# ''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र
विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी
सादर केलेला शोधप्रबंध

स्थापना १९२१


संशोधक

**श्री. प्रभुदास आनंदराव खाबडे**

पी.आर.एन : ०२११५००८३३४

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. माणिकराव सोनावणे**
समन्वयक, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


**राज्यशास्त्र विभाग**

**मे, २०२४**

# ''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र
विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी
सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

**श्री. प्रभुदास आनंदराव खाबडे**

पी.आर.एन : ०२११५००८३३४

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. माणिकराव सोनावणे**
समन्वयक, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


**राज्यशास्त्र विभाग**

**मे, २०२४**

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, ''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास'' हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. माणिकराव सोनावणे, यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे राज्यशास्त्र विभागामध्ये पीएच्. डी. पदवीसाठी हा शोधप्रबंध सादर केला आहे. हा शोधप्रबंध यापूर्वी इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक :     /०५/२०२४

संशोधक

**श्री. प्रभुदास आनंदराव खाबडे**
राज्यशास्त्र विभाग
श्री. विजयसिंह यादव महाविद्यालय,
पेठवडगाव, कोल्हापूर

# प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, श्री. प्रभुदास आनंदराव खाबडे यांनी ''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास'' हा प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेच्या पीएच्. डी. पदवीसाठी सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रबंध हा श्री. प्रभुदास आनंदराव खाबडे यांचा स्वत:चा आहे. त्यासाठी त्यांनी अनेक अस्सल व विश्वसनीय साधनांचा वापर करून माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या लिहिला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेच्या पीएच्. डी. राज्यशास्त्र पदवीच्या पूर्ततेसाठी तो सादर करण्यात येत आहे.

स्थळ : पुणे

दिनांक :     /०५/२०२४

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. माणिकराव सोनावणे**
समन्वयक, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# ऋणनिर्देश

''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास'' या शिर्षकाचा शोधप्रबंध राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी. पदवीसाठी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या' राज्यशास्त्र विभागामध्ये सादर करीत असताना या संशोधन कार्यासाठी ज्यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन व सहकार्य लाभले त्यांचे प्रती ऋण व्यक्त करणे, हे मी माझे कर्तव्य समजतो. हा प्रबंध पूर्णावस्थेस येण्याचे श्रेय माझे पीएच्. डी. चे मार्गदर्शक आदरणीय गुरूवर्य डॉ. माणिक सोनावणे यांचे आहे. त्यांनी माझा हा प्रबंध अधिक प्रगल्भ व्हावा म्हणून सातत्याने प्रयत्न केले. त्यांचा मी नेहमीच ऋणी राहीन.

हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने' प्रशासकीय सहकार्य केल्यामुळेच हा प्रबंध पूर्णत्वास पोहचु शकला त्याबद्दल मी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या'

प्रशासकीय विभागाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. तसेच 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे' सुसज्ज ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठाचे बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर, लालबहाद्दुर शास्त्री महाविद्यालय, साताराचे ग्रंथालय, छ. शिवाजी कॉलेज साताराचे ग्रंथालय तसेच माझ्या कॉलेजचे श्री विजयसिंह यादव ग्रंथालय व या ग्रंथालयामधील ग्रंथपाल यांनी वेळोवेळी प्रबंधासंबंधी सर्व प्रकारचे संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिले. मी या सर्व ग्रंथालयांचा व सर्व ग्रंथपालांचा मनापासून ऋणी आहे.

तसेच माझ्या या संशोधन कार्यासाठी श्री. शाहू शिक्षण प्रसारक सेवा मंडळाचे बहुमोल सहकार्य लाभले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. श्रीमंत विजयसिंह यादव (साहेब) यांच्या आशीर्वादामुळेच हा प्रबंध पूर्ण झाला असे मी मानतो. संस्थेचे अध्यक्ष श्री. गुलाबराव पोळ (साहेब) यांची प्रेरणा व मार्गदर्शन, उपाध्यक्ष आदरणीय विजयादेवी यादव (आईसाहेब) यांचे आशीर्वाद, सचिव सौ. विद्याताई पोळ (ताईसाहेब) यांचा स्नेह हा या प्रबंधाच्या पूर्णत्वाचे प्रमुख कारण आहे. तसेच महाविद्यालयाच्या आजपर्यंतच्या सर्व प्राचार्यांचे प्रोत्साहन हे ही या प्रबंधाच्या यशाचे कारण होय. श्री. विजयसिंह महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. अधिकराव निकम व महाविद्यालयामधील सर्वच माझे सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी मित्रांचे सहकार्य व सदिच्छा ही या प्रबंधाचा पूर्णत्वाची प्रेरणा होय.

शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र भणगे सर, बाळासाहेब देसाई कॉलेज पाटणचे, प्राचार्य डॉ. शिरीष पवार सर, डॉ. सुनिल साठे–श्रीमती विजयादेवी देसाई कॉलेज, दौलतनगर पाटण, डॉ. वावरे, डॉ. धोंडे, डॉ. खळदकर, डॉ. संपकाळ, डॉ. सलीम पठाण, डॉ. करीम मुल्ला, हेरले गावचे श्री. देवदान कांबळे, श्री. शशुपाल कुरणे, श्री. प्रशांत खाबडे, श्री. आकाश वीरभक्त, श्री. अभिजित विरभक्त, श्री. जालंदर उलसार, श्री. सुधीर कोले, श्री. अमोल लोकरे, श्री. अजित खाबडे, श्री. संदीप कुरणे, श्री. कुलभूषण कुरणे यांचे सहकार्य लाभले.

शेवटी ज्यांचा आशिर्वादाशिवाय हे काम पूर्णच होऊ शकले नसते ते माझे वडील कै. ॲड. आनंदराव खाबडे, आई श्रीमती सुमन खाबडे, सासरे श्री. विजय कांबळे, सासू सुनंदा कांबळे, वडील बंधु डॉ. सुरेश खाबडे, वहिणी संध्याराणी, पत्नी सुरेखा, मुले राजवर्धन व अनिकेत या सर्वांचा अत्यंत मोलाचा वाटा आहे.

सदर शोधप्रबंधाचे टंकलेखनाचे, झेरॉक्सचे व बायडिंगचे काम करणारे श्रीकांत कॉम्प्युटर्स यांचा मी अत्यंत ऋणी आहे. शेवटी हा शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्या ज्ञात–अज्ञातांचे मला मार्गदर्शन व सहकार्य लाभले अशा सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

आपला,
अभ्यासक

**(श्री. प्रभुदास आनंदराव खाबडे)**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| | मुखपृष्ठ | I |
| | प्रतिज्ञापत्र | II |
| | प्रमाणपत्र | III |
| | ऋणनिर्देश | IV-V |
| | अनुक्रमणिका | VI |
| प्रकरण : १ | प्रस्तावना | १–६७ |
| प्रकरण : २ | संदर्भ साहित्यांचा आढावा | ६८–९७ |
| प्रकरण : ३ | संशोधन पद्धती | ९८–११६ |
| प्रकरण : ४ | काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण | ११७–२३२ |
| प्रकरण : ५ | सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी | २३३–२५९ |
| | संदर्भग्रंथ सुची | २६०–२७० |

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

**प्रस्तावना**

आधुनिक भारतातील बहुजन राजकारणाचा अभ्यास करीत असताना बहुजन समाज ही संकल्पना प्रथम अभ्यासणे गरजेचे आहे; कारण बहुजन समाज या संकल्पनेच्या आधारे बहुजन राजकारण आकारास आलेले आपल्याला दिसते. समकालीन सामाजिक, राजकीय क्षेत्रात 'बहुजन समाज' आणि बहुजन राजकारण हे शब्द आज परवलीचे शब्द बनलेले आहेत. बहुजन हा शब्द मुळात शक्तीदर्शक आहे. बहुजन या संकल्पनेचा आजमितीपर्यंत विविध विचारवंत, राजकारणी तसेच समाजसुधारकांनी विविध पैलूंनी अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अगदी या संकल्पनेत कोणत्या समाजघटकांचा समावेश करता येईल, इथपासून ते कोणाला या संकल्पनेबाहेर टाकायचे इथपर्यंत वादाचे विषय आहेत. या संकल्पनेला जातसंघटनाच्या पार्श्वभूमीवर हितसंबंधाचा दावा करण्याची एक विशिष्ट कडा आहे. जातसंघटनांनी भौतिक मागण्या गेल्या तीन दशकात केल्या असल्या, तरी अशा मागण्या करण्याचा प्रारंभ सुरूवात ब्रिटिश राजवटीत झाला. भौतिक मागण्या करण्याचा एक संदर्भ लोकशाही हा आहे; कारण लोकशाही प्रक्रियेत लोकांचा सहभाग जसजसा वाढत गेला. तसतसा जात या घटकाचाही सहभाग वाढत गेला. उदा. म. फुले यांनी उच्च जातीचा प्रतिकार केला. तेव्हा त्यांनी जातिव्यवस्थेविरोधी लढे उभे केले.

महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यतेचा मुद्दा राजकारणात आणला शिवाय बहुजनवाद हा विचार मांडला यामध्ये जात हा घटक होता. छ. शाहू महाराजांनी ब्राम्हणेतर चळवळीला पाठिंबा दिला आणि राखीव जागांचा मुद्दा मांडला. या प्रक्रियेचा आधार जात हा घटक राहिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीव्यवस्थेची समीक्षा करून जाती विषमतेविरूद्ध लढा दिला. 'शेडयुल्ड कास्ट फेडरेशन' हा पक्ष स्थापन केला होता. या प्रक्रियेत उच्च जातीचा प्रतिकार, जातिसंस्थेच्या विषमतेस विरोध हे मुद्दे होते. याशिवाय राजकीय प्रतिनिधित्वाचा मुद्दा देखील होता. या मुद्याबरोबर शिक्षण, नोकरी आणि शासन या तीन क्षेत्रांमध्ये सत्ता कोणाकडे व किती असावी याबाबत वाद साकारत गेला.[१] बहुजन राजकारण ही संकल्पना राज्यशास्त्रामध्ये अलिकडच्या कालखंडात एक प्रमुख संकल्पना म्हणून अभ्यासली जात असली तरी तिच्या

उदयाचे संदर्भ हे प्राचीन असे आहेत. पण अलिकडे त्याला नवे संदर्भ जोडले गेले आहेत. बहुतेकदा भारतीय राजकारणात बहुजन समाज या संकल्पनेच्या आधारे विविध सत्ताकेंद्रे पादाक्रांत करण्याचे एक धारदार शस्त्र म्हणून बऱ्याचदा या संकल्पनेचा वापर झाल्याची अनेक उदाहरणे पहावयास मिळतात. या संकल्पनेच्या आधाराने अखिल भारतीय समाज जीवनाचे बहुजन समाज म्हणून संघटन करून या संघटीत शक्तीचे रूपांतर राजकीय सत्तेत करून घेण्याचा प्रयत्नच मोठ्या प्रमाणात झाला. असे करीत असताना असे सांगितले जाते की, भारतात तथाकथित उच्चवर्णीयांनी असंख्य वर्षे बहुसंख्य शोषित समाजाची पिळवणूक केली. साधे मानवतेचे हक्क नाकारले, परिणामी हा समाजघटक संख्येने बहुसंख्य असुनही सामाजिक आणि राजकीय अशा विविध क्षेत्रातून जाणीवपूर्वक बहिष्कृत केला गेला. परिणामी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' ही घोषणा बाजूला पडून अल्पजनांचाच मोठ्या प्रमाणात विकास झाला आणि शोषित समाजाचे कल्याण आणि उद्धार जसा व्हायला हवा तसा झाला नाही. मात्र आधुनिक भारतात ब्रिटिशांच्या आगमनाने काही बदलांची चाहुल लागली.

**बहुजन समाज संकल्पना आणि बहुजन राजकारण : उदय आणि विकास**

भारतीय समाजाचे जातीव्यवस्था हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. भारतीय समाज हा चातुवर्ण्य आणि जातीभेदामध्ये विभागला गेला आहे. त्यामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ जाती अशी वर्ग विभागणी निर्माण झाली असून, वरिष्ठ वर्णीयांनी कनिष्ठ वर्णातील जातीवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. परिणामी समाजातील विकासाची सर्व सत्ता स्थाने आपल्या हाती ठेवण्यात वरिष्ठ जाती यशस्वी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेतील संख्येने मोठा असलेला 'बहुजन समाज' अनेक क्षेत्रात मागास राहिला. त्यांचे हे मागासलेपण व्यवस्थापरिवर्तनाच्याद्वारे दूर करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे या प्रमुख भूमिकेतून प्राचीन काळी गौतम बुद्ध, १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून म. जोतिबा फुले यांनी, १९०२ या साली आरक्षण व ब्राम्हणेत्तर चळवळीच्या माध्यमातून छ. शाहू महाराज, बहुजन पक्षाच्या माध्यमातून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी, तर आरक्षण, दलितोद्धाराच्या व भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जोरदार आवाज उठवून बहुजन समाजास सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिकदृष्ट्या जागृत केले. व आपल्यावर होणाऱ्या

अन्याय–अत्याचाराविरूद्ध संघटितरित्या लढा देण्यास प्रवृत्त केले. परिणामतः भारतीय समाजातील बहुजन समाज जागृत होऊन त्यांच्या मध्ये ऐक्य निर्माण होऊन संघटित होण्यास मोठी मदत झाली. या पार्श्वभूमीवर गौतम बुद्ध, म. फुले, छ. शाहू महाराज, म. वि. रा. शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजाच्या प्रश्नावर उभी केलेली सामाजिक, राजकीय चळवळ बहुजन समाजामध्ये झालेली समाज जागृती, बहुजन समाजाचे संघटन, त्यांचा झालेला सर्वांगिण विकास, त्यामध्ये आलेले अडथळे व केलेला संघर्ष या व अशा अनेक प्रश्नांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणाला सुरवात करण्यापूर्वी ‘बहुजन’ ही संकल्पना समजावून घेऊ.

**बहुजन समाज म्हणजे काय?**

भारतीय समाजव्यवस्थेचे जात हे वैशिष्ट्ये आहे. जातीची एक उतरंड भारतात पाहण्यास मिळते. ज्यामध्ये एक जात दुसरीहून श्रेष्ठ आहे. ज्या जातीचे शोषण होते व ज्यांना प्रतिनिधित्वापासून दूर ठेवले जाते त्यांच्या लक्षात ही ही गोष्ट येत नाही की, त्यांचे शोषण हे चातुवर्ण्यव्यवस्थेमुळे होत आहे. प्रत्येक जातीत एकच भावना असते की, आपण कोणत्या तरी जातीपेक्षा श्रेष्ठ जातीचे आहोत. पण ज्या महापुरूषांच्या लक्षात या जाती व्यवस्थेची उतरंड व निर्मितीचा उद्देश लक्षात आला त्यांनी हे दाखवून दिले की, समाजव्यवस्थेतील प्रभु जाती सोडून इतर सर्वजण कनिष्ठ जातीतील असून, ते बहुजन आहेत. प्रत्येक महापुरूषाने बहुजन समाजाचा आशय आपल्या पद्धतीने लावला. त्यातून आपल्याला बहुजन समाज म्हणजे कोण हे स्पष्ट होते. भारतात प्राचीन काळापासून बहुजन ही संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज तर भारतात मोठ्या प्रमाणात बहुजन समाज, बहुजन राजकारण याची चर्चा होताना दिसते. ढोबळमानाने आपण असे म्हणू शकतो की, जे संख्येने जास्त आहेत ज्यांना व्यवस्थेचे लाभ मिळत नाहीत किंवा त्यांना लाभापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले जाते. ज्यांना समाजामध्ये विषमतेची, कमीपणाची वागणूक मिळते ज्यांचे हक्क डावलले जातात त्यांना बहुजन समाज असे म्हटले जाते. या बहुजन समाजाच्या हक्कासाठी, प्राचीन काळापासून समाजकारण व राजकारण केले जात आहे. अनेक चळवळी आंदोलने त्यासाठी उभारली गेल्याचे दिसून येते.

बहुजन समाज म्हणजे शारिरीक कष्टाची कामे करणारा शोषित उपेक्षित दुर्लक्षित समाज घटक होय. या समाज घटकाला भारतीय समाजव्यवस्थेत ब्राम्हण व सवर्ण जातीकडून पराकोटीची नीच व हीन दर्जाची वागणूक मिळत होती. त्यांना गावकुसाबाहेर ठेवण्यात आले होते. व्यवसायावरून जाती ठरवून त्यांचे शारिरीक व मानसिक शोषण केले जात होते. त्यांना माणुसकीचे सर्व हक्क नाकारले गेले होते. यावरून भारतातील मागास व अल्पसंख्यांक समाज घटक म्हणजे ब्राम्हण जात वगळून बाकी सर्व समाज घटक म्हणजे 'बहुजन समाज' होय असे म्हटले तर फारसे चुकीचे ठरणार नाही.[२] अशा या जाती भारतीय समाजव्यवस्थेच्या बळी ठरून त्या अनेक क्षेत्रात मागास राहिल्या होत्या. त्यांचे हे मागासलेपण दुर करून त्यांच्यामध्ये आत्मसन्मानाची, आत्मनिर्भतेची जाणीव जागृत करून त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याच्या प्रमुख भूमिकेतून प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत ज्या समाज सुधारकांनी वेगवेगळ्या कालखंडात अनेक चळवळी व आंदोलने उभारली.

भारतात ब्रिटिशाच्या आगमनाने आधुनिक कालखंडाची सुरूवात झाली. भारतात ब्रिटिश आल्याने तीन महत्वाच्या गोष्टी घडल्या पहिली गोष्ट भारतीयांवर गुलामगिरी लादली गेली. दुसरी गोष्ट भारतीय आणि ब्रिटिश यांच्यात शासक आणि शासित असे संबंध निर्माण झाले. तिसरी महत्वाची गोष्ट ब्रिटिशांच्या आगमनामुळे भारतात आधुनिकतेची सुरूवात झाली. परंतु त्याहुनही महत्वाची आणखी एक गोष्ट म्हणजे ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी जो शोषित, वंचित, बहिष्कृत समाज घटक भारतातील तथाकथित उच्चवर्णीय लोकांच्या सामाजिक, राजकीय आणि मानसिक गुलामगिरीत होता. ब्रिटिश आल्यानंतर त्यांच्या गुलामगिरीचे दास्याचे स्वरूप बदलून गेले ते आता केवळ गुलाम नव्हते, तर 'गुलामांचे गुलाम' होते. परिणामी माणूसकीला काळीमा फासणाऱ्या घटनांचा दररोज सामना करणे, हे या वंचित समाजबांधवाच्या वाट्याला आले. परंतु ब्रिटिशांचे आगमन हे भारतात आधुनिकता सुरू करणारे ठरले होते. ही पुरोगामी आधुनिक दृष्टी त्यांना पश्चिमेकडील धर्मसुधारणा आंदोलनाने दिली होती. आधुनिकतेची प्रथम ओळख पश्चिमी राष्ट्रांना झाली होती. पश्चिमेकडे गॅलीसियस पासून जॉन हस, मार्टिन ल्यूथर, मॅकीयाव्हेली पर्यंत अनेक लोकांच्या चिंतनातून बुद्धिप्रामाण्यवाद रूजला होता. कार्ल मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद तर पूर्णतः बुद्धीप्रामाण्यावर आधारित होता. धर्माला त्याने अफुची गोळी म्हटले होते. बुद्धीप्रामाण्यवादाची परंपरा फार पुर्वीपासून सूरू होती. पश्चिमी देशात इ. स.

पाचव्या शतकापासून प्रबोधनाला सुरूवात झाली होती. पाचव्या शतकात गॅलॅशियसने 'दोन तलवारीचा सिध्दांत सांगून धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यांच्यातील संबंधांना अधोरेखित केले होते. त्याने असे सांगितले होते की, समाजाच्या आध्यात्मिक कल्याणाची काळजी धर्माने घ्यावी आणि लोकांच्या भौतिक सुखाची काळजी राज्याने करावी.[३]

**बहुजन संकल्पना**

काही योग्य व रास्त निष्कर्ष काढायचे असतील तर ती संकल्पना चांगल्या प्रकारे समजून घ्यावी लागते. तसेच त्याचा इतिहास समजून घ्यावा लागतो. बहुजन ही संकल्पना समजावून घेण्यासाठी गौतम बुद्ध, म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. वि. रा. शिंदे यांचे समाजकार्य अभ्यासने गरजेचे आहे. त्यांच्या बहुजन समाजामध्ये कोणाकोणाचा समावेश होतो व कोणाचा होत नाही. याचा अभ्यास केला तर त्याचा उलगडा होतो.

बहुजन राजकारणातील बहुजन ही संकल्पना चरथ–भिक्कवे चारिकं बहुजन हिताय–बहुजन सुखाय या बुद्धांच्या तत्त्वज्ञानातून उदयास आली. बुद्धांनी लोकांना दुःखातून मुक्त करण्यासाठी आपल्या चिंतनातून जो मार्ग शोधला होता तो जास्तीत–जास्त लोकांपर्यंत पोहचावा, असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी 'बहुजन हिताय – बहुजन सुखाय' असे शब्द वापरले. बुद्धांनी आपल्या बहुजन या शब्दातून कोणत्याही जाती अथवा वर्णाला वगळले नाही. काळाच्या ओघात बहुजन या शब्दाला अनेक अर्थ प्राप्त झाले आहेत व प्रांतनिहाय त्याचे संदर्भही वेगवेगळे आहेत.

म. जोतिबा फुले यांनी बहुजन समाजाच्या व्याप्तीमध्ये भारतीय समाज घटकातील शूद्र अतिशूद्र व स्त्रियां यांचा समावेश केला. कारण समाजातील हे तीन घटक संख्येने जास्त असून ते अनेक सुविधांपासून व विकासापासून वंचित तर होतेच, शिवाय त्यांना माणूस म्हणून माणुसकीचे साधे हक्क ही भारतीय समाजव्यवस्थेने नाकारलेले होते, म्हणून त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून दिला. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये सामाजिक वंचिततेची व हक्क अधिकारांची जाणीव निर्माण केली.

बहुजन म्हणजे स्त्री, शुद्रातिशुद्र जनसमूह असा अर्थ प्रामुख्याने क्रांतीबा फुले यांनी केला. फुले स्वतः शुद्रातिशुद्र हाच शब्द प्रामुख्याने वापरत. हे खरे असले तरी यात येथील स्त्री, रयत, गोर–गरीब लोक, नागवलेला कुणबी व शेतकरी वर्ग इत्यादींचा समावेश होता.

छ. शाहू महाराजांनी समाजातील शोषित, उपेक्षित, दलित व इतर मागासवर्गीयांसाठी १९०२ मध्ये आपल्या संस्थानामध्ये ब्राह्मण सोडून ब्राम्हणेत्तरांना आरक्षणाच्या माध्यमातून नोकऱ्या दिल्या आणि त्यांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. छ. शाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तरांना एकत्रित करून त्यांच्यामध्ये सामाजिक व राजकीय जाणीव जागृती केली.

छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन हा शब्द वापरलेला नसला तरी त्यांच्या १९०२ च्या संस्थानाच्या हुकुमात ब्राह्मण, प्रभू, शेणवी सोडून उरलेले सर्व मागासलेले अशी व्याख्या केलेली आहे. म्हणजे त्यांचे ब्राह्मणेत्तर राजकारण बहुजन या संकल्पनेत येते.

म. विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलित, मागासवर्गीयामध्ये आपल्या हक्क अधिकाराविषयी जाणीव जागृती केली. त्यांना राजकीय सत्तेत वाटा मिळाला तरच त्यांच्या समस्या सुटतील व त्यांची सर्व क्षेत्रात विकास होईल, या प्रमुख भूमिकेतून त्यांनी १९२० मध्ये बहुजन पक्ष स्थापन केला.

आधुनिक काळात बहुजन हा शब्दप्रयोग विठ्ठल रामजी शिंदे यांनी उपयोगात आणल्याचे दिसते. त्यांनी बहुजन पक्ष (१९२०) या राजकीय पक्षाची स्थापना केली. त्यांच्या बहुजन पक्षात स्त्रिया, शेतकरी, शिपाई, वाणी, उदणी, दुकानदार, मजूर, अस्पृश्य या आठ वर्गांचा समावेश केलेला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशन आणि रिपब्लिकन पक्ष वेगवेगळ्या हेतूने स्थापन केले. बहुजन समाजासाठी स्वतःचे एक राजकीय विचारपीठ असावे, हा उद्देश बाबासाहेबांचा होता. या पक्षामध्ये त्यांनी सर्व शोषित जाती–जमातींना सहभागी करून घेतले होते. या पक्षांच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाच्या अनेक प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. १९३८ मध्ये रेल्वे कामगारांच्या सभेत बोलताना त्यांनी ब्राह्मणशाही व भांडवलशाही हे दोन बहुजन समाजाचे प्रमुख शत्रू आहेत, असे म्हटले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन संकल्पनेचा स्वीकार केला होता. १९३७ साली मुंबई येथे झालेल्या भाषणात त्यांनी श्रमजीवी बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी

स्थापन केलेला स्वतंत्र मजूर पक्ष जिंवत ठेवावयाचा आहे असे उद्गार काढले होते. त्यांच्या बहुजन संकल्पनेत स्त्री, अस्पृश्य, पददलित, मागासवर्ग, कामगार, शेतमजूर इत्यादींचा समावेश होता.

काशीराम यांनी बहुजन पक्ष स्थापन करण्याअगोदर 'ब्राह्मण बनिया ठाकूर चोर, बाकी सब डीएसफोर' म्हणजेच 'दलित, शोषित समाज संघर्ष समिती' अशी घोषणा केली होती. या घोषणेचा अर्थ शोषित समाज घटक असा आहे. ब्राह्मण, बनिया, ठाकूर या जातीत शोषित उपेक्षित नाहीत तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या वर्णातील सर्व जातींतील सर्व जाती शोषक आहेत, अशी ही त्यांची भूमिका आहे. म्हणून त्यांनी बी.सी., ओबीसी जातीचे संघटन करून उरलेल्या सर्व जातींना विरोध करून १४ एप्रिल १९८४ मध्ये 'बहुजन समाजपक्ष' या राजकीय पक्षाची स्थापना केली.[८] बहुजन समाजाची संकल्पना स्पष्ट करताना गौतम बुद्ध, म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. वि.रा. शिंदे यांनी अशाप्रकारे आपले विचार मांडले. तसेच वेगवेगळ्या मार्गाने राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांची निर्मिती करून, त्यांच्यामध्ये ऐक्य निर्माण करून त्यांची संघटनात्मक बांधणी केली. ज्या जाती भारतीय समाजव्यवस्थेच्या बळी ठरून अनेक क्षेत्रांमध्ये मागास राहिल्या होत्या. त्यांचे मागासलेपण दूर करून त्यांच्यामध्ये आत्मसन्मान, आत्मनिभर्रता यांची जाणीव, जागृत करून त्यांचा विकास घडवून आणण्याच्या भूमिकेतून प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या समाजसुधारकांनी वेगवेगळ्या कालखंडात अनेक चळवळी व आंदोलने केली.

**बहुजन समाज आणि बहुजन राजकारण म्हणजे काय?**

''बहुजन समाजात काबाडकष्ट करणाऱ्या सर्व जनसामान्यांचा''[४] समावेश होतो. ज्या समाजघटकाला भारतीय समाजजीवनात पराकोटीची हीन दर्जाची वागणूक मिळत होती. ज्या समाजाला नैसर्गिक मानवी हक्कच नाकारले गेले नाहीत. तर सार्वजनिक पाणवठ्यापासून ते सर्वच सार्वजनिक, खाजगी बाबींपासून किंबहुना ठिकाणांपासून सुद्धा बहिष्कृत करण्यात आले. त्यांना बहुजन समाज म्हटले जाते. काळानुरूप समाजव्यवस्था बदलत आहे. या पार्श्वभूमीवर बहुजन कोण यासंदर्भात नव्याने विचार आणि व्याख्या करण्याची आज गरज आहे. बहुजनाची व्याख्या ही जात आणि वर्ग या दोन घटकांच्या आधारे व्याख्या करता येवू शकते. पश्चिमी युरोपीय राष्ट्रांतून आपल्याला वर्गीय समाजव्यवस्था आढळते त्या तुलनेत भारतात वर्ण

आढळतात. परंतु भारतात जातींच्या तुलनेत वर्गीय समाजरचा तितकी ठळक दिसत नाही. यामुळे भारतासंदर्भात बहुजनांची व्याख्या ही जात या घटकाच्या आधाराने करावी लागते. यावरून 'सर्व मागास जाती आणि अल्पसंख्यांक समाजघटक म्हणजे बहुजन समाज.' अर्थात बहुजन म्हणजे, ब्राम्हण वगळून ज्याला ब्राम्हण्याचा स्पर्श झालेला नाही, त्या बहुसंख्य समाजाला बहुजन समाज म्हटले तर वावगे ठरणार नाही.

स्वतंत्र जैन यांच्या मते, ''बहुजन म्हणजे असे लोक जे या देशात बहुसंख्येने आहेत. ज्यांना आज अनुसूचित जनजाती आणि अतिमागास जाती, धर्मांतरित अल्पसंख्यांक या नावाने ओळखले जातात. अर्जुनसेन गुप्ता समितीच्या रिपोर्टनुसार या देशात ८४ टक्के लोक गरीब आहेत. यापैकी ७७ टक्के लोक हे बहुजन समाजातील आहेत. या अहवालात या बहुजन समाजाचा सांस्कृतिक दृष्टीने मागास, सामाजिक भेदभावाचे बळी गेलेले लोक आणि शैक्षणिक दृष्टया मागासलेला बहुसंख्य समाजघटक असा उल्लेख करण्यात आलेला आहे.''[५] अर्थात भारतातील आजचा बहुजन समाज हा सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेला, राजकीयदृष्टया दुर्लक्षित आणि सामाजिकदृष्टीने पराकोटीच्या भेदभावाला बळी पडलेला आहे. या मागासलेल्या जनजाती आणि धर्मांतरीत अल्पसंख्य समाजघटकाला प्रचंड भेदभावाला सामोरे जावे लागले आज हा समाजच बहुजन समाज म्हणून संघटित होत आहे. त्यांच्या संघटनांचे राजकीय शक्तीत रूपांतर होत आहे.

**बहुजन राजकारण अर्थ**

बहुजन राजकारण ही संकल्पना स्पष्ट करताना राजकारणही संज्ञा समजून घेणे महत्त्वाचे ठरते. राजकारण म्हणजे (Politics) म्हणजे राजनीती होय. संस्कृत भाषेत राजनीतीचा अर्थ राजाची नीती.[६] परंतु आधुनिक काळात राजनीतीचा अर्थ व्यापक दृष्टिकोणातून पाहिला जातो. रॉबर्ट डाल्ह यांच्या मते, मानवी समुदायावर सत्ता चालविण्यासाठी आणि नियंत्रण ठेवण्यासाठी जे कौशल्य लागते त्यास राजनीती किंवा राजकारण असे संबोधले जाते. जॉर्ज कॅटलिन यांच्या मते, संपूर्ण राजनीती ही सत्ता (शक्ती) आणि संघर्ष यांच्याशी संबंधित असते. (Politics is the struggle for power or the influencing of those in power, -ll Politics is by its nature Power Politics) मैक्स वेबर यांच्या मते, राजनीती (राजकारण) म्हणजे सत्ताप्राप्तीसाठी संघर्ष करावा लागतो. राजनीती आणि सत्ता यांचा संबंध घनिष्ठ असतो. राज्यातील समुदायांमध्ये

चालणारा संघर्ष आणि संबंध राजनीतीमध्ये समाविष्ट असतात. सत्ताप्राप्तीसाठी, सत्ता टिकविण्यासाठी लोकांमध्ये संघर्ष चालू असतो. क्रिन्सी राईट यांच्या मते, राजकारण ही एक अशी कला आहे की, ज्याद्वारे प्रत्येक समूह दुसऱ्या समूहावर नियंत्रण ठेवून प्राप्त परिस्थितीत आपले हितसंवर्धन करीत असतो. राजनीती किंवा राजकारण ही प्रक्रिया सुरू होण्यासाठी समूहांचे अस्तित्व असावे लागते. अशा समूहांत परस्परांचे नियंत्रण चालू असते. प्रत्येक समूह आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी दुसऱ्या समुहाबरोबर संघर्ष (विवाद) करीत असतो. अशा संघर्षातून राजकारण घडत असते. सत्ताप्राप्तीसाठी केला जाणारा संघर्ष म्हणजेच राजकारण होय. सत्ता राजनीतीचे (राजकारणाचे) अनिवार्य तत्त्व आहे. प्रत्येक समूह आपली सत्ता टिकविण्यासाठी समुहावर प्रभाव (नियंत्रण) पाडीत असतो, संघर्ष करीत असतो. अशा संघर्षातून राजकारण घडत असते. अर्थात, समूहामध्ये सहयोग, मैत्रीपूर्ण स्नेहसंबंध असतात.

समुह पातळीवरील समुहा–समूहामध्ये चालणारे राजकारण हे सहकार्य आणि संघर्ष या दोहोंशी संबंधित असते. राजकारण म्हणजे समुहा–समुहातील संबंधाचे राजकारण होय. समूह हित (Interest), संघर्ष (Conflict) आणि सत्ता (Power) या तीन महत्त्वपूर्ण घटकांशी राजकारणाचा संबंध येत असतो. समूह हितासाठी समूह परस्परांशी मतभेद, संघर्ष करीत असतात, त्यासाठी सत्तेचा वापर करीत असतात. समुहा–समुहात संघर्ष नसेल तर समूहहित आणि सत्ता यांना फारसे महत्त्व राहत नाही, तेव्हा संघर्ष हाच राजकारणाचा आधार आहे. तरीपण केवळ संघर्षाला महत्त्व देता येणार नाही. प्रत्येक समूह दुसऱ्या समुहाशी संघर्षच करीत असतो असे नाही, तर समुह परस्परांशी मैत्रीपूर्ण संबंध, सहयोग, सहकार्य याद्वारे समुहहित जोपासताना दिसतात. जोसेफ फ्रँकेल यांच्या मते, राजकारणात संघर्षांबरोबरच सहकार्यालाही तेवढेच महत्त्व असते. सामाजिक आंतरक्रियेत संघर्ष आणि शांतता या दोन घटकांना महत्त्वपूर्ण स्थान असते.[७]

बहुजन राजकारण म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेमध्ये ज्या–ज्या जाती कनिष्ट मानलेल्या आहेत, ज्यांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्तर निम्न आहे, ज्याना पुरेशा प्रमाणात समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळालेले नाही. त्यांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळून समतावादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी ज्या–ज्या कृती केल्या जातात त्याला बहुजन राजकारण असे म्हणता येईल.

## प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेतील बहुजन समाजाचे सामाजिक, राजकीय संदर्भ

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये संख्येने मोठा असलेला बहुजन समाज अनेक क्षेत्रात मागास राहिला. त्याचे हे मागासलेपण दूर करून विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणून त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या प्रमुख भूमिकेतून प्राचीन काळी चार्वाक, गौतम बुद्ध, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून म. जोतिबा फुले, १९०२ मध्ये आरक्षण व ब्राह्मणेत्तर चळवळीच्या माध्यमातून छ. शाहू महाराज, म. विठ्ठल रामजी शिंदे, पेरियर रामस्वामी नायर यांनी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित उद्धाराची चळवळ व भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून जोरदार आवाज उठवून बहुजन समाजास सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीयदृष्ट्या जागृत केले व आपल्या होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध संघटितरित्या लढा देण्यास प्रवृत्त केले. परिणामतः भारतीय समाजातील समस्त बहुजन समाज, आपल्या हक्क व अधिकारांविषयी जागृत होऊन, संघटित होऊ लागला. या पार्श्वभूमीवर गौतम बुद्ध, चार्वाक, म. जोतिबा फुले, छ. शाहू महाराज, पेरियार रामस्वामी नायर, म. वि. रा. शिंदे, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजाच्या विविध प्रश्नांवर उभी केलेली सामाजिक व राजकीय चळवळ त्यांचे संघटन तसेच यांच्या समाजजीवनावर झालेला परिणाम याचा सविस्तर आढावा प्रस्तुत प्रकरणांमध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### १. चार्वाक

प्राचीन भारताच्या इतिहासामधील एक उपेक्षित व हेटाळणी केलेले दर्शन म्हणजेच चार्वाक तत्त्वज्ञान अशी चूकिची मांडणी करण्यात आलेली होती. हे तत्त्वज्ञान अन्याय व शोषणावर जबरदस्त आघात करणारी एक स्फोटक आणि जळजळीत विचारसरणी होती. पारलौकिक भ्रमांच्या पाठीमागे धावण्याऐवजी पहिल्या श्वासापासून अखेरच्या श्वासापर्यंतचे वास्तव असे मानवी याच जगात निकोप प्रयत्नाद्वारे निरामय आनंदाने जगावे असे सांगणारी इहवादी, जीवनवादी आणि आनंदवादी विचारसरणी.[९] चार्वाक दर्शन हे समतावादी असल्याचे दिसते. म्हणूनच चार्वाकांनी चातुवर्ण्य व्यवस्थेवर संकल्पनेवर कडाडून हल्ला चढविला. त्याचे असे स्पष्ट मत होते की, सर्व मानवाच्या शरीरातील मुख वगैरे अवयव समान असताना त्यांच्यात उच्चनीचता कसली आली आहे?[१०]

चार्वाकांच्या काळामध्ये चातुवर्ण्याने निर्माण केलेल्या उच्चनीचतेचा त्रास अनेक लोकांना होत होता. जो वैदिक संस्कृतीतून आलेला होता. चार्वाक हे अवैदिक होते. चार्तुवर्ण्य व्यवस्थेने एके काळी ज्ञानाचा अधिकार अवैदिक असणाऱ्या सर्वांना नाकारला होता. काही मुठभर लोकांना ज्ञानाचा अधिकार होता. बाकीचे इतर बहुजन समाजातील लोक ज्ञानाच्या व इतर अधिकारापासून वंचित होते. म्हणूनच गौतम बुद्धापासून म. फुलेपर्यंत अनेक महात्म्यानी सर्वसामान्य बहुजनाच्या अधिकारासाठी संघर्ष केल्याचे दिसून येते. चार्वाक दर्शनाने सुद्धा सर्वसामान्य लोकांच्या अधिकाराचे ठामपणे समर्थन केल्याचे दिसते.[११]

मानवी जीवनामध्ये असणारे दुःख टाळून लौकिक सुख सर्व मानवाना कसे मिळवून देता येईल हा त्यांचा विचार होता. या विचाराच्या मार्गातील मोठा अडथळा विषमतावादी वर्णव्यवस्था असल्याने चार्वाकांनी वर्णव्यवस्थेबरोबर ईश्वर, कर्मकांड, यज्ञ याग या गोष्टी नाकारल्या. सर्व लोकांना समान अधिकार असतात ही भूमिका चार्वाकांनी घेतलेली दिसून येते. चार्वाक दर्शन म्हणजे बहुजन समाजाचे दर्शन असे मानले गेले. या चार्वाक दर्शनालाच अवैदिक दर्शन असेही म्हटले गेले. म्हणजेच हे बहुजन समाजाचे दर्शन आहे. या दर्शनाची निर्मिती असूरांच्या सिंधू संस्कृतीमध्ये झाली होती. सिंधू संस्कृतीचे निर्मिती असलेल्या हिरण्यकश्यपू, विरोचन, बळी इ. असूर राजाची जीवन पद्धती व समाजव्यवस्था हीच या दर्शनाच्या रूपाने पुढे विकसित झाली.

चार्वाकांनी वेदावर आक्षेप घेतले व त्यांनी ईश्वर नाकारलेला आहे. त्यामुळे वेद हे मानव निर्मित आहेत. असे त्यांचे म्हणजे आहे. त्यामुळे वेद ग्रंथ ज्या द्विजांनी निर्माण केलेले आहेत ते त्यांचेच हितसंबंध जोपासणार ही भूमिका चार्वाकांनी घेतली.[१२] त्यानुसार खूप कमी लोक समाजामध्ये अधिकार संपन्न बनले व बाकीचे इतर अधिकारापासून वंचित राहिले तेच बहुजन असे म्हणता येते. या बहुजनांच्या हक्कासाठी त्याच्या संरक्षणासाठीची भूमिका चार्वाकांच्या तत्त्वज्ञानात दिसून येते.

### २. गौतम बुद्ध

बहुजन समाज आणि राजकारण ही संकल्पना आज आपण ज्या अर्थाने वापरतो त्या अर्थाने प्राचीन भारतात प्रचलित नव्हती, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. भारतात या संकल्पनेचे जनक म्हणून तथागत गौतम बुद्ध यांच्याकडे आपण पाहतो. बुद्धांची शिकवण ही

व्यापक आणि समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी होती तथागत गौतम बुद्ध यांच्या तत्वज्ञानात समयष्टीला सामावून घेण्याची अदम्य शक्ती होती.

प्राचीन काळी समाज व्यवस्था वर्णभेदात विभागली होती. नंतरच्या काळात त्याचे जातीमध्ये रूपांतर झाले, समाज जातीमध्ये विभागला गेला. जात हेच बहुजन समाजाच्या पराभवाचे मागासलेपणाचे कारण आहे. अडीच हजार वर्षापासून जाती विरोधात लढा सुरू आहे. बळीराजानंतर गौतम बुद्धांनी वर्णव्यवस्था, जाती व्यवस्थेविरोधात लढा उभारला. माणसात जाती नाहीत सर्व माणसे एकच आहेत असा युक्तीवाद करून ते थांबले नाहीत तर वर्ण, जातीभेद नाहीसा करण्यासाठी वेगवेगळे प्रयोग केले. अडीच हजार वर्षांपूर्वी सर्वमाणसांना समान मानणारी ही चळवळ अति उच्च शिखरावर होती.

बुद्ध काळात भारतात वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था मोठ्या प्रमाणात होती. वर्णव्यवस्थेमध्ये ब्राम्हण जात/वर्ण स्वत:ला इतर वर्णांपेक्षा श्रेष्ठ मानत होता. बुद्धांनी वर्ण, जात, धर्म, पंथ, गोत्र, रंग, वेदाध्ययन या गोष्टी ऐवजी प्रज्ञा, शील या मूलभूत गोष्टींना ब्राम्हणाचा आधार मानले. ब्राम्हण कोणास म्हणावे हे स्पष्ट करताना गौतम बुद्ध म्हणतात. जो काया वाचा मन याद्वारे दुष्कृत्य करत नाही तो ब्राम्हण, जटामुळे, गोत्रामुळे, जन्मामुळे व्यक्ती ब्राम्हण होत नाही. ज्याच्या ठिकाणी सत्य आणि धम्म असतो तो शुद्ध होय. तो ब्राम्हण होय.[१३] या अर्थाने गौतम बुद्धांनी अनेक अवैदिकानाही ब्राम्हण म्हणून संबोधले आहे. म्हणजेच गौतम बुद्धांनी वेद प्रामाण्य, चातुवर्ण्य, हिंसा, ग्रंथप्रामाण्य, यज्ञ, जातीव्यवस्था याना नकार दिला. ही सर्व शोषण व विषमतेची साधने होती. यामुळे समाजात काही लोकांना या व्यवस्थेचे लाभ मिळत होते. व इतर जे संख्येने जास्त असणारे इतर वर्णातील लोक शोषणाचे बळी ठरले होते. अधिकारापासून वंचित होते म्हणूनच या अशा समाजव्यवस्थेचे बळी ठरलेल्या व शोषण होत असलेल्या समाजाच्या कल्याणासाठी गौतम बुद्धांनी आपल्या भिक्खूंना संदेश दिला. चरथ भिक्खवे, चारिक्ं बहुजन हिताय, बहुजन सुखाय लोकानुकंपाय अत्याय हिताय सुखाय देवमनुस्सानं[१४] याचा अर्थ गौतम बुद्धांनी बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी त्यांच्यावर अनुकंपा करण्यासाठी आणि देव मनुष्यांचे साफल्य हित आणि सुख यासाठी भिक्खूना बहुजन हिताय बहुजन सुखाय चारिका करा असे सांगितले. गौतम बुद्धाना भारतीय समाजव्यवस्था ही न्याय समता व स्वातंत्र्यावर आधारित करावयाची होती. त्यासाठी त्यांनी चार्तुवर्ण्य व्यवस्थेला मोठा

विरोध केला. दु:ख, वर्ण जातीविरहित समतेवर आधारित नवा समाज निर्माण करणेचे ध्येय ठेवले.[१५] म्हणूनच त्यांनी आपल्या संघात सर्व जाती दर्जाच्या लोकांना कोणताही भेदाभेद न करता प्रवेश दिला व सर्वांना सारख्या रितीने वागविले.

## स्त्री मुक्ती

प्राचीन काळापासून भारतीय समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले होते. तिला कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. माणूस म्हणून तिचे अस्तित्व नाकारले होते. मुलगी जन्माला येणे दु:खकारक असल्याचे मानले होते. तेव्हा बुद्धानी स्त्री जन्माचे स्वागत केले. शोषित अत्याचारित व गुलामगिरीला बळी पडलेल्या स्त्रियांना अस्तित्व, अस्मिता व आत्मविश्वास देण्याचे काम बुद्धांनी केले. एका उपदेशात ते आपल्या भिक्खुंना म्हणतात, ''एखादी स्त्री तुम्हाहून मोठ्या उमरीची असल्यास तिला तुम्ही आपल्या मातेसमान लेखावे. ती तुम्हाहून अंमल लहान वयाची असेल तर तिला आपली भगिनी मानावी. आणि ती वयाने फारच लहान असल्यास तिला आपल्या मुलीप्रमाणे समजावी.

बुद्धांनी धम्मामध्ये स्त्री आणि पुरूष असा भेद न करता स्त्रियांचा समतेचा अधिकार मान्य केला. म्हणजेच बुद्धांनी पुरूषांच्या तुलनेत स्त्रीला कमी न मानता स्त्री पुरूष समतेचा विचार करून स्त्रीला मानवी हक्क प्रदान केले म्हणूनच त्यांना स्त्री स्वातंत्र्याचे पहिले उद्गाते म्हणतात.[१६] बुद्धांनी केवळ स्त्री स्वातंत्र्याचा आग्रहाने पुरस्कारच केला नाही, तर त्यांच्या क्षमतांना फुलण्यासाठी अनुकूल वातावरण निर्मिती करून दिली. आपल्या संघात स्त्रियांना प्रवेश दिला. कोणत्याही विचारसरणीचा प्रचार प्रसार होणेसाठी तिला राजाश्रय मिळणे आवश्यक असते त्याशिवाय त्या विचारसरणीनुसार समाजव्यवस्था निर्माण होत नसते. गौतम बुद्धांनी त्या काळातील राजानाच आपल्या विचारधारेचे बनवून चार्तुवर्ण्य व्यवस्थेला तडा दिला व समाजामध्ये पिडीत बहुजनांना समतेचे स्थान मिळवून दिले.

समाजातील शोषित उपेक्षित समाजाच्या आत्मसन्मानाला जागृत करून स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय या मानवतावादी मुल्यांचा प्रचार आणि प्रसार केला. परिणामी या संपूर्ण जाती सामाजिकदृष्ट्या जागृत होण्यास फार मोठी मदत झाली. उच्चवर्णियांच्या अमानुष जाचाला बळी पडलेल्या या समाजास 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' ही विचार संजीवनी देऊन बुद्धांनी तमाम शोषित व दुर्लक्षित समाज घटकास सामाजिक दृष्ट्या जागृत केले. सत्ता,

संपत्ती, प्रतिष्ठा याच्या पलीकडे जावून समताधिष्ठीत समाज निर्मितीचा विचार त्यांनी मांडला त्यांच्या नंतर त्यांचे हे कार्य त्यांच्या अनुयायांनी सतत चालू ठेवले. त्यामुळे बहुजन समाजामध्ये आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची जाणीव जागृती झाली आणि भारतातील समस्त बहुजन समाज संघटीत होऊ लागला त्यांच्या परिस्थिती मध्ये थोड्या फार फरकाने बदल होऊ लागला परंतु ज्या प्रमाणात बदल व्हायला पाहिजे होता त्या प्रमाणात तो झालेला नव्हता मात्र १६ व्या शतकात ब्रिटिशांच्या आगमनाने काही बदलाची चाहूल लागली.

**गौतम बुद्ध यांची बहुजन संकल्पना**

बहुजन हा शब्द सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध यांनी उच्चारला. त्यांच्या शिकवणुकीचे तत्वच मुळात 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे होते. गौतम बुद्ध हे बहुजन संकल्पनेचे प्रवर्तक होते. त्यांची बहुजन संकल्पना ही व्यापक अशी होती. बहुजन ही संकल्पना 'चरथ भिक्कवे चारिक बहुजन हिताय बहुजन सुखाय लोकानुकपाय' या बुद्धाच्या तत्वज्ञानातून उदयास आली. बुद्धांनी लोकांना दुःखातून मुक्त करण्यासाठी आपल्या चिंतनातून जो मार्ग शोधला होता. तो जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवावा असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी बहुजन हिताय बहुजन सुखाय असे शब्द वापरले. बुद्धांनी आपल्या बहुजन या शब्दातून कोणत्याही जातीला अथवा वर्णाला वगळले नाही. काळाच्या ओघात बहुजन या शब्दाला अनेक अर्थ प्राप्त झाले आहेत. प्रदेश निहाय तिचे संदर्भ आपल्याला बदलेले दिसतात. ''बहुजन समाजाचे प्रथम मुक्तीदाता आणि मार्गदर्शक म्हणून तथागत गौतम बुद्ध यांना ओळखले जाते. बहुजन या शब्दाचा प्रथम प्रयोग गौतम बुद्ध यांनी केला. गौतम बुद्ध यांनी बहुजन समाजाला धम्म विचाराशी परिचय करून दिला. गौतम बुद्ध यांनी आपल्या धम्माला बहुजनांचा धम्म म्हटले, गौतम बुद्धांनी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय सर्वांनुकपाय' असा सर्वकल्याणकारी धम्म म्हटले.'[१७] गौतम बुद्ध यांच्या काळातील बहुजन समाजाच्या स्थितीची वस्तुनिष्ठ मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या Revolution and Counter Revolution ancient India ग्रंथात केली. त्यांनी आपल्या मांडणीत आर्याच्या हीन अशा समाजव्यवस्थेकडे आणि निकृष्ठ, जंगली संस्कृतीकडे लक्ष वेधले. आणि सांगितले की, बुद्ध काळात आर्यानी निर्माण केलेली समाजव्यस्था अतिशय खालच्या दर्जाची आणि घृणीत अशा अवस्थेमध्ये होती.''[१८] तथागत गौतम बुद्ध यांनी अशा काळात बहुजन समाजाच्या हिताची सुखाची काळजी घेणारा

धम्म विचार बहुजन समाजाला दिला. ''गौतम बुद्ध फक्त अध्यात्मिक गुरू नव्हते तर ते क्रांतीचे महानायक होते. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय यासाठी त्यांचा बहुजन हिताय बहुजन सुखाय चा संदेश वर्णभेद, जातीभेद, अस्पृश्यता, पोथीनिष्ठता अशा अनिष्ठ गोष्टींबरोबर दोन हात करत निरंतर पुढे जाणारा संदेश आहे.''[१९] गौतम बुद्ध यांनी बहुजन समाजाच्या आत्मभानाला जागृत करणारा धम्म विचार दिला.

गौतम बुद्ध यांचा उदय हा भारत आणि आशिया खंडासाठी बुद्धीवादाची मुहूर्तमेढ होती. बुध्दांची शिकवण ही समस्त मानवजातीला दिशादर्शक होती. बौद्ध काळापर्यंत उत्तर भारतात त्या काळी आर्यांनी चार वर्णांची प्रस्थापना केली होती. वर्णव्यवस्था जन्मसिद्ध मानली जात असे. इतकेच नाही तर ब्राम्हण आणि क्षत्रिय या दोन जाती डोईजड झाल्या होत्या त्यांच्यात वर्चस्वासाठी तंटे सुरू होते. ब्राम्हण आणि क्षत्रिय यांचा जातिमत्सराविषयक तंटा बुद्धांच्या पूर्वीच निकोपाला गेला होता. हे पाली आणि संस्कृत वाङ्मयावरून उघड होते. ह्या दोन वर्णानी वैश्य नावाच्या सामान्य आर्य वर्गाला तुच्छ मानले होते. मग आर्येतर शुद्रांची काय कथा'[२०] थोडक्यात जे वर्ण तथाकथित उच्च मानले जात होते त्यांच्यामध्ये तीव्र वर्चस्व संघर्ष सुरू होता. अशात ज्या वर्गाची शुद्र वर्गात गणना केली जात होती त्यांची स्थिती अधिकच बिकट झाली होती. सत्ता, संपत्ती, यापासून हा समाज दूर होताच किंबहुना साधे माणूस म्हणून जगण्यासाठी जे सर्वसामान्य हक्क असतात त्यापासून हा समाजघटक वंचित होता. यालाच आपण बहुजन समाज म्हणतो.

आधुनिक काळातील राजकारणात बहुजन राजकीय चळवळ आणि सत्ता याचे आत्मभान त्यातूनच आलेले आहे. कारण भारताच्या परिप्रेक्षात जेव्हा बहुजन समाजाकडे आपण पाहतो तेव्हा एक गोष्ट पटकन आपल्या डोळयासमोर येते ती म्हणजे, मूठभर अल्पजनांनी आणि तथाकथित उच्चवर्णीयांनी बहुसंख्य अशा समाजघटकाला हजारो वर्ष गुलामीत लोटले. हा समाजघटक विविध जातींमध्ये विभागून या समाजावर मानसिक गुलाम करून टाकले. परिणामी हा समाजघटक आपले जगणे म्हणजे, आपले प्रारब्ध आहे. आपल्या पूर्वजन्मीच्या पापाचे हे फलित आहे. अशी निरर्थक समजूत करून जगू लागला. ह्या समजूतीला छेद देणाऱ्या विचाराची महुर्तमेढ तथागत गौतम बुद्ध यांनी आपल्या बुद्ध धम्माच्या माध्यमाने रोवली. आधुनिक काळातील बहुजन राजकारणाने यातूनच प्रेरणा घेतलेली आहे. गौतम बुद्ध यांच्या काळातील

समाजव्यस्था आर्यांनी अतिहीन दर्जाची करून ठेवली होती. अशा समाजव्यवस्थेमध्ये बुद्धांनी धम्माची शिकवण लोकांना सांगून बहुजन समाजाच्या उद्धाराचा मार्ग मोकळा केला. परंतु तथागत गौतम बुद्ध यांचा 'बहुजन' हा संकुचित नव्हता. त्यांनी बहुजन ही संकल्पना व्यापक अर्थाने वापरली होती. त्यांनी आपल्या संकल्पनेतून कोणत्याही जाती किंवा वर्णाला वगळले नव्हते. राजकारण, संपत्ती हव्यासाच्या पलीकडे जावून समयष्ठित किंबहुना आखिल मानवजातीला उच्चकोटीच्या अहिंसेकडे घेवून जाणारा धम्म विचार हा जीवनवास्तवाची मर्यादा ओलांडूल पूढे जाणारा होता. त्यांनी मांडलेला धम्म विचार हा मानवजीवन जगण्याची आदर्श अशी जीवनाचारसंहिता होती. म्हणूनच तथागत गौतम बुद्ध यांच्या तत्वज्ञानाने आधुनिक बहुजन चळवळीस आत्मबळ प्राप्त झालेले आपण पाहतो.

**छत्रपती शिवाजी महाराज आणि बहुजन समाज संकल्पना**

महाराष्ट्रात मराठा नावाची जात आहे, असे नव्हे तर तो बहुजन समाज आहे. भागवत धर्माची परंपरा स्वतंत्र भाषा आणि सह्याद्री पर्वत रांगांची लाभलेले भक्कम असे नैसर्गिक संरक्षण यामुळे महाराष्ट्रातील मराठा समाज धन व धान्यांना समृद्ध झाला. शिवाजी महाराजांच्या प्रभावी कार्यामुळे महाराष्ट्रातील मराठेत्तर सुद्धा स्वतःला मराठे म्हणून संबोधू लागले. मराठी व्यापक संघटनेत मराठी भाषा बोलणाऱ्या अनेक जाती व जमाती व पोट जातीचा समावेश होतो. मराठ्यांची जी भाषा तीच मराठी भाषा अशी मराठी भाषेची साधी व सरळ व्याख्या आहे. अनेक साधुसंतांच्या अंभग वाङ्मयामुळे या भाषेच्या कणखर साहित्याचा पाया घातला गेला. संत तुकाराम, संत रामदास यांचे तत्त्वज्ञान हे महाराष्ट्राचे आनंदवन होण्यास कमी अधिक प्रमाणात सहाय्यभूत ठरले, आणि मराठी इतिहासाची जडण-घडण घडली. या सर्व प्रयत्नांचा पुढचा कळस म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे क्रांतिकारी समाजकार्य म्हणून महाराष्ट्राच्या समाजकारणात व राजकारणात ओळखले जाते. शिवाजी महाराजांनी बहुजन समाजातील बारा बलुतेदार, आठरा आलुतेदार, दलित, अस्पृश्य मागास आदिवासी व शेतकरी, शेतमजूर अशा समाजातील सर्व स्तरातील लोकांना स्वराज्य स्थापनेच्या लढ्यात सैनिक, शिलेदार, सेनापती इत्यादी महत्त्वाच्या पदावर काम करण्याची संधी निर्माण करून दिली, आणि शेतकरी, कष्टकरी, बहुजन समाजाचे राज्य प्रत्यक्ष स्थापन केले.[२१] आजचा बहुजन समाज हा नेतृत्वाच्या अभावामुळे असंघटित असून अज्ञानाच्या साखळदंडामध्ये तो अडकलेला दिसून येतो. परंतु

महाराष्ट्रातील बहुजन समाजास सतत स्फूर्ती व प्रेरणा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिवाजी महाराजांच्या कार्याने केलेले आहे.

शिक्षण हे फक्त व्यक्तीच्या विकासाचे साधन नसून ते सर्वांगिण विकासाचे तसेच राष्ट्राच्या कल्याणासाठी असते ही भूमिका छ. शिवाजी महाराजांची होती. तत्कालिन समाज व्यवस्थेमध्ये वैदिक धर्माच्या नियमानुसार शिक्षणाचा अधिकार फक्त ब्राह्मण समाजालाच होता. समाजातील बहुजन समाजास समाज व्यवस्थेने शिक्षणाचा हक्क नाकारला होता. अशावेळी छ. शिवाजी महाराजांनी शिक्षणाची दारे बहुजन समाजासाठी खुली केली. तसेच पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सुद्धा समाजामध्ये अधिकार मिळाले पाहिजेत, ही त्यांनी भूमिका घेतली. स्त्रियांना चुल व मुल या जोखडातून मुक्त केले त्यासाठी त्यांनी आपल्या कुटुंबापासून सुरुवात केली. त्यांनी आपले पुत्र संभाजीराजे, राजाराम, सुना येसूराणी, ताराराणी यांना संस्कृत भाषा शिकविली. युवराज संभाजी महाराजांनी तर राजनितीवरील बुद्धभूषण नावाचा संस्कृत ग्रंथ लिहिला. तो आजही स्फूर्तीदायक आहे. त्याचबरोबर छ. शिवाजी महाराजांनी धर्म, जात, लिंग असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना धर्माची दारे खुली करून अस्पृश्यता पाळण्यास बंदी घातली. समानतेचे तत्व जपले. अस्पृश्यतेचा पूर्णपणे नायनाट व्हावा, या भूमिकेतून शिवाजी महाराजांनी आपल्या किल्ल्याच्या किल्लेदारपदी एका महार व्यक्तीला बसविले व जातीभेद नष्ट करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.[२२]

शिवाजी महाराजांचा काळ संरजामशाहीचा होता. छ. शिवाजी महाराज हे सुद्धा सरंजामशाहीतच राजे होते. तरी छ. शिवाजी महाराजांनी जमिनदारांची, वतनदारांची व्यवस्था मोडीत काढली. जनतेकडून वसूलीची कामे करण्यासाठी सर्वत्र सरकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. पूर्वीच्या जमिनदारांनी व मिरासदारांनी रयतेस कोणत्याही प्रकारचा त्रास देऊ नये म्हणून नियमांची कडक कार्यवाही केली. त्याची व्यवस्थित अंमलबजावणी केली. त्यांना पूर्वीच्या अंमलात जितके मिळत असत त्याचे प्रमाण ठरवून त्यास ते सरकारी वेतनाप्रमाणे प्रतिवर्षी मिळत अशी व्यवस्था केली. त्यांनी ते प्रत्यक्षात जनतेकडून वसूल करू नये, असे ठरविण्यात आले. हा जो सरकारी उत्पन्नांचा ठरीव अंश त्यांना कोणतीही जोखीम शिरी न बसता मिळत असे. तसेच त्यांना प्रत्येक वर्षी मंजूरी मिळवून घ्यावी लागे. त्यामुळे जनतेचा त्रास कमी होऊन अधिकाऱ्यांच्या वर्तनावर जबर दबाव बसून जनता त्यांच्या कचाट्यातून पूर्णपणे सुटली. रयतेस

गुलाम करणाऱ्या देशपांडे, देशमुख, ग्रामाधिकाऱ्यांचे वाडे, कोट पाडून शिवाजी महाराजांनी जमिनदोस्त केले व त्यांनी इतपर असले धंदे करू नये म्हणून इतर रयतेसारखी साधी घरे बांधून रहावे, असा हुकूम सोडला.[२३] यावरून छ. शिवाजी महाराजांचे कार्य किती मोठे व उल्लेखनिय होते याची प्रचिती येते. छ. शिवाजी महाराजांनी समतेचे तत्त्व स्वीकारून सामान्य जनतेवर कसल्याही प्रकारचा दबाव व अन्याय न करता सर्वांना समान संधी देऊन सर्व जनतेच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न केले. आपल्या राज्यामधील स्त्रियां, दलित व बहुजन समाजातील लोकांना शिक्षणाची दारे खुली करून त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. सर्व धर्मातील लोकांना आपआपल्या धर्मानुसार आचरण करण्याची संधी छ. शिवाजी महाराजांनी दिली. राजेशाही व संरमजामशाहीला विरोध करणारा आपला हा आपला देश आजच्या आधुनिक युगातील 'शिवाजी महाराज की जय' अशी घोषणा देतो व स्वतःमध्ये नवी स्फूर्ती व प्रेरणा निर्माण करतो. आज महाराष्ट्रासह संपूर्ण देशामध्ये छ. शिवाजी महाराजांच्या राजकीय कार्यपद्धतीचा अभ्यास करून राज्यकारभार केला जातो. महाराष्ट्रामध्ये तर शिवसेना व भाजपसारखे राष्ट्रीय पातळीवर पक्ष किंवा शिवाजी महाराजांच्या नावाने चालतात. त्यांनी त्यांच्या नावाचा वापर करून राज्यातील सत्ता हस्तगत केलेली आहे. एवढी ताकद छ. शिवाजी महाराजांच्या नावांमध्ये व कार्यामध्ये असलेले आपणास दिसून येते, हेच छ. शिवाजी महाराजांच्या समाजकार्याचे व तत्कालीन राजकारणाचे मोठे यश आहे हे सिद्ध होते.

**आधुनिक भारतीय समाजव्यवस्थेतील बहुजन समाजाचे सामाजिक, राजकीय संदर्भ**

१६ व्या शतकामध्ये व्यापारी म्हणून ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून ब्रिटिशांचे भारतात आगमन झाले. १७५७ च्या प्लासीच्या लढाईच्या माध्यमातून त्यांनी भारतातील राजकीय सत्तेची सुत्रे आपल्या हातात घेतली, आणि त्यांनी पाश्चात्य शिक्षण पद्धती सुरू केली. इंग्रजी राजवटीमुळे आलेल्या नव्या विचारामधून भारतीयामध्ये शिकण्याची जिज्ञासा जागृत झाली. पाश्चात्य शिक्षणव्यवस्थेमुळे एक राष्ट्रीयत्व, समान नागरीकत्व, मानव समानता, जाती धर्माच्या भिंती, अंधश्रद्धा, लोकभ्रम, अनिष्ट चालीरीती, अज्ञानापासून सामाजिक विषमतेपासून मानवाची मुक्ती असे अनेक धडे या पाश्चात्य शिक्षणपद्धतीमुळे भारतीयांना मिळाले.[२४] व्यक्तीची स्वायत्तता, आर्थिक, सामाजिक पिळवणूकीपासून मुक्तता, मानवतावाद इत्यादी वैशिष्ट्ये या शिक्षणाच्या लाटेसोबत आली. तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मुल्यावर

आधारित लोकशाहीची संकल्पना ही त्या लाटेसोबत आली. परिणामी भारतीय समाज व्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल घडून आला. यातूनच अनेक समाजसुधारकांचा उदय झाला. त्यांनी बहुजन सामाजिक विषमतेविरूद्ध वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळ्या मार्गानी लढा दिला. त्यामध्ये म. फुले यांच्या नावाचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल.

**महात्मा फूलेंची सामाजिक, राजकीय चळवळ व बहुजन संकल्पनेचा आशय**

म. फुले यांना एक कृतीशील, क्रांतिकारी समाजसुधारक म्हणून ओळखले जाते. त्यांनी बहुजन समाजाच्या आर्थिक व सामाजिक समस्यांना वाचा फोडली. विशेषतः अस्पृश्य, मागास, महिला, शेतकरी यांची दुरावस्था, तसेच इथल्या ब्राम्हणी व्यवस्थेकडून स्त्रियांचे झालेले शोषण यांचे अत्यंत मर्मभेदी विश्लेषण फुले यांच्या लेखनामध्ये दिसून येते. म. फुले यांचे प्रबोधनाच्या चळवळीतील सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी हिंदू धर्माची केलेली कठोर आणि परखड चिकित्सा होय. बहुजन समाजाचे शोषण करण्यासाठी ब्राम्हणी व्यवस्थेने धर्म व देव ही दोन हत्यारे कशी वापरली याचा पर्दाफाश म. फुले यांनी केला.

हिंदू धर्म व समाज परिवर्तनाचा त्यांनी एकत्र आणि समग्रतेने विचार केला. समकालीन सुधारकापेक्षा त्यांनी जाती समस्येचा वेगळ्या पद्धतीने विचार केला. या समस्येचे आकलन परिवर्तनातील तिचा क्रम उपेक्षित सुधारणेचा आराखडा आणि परिवर्तन नीती या सर्व बाबीत रूढ विचार पद्धतीच्या बाहेर जाऊन फुल्यांनी आपले विचार स्पष्ट केल्याचे दिसते.[२५] १८६६ साली 'ब्राम्हणांचे कसब' आणि १८७३ साली 'गुलामगिरी' यासारखे ग्रंथ लिहून फुल्यांनी महाराष्ट्रातील जातीविषयक प्रश्नावर विचार मांडले आणि जातीसंस्थेत दलितांचे होणारे शोषण व जगाचा पोशिंदा शेतकरी यांचे होणारे शोषण प्रथमच फुल्यांनी उघडकीस आणले. तसेच बहुजन समाजाचा इतिहास हा शोषणाचा इतिहास आहे. वर्णव्यवस्था व जातीसंस्था या शोषण करणाऱ्या यंत्रणा असून त्या नष्ट केल्याशिवाय समताधिष्टीत समाजाची निर्मिती होणार नाही अशी फुल्यांची भूमिका होती.[२६] म. फुले यांनी स्त्री–शुद्र अतिशुद्र अशी बहुजनांची व्याख्या केली. बहुजनांच्या स्त्रियांच्या दुःख दैन्याचे कारण अविद्या होते. ब्राम्हण्यग्रस्त वर्चस्वाने धर्म व देवाच्या नावाने दास शुद्रांचे केवळ आर्थिक शोषण केले नाही, तर त्यांना एवढे नागविले की, अन्याय अत्याचार विरूद्ध बंड करून उठण्याची त्यांची ऊर्जाच पार मावळून गेली. शोषण करणारा वर्ग किंवा उच्च वर्णीय समाज अल्प होता. तरीही तो धर्म व देवाच्या नावाने स्त्री शुद्र

आणि अति शुद्रांचे खुले आम शोषण करीत राहिला. बहुजन दलित दास्यांचा विचार भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात करताना प्रथम लक्षात येते की, सर्वहारा बहुजन समाजाच्या दैन्य, दु:खाचे कारण त्यांच्या अंधविश्वासात होते. धार्मिक, रूढी, शस्त्रापेक्षा वरचढ झाल्या बहुजन, कष्टकरी डोळे गमावून बसले. आपली ओळख गमावून बसला शाळेतच नव्हे तर मंदिरात ही त्यांना बंदी होती. ब्राम्हण हे केवळ जातीपुरते मर्यादित नव्हते म्हणून ब्राह्मणांना शिव्या शाप देण्यापेक्षा बहुजनांना त्यांची ओळख देण्यासाठी त्यांना शिक्षण दिले पाहिजे, अशी फुल्यांची भूमिका होती.[२७] उच्च वर्णियांच्या वर्चस्वामुळे बहुजन समाज भरडला जात होता. त्यांना शिक्षणाची गरज होती. म्हणून फुल्यांनी १८४८ साली बहुजनांच्या साठी पहिली शाळा काढली. दलित, मागास आणि बहुजन समाजाला सक्तीचे व मोफत शिक्षण द्यावे, अशी हंटर कमिशन समोर साक्ष दिली.[२८] २४ सप्टेंबर १८७३ साली म. फुले यांनी सत्यशोधक समाज या संघटनेची स्थापना केली. आणि बहुजन समाजातील अनिष्ट चालीरीतींना तिलांजली दिली. बहुजन समाजातील सर्व जातींना ब्राम्हणी शोषणापासून मुक्त करणे हा या समाजाचा उद्देश होता. सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा पाया बुद्धीवाद, व्यक्तीविकास जातीभेद नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करणे हा होता. त्याचबरोबर देव आणि भक्त यामधील मध्यस्तीची भूमिका बजावणाऱ्या ब्राम्हणशाहीस नष्ट करणे या उद्देशाने फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली व या माध्यमातून ब्राम्हणेतरांच्या प्रश्नावर लढा उभारला.[२९]

**स्त्रीयांच्या प्रतिष्ठेसाठी प्रयत्न**

म. फुले यांनी गुलामगिरी, तृतीय रत्न नाटक, सार्वजनिक सत्यधर्म, ब्राम्हणांचे कसब व शेतकऱ्याचा आसूड इत्यादी साहित्याच्या माध्यमातून बहुजन समाजातील शोषित, उपेक्षित समाज घटकांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात लढा दिला. विशेषत: भारतीय समाज व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असलेल्या स्त्रीयांवर, दलितांवर होणाऱ्या अमानुष अत्याचार विरोधात शैक्षणिक चळवळीतून जागृत केले. खास करून फुले यांनी पुर्नविवाहास बंदी, बालविवाह, सती पद्धती याविरूद्ध जोरदार आवाज उठवून स्त्रीयांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. स्त्रीतून पुरूष जन्माला येतो म्हणून स्त्री ही आदरणीय व पुजनीय आहे. मात्र भटशाहीने हे जाणीवपूर्वक टाळून स्त्री ची प्रचंड विटंबना केली असे म. फुले यांचे मत होते. तसेच भारतीय पुराणातील परशुरामाने आपल्या मातेचा केलेला वध आणि शशुपालाची नियोजित पत्नी रूक्मीणी हिला श्रीकृष्णाने

पळवून नेऊन तिच्याबरोबर केलेला विवाह या दोन कृत्याचा म. फुले विरोध करतात. ही दोन उदाहरणे म्हणजे स्त्रीयांना असमानतेच्या आणि अमानवीय क्रुरतेच्या गर्तेत ढकलणारे आहे.

अठराव्या शतकामध्ये म. फुले यांनी अनेक सुधारणांचा अंगीकार केल्या. कित्येक स्त्री विषयक सुधारणा आज शासनाने स्वीकारलेल्या आहेत. स्त्री शिक्षणाविषयी कोणतेही मतभेद राहिलेले नाहीत पतीत स्त्रियांचा उद्धार आणि अनाथ अर्भकाचे संवर्धन याविषयी त्यांनी घालून दिलेला आदर्श समाजाने स्वीकारला आहे. सतीची चाल कायद्याने बंद केली आहे. अनेक विधवा विवाह होऊ लागले आहेत. उशीरा का होईना पण आज शासन आणि भारतीय समाज जागृत होऊन फुल्यांनी सांगितलेल्या समताधिष्ठीत समाज व मानवतावादी मार्गावर चालताना दिसत आहे. हेच म. फुले यांच्या बहुजनवादी चळवळीचे सर्वांत मोठे यश आहे.

**स्त्री शिक्षणाची सुरुवात**

म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात भिडे वाड्यात १८४८ मध्ये मुलींची पहिली शाळा काढली. परंतु ही सर्व जातीय मुलींची शाळा होती. त्यात चार ब्राम्हण, एक मराठा, एक धनगर अशा दलित्तेतर मुली शिकत होत्या. त्यानंतर त्याच वर्षी पुण्यातील महार वाड्यात सगुनाबाई क्षीरसागर व सावित्रीबाई यांच्या देखरेखीखाली अस्पृश्य मुला–मुलींची शाळा त्यांना सुरू करावी लागली. ब्रिटिश वासाहतिक काळात ब्राम्हणी व्यवस्थेच्या ज्ञान बंदी विरोधात शुद्रातिशुद्र जाती–जमाती आणि सर्व जातीय स्त्री यांच्यासाठी शिक्षण प्रसाराचे क्रांतिकारी कार्य करताना फुले दाम्पंत्यांनी केवळ शाळा स्थापन करून त्या चालविल्या नाहीत तर त्याद्वारे क्रांतीकारी भान असलेले विद्यार्थी ही घडविले. म. फुले यांचे प्रारंभिक काळातील हे शैक्षणिक कार्य जातीव्यवस्थेच्या अंताच्या ध्येयातूनच गतिमान झाले होते. त्यांचे हे कार्य क्रांतिकारी होते. तसेच भारतीय स्त्रीला पुरूषी गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी म. फुले यांनी क्रांतीकारक कार्य केले. एकीकडे स्त्रीयांवर पुरूषांनी लादलेली गुलामगिरी होती. तर दुसरीकडे धर्म सत्तेने लादलेली गुलामगिरी होती. या सर्वांतून स्त्री ची सुटका व्हावी, तिला स्वातंत्र्य मिळून तिला इच्छेप्रमाणे जीवन जगता यावे, धर्म बंधनातून मुक्त व्हावे म्हणून फुले यांनी स्त्रीयांच्या सर्वांगिण सुधारणेचा विचार मांडला. केशवपन पुर्नर्विवाह बंदी, बालविवाह, बालजरठ, विवाह आदी प्रथामुळे स्त्रीयांना पशुप्रमाणे लाचार जीवन जगावे लागत असे. म्हणून म. फुल्यांनी पुढाकार घेऊन १८८३ मध्ये पुण्यात बालहत्या प्रतिबंध गृह सुरू केले. याद्वारे अशा नाडल्या

फसविल्या गेलेल्या स्त्रीयांच्या बाळंतपणाची सोय केली, तसेच विधवांच्या केशवपणाची प्रथा बंद व्हावी म्हणून न्हाव्यांच्या मानवतेला आव्हान करून त्यांना संघटीतपणे केशवपनावर बहिष्कार घालण्यास प्रवृत्त केले.[३०]

## महात्मा फुले यांची बहुजन संकल्पना

म. फुले हे आधुनिक काळातील भारतीय नव पुनर्जागरण आणि नव प्रबोधन पर्वामुळे महापुरुष ठरलेले आहेत. म. फुले यांनी समाजजीवनातील अंतर्विरोधाचा नेमका वेध घेवून आपली बहुजन संकल्पना मांडली. आर्य समाज, प्रार्थना समाज, ब्राम्हो समाज या परिवर्तनवादी चळवळीपेक्षा म. फुले यांची सत्यशोधक चळवळ अधिक शास्त्रीय व पूरोगामी होती. त्यांनी सांगितलेल्या सार्वजनिक सत्यधर्मात व्यापकता व अखंड मानवजातीला कवेत घेण्याची प्रचंड शक्ती होती. त्यांच्या एकूणच मांडणीतून आणि कृतीतून प्रतिबिंबीत झालेला बहुजनवाद हा व्यापक होता. या पार्श्वभूमीवर त्यांनी आरंभलेल्या सत्यशोधक चळवळीचा संबंध हा संपूर्ण शोषित, वंचित आणि तळागाळातील लोकांच्या उद्धारासी होता. सर्वसामान्य बहुजन समाज हा दैनंदिन जीवनात ज्या प्रश्नांना सामोरे जात होता त्या प्रश्नासी दोन हात करीत होता. त्या समाजघटकाला मुक्तीचा राजमार्ग म. फुले यांच्या सत्यशोधकी विचारांने दिला होता. त्यांच्या सत्यशोधक बहुजनवादी चळवळीचा ''शिक्षणावर खूप भर होता. त्यातून क्षुद्रातिशूद्रांची चळवळ डोळसपणे चालवणारा नवा बुद्धिमंतवर्ग उदयास येईल अशी त्यांची अपेक्षा होती.''[३१] पुढच्या काळात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समाज परिवर्तनवादी चळवळीच्या पटलावर उदय झाल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर म. फूले यांनी धरलेला शिक्षणाचा अग्रह हा किती दूरदृष्टीचा होता. हे लक्षात येते. म. फूले यांच्या संकल्पनेतील बहुजन हा निराळा होता. शिक्षणाच्या प्रसाराने बहुजन जागृत होईल व बहुजन बुद्धिमंत वर्ग निर्माण होईल हा वर्ग जैवरित्या तळागाळातील सर्व समाजासी व त्यांच्या प्रश्नांसी जोडलेला असेल असे म. फुले यांना वाटत होते. हा बुध्दीमंत स्थितीवादाशी बांधिलकी न ठेवणारा आणि इटलीचा विचारवंत अंतनिओ ग्राम्शी याने म्हटल्याप्रमाणे समाजासी जैवरित्या जोडलेला असावा, असेच म. फुले यांना वाटत होते. शिक्षणातून हा असा बुद्धिमंत माणूस निर्माण व्हावा असे म. फूले यांना वाटत होते. म्हणून त्यांच्या चळवळीचा आग्रह हा शिक्षणावर अधिक होता. म. फुले म्हणतात,

विद्येविना मती गेली; मतीविना नीती गेली;

नीतीविना गती गेली; गतीविना वित्त गेले;

वित्ताविना शूद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले।

म. फुले आणि पुढे डॉ. आंबेडकर हे वंचित शोषित बहुजनांना शिक्षण व त्यातून राज्यकर्ती जमात बनण्याचेच आवाहन करताना दिसतात. अविद्या आणि सर्व प्रकारच्या सत्तास्थानापासून बहिष्कृत झाल्याने बहुजन क्षुद्रातिशुद्रांची काय स्थिती झाली ही गोष्ट जोतिबांनी स्पष्ट करण्यासाठी अनेक उदाहरणे दिलेली दिसतात. ''सत्यशोधक समाजाच्या उद्देशपत्रिकेत जरी 'या समाजात राजकीय विषयावर बोलणे अजिबात वर्ज्य आहे' असे म्हटले असले तरी 'सत्ता' या विषयाचा सर्वांगांनी व सूक्ष्म विचार म. जोतिबा फुलेंनी केला होता. परकीय राज्यकर्यांचे घोषित ध्येयधोरणे, किंवा त्यांचे प्रत्यक्ष प्रशासन एवढ्यापुरता त्यांचा हा सत्ताविचार सीमित नव्हता. तर धार्मिक-सामाजिक दिसणाऱ्या व्यवस्थांच्या मुळाशी असलेल्या सत्तेलाही त्यांनी हात घातला होता. सत्तेची विविध रूपे त्यांच्या लेखनात पहायला सापडतात. समुद्रापलीकडील राणीची सत्ता व प्रशासन व्यवस्था ही उत्तम राज्यसत्तेचे प्रतीक म्हणून येते, गोऱ्या अधिकऱ्यांनी चालवलेला सदोष कारभार विपरित सत्तेचे रूपदर्शन घडवतो. व्यसनी, सदोष राज्यकारभारामुळे कशी अवकळा येते. याची विविध उदाहरणे म. फुले यांनी दिलेली दिसतात. सत्ताहिन समाजाची अवकळा आणि सत्तावान समाजाची भरभराट त्यांनी विविध उदाहरणे देवून स्पष्ट केली आहेत.''[३२]

अर्थात म. फुले यांचा सत्यशोधकी विचार बहुजन समाजाला राजकीय सत्तेपासून परावृत्त करीत नाही, तर या समाजाला माणूस म्हणून जगण्यासाठी, आपल्या मानवी हक्कासाठी खरे राजकीय आत्मभान प्राप्त करून देताना दिसतो. ''म. फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचा दलित-शोषितांच्या बाजूने असलेला जो आर्थिक कार्यक्रम होता तोच वस्तुतः अधिक महत्वाचा व मूलगामी होता. ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर संघर्षाचे मूळ आर्य-अनार्य वंशभेदात व सांस्कृतिक विग्रहात असल्याने सांगून जोतीराव थांबले नव्हते; तर ब्राम्हण अभिजन, शूद्रातिशूद्र शेतकऱ्यांचे व श्रमिकांचे जे आर्थिक शोषण करीत असत, त्याकडेही त्यांनी आवर्जून व वारंवार लक्ष वेधले होते. छ. शाहू महाराजांच्या काळात आणि नंतर शेतकरी परिषदा पुष्कळ झाल्या. पण शेतकऱ्यांच्या प्रश्नांची आर्थिक अंगाने मांडणी करण्याचा प्रयत्न फारसा झाला नाही. त्यामुळे ब्राम्हण विरोधाच्या मुळाशी आर्थिक-सामाजिक शोषणाचे संदर्भ न राहता व्यक्तिगत व

प्रासंगिक ताणतणावच शिल्लक उरले.[३३] म. फुले यांनी शेतकरी वर्गाचा उल्लेख आपल्या व्यापक बहुजन संकल्पनेत करून शेतकऱ्याच्या मुक्तीचा मार्ग सांगितला त्यांनी सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर ब्राम्हणी धार्मिक कर्मकांडात अडकून कशी त्यांची लूट होते, यांची वस्तुनिष्ट मांडणी आपल्या शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात केल्याची दिसते. ''अलीकडच्या राजकारणात बहुजन राजकारणात बहुजनवादास जे अर्थ लाभले ते पाहणे अस्थानी ठरू नये. त्यासाठी फार मागे न जाता असे म्हणता येईल की, सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळीच्या काळापासून बहुजन म्हणजे स्थूलमानाने शुद्रातीशुद्र जनसमूह असा त्यांचा अर्थ प्रामुख्याने म. फुले यांनी केला. फुले स्वतः शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रियां हाच शब्द प्राधान्याने वापरत होते, हे जरी खरे असले तरी येथील रयत, गोरगरीब लोक नागवलेला कुणबी वा शेतकरी वर्ग सामान्यांचा अंतर्भाव 'बहुजन' या शब्दात करण्यास म. फुले यांच्या कोणत्याही सत्यशोधकी अनुयायास कोणत्याच प्रकारची अडचण कधी जाणवली नाही. किंबहूना शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रियां म्हणजे बहुजन आणि बहुजन म्हणजे शुद्रातिशुद्र हे समीकरण सत्यशोधकांनी मान्यच केले होते. व या दोन शब्दांबाबत त्याकाळी बुध्दीभेदही कधी कोणी कोणाचा केला नाही. पुढे वि. रा. शिंदे यांनी जेव्हा बहुजन पक्षाची स्थापना केली, तेव्हा त्यामागे हा सत्यशोधकी वारसाच ते सांगू इच्छित होते.''[३४]

म. फुले यांच्या बहुजन संकल्पनेचा गाभा मुळात समता आणि बंधुता हा होता. हजारो वर्षापासून वंचित समाजाला जागृत करण्याचे उदात्त कार्य त्यांच्याकडून घडले. त्यांनी ब्राम्हणशाहीला विरोध करून स्त्री–शुद्रातिशुद्र यांचे संघटन केले परंतु ''ब्राम्हणशाहीला विरोध हा म. फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचा फक्त एक भाग होता, तो एकमात्र खचितच नव्हता. शिवाय त्या विरोधाला कारणीभूत अशी परिस्थिती तेव्हा देशात होती. या राजवटीची पकड या या देशावर जसजशी पक्की होत गेली, तसतसी ब्राम्हणांची सत्ताही सर्व बाजूनी फोफावत गेली. पूर्वी स्वतःच्या बळावर काहीच करू न शकणारा एकमात्र साक्षर पदाधिकारी गावपातळीवरचा कुलकर्णी, कंपनी सरकारने न्याय व प्रशासन यांचे केंद्रीकरण करताच तालुक्याशी संपर्क ठेवू शकणारा एकमात्र साक्षर पदाधिकारी ठरल्यामुळे खूपच प्रतिष्ठीत होवून बसला. निरक्षर पाटलाचे अधिकार मात्र रोडावत गेले. पेशवे, कुलकर्णी, खोत, सावकार, पुरोहित, धर्मग्रंथाचे भाष्यकार, वकील, कारकून, शिरस्तेदार, अधिकारी अशा विविध भूमिकांच्याव्दारे समाजाची ऐहिक व

आध्यात्मिक सत्ता ब्राम्हणांच्या हाती, त्यांच्या संख्येच्या अगदी व्यस्त प्रमाणात संक्रमित झाली. शहरात उद्योगधंदे, व्यापार–उदीन वाढला. तिथेही कारभारी व कारकून या पदांवर शिक्षित ब्राम्हणांचीच वर्णी लागली.''[३५] परिणामी बहुजन शोषित आणि सर्व बाजूनी वंचित समुदायाच्या वाटयाला निम्न दर्जाची कामे, चाकरी, काबाडकष्ट, कमालीचे दुयमत्व, आप–परभाव, बहिष्कृतता आली. म. फुले यांच्या विचाराने या बहुजन जनसमुहात राजकीय, सामाजिक हक्काचे आत्मभान येवू लागले. वंचित Sabaltern बहुजन वर्गात म. फुले यांच्या विचारांने आपल्या हक्काबाबत जाणीव जागृती झाली. भारतीय समाजजीवनात समाजातील मोजक्या महाजन अभिजनांनी Elite Class मक्तेदारी निर्माण करून वंचित समाजघटकाला दुय्यमत्व दिले होते. म. फुले यांनी या दुय्यमत्वाला छेद देणारी मांडणी केली. शेतकरी, शुद्रातीशुद्र, शोषित समाजघटक, कष्टकरी श्रमिक यांची होणारी लुबाडणूक यांचे वास्तव अवलोकन करून या प्रश्नांना मोकळी वाट करून दिली आणि वैचारिक कृतीशील चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

''म. फुले सर्वांगीण उन्नतीचे क्रियाशील कर्मवीर होते. म्हणजे समाजाच्या सर्व अंगोपांगासाठी ते झटले. पुढारलेला ब्राम्हणादी वरचा थर, मराठा तत्सम मधला ब्राम्हणेतर बहुजनवर्ग व अस्पृश्य मानला गेला होता तो, अतिशूद्रांच्या तळागाळातील निकृष्ठ, तिरस्कृत, बहिष्कृत समाज, अशा तीन थरातील समाजासाठी त्यांनी त्यांच्या आयुष्यात कामगिरी केली. सर्वोन्नती व सर्वांगिण प्रगतीचे आचार विचार म. फुलेंच्या विचारात सापडतात. राजाराममोहन रॉय व महाराष्ट्रातील न्या. रानडे हे सर्वागिण प्रगतीचे प्रयत्नशील प्रवक्ते होते. याअर्थी फुले यांनी देखील समाजाच्या सर्व अंगोपांगासाठी व सर्व क्षेत्रातील उत्कर्षासाठी विचार, आचार केले. धार्मिक–सामाजिक आर्थिक व राजकीय क्षेत्रातील सर्वोन्नतीसाठी ते कार्यरत होते. विशेषत: श्रमजीवी दरिद्री समाजाच्या उन्नतीची त्यांनी सक्रिय काळजी वाहिली व ज्ञान आणि विद्या तळागाळापर्यंत जाण्याचा सक्रिय पांयडा घातला.''[३६] म. फुले यांनी जो बहुजन मुक्तीचा मार्ग सांगितला, त्यातूनच पुढच्या कालखंडात या विचारांना बहुजन समाजाची वैचारिक चळवळ आणि राजकारणात एक आचारसंहितेचे किंबहुना जाहिरनाम्याचे रूप आले. ज्याप्रमाणे मार्क्सच्या साम्यवादाच्या विचाराला, मार्क्सवादी, उत्तर मार्क्सवादी व नवमार्क्सवादयांनी आपली आचारसंहिता मानली. मार्क्सच्या विचाराला मार्क्सवाद्यांनी डोक्यात घेवून त्याचा जगात प्रचार केला. व उदारमतवादी भांडवलशाही विचारपरंपरेशी दोन हात करण्याची क्षमता निर्माण केली.

म. फुले यांच्या विचारांचा प्रसार या पातळीवर झाला तर जगातील सर्वच शोषित समाजाला मुक्तीचा मार्ग मोकळा हाईल. म्हणून आजच्या बहुजन राजकारणाची दिशा ही या परिप्रक्षात होणे गरजेचे आहे. राजकीय सत्ता महत्वाची आहेच पण त्याहुनही महत्वाची दुसरी गोष्ट म्हणजे भारतातील आणि पर्यायाने जगातील शोषित आणि वंचित समाजाची सर्व जोखडातून मुक्ती. म. फुले यांच्या विचारात बहुजनांच्या उत्कर्षाची बीजे आहेत. या विचारांचा जागर करून बहुजन राजकारण आकारास आले तर ते या समाजाच्या उन्नतीस पोषक ठरेल. आधुनिक भारतात प्रामुख्याने बहुजन शब्दाचा वापर प्रथम म. फुले यांच्या मांडणीत झाल्याचे आपल्याला दिसते. थोडक्यात बहुजन म्हणजे स्त्री, शुद्रातिशुद्र जनसमुह असा अर्थ प्रामुख्याने म. फुले यांनी केला. म. फुले स्वतः शुद्रातीशुद्र हाच शब्द प्रामुख्याने वापरत. हे खरे असले तरी यात येथील स्त्री रयत, गोरगरीब लोक नागवलेला कुणबी व शेतकरी वर्ग इ. समावेश होतो.

**छ. शाहू महाराजांची सामाजिक व राजकीय चळवळ व बहुजन संकल्पनेचा आशय**

भारताच्या सामाजिक, राजकीय, दलित, मागास वर्ग आणि बहुजन समाजाच्या इतिहासाला ज्या थोर समाजसुधारकांनी आपल्या कार्य कर्तृत्वाने नवी दिशा दिली, व त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आपले सर्व आयुष्यपणाला लावले, त्या समाजसुधारकांमध्ये छत्रपती शाहू महाराजांचे नाव आवर्जुन घ्यावे लागते. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानची राज्यसुत्रे हाती घेतली, तेव्हा कोल्हापूर संस्थान उद्दाम ब्रिटिश अधिकारी, भ्रष्टाचारी उच्चवर्णिय, नोकरदार, बहुजन समाजाचे अज्ञान आणि अंधश्रद्धा या चक्रव्युहात सापडले होते. दरबार व खाजगी कारभार यात ब्राम्हणांचीच मिरासदारी होती त्यावेळी सुमारे ८०% ब्राम्हण शिकलेले तर २०% बहुजन समाज शिक्षित होता. राज्यरोहणानंतर छ. शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक सुधारणा करण्यावर भर दिला. सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून त्यांनी शैक्षणिक सुधारणांना प्राधान्य दिले. त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. विद्यार्थ्यांना सवलती दिल्या, कोल्हापूर शहरात विद्यार्थी वसतिगृहे सुरू केली. संस्थानाबाहेरील शिक्षण संस्थांना मदत दिली. कोल्हापूरात सुरू झालेली विविध जातीची विद्यार्थी वसतिगृहे हा त्यांच्या शैक्षणिक कार्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग होता. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना अल्प खर्चात शहरात राहून शिक्षण घेता यावे, हा या वसतिगृहांचा उद्देश होता. शाहू महाराजांच्या प्रोत्साहनामुळे कोल्हापूर शहरात विविध जातींच्या विद्यार्थ्यांसाठी

वीस वसतिगृहे सुरू केली. त्यामुळे कोल्हापूर शहर वसतिगृहांची जननी म्हणून ओळखले जाऊ लागले.[३७]

कोल्हापूर संस्थानामध्ये सर्वसमावेशक धोरणाचा अवलंब करून छ. शाहू महाराजांनी शोषित, उपेक्षेत समाज घटकांना न्याय देण्याकडे लक्ष केंद्रित केले. बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी व त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी मोफत व सक्तीचे शिक्षण तसेच वसतिगृहाची निर्मिती केली. याच अनुषंगाने परिवर्तनाचा भाग म्हणून राज्यकारभारामध्ये समानता निर्माण करण्यासाठी, ठराविक वर्गाची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी संस्थानातील विविध खात्यामध्ये १९०२ साली ५०% राखीव जागा ब्राम्हणेतर वर्गासाठी ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला.[३८] कोल्हापूर संस्थानातील ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर लोकांचा नोकरीतील तुलनात्मक सहभाग दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे

**तक्ता क्र. १.१**

**कोल्हापूरातील जातनिहाय नोकऱ्या दर्शविणारा तक्ता (१८९४ ते १९२२)**

| अ. क्र. | | ब्राम्हण | ब्राम्हणेत्तर | अस्पृश्य |
|---|---|---|---|---|
| १. | नोकरी: सामान्य प्रशासन<br>१८९४ ते १९२२ | ६०<br>२६ | ११<br>५९ | –<br>– |
| २. | नोकरी: खाजगी खाते<br>१८९४ ते १९२२ | ४६<br>१३ | ०७<br>१०९ | –<br>०१ |
| ३. | विद्यार्थी शहरातील सर्व शाळा<br>१८९४ ते १९२२ | २,५२२<br>२,७२२ | ८,०८८<br>२१,०२७ | २३४<br>२,१६२ |

स्त्रोत– ऑमव्हेट गेल, वसाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड पृ. क्र. १०६ [३९]

उपरोक्त तक्त्याचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, कोल्हापूर संस्थानची राज्यकारभाराची सुत्रे शाहू महाराजांनी १८९४ मध्ये हाती घेतली, त्यावेळी कोल्हापूर संस्थानातील प्रशासनाच्या नोकरीमध्ये ६० ब्राम्हण व ११ ब्राम्हणेत्तर होते. तर अस्पृश्य समाजातील एक ही व्यक्ती नोकरीमध्ये नव्हती. शाहू महाराजांनी प्रत्यक्ष राज्यकारभार सुरू केला तेव्हा म्हणजे १९२२ मध्ये मात्र नोकरीतील ब्राम्हण लोकांची संख्या कमी करून ती ६० वरून २६ पर्यंत खाली आणली, तर ब्राम्हणेत्तर स्तरातील नोकरीची संख्या ११ वरून ५९ पर्यंत वाढविली. तसेच १८९४ मध्ये खाजगी खात्यातील नोकरीमध्ये ब्राम्हण समाजाची ४६ व ब्राम्हणेत्तर समाजाची केवळ ७ व्यक्ती नोकरीस होत्या. अस्पृश्य समाजातील एकही व्यक्ती

नोकरीस नव्हती. १९२२ मध्ये मात्र खाजगी नोकरीतील ब्राम्हण लोकांची संख्या कमी करून ४६ वरून ४३ पर्यंत कमी करून ब्राम्हणेत्तर ७ वरून १०९ पर्यंत वाढवली आणि अस्पृश्य समाजातील एका व्यक्तीस खाजगी नोकरीमध्ये काम करण्याची संधी उपलब्ध झाली. म्हणजेच १८३४ च्या तुलनेत १९२२ मध्ये ब्राम्हणेत्तर लोकांचा शासकीय व खाजगी नोकरीमधील सहभाग लक्षणीय होता असे दिसते. शाहू महाराजांच्या प्रभावी कार्यामुळे कोल्हापूर संस्थानातील ब्राम्हणेत्तरांचे व अस्पृश्यांचे अनेक प्रश्न मार्गी लागले त्यामुळे त्यांचा विकास होण्यास मदत झाली. म्हणजे छ. शाहू महाराजांची बहुजनांची संकल्पना ही ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर या संकल्पनेशी निगडीत असल्याचे दिसून येते.

छ. शाहू महाराजांनी आपल्या राजपदाचा वापर विलासी जीवन न जगता बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी केला. आपल्या राज्यामध्ये प्रशासनामध्ये विविध जाती धर्मातील लोकांना स्थान दिले. प्रशासनातील काही जागा मागासवर्गीयासाठी राखीव ठेवल्या. समाजातील शेवटच्या स्तरावरील माणसाला सामाजिक न्याय व समता प्राप्त होत नाही, तोपर्यंत स्वराज्य हे मृगजळ ठरेल असे त्यांना वाटत होते. छ. शाहू महाराजांनी सार्वजनिक हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. प्रशासनामध्ये अनेक सुधारणा केल्या. पगारी नोकरांची नेमणुक केली. कर वसुली आणि दप्तर जतन करण्याच्या अनेक पद्धती आणल्या. हिशेबातील गोंधळ दूर केले. अनेक पुरोगामी कायदे करून आपल्या संस्थानाचा नावलौकिक वाढविला. सार्वजनिक हितासाठी जाती जातीत एकता निर्माण होणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. कनिष्ठ जातींना योग्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी दहा वर्षापर्यंत जातीय प्रतिनिधित्व पद्धत लागू करावी. कनिष्ट जातीचा विकास झाल्यानंतर ही पद्धत बंद करावी, असे त्यांचे मत होते. याचा अर्थ शाहू महाराज कायमस्वरूपी जातीय प्रतिनिधित्वाचा पुरस्कार करत नव्हते. राजकीय जागृती झाल्यानंतर ही पद्धती बंद करण्याचे समर्थन करत होते. छ. शाहू महाराज हे आपल्या प्रजेला स्वराज्य देण्याच्या पक्षाचे नव्हते असा आरोप त्यांच्यावर केला जातो. परंतु छ. शाहू महाराजांच्या मते अज्ञानी जनतेच्या हातात अधिकार सोपवून उपयोग नाही. अन्यथा अधिकाराचा वापर मुठभर लोक करतील अशी त्यांची भूमिका होती.

**ब्राम्हणेत्तर चळवळ**

ब्राम्हणेत्तर चळवळीची बीजे म. फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीत आहेत. ब्राम्हण, पुरोहित शाहीविरूद्ध बंड करणारी ही महाराष्ट्रातील पहिली चळवळ होय. सत्यशोधक

चळवळीच्या पुनरूज्जीवनातून ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया छ. शाहू महाराजांनी घातला. वेदोक्त प्रकरणातून त्याला अधिक लढाऊ स्वरूप दिले. राजकीय मागण्यांच्या संदर्भात उद्‌भवलेला आणखी एक ब्राम्हणेत्तर चळवळीचा प्रवाह त्यास मिळाला. या एकत्रित प्रवाहास ब्राम्हणेत्तर चळवळ असे म्हणतात.[४०] समाजातील प्रत्येक लोकांना आपले हक्क अधिकार मिळाले पाहिजेत अशी मागणी करून, त्यांनी ब्राम्हणशाही विरूद्ध आवाज उठविला. ब्राम्हणेत्तर चळवळीतील शाहू महाराजांचे योगदान लक्षणीय ठरले. परिणामी ही चळवळ भारतभर पोहचली. त्यामुळे मॉटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा समितीला ब्राम्हणेत्तर चळवळीची दखल घ्यावी लागली. यातुनच जातवार प्रतिनिधित्वाच्या मागणीला प्राधान्य मिळाले.[४१] तसेच छ. शाहू महाराजांनी ब्राम्हणेत्तरासाठी ठेवलेल्या ५०% राखीव जागांचा परिणाम म्हैसुर प्रांतात होऊन १९१८ मध्ये म्हैसूर प्रांतात राखीव जागांच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात आली. त्यानंतर १९२१ मध्ये मद्रास प्रांतामध्ये 'जस्टीज पार्टीच्या' सरकारने आणि १९२५ मध्ये मुंबई प्रांताच्या सरकारने याच प्रकारचे राखीव जागांचे धोरण स्विकारले.[४२] थोडक्यात कोल्हापूर आणि महाराष्ट्रात छ. शाहू महाराजांनी ब्राम्हणेत्तर चळवळीचे नेते म्हणून प्रचंड कार्य केले. त्यांच्या कारकीर्दीत या चळवळीस अखिल भारतीय संदर्भ प्राप्त झाले.

छ. शाहू महाराजांनी ब्राम्हणेत्तर चळवळीच्या माध्यमातून राखीव जागांसाठी आपला लढा तीव्र केला. आणि जातवार प्रतिनिधित्वाची व मराठ्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. हे जातवार प्रतिनिधित्व करणारे स्वतंत्र मतदारसंघ भारताच्या नव्या राज्यघटनेत समाविष्ट करावेत असे मत लॉर्ड विलिंग्डन यांना लिहिलेल्या पत्रात छ. शाहू महाराजांनी व्यक्त केले. तसेच स्वातंत्र्य, समता हे माणसाचे जन्मसिद्ध हक्क आहेत, आणि ते मिळविण्यासाठी नव्या बदलांना तोंड देण्यासाठी व आपल्या अधिकाराची मागणी करण्यासाठी मागास जातीनी काँग्रेस पक्षासारखाच आपला वेगळा स्वतंत्र पक्ष स्थापन करावा असे छ. शाहू महाराजांना वाटत होते.[४३] जातीच्या आधारावर स्वतंत्र मतदार संघाची मागणी महाराज फक्त खाजगी पत्रातून करत नव्हते, तर ते जाहीर सभांच्या माध्यमातून त्यावर आवाज उठवित होते. १९१७ मध्ये खामगावमध्ये शिक्षण परिषदेमध्ये बोलताना महाराज म्हणाले की, किमान १० वर्षे तरी आम्हांला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे, अशी जाहीर मागणी त्यांनी केली. माँटेग्यु चेम्सफर्ड यांनी ती मान्य केली नाही. परंतु त्या शिफारशीवर आधारलेला कायदा

करण्याची प्रक्रिया इंग्लंडच्या संसदेत सुरू झाली. पुढे १९१७ नंतर वेगवेगळ्या जाहीर सभांमधून महाराजांनी स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीचा लढा तीव्र केला.[४४]

अशाप्रकारे छ. शाहू महाराजांनी बहुजन समाजातील विषमता नष्ट करून समताधिष्टीत समाज निर्माण करण्याच्या भूमिकेतून ब्राम्हणेत्तर चळवळीच्या माध्यमातून लढा उभारला. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपला सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी स्वातंत्र्य व समानता आवश्यक आहे. त्याशिवाय समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत विकास पोहचणार नाही असे त्यांचे परखड मत होते. त्यासाठी त्यांनी आपले सर्व आयुष्य खर्ची घातले, त्यांनी केलेल्या बहुजन समाजाच्या उध्दाराच्या कार्याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रासह अनेक राज्यातील बहुजन समाजात सामाजिक व राजकीय जागृती घडून आली. आणि हा समाज आपल्या हक्क अधिकारांसाठी संघटितरित्या संघर्ष करण्यासाठी सज्ज झाला. असेच कार्य पुढे महर्षी वि. रा. शिंदे यांनी तमाम बहुजन समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी पुढे चालू ठेवले.

**राजर्षी छ. शाहू महाराज आणि बहुजन समाज संकल्पना**

छ. शाहू महाराज यांनी बहुजन हा शब्दप्रयोग केला नसला तरी, १९०२ च्या संस्थानाच्या हुकूमात ब्राम्हण, प्रभू, शेणवी सोडून उरलेला सर्व मागासलेले अशी व्याख्या केलेली दिसते. अर्थात त्यांनी केलेले राजकारण हे बहुजन राजकारणात मोडते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांची सर्वसामान्य वंचित समाजासाठी केलेले कार्य उल्लेखनीय असे आहे. त्यांनी केलेल्या कार्यामुळे बहुजन समाजाला राजकारणाची योग्य दिशा सापडली. त्यांची बहुजन शोषित वंचित समाजाबाबत प्रामाणिक तळमळ होती. ते एका भाषणात म्हणतात ''आम जनतेला शिक्षण द्यावे, स्वतःचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना उद्युक्त करावे, अंधश्रद्धा नष्ट कराव्यात, आणि जिच्यामुळे समाजात एक विलक्षण कृत्रिमता आली आहे. त्या विषमतेची कारणेच समुळ नाहीशी करावीत, या हेतूने आम्ही इतकी वर्षे जिद्दिने सतत प्रयत्न करीत आलो. हे काम सोपे नाही. लहान–सहानही नाही. कारण शेकडो वर्षाची निश्चलता, गतीशीलता दूर करावी लागणार, आणि जूने पार बदलावे लागणार आहे. समाजातील गतीहिनता अद्याप संपलेली नाही. माणसामाणसातील विषमताही दूर झालेली नाही. एवढेच काय, धर्म आणि संस्कृतीच्या नावावर अंधश्रद्धा बळकट करण्याचे प्रयत्न हितसंबंधी लोकांकडून होत असलेले

दिसतात.''[४५] अर्थात छ. शाहू महाराज यांना वंचित, शोषित, शुदातिशुद्र समाजघटकाचा उद्धार साध्य करावयाचा होता. ज्या आधारे समाजातील समाजविघातक मंडळींनी ज्या विषमता आणि अंधश्रद्धा पसरविलेल्या आहेत त्या नष्ट करता येतील. राजर्षींना एकूणच वंचित बहुजनांची मुक्ती घडवायची होती. म्हणून त्यांना अस्पृश्यता विरोधी कृतीशील प्रयोग करून समाजात नवा मापदंड घालून दिला. त्यांनी आपल्या संस्थानात ५० टक्के राखीव जागा देवून एक ऐतिहासिक निर्णय घेतल्यामुळे आरक्षणाचे जनक म्हणून ते आज ओळखले जातात. त्या काळात त्यांनी धाडसी निर्णयाबरोबर विचारही प्रकट केल्याचे दिसतात. ते म्हणतात, ''ब्राम्हणांनी युक्तीने आपले स्वाधीन विद्या ठेवली. इतरांना शिकवू नये असा धर्म लावून दिला. भटांनी शाळात घालून कोणास तयार केले. किंवा कोणास विद्वान केले.? हल्ली बहुदा सर्व रोजगार ब्राम्हणांनी बळकाविले आहेत. म्हणजे एकीकडे भटांनी धर्म व दुसरीकडे गृहस्थांनी रोजगार अशा दोन्ही बाजू धरून इतर लोकास आत येवू देवू नये, अशी शक्कल केली होती. आता जर कोणी शूद्र जातीचा कारकून झाला, तर सर्व ब्राम्हण लोक त्याजकडे डोळे वटारून पहातात. त्यास असे वाटते की, आमचा धर्म लिहिणे पुसणे करावयाचा असून कुणबी आमचा वृत्तिच्छेद करितात.''[४६]

राजकारणाबाबत शाहू महाराज व्यापक दृष्टीकोन बाळगतात ते म्हणत ''स्वराज्य आम्हास पाहिजे आहेच. त्या योगानेच आमच्यात चैतन्य उत्पन्न होईल, परंतु जोपर्यंत आमच्यामध्ये जातीजातीतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहेत. तोपर्यंत आम्ही आपआपसात झगडत राहणार, आणि आमच्या हितबुद्धीस अपाय करून घेणार, आमच्यातील अंतस्थ कलह नाहीसे करण्यास आणि आम्हांला स्वराज्यास पात्र करून घेण्याकरिता ही अनर्थकारक, जातिपद्धती झुगारून देणे अत्यंत आवश्यक आहे.''[४७]

१५ एप्रिल १९२० साली माणगाव येथे परिषद भरली त्या परिषदेत बोलताना राजर्षी म्हणतात, ''अस्पृश्यांना तुम्ही बेशरम नि बेअब्रु केल्यामुळे त्यांची वृत्ती गुन्हयाकडे होते. कित्येक लोक म्हणतात अस्पृश्यतेचा आणि राजकारणाचा काय संबंध आहे? पण मी म्हणतो, अस्पृश्यांना मनूष्याप्रमाणे वागविल्याशिवाय राजकारण कसे होणार? ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशात वागवितात त्याप्रमाणे वागविले पाहिजे आणि तसे वागविल्याशिवाय देशकार्य कसे होणार? तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको

आहेत. कृतीने जातिभेद मोडून आम्हास मनुष्याप्रमाणे वागवतील असे पाहिजे. अस्पृश्य समाजाला ते असे आवाहन करतात की, तुमचे खरे पुढारी डॉ. आंबेडकर आहेत. माझी खात्री आहे की, ते तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे.''[४८]

छ. शाहू महाराजांनी शुद्रातिशुद्र समाजाच्या हिताची काळजी घेतली. ते स्वतः अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजबांधवाबरोबर स्नेहभाव जपत होते. किंबहुना त्यांनी आपल्या संस्थानातून आरक्षण देण्यापासून या समाजाचे नोकरीमध्ये प्रमाण वाढावे यासाठी सतत प्रयत्न केले. त्यांच्या क्रांतिकारी निर्णयाबरोबर त्यानी केलेले कायदे, या सर्वामुळे शोषित, वंचित समाजाला सुरक्षितता मिळू लागली. परिणामी छ. शाहू महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाने या समाजबांधवांना प्रगतीचा नवा अवकाश प्राप्त झाला. छ. शाहू महाराजांमुळे बहुजन समाजाच्या राजकीय प्रगतीला गती येवू लागली. त्यांच्या कालखंडात सामाजिक लोकशाहीकडे होणारी वाटचाल खरेच वाखाणण्याजोगी आहे.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक, राजकीय चळवळ व बहुजन संकल्पनेचा आशय**

म. फुले आणि छ. शाहू महाराज यांचा समाज कार्याचा वारसा म. विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या समाज कार्यातून अखंडपणे चालू ठेवला. बहुजन समाज म. शिंद्यांना बहुजन समाजाचे कर्मवीर मानतो, परंतु हा कर्मवीर बहुजनांकडूनच उपेक्षित राहिला आहे. निदान आता अस्पृश्यतेच्या जन्मजात रूढीचे व परंपरेचे समर्थन करण्यास कोणी धजत नाही. म्हणजे विचारातुन तरी प्राथमिक क्रांती होऊन चुकली, पण या प्राथमिक परिवर्तनाचा देखील खेड्यापाड्यात अभाव दिसतो. बहुजन समाज म्हणजे ग्रामीण शेतकरी समाज होय. या शेतकरी मराठी वर्गाच्या या प्रश्नासंबंधीच्या रूढ मनोवृत्तीत मात्र दुर्देवाने आचारात्मक क्रांती झाल्याचा साक्षात्कार प्रत्यक्ष व्यवहारात व राजकारणात झाल्याचे दिसून येत नाही. नैतिक सुधारणा म्हणजे समाज सुधारणा व मुलभूत विकास असा अर्थ अभिप्रेत धरून यापुढे जाणे क्रमप्राप्त होय. देशातील डिप्रेस्ड क्लास म्हणजे निराश्रित लोकांची अवस्था शिंदेंना प्रत्यक्ष दिसून आली. मानवी समता जर व्यवहारात आणावयाची झाली तर या निराश्रित लोकांना म्हणजे तळागाळातील लोकांना सक्रीय उन्नत करून त्यांना घरी–दारी समाजात, धर्मात आणि राजकारणात बरोबरीने वागविले पाहिजे. या हेतूने सन १९०६ साली म. शिंद्यांनी अखिल

भारतीय निराश्रित साह्यकारी संस्था स्थापिली. अस्पृश्यांचे प्रांतवार लोकसंख्येचे आकडे त्यांनीच प्रथम उपलब्ध करून दिले आणि बहिष्कृत भारताचे स्वरूप जनता, सरकार व राष्ट्रीय सभेपुढे मांडले. कॉंग्रेसच्या अधिवेशनात डॉ. ॲनी बेझंट यांच्या सहाय्याने कॉंग्रेसमध्ये अस्पृश्यता निवारणाचा पहिल्यांदा ठराव मांडला, व पास केला. सरकारातून त्यांच्यासाठी राखीव जागा व अनेक सवलती मिळविल्या. देशात निराश्रित साह्यकारी मंडळाच्या शाखा ठिकठिकाणी सुरू केल्या तसेच मराठी शाळा बोर्डींग वगैरे चालून बहुजन समाजाचे अनेक प्रश्न मार्गी लावले. एवढेच नाही तर पुण्यात अहिल्या आश्रम बांधून स्वःतच्या कुटुंबांसह सर्व जीवन या कार्याला समर्पित केले.[४९]

**महर्षी वि.रा. शिंदे यांची राखीव जागा विषयीची भूमिका**

अस्पृश्यांचे मागासलेपण दूर करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी, त्याचा राजकीय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने त्यांनी राजकारणामध्ये व नोकऱ्यामध्ये दलित समाजातील लोकांना राखीव जागा असाव्यात यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारतातील विविध प्रांतातील कायदे कौन्सिलात प्रतिनिधी पाठविण्यासाठी कोणती मतदान पद्धती स्वीकारावी यासाठी साऊथ बरो कमिटी हिंदुस्थानात नियुक्त केली होती. या कमिटीसमोर शिंदे यांनी अस्पृश्याबद्दलच्या राखीव जागाविषयी आपली प्रत्यक्ष व लेखी साक्ष दिली होती.

सर्वसाधारण मतदानासाठी पात्रतेबाबत पुरूषाचे आर्थिक उत्पन्न ३०० व व्हर्नाक्युलर फायनल पर्यंतचे शिक्षण या अटी चालतील परंतु अस्पृश्य वर्गाची निकृष्ट अवस्था लक्षात घेता त्यांच्यासाठी या अटी शिथिल करण्यात याव्यात. अस्पृश्य वर्गासाठी वार्षिक उत्पन्न रू. १४४ अथवा इयत्ता ४ थी पर्यंतचे शिक्षण एवढ्या अटी मतदान पात्रतेसाठी असाव्यात अशी त्यांनी मागणी केली होती. पुढे त्यांनी असे म्हटले की, ''या वर्गातील प्रतिनिधीची प्रांतिक कायदे कौन्सिल व स्थानिक स्वराज्य संस्था यावरती स्वतंत्र राखीव मतदार संघातून त्या जातीच्या प्रतिनिधींची निवड केली, तर ती त्यांच्यादृष्टीने फारच हितावह ठरेल. मुंबई इलाख्यात कायदे कौन्सिलात १५० जागा असतील असे गृहीत धरले तर पाच जागा या वर्गासाठी असाव्यात. कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात सिंध आणि मुंबई शहर या पाच विभागातून प्रतिनिधींची निवड व्हावी. ही निवड अस्पृश्यांना ठेवलेल्या राखीव मतदार संघातून करण्यात यावी, अशा प्रकारचे स्वतंत्र राखीव मतदार संघ निर्माण करणे हे अशक्य नाही. उलट ते या वर्गाच्यादृष्टीने हितावह

ठरेल. त्याचप्रमाणे राजकीय शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने तसेच सामाजिक उन्नती होण्यासाठी ते एक पुढचे पाऊल ठरेल.'' म. वि. रा. शिंदे पुढे म्हणतात, मराठे हे मागासलेले आहेत. मात्र त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघ ठेवू नये. लेखी निवेदनात त्यांनी जरी अस्पृश्य वर्गासाठी पाच जागांची मागणी केली तरी प्रत्यक्ष साक्षीत मात्र त्यांनी एकंदर सात मतदार संघ व नऊ पेक्षा कमी जागा असू नये प्रतिपादन केले.[५०] या लेखी साक्षीचा अभ्यास केला असता असे त्यात विसंगती असल्याचे दिसते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याच दिवशी शिंदेंच्या या साक्षीचा जोरदार विरोध केला. म. वि. रा. शिंदे यांच्या मते वेगळ्या मतदारसंघामुळे अस्पृश्य समाज हिंदू पासून वेगळे होतील. हिंदू व अस्पृश्य समाजात एकात्मता ठेवायची असेल तर अस्पृश्यांसाठी वेगळा मतदार संघ असू नये. एकंदरीत म. वि. रा. शिंदे यांच्या अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याचा अभ्यास केला असता, त्यांच्या अगोदर अशा प्रकारचे कार्य कोणत्याच समाजसुधारकांनी केले नव्हते. जातवार प्रतिनिधित्व व राखीव जागांबद्दलची त्यांची भूमिका अस्पृश्यांचे खरेखुरे हित जपणारी होती. परंतु त्यांच्या या भूमिकेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसह देशातील अनेक दलित नेते त्यांच्यावर नाराज झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व म. वि. रा. शिंदे यांच्यात कायमचे अंतर पडण्यास शिंदे यांची दलित विरोधी साक्ष कारणीभूत ठरली.

**महर्षी वि.रा. शिंदे यांचे बहुजन संकल्पनेबद्दल चिंतन**

म. विठ्ठल रामजी शिंदे यांचे समाजकारण, राजकारण याचे मूलभूत असे चिंतन होते. समाजजीवनाला भेडसावणाऱ्या प्रश्नासी भिडून त्याचे नेमके समाधान होईपर्यंत स्वस्थ न बसण्याची विलक्षण वृत्ती त्यांच्या अंगी होती. त्यांचे संपूर्ण जिवीतकार्यच बहुजन शोषित, वंचित समाजासाठी अर्पण केले होते. त्यांनी दिलेली भाषणे, लिखाण, ग्रंथ आदी संशोधनामधून त्यांची बहुजन संकल्पना प्रतिबिंबीत होते. त्यांची बहुजन संकल्पना व्यापक आणि सर्वसमावेशक अशी होती. त्यांची बहुजन संकल्पना जाणून घेत असताना त्यांनी केलेले समग्र चिंतन आणि कार्याचा आढावा घ्यावा लागेल.

न्या. भवानीशंकर नियोगी यांनी १९३३ मध्ये महाराष्ट्र साहित्य संमेलनात नागपूर येथे महर्षी शिंदे यांच्याबाबत महत्वपूर्ण भूमिका मांडलेली दिसते. ते म्हणतात, ''शिंद्यांचा जिला भरीव हातभार नाही अशी लोकसेवेची व समाजोन्नतीची चळवळ दाखवून देणे कठीण आहे. राजकारण, समाजकारण, धर्मकार्य, शिक्षणकार्य इतकेच नाही तर वाङ्मयसेवा आणि इतिहास

संशोधन या सर्वांत म. रा. शिंदे यांचा मोठा महत्त्वाचा सहभाग आहे. ज्या काळी विधवाविवाहासारखे साधे प्रश्न सुटणे दुरापास्त होते, अशा त्या घनदाट धर्मवेडाच्या काळात अस्पृश्योध्दाराची चळवळ सुरू करणे, डिप्रेस्ड क्लासेस मिशन ही संस्था काढणे, इतकेच नव्हे तर अस्पृश्यांत जाऊन त्यांच्यापैकी एक झाल्याप्रमाणे वागणे या गोष्टीसाठी अतुल स्वमतधैर्याची, एवढेच नव्हे तर मूलगामी बुध्दीची व समाजाविषयी खऱ्या कळकळीचीही गरज होती. इतक्या व्यापक व सुक्ष्म दृष्टीच्या कार्यकर्त्यांची दृष्टी सबंध देशाइतकी विशाल विस्तृत असावी लागते. म्हणूनच श्री शिंदे सामाजिक चळवळीप्रमाणे अनेक राजकीय चळवळीतही भाग घेताना दिसतात.''[५१] यावरून त्यांचे कार्य किती महत्वाचे होते हे लक्षात येते.

म. शिंदे यांनी विविध पातळ्यावर चिंतन व कार्य केल्याचे दिसते. प्रस्थापित समाजव्यवस्थेचे अवलोकन करून ज्याप्रमाणे शुद्र अतिशुद्र समाजाच्या अवहेलनेची, अवनतीची मीमांसा म. फुले यांनी केली, ती परंपरा महर्षी शिंदे यांनी सुरू ठेवली. त्यांनी इंग्लड, स्कॉटलंड, फ्रान्स, हॉलंड, जर्मनी, स्वित्झर्लंड व इटली या देशांतून प्रवास करून जागतिक समाजरचनेचा तसेच वंचित गरीब लोकांचे अवलोकन केले. बडोदा संस्थानाचे श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड महाराज यांचे सहकार्य मिळाल्याने संस्थानातील अस्पृश्य वर्गासाठी चालविलेल्या शाळांची तपासणी केली. बौध्द धर्माचे अवलोकन करण्यासाठी ते ब्रम्हदेशाला गेले, आणि तेथील अस्पृश्य वर्गाची स्थिती जाणून घेतली. पुढे त्यांनी ब्रम्हदेशातील बहिष्कृत समाज हा शोधनिबंध भारतातील इतिहास संशोधन मंडळासमोर वाचला. यावरून त्यांच्या कार्याचा विस्तार लक्षात येतो. त्यांनी केवळ भारतातील अस्पृश्यतेची जळमटेच फक्त काढली नाही तर भारतात जाती अंताचा लढा उभा केला हे कार्य पुरोगामी भारताची उभारणी करण्यास पोषक होते. त्यांची बहुजन संकल्पना भारतीय राष्ट्रीय एकात्मतेला पोषक होती. त्यांच्या या संकल्पनेमुळे व भूमिकेमुळे भारतातील बहुजन समाजामध्ये आपल्या न्याय हक्कासाठी लढा देण्याचे बळ प्राप्त झाले. त्याचे विचार आज ही प्रस्तुत वाटतात म्हणून त्यांच्या विचारांना जाणून घेणे आज गरजेचे बनले आहे. त्यांच्या बहुजन विचारांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**विठ्ठल रामजी शिंदे यांची बहुजन समाज संकल्पना आणि राजकारणाची मिमांसा**

म. शिंदे यांनी बहुजन राजकारणाचा व्यापक अर्थ लावला होता. संकुचित बहुजनवादी राजकारण त्यांना अमान्य होते. म. शिंदे हे बहुजन राजकारणाचे प्रारंभकर्ते होते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. एकोणीसाव्या शतकात जे धर्म चिंतन झाले, ज्या धर्मसुधारणा

चळवळी झाल्या, त्या चळवळीचे सारतत्व त्यांच्या एकुण मांडणीत होते. त्यांच्या मांडणीत बहुजन मुक्तीची कूस होती. त्यांची मांडणी आणि चळवळ बहुजन राजकारणाचा आरंभ होता. अस्पृश्य, कष्टकरी लोकांसाठी त्यांनी अखंड साधना केली. त्यांच्या मते, ''आमच्या घरी समता आणि स्वातंत्र्य, उदारता, स्वाभिमान ही सुधारणेची तत्त्वे समतोलात पाळली जात''[५२] ही तत्त्वे, मानवी उदारता मनुष्य जीवनाला तारणारी आहेत. ही धारणा त्यांची होती. राजकारणाचा व्यापक अर्थबोध त्यांना होता ते म्हणतात, ''राजकारण हे प्रवाही असावे, राजकारणाचा अर्थ अर्थकारक म्हणजे अर्थाच्या आधारे समाजशास्त्राची धारणा एवढाच आहे. समाजाची धारणा व्हावी म्हणून अर्थशास्त्रासारखे शासनशास्त्राची तत्त्वेही राजकारणात समाविष्ठ होतात. यातील दुसरे तत्त्व गौण असावयास हवे. पूर्वी जीवनकलह तीव्र नव्हता, तेव्हा राजकारण अर्थशास्त्राचे महत्व होते पण पुढे कनक व कांतामुळे राजकारणात अर्थशास्त्रापेक्षा शासनशास्त्राचे प्राबल्य वाढले.''[५३]

म. शिंदे यांनी अर्थकारण व शासनशास्त्र वेगळे मानले. समाजाची धारणा ही महत्वाची आहे, शासनशास्त्र हे गौणतम तत्त्व आहे. अशी भूमिका म. वि. रा. शिंदे मांडतात आणि समाजधारणेला बहूजन राजकारणात महत्वाचे स्थान देतात. ''आजची बहूजनवादी चळवळ छ. शाहूंचे बहूजनवादातील ऋण मान्य करते, पण म. शिंदेच्या कार्याची दखल घेत नाही. कारण त्यांची बहुजनविकासाची चळवळ जातिवादी नव्हती तर ती वर्गवादी होती. आणि जातिनिर्मूलनात कधी कोणाला फारसा रस नसतो''[५४] म. शिंदे यांनी जे बहुजनवादी राजकारण केले ते सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा या पलीकडे जाणारे होते. या तीन घटकांचा त्यांच्या चळवळीत लवलेशही नव्हता. त्यांची चळवळ जात, जमातनिष्ठ राजकारणाच्यापुढे जाणारी होती. त्यांनी व्यापक अशी बहुजनवादी राजकारणाची भूमिका मांडली होती. त्यांची चळवळ ही जाति अंताची चळवळ होती. त्यासाठी त्यांनी बहुजन राजकारणाचा नवा विचारप्रवाह निर्माण केला होता. राष्ट्रीय ऐक्यास म. शिंदे महत्व देत होते. प्रार्थना समाज, डिप्रेस्ड क्लास मिशनच्या वाढीसाठी राष्ट्रीय ऐक्य महत्वाचे आहे असे ते म्हणत. त्यांनी राजकीय सुधारणांना व्यापक धर्मकार्य मानले. राजकीय सुधारणा या बहुजन समाज, कष्टकरी, कामगार, अस्पृश्य व शेतकरी वर्ग यांच्या उपयोगी पडणाऱ्या असाव्यात असे ते म्हणत. या शोषित लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी राजकीय सुधारणांचा आग्रह धरला होता. याबाबत विजापूरच्या धर्म परिषदेत ते असे

म्हणतात की, ''राजकीय प्रांतिक परिषदेसाठी हा भव्य मंडप उभारला असताना तिचे अधिवेशन होण्यापूर्वी या धर्मसभेचे पिल्लू या मंडपात का सोडण्यात आले? असा प्रश्न लोकांकडून करण्यात आलेला आहे. त्याचे उत्तर म्हणजे, आम्हा पौरस्त्य लोकांच्या विशेषतः सनातन म्हणून गाजत असलेल्या हिंदुच्या कीर्तीचा नगारा असा आहे की, आम्ही कोणतेही काम ईश्वराचे नाव आणि धर्माचा संस्कार केल्याशिवाय करीत नाही. जेवणाचा घाससुद्धा नारायणाचे नाव घेऊन घेतो. उद्या तर याठिकाणी मोठमोठे राष्ट्रीय निश्चय होणार आहेत. त्यापूर्वी ईशस्मरण न करणे हे आपल्या सनातन धर्मभिमानास शोभेल का?''[५५] यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, ती म्हणजे शोषित बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आपण ज्या सुधारणा करू, ज्या राजकीय सुधारणा घडवून आणू त्या त्यांच्या उपयोगी पडल्या पाहिजेत. राजकारण हे धर्मकार्य व धर्मकर्तव्य असल्याने ते ईश्वराचे स्मरण करून कर्तव्यभावनेने केले पाहिजे, असे महर्षी शिंदे यांना सुचवायचे होते.

जातीजातींमधील द्वेषाचे राजकारण हे जातीजातीत संघर्ष निर्माण करणारे आहे, हे म. शिंदे यांनी जाणले होते. महर्षी शिंदेनी सदैव ''सकारात्मक व समन्वयवादी राजकारणाचीच कास धरली होती. काँग्रेसच्या बहुजनीकरणाचा त्यांचा आग्रह, राखीव जागांना त्यांनी केलेला विरोध आणि वेगळा बहुजन पक्ष काढून त्याच्यामार्फत खुल्या जागेवरून त्यांनी लढवलेली निवडणूक या गोष्टीकड़े याच दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. ब्राम्हणेतर चळवळीच्या संधिसाधू राजकारणामुळे ज्या बहुजन समाज संज्ञेला फक्त जातलक्षी संदर्भ प्राप्त झाला होता तिला तिच्या फुलेप्रणीत सत्यशोधकी अर्थाने रूढ करण्याचा प्रयत्न म. शिंदे करत होते. जातीचे राजकारण अंतिमतः जातीनिर्मूलनात परिणत होत असेल तरच त्यांना ते हवे होते. त्यामुळे बहुजन समाजाची व्याख्या करताना स्पष्ट अशा जातवर्गीय कसोट्या लावताना ते आढळतात. त्यांच्या मते, त्या कसोट्यांच्या आधारे कोणते वर्ग बहुजन समाजात अंतर्भूत होतात आणि वर्ग कटाक्षाने वगळले पाहिजेत हे सहज निश्चित करणे शक्य होणार होते.

जाती–पोटजातीवर आजवर उभारलेले पक्ष आणि संघटना मुख्यतः भावनेच्या आधारे व्यवहार करतात. हितसंबंधाच्या आधारे व्यवहार करताना दिसत नाहीत. या पक्षांनी एकत्रित केलेल्या 'जातीं' मध्ये वेगवेगळे 'हितसंबंध'असतात. तरी ते जात म्हणून एकत्र येतात. या जातींबाहेरच्या जातींतसुद्धा त्यांच्याशी समान हितसंबंधाचे विभाग असतात; परंतु जातीबाहेरील

या समान हितसंबंधांच्या विभागांना एकत्रित करण्याची त्यांची दिशा नसते. आपल्या एका किंवा अनेक जातींबाहेरसुद्धा मागासलेले असतात. परंतु आपल्या जातीतले मागासलेले आणि आपल्या जातीबाहेरचे मागासलेले यांना एकत्र करण्याकडे ते दुर्लक्ष करतात. म्हणून कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांची हितसंबंधाची मांडणी आणि त्या समान हितसंबंधांच्या विभागांना एकत्र करण्याची कल्पना आणि व्यवहार नीट लक्षात घेतला पाहिजे. १ सप्टेंबर १९२० च्या बहुजन पक्षाच्या जाहीरनाम्यात ते लिहितात, कारण ह्या पक्षाच्या (बहुजन पक्षाच्या) पायाखाली केवळ पोकळ मनोभावना नसून भरीव हितसंबंध आहेत. त्यांची राखण आणि पुरस्कार करण्याचे निःस्पृह काम या पक्षाला आपल्याच पायावर उभा राहून व आपल्याच हातांनी करावयाचे आहे. आमचे सहकारी ब्राह्मण असोत, ब्राह्मणेतर असोत, मवाळ असोत, जहाल असोत, किंबहुना स्वकीय असोत की परकीय असोत, त्यांनी कोणतीही नावे, रूपे किंवा मते स्वीकारलेली असोत, फार तर काय त्यांचा पूर्वेइतिहास कसाही असो, जोपर्यंत आपल्या हितसंबंधाचा पुरस्कार प्रामाणिकपणे आणि जोराने त्यांच्या हातून होईल, अशी आमची खातरजमा कायम राहील, तोपर्यंत आम्ही त्यांच्याशी व तेवढ्यापुरते सहकार्य करावयास मोकळे राहू. एरवी त्यांना आमचा रामराम. हा पक्ष ज्यांना संघटित करू पाहतो त्यांची व्याप्ती त्यांनी स्पष्टपणे नमूद केली आहे. ते लिहितात, ''हिंदुस्थानातील एकंदर लोकसंख्येचे केवळ राजकीयदृष्ट्या दोन मुख्य भाग पडत आहेत. ते हे की, एक विद्याबळ, द्रव्यबळ किंवा अधिकारबळाने पुढारलेला वर्ग आणि दुसरा ह्यातील कोणतेही बळ अंगी नसल्यामुळे नाइलाजाने मागासलेला वर्ग किंवा बहुजन समाज.'' कर्मवीर शिंदे यांची विभागणी स्पष्ट आहे. ती केवळ वर्णावर आधारलेली नाही. केवळ जातीवर आधारलेली नाही. ती 'विद्याबळ, द्रव्यबळ आणि अधिकार बळ' यांवर आधारलेली आहे. मागासलेल्या जातींना यातले कोणतेही बळ नसते, हे स्पष्टच आहे; परंतु मागासलेल्या म्हणून ज्यांना समजले जात नाही किंवा ज्यांना पुढारलेल्या जाती असे समजण्यात येते त्या जातीतही विद्याबळ नसलेले, द्रव्यबळ नसलेले आणि अधिकारबळ नसलेले असतात आणि तेसुद्धा कर्मवीर शिंदे यांच्या 'बहुजन' या संकल्पनेत येतात, हे महत्त्वाचे आहे. तेव्हा व आता मागासलेल्या समजत असलेल्या जातींतही विद्याबळ, द्रव्यबळ आणि अधिकारबळ येत आहे. कमी–जास्त प्रमाणात आले आहे. असे बळ प्राप्त झालेले विभाग म. शिंदे यांच्या बहुजन

संकल्पनेत येत नाहीत. हे नीट लक्षात घ्यावे. याच कारणांनी त्यांनी 'ब्राह्मणेतर' असे नाव घेण्यास स्पष्ट विरोध केला.

कोणी केवळ ब्राम्हण नाही एवढ्यावरून तो बहुजन समाजाचा आहे हे स्वीकारायला शिंदे तयार नव्हते. पण त्यांनी घालून दिलेल्या कसोट्यांचे कालसापेक्ष संस्करण करून बहुजन समाजाची काटेकोर व्याख्या करण्याचा प्रयत्न त्यांच्या पश्चात कोणीच केलेला दिसत नाही. त्यामुळे बहुजन समाजाचे स्वरूप कायम सबगोलंकारच राहिले आणि त्या संज्ञेचा हवा तसा वापर विविध पक्षांच्या राजकारण्यांकरवी होत राहिला.''[५६] म. शिंदे यांची बहुजन संकल्पना व्यापक होती. जात जमात यांच्या पलीकडे जावून बहुजन समाजाची उभारणी आणि ऐक्य झाल्याखेरीज या समाजाची उन्नती होणार नाही असे मत त्यांचे होते. सुहास पळशीकर यांनी याबाबत महत्वपूर्ण भूमिका मांडलेली दिसते ते म्हणतात, आज बहुजन समाजापुढचा खरा पेच जातिविशिष्टता व सार्वत्रिकता यांची सांगड घालणाऱ्या अस्सल बहुजनवादाची उभारणी कशी करायची हाच आहे. जातीकेंद्री बहुजन जाणिवांचा परिपोष करून टिकाऊ स्वरूपाचे सामुदायिक भान निर्माण केले जाऊ शकत नाही हे स्पष्टच आहे. तसेच जातीचा अभिमान बाजूला सारल्याखेरीज बहुजन आत्मभान उभे राहू शकणार नाही.[५७] यापूर्वी बहुजन राजकारणाबाबत भूमिका मांडताना म. शिंदे नेमके हेच सांगत होते. बहुजनवादाच्या चळवळीला जमात आणि जातलक्षी संदर्भ दिल्यास अखिल भारतीय समाजजीवनाचे नुकसान होईलच, त्याच्या बरोबरीला राष्ट्रीय ऐक्य धोक्यात आल्याखेरीज राहणार नाही हे म. शिंदे यांनी जाणले होते.

विठ्ठल रामजी शिंदे यांची बहुजन संकल्पनेमध्ये सर्व समाजघटकांचा समावेश त्यांनी केला होता त्यांची बहुजन संकल्पना व्यापक संकल्पना होती. ज्या समाजाला असंख्य वर्ष सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वच बाबतीत बहिष्कृत करण्यात आले होते. अशा समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याची जाणीव जागृती त्यांच्या बहुजन संकल्पनेत होती.

म. वि. रा. शिंदे यांचे समाजकारण, राजकारण यांचे मुलभूत असे चिंतन होते. समाजजीवनाला भेडसावणाऱ्या प्रश्नांना भिडून त्यांचे नेमके समाधान होईपर्यंत स्वस्त न बसण्याची विलक्षण वृत्ती त्यांच्या अंगी होती. त्यांचे संपूर्ण जीवनकार्य बहुजन, शोषित, उपेक्षित, वंचित समाजासाठी अपर्ण केलेले होते. त्यांचे साहित्य, भाषणे, विचार आणि संशोधन यामधून

त्यांची बहुजन संकल्पना प्रतिबिंबित होते. त्यांची बहुजन संकल्पना ही सर्वसमावेशक व व्यापक स्वरूपाची होती. न्या. भवानी शंकर नियोगी यांनी १९३३ मध्ये महाराष्ट्र साहित्य संम्मेलन नागपूर येथे म. शिंदे यांच्याबाबत महत्त्वपूर्ण भूमिका मांडलेली दिसते. ते म्हणतात, शिंद्यांचा जीला भरीव हातभार नाही, अशी लोकसेवेची व समाजोन्नतीची चळवळ दाखवून देणे कठिण आहे. राजकारण, समाजकारण, धर्मकार्य, शिक्षणकार्य इतकेच नव्हे तर वाङ्मयीन सेवा आणि इतिहास संशोधन या सर्वात शिंद्यांचा सहभाग आहे. ज्या विधवा विवाहासारखे प्रश्न सोडविणे अवघड काम होते. तत्कालिन धर्मवेड्या काळात अस्पृश्योद्धाराची चळवळ सुरू करणे, तसेच डिप्रेस्ड क्लास ही संस्था उभी करणे, एवढेच नव्हे तर अस्पृश्यांच्या वस्तीमध्ये जावून राहणे, त्यांच्या सहवासात राहणे,म्हणजे मोठ्या धाडसाचे होते.[५८]

गौतम बुद्ध, म. फुले, छ. शाहू महाराज तसेच पेरियार यांच्या बरोबर म. विठ्ठल रामजी शिंदे यांनी बहुजन समाज आणि राजकारणाबाबत मूलभूत चिंतन केले. म्हणून बहुजन संकल्पनेचा अर्थ, उदय आणि विकास आणि बहुजन राजकारण जाणून घेताना महर्षी शिंदे यांची भूमिका दुर्लक्षिता येणार नाही.

**पेरियार रामस्वामी नायर यांचे सामाजिक व राजकीय चळवळ व बहुजन संकल्पनेचा आशय**

म. फुले यांनी भारतामध्ये स्त्री शिक्षणाचे कार्य करून स्त्रियांचा आत्मसन्मान जागृत करून त्यांच्या होणाऱ्या अन्याय, अत्याचार विरोधात शिक्षणाच्या माध्यमातून जोरदार लढा उभारला. तशाच प्रकारचे स्त्री शिक्षणाचे कार्य पेरियार रामसामी नायर यांनी 'स्वाभिमानी चळवळ' या नावाने सुरू केले. 'स्त्री ही पुरुषाची गुलाम नाही' असे विचार त्यांनी वेगवेगळ्या सभांमधून भाषणांमधून व नियतकालिकामधून मांडले. 'देवदासी' या अमानुष प्रथेवर त्यांनी कडाडून हल्ला केला. स्त्रियांना पुरुषाप्रमाणे सामाजिक हक्क मिळाले तरच तिच्यावरील अन्याय दूर होतील, त्यासाठी ती शिक्षित झाली पाहिजे, या प्रमुख भूमिकेतून त्यांनी स्त्रियांसाठी शाळा व महाविद्यालयाची स्थापना केली आणि स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावला. पेरियार यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये महिलांसाठी अभियांत्रिकी महाविद्यालयाची खास व्यवस्था आहे. हा प्रयोग जगात पहिल्यांदाच त्यांनी करून दाखवला. स्त्रियाविषयी ते म्हणतात, ''समाजामध्ये दहा पुरुषापेक्षा दोन स्त्री अधिक लाभदायक ठरतात, कारण त्यांची बुद्धिमत्ता हि भावी पिढी उभी करण्यासाठी उपयोगी ठरते. स्त्रियांना अर्ध्या संपत्तीचा वाटा मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

अन्यथा स्त्री स्वातंत्र्याच्या गप्पा केवळ पोकळ ठरतील, अशी प्रकट भूमिका पेरियार रामसामी नायर यांची होती.

आज दक्षिण भारतातील अनेक स्त्रियां शिक्षण घेऊन पुरुषांच्यापेक्षाही सक्षम झाल्या आहेत. तमिळनाडूच्या मुख्यमंत्री सुद्धा एक स्त्री होती. हे पेरियार रामसामी नायर यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याचे व चळवळीचे फलित आहे. तसेच म. फुले यांच्या सत्यशोधक समाजाची प्रेरणा घेऊन त्यांनी पारंपरिक विवाह पद्धतीला आव्हान देऊन स्वाभिमानी विवाह पद्धतीचा अवलंब केला. ही पद्धत म्हणजे कोणत्याही प्रकारच्या विधी शिवाय केवळ एकमेकांना विश्वास देण्याच्या अटीवर व्यावहारिक कराराप्रमाणे ठरवण्यात आलेली पद्धत होती. या सरळ सोप्या विवाह पद्धतीला नंतर अण्णा दुराई मुख्यमंत्री झाल्यावर वैध असल्याचे जाहीर केले. परिणामी भोळ्या–भाबड्या व गरीब जनतेस लुटण्याचे पुरोहितांचे मार्ग बंद झाले त्यांना रूढी–परंपरेपासून मुक्तीचा मार्ग मिळाला.[५९]

**पेरियार रामसामी यांचे राजकीय कार्य व विचार**

इराडे या शहराच्या महापालिकेच्या अध्यक्षपदी काम करत त्यांनी आपल्या राजकीय कार्याची सुरुवात केली. बहुजन समाजाचा सर्व बाजूंनी विकास घडवून आणावयाचा असेल तर राजकीय सत्तेत सहभागी व्हावे लागेल, या प्रमुख भूमिकेतून त्यांनी १९२० मध्ये काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. कारण काँग्रेस हा असा पक्ष आहे की, ज्यामध्ये समस्त बहुजन समाजास सहभागी होता येते व त्याचा सर्वांगीण विकास होतो, या विचारापर्यंत आले होते. काँग्रेसमध्ये सक्रिय झाल्यानंतर देशाचे स्वातंत्र्य हिंदू–मुस्लिम ऐक्य व बहुजनांचे अनेक प्रश्न सोडवणे, अस्पृशता निवारण इ. महत्त्वाच्या प्रश्नाला त्यांनी हात घालून पेरियार रामसामी यांनी काँग्रेस पक्षाच्या चळवळीत स्वतःला झोकून दिले. दरम्यान १९१६ साली ब्राह्मणेत्तर जाहीरनामा जस्टीस पार्टीच्या नेत्यांनी जाहीर केला होता. या चळवळीने विधिमंडळात व सार्वजनिक सेवांमध्ये ब्राह्मणेत्तरांचे, मागासवर्गीयांचे यांचे प्रमाण नगण्य आहे. हे जाहीर केले होते व त्यासाठी लोकांना जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. या चळवळीमध्ये प्रामुख्याने श्री थियागरायाचेट्टी, डॉ. सी. एन. मुदलियार इत्यादींचा समावेश होता. एका बाजूला ब्राह्मणेत्तरांसाठी जस्टीस पाटीचे भरीव कार्य चालू होते, तर दुसऱ्या बाजूला पेरियार रामसामी

कॉंग्रेसमध्ये राहून बहुजन समाजाच्या प्रश्नासंबंधी व मागासवर्गीयांच्या आरक्षणासाठी लढा देत होते.

समाजातील एका विशिष्ट जातीचेच वर्चस्व सरकारी सेवा क्षेत्रांमध्ये आहे यावर पेरियार रामसामी नायर यांनी जोरदार अक्षेप घेतला होता. भारतामध्ये केवळ ३ टक्के असलेला ब्राह्मण समाज सरकारी नोकऱ्यांमध्ये ८० टक्के प्रतिनिधित्त्व करतो परंतु भारतीय समाजव्यवस्थेमध्ये सर्वात जास्त संख्येने असलेला ब्राह्मणेत्तर वर्ग मात्र नोकऱ्यांमध्ये अगदीच किरकोळ प्रमाणात प्रतिनिधित्व करतो. हा असमतोल दूर करण्यासाठी जातीवर आधारित आरक्षण असणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. या मुद्द्यावर त्यांनी अधिक भर दिला. पुढे १६ सप्टेंबर १९२१ व १५ ऑगस्ट १९२२ मध्ये मद्रास प्रांत सरकारने एक अध्यादेश काढून ब्राह्मणेत्तर समाजाला ४८% आरक्षण जाहीर केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उच्च न्यायालयाच्या निकालामुळे हा अध्यादेश रद्द झाला. तेव्हा पेरियार रामसामी यांनी आकाश–पातळ एक करून सोडले व आरक्षणासाठी तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे केले आणि १४ ऑगस्ट १९५० मध्ये मद्रास बंदचे आव्हान करून बंद यशस्वी केला. परिणामी १३ ऑगस्ट १९५० रोजी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले. या बैठकीला उद्देशून केलेल्या भाषणात त्यांनी आरक्षणासंबंधी सिंहगर्जना केली, ही गर्जना सत्ताधाऱ्यांना हादरा देणारी होती. त्या भाषणात ते म्हणतात, 'जातनिहाय प्रतिनिधित्त्व ही काही आजच्या काळाची चर्चा नाही. सन १९०० पासून हा विषय खदखदत आहे. आपले नेतेही त्या काळापासून जातनिहाय प्रतिनिधीत्त्वाची मागणी करत आहेत. या भाषणामध्ये त्यांनी कॉंग्रेस व म. गांधी यांच्या चळवळीवर घणाघाती टीका करून कॉंग्रेसचे राजकारण उच्चवर्णीयांचे हित जपणारे असे ठामपणे सांगितले. याच भाषणात त्यांनी कॉंग्रेसकडून जस्टिस पार्टीतील नेत्यांवर विनाकारण केलेली चिखलफेक इथपासून ते जस्टीस पार्टीचे सरकार पाडून कॉंग्रेसने मिळवलेल्या सत्तेपर्यंत सर्व इतिहास सांगून त्यांनी कॉंग्रेस अंतर्गत नेत्यांचा आरक्षणास विरोध कसा असायचा हे मुद्देसूदपणे सांगितले. त्यांनी याच भाषणात लोकांसमोर काही प्रश्न उपस्थित केले व आपला हा लढा न्याय हक्कासाठी आहे, असे सांगितले. ते म्हणतात आमच्यावर तीन टक्के लोकांचे प्रभुत्व व सर्वत्र त्यांची मक्तेदारी हे संयुक्तिक वाटते का? आपल्या हक्कासाठी संघर्ष करणे चूक आहे का? असे प्रश्न उपस्थित करून ते पुढे म्हणतात की, 'आम्ही न्याय मागतोय, आम्ही आमचा स्वाभिमान मागतोय आणि आम्ही आमचा वाटा मागतोय'.[६०]

थोडक्यात भारतीय समाज व्यवस्थेतील संख्येने मोठा असलेला बहुजन गुलामगिरीच्या साखळीत अडकून तो समाज व्यवस्थेचा बळी ठरला होता. अशा या शोषित, उपेक्षित समाज घटकास विकासाच्या प्रवाहामध्ये आणून त्यांचा विकास करून त्यांच्यामध्ये आत्मसन्मानाची जाणीव जागृती करण्यासाठी या देशांमध्ये अनेक समाजसुधारकांनी वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळी आंदोलने केली आणि बहुजन समाजाला सामाजिक व राजकीयदृष्ट्या जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. म. फुले, छ. शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. वि. रा. शिंदे या सर्व समाज सुधारकांचा तामिळनाडूमधील वारसदार म्हणून पेरियार रामसामी नायर यांच्याकडे पाहिले जाते. पेरियार रामसामी नायर यांनी तामिळनाडूमध्ये बहुजन समाजाच्या उद्धारासाठी वेगवेगळ्या प्रश्नांवर वेगवेगळे लढे दिले. त्यांनी स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून समस्त महिलावर्गास आपल्या होणाऱ्या अन्यायाविषयी जागृत केले. पुरुषाच्या अधिकारा एवढ्या अधिकाराने समाजात सन्मानाने वागण्याचे स्वातंत्र्य मिळवून दिले. तसेच काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजामध्ये राजकीय वंचिततेची व हक्काची जाणीव निर्माण केली लोकसंख्येने फक्त तीन टक्के असणाऱ्या ब्राह्मण समाजाने संख्येने मोठा असलेल्या बहुजन समाजाला कशाप्रकारे गुलाम केले हे निदर्शनास आणून दिले. तर दलित, मागासवर्गीय समाजास नोकरीत, शिक्षणात व राजकारणात आरक्षण मिळावे, म्हणून सातत्याने आवाज उठून आरक्षणासारख्या ज्वलंत प्रश्नांविषयी सरकारला विचार करण्यास भाग पाडले.

म. फुले, छ. शाहू महाराज, म. शिंदे या महापुरूषांनी दलित समाजोद्धाराचे कार्य करून भारतीय समाजव्यवस्थेला धक्का दिला. तसाच धक्का दक्षिण भारतातील पेरियार रामसामी यांनी दिल्याचे दिसून येते. पेरियार यांच्या मते, प्राचीन भूतकाळ इतिहासजमा झालेला नसून आज ही शुद्रातिशुद्रांच्या व स्त्रीयांच्या मानगुटीवर बसला आहे. आणि आज ही त्यांच्या हिन–दिन अवस्थेला कारणीभूत ठरत आहे. हे पेरियार सामीचे खरे दुःख होते. या वर्गांना शरीर कष्ट पडण्यामागे वर्णाश्रम धर्माची विषम श्रमविभागणी असून कष्टकरी म्हणून त्यांचा दर्जा हलका ठरवला जाण्याकडे ही हिंदू धर्माने शुद्रांना दिलेले दुय्यमस्थानच कारणीभूत आहे. पेरियारांचा असा निष्कर्ष आहे की, भूतकाळ इथे आता उपस्थित आहे. तो वर्तमानाला भरवतो, उतरंडींना अधिमान्यता देतो, आणि सर्वांना स्वतंत्र व समान दर्जा देण्यास नकार देतो. खरेखुरे नागरिकत्व आणि त्यावर आधारित राष्ट्राची निर्मिती त्या भूतकाळाशी जोडुन घेऊन नव्हे तर त्याकडे

सपसेल पाठ फिरवुनच होऊ शकते. ज्ञानाची सर्व साधने सर्वांसाठी सहज प्राप्त असणे, स्वातंत्र्यासाठी स्वाभाविकच अत्यावश्यक ठरले. समाजातील सर्व क्षेत्रातील माणसे जिथे परस्परांशी बरोबरीच्या पातळीवरून व्यवहार करतात, आणि त्यांच्यात परस्परावलंबी समीलन शक्य होते. तिथेच स्वातंत्र्याची शक्यता असते. या दृष्टीने भारतातील जातीय समाज वास्तवात स्वातंत्र्याचे अस्तित्व आणि भवितव्य यासंबंधी काय म्हणता येईल.

ज्ञान हा विषय पेरियारांच्या सर्वच जातीविरोधी लढ्याच्या केंद्रस्थानी होता. त्यांच्या मते जाती विभक्त समाजात जी विषम श्रमविभागणी असते. तिच्यामुळे एका बाजुला केवळ शरीर श्रमाला पात्र असणारे उपजिविकेसाठी राबराब राबणे हाच आपला हक्क समजणारे आणि प्रचंड शारिरीक ताण सोसणारे बहुसंख्य लोक असतात तर दुसऱ्या बाजुला विचार व चिंतन मनन करणारे, इह आणि पारलौकिक जगाचा अन्वयार्थ सांगणारे आपल्या उपजिविकेसाठी स्वत: कष्ट करणारे किंबहुना असे कष्ट करणे हाच आपला हक्क मानणारे निवडक लोक असतात. दुसरे असे की हिंदू धर्माने विशिष्ट प्रकारचे श्रम नेहमीकरीता विशिष्ट समुहावर सोपविले असल्यामुळे त्या समुहाने फक्त तेवढेच करायचे बाकीचे काहीही करायचे नाही. रूढी, कायदा व राजाज्ञा याची शक्ती वापरून बळकट केलेली ही श्रमविभागणी इतिहासभर फक्त ब्राम्हणांच्याच मर्जीने वापरली गेली कारण फक्त ब्राम्हणांनाच ज्ञानावर हक्क होता.[६१]

पेरियारांच्या मते भारताच्या जाती विभक्त समाजातील ज्ञानाबाबत हेच खरे आहे. जीवन प्रक्रियांपासून ते तुटलेले असले तरी समाज जीवनात ते ज्ञान ब्राम्हणांचे मंत्र पठण, कर्मकांड वगैरेच्या द्वारे पुन्हा शिरते, आणि बुद्धीवंत म्हणून जी काही प्रतिष्ठा व शक्ती ब्राम्हणांची असते, तिच्यामुळे त्यांच्या तोंडून बाहेर पडलेल्या संहितांना आपोआपच प्रामाण्य लाभते. कोणीच त्याचा सहज प्रतिकार किंवा विरोध करू शकत नाही.[६२] पेरियार अशा प्रकारचे विचार मांडून थांबले नाहीत तर ब्राम्हणी विषारी विचारापासून बहुजन समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांनी सतत आवाज उठविला. पेरियार रामस्वामी यांनी दक्षिण भारतातील समस्त बहुजन समाजास संघटीत करून त्यांच्यामध्ये सामाजिक व राजकीय वंचितेची जाणीव निर्माण केली. बहुजन समाजाच्या विकासात अडथळा ठरलेल्या अंधश्रद्धावर अनेक सभा, परिषदा व आंदोलनाच्या माध्यमातून जोरदार आवाज उठविला.

अशाप्रकारे भारतीय समाजव्यवस्था ही जातिभेद, लिंगभेद व वर्णभेदात विभागली असून हजारो वर्षापासून बहुजन समाजातील जातीवर उच्चवर्णियांनी आपले वर्चस्व प्रस्थापित करून त्यांना मानसिक, सामाजिक व शारिरीक गुलाम केले. त्यांना माणुस म्हणून गणलेच जात नव्हते. पशुपेक्षाही हिन वागणूक काही जातींना दिली जात होती. एवढेच नव्हे तर त्यांचा शारिरीक स्पर्शसुद्धा विटाळ समजला जात होता. हा पराकोटीचा अन्याय भारतीय समाजव्यवस्थेमध्ये घट्ट रूजला होता. त्यामुळे या जाती अनेक विकासापासून, हक्कापासून वंचित होत्या. या समाजाला आपला विकास करण्याची संधीच या व्यवस्थेने दिली नव्हती. ब्राम्हण सांगेल तो नियम, करायला लावेल ते काम मग ते कसलेही असो मुकाटपणे ते करायचेच या नियमाप्रमाणे शेकडो वर्षापासून इथला बहुजन समाज मानसिक गुलामगिरीत जगत होता. अशा या बहुजन समाजास गुलामगिरी व शोषण मुक्त करून त्यांना माणुस म्हणून जगता यावे, मान, सन्मान, प्रतिष्ठा मिळावी व समताधिष्ठीत भारतीय समाजाची निर्मिती व्हावी, कोणावरही कसल्याही प्रकारचा अन्याय होऊ नये, सर्वांना समानतेची वागूणक मिळावी, त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, म्हणून प्राचीन काळी गौतम बुद्धांनी तर आधुनिक काळामध्ये म. फुले, छ. शाहू महाराज, म. शिंदे, पेरियार रामस्वामी नायर यासारख्या थोर समाज सुधारकांनी वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळी आंदोलने करून बहुजन समाजाच्या प्रश्नाला वाचा फोडली व त्यांना न्याय मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. हे कार्य करताना या समाजसुधारकांना फार मोठ्या सामाजिक विरोधाचा सामना करावा लागला. शारीरिक मानसिक कुचंबनांना त्यांना सामोरे जावे लागले. एवढेच नव्हे तर त्यांचे समाजसुधारणेचे कार्य थांबविण्यासाठी त्यांचेवर मारेकरी सुद्धा घालण्यात आले परंतु त्यांनी आपल्या प्राणाची ही पर्वा न करता आपले समाज प्रबोधनाचे कार्य अधिक नेटाने व सतत सुरू ठेवले. आज आपण जे स्वातंत्र्य उपभोगतो ते त्यांचीच देण आहे. अशा या समाजसुधारकांच्या प्रभावी कार्यामुळे देशातील समस्त बहुजन समाज सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या जागृत झाला. आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची जाणीव त्यांना होऊ लागली. अन्यायाविरोधात तो संघटितरित्या पेटून उठू लागला. यातुनच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे खंबीर व लढावू नेतृत्व भारतामध्ये उदयास आले. त्यांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहून समस्त बहुजन समाजाला सर्वांगिण विकास करण्याची संधी दिली. त्यांच्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक व राजकीय चळवळ व बहुजन संकल्पनेचा आशय

भारतीय समाजाला विचारांची एक नवी दिशा देणारे तसेच शतकानुशतके रूढी, प्रथा, परंपरेच्या साखळदंडात अडकलेल्या भारतीय समाजाला जागे करण्याचे कार्य करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील महान समाजसुधारक, क्रांतिकारक नेते, विचारवंत होते. भारतीय समाजव्यवस्थेत आढळणाऱ्या समस्यांचा शास्त्रशुद्धपणे अभ्यास करून, त्यांनी आपल्या व्यासंगीवृत्तीचा परिचय करून दिला. भारतीय घटना निर्मितीत दिलेल्या अतुलनीय योगदानामुळे देशाने त्यांना घटनेचे शिल्पकार या नावाने गौरविले. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत वाटचाल करत डॉ. आंबेडकरांनी देशातील अस्पृश्य समाजासह बहुजन समाजास सन्मान आणि प्रतिष्ठेचे जीवन मिळवून दिले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य हिंदू धर्मातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आणि त्यांना अधिकार मिळवून देण्यासाठी खर्च केले. समताधिष्टीत, न्यायाधिष्टीत समाजरचना स्थापन करण्याचे ध्येय ठेवून सातत्याने संघर्ष करत राहिले. समतेच्या अभावी दलित वर्गाला जी मानहानी सहन करावी लागत होती, तिचा प्रत्यक्ष अनुभव ही त्यांना स्वत: घेतला होता. मनावर ओरखडे उमटविणारे अनुभव पुढच्या पिढीच्या वाट्याला येऊ नयेत म्हणून प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष करीत राहिले. दलितांच्या अधिकारासाठी कोणाशीही संघर्ष करण्याची त्यांची तयारी होती. त्यांच्या नेतृत्त्वामुळे दलित चळवळीला आवाज मिळाला. दलितांच्या अधिकारासंबंधी मागण्यांचा विचार करण्यास भारत सरकारला भाग पाडले. भारतीय घटनेचे शिल्पकार, राजकीय नेता, अर्थतज्ञ, शिक्षणतज्ञ आणि विचारवंत इत्यादी विविध भूमिका पार पाडून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला.

## डॉ. आंबेडकरांची दलित समाजाविषयीची भूमिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्योद्धाराच्या दृष्टीने राजकीय सत्तेचे महत्त्व ओळखून अत्यंत प्रभावीपणे राजकारण केले होते. दलितांवरील सर्व प्रकारच्या समस्येवरील उपाय म्हणजे राजकीय सत्ता होय. राजकीय सत्तेशिवाय बहिष्कृत वर्गाचा उद्धार होणार नाही असे त्यांचे ठाम मत होते. दलितांना राजकारणात स्थान मिळाले म्हणजे त्यांच्या समस्या तेच चांगल्या प्रकारे मांडू शकतील, असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी साऊथबरो कमिटी पुढे महत्त्वपूर्ण साक्ष दिली होती. स्वराज्य मिळाल्यानंतर देखील कायदेमंडळात ब्राम्हण्यग्रस्तांचे वर्चस्व निर्माण झाल्यास त्यांचेच प्रस्थ निर्माण होईल त्यामुळे स्वराज्य मिळाले तरी अल्पसंख्याकांचे हित

सुरक्षित राहणार नाही. हे लक्षात घेऊन अल्पसंख्यांकावर अन्याय होऊ नये म्हणून त्या–त्या जातीला कायदेमंडळात पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले तरच स्वराज्याचा खरा उपयोग होईल. म्हणूनच जातवार प्रतिनिधित्वाच्या मागणीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आत्यंतिक महत्त्व दिले होते. दलितांना राजकीय सत्तेतील योग्य तो वाटा मिळाल्याशिवाय या देशातील वर्णव्यवस्थेवर आधारित विषमता नष्ट होणार नाही, म्हणून दलितांना राजकीय सत्तेची आवश्यकता आहे. म्हणून त्यांनी बहुजन सामाजाला संदेश दिला. जा आणि तुमच्या घरांच्या भिंतीवर लिहून ठेवा, तुम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनायचे आहे.[६३] त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेगवेगळे राजकीय पक्ष स्थापन केले होते. या पक्षांच्या नावावरून व्याप्ती व धोरण यावरून बाबी स्पष्ट होतात. स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशन आणि रिपब्लिकन पक्ष अशी ती नावे आहेत. १९३८ साली मनमाड येथे जी. आय. पी. रेल्वे कामगारांच्या सभेत भाषण करताना ते म्हणाले होते, ब्राह्मणशाही व भांडवलशाही हे आपले दोन शत्रू आहेत. म. फुले यांनी योजलेल्या भटजी व शेटजी या दोन शब्दांची येथे आठवण व्हावी. डॉ. आंबेडकरांनी ब्राह्मण असा शब्द न वापरता ब्राह्मण्य असा शब्द वापरला. म. फुले यांच्या शेटजी या शब्दाने शेटगिरी (सावकारी) करणे हा व्यवसाय सुचित होतो आणि भटजी (ब्राह्मण नव्हे) या शब्दाने 'भटजी' करणे हे सुचित होते, अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती.

भारताच्या राजकारणात दलित बहुजन समाजास स्वतंत्र आणि वेगळे स्थान असावे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मागणी होती. किंबहुना तोच त्यांच्या राजकारणाचा पाया होता. दलित अस्पृश्यांना सवर्णाच्या बरोबरीने स्थान मिळावे, आणि त्याचबरोबर दलित समाजाला हिंदू पासून विभक्त समजण्यात यावे असे त्यांचे मत होते. त्यांची ही मागणी जातवार प्रतिनिधित्वाप्रमाणे समतेची वाटत होती. अस्पृश्य जोपर्यंत हिंदू समाजात त्यांचे गुलाम म्हणून राहतील तोपर्यंत ब्राम्हण्यावर हल्ला करणे शक्य होणार नाही, म्हणून जातीव्यवस्थेची पकड असलेल्या घरात गुदमरून राहण्यापेक्षा त्यांच्या बाहेर पडून स्वःताची तसेच देशाची उन्नती करून घ्यावी, त्यांच्या या मागणीत वरकरणी विषमता दिसत असली तरी ती समतेसाठीच आहे असे त्यांचे मत होते. दलित अस्पृश्यांनी कुणाच्याही दावणीला आपला समाज किंवा पक्ष न बांधता स्वतंत्रपणे राजकारण करून स्वाभिमानी चळवळ उभी करावी अशी त्यांची भूमिका होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती धर्माचा विचार न करता देशातील बहुसंख्यांक शेतकरी, शेतमजुर, कामगार या श्रमजीवी वर्गाच्या ताब्यात सत्ता यावी या हेतुने 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला होता. या पक्षात मराठा कुणबी, कायस्थ इत्यादी जातींचा समावेश होता. देशाच्या शासनात आतापर्यंत उच्चवर्णीय लोकांचाच भरणा झाल्यामुळे मुठभर अल्पसंख्यांक उच्च वर्णियांनी बहुसंख्य जनतेवर राज्य केले. परंतु यात बदल झाला पाहिजे. आणि ८०% गोरगरीब जनतेचे राज्य आले पाहिजे आणि याच वर्गातील एखादी लायक व्यक्ती या देशाची पंतप्रधान व्हावी असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

अस्पृश्यांनी स्वावलंबन आणि स्वाभिमानी वृत्तीने लढा चालविला पाहिजे, आणि राजकीय हक्क कोणाची मेहरबानी म्हणून नव्हे तर नैसर्गिक हक्क म्हणून संपादित केले पाहिजेत. राजकारण हेच दलितोद्धाराचे एकमेव साधन आहे. दलितोद्धाराचे हे कार्य भाडोत्री माणसांकडून होणे शक्य नाही. त्यासाठी दलितांनी सत्तेची कास धरली पाहिजे अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. देशात खरी लोकशाही निर्माण करावयाची असेल तर हजारो वर्ष डोक्यावर नाचत असलेला वरचा वर्ग खाली आणि खालचा वर्ग वर गेल्याशिवाय म्हणजे क्रांतीचे चाक पूर्ण फिरकल्याशिवाय खरी क्रांती होणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले होते.[६४] आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२४ साली बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना करून दलित आणि सवर्ण यांनी दलितांचा आत्मसन्मान जागृत करण्याचा प्रयत्न केला व महाडच्या चवदार तळ्याचा प्रसिद्ध सत्याग्रहामार्फत आत्मसन्मानाची ओळख करून दिली. राजकीय पातळीवर प्रथम डॉ. आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजुर पक्ष' या पक्षाची स्थापना केली. यात दलित, शेतमजुर, कष्टकरी यांचा राजकीय पक्ष उभारून, समविचारी सवर्णांना निवडुन आणुन विरोधी पक्ष म्हणून काम केले.

१९४२ च्या सुमारास स्वातंत्र्यासाठीच्या वाटाघाटीमध्ये धर्म आणि जाती समुह यांना महत्त्व आल्याने १९४२ सालात 'शेडयुल्ड कास्टस् फेडरेशन' ची स्थापना केली. स्वातंत्र्य मिळाले ते तेव्हा जातिवाचक पक्षाचे विसर्जन करून राममनोहर लोहिया, एस. एम. जोशी, आचार्य अत्रे यांच्या सारख्यांचा समावेश असलेला सर्व समावेशक रिपब्लिकन पक्ष असावा म्हणून संबंधितांना त्यांनी खुले पत्र पाठविले. पण पक्ष स्थापनेपूर्वीच त्यांचे महापरिनिर्वाण झाले. म्हणून त्याकाळचे शेड्युल्ड कास्टस फेडरेशन आत्मकेंद्री पुढारी यांनी खुल्या पत्राच्या

आधारावर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. अध्यक्षांच्या ठिकाणी प्रेसिडियमची वर्णी लावली. तेथेच फार मोठी चूक झाली. शेड्युल्ड कास्टसच्या फेडरेशनच्या काळात दुसरे फेडरेशनचे पुढारी निर्माण होऊ न शकल्याने प्रेसिडिम मध्ये असलेले पुढारी आपणच प्रथम क्रमांकाचे असल्यासारखे वागू लागले. तरी पण संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बॅनरखाली प्रमुख पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाने भाग घेतला. परिणामी महाराष्ट्रात पाच खासदार आणि इतर राज्यात तीन खासदार निवडून आले. मुंबई राज्यात (महाराष्ट्रात) रिपब्लिकन पक्षाचे १३ आमदार निवडून आले.[६५] पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात १९५७ सालापासून आर. पी. आय. या पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये दलित राजकारणाला सुरवात झाली.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेतील बहुजन समाज आणि बहुजन राजकारण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षाच्या गुलामगिरीतून बहुजन, शोषित, वंचित आणि बहिष्कृत समाजाची मुक्ती करण्यासाठी जे चिंतन आणि जी पर्यायी मांडणी केली त्यातून त्यांचे बहुजन राजकारणाची आणि सामाजिक लोकशाहीचे भक्कम वैचारिक अधिष्ठान निर्माण केले. त्यांच्या बहुजन चिंतनाला सामाजिक लोकशाही आणि समतेची भक्कम कडा होती. त्यानी म. फुले आणि छ. शाहूंनी आरंभलेल्या बहुजन राजकारण आणि बहुजन मुक्ती लढ्याला आपले जीवितकार्य बनविले, आणि या समाजाचा उद्धार केला. म्हणून आजच्या बहुजन राजकारणाला छ. शाहू महाराज, म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची परंपरा मिळालेली आहे. किंबहुना या परंपरेतूनच बहुजन राजकारण साकार झाले आहे. बहुजन वंचित समाजाला राज्यकर्ती जमात बना असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर करताना दिसतात. हा बदल घडण्यासाठी शिक्षण संघटन आणि संघर्ष या त्रयीचा अवलंब करण्यास सांगतात. बहुजन शोषित समाजाला सामाजिक गुलामगिरीतून आणि विषमतेच्या बेड्यातून स्वतंत्र करण्यासाठी धर्मचिकित्सेची गरज वाटली. कारण सर्व विषमतेच्या मुळासी तथाकथित धर्मभावना आहेत हे बाबासाहेबांनी ओळखले होते, म्हणून त्यांनी प्रथम धर्मचिकित्सा केली. तशी म. फुले, छ. शाहू महाराज यांची या अगोदर परंपरा होतीच बाबासाहेब या परंपरेचाच वारसा चालवित होते. त्यांनी केलेली धर्माची केलेली बुद्धीप्रामाण्यवादी चिकित्सा ही अभ्यासपूर्ण आणि साधार युक्तीवाद करणारी होती. त्यानी केलेले धर्मचिंतन हे वास्तव चिंतन होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्म मिमांसा**

लाहोरच्या जात पात तोडक मंडळासमोर भाषण करण्यासाठी बाबासाहेबांनी जे भाषण तयार केले होते त्याचे Annihilation of Cast नावाने ग्रंथ लिहिला. यांत आणि Riddles in Hinduism हिंदुत्वाचा कूट प्रश्न या दोन ग्रंथात धर्मचिकित्सा केली. जातीचे निर्मुलन या ग्रंथात त्यांनी असे म्हटले की, हिंदु धर्म प्रारंभी चार वर्णांनी विभागलेला होता. कालांतराने चार वर्णांचे रूपांतर चार जातींमध्ये झाले. जातीभेद वाढतच गेला जातीभेद हे श्रमाची विभागणी करते असे नाही तर श्रमिकांची विभागणी करते. हिंदु समाजाची वर्णाच्या आधारे झालेली पुनर्रचना ही अपमानास्पद आहे. वर्ण नियमानुसार क्षुद्रांना ज्ञान संपादन करण्याचा अधिकार नाही. आर्थिक उत्पादन करणारा व्यवसाय करण्यास बंदी आहे. शस्त्र बंदी आहे. त्यामुळे क्षुद्राने कधीच बंड केले नाही. दास्यात खितपत पडणे हे आपले पूर्वसंचित समजून दारिद्र्य, गुलामगिरीत खितपत राहिले पाहिजे असे तो समजू लागला. त्याचे कर्तव्य लूळे पडून तो पंगू झाला. जरी जगात कुठेही सर्व समाज पूर्णतया एकच बनलेला नाही. प्रत्येक समाजात वर्ग असतात तरी भारतीय समाजातील वर्ग मुळातच वेगळे असतात हिंदुच्या हानीचे मुळ जातीभेदात आहे जात हिंदुच्या अवनतीचे कारण आहे. जातीव्यवस्था हिंदुच्या अखंड पराभवास कारणीभूत झाली आहे. जातीमुळे हिंदुचे वाटोळे झाले आहे.''[६६]

मुंबईत दादर येथे भरविलेल्या परिषदेत आपल्या समाजबांधवांना महत्वपूर्ण उपदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला ते म्हणतात, धर्म, जाती पाळण्यास सांगत आहे, त्यामुळे जाती पाळण्याचा धर्म शिकविणारी हिंदुची धर्मशास्त्रेच त्यांची खरे शत्रू आहेत. धर्मशास्त्रांच्या पावित्र्यावरील श्रध्दा नाहीशी करा, त्यांची सत्ता नाहीशी करा, त्यांची सत्ता उलथून पाडा, ती देवप्रणीत आहेत ही समजूत नाहीशी करा. हिंदु स्त्री आणि पुरूष यांना शास्त्रांच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करा, त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे आंतरजातीय विवाह करू द्या, ब्राम्हण स्वतःला बुध्दीमान आणि जन्मसिध्द पुढारी समजत असतात. पुरोहित वर्गाची सत्ता नाहीशी करण्यासाठी निघालेल्या चळवळीचे नेतृत्व ब्राम्हण वर्ग करणार नाही. कारण एकाच शरीराची दोन अवयव एकमेकांशी लढणार नाहीत, म्हणून जन्मजात पुरोहितगिरीची पध्दत बंद करून ती सर्व हिंदुना खुली केली पाहिजे.[६७] याचा अर्थ बाबासाहेबांना हिंदु समाजाची समतेच्या आधारे पुर्नरचना करायची होती. जातनिर्मुलनाच्या प्रबंधामध्ये डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, हिंदु

समाज हा मिथक आहे. हिंदु हा शब्द मुस्लिमांनी मुस्लिम आणि इथले लोक यांच्यातील भेद सांगण्यासाठी उच्चारलेला शब्द आहे. हा शब्द ओळख म्हणून दिलेला शब्द आहे. मुस्लिमांच्या आगमनापूर्वी कुठल्याही संस्कृत साहित्यामध्ये हिंदू हा शब्द आढळत नाही. हिंदू समाज हा समाज नसून जातींचा समूह आहे.[६८] अर्थात हिंदू हा शब्द सिंधू नदीच्या खोऱ्यात राहणाऱ्या लोकासाठी वापरलेला प्रदेशवाचक शब्द आहे असे अनेक विचारवंतानी नमुद करून ठेवले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म. फुले आणि राजर्षी छ. शाहु महाराज यांच्यानंतर जो वारसा निर्माण केला तो अखिल भारतीय समाजाला दिशादर्शक आहे. त्यांच्या प्रमाणे आजमितीपर्यंत कोणीही धर्मचिकित्सा करू शकला नाही, ही गोष्ट आज आपण प्रामाणिकपणे कबूल केले पाहिजे. बुध्दीवाद, वास्तवता, वस्तुनिष्टता, साधार प्रहार आणि युक्तीवाद करण्याची दुर्दम्य विद्याशक्ती बाबासाहेब यांच्याकडे होती. ते एका ठिकाणी म्हणतात, मी सांगतो धर्म हा मनुष्याकरिता आहे. मनुष्य धर्माकरिता नाही. या जगात तुम्हास जर संघटन करायचे असेल, समाज एकसंघ करायचा असेल व यश संपादन करायचे असेल, तर हिंदु धर्माचा त्याग करा. जो धर्म तुम्हाला माणूस म्हणून ओळखावयास तयार नाही. जो धर्म तुम्हाला शिक्षण मिळू देत नाही, तुमच्या ऐहिक उत्कर्षाच्या आड येतो. तो धर्म या सज्ञेला पात्र नाही. जो धर्म आपल्या अनुयायांना आपल्या धर्मबांधवाशी माणुसकीने वागण्यास शिकवित नाही तो धर्म नसून रोग आहे. जो धर्म आपल्या अनुयायांना अमंगल जनावरास स्पर्श करावयास शिकवितो. परंतू माणसाचा स्पर्श चालू देत नाही, तो धर्म नसून शुध्द वेडगळपणा आहे. जो धर्म काही वर्गांना शिक्षणापासून दूर ठेवतो, त्यांना धनसंचय करू देत नाही, शस्त्र हाती घेवू देत नाही.[६९] अशा धार्मिक व्यवस्थेला विरोध करून बहिष्कृत बहुजन समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर परिश्रम घेतले. त्यांनी बहुजन शोषित समाजाच्या उद्धारासाठी सामाजिक लोकशाहीचे चिंतन केले.

**बाबासाहेब आंबेडकरांचे बहुजन समाज घटकांसाठी केलेले सामाजिक लोकशाहीचे चिंतन**

आजमितीपर्यंत बहुतांश विद्वान मंडळी सांगतात, लिहितात, बोलतात म्हणून लोकशाही चिंतन म्हटले की, लोकशाहीचा राजकीय अंगाने आपण विचार करीत आलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लोकशाही चिंतनाला समाजशीलतेचा भक्कम आधार दिलेला होता. लोकशाही ही कोरी कल्पना नसून त्याला सामाजिक संदर्भ असतात. भारतामध्ये राजकीय

लोकशाहीबरोबर आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रस्थापित झाली पाहिजे. तरच भारताच्या स्वराज्याचा आशय अधिक समृध्द होणार आहे ही भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, भारत देशाला स्वराज्य मिळणे गरजेचे आहेच. पण, त्याहुनही प्राणप्रिय म्हणजे भारतीय समाजातील सामाजिक गुलामगिरी, मानसिक गुलामगिरीतून संपूर्ण शोषीत समाजाची मुक्ती मंदीर प्रवेश आहे. लोकशाही सत्याग्रहाबाबत भूमिका मांडताना डॉ. बाबासाहेब हिंदु समाज माणुसकीचे हक्क देणार आहे की नाही? हा प्रश्न उपस्थित करतात. मंदिर प्रवेश करून माझ्या समाजाला कर्मकांडात मला गुंतवायचे नाही. देवाची पुजा केल्याने त्यांचे प्रश्न मिटतील असे मी मुळीच मानत नाही किंवा माझी तसी मुळीच समजूत नाही. मंदिर प्रवेशाच्या घोषणेने समाजात जागृती निर्माण झालेली आहे. आपल्या हक्काची जाणीव झालेली आहे. आता अस्पृश्यांनी शिक्षणप्रसार व राजकीय हक्कासाठी झगडण्याची पराकाष्ठा केली पाहिजे.''[७०] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समाजात लोकशाही समानतेच्या हक्कासाठी समाजात जाणिव जागृत करावयाची होती. कारण जागृत समाजच लोकशाहीला चिरंतनत्व देवू शकतो हे त्यांनी ओळखले होते. ज्या समाजात मोठया प्रमाणात विषमता आहे. माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळत नाही अशा विषमता पूर्ण समाजात केवळ राजकीय लोकशाही यशस्वी होवून उपयोग नाही असे ते म्हणत. समाजाचा उत्कर्ष करायचा असेल तर भारतातील सर्व समाज घटकाला समानतेचे हक्क मिळायला हवेत. अस्पृश्यता समुळ नष्ठ होवून समाजातील जातीसंस्थेचे निर्मुलन व्हायला हवे. हे सामाजिक लोकशाहीच्या प्रस्थापनेमुळेच शक्य होणार आहे. ते पुढे म्हणतात आपण भारतात राजकीय लोकशाहीत यश मिळविले आहे, परंतु सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यास आपल्याला अपयश आलेले आहे. सामाजिक आणि आर्थिक लोकशाही ही स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व आणि राज्यघटनेची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करूनच प्रस्थापित करता येईल. या सामाजिक लोकशाहीच्या चौकटीत बहुजन समाजाचे रास्त राजकारण आकारास आले पाहिजे असे बाबासाहेबांना सांगायचे होते.

### दलितांचे राजकारण

महाराष्ट्रासह संपूर्ण देशात दलित समाजाच्या राजकारणाला दिशा आणि गती मिळाली. ती डॉ. आंबेडकरांच्या लेखन आणि राजकीय नेतृत्त्वामुळेच देशातील समस्त दलितांनी संघटीत

होऊन समान अधिकारांसाठी लढा दिला पाहिजे, आणि राजकीय अधिकार मिळविले पाहिजेत यावर सुरवातीपासूनच डॉ. आंबेडकरांनी भर दिला होता. त्यासाठी त्यांनी दलितांचे वेगळे संघटन करून समाज जागृती करण्यावर लक्ष केंद्रीत केले होते. त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९२० मध्ये 'मुकनायक', १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत', १९३० मध्ये 'जनता' तर १९५६ ला 'प्रबुद्ध भारत' अशी चार वर्तमानपत्रे काढून त्या माध्यमातून दलित समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे व त्यांना जागृत करण्याचे कार्य केले. डॉ. आंबेडकरांनी हयात असताना सर्व धर्मीय सर्व जातीय जनतेच्या उद्धारासाठी म्हणून लोकशाही राज्यात प्रभावी विरोधी पक्ष असला पाहिजे. या व्यापक भूमिकेतून भारतीय रिपब्लिकन पक्ष नावाचा राजकीय पक्ष स्थापन करण्याची दि. १३ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे घोषणा केली. परंतु डॉ. आंबेडकरांना या पक्षाची स्थापना करता आली नाही. कारण १९५६ रोजी त्यांचे महापरिनिर्वाण झाले.[७१]

थोडक्यात डॉ. आंबेडकरांना दलितांच्या राजकारणाची राजकीय चळवळ सक्षम करून तिला दिशा दिली पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आपल्या मागे या समाजाला तेवढेच दुरदृष्टीचे नेतृत्त्व देऊ शकेल अशी खंबीर माणसे डॉ. बाबासाहेबांना मिळाली नाहीत. गांधी, नेहरू, इंदिराजी या क्रमाने कॉँग्रेस पक्षाला नेतृत्त्व मिळत राहिले. डॉ. मुंजे यांचे मानसपुत्र डॉ. हेडगेवार आणि पुढे गोवळकर गुरूजी यांच्यासारखे नेतृत्त्व हिंदुत्ववादी चळवळीला लाभले मात्र दलितांच्या चळवळीत डॉ. आंबेडकरांच्या नंतरचा खंबीर पुढारी दिसण्याआधीच बाबासाहेबांचे महानिर्वाण व्हावे ही खरी शोकांतिका होती. कारण त्यांच्याच प्रयत्नाने जागा झालेला शोषित समाज नेतृत्त्वाअभावी दिशाहीन झाला होता. पुढे त्यांच्या पश्चात त्यांचेच अनुयायी पुढारी बनले पण कर्तृत्त्वहीन महत्त्वाकांक्षेने पछाडलेल्या नेत्यांना ना दलितांची चळवळ चालविता आली ना बाबासाहेबांचा रिपब्लिकन पक्ष चालविता आला त्याचा आढावा पुढीलप्रमाणे

**रिपब्लिकन पक्ष** (आर. पी. आय.)

डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणामुळे दलित समाजावर दु:खाचा डोंगर कोसळला होता. आमचा वाली, तारणहार, माय बाप पोशिंदा योद्धा गेला. आता आमचे कसे होणार या चिंतेने देशातील समस्त दलित समाज हादरून गेला होता. बाबासाहेबांनी सुरू केलेली ही दलित्तोद्वाराची चळवळ कोण पुढे नेणार हा एकच प्रश्न लोकांच्या मनामध्ये घर करून राहिला होता. अशा चिंतेच्या वातावरणातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दहा

महिन्यानंतर त्यांनी दाखविलेला मार्ग कृतीत आणण्यासाठी त्यांचे अपुरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ३ ऑक्टोबर १९५७ रोजी ॲड. बी. सी. कांबळे यांच्या पुढाकाराने नागपूर येथे दिक्षा भूमीवर रिपब्लिकन पक्ष स्थापनेची घोषणेची घोषणा केली. आर. डी. भंडारे, दा. ता. रूपवते इत्यादी दिग्गज मंडळी त्यांच्या समवेत होतो. पक्षाचा उद्देश कार्य पद्धती याबाबतचा निश्चित आराखडा तयार करण्यासाठी ॲड. बी. सी. कांबळे, दा. ता. रूपवते, बॅरिस्टर खोब्रागडे यांची समिती गठीत करण्यात आली. सामाजिक, राजकीय परिवर्तनाची लढाई जिंकण्याचा आशावाद पल्लवीत होऊ लागला. परंतु पक्षाची घटना तयार करण्याचे काम झाले नाही. सर्व मंडळी जोमाने कामाला लागली. अल्पावधीतच रिपब्लिकन पक्षाने भारतीय राजकारणात गरूड झेप घेतली. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत मित्र पक्षाच्या पाठींब्याने मुंबई राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत या पक्षाचे १९ आमदार तर महाराष्ट्राच्या इतर प्रांतातून लोकसभेवर ९ खासदार निवडून गेले. ही पक्षाची गरूड झेप निश्चितच क्रांतिकारक होती. हा पक्षाचा सुवर्णकाळ मानला जातो. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नावाने निवडणूका लढविल्या असल्याने समविचारी घटक पक्षाचे सहकार्य मिळालेले होते. त्याचा निवडणूकीत यश मिळविण्यासाठी फायदा झाला हे नाकारता येत नाही. भीमशक्तीची एकजुट इतरांना आव्हान वाटले होते. भाजप जनसंघाचे केवळ ४ खासदार निवडून आले होते. त्यांना रिपब्लिकन पक्षाचा विजय अस्वस्थ करणारा ठरला होता. नेत्यांची वैचारिक ताकद निवेदन शैली, युक्तीवाद इंग्रजी भाषेचा वापर, प्रभावशाली नेतृत्त्व व्यक्तीमत्त्व ही सर्व मंडळी गुणसंपन्न, हरहुन्नरी, हुशार असल्याने त्यांच्या सभांना प्रचंड गर्दी होत असे. जातीयवाद्यांचा मुकाबला करणारा दरारा निर्माण केला होता परंतु चळवळीचे नेतृत्त्व कुणी करायचे कधी उघड तर कधी छुप्या पद्धतीने धुसफुस सुरू झाली. वैयक्तिक गैरसमज, हेवेदावे यावरून भांडणे होऊ लागली. मतभेदावर तोडगा काढणे सामंजस्याची भूमिका स्वीकारण्याऐवजी नेते मंडळी वैयक्तिक सत्ता लाभ मिळविण्याचा शोध घेऊ लागली. सर्वप्रथम मलाच सत्ता मिळाली पाहिजे अशी सर्वांमध्ये स्पर्धाच सुरू झाली तेव्हापासूनच पक्षाच्या ऱ्हासाला सुरवात झाली.

**पक्षाची फाटाफुट**

३ ऑक्टोबर १९५८ ला पक्ष फुटला आणि फुटलेल्या नेत्याच्या स्वतंत्र सभा होऊ लागल्या. पक्षाची रितसर घटना तयार करण्यात आली नव्हती. फाटाफुटीचे कारण कोणतेही

नव्हते. दादासाहेब गायकवाड हे बाबासाहेबांच्या चळवळीचा कट्टर कार्यकर्ते होते. बाबासाहेबांनी त्यांच्यावर चळवळीची सोपविलेली जबाबदारी उत्तम पार पाडत होते. समाजात त्यांचे स्थान आदराचे होते. परंतु त्यांचे शिक्षण कमी होते. दादासाहेब गायकवाड संयुक्त महाराष्ट्राच्या समितीच्या वेळी कम्युनिस्टांच्या बरोबर रहात होते. बाबासाहेबांनी साम्यवादाला, कम्युनिस्टांना विरोध केला होता. म्हणून कम्युनिस्टांशी असलेली मैत्री गायकवाडांनी सोडावी अशी अनेक कार्यकर्त्यांची भूमिका होती. गायकवाड मात्र साम्यवादाचे अनुयायी नव्हते, हे त्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले होते. कायद्याचे ज्ञान असलेल्या ॲड. बी. सी. कांबळे यांनी संकुचित अर्थ लावला हेच कारण कौशल्यपूर्वक पटवून सांगितले. एकमेकांना समजून न घेताच व योग्य अशी समज न देताच पक्षाची घडी बसविण्यासाठी खास पक्षाचे अधिवेशन घेण्याचा निर्णय घेतला. परंतु पक्षाध्यक्ष एन. शिवराज यांनी प्रतिसाद दिला नाही. एक वर्षाने म्हणजेच ३ ऑक्टोबर १९५८ प्रेसिडियमची मुदत संपणार म्हणून बैठक होणार होती. प्रत्यक्षात बैठक न झाल्याने प्रेसिडीयम बरखास्त झाले असा अर्थ कायदे पंडित बी. सी. कांबळे यांनी लावला आणि कायद्याच्या भाषेत पक्ष संपुष्टात आला.

रिपब्लिकन पक्षाचे नादुरूस्त रिपब्लिकन आणि दुरूस्त रिपब्किलन पक्ष असे दोन गट पक्षाचे झाले. १४ मे १९५९ रोजी नागपूर येथे बी. सी. कांबळे यांनी अधिवेशन बोलावले. त्यांच्या सोबत दा. ता. रूपवते, हरिदास आवळे, एल. आर. बाली, पंजाबराव शंकरकर, रामरतन जानोरकर होते. त्यांनी दुरूस्त रिपब्लिकन पक्ष स्थापन केल्याचे जाहीर केले. हाच दुहीचा फाटाफुटीचा पहिला गट ओळखला जातो. मतभेद टोकाला गेल्यामुळे लगेचच १५ व १६ मे १९५९ रोजी औरंगाबाद येथे दादासाहेब गायकवाड यांनी आर. डी. भंडारे, बॅ. खोब्रागडे, बी. पी. मौर्य यांच्या सहकार्याने नादुरूस्त रिपब्लिकन पक्षाची स्थापना केल्याची घोषणा केली.[७२] अशा प्रकारे आर. पी. आय. पक्ष श्रेयवाद व अंतर्गत कुरघोडीने फुटला. प्रत्येक नेत्याला या पक्षाचे नेतृत्त्व करावयाचे होते. तसेच पक्षातून बाहेर पडून स्वतःची ताकद सिद्ध करून इतर पक्षामध्ये प्रवेश करून सत्ता व संपत्ती मिळविणे व स्वतःचा स्वार्थ साधणे हे सुद्धा पक्ष फुटीचे कारण होते. आर. पी. आय. हा अखिल भारतीय पक्ष, दलितांची ताकद कमी करण्याच्या प्रमुख भूमिकेतून कॉंग्रेसने सत्तेची लालूच दाखवून फोडला, अशी राजकीय वर्तुळात

चर्चा होती. मात्र ते साफ चुकीचे होते. कारण पक्ष फुटीला आर. पी. आय. चे कार्यकर्ते व नेतेच जबाबदार होते.

गट नेत्यांपैकी आर. पी. भंडारे हे चाणाक्ष बुद्धीचे नेते होते. त्यांनी १५ ऑगस्ट १९६५ रोजी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. वाघासारखी डरकाळी फोडणारा भंडारे कॉंग्रेसमध्ये प्रवेश करणारा पहिला रिपब्लिकन गट नेता ठरला. पक्ष फाटाफुटीचा पहिला मान अॅड. बी. सी. कांबळे गटास जातो. भंडारे यांना काँग्रेसमध्ये वरचे स्थान मिळत आहे हे पाहून बी. सी. कांबळे यांच्या गटास सोडून दादासाहेब रूपवते यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि समाजकल्याण मंत्री पदावर ते बरेच वर्षे राहिले. सत्तेत राहून त्यांनी समाज हिताची अनेक कामे मार्गी लावली. वसतिगृहांचा दर्जा सुधारण्याचा विशेष प्रयत्न केला. आर्थिक उन्नतीच्या विविध योजना राबविल्या. त्यांनी गट नेत्यावर जहाल टिका कधीच केली नाही. दलित बांधवांच्या उद्धारासाठी सतत काम करत रहाणे हे व्रत त्यांनी स्वीकारले होते. १९६६–६७ हा काळ आंबेडकरी चळवळीस खिंडार पाडणारा ठरला होता.[७३] त्यानंतरचा दलित नेत्यांचा राजकीय प्रवास काँग्रेस पक्षाच्या मर्जीनुसार सुरू झाला आणि येथेच आंबेडकरी विचारधारेची धार संपली.

**दलित पँथरचा उदय**

रिपब्लिकन नेत्यांची फाटाफुट आणि काँग्रेस प्रवेश यामुळे आंबेडकरी विचारांची चळवळ कमकुवत होऊ लागली. समाजात नेत्यांबाबत असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. खेड्यापाड्यात दलित वर्गावर होणारे अन्याय–अत्याचारास वाचा फोडण्यास लढावू संघटना स्थापन केल्याशिवाय पर्याय नाही, असे तरूण वर्गाला वाटू लागले. त्यासाठी Action Programme निश्चित करण्यासाठी राजा ढाले यांच्या अध्यक्षतेखाली ९ जुलै १९७२ रोजी 'दलित पँथर' या लढावू संघटनेची स्थापना करण्यात आली. मार्क्सवादाकडे झुकलेले नामदेव ढसाळ व बुद्धीझमकडे झुकलेले राजा ढाले जोमाने कामाला लागले. जिथे अन्याय होईल तिथे जावून जातीयवाद्यांना जोरदारपणे प्रत्युत्तर दिले. त्यांचे व्यक्तिमत्त्व व प्रभावशाली भाषणे, अभ्यासपूर्ण युक्तीवाद असल्यामुळे ही संघटना सवर्ण हिंदूंना आव्हान देणारी ठरली. भाई संगारे, गंगाधर गाडे, टी. एम. कांबळे यांनी आपल्या संघटनेची लेबल टाकून देऊन एक दिलाने पॅथरच्या कार्यास वाहून घेतले. या धडाडीच्या कार्यकर्त्यांनी अल्पावधीतच कृतीशिल पावले उचलल्याने वचक व दबदबा निर्माण केला.

ज. वि. पवार, अविनाश म्हातेकर, अर्जुन डांगळे, अरूण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगावकर, प्रल्हाद चेंदवणकर इत्यादी कार्यकर्त्यांनी ही संघटना खेड्यापाड्यात पोहोचविली. खेड्यात अन्याय–अत्याचाराचा मुकाबला करत असताना मराठे लोकसंख्येने बहुसंख्य आहेत. त्यांच्यापुढे आपला टिकाव लागणार नाही. हे सत्य माहित असूनही या मंडळींनी जिवाची पर्वा न करता अन्याय–अत्याचार करणाऱ्यांना चोप दिला. त्यांच्या सभा वादळी होत. हाणामारी, मोर्चे पोलिस केसेस यामुळे सर्वांचे लक्ष पँथरने वेधून घेतले होते. प्रत्येक दलित वस्तीत पँथरची छावणी होती. दलितांना संरक्षणात्मक आधार वाटत होता. 'विद्रोह' हे पँथरचे मुखपत्र होते ते ढसाळ व ज. वि. पवार चालवत होते. या संघटनेचे चिन्ह वाघ होते. 'शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन मेलेलं बरं' तसेच गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो आपोआप बंड करून उठेल. ही प्रखर बाण्याची भूमिका तरूणांना चेतावनी देणारी ठरली. स्वाभिमानाने जीवन जगण्याचे आत्मविश्वासाचे बळ त्यांच्यात निर्माण केले. दलितांना संरक्षणाची हमी मिळाल्याने खेड्यापाड्यातील दलित वस्तीमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. हे वास्तव नाकारता येणार नाही. या संघटनेस लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकात फारसे यश मिळाले नाही परंतु महापालिका नगरपालिका निवडणुकीमध्ये मात्र १७९ नगरसेवक निवडून आणण्यात यश मिळाले होते. या संघटनेने नामांतराचा लढा, वरळीची शिवसेना व भीम शक्ती दंगल, रिडल्सचा प्रश्न, स्कॉलरशिपच्या वाढीचा प्रश्न, रिपब्लिकन नेत्यांच्या ऐक्यासाठी प्रखर व जोरदार आंदोलने केली. आणीबाणी जाहीर झाली. याच दरम्यान मतभेदाचे वातावरण तीव्र बनले. राजा ढाले यांनी दलित पँथर १९७५ मध्ये बरखास्त केली. पण कार्यकर्त्यांनी हा एकतर्फी निर्णय धुडकावून लावला आणि १९७५ लाच 'दलित पँथर' ऐवजी 'भारतीय दलित पँथर' या नावाने संघटना स्थापन केली. या नव्या पँथरची धुरा प्रा. अरूण कांबळे यांच्याकडे होती. भाई संगारे, रामदास आठवले, उमाकांत रणबीर, वामन निंबाळकर, टी. एम. कांबळे, गंगाधर गाडे, दयानंद म्हस्के इत्यादी नव्या जोमाने लढले. या चळवळीचे वैशिष्ट्ये म्हणजे चळवळीच्या कार्यात खंड पडू दिला नाही. १९७७ ला ढाले यांनी 'मास मुव्हमेंट' नावाची संघटना स्थापन केली. परंतु ती फारशी नावारूपाला आली नाही. वैयक्तिक स्तरावर आंबेडकरी चळवळ मोठी करण्याची आकांक्षा फसल्याचे दिसते. थोडक्यात आर. पी. आय. या पक्षाची जी अवस्था झाली तीच अवस्था दलित पँथर या संघटनेची ही झाली.

रामदास आठवले, प्रा. अरूण कांबळे, प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नामांतराचा लढा दलितांच्या अस्मितेचा म्हणून दिला. वाघासारखी डरकाळी फोडणारी मंडळी वैयक्तिक हेवेदावे, मतभेदाच्या आहारी गेले. १९८० च्या निवडणुकीत रामदास आठवले यांनी कॉंग्रेसला पाठिंबा दिला. १९८४ च्या निवडणुकीत प्रा. अरूण कांबळे यांनी जनता दलात प्रवेश करून निवडणूक लढविली. प्रा. कवाडे यांनी पिपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना केली. वाघासारखी डरकाळी फोडणारी ही मंडळी शेळी होण्याचे धोरण स्वीकारून कॉंग्रेस कडून जी मंत्री पदे मिळतील ती स्वीकारून आंबेडकरी चळवळीचे काम करणे पसंत केले.[७४] अशा प्रकारे किरकोळ कारणावरून आंबेडकरी चळवळीची अनेक छकले झाली आणि एकसंघ ताकत असलेल्या या चळवळीचे अनेक पक्षात गटात विभाजन झाले. प्रत्येक कार्यकर्ता हा दलित हितापेक्षा वैयक्तिक हिताला प्राधान्य देऊ लागला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी सांगितलेल्या शासन कर्ती जमात व्हा तरच तुमचे प्रश्न सुटतील या त्यांच्या घोषणेला त्यांच्याच अनुयायांनी हरताळ फासला. एकेकाळी संसद व संसद बाह्य राजकारणात दबाव टाकून आपले वर्चस्व भारतीय राजकारणात टिकवून ठेवणारी व दखलपात्र कार्य करणारी आंबेडकरी चळवळ आज भारताच्या राजकारणात शोधावी लागते. त्यामुळे समस्त दलित समाज दिशाहीन झाला आहे. आज भारतीय राजकारणात दलित समाजाचा स्वतंत्र प्रश्न मांडणारा एक ही राजकीय पक्ष किंवा प्रभावी अशी संघटना नाही आणि भविष्यात असा नेता संघटना किंवा पक्ष निर्माण होईल असे सध्या तरी दिसत नाही.

महाराष्ट्रासह देशातील दलित वर्गाची लोकसंख्या व मतदार लक्षात घेता आणि दिशाहीन स्वार्थी नेतृत्त्व यामुळे हा समाज शासनकर्ती जमात होईल का अशी शंका मनामध्ये येते आणि म्हणूनच केवळ दलित समाजाच्या मतदारामुळे आपला पक्ष सत्तेवर येणार नाही याची जाणीव झाल्याने महाराष्ट्रासह संपूर्ण देशात दलित पुढारी दलित समाजासह इतर जाती धर्माच्या लोकांना आपल्या सोबत घेऊन दलित राजकारणाऐवजी बहुजनांचे राजकारण ही संकल्पना राबविताना दिसत आहे.

**बहुजन राजकारणाचा उदय**

म. फुले म्हणत होते, विद्येविना मती गेली। मतीविना गती गेली। गती विना वित्त गेले। वित्तविना शुद्र खचले। एवढे अनर्थ एका अविद्येने केले। डॉ. बाबासाहेब म्हणत होते, ''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा, लोकशाहीर आण्णा भाऊ साठे म्हणाले होते, जग बदल घालूनी

घाव, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णा भाऊ साठे यांच्यासह तत्कालीन सर्व बहुजन विचारवंतांनी बहुजन अस्मितेसाठी सुरू केलेले प्रयत्न महत्त्वाचे होते. म. वि. रा. शिंदे यांनी बहुजन पक्षाच्या स्थापनेवेळी बहुजन समाजाच्या या अस्मितेबाबत नेमके विवेचन केले होते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात व संयुक्त महाराष्ट्र निर्मिती पूर्व काळात महाराष्ट्रातील तमाम विचार अग्रणींना बहुजन चेहऱ्याची, बहुजन अस्मितेची घडण अपेक्षित होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्यावर ही बहुजन अस्मिता घडत जाणारच हा त्यांचा ठाम विश्वास होता.

समाजातील कष्टकरी, शेतकरी–शेतमजुर, दलित, स्त्रीया, पिडीत, भटके विमुक्त असा सर्वहारा समुह त्यांच्या मांडणीच्या केंद्रभागी होता. त्यांच्यात नवअस्मिता निर्माण व्हावी, नवआत्मभान यावे यासाठी या साऱ्यांची धडपड होती. या साऱ्या समुहांना मिळून बहुजन असा शब्द वापरता येईल. या बहुजन अस्मितेची निर्मिती व्हावी हा सर्वहारा समुह सन्मानाने जगावा यासाठी पर्यायी विचारधारांची धडपड होती. कारण त्यांना या समुहाचे दु:ख, दारिद्र्य, शोषण माणूस म्हणून जगू न देणाऱ्या व्यवस्थेचे नियम संपवायचे होते. मानव मुक्तीचाच लढा त्यांनी आरंभिला या लढ्याचा शेवट समताधिष्ठीत समाज आणि बहुजन अस्मिता निर्माण व्हावी असे त्यांचे स्वप्न होते. बहुजन अस्मितेची बांधणी म. फुले, डॉ. आंबेडकर, छ. शाहू महाराज, वि. रा. शिंदे करत होते. असे म्हणतात की, अस्मिता ही सामाजिक गोष्ट आहे. आणि माणसाला व समुहांना ती समुदायापासून प्राप्त होते. अस्मिता समुहनिष्ठ असते असे अमर्त्य सेन सुचवतात. बहुजन समाजाला ही अस्मिता प्राप्त व्हावी म्हणून आपल्या पूर्वसूरींनी अतोनात परिश्रम केले. आपली ह्यात खर्ची घातली. परिणामी बहुजनातील विविध जाती–जमातीतील लोक शिकू लागले. खेड्यापाड्यात शिक्षण पोहचले बहुजनाच्या पहिल्या पिढीत जे लोक शिकले त्यांनी लेखणी हातात घेतली. त्यांच्या लेखणीतून बहुजन समाजास सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व राजकीय दृष्ट्या जागृत केले व संघटित होऊन आपल्या न्याय हक्कांसाठी लढण्यास प्रवृत्त केले.[७५] त्यामधून काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकरांसारखे नेतृत्त्व उदयास त्यांनी म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा आत्मसात करून बहुजन समाजाचे व्यवस्था परिवर्तनाचे वेगळे असे राजकारण करण्याचा प्रयत्न केला.

## स्वतंत्र भारतातील बहुजन राजकारणाचा उदय व बहुजन राजकारण

स्वातंत्र्यानंतर विशेषतः मंडल आयोगानंतरचे जे बहुजन राजकारण भारतीय संघराज्याच्या लोकशाहीच्या चौकटीत आकारास आले, त्याच्या परंपरा जुन्या होत्या परंतू

राजकीय समीकरणे नवी होती. स्वातंत्र्योतर कालखंडात यशवंतराव चव्हाण यांनी 'बहुजन' या शब्दाला परवलीचा शब्द बनविला. यशवंतराव चव्हाण यांनी ज्या अर्थाने बहुजन राजकारण केले ते बहुजन राजकारण हे बेरजेचे राजकारण होते. यशवंत सुमंत यांच्या मते, ''स्वातंत्र्योतर काळात व विशेषतः महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर 'बहुजन' शब्द यशवंतराव चव्हाणांनी परवलीचा बनवला. त्यात या शब्दाला चढविलेला उपरोक्त लोकशाही साज तर होताच शिवाय त्यास बेरजेच्या राजकारणाचे एक नवे परिमाण होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतरची यशवंतराव चव्हाण यांची सर्व भाषणे याची साक्ष देतात. बहुजन शब्द या काळात बेरजेच्या राजकारणातील चलनी नाणे बनला. एक नवोदित भाषिक राज्य स्थिरावण्यासाठी राज्यातील विविध घटकांमध्ये जी किमान सहमती असावी लागते ती साध्य करण्यासाठी हे बेरजेचे राजकारण आवश्यकही होते. ते करून चव्हाणांनी एक द्रष्टेपण दाखवले हेही निर्विवाद. ब्राम्हण–ब्राम्हणेतर व दलित जाती यांच्यातील पूर्वापार वैमनस्याची स्वाहाकारी आग विझविण्यास या बेरजेच्या राजकारणाचा क्वचितच उपयोग झाला. नवसमाजाच्या निर्मितीसाठी ही आग कधीतरी विझणे आवश्यकही होते.''[७६]

या ठिकाणी बहुजनवादी राजकारणाच्या संदर्भात हर्ष जगझाप महत्वाच्या घटकांकडे आपले लक्ष वेधताना दिसतात. त्यांच्या मते, ''जातीअंताचा विचार म. फुले यांनी प्रथम मांडला. त्यासाठी एका बाजूला धर्मचिकित्सा व पर्यायी संस्कृतीचा प्रसार तर दुसऱ्या बाजूस विद्येचा प्रसार व त्या आधारे शूद्रातिशूद्रांचे संघटन करून त्यांचा सर्व प्रकारच्या सत्तेतील सहभागाचा मार्ग त्यांनी सांगितला. शूद्रातिशूद्र व स्त्रिया (बहुजन) यांच्या चळवळीचा विचार मांडताना भारतातील जातीव्यवस्था समाजातील प्रधान संघर्ष हा ब्राम्हण व वैश्य, शेटजी, भटजी विरूद्ध सर्व बहुजन मागास जाती यांच्यातील आहे असे त्यांचे सूत्र होते.''[७७] पुढे ते म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी शूद्रातिशूद्र जातींमधील अंतर्विरोध व अस्पृश्यतेच्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर अस्पृश्य जाती विरूद्ध सवर्ण जातीचा संघर्ष हा भारतातील प्रमुख संघर्ष मानला.''[७८] अर्थात म. फुले आणि बाबासाहेब आंबेडकर या अंतर्विरोधाच्या संदर्भात बहुजन राजकारणाकडे लक्ष वेधताना आपल्याला दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर दादासाहेब गायकवाड यांचे नेतृत्व पुढे आल्याचे आपल्याला दिसते. त्यांनी भूमिहिन शेतमजूरांची चळवळ संघटीत करून संसदीय राजकारणाचा स्वीकार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकराची

चळवळ ही लोकशाही चौकटीत चळवळ करण्याची प्रेरणा देताना दिसते. राज्यकर्ती जमात बनणे, जातींचा अंत करणे व अन्याय करणारा धर्म सोडून बौद्ध धम्माचा जीवनविचार स्वीकारण्यास बाबासाहेब सांगत होते.

काशीराम आणि ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचा राजकीय पटलावरील उदय हा नव्या बहुजन राजकारणातील मैलाचा दगड मानला जात आहे. संसदीय राजकारणाची चौकट वापरून बहुजन वंचित समाजबांधवात नव चैतन्याचे बळ या दोन नेत्यांमुळे प्राप्त झाले. स्वातंत्र्यानंतर काशीराम आणि ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, पेरियार यांच्या विचारांची परंपरा जोपासून जे आत्मभान, आत्मसन्मान, स्वतंत्र राजकारणाची मांडणी करून ते यशस्वी करून दाखविली. या दोघांच्या या राजकीय प्रयत्नाचा अभ्यास करत असताना त्यांच्या राजकारणाबाबत तुलनात्मक दृष्टीकोन न स्वीकारता दोघांच्या एकत्रित अभ्यासाचा दृष्टिकोन स्वीकारला आहे. याचे कारण या दोघांचे बहुजन राजकारण हे आजच्या संदर्भात भारतीय राजकारणात महत्वाची भूमिका पार पाडत आहे. म्हणून काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाचा अभ्यास आज होणे गरजेचे आहे.

## संदर्भ


१. पळशीकर सुहास : 'भारताच्या राजकारणाचा ताळेबंद', मराठी वाचन साहित्य मालिका क्र. १ राज्यशास्त्र व लोकप्रशासन प्रगत अध्यायन केंद्र, पुणे विद्यापीठ पुणे, २००१, पृ.१३०

२. दैनिक लोकमत, सोमवार, २५ मे २००९, पान नं. ४

3. Arnest Barkar, Principle of Social and Political Theory, Oxford University Press, 1976, Page No. 10.

४. व्होरा राजेंद्र (संपा. लेख) : 'भारतीय राजकारणातील बहुजनवादाचा पाडाव' आणि सुहास पळशीकर (संपा. लेख) : 'भारतीय लोकशाही', डायमंड पब्लिकेशन, पृ. २८५.

५. जैन, संपादकीय लेख, नवभारत टाईम्स्, २००१, पृ. ६

६. पाटील बी. बी. : 'राज्यशास्त्र परिचय', फडके प्रकाशन, २०१९, पृ. ५६

७. उपरोक्त, पृ. ५७

८. पानसरे गोविंद : 'परिवर्तनाच्या दिशा', लोकवाङ्गृह मुंबई, २००६, पृ. ५५

९. साळुंखे आ. ह., 'आस्तिक शिरोमणी चार्वाक', लोकायत प्रकाशन सातारा, २०२२, पृ. ७

१०. उपरोक्त, पृ. ७

११. उपरोक्त, पृ. १६

१२. उपरोक्त, पृ. २०

१३. साळुंखे आ. ह. : 'सर्वोत्तम भूमिपुत्र गोतम बुद्ध', लोकायत प्रकाशन, सातारा, पृ. ३२७

१४. उपरोक्त, पृ. ४८०

१५. डॉ. गायकवाड प्रशांत : 'बुद्ध चरित्र आणि तत्त्वज्ञान', लोकायत प्रकाशन, सातारा, २०१५, पृ. ९१

१६. जाधव, सुशिला : 'भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री' कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००६, पृ. २१

१७. सुखदेव काशीराम जी का बहुजनवाद, सोमाना नागपूर, २०१०, पृ. ०५.

18. Ambedkar B. R., Annihilation of Caste, Govt. Of Maharashtra, Mumbai, 2013, Page No. 23.

१९. अकोला के. आर. : 'मा. काशीराम साहब के ऐतिहासिक भाषण' खंड १, आनंद साहित्य सदन, प्रकाशन, अलिगड, २०१४, पृ.११

२०. पवार गो. मा. : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००९, पृ. २०

२१. डॉ. भोसले एस. एस. : परिवर्तनाची क्षितीजे, दलित मित्र रा. ना. चव्हाण यांचे, निवडक लेख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ. १२१,२२

२२. प्रा. कुमदाळे सतिश : 'पॅटर्न शिवरायांचा', आदित्य प्रकाशन, लातूर, २०१५, पृ. १४७

२३. उपरोक्त, पृ. १४९

२४. भोले भा. ल. : 'आधुनिक भारतातील राजकीय विचार' पिंपळापुरे बुक्स् डिस्ट्रीब्युटर्स ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, २००३, पृ. २५

२५. प्रा. सुमंत यशवंत, डॉ. पुंके दत्तात्रय : 'महाराष्ट्रातील जाती संस्थांविषयक विचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६, पृ. १९,२०

२६. उपरोक्त, पृ. २८

२७. सकट अजय (संपा.) : मासिक : 'परिवर्तनाची लढाई', वर्ष तिसरे, अंक २० वा जयंती विशेषांक, २०१२, पृ. १२

२८. धनंजय कीर, : 'माळसे स. ग.', फडके य. दि., महात्मा फुले समग्र वाङ्मय, सहावी आवृत्ती, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृ. ७२९, ७३०.

२९. खरात शंकरराव : 'सामाजिक चळवळीचा इतिहास', इंद्रायनी साहित्य प्रकाशन, पुणे, २००६, पृ.२२७

३०. डॉ. साठे एस. एस. : ‘स्त्री मुक्तीचे आद्यप्रवर्तक : महात्मा जोतिबा फुले : महात्मा फुले व्यक्ती आणि कार्य’, एस. आर. पी. पब्लिकेशन्स, २०२१, पृ. २,३

३१. भोळे भा. ल. : महात्मा जोतिराव फुले वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन औरंगाबाद, २००९, पृ. २२

३२. भोळे भा. ल., महात्मा जोतिराव फुले वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन औरंगाबाद, २००९, पृ. १६६

३३. उपरोक्त, पृ. २१, २२.

३४. यशवंत सुमंत, विचारसरणीच्या विश्वात, युनिक अ‍ॅकॅडमी पब्लिकेशन पुणे, २०१८, पान नं. ५३, ५४.

35. M. S. Gore Non Brahmin Movement in Maharashtra 2014, Page No. 9.

३६. चव्हाण रा. ना., राजर्षी शाहू महाराज, रमेश चव्हाण प्रकाशन, १९९५, पृ. १

३७. कीर धनजंय : प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती, आप्पासाहेब पवार यांच्या प्रस्तावनेतून, शि. वि. कोल्हापूर प्रकाशन, १९७०.

३८. कीर धनंजय : ‘राजर्षी शाहू छत्रपती’, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, २००५, पृ. १२२

३९. ऑमवेट गेल : ‘वसाहातिक सामाजिक, सांस्कृतिक बंड’, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. १०६

४०. डॉ. पवार एस. डी. : ‘राजर्षी छ. शाहू महाराज : विचार आणि कार्य’, सह्याद्री प्रकाशन, पुणे, २०१२, पृ. १८६

४१. डॉ. पवार जयसिंगराव : ‘राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ’, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००१, पृ. ४५७

४२. ऑमवेट गेल : ‘वसाहातिक सामाजिक, सांस्कृतिक बंड’, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. १०८

४३. डॉ. पवार एस. डी. : ‘राजर्षी छ. शाहू महाराज : विचार आणि कार्य’, सह्याद्री प्रकाशन, पुणे, २०१२, पृ. १८८

४४. उपरोक्त, पृ. १८९

४५. सहस्त्रबुद्धे पु. ग. : लोकहितवादींची शतपत्रे, कॉन्टीनेंटल प्रकाशन, १९७७, पृ. ७१, ७२.

४६. उपरोक्त, पृ. ७१, ७२, ३१५

४७. छ. शाहू महाराज यांची भाषणे, पान नं. ४, ५, ९, १०.

४८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जनता विशेषांक, १९३३, पान नं. ४६.

४९. भोसले एस. एस. : 'परिवर्तनाची क्षितिजे – रा. ना. चव्हाण यांचे निवडक लेख', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ मुंबई, पृ. १०३, १०४

५०. पवार गो. मा. (संपा.) : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००९, पृ. ३२५

५१. उपरोक्त, मलपृष्ठ.

५२. शिंदे वि. रा. : माझ्या आठवणी व अनुभव भाग १, २, ३ लेखन वाचन भांडार पुणे, १९५८, पृ. ८४

५३. मूंगडकर मा. प. : शिंदे लेखसंग्रह, ठोकळ प्रकाशन पुणे, १९६३, पृ. ९६.

५४. भोळे भा. ल., बेडकिहाळ किशोर (संपा.) : बदलता महाराष्ट्र साठोत्तरी परिवर्तनाचा मागोवा, डॉ. आंबेडकर अकादमी सातारा २००३, पृ. ०५.

५५. शिंदे वि. रा., माझ्या आठवणी व अनुभव, भाग १, २, ३ लेखन वाचन भांडार पुणे १९५८, पृ. २९०.

५६. भोळे भा. ल. : विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०, पृ. १६४, १६५.

५७. पळशीकर सुहास : भारताच्या राजकारणाचा ताळेबंद, मराठी वाचन साहित्य मालिका क्र. १, राज्यशास्त्र व लोकप्रशासन प्रगत अध्यासन केंद्र, पुणे विद्यापीठ पुणे, २००९, पान नं. २९०.

५८. पवार गो. मा. (संपा.) : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००९, पृ. ३२३

५९. सरवदे भिमराव : 'पेरियार रामसामी नायर', समता प्रकाशन, नागपूर, २००३, पृ. २४, २५

६०. उपरोक्त, पृ. ५०, ५१, ५२

६१. उपरोक्त, पृ. २७

६२. उपरोक्त, पृ. २८

६३. प्रज्ञावंत गौतम : 'काशीराम व सामाजिक परिवर्तनाचा लढा', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ. ४४

६४. निकुंबे सी. एच. : 'दलितांच्या राजकारणाची दिशा' सुगावा प्रकाशन, पुणे, २००४, पृ. ८, ९

६५. सांगलीकर झेड. यु. : 'रिपब्लिकन की बसपा', पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर, २०१२, पृ. १२

६६. धनंजय कीर, प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती आप्पासाहेब पवार यांच्या प्रस्तावनेतून शि. वि. कोल्हापूर, प्रकाशन, १९७०, पृ. २७५, २८०.

67. B. R. Ambedkar Anhilation of Cast Govt. of Maharashtra Mumbai 2013, उद्धृत कीर २७५–२८०.

68. B. R. Ambedkar Anhilation of Cast Govt. of Maharashtra Mumbai 2013, Page No. 33.

69. B. R. Ambedkar Anhilation of Cast Govt. of Maharashtra Mumbai 2013, उद्धृत कीर २७५–२८०.

70. B. R. Ambedkar Revolution & Counter Revolution An Ancient India, Govt Of Maharashtra Mumbai 2008, Page No. 27-28.

७१. साठे सुनिल संभाजी : 'राखीव मतदार संघातील मातंग समाजातील राजकीय अभिजन वर्गाचा दक्षिण महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव : एक चिकित्सक अभ्यास', टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, पीएच.डी. पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध.

७२. साळवे मधुकर : 'रिपब्लिकन पक्षाचा प्रवास आणि नेत्यांना पर्याय', सुगावा प्रकाशन, वर्ष ३६, अंक ४ था, डिसेंबर २००६, पृ. १०

७३. उपरोक्त, पृ. १२

७४. उपरोक्त, पृ. १३

७५. गवस राजन : ‘बहुजनांच्या वाङ्मयीन संस्कृतीचा नायक : कॉ. अण्णाभाऊ साठे’मासिक, उद्याचा माणूस, वर्ष दुसरे, अंक सातवा व आठवा, २०१०, पृ. ७

७६. सुमंत यशवंत : बहुजनवादी राजकारण, लेख, शतकानंतरच्या वळणावर, कोळे, बेडकिहाळ संपादित, आंबेडकर अकादमी, सातारा, २००६, पृ. २३२.

७७. जगताप हर्ष : आंबेडकरवाद आणि बहुजनवाद, लेख, समाज प्रबोधन पत्रिका, १९९५, पृ.१

७८. उपरोक्त, पृ. २

# प्रकरण दुसरे
# संदर्भ साहित्याचा आढावा

**प्रस्तावना**

भारताच्या समाजव्यवस्थेचा विचार केला तर जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे वैशिष्टे आहे. या जातीव्यवस्थेचा भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्व व्यवहारावर मोठा प्रभाव पडताना दिसतो. किंबहुना या जाती व्यवस्थेनुसारच सर्व व्यवहार निश्चित होतात, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. निश्चितच या जातीव्यवस्थेचा परिणाम राजकारणावरही पडल्याचे दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून याचे अस्तित्व आपल्याला पहावयाला मिळते.

भारताच्या राजकीय व्यवस्थेवर कायमपणे समाजव्यवस्थेमध्ये मुठभर असणाऱ्या प्रभू जाती व वरिष्ठ जाती यांचाच प्रभाव राहिला असल्याचे दिसून येते. त्यामुळे कनिष्ट जाती ज्यांची संख्या मोठी असूनही त्यांना राजकीय सत्ता प्राप्त करता आली नाही. परिणामी त्यांची सर्वच क्षेत्रात पिछेहाट झाली. त्यांच्या या मागासलेपणाची जाणीव भारतात ब्रिटीश राजवटीनंतर पाश्चात्य पध्दतीचे शिक्षण घेतलेल्या भारतीयांना होऊ लागली. त्यामध्ये म. जोतिबा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. या महापुरुषांनी जातिव्यवस्थेतील या वंचित घटकांना न्याय देण्यासाठी राजकीय, सामाजिक पातळीवरील संघर्ष करून या वर्गामध्ये आपल्या हक्कांबाबत व देशाच्या उत्पन्नामधील वाट्याची जाणीव निर्माण करून दिली. तेव्हापासून या देशात संख्येने जास्त असलेल्या कनिष्ठ जातीतील लोकांनी विस्कळीतपणाने राजकीय सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. पण या सर्वांमध्ये काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यानंतर व्यवस्थेचे बळी असणाऱ्या बहुजन समाजाला एकत्र करून राजकीय व्यवस्थेमध्ये प्रस्थापित राजकीय पक्षांना बहुजनांचा पर्याय देण्याचा प्रयत्न केला. भारतीय राजकारण हे उच्च वर्गीयाकडून बहुजन राजकारणाकडे वळविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

प्रस्तुत विषयासंदर्भात आजमितीपर्यंत झालेले पूर्व संशोधन हे निवड केलेल्या विषयाव्यतिरिक्त स्वतंत्ररित्या आणि सखोल स्वरुपात झालेले नाही. त्यातही जे पूर्व संशोधन झालेले आहे ते लेख, पुस्तक, नोंदी इत्यादी रूपाने सुट्या स्वरूपात झालेले आहे. व्यवस्था

परिवर्तनासाठी बहुजन संकल्पना, राजकारण या दोन गोष्टी डोळयासमोर ठेवून **''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर''** या दोन विचारवंतांच्या बहुजन राजकारणाच्या संकल्पनेचा अभ्यास राज्यशास्त्रात आजमितीपर्यंत झालेला नाही.

संशोधन विषयावरील पूर्व अभ्यास अवलोकनाचा उद्देश हा संशोधनासाठी निवडलेल्या विषयासंबंधी कोणत्या पैलूंवर अभ्यास झालेला आहे, हे पाहुन नाविण्यपूर्ण संशोधन काय केले जाणार आहे हे सांगणे हा असतो. अन्यथा संशोधकांच्या हाती नवीन काही सापडण्यापेक्षा पुनरावृत्ती होण्याची अधिक भीती असते. प्रस्तुत विषयावर संशोधन करताना ज्या पूर्व संशोधनाचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. त्यावरून या प्रस्तुत पूर्व संशोधनापेक्षा वेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रबंधातून करण्यात आलेला आहे. पूर्व संशोधनातील उणीवा भरून काढण्याचे आणि नवीन भर टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रंबधाच्या माध्यमातून केला गेलेला आहे. यापूर्वी प्रस्तुत विषयावर झालेले संशोधन हे चरित्ररूप आणि माहितीवजा अशा स्वरूपात आहे. परंतु निवडक हे दोन राजकीय व्यक्तिमत्त्व व विचारवंत घेवून त्यांच्या व्यवस्था परिवर्तनाच्या बहुजन राजकारणाचा व विचारांचा अभ्यास कोणी केलेला नाही. हे पूर्व अभ्यास अवलोकनातूनच सिद्ध होईल. आणि त्यातील उणीवा लक्षात येतील. त्यामुळे प्रस्तुत विषायावरील पूर्व अभ्यासाचे अवलोकन करणे क्रमप्राप्त आहे.

**प्रस्तुत विषयाबाबत पूर्व अभ्यास अवलोकन**

**१. भोळे भा.ल. २०१०: 'विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण' प्रस्तुत ग्रंथ लोकवाङ्मय गृह, मुंबई** यांनी प्रकाशित केलेला आहे. प्रस्तुत ग्रंथात लेखकांनी विठ्ठल रामजी शिंदे यांची राजकीय जडणघडण, त्यांच्या राजकीय निष्ठा, टिळक ते गांधी यांच्या संदर्भात, महर्षी शिंदे यांच्या राजकारणाचे सामाजिक संदर्भ, त्यांचा बहुजनवाद आणि समाजवाद अशा विविध विषयाचा परामर्श घेतलेला आहे. लेखकाच्या मते, महर्षी शिंदे यांचे बहुजनवाद आणि समाजवाद यांच्यामध्ये विशिष्ट असे अनुबंध आहेत. त्यांचे बहुजनवादाचे विचार हे आजही प्रस्तुत आहेत. कारण त्यांच्या बहुजन राजकारणाला केवळ जात हा पाया नव्हता. ब्राम्हणेत्तर संधीसाधू राजकारणामुळे ज्या बहुजन संकल्पनेला फक्त जात लक्ष्यी संदर्भ प्राप्त झाला होता; तिला म. फुले प्रणित सत्यशोधकी अर्थाने दृढ करण्याचा प्रामाणिक प्रयत्न महर्षी शिंदे यांनी केला. महर्षी शिंदे यांनी ग्रामीण भारताच्या फेरमांडणीसाठी गावगाडा दुरुस्त करण्याची आणि

ग्रामीण भागातील शेतकरी पुन: उभे राहण्याचे आत्मभान निर्माण करण्याचे वैचारिक बळ दिले. त्यांना अपेक्षित असणारा धर्म हा दुर्बळांना सबल करणारा, अज्ञानींना ज्ञान देणारा, विखंडीत समाजाला एकसंघ करुन राष्ट्रीय एकात्मतेस मजबूत करणारा होता. ध्येयासाठी विचारपूर्वक पराभव पत्करणाऱ्या शिंदे यांचे मोठेपण विशिष्ट काळातील पुढारीपणापेक्षा कालातीत मार्गदर्शन करणाऱ्या विचारवंताचे आहे हे लक्षात घेऊन त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केले पाहिजे, असा विचार या ग्रंथामध्ये असलेला दिसतो.

**२. चव्हाण रा. ना. १९४९: बहुजन समाजाच्या शिक्षणाचा व उन्नतीचा प्रश्न प्रस्तुत लेख साप्ताहिक राष्ट्रवीर बेळगांव** मध्ये २ सप्टेंबर ९ सप्टेबर रोजी प्रकाशित झाला. प्रस्तुत लेखात बहुजन समाजाचा शिक्षणाअभावी प्रगती कशी खुंटली यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. रा. ना. चव्हाण यांनी आपल्या ग्रंथात मराठा हा शब्द बहुजन समाज या अर्थाने वापरला आहे. त्या काळातील राजकारणाची चिकित्सा करत असताना त्यानी असे म्हटले की, 'सामाजिक क्रांती करावयाची झाल्यास बहुजन समाजाच्या नेतृत्वाने आपल्या अनुयायांच्या दोषांवर पांघरूण घालून चालणार नाही. म. फुले यांचा भर बुद्धिवादावर व चिकित्सेवर होता. पण सध्याच्या नेतृत्वाला चिकित्सा नको त्यांना घोषणा मार्ग आवडतो. सहकारी किंवा सरकारी मिरासदारांच्या पुढे हरिजन–बौद्धाचा प्रश्न दिसत नाही. विकेंद्रित मराठ्यांची संख्या जास्त आहे त्यामुळे त्यांचे नेतृत्व राहणे स्वाभाविक आहे त्याला सुधारणे हाच एक उपाय.' याची चर्चा केलेली आहे.

**३. पवार गो. मा. २००४: 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे जीवन व कार्य' प्रस्तुत ग्रंथ लोकवाङ्मय प्रकाशन** यांनी प्रकाशित केला. या ग्रंथात महर्षी शिंदे यांचा जीवन परिचय करून दिलेला आहे. एकूण त्यांची जडणघडण कशी झाली. त्यांच्यावर कोणत्या विचारांचा प्रभाव पडला याचा विस्तृत आढावा लेखकाने घेतलेला दिसतो. लेखकाने बहुजन पक्षाचे राजकारण आणि पक्षाचा जाहीरनाम्याची सविस्तर चर्चा कलेली आहे. जाहीरनाम्यात हा पक्ष बहुजन समाजाच्या कल्याणासाठी स्थापन झालेला आहे असे स्पष्ट केलेले आहे. बहुजन समाजाची व्यापक व्याख्या या जाहीरनाम्याच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेली आहे.

**४. बागल माधवराव १९६६: 'बहुजन समाजाचे शिल्पकार' प्रस्तुत ग्रंथ ठोकळ प्रकाशन पुणे** मध्ये प्रकाशित झाला. लेखकाने भारतीय राजकारणाची चर्चा करताना असे म्हटले आहे की, 'भारतीय राजकारण म्हणजे सुशिक्षितांची आणि काही भांडवलदारांची चळवळ अफाट! शेतकरी

वर्ग, मजूर वर्ग व बहुजन समाज कोणत्याही चळवळीत पारखा होतो ही चळवळ खालच्या वर्गात आली नव्हती'. थोडक्यात लेखकाने आपल्या ग्रंथातून उच्च, सुशिक्षितांच्या, मूठभर भांडवलदाराच्या हातातील चळवळीमध्ये बहुजन वर्गाचे स्थान शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. लेखकाने बहुजन समाजाचा उद्धारक म्हणून महर्षी शिंदे यांना या ग्रंथात प्रस्तुत केलेले दिसते.

**५. कुलकर्णी सुहास, १९९८: 'जातीचा प्रश्न आणि महर्षी शिंदे यांची बहुजन संकल्पना' अप्रकाशित प्रबंध पुणे विद्यापीठ, पुणे.** प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये महर्षी शिंदे यांची जातीसंस्थेबद्दलची भूमिका आणि त्यांची बहुजन संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. लेखकांनी महर्षी शिंदे यांच्या राजकारणावरही प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. लेखकाच्या मते, शिद्यांच्या राजकारणाच्या वैशिष्ट्यांतच त्यांच्या मर्यादाही अंगभूत होत्या. शिंद्यांच्या नेतृत्वशैलीचे मर्म त्यांच्या संयम समतोल बुद्धीत सामावलेले होते. जातीय राजकारण करण्यावाचून या समाजात गत्यंतर नाही हे तथ्य स्वीकारूनही केवळ जातीवाचक राजकारण करण्यातील धोके ते पुरते ओळखून होते. बहुजन जातींची अस्मिता फुलवून त्यांच्यातील न्यूनगंड दूर करणे निकडीचे आहे. हे पटल्यामुळे शिंद्यांनी इतिहासाची फेरमांडणी केली.' अशी नोंद महर्षी शिंदे यांच्या कार्याची केलेली दिसते.

**6. Dr. Suresh Mane, 2006: Glimpses of Socio Cultural Revolt in India** प्रस्तुत ग्रंथ समृद्ध भारत प्रकाशनाने प्रकाशित केला. ग्रंथात लेखकाने आर्य समाज आणि चार्वाक यांचा उठाव, गौतम बुद्ध यांनी उभी केलेली रक्तहिन क्रांती, सामाजिक समता, बंधुतेचा धम्म विचारांचा परामर्श घेतला आहे. संत कबीर, रोहिदास यांची क्रांती, पश्चिम बंगाल मधील चांडाळ जाती समुदायाची चळवळ, म. फुले यांच्या क्रांतीवादी विचाराने महाराष्ट्र आणि सबंध भारतभर निर्माण केलेले नव प्रबोधनपर्वाची नोंद विस्ताराने लेखकाने घेवून म. फुले यांना भारतीय सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हटले आहे. त्याचबरोबर छ. शाहू महाराज यांच्या कार्याचा आढावा घेवून छ. शाहू महाराज यांना भारतीय सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ असे म्हटले आहे. लेखकांनी द्रविड प्रांतातून ब्राम्हण्यवादाला हद्दपार करणारे पेरियार यांचा सखोल आढावा घेतलेला आहे. त्याचबरोबर नारायण गुरू, अय्यंकाली, कुमार गुरूदेव यांच्या क्रांतीचाही परामर्श घेतलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय क्रांती उभी राहिली. हे सांगून काशीराम यांना बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार असे म्हटले आहे.

**६. डॉ. रूपचंद गौतम, २०१२: 'दलित राजनीती उद्‌भव और विकास' प्रस्तुत ग्रंथ नटराज प्रकाशनाने प्रकाशित केला.** या ग्रंथात दलित राजकारणाची व्याख्या लेखकांनी करून दलित राजकारणाचा विकास स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे करीत असताना बहुजन समाज पार्टी पूर्व दलित राजकारणाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर बसपाच्या समकालीन दलित राजकारणावही लेखकाने प्रकाश टाकला आहे. बिगर दलित राजकीय पक्षात दलित समाजाची स्थिती काय आहे याकडेही लेखक निर्देश करताना दिसतात. त्यामध्ये प्रामुख्याने कॉग्रेस, भारतीय जनसंघानंतर भारतीय जनता पक्ष, डावे पक्ष इत्यादी पक्षात दलित समाजाचा सहभाग किती आहे, या गैर दलित पक्षांतून दलित समाजाचे स्थान काय आहे. याकडे लेखक लक्ष वेधताना दिसतात. प्रस्तुत ग्रंथामधून लेखक दलित समाजातील लोकांनी स्थापन केलेल्या विविध पक्षांचाही आढावा घेताना दिसतात. त्यामध्ये प्रामुख्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, बहुजन समाज पार्टी याकडे ही पक्षाकडे लक्ष वेधताना व त्यांच्या राजकारणामुळे राजकीय समीकरणात कोणते बदल झाले हे शोधण्याचा प्रयत्न करतात. विविध पक्षातील दलित नेत्यांचाही लेखक उल्लेख करताना दिसतात. ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाबू जगजीवनराम, बुद्धप्रिय मौर्य, मान्यवर काशिराम, के. आर. नारायनन माता प्रसाद, बंगारू लक्ष्मण, जी. एम. सी. बालयोगी, मायावती, रामविलास पासवान, डॉ. सत्यनारायण जरिया, सुशिलकुमार शिंदे, रा. सु. गवई, रामदास आठवले, डॉ. उदीत राज आदी राजकीय नेत्यांचा उल्लेख लेखकाने प्रस्तुत ग्रंथामध्ये केलेला दिसतो.

**८. कँवल भारती, २०१२: 'काशीराम के दो चेहरे' प्रस्तुत ग्रंथ अमन प्रकाशन, कानपूर मधून प्रकाशित झाला.** या ग्रंथात लेखकाने काशीराम यांचा जीवन परिचय करून दिलेला आहे. त्याचबरोबर बसपा या राजकीय पक्षाचा उदय आणि विकासाचा आढावा घेतलेला आहे. त्याचबरोबर बसपा हाच का पर्याय असा मूलभूत प्रश्न उपस्थित करून बसपा या पक्षाचे महत्व सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. बसपाव्दारे सत्ता संपादनानंतर जो उत्साह बहुजन समाजात दिसला. यावरही प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. याला लेखकाने दूसरी आझादी की लढाई असे म्हटल्याचे दिसते. त्याचबरोबर काशीराम यांचा प्रयोग यशस्वी होईल का? असे काही प्रश्न उपस्थित करून काशीराम यांच्या काही निर्णयाची चिकित्सा केलेली दिसते.

काशीराम यांच्या काही निर्णयाला आत्मघातकी कदम अशी चिकित्सा लेखकाने तटस्थपणे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**९. अकेला ए. आर., २०१४: 'माननिय काशीराम के ऐतिहासिक भाषण' खंड १ प्रस्तुत आनंद साहित्य सदन अलीगड प्रकाशनाने प्रकाशित केला.** प्रस्तुत ग्रंथात काशीराम यांच्या दुर्मिळ ऐतिहासिक भाषणांचे संकलन लेखकाने केलेले आहे. त्यामध्ये आंबेडकरवाद शोषित समाज का कल्याण हो सकता है, हम बहुजन समाज को एक मंचपर संघटित कर रहे है, डी. एस. फोर सामाजिक समता के लिए संघर्ष करेंगा, बामसेफ को सबसे सशक्त और प्रभावशाली संघटन बनाना है!, दलीतों का संघर्ष भारतीय स्तर पर होना चाहिए आदी लेखांचे संकलन ग्रंथात केलेले आहे.

**१०. अकेला ए. आर., २०१४: 'माननिय काशीराम के ऐतिहासिक भाषण' खंड २ प्रस्तुत आनंद साहित्य सदन अलीगड प्रकाशनाने प्रकाशित केला.** प्रस्तुत ग्रंथात हमे चमचा युग से बाहर निकलना है!, दलित शोषित समाज अपने वोट की किंमत जाने, ब्राम्हणवादी व्यवस्था को उखाड फेकने का आव्हान है, अशा विविध भाषणांचे संकलन करून लेखकाने ते एकत्रितरित्या ग्रंथरूपाने प्रकाशित केलेले आहेत. या भाषणांतून काशीराम यांच्या एकून वैचारिक भूमिका समजण्यास मदत होते. परंतु ही भाषणे मराठी भाषेमध्ये एकत्रितरित्या आलेली दिसत नाहीत.

**११. अकेला ए. आर., २०१४: 'माननिय काशीराम के ऐतिहासिक भाषण' खंड ३ प्रस्तुत आनंद साहित्य सदन अलीगड प्रकाशनाने प्रकाशित केला.** प्रस्तुत ग्रंथात लेखकाने दलित समाज के उद्धार के लिए स्वतंत्र राजनितिक दल की जरूरत है, पंदरह फिसदीवाले पंचाशी फिसदी का मुकाबला नहीं कर सकते, सशक्त विरोधी दल के अभाव से लोकतंत्र अर्थहीन, बी. एस. पी. के माध्यम से हम अपनी लाचार/गुलामी दूर कर सकेंगे इत्यादी लेखांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**१२. अकेला ए. आर., २०१४: 'माननीय काशीराम के ऐतिहासिक भाषण' खंड ४ प्रस्तुत आनंद साहित्य सदन अलीगड प्रकाशनाने प्रकाशित केला.** प्रस्तुत ग्रंथात लेखकाने हमने ३६५ दिनों का भाईचारा बनाने का कार्यक्रम बनाया है, भाईचारा आंदोलन से लोगों की संघटीत शक्ती बढ रही है, हम सबको सिर्फ इन्सान के बच्चे बनाना चाहते है, सीट नही स्टेट

जितेंगे, हमारा मकसद संघटित होकर दिल्ली तक्त जीतना है, दलितोंका का शोषण चार हजार सालोसे और मुसलमानो का शोषण चालीस साल से होता आ रहा है,

**13. Shewde Uttam 2010 : Manyavar Kanshiram Writing and Speeches Vol. I** प्रस्तुत ग्रंथ समता प्रकाशन, नागपूरमधून प्रकाशित झाला. यामध्ये काशीराम यांची काही निवडक भाषणांचा समावेश लेखकाने समावेश केलेला आहे. त्यामध्ये म. फुले आणि ओ. बी. सी., बामसेफ, डी. एस. फोर, युथ एन्ड लिडींग फ्रंट, वासाहतिक काळातील सांस्कृतिक क्रांती, बी. एस. पी. चा चांगला कालखंड अशा शीर्षकाखाली काशीराम यांच्या वैचारिक भाषणांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**१४. चव्हाण रा. ना. १९९५: 'महात्मा फुले, न्यायमुर्ती रानडे आणि आंबेडकर' प्रस्तुत लेख रा. ना. चव्हाण यांच्या पश्चात सौ. चव्हाण यांनी लेख संग्रहात प्रकाशित केला.** या लेखात फुले, न्या. रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील साम्यस्थळे शोधण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. त्याचबरोबर न्या. रानडे आणि म. फुले यांच्यामधील वैचारिक मतभेदावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न कला आहे. म. फुले यांनी शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथातून शेतकरी वर्गाची व्यथा सम्यकरित्या मांडण्याचा प्रयत्न कलेला आहे, त्याचा हवाला देवून शेतकरी वर्गाची सध्याची दयनीय अवस्था काय आहे याकडे अभ्यासकांचे लक्ष वेधून घेण्याचे महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. महर्षी शिंदे यांची बहुजन संकल्पना या विचारांशी संबंधित होती.

**१५. चव्हाण रा. ना. १९९५: 'दलित चळवळीचे प्रणेते डॉ. आंबेडकर' प्रस्तुत लेख सौ. चव्हाण यांनी सातारा येथून प्रकाशित केला.** प्रस्तुत लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे महत्व समकालिन समाजव्यवस्थेला कसे गरजेचे आहे, याचे महात्म्य सांगणारे आहे. लेखात लेखकाने दलित समाजाचे जे प्रश्न आहेत त्याचे वेगळेपण कशात आहे. या प्रश्नांचे स्वतंत्रपणे निर्देशित करताना हे प्रश्न सोडविल्यानेच या शोषित समाजघटकाच्या उन्नतीचा मार्ग सूखकर होणार आहे. ही गोष्ट आवर्जून अधोरेखित केलेली आहे. लेखकाच्या मते, 'ब्राम्हणी वर्चस्ववादाचाच प्रतिकूल परिणाम हा दलित समाजाबरोबर इतर ब्राम्हणेत्तर समाजघटकांवर

कसा होतो. त्यामुळे ब्राम्हणी वर्चस्वाला हादरे दिले पाहिजेत'. दलित शोषित समाजाला बाबासाहेबांनी 'डिप्रेस्ड क्लास' असा शब्द दिला असे लेखकांनी मत मांडलेले दिसते.

**१६. चव्हाण, रा. ना. १९९५: 'फुले, आंबेडकर आणि बहुजन समाज' प्रस्तुत लेख सौ. चव्हाण यांनी रा. ना. चव्हाण यांच्या पश्चात सातारा येथून प्रकाशित केला.** या लेखात लेखकाने अतिशूद्रांचा प्रश्न काय आहे आहे याकडे प्रथम लक्ष वेधण्याचे काम केले आहे. त्याचबरोबर आंबेडकर व तो काळ याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकाने दलित समाज व बहुजन समाज दोन संकल्पनातील द्वैत स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. दलित व बहुजन या दोन वेगवेगळ्या अर्थाच्या संकल्पना आहेत. यावर लेखकाने भर देण्याचा प्रयत्न लेखातून केला आहे. दलित समाजाचे प्रश्न आणि ब्राम्हणेत्तर चळवळ यांमध्ये अंतर आहे. या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत असे सांगून दलित समाजाच्या प्रश्नांचे वेगळेपण सांगण्याचे काम महर्षी शिंदे यांनी केलेले आहे.

**१७. दाभोळे ज. रा. आणि म्हमाणे आ. २०१६: 'आंबेडकरवादी चळवळ दिशा व अपेक्षा' प्रस्तुत ग्रंथ हा ॲड. पंडीतराव सडोलीकर गौरव ग्रंथ समिती, कोल्हापूर** यांनी प्रकाशित केला. प्रस्तुत ग्रंथात विविध वैचारिक लेखांचा समावेश करण्यात आलेला आहे. आंबेडकरवादी चळवळ व्यापक आणि क्रांतिकारी बनली पाहिजे, आंबेडकरी चळवळीचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध, आजची आंबेडकरी चळवळ आणि प्रतिगाम्यांचा आक्रोश, प्रश्न आहे विस्कटलेल्या दलित चळवळीचा, आंबेडकरवादी चळवळीची दिशा व अपेक्षा या विविध शीर्षकाखाली लेखांचा समावेश प्रस्तुत ग्रंथात केलेला आहे. आंबेडकरवादी चळवळ ही विस्कटल्याने संघटनात्मक शक्ती कमी होत आहे. परिणामी प्रतिगामी शक्तींचे फावलेले आहे. आपापसातल्या मतभेदांचा उपयोग करून प्रतिगामी शक्ती या बहुजन समाजाच्या आणि पर्यायाने दलित शोषित समाजाच्या चळवळी मोडीत काढण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. परिणामी बहुजन समाजाच्या संघटित लोकशाही चौकटीतील राजकारणाला मर्यादा पडत आहेत. या समाजाची संघटित राजकीय चळवळ मुळात देशाची राजकीय समीकरणे बदलू शकतात. काशीराम हे याबाबतीत उत्तम उदाहरण म्हणून आपल्याला डोळयासमोर पटकन येते. अशा आशयाचे विश्लेषण या विविध लेखातून पहायला मिळते.

**१८. शिरवाडकर कुमार, २००६: 'जातीसंस्थेचे बदलते स्वरूप' प्रस्तुत लेख किशोर बेडकिहाळ संपादित शतकोत्तरांच्या वळणावर या ग्रंथामधून आंबेडकर अकादमी सातारा मधून प्रकाशित झाला.** या लेखात जातीसंस्थेचे बदलते स्वरूप स्पष्ट करताना जातींची ठळक वैशिष्ट्ये कोणती ती सांगून आज जन्मसिद्ध व्यवसायावर आधारित जातिसंस्थेला आव्हान आणि हादरे देणारे विविध पैलू मांडून लेखकाने जातिसंस्थेची बदलती समीकरणे स्पष्ट केलेली आहेत. आज माहिती आणि तंत्रज्ञानाने व संविधानाने सर्वच समाजघटकाला विविध क्षेत्रात वाव आणि अवकाश कसा निर्माण केलेला आहे. यावर प्रकाश टाकून नव्या व्यवस्थेतील नव्या संधीचा परामर्श घेतला आहे. नव्या व्यवस्थेत लोकांचे जन्मजात व्यवसाय बदलत आहेत. त्यातील अनेक संदर्भ बदलत आहेत परंतू मनाच्या एका कप्पात कोंडवाड्यातून मानसिकदृष्टया घट्ट असणाऱ्या जातलक्षी मानसिक गुलामगिरीचे काय? असे काही मूलभूत प्रश्न उपस्थित करून लेखकाने आजच्या संदर्भातील या जातिसंस्थेच्या मानसिक बाजूकडेही लक्ष वेधलेले दिसते. आजच्या संदर्भात आपल्या संसदीय राजकारणाचा कोणता परिणाम होत आहे यावरही प्रकाश टाकला आहे.

**१९. सुमंत यशवंत, २००६: 'बहुजनवादी राजकारण' प्रस्तुत लेख किशोर बेडकिहाळ संपादीत शतकोत्तरांच्या वळणावर या ग्रंथामधून आंबेडकर अकादमी सातारा मधून प्रकाशित झाला.** लेखकाने आपल्या या लेखात 'बहुजन राजकारणाचा' प्रथम आढावा घेतलेला आहे. बहुजन शब्दाचा आशय स्पष्ट करताना लेखकाने या संकल्पनेला खूप सैलपणे आजमितीपर्यंत वापरले गेले, अशी खंत व्यक्त करून बहुजन या संकल्पनेचा विविध लोकांनी आप–आपल्यापरिने अन्वयार्थ लावल्याने या संकल्पनेबाबत गुंता वाढत गेला, असे मत मांडलेले आहे. लेखकाने बहुजन संकल्पनेचा अर्थ सांगण्यासाठी म. फुले यांच्या मांडणीचा आधार घेतलेला आहे. लेखकाच्या मते बहुजन या संकल्पनेला स्व. यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणात परवलीचा शब्द बनविले; आणि बेरजेच्या राजकारणातील चलनी नाणे म्हणून बहुजन या संकल्पनेचा वापर केला. लेखकाच्या मते, बहुजन संकल्पनेचे स्वरूप उत्तर भारतात पार बदलूनच जाते, ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य या त्रैवर्णिय हिंदूंच्या वर्चस्वाला बहुजनवादी राजकारण हे आव्हान देते. लेखकाने बहुजन राजकारणाची फलिते सांगताना तीन गोष्टींकडे निर्देश केला. पहिली गोष्ट, या राजकारणाने लोकानुरंजनवादास जन्म दिला. दुसरी गोष्ट,

संकुचित जातीवाद वाढला, तिसरी गोष्ट, हिंदूत्ववादी आणि मुस्लिम जमातवादाला खतपाणी मिळाले.

**२०. देशपांडे राजेश्वरी, २००६ : 'वंचितांच्या चळवळींचे यशापयश: एक मूल्यमापन' प्रस्तुत लेख किशोर बेडकिहाळ संपादीत शतकोत्तरांच्या वळणावर या ग्रंथामधून आंबेडकर अकादमी सातारा मधून प्रकाशित झाला.** प्रस्तुत लेखात वंचितांच्या संघटित राजकारणावर प्रकाश टाकलेला आहे. आजच्या संदर्भात शोषणाच्या नव्या आयामांचा अविष्कार झाला आहे. लेखकाच्या मते, भारतात ६७ टक्के शेतकरी वर्ग आहे; आणि शेतीवर काम करणारा मजूर वर्ग हा ४० टक्के इतका आहे. या चाळीस टक्के शेतमजूरात बहुसंख्य हे दलित आहेत. सध्याच्या विषम आर्थिक धोरणांचा प्रतिकूल परिणाम या दोन वर्गावर होत आहे. भूमिहिनता वाढत आहे. त्यात निवडणूकीच्या राजकारणाचाही परिणाम होत आहे.

**२१. दुसाद, एच. एल., २००३ : 'सामाजिक परिवर्तन और बी. एस. पी'. प्रस्तुत ग्रंथ सम्यक प्रकाशन दिल्ली येथे प्रकाशित झाला.** प्रस्तुत ग्रंथात परदेशातील भूमीपूत्र आणि भारतातील बहुजन, जातीचा विनाश कठीण आहे. अस्पृश्यतेचा प्रतिकार, संघटित शक्तीविना मानवी अधिकारांचा उपभोग अशक्य, आंतरजातीय विवाहाला चालना देणे जातीनिर्मूलनासाठी आवश्यक, काशीराम यांचे परिवर्तनवादी सूत्र, ब्राम्हणी आतंकवादापासून सावधान, सामाजिक क्रांतीचे पितामह म. फुले, हिंदूत्वाचे विचार फक्त ब्राम्हणासाठी, मायाराज ऱ्हासावर उत्सव, जर काशीराम नसते? पेरियार यांची सामाजिक परिवर्तनाची कसोटी इत्यादी विषयावर प्रस्तुत ग्रथांत लेखरूपाने विवेचन करण्यात आलेले आहे.

**२२. Ghansham Shaha, 2002 : Dalit identify Politics** प्रस्तुत ग्रंथ सेज प्रकाशनाने प्रकाशित केला. त्याचे सुनंदा कोगेकर यांनी 'दलितांची आस्मिता आणि राजकारण' या शीर्षकाखाली वस्तुनिष्ठरित्या मराठीत अनुवाद केला तो डायमंड प्रकाशन पुणे, येथे प्रकाशित झाला. प्रस्तुत ग्रंथात लेखकाने दलित राजकारण, दलित चळवळ आणि अस्मिता, उत्तर प्रदेशातील अनुसूचित जाती व निवडणूका, निवडणूक राजकारणातील दलितांची भूमिका इत्यादी घटकांवर प्रकाश टाकला आहे.

**२३. नैमिशराय मोहनदास, २००९ : 'बहुजन समाज' निलकंठ प्रकाशन नवी दिल्ली,** प्रस्तुत ग्रंथात लेखकाने बामसेफपूर्व दलित समाजाची सामाजिक आणि राजकीय स्थिती,

बामसेफ ते बहुजन समाज पार्टी, काशीराम याचा दक्षिण दौरा, डॉ. आंबेडकर आणि काशिराम, बसपावरील बाह्य दबाव, बहुजन समाज पक्षाचे सामाजिक संबंध अशा विविध घटकांवर प्रकाश टाकला आहे.

**२४. रूईकर प्रज्ञा, २०१२ : 'ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा अभ्यास' प्रस्तुत अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंधात** ॲड. बाळासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रातील प्रवेशाची पार्श्वभूमी, महाराष्ट्राच्या आंबेडकरी चळवळीत ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचे वेगळेपण, बहुजन महासंघाचा प्रयोग, त्यांनी केलेली आंदोलने इत्यादी प्रकरणांमधून ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे.

**२५. भास्कर भोजने, अष्टपैलू बाळासाहेब आंबेडकर', राजेंद्र प्रिंटर्स अकोला, आक्टोंबर, २००८** प्रस्तुत ग्रंथात लेखकाने ॲड. प्रकाश ऊर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडण–घडणीचा, त्यांच्यावर पडलेल्या प्रभावाचा आणि त्यांच्या कार्य कर्तुत्वाचा आढावा घेतलेला आहे. या पुस्तकात लेखकाने ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी वेळोवेळी शेतीविषयक महिलाविषयक, शेतकरीविषयक, आदिवासीबाबत, शिक्षणबाबत, तंत्रज्ञान, जागतिकीकरण, मुस्लीम, ओबीसी, अर्थसंकल्प इत्यादींसारख्या विषयाच्याबाबतीत आंबेडकरी दृष्टिकोनातून त्याचे कसे शास्त्रीय पद्धतीने विवेचन केले आहे. याची मांडणी केलेली आहे. त्याचबरोबर या पुस्तकात समाजाला व देशाला प्रगती पथावर नेण्यासाठी कोणती भूमिका घेता येईल. त्यासाठी आपली भूमिका काय असावी. याबाबतचे त्यांचे विचार व कार्यक्रम याची मांडणी केलेली दिसते. या सर्व बाबींचा लेखकांनी अभ्यासपूर्ण आढावा घेतला आहे

**२६. कमलेश कुमार, बहुजन समाज पार्टी : विचारधारा, कार्यक्रम आणि नेतृत्व का अध्ययन (१९८४ ते २०१२ पर्यंत वाराणसी विभागाच्या विशेष संदर्भासह) काशी हिंदू विश्वविद्यालय वाराणशी पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१९** प्रस्तुत शोध निबंधामध्ये कमलेश कुमार यांनी बहुजन समाज पार्टीची स्थापना, तिची विचारधारा कार्यक्रम आणि नेतृत्व याचा अतिशय सखोल अभ्यास केला आहे. बहुजन समाज पक्ष आज उत्तर प्रदेश तसेच भारतीय राजकारणाचा केंद्रबिंदू बनला आहे. ज्यामुळे काही राजकीय पक्ष त्याच्याशी तडजोड करू इच्छितात किंवा युती करू इच्छितात. बसपाला या

उंचीवर नेत असताना काशीराम यांच्या नेतृत्वाचा आणि नंतर मायावतींच्या नेतृत्वाचा अभ्यास करण्याबरोबरच खालच्या पातळीवरील नेतृत्वाचा अभ्यास महत्त्वाचा ठरू लागला. पहिल्या प्रकरणामध्ये १९८० नंतर, उत्तर प्रदेशच्या राजकीय प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणजे दलित चेतनेचा उदय. उत्तर प्रदेशच्या राजकीय विकासाच्या दृष्टीकोनातून त्याचे महत्व, बहुजन समाज पक्षाच्या इतिहास जो कि, म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रामध्ये निर्माण करून ठेवलेला होता. त्या पार्श्वभूमीवर काशीराम यांना पुण्यामध्ये आलेले अनुभव, जातीयतेची त्यांना झालेली जाणीव डॉ. आंबेडकरांच्या पश्चात दलित चळवळीची दशा त्यामधून काशीरामाना आलेले नैराश्य म. जोतिबा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी आलेला संपर्क या सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास केलेला आहे. प्रकरण दुसरे यामध्ये त्यांनी बहुजन समाज पक्षाच्या विचारसरणीचा सैद्धांतिक आधार काय आहे? त्यात कोणते बदल झाले आहेत किंवा त्याच्या पद्धतींमध्ये कोणते बदल झाले आहेत हे समजून घेण्याचा आणि विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. बहुजन समाज पक्षाची स्थापना झाली तेव्हा त्याचा कार्यक्रम, विचारधारा काय होती, आणि आज बहुजन समाज पक्षाचे नेतृत्व मायावती करत असताना कोणते बदल झाले आहेत. याचा विचार केलेला आहे. प्रकरण तिसरे यामध्ये बहुजन समाज पक्षातील नेतृत्वाचा अभ्यास केलेला आहे.

यामध्ये काशीरामांचे नेतृत्व, त्यांच्या पश्चात मायावती नेतृत्व करत असताना कोणते बदल झाले आहेत. यासोबतच विभागीय स्तरावर कोणत्या प्रकारचे नेतृत्व उदयास येत आहे. यामध्ये पदाधिकाऱ्यांची निवड कशी केली जाते, त्यांची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक पार्श्वभूमी काय आहे? कारण काशीराम यांनी त्यांच्या हयातीतच मायावतींना बहुजन समाज पक्षाच्या उत्तराधिकारी का म्हणून घोषित केले होते, हा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात उठू लागला होता. मायावती यांच्यानंतर बहुजन समाज पक्षात कोणते नेतृत्व उदयास येत आहे किंवा कोण असेल? बहुजन समाज पक्षाचे नेतृत्व करणारा नेता कोण आहे? यांचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

प्रकरण चारमध्ये वाराणशी भागातील बहुजन समाज पक्षाच्या स्थानिक नेतृत्वाचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये वय, लिंग, जात, धर्म यावरून किती प्रमाणात नेतृत्व बहूजन

समाज पक्षात आहे याचे तक्त्याद्वारे विश्लेषण करण्यात आलेले आहे. प्रकरण पाचमध्ये संशोधनाविषयीचे निष्कर्ष मांडून त्यावर सकारात्मक उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

**२७. अवनीश कुमार, बहुजन विचारधारेतील ज्योतिबाफुले, पेरियार इ. व्ही. रामासामी नायकर आणि मान्यवर काशीराम यांच्या राजकीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास. वीर बहादूर सिंग, पूर्वांचल विद्यापीठ, जौनपूरचे पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.** प्रस्तुत शोध निबंधामध्ये अवनीशकुमार यांनी बहुजन विचारधारेतील ज्योतिबा फुले, पेरियार इ. व्ही. रामासामी नायकर आणि मान्यवर काशीराम यांच्या राजकीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास ऐतिहासिक वर्णनात्मक पद्धतीचा वापर करून अभ्यास केलेला आहे. पहिल्या प्रकरणात ज्योतिबा फुले, पेरियार इ. व्ही. रामासामी नायकर आणि काशीराम यांचे चरित्र या महापुरुषांचे जन्मस्थान, आई–वडील यांची चर्चा केली आहे. आणि त्या काळातील परिस्थितीचा सविस्तर अभ्यास केला आहे. केले आहे. त्या सर्वांच्या जीवनसंघर्षातून हे समजू शकते की, सर्व अडचणी असतानाही आपण निर्धारपूर्वक कोणत्याही चुकीच्या व्यवस्थेविरुद्ध किंवा अन्यायाविरुद्ध लढा दिला तर तो दूर होऊ शकतो. हे तिन्ही लोक वेगवेगळ्या कालखंडात जन्मले आणि त्यावेळच्या शोषक व्यवस्थेच्या विरोधात स्वतःच्या मार्गाने लढले आणि यशही मिळवले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजाच्या उन्नतीसाठी समर्पित केले. या प्रकरणात त्यांच्या जीवनातील प्रत्येक घटनेचा तपशीलवार अभ्यास केला आहे.

दुसऱ्या प्रकरणात म. जोतिबा फुले, पेरियार रामासामी नायर आणि काशीराम यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतलेला आहे. त्यांनी लोकांमध्ये सामाजिक जाणीव आणण्यासाठी सामाजिक स्तरावर अनेक गोष्टी केल्या आहेत. फुले यांनी जातीव्यवस्थेला आणि वर्णव्यवस्थेला विरोध केला. सतीप्रथासारखी सामाजिक दुष्प्रवृत्ती संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न केले. विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले गेले. पेरियार यांनी या दृष्टप्रवृत्तींना दूर करण्यासाठी जी पावले उचलली, त्या सर्व प्रयत्नांचा सखोल अभ्यास केला आहे. काशीराम यांनीही प्रचलित सामाजिक कुप्रथा आणि अन्याय दूर करण्यासाठी, लोकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी अनेक सामाजिक संस्था स्थापन केल्या. त्यांच्यामध्ये सामाजिक जागृती आणण्यासाठी प्रयत्न केला. या सर्व उपाय, पद्धती आणि संघटना यांचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे.

प्रकरण चारमध्ये म. जोतिबा फुले, पेरियार इ. व्ही. रामासामी नायकर आणि काशीराम यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या राजकीय कार्यांतर्गत, त्यांनी राजकीय जागृती करण्यासाठी केलेल्या सर्व कार्यांचा तपशीलवार अभ्यास केला आहे. या लोकांनी स्वत: राजकीय सत्ता मिळवली नाही, परंतु शोषित, मागासलेले, शुद्र, अतिशुद्र समाजाला राजकीय सत्ता मिळविण्यासाठी प्रेरित केले. फुले आणि पेरियार यांनी सामाजिक परिवर्तनावर भर दिला असला, तरी काशीराम यांनी मुख्यत्वे राजकीय सत्ता मिळविण्यावर भर दिला. त्यांनी बहुजन समाजाच्या हिताचे प्रतिनिधित्व करणारा बसपा हा राजकीय पक्ष स्थापन केला.

चौथ्या प्रकरणात, म. जोतिबा फुले, पेरियार इ. व्ही. रामासामी नायकर आणि काशीराम, यांचे सामाजिक उत्थानासाठीचे प्रयत्न याचे सविस्तर अध्ययन करण्यात आले आहे. म. जोतीबा फुले यांचे प्रयत्न, आजूबाजूच्या परिसरापुरते मर्यादित होते. तर पेरियार यांचे प्रयत्न व्यापक सामाजिक उन्नतीसाठी होते. काशीराम यांनी संपूर्ण देशभर प्रयत्न केले. त्यांनी विविध ठिकाणी भेटी देऊन लोकांचे प्रबोधन केले. त्यांनी अनेक राज्यांमध्ये सभा आणि परिषदा संबोधित केल्या. ८५ विरुद्ध १५ टक्के या संकल्पनेचे सूत्र मांडून खूप मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणले. त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण प्रयत्नाचा अभ्यास आणि विश्लेषण या प्रकरणात केला आहे. या सर्वांनी आपापल्या काळानुसार आणि परिस्थितीनुसार सामाजिक व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न केला, ज्यामध्ये अन्याय, विषमता, भेदभाव आणि शोषणाच्या प्रवृत्ती होत्या. त्याचा सखोल अभ्यास करून हे अन्याय संपवण्यासाठी त्यांनी कोणती पावले उचलली याचाही अभ्यास करण्यात आला आहे.

पाचव्या प्रकरणात जोतिबा फुले, पेरियार इ. व्ही. रामासामी नायकर आणि काशीराम यांच्या विचारांची सध्याच्या काळात प्रासंगिकता स्पष्ट केली आहे. जोतिबा फुले, पेरियार इ. व्ही. रामासामी नायकर आणि काशीराम यांच्या विचारांनी बहुजन समाजाच्या कल्याणासाठी कसे योगदान दिले, त्या सर्व पैलूंचा बारकाईने अभ्यास आणि विश्लेषण करण्यात आले आहे. या महापुरुषांच्या संघर्षाने बहुजन समाजाला समाजात त्यांचे स्थान कसे मिळवून दिले आणि त्यांची स्थिती सातत्याने कशी सुधारली, यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**२८. गजानन गजभिये, भारतीय रिपब्लिकन पक्ष– बहुजन महासंघाची भूमिका व त्यांचा महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध** प्रस्तुत

शोधनिबंधात गजानन गजभिये यांनी भारतीय रिपब्लिकन पक्ष– बहुजन महासंघाची भूमिका व त्यांचा महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव याचा सखोल आढावा घेतलेला आहे. या शोधनिबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये विषयाच्या संशोधन आराखड्यासंबंधी मांडणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये अध्ययनाची उद्दिष्ट्ये, अध्ययन तंत्रे, अध्ययनाचे महत्त्व, अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा यासंबंधी माहिती देण्यात आली आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये भारतीय रिपब्लिकन पक्ष–बहुजन महासंघाची निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, उदय आणि विकास याविषयी विस्ताराने आढावा घेण्यात आला आहे. शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या वेगवेगळ्या सामाजिक, राजकीय संघटना व भारतीय रिपब्लिकन पक्ष व महासंघाची निर्मिती त्याचे कार्य, दलित पँथरचा उदय व कार्य, भारतीय रिपब्लिकन पक्ष – बहुजन महासंघाची गरज निर्मिती व वाटचाल, विचारसरणी, पक्षाचा ध्वज, पक्षाचे ध्येय व उद्दिष्ट्य, पक्षाची संघटनात्मक रचना व पक्षाची वाटचाल याविषयी माहिती देण्यात आली आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये भारतीय रिपब्लिकन पक्ष–बहुजन महासंघाचे कार्य व भूमिका याचा आढावा घेण्यात आलेला आहे. यामध्ये या पक्षाने समाजातील विविध घटकांच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी केलेली आंदोलने याचा उल्लेख आढळतो. त्यात बौद्धांच्या सवलतीचा प्रश्न, दलितांवर होणाऱ्या अत्याचाराबाबत आंदोलन, झोपडपट्टी विकास आंदोलन, सहकारी साखर कारखाने सरकारच्या ताब्यात असावेत, या मागणीसाठी लाँग मार्च, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, 'राम व कृष्णा'बाबत भूमिका, मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची मागणी, स्वतंत्र विदर्भासाठी आंदोलन, ऐन्रॉन विज प्रकल्पाच्या विरोधातील आंदोलन, भारतीय संविधानाच्या पुनर्विलोकनाविषयी असणारी पक्षाची भूमिका, भूमिहिंनाचा लढा, ओ.बी.सी.ना. आरक्षण लागू करण्याबाबतचे आंदोलन, महिला जागृतीसाठी प्रयत्न, ओबीसींना खाजगी शिक्षण संस्थामध्ये आरक्षण मिळावे म्हणून कलेले आंदोलन, रिपब्लिकन ऐक्य, ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी यासाठी आंदोलन, अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ व्हावी, यासाठी आंदोलन, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधी भूमिका, वर्गीय जाणिवा निर्माण करण्याविषयी भूमिका इ.विषयी माहिती देण्यात आली आहे. चौथ्या प्रकरणामध्ये, भारतीय रिपब्लिकन पक्ष–बहुजन महासंघ या पक्षाचा निवडणुकीतील सहभाग याचा आढावा घेण्यात

आलेला आहे. पक्षाच्या महाराष्ट्र राज्यातील केंद्रीय व राज्यपातळीवरील निवडणुक सहभागाविषयी माहिती देण्यात आलेली आहे आली. १९८४ ते २००४ पर्यंत राज्यामध्ये झालेल्या लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकांमध्ये पक्षाने उभे केलेले उमेदवार, त्यांना मिळालेली मते व टक्केवारी यासंबंधी माहिती देण्यात आली. तसेच राज्यसभेत व राज्यविधानपरिषदेत पक्षाने केलेल्या प्रतिनिधित्वाचा येथे आढावा घेण्यात आला. त्याचबरोबर स्थानिक स्वराजसंस्थांच्या निवडणुकींमध्ये पक्षाने घेतलेल्या सहभागाविषयीची माहिती या प्रकरणात देण्यात आली. पाचव्या प्रकरणामध्ये भारतीय रिपब्लिकन पक्ष–बहुजन महासंघाचा महाराष्ट्राचे राजकारण याविषयीचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यात सामाजिक प्रश्न आर्थिक समस्या सोडविण्यासाठी केलेल्या प्रयत्नातून भारतीय रिपब्लिकन पक्ष–बहुजन महासंघाचे महाराष्ट्रातील राजकारण व निवडणुका याबाबतचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण सहामध्ये प्रस्तुत शोधनिबंधाविषयीचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. तसेच भारतीय रिपब्लिकन पक्ष–बहुजन महासंघापुढील आव्हाने व पक्षाचे भवितव्य याबाबत विश्लेषण करण्यात आले आहे.

**२९. प्रभातकुमार ओझा, भारतीय राजनिती मे जाती आधारित राजनीतिक दलो का अस्तित्व और संभावनाए बहुजन समाज पार्टी के विशेष संदर्भ मे वीर बहादूर सिंह पूर्वांचल विश्वविद्यालय, जौनपुर , पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध** पहिल्या प्रकरणांमध्ये भारतातील जाती आणि राजकारण याचे सैद्धांतिक विश्लेषण करण्यात आलेले आहे. या प्रकरणांमध्ये जातीव्यवस्था निर्माण होण्याच्या पूर्वी असणारी सामाजिक व्यवस्था कशी होती. याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. जातीचा अर्थ विविध व्याख्या करण्यात आलेले आहेत. तसेच प्राचीन काळात व मध्ययुगीन काळात जातीचे अस्तित्व कसे होते याचेही विवेचन करण्यात आलेले आहे. हिंदू धर्मात असणारी जातीव्यवस्था दूर करण्यासाठी भारतीय समाजामध्ये अनेक विचारवंतांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा या प्रकरणांमध्ये घेण्यात आलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जात आणि धर्माविषयीच्या दृष्टिकोनाचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. गांधी आणि आंबेडकर यांच्यामध्ये झालेला पुणे करार, वेगवेगळ्या घटक राज्यांमध्ये जातीचा प्रभाव कशा पद्धतीने राजकारणावर पडतो, त्याचे सखोल पद्धतीने अध्ययन या प्रकरणांमध्ये केलेले आहे

प्रकरण दोन या प्रकरणांमध्ये भारतामध्ये जातीवर आधारित राजकीय पक्षांचा उदय व विकास याबाबत सविस्तर विवेचन करण्यात आलेले आहे. शिवाय भारतामध्ये असणाऱ्या राजकीय पक्षांची संख्या, प्रकार याचे स्पष्टीकरण केलेले आहे. या प्रकरणांमध्ये स्वातंत्र्यानंतर केंद्रामध्ये काँग्रेस पक्ष प्रभावी असताना नंतरच्या काळामध्ये काँग्रेसचा प्रभाव कमी होत गेला आणि प्रत्येक घटक राज्यांमध्ये कशा पद्धतीने प्रादेशिक पक्ष वाढत गेले, याचा विवेचन केलेले आहे. शिवाय प्रत्येक घटक राज्यांमध्ये कोणता राजकीय पक्ष जातीवर आधारित आहे याचेही स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

प्रकरण तीन या प्रकरणांमध्ये बहुजन समाज पक्ष एक राजकीय पक्ष म्हणून त्याची निर्मिती विकास पार्श्वभूमी याचा अभ्यास केलेला आहे. या प्रकरणांमध्ये भारतामध्ये असणारी वैदिक संस्कृती आणि वर्णव्यवस्था यांचे पहिल्यांदा विवेचन करण्यात आलेले आहे. या वर्ण व्यवस्थेमध्ये शूद्र समाजाची नेमकी भूमिका किंवा त्याचे हक्क अधिकार कशा पद्धतीने नाकारले जात होते, याचे विवेचन केलेलं आहे. या प्रकरणात ज्योतिबा फुले यांनी दलित म्हणजे कोण हे सांगितले आहे. त्याची व्याख्या याच्यामध्ये केलेली आहे. म. फुलेंनी दलितांच्या शोषणा पाठीमागे आर्थिक कारण हे महत्त्वाचे कारण आहे हे स्पष्ट केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय उद्धार करण्यासाठी केलेले प्रयत्न. त्यांच्यामध्ये राजकीय चेतना निर्माण करणेसाठी सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यात आलेला आहे. भारतीय रिपब्लिकन पार्टी, त्या पार्टीमध्ये पडलेली फूट, त्यानंतर निर्माण झालेली दलित पँथर, बामसेफ, दलित शोषित समाज संघर्ष समिती आणि या संघटनांच्यामार्फत काशीराम आणि भारतामध्ये दलितांच्या उद्धारासाठी त्यांच्यामध्ये राजकीय चेतना निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण चारमध्ये बहुजन समाज पार्टीचे संघटना आणि निवडणुकीतील सांस्कृतिक रणनीती, राजनितिक, रणनीती याचे विश्लेषण केलेले आहे. बहुजन समाज पक्षाची संघटना त्यामध्ये काशीरामांची भूमिका, पक्षाचा विस्तार करण्यासाठी उत्तर प्रदेश मधील १४ विभाग बहुजन समाज पार्टी व समाजवादी पक्ष यांची युती, भारतीय जनता पक्ष व बहुजन समाज पक्ष यांची युती यांचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. प्रकरण पाचमध्ये बहुजन समाजाकडून सर्वजण समाजाकडे वाटचाल या बहुजन समाज पक्षाच्या भूमिकेचे विश्लेषण

करण्यात आले आहे. मायावती मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी प्रशासनामध्ये केलेले बदल. २००२ सालचा सोशल इंजिनियरिंग चा प्रयोग याचा अभ्यासपूर्ण आढावा घेतलेला आहे.

**३०. महात्मा फुले, गुलामगिरी, (१८७३) फुले जोतिबा यांनी त्यांच्या गुलामगिरी** या पुस्तकात सर्व शूद्र आणि अस्पृश्य हे जातीयदृष्ट्या एक आहेत, असे निरीक्षण नोंदवले. वैदिक व्यवस्थेत वर्णव्यवस्थेची मुळे दिसतात. या पुस्तकात त्यांनी ब्राह्मणी विचारसरणीची यंत्रणा निदर्शनास आणून दिली आणि जातिव्यवस्थेबद्दलची त्याची कार्यप्रणाली. कोणत्याही प्रकारच्या असमानतेशी ते पूर्णपणे असहमत होते. त्यांनी समान समाजासाठी बळी राजांच्या (सिंधू सभ्यता) कालखंडाचा आदर्श मांडला आहे. त्यांनी समाजाचे शोषण न करणारी समानतेवर आधारित भारतीय समाजाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला.

**३१. महात्मा फुले, 'ब्राह्मणाचे कसब' (१८६९) या पुस्तकात ब्राह्मणांनी आपले वर्चस्व टिकवण्यासाठी सर्वप्रकारे प्रयत्न केले आहेत,** हे सत्य समोर आणले आहे. त्यांनी जातीच्या आधारावर ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांची कशी फसवणूक केली हे सांगितले. पीडित जाती आणि स्त्रियांसाठी त्यांनी स्त्री–शूद्र–अतिशुद्र (स्त्रिया–मागास–अस्पृश्य) या अद्वितीय संज्ञा वापरल्या. त्याना सर्व शोषित जातींना अमानुषतेविरुद्ध एकत्र आणावयाचे आहे.

**३२. महात्मा फुले, 'सार्वजनिक सत्यधर्म (१८८९)' हे पुस्तक सार्वजनिक सत्य समाजाचा (युनिव्हर्सल ट्रुथ सोसायटी)चे जाहीरनामा आहे. समान समाज निर्माण करण्यासाठीचा हा मूलभूत दस्तऐवज आहे.** या पुस्तकात ज्योतिबा फुले यांनी जाती निर्मूलनाचे मार्ग दाखवले आहेत. सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा हा वैज्ञानिक मूल्ये, स्वातंत्र्य–समता आणि बंधुभाव, शोषणाविरुद्ध आंदोलनाचा जाहीरनामा आहे. म. फुलेंनी हा संदेश दिला कि मानवता हे सर्व मानवांचे अंतिम ध्येय आहे.

**३३. आंबेडकर बी.आर. 'भारतातील जाती (१९१६)' या विषयावर एक संशोधनात्मक लेख प्रकाशित केला.** हा लेख ९ मे १९१६ रोजी कोलंबिया विद्यापीठात वाचला गेला. या संशोधन लेखाद्वारे त्यांनी भारतातील जातीच्या समस्येवर प्रकाश टाकला. सेनार्ट, नेसफिल्ड, रिस्ले आणि केतकर यांनी मांडलेल्या जातीविषयक सिद्धांतांचे त्यांनी खंडन केले आहे. या चार विद्वानांच्या जातीच्या व्याख्यांचे विवेचनात्मक मूल्यमापन केले आहे. त्यांनी नवा प्रस्ताव मांडला की, बाह्यविवाहीवर अंतःविवाहाच्या वरची स्थिती म्हणजे जातीची निर्मिती. एकेकाळी निर्माण

झालेल्या जातीने (१) सती किंवा विधवेला जाळणे, (२) सक्तीचे वैधव्य (विधवा पुनर्विवाहावर बंदी आणि (३) मुलगी–विवाह (बालविवाह) या प्रथेद्वारे आपले अस्तित्व कसे टिकवून ठेवले याकडे त्यांनी लक्ष वेधले. श्रमविभागणीच्या आधारे समाजाची उपविभागणी होणे स्वाभाविक असले तरी मजुरांची विभागणी ही अगदीच अनैसर्गिक आहे, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. डॉ. बी. आर. आंबेडकरांनी जातिव्यवस्थेची वास्तववादी वैशिष्ट्ये ओळखली. ज्यांना जातिव्यवस्थेचा नाश करणारे घटक म्हणून पाहिले जाते.

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या अप्रसिद्ध लिखित भाषणात जातिव्यवस्थेच्या राष्ट्र उभारणीवर होणाऱ्या परिणामांबद्दल चेतावणी दिली, जी नंतर 'जातीचे उच्चाटन' या पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशित झाली. (१९३६) ते म्हणतात की, मी हिंदूंना हे लक्षात आणून दिले की ते भारतातील आजारी आहेत आणि त्यांच्या आजारामुळे भारतीयांना धोका आहे. हू वेअर दि शूद्र नावाचे पुस्तक, (१९४६) महान क्रांतिकारक म. फुले यांना समर्पित करून त्यांनी आपल्या पुस्तकात दाखवले आहे कि इंडो–आर्यन समाजात शूद्र हे चौथे वर्ण कसे बनले. त्यांच्या सखोल अभ्यासातून त्यांना असे दिसून आले की, ब्राह्मणांनी शूद्रांचे अध:पतन घडवून आणले.

मराठी संत चोखामेळा यांना डॉ. आंबेडकर यांनी समर्पित केलेल्या अस्पृश्य (१९४८) या पुस्तकात प्राचीन समाजातील चातुर्वर्ण्यांचे एकंदर वर्चस्व सूचित केले आहे. अस्पृश्यता मानली गेली. ब्राह्मणांचा शूद्रांविरुद्धचा द्वेष ज्यांना नंतर अति–शूद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. (पाचवा वर्ण किंवा अंत्यज) त्यांनी निदर्शनास आणून दिले की, शूद्रांनी पदानुक्रमात ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व मान्य केले नाही आणि त्यांचे वर्चस्व नाकारले.

'क्रांती आणि प्रतिक्रांती' (२००८) या अप्रकाशित पुस्तकात, भारतीय इतिहास हा बौद्ध आणि ब्राह्मणवाद यांच्यातील संघर्षाचा इतिहास आहे, असे डॉ. आंबेडकरांनी नमूद केले आहे, तो अनुक्रमे समता आणि विषमता प्रस्थापित करण्याचा संघर्ष आहे. या पुस्तकात प्राचीन काळातील अस्पृश्यांच्या अभिमानास्पद स्थानाबद्दल ऐतिहासिक संदर्भ दिले आहेत. त्यांनी भारतातील तमाम शोषित समाजाला राजकीय सक्षमीकरणाचा संदेश दिला आहे.

**34. JI - Eun Lee, Dalit Movement in India : Centre, States and The lternatives, 1947-2000, Centre For Historical Studies School of Social Science Jawaharlal Neharu University, New Delhi, 2010,** पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता

सादर केलेला अप्रकाशित प्रबंध. प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील दलित चळवळीचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये दलित चळवळीचा परिचय, ऐतिहासिक पार्श्वभूमी याचे विवेचन करण्यात आलेले आहे. तसेच दलित समाजाबद्दल केंद्र सरकार आणि विधिमंडळ संस्थांचे दृष्टीकोन, त्यांच्या विकासासाठी केलेले कायदे, योजना, कायद्याच्यासंहितेत अनुसूचित जाती, अनुसूचित जातीची ओळख, दलित सबलीकरणाची पद्धत म्हणून आरक्षणाचे मूल्यमापन, राज्याचे राजकारण : महाराष्ट्र, १९४७–१९८० वसाहत काळात मुंबई प्रांतातील दलित पक्षांच्या राजकीय उपक्रम, स्वातंत्र्योत्तर राजकीय वातावरणात दलित पक्षांसाठी युतीची शक्यता, आंबेडकरोत्तर नेतृत्वाखालील RPI चे राजकारण, संघर्षाचे पुनरुज्जीवन दलित पँथर, राज्याचे राजकारण: उत्तर प्रदेश, १९८४–२०००, पार्श्वभूमी आणि सामाजिक–राजकीय वातावरण: १९८० पूर्वी, काशीरामच्या चळवळीचा उदय आणि त्याची विचारधारा, सुरुवातीच्या टप्प्यात बसपचा विकास, बहुजनांच्या नावाखाली दलित मतांचे एकत्रीकरण, युतीच्या राजकारणातून सत्ता मिळवणे, पर्यायी दृष्टीकोन : एक नागरी समाज चळवळ, १९८१–२०००, दलित आवाज : एक परिचय, विचारसरणीचा आधार : वांशिक दृष्टिकोन, संघर्षाची रणनीती : संख्यात्मक बहुमतासाठी युती, समतावादी समाजासाठी रणनीती: राष्ट्र म्हणून जात याचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

**३५. रमेश विवेकी, आंबेडकरी चळवळीतील काशीराम ह्यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २०१० पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.** प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये काशीराम ह्यांचे आंबेडकरी चळवळीतील योगदान याबाबत सखोल आढावा घेतलेला आहे. सदर शोधप्रबंधामध्ये आंबेडकरी चळवळीची पार्श्वभूमी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित वर्गासाठी केलेले कार्य, त्यांनी स्थापन केलेल्या विविध सामाजिक, राजकीय संस्था, पुणे करार, राखीव मतदार संघ, त्यातून निवडून आलेल्या प्रतिनिधींचा समाजाशी द्रोह, रिपब्लिकन पक्षाची स्थापना, फुट, काशीरामांचे जीवनकार्य, त्यांच्यावर पुणे येथे असताना पडलेला आंबेडकरी चळवळीचा प्रभाव, त्यांनी केलेली प्रतिज्ञा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काशीरामानी केलेला त्याग, त्यांनी स्थापन केलेल्या विविध संघटना बामसेफ , DS4, बहुजन समाज पक्ष ,

या संघटनामार्फत त्यांनी आंबेडकरी चळवळ पुढे नेण्यासाठी केलेला प्रयत्न याचा अतिशय तपशीलपणाने अभ्यास केलेला आहे.

**३६. अनिल जगताप ,सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास १९७२ ते २००२ टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे , पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.** प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये जातिव्यवस्थेमुळे भारताचे जगात असणारे वेगळेपण, दलित व अतिक्षुद्र यांच्या चळवळीची सुरुवात ते मानवमुक्तीपर्यंतचा प्रवास, जातीव्यवस्थेची निर्मित्ती, म. फुलेंनी दलितांच्या मागासलेपणाची केलेली मीमांसा, त्यांनी मुलींसाठी व दलितांसाठी सुरु केलेल्या शाळा, छत्रपती शाहू महाराजांनी दलित व ब्राह्मणेत्तर लोकांसाठी केलेले कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन चरित्र, त्यांनी सुरु केलेल्या चळवळी, राज्यघटनेची निर्मिती, रिपब्लिकन पक्षाची स्थापना, त्या पक्षातील फुट, १९७२ ते २००२ या कालावधीतील दलितांच्या चळवळी, दलित पँथर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, बहुजन महासंघ, बहुजन समाज पक्ष याची निर्मिती वाटचाल दलित विकासातील योगदान, सातारा जिल्ह्यातील दलितांच्या चळवळी याची अभ्यासपूर्ण मांडणी केलेली आहे.

**३७. रमेश इंगोले ,भारिप – बहुजन महासंघाच्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास विशेष संदर्भ. अकोला, वाशीम, बुलढाणा जिल्हा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.** प्रस्तुत शोध प्रबंधात भारिप – बहुजन महासंघाच्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. या शोध निबंधात भारिप – बहुजन महासंघाच्या निर्मितीचा इतिहास स्वातंत्र्यपूर्व काळात झालेले दलितांच्या उद्धारासाठीचे प्रयत्न, डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचे सामाजिक, राजकीय कार्य, रिपब्लिकन पक्षाची स्थापना व वाटचाल, रिपब्लिकन पक्षाचे विघटन, रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य व संघर्षाचे परिणाम, भारिप – बहुजन महासंघाचा उदय, परिवर्तनीय राजकारण, अँड. प्रकाश आंबेडकर यांचा राजकारणात प्रवेश, अकोला पँटर्न, भारिप–बहुजन महासंघाचा लोकसभा, विधानसभा आणि विधानपरिषद निवडणुकीतील सहभाग, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीतील सहभाग, भारिप–बहुजन महासंघाची विविध क्षेत्रातील कार्य साखर कारखानाविरोधी माणगाव–पुणे लाँगमार्च, सामाजिक,

आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषी, महिला विकास इ., वारकरी आंदोलन स्वतंत्र विदर्भ आंदोलन, संविधान पुनर्विलोकनाबाबतची भूमिका इ.बाबतची अतिशय सविस्तर मांडणी केलेली आहे.

**३८. सिकंदर दुलगच, भारतीय राजनितीमे दलित चेतना के उन्नयन में बहुजन समाज पार्टी की भूमिका, डॉ. हरीसिंह गौर केंद्रीय विश्वविद्यालय सागर, मध्य प्रदेश, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.** प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये बहुजन समाज पक्षाच्या निर्मितीची पार्श्वभूमी, बहुजन समाज पक्षाची निर्मिती आणि विकास कसा झाला, बहुजन समाज पक्षाची घटना बहुजन समाज पक्षाची संघटना, बहुजन समाज पक्षाने शून्यातून केलेली राजकीय प्रगती, बहुजन समाज पक्षाचे संस्थापक काशीराम, काशीराम यांचा जीवन परिचय, त्यांचे बहुजन समाज पक्षाच्या स्थापनेत योगदान, संसदेत बहुजन समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांची कामगिरी, राष्ट्रीय राजकारणातील स्थान, बहुजन समाज पक्षाच्या नेत्या म्हणून मायावतींचा भारतीय राजकारणात उदय, काशीराम यांच्यानंतर मायावतींचे बहुजन समाज पक्षाचे दूरदर्शी नेतृत्व, संधीसाधू राजकारणावर विश्वास, दलित उत्थानामध्ये प्रमुख सामाजिक सुधारणांची भूमिका, बहुजन समाज पक्ष मायावती आणि उत्तर प्रदेशचे राजकारण, बहुजन समाज पार्टी बहुजनाकडून सर्वजनाकडे वाटचाल, सद्यस्थितीत मायावती आणि बहुजन समाज पक्ष याचा सविस्तर आढावा घेतलेला आहे.

**३९. संजयसिंह, दलित वर्ग मे राजनितीक चेतना का विकास और बहुजन समाज पार्टी, महात्मा गांधी काशी विद्यापीठ, वाराणसी, पीएच. डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध** प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये दलित वर्गात बहुजन समाज पक्षामुळे निर्माण झालेल्या राजकीय जागृतीचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या शोधप्रबंधात दलितोध्दाराची विचारधारा, चळवळी आणि संघटनांच्या पूर्वीच्या परंपरा: एक विहंगावलोकन या शीर्षकासह, त्या सर्व आर्थिक, राजकीय आणि सामाजिक क्रियाकलापांचा एक पद्धतशीर संक्षिप्त लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न प्रयत्न केला आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकांतील दलित उद्धाराच्या चळवळी, राष्ट्रीय चळवळ आणि दलित चळवळ, १९४७ पर्यंत काँग्रेससोबत आणि काँग्रेसबाहेर कार्यरत असलेल्या दलित चळवळी आणि संघटनांचे

बहुआयामी विश्लेषण मांडण्यात आले आहे. सत्तेच्या राजकारणात संघर्ष करणाऱ्या बहुजन समाज पक्षाच्या संदर्भात १९८५ पासूनच्या बहुजन समाज पक्षाच्या कामगिरीचे सकारात्मक विवेचन मांडण्यात आलेले आहे. पण त्या पक्षाने आपल्या व्यावहारिक अनुभवांच्या जोरावर आपल्या विचारसरणीत आणि रणनीतीत केलेले बदलही अधोरेखित झाले आहेत. सत्तेच्या राजकारणात बहुजन समाज पक्षाचा प्रवेश', बहुजन समाज पक्षाने १९८५ पूर्वी सत्तेच्या राजकारणाच्या संदर्भात स्वीकारलेल्या धोरणांचा विवेचनात्मक संदर्भ घेऊन, मुख्यतः सत्तेच्या राजकारणाशी संबंधित. १९८५ ते १९९० हा काळ. त्यांच्या राजकीय कामगिरीच्या विविध पैलूंचा आढावा, १९९८ पर्यंत, ज्यामध्ये बहुजन समाज पक्षाचे देशाच्या आणि राज्याच्या राजकारणातील कार्य, उपलब्धी इत्यादींचे सूक्ष्म विवेचन करण्यात आले आहे. अभ्यासातून मिळालेले निष्कर्षही मांडण्यात आले आहेत. आणि त्या आधारे बहुजन समाज पक्षाच्या भविष्यातील विकासाची दिशाही सूचित करण्यात आली आहे.

**40. Ambedkar, B. R (2013) : Annihilation of Cast, Govt. Of Maharashtra, Mumbai** प्रस्तुत ग्रंथातून लेखकाने भारतातील जातवास्तवाची वस्तुनिष्ठ मांडणी केलेली आहे. भारतातील जातींच्या उतरंडीचे विदारक चित्र लेखकांनी वास्तववादी दृष्टीकोणातून मांडणी केलेले आहे. भारतातील हे जात वास्तव आणि उतरंडी इथल्या शोषित, वंचित, बहुजन समाजाच्या प्रगतीचा मार्ग अवरूध्द कसा करत आलेल्या आहेत. याची मांडणी करण्यात आलेली आहे. वर्षानुवर्षे सामाजिक, राजकीय आणि मानसिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी भारतातील जातीसंस्था नष्ट झाली पाहीजे, असे मत मांडून लेखकाने साधार पुरावे आणि युक्तीवादाच्या विलक्षण शैलीच्याआधारे वास्तववादी मांडणी करून जातीअंत करण्यासाठीचा रास्त कार्यक्रम दिलेला दिसतो.

**41. Barkar, Arnest (1976) : Principle of Social and Political Theory; Oxford University, Press.** प्रस्तुत ग्रंथात लेखकाने राज्यशास्त्रातील सामाजिक तत्त्वांचे विवेचन केलेले आहे. सामाजिक तत्वांच्या आधारे राजकीय सिध्दांताचा उहापोह प्रस्तुत ग्रंथातून विस्ताराने केला असला तरी सामाजिक, राजकीय संकल्पनाच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणी बहुजन राजकीय संकल्पनेसारख्या व्यापक विषयांना बगल दिल्याचे दिसते. तरीही सैध्दांतिक मांडणीच्या परिप्रेक्ष्यात प्रस्तुत ग्रंथ हा उपयुक्त असा आहे.

**४२. भोळे भा. ल./बेडकिहाळ किशोर, संपा (२००३) : बदलता महाराष्ट्र– साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा डॉ. एन. डी. पाटील गौरव ग्रंथ, डॉ. आंबेडकर अकादमी, सातारा.**

प्रस्तुत ग्रंथ हा गौरवग्रंथ आहे. परंतु या ग्रंथांतून विविध सामाजिक राजकीय प्रश्नांच्या संदर्भातील नामांकित लेखकांच्या लेखांचा समावेश केला गेला आहे. भारतातील आणि प्रामुख्याने महाराष्ट्राच्या विशेष संदर्भातील विविध प्रश्नांना, विषयांना वाचा फोडण्याचे काम या विविध लेखांतून केलेले दिसते. प्रामुख्याने महाराष्ट्राच्या साठोत्तर सामाजिक परिवर्तनाचा आढावा घेण्याच्या संदर्भातील लेख हे प्रस्तुत संशोधन करण्यासाठी उपयुक्त असे आहे.

**४३. जगझाप हर्ष, १९९५ : आंबेडकरवाद आणि बहुजनवाद, लेख समाज प्रबोधन पत्रिका.**

प्रस्तुत लेखात बहुजन समाज संकल्पनेबाबत ओझरता उल्लेख आलेला आहे. आंबेडकरवादाच्या संदर्भात बहुजनवादाच्या संकल्पनेचे विवेचन लेखकाने केलेले दिसते. बहुजनवादाची संकल्पना प्रस्तुत लेखामध्ये चर्चिली असली तरी काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्यासंदर्भात मांडणी आलेली नाही. एकूणच बहुजन राजकारणाचा समग्र आशय यातून स्पष्ट होत नाही. हा लेख असल्याकारणामुळे बहुजन राजकारणाला स्पर्श करून जाणारा आहे.

**४४. सुखदेव, ९ ऑक्टोंबर २०१० : काशीरामजी का बहुजनवाद, सोमाना प्रकाशन, नागपूर.** प्रस्तुत लेखात काशीराम यांच्या बहुजनवादाचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. काशीरामाच्या संदर्भात बहुजन राजकारणाच्या संकल्पनात्मक सैध्दांतिक बाजूपेक्षा राजकारणाची चर्चा करण्यात आलेली आहे.

**४५. सुमंत यशवंत, २००६ : बहुजनवादी राजकारण, लेख शतकांतराच्या वळणावर भोळे, बेडकीहाळ (संपा.) आंबेडकर अकादमी, सातारा** प्रस्तुत लेख संग्रहात लेखकाचा बहुजनवादी राजकारण शिर्षकाखाली लेख समाविष्ठ आहे. लेखातून लेखकाने बहुजन राजकारणातील पेचप्रसंग आणि राजकारणाची चर्चा केलेली आहे. बहुजन राजकारणातील विविध संघर्ष क्षेत्रांचा उल्लेख करित लेखकाने वरवरची आणि लेखाच्या संदर्भात थोडक्यात मांडणी केलेली दिसते. परिणामी बहुजन राजकारणाचा समग्र आशय त्यातुन पुढे येत नाही.

**४६. सुमंत यशवंत २०१८ : विचारसरणीच्या विश्वात, युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स, पूणे.** प्रस्तुत ग्रंथ हा विविध विचारसरणीचा आढावा घेणारा ग्रंथ आहे. सदर ग्रंथात लेखक बहुजन

विचारसरणीच्या सामाजिक संदर्भाचा आढावा घेताना दिसतो. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांचा ओझरता उल्लेख या ग्रंथात आढळतो. प्रामुख्याने पुस्तकात विचारसरणीच्या चर्चा करण्याचा उद्देश ग्रंथाचा असल्याने या विषयाबाबत सविस्तर सविस्तर मांडणी दिसत नाही.

**47. Sudha Pai, 2013 Dalit Assertion, Oxford University Press, New Delhi.**

प्रस्तुत ग्रंथात लेखकाने दलित चळवळीतील विविध वैचारिक प्रवाहांची चर्चा केलेली आहे. विशेषतः द्रविडियन आदि द्रविडियन, गांधीयन विचारधारा तसेच आंबेडकरी विचारधारा शिवाय, आंबेडकरोत्तर विचारधारेमध्ये काशीरामांची विचारधारा व बहुजन समाजपार्टीचा उगम, तत्त्वज्ञान आणि बहुजन चळवळ याचा विचार केलेला आहे. तसेच स्वातंत्र्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरूंकडे आकर्षित झालेला दलित समाज पण नंतर दलित समाजाच्या भ्रमनिरास पुढच्या काळात दलित समाजात निर्माण झालेल्या विविध संघटना जसे की दलित पँथर, भारतीय दलित पँथर इत्यादीचे सविस्तर वर्णन केले आहे. पुढच्या भागात दलितांमध्ये निर्माण झालेले विविध राजकीय पक्ष आणि त्यांचे निवडणूकांमधील राजकारण, दलितांमधील मध्यमवर्गाची कृतीशिलता या बाबींचाही अभ्यास केलेला आहे.

**48. Christophe Jaffrelot – 2010 : Religion Cast and Politics in India, Primus Book's Delhi.**

प्रस्तुत ग्रंथांत लेखकाने भारताची धर्मनिरपेक्षता हिंदू राष्ट्रवादाने कशी धोक्यात आली आहे. याची चर्चा संघ परिवारासंदर्भात केलेली दिसून येते. तसेच भारतात झालेल्या हिंदू मुस्लिम दंगलीचाही आढावा या पुस्तकात घेण्यात आलेला आहे. त्याचबरोबर भारतात खालच्या जातींचा राजकारणात झालेला उदय याचीही चर्चा करण्यात आलेली आहे. या संदर्भात उत्तरप्रदेशातील बहुजन समाज पक्षाची स्थापना त्यामध्ये काशीरामांचे योगदान, ओबीसी समाज आणि बसपाने जातीनिहाय दिलेले प्रतिनिधित्त्व, बसपाला विविध निवडणुकीत मिळालेली मते याची चर्चा करण्यात आली आहे.

**आजपर्यंत प्रस्तुत विषयावर झालेल्या पूर्व संशोधनातील उणीवा** :

भारताचे राजकारण हे नेहमीच उच्चवर्गीय जाती व प्रभू जाती यांच्या हातात राहिलेले आहे. त्यामुळे इतर कनिष्ट जातीना या उच्चवर्गीय जातीच्या आधारे राजकारण करावे लागत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा व्यवस्था परिवर्तनासाठी राजकीय

पक्ष निर्माण करून प्रस्थापित व्यवस्थेला हादरे दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यानंतर काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या बहुजन राजकारणाची मांडणी केली व त्याचे तत्वज्ञान निर्माण केले. भारतामध्ये पद्‌दलित मागास, अल्पसंख्यांक यांचे म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे बहुजन राजकारण यशस्वी होऊ शकते हे दाखवून दिले. पण त्यांनी व्यवस्था परिवर्तनासाठी केलेल्या बहुजन राजकारणावर आजमीतीपर्यंत या दृष्टिकोनातून संशोधन झालेले नाही. या दोघांच्या बाबतीत झालेले संशोधन हे एका चौकटबद्ध दृष्टिकोनातून झालेले आहे. यामध्ये बहुतांश संशोधन, दलित चळवळ मागासलेल्या जातींचे राजकारण, आंबेडकरी चळवळ, बहुजन समाज पक्ष, भारिप बहुजन महासंघ आणि निवडणुका या अनुषंगाने झालेले दिसते. ते स्वतंत्र आणि सुट्या–सुट्या स्वरूपात झालेले आहे. दोन्ही विचारवंताच्या बाबतीत सखोल अशी मांडणी झालेली नाही. प्रस्तुत विषयावरील साहित्य हे विस्कळीत स्वरूपात आहे या दोन राजकीय व्यक्तिमत्त्वांवर व विचारवंतावर स्वतंत्रपणे काम झालेले असले तरी या दोनही विचारवंत व राजकीय नेतृत्त्वाची बहुजन संकल्पना डोळ्यासमोर ठेवून त्यांनी उभी केलेली वैचारिक चळवळ आणि राजकारण याचा वस्तुनिष्ठरित्या अभ्यास झालेला नाही. या दोन राजकीय व्यक्तिमत्त्वांचा व त्यांच्या राजकारणाचा, वैचारिक भूमिकेचा व बहुजन संकल्पनेचा अभ्यास कोणीही केलेला नाही. म्हणून प्रस्तुत विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे. या विषयावर झालेल्या पूर्वसंशोधनातील उणीवा तपासून त्या दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न प्रस्तुत शोधप्रंबधातून केला आहे व त्यांच्या सामाजिक, राजकीय चळवळीला वेगळा पैलू देणारा विषय निवडून, या दुर्मिळ विषयावर संशोधन करण्यात आलेले आहे.

**संदर्भ**


१. भोळे भा.ल.: 'विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण' ग्रंथ लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०

२. चव्हाण रा. ना.: बहुजन समाजाच्या शिक्षणाचा व उन्नतीचा प्रश्न , लेख साप्ताहिक राष्ट्रवीर, बेळगांव १९४९

३. पवार गो. मा. : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे जीवन व कार्य' लोकवाङ्मय प्रकाशन, २००४

४. बागल माधवराव : 'बहुजन समाजाचे शिल्पकार' प्रस्तुत ग्रंथ ठोकळ प्रकाशन, पुणे १९६६

५. कुलकर्णी सुहास : 'जातीचा प्रश्न आणि महर्षी शिंदे यांची बहुजन संकल्पना' अप्रकाशित प्रबंध पुणे विद्यापीठ, पुणे, १९९८

6. Mane Suresh : Glimpses of Socio Cultural Revolt in India, Samruddha Bharat, 2012

६. डॉ. रूपचंद गौतम : 'दलित राजनीती उद्‌भव और विकास' प्रस्तुत ग्रंथ नटराज प्रकाशन, २०१२

८. कॅबल भारती : 'काशीराम के दो चेहरे' प्रस्तुत ग्रंथ अमन प्रकाशन कानपूर, २०१२

९. अकेला ए. आर. : 'माननिय काशीराम के ऐतिहासिक भाषण' खंड १, आनंद साहित्य सदन अलीगड प्रकाशन, २०१४

१०. अकेला ए. आर. : 'माननिय काशीराम के ऐतिहासिक भाषण' खंड २, आनंद साहित्य सदन अलीगड प्रकाशन, २०१४

११. अकेला ए. आर. : 'माननिय काशीराम के ऐतिहासिक भाषण' खंड ३, आनंद साहित्य सदन अलीगड प्रकाशन, २०१४

१२. अकेला ए. आर. : 'माननिय काशीराम के ऐतिहासिक भाषण' खंड ४, आनंद साहित्य सदन अलीगड प्रकाशन, २०१४

13. Shewde Uttam : Manyavar Kanshiram Writing and Speeches Vol. I, Samata Publication, Nagapur, 2010

१४. चव्हाण रा. ना.: 'महात्मा फुले, न्यायमुर्ती रानडे आणि आंबेडकर' प्रस्तुत लेख रा. ना. चव्हाण यांच्या पश्चात सौ. चव्हाण यांनी लेख संग्रहात प्रकाशित १९९५

१५. चव्हाण रा. ना.: 'दलित चळवळीचे प्रणेते डॉ. आंबेडकर' प्रस्तुत लेख सौ. चव्हाण यांनी सातारा, १९९५

१६. चव्हाण, रा. ना.: 'फुले, आंबेडकर आणि बहुजन समाज' प्रस्तुत लेख सौ. चव्हाण यांनी रा. ना. चव्हाण यांच्या पश्चात सातारा, १९९५

१७. दाभोळे ज. रा., हमाणे आ. : 'आंबेडकरवादी चळवळ दिशा व अपेक्षा' ॲड. पंडीतराव सडोलीकर गौरव ग्रंथ समिती, कोल्हापूर २००६.

१८. शिरवाडकर कुमार : 'जातीसंस्थेचे बदलते स्वरूप' प्रस्तुत लेख किशोर बेडकिहाळ संपादीत शतकोत्तरांच्या वळणावर या ग्रंथामधून आंबेडकर अकादमी सातारा, २००६

१९. सुमंत यशवंत (संपा.) : 'बहुजनवादी राजकारण' प्रस्तुत लेख किशोर बेडकिहाळ शतकोत्तरांच्या वळणावर या ग्रंथामधून आंबेडकर अकादमी सातारा, २००६

२०. देशपांडे राजेश्वरी : 'वंचितांच्या चळवळींचे यशापयश: एक मूल्यमापन' किशोर बेडकिहाळ संपादीत शतकोत्तरांच्या वळणावर, आंबेडकर अकादमी सातारा, २००६

२१. दुसाद, एच. एल. : 'सामाजिक परिवर्तन और बी. एस. पी' सम्यक प्रकाशन दिल्ली. २००३.

२२. Ghansham Shaha : Dalit identify Politics, Seg Publication. Delhi.2002

२३. नैमिशराय मोहनदास : 'बहुजन समाज' निलकंठ प्रकाशन, २००९, नवी दिल्ली,

२४. रूईकर प्रज्ञा, 'ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा अभ्यास', डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, राज्यशास्त्र विभाग, २०१२, अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध.

२५. भास्कर भोजने : 'अष्टपैलू बाळासाहेब आंबेडकर', राजेंद्र प्रिंटर्स अकोला, आक्टोंबर २००८

२६. कुमार कमलेश : बहुजन समाज पार्टी : विचारधारा, कार्यक्रम आणि नेतृत्व का अध्ययन (१९८४ ते २०१२ पर्यंत वाराणसी विभागाच्या विशेष संदर्भासह) काशी हिंदू

विश्वविद्यालय वाराणशी पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१९

२७. कुमार अवनीश : बहुजन विचारधारेतील जोतिबा फुले, पेरियार इ. व्ही. रामासामी नायकर आणि मान्यवर काशीराम यांच्या राजकीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास. वीर बहादूर सिंग, पूर्वांचल विद्यापीठ, जौनपूरचे पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१३

२८. गजभिये गजानन : भारतीय रिपब्लिकन पक्ष– बहुजन महासंघाची भूमिका व त्यांचा महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २००९

२९. ओझा प्रभातकुमार : भारतीय राजनिती मे जाती आधारित राजनीतिक दलो का अस्तित्व और संभावनाए बहुजन समाज पार्टी के विशेष संदर्भ मे वीर बहादूर सिंह पूर्वांचल विश्वविद्यालय, जौनपुर , पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१२

३०. फुले महात्मा : गुलामगिरी, १८७३

३१. फुले महात्मा : 'ब्राह्मणाचे कसब', १८६९

३२. फुले महात्मा : 'सार्वजनिक सत्यधर्म १८८९

३३. आंबेडकर बी.आर. : 'भारतातील जाती १९१६

34. JI - Eun Lee, Dalit Movement in India : Centre, States and The lternatives, 1947-2000, Centre For Historical Studies School of Social Science Jawaharlal Neharu University, New Delhi, 2010

३५. विवेकी रमेश : आंबेडकरी चळवळीतील काशीराम ह्यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१०

३६. जगताप अनिल : सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास १९७२ ते २००२ टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे , पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१२

३७. इंगोले रमेश : भारिप– बहुजन महासंघाच्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास विशेष संदर्भ. अकोला, वाशीम, बुलढाणा जिल्हा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१३

३८. सिकंदर दुलगच : भारतीय राजनितीमे दलित चेतना के उन्नयन में बहुजन समाज पार्टी की भूमिका, डॉ. हरीसिंह गौर केंद्रीय विश्वविद्यालय सागर, मध्य प्रदेश, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१३

३९. संजयसिंह : दलित वर्ग मे राजनितीक चेतना का विकास और बहुजन समाज पार्टी, महात्मा गांधी काशी विद्यापीठ, वाराणसी, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २००२

40. Ambedkar, B. R (2013) : Annihilation of Cast, Govt. Of Maharashtra, Mumbai

41. Barkar, Arnest (1976): Principle of Social and Political Theory; Oxford University, Press.

४२. भोळे भा. ल./बेडकिहाळ किशोर, (संपा) (२००३) : बदलता महाराष्ट्र– साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा डॉ. एन. डी. पाटील गौरव ग्रंथ, डॉ. आंबेडकर अकादमी, सातारा.

४३. जगझाप हर्ष : आंबेडकरवाद आणि बहुजनवाद, लेख समाज प्रबोधन पत्रिका. १९९५

४४. सुखदेव : काशीरामजी का बहुजनवाद, सोमाना प्रकाशन, नागपूर, ९ ऑक्टोंबर २०१०

४५. सुमंत यशवंत (संपा.) : बहुजनवादी राजकारण, लेख शतकांतराच्या वळणावर भोळे, बेडकीहाळ, आंबेडकर अकादमी, सातारा, २००६

४६. सुमंत यशवंत : विचारसरणीच्या विश्वात, युनिक अॅकॅडमी पब्लिकेशन्स, पूणे, २०१८

# प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती

## प्रस्तावना

वर्तमान बहुजन राजकारण हे राज्यशास्त्राचा एक महत्त्वाचा विषय म्हणून गणलेला आहे. त्याचप्रमाणे तो सामाजिक व्यवहाराचाही नित्याचा शब्द बनलेला आहे. भारतातील मागासलेल्या परंतु बहुसंख्याक असलेल्या जातीसमूहाच्या उत्थानासाठी बहुजन राजकारण महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. ब्रिटीश राजवटीमध्ये भारतीय राजकारणामध्ये अनेक परिवर्तने होत आली. पक्षपद्धती, संसदीय शासनप्रणाली, कायद्याचे राज्य इ. बाबी भारतीय राजकारणामध्ये आल्या. स्वातंत्र्योत्तर काळात संविधानाच्या निर्मितीनंतर मागासलेल्या जातीमध्ये एक प्रकारे गतीमानता आली. नव्या नेतृत्वाच्या निर्मितीबरोबर राजकीय जाणीव जागृती आली.

स्वातंत्र्योत्तर राजकारणाचे सर्वसाधारणपणे डावी विचारसरणी व उजवी विचारसरणी असे भाग पाडल्याचे दिसते. उजव्या विचारसरणीचे लोक हे प्रस्थापित व्यवस्थेच्या बरोबर व व्यवस्थेला पूरक असे कार्य करीत असतात. आधुनिक काळात मुख्यत: भांडवलदारांचे पक्ष म्हणून यांच्याकडे पाहिले जाते. यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष इत्यादी यांचा समावेश होतो. तर डाव्या विचारसरणीमध्ये नाही, रे वर्गाचे मत मांडणारे मुख्यतः कम्युनिस्ट, समाजवादी पक्ष येतात. बहुजन राजकारण हे या चौकटीना भेदते. बहुजन राजकारणाचा मूलाधार चार्वाक, गौतम बुद्ध, छ. शिवाजी महाराज, क्रांती अग्रणी जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, पेरियार रामस्वामी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यवस्था परिवर्तनाचे तत्वज्ञान आहे. बहुजन राजकारणामध्ये मार्क्सच्या नाही रे वर्गाचाही समावेश आहे. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''भारतात कामगारांच्या श्रमाचे वर्गीकरण नाही तर श्रमिकांचे वर्गीकरण होत आले आहे.

प्राचीन भारतामध्ये चार्वाकाची एक विचार परंपरा होती, जी वर्णव्यवस्था, जातव्यवस्था, ईश्वर, कर्मकांड या गोष्टी नाकारत होती. प्राचीन भारतामध्ये वर्णव्यवस्थेमध्ये उच्चस्थानी असलेल्याच लोकाना सर्व सेवा सुविधा विशेषाधिकार मिळत होते. क्षेत्रात त्यांची मक्तेदारी होती. मात्र या उच्चवर्णीयांची संख्या खूपच कमी होती. या उलट संख्येने जास्त असणाऱ्याना सर्वच क्षेत्रात वगळले जात होते. या व्यवस्थेविरुद्ध चार्वाकानी आवाज उठविला व सर्व लोक समान आहेत, सर्वाना समान अधिकार आहेत अशी मांडणी केली.

बहुजन राजकारणातील बहुजन ही संकल्पना चरथ–भिक्कवे चारिकं बहुजन हिताय–बहुजन सुखाय या बुद्धांच्या तत्त्वज्ञानातून उदयास आली. बुद्धांनी लोकांना दुःखातून मुक्त करण्यासाठी आपल्या चिंतनातून जो मार्ग शोधला होता तो जास्तीत–जास्त लोकांपर्यंत पोहचावा, असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी 'बहुजन हिताय – बहुजन सुखाय' असे शब्द वापरले. बुद्धांनी आपल्या बहुजन या शब्दातून कोणत्याही जाती अथवा वर्णाला वगळले नाही. काळाच्या ओघात बहुजन या शब्दाला अनेक अर्थ प्राप्त झाले आहेत व प्रांतनिहाय त्याचे संदर्भही वेगवेगळे आहेत.

छ. शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातील अत्यंत प्रभावी राजे होते. सुरुवातीच्या काळात छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करताना बारा बलुतेदार व अठरा अलुतेदारांना सोबत घेवून स्वराज्याची स्थापना केली. त्या काळातही भारतातील वर्ण व्यवस्थेच्या बाबतीत प्रभू आणि वरिष्ठ असणाऱ्या जातींचाच राज्यकारभारात व प्रशासनात प्रभाव होता. छ. शिवाजी महाराजांनी बारा बलुतेदार अठरा अलुतेदारातील लोकाना त्यांच्या पात्रतेनुसार राज्यकारभारात सामावून घेतले. आपल्या स्वराज्यातील लोकाना ते मावळा असे संबोधित. छ. शिवाजी महाराजांचा राज्यकारभार हा बहुजन असणाऱ्या लोकांच्यासाठी होता.

बहुजन म्हणजे स्त्री, शुद्रातिशुद्र जनसमूह असा अर्थ प्रामुख्याने क्रांतीबा फुले यांनी केला. फुले स्वतः शुद्रातिशुद्र हाच शब्द प्रामुख्याने वापरत. हे खरे असले तरी यात येथील स्त्री, रयत, गोर–गरीब लोक, नागवलेला कुणबी व शेतकरी वर्ग इत्यादींचा समावेश होता.

आधुनिक काळात बहुजन हा शब्दप्रयोग विठ्ठल रामजी शिंदे यांनी उपयोगात आणल्याचे दिसते. त्यांनी बहुजन पक्ष (१९२०) या राजकीय पक्षाची स्थापना केली. त्यांच्या बहुजन पक्षात स्त्रिया, शेतकरी, शिपाई, वाणी, उदणी, दुकानदार, मजूर, अस्पृश्य या आठ वर्गांचा समावेश केलेला होता.

छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन हा शब्द वापरलेला नसला तरी त्यांच्या १९०२ च्या संस्थानाच्या हुकुमात ब्राह्मण, प्रभू, शेणवी सोडून उरलेले सर्व मागासलेले अशी व्याख्या केलेली आहे. म्हणजे त्यांचे ब्राह्मणेत्तर राजकारण बहुजन या संकल्पनेत येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन संकल्पनेचा स्वीकार केला होता. १९३७ साली मुंबई येथे झालेल्या भाषणात त्यांनी श्रमजीवी बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन केलेला

स्वतंत्र मजूर पक्ष जिंवत ठेवावयाचा आहे असे उद्गार काढले होते. त्यांच्या बहुजन संकल्पनेत स्त्री, अस्पृश्य, पददलित, मागासवर्ग, कामगार, शेतमजूर इत्यादींचा समावेश होता.

सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तन व विकासाचे मुख्य साधन असते. भारतामध्ये क्रांती अग्रणी जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, पेरियार रामसामी नायर इत्यादींनी बहुजन समाजामध्ये परिवर्तन व्हावे व जातीची असमानतेची व्यवस्था नष्ट व्हावी, यासाठी प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक चळवळीवर आधारित 'स्वतंत्र मजूर पक्ष' (१९३६), शेड्यल्ड कास्ट फेडरेशन (१९४२) व प्रस्थावित आर. पी. आय. (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, १९५७) या राजकीय पक्षांद्वारे करण्याचा प्रयत्न केला. म्हणजेच राजकीय चळवळीद्वारे राजकीय सत्ता व त्याद्वारे समाजपरिवर्तन हे महत्त्वाचे तत्त्व राहिले आहे. आंबेडकरोत्तर काळात अशा प्रकारच्या सामाजिक चळवळीद्वारे बहुजन समाजाला राजकीय भान देण्याचे प्रयत्न झालेले दिसतात. यामध्ये महाराष्ट्रात आर. पी. आय. (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया), भारिप बहुजन महासंघ (१९९३), उत्तर भारतात लोकजनशक्ती तर दक्षिणेकडे पूर्वीची जस्टीस पार्टी (१९१७) आणि त्यामधून निर्माण झालेले द्रविड मुनेत्र कळघम इ. प्रयत्न केलेले दिसतात.

काशीराम यांनी 'बामसेफ' आणि 'डीएस ४' या संघटनाद्वारे बहुजन समाजात राजकीय भान आणण्याचा प्रयत्न केला व या राजकीय भानाला १९८४ साली 'बहुजन समाज पक्ष' या राजकीय शक्तीमध्ये रूपांतरित केले आणि अवघ्या १० वर्षात उत्तरप्रदेश सारख्या मोठ्या घटकराज्यात स्वतःच्या नेतृत्वाखाली सत्ता आणून आपल्या सरकारचे धोरण सम्राट अशोकाच्या धर्मनिरपेक्ष व समतावादी धोरणाप्रमाणे ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याचे प्रतिबिंब 'मेरे सपनों का भारत सम्राट अशोक का भारत' या नाऱ्यात दिसते. उत्तरप्रदेशात सत्ता आणून प्रस्थापित वर्गाच्या व्यवस्थेला हादरे देवून बहुजन राजकारणाचा दबाव भारतीय राजकारणात निर्माण केला. काशीरामांनी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी अविवाहित राहून संपत्तीचा त्याग केला.

प्रकाश आंबेडकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील व्यवस्था परिवर्तनासाठी रिपब्लिकन पक्षाप्रमाणे काम करण्यासाठी १९८० साली भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली व नंतर १९९३ मध्ये बहुजन महासंघ निर्माण करून महाराष्ट्रातील बहुजन समाजामध्ये राजकीय जागृती आणण्याचा प्रयत्न केला. ज्या बहुजनाना राजकीय प्रतिनिधित्व मिळाले नाही, त्यांना ते मिळावे. यासाठी त्यांनी प्रयत्न केले त्यासाठी अकोला जिल्हा सामाजिक

अभियांत्रिकीची प्रयोगशाळा बनवून, यशस्वी प्रयोग केला महाराष्ट्रात तो अकोला पॅटर्न नावाने ओळखला जातो. डॉ. आंबेडकरांना या देशामध्ये सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करावयाची होती. त्याला अनुसरूनच त्यांनी लोकशाहीची संकल्पना स्पष्ट केली. ज्या शासन पद्धतीत लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात क्रांतीकारक स्थित्यंतरे रक्तपाताशिवाय घडवून आणण्यात येतात ती लोकशाही. म्हणजे व्यवस्था परिवर्तनासाठी लोकशाही प्रत्यक्षात आणण्याचा काशीरामांनी व प्रकाश आंबेडकरांनी प्रयत्न केला. वर्तमान बहुजन राजकारणामध्ये त्यांनी निर्माण केलेल्या राजकीय कार्याची प्रचिती स्पष्टपणे जाणवत आहे. म्हणून काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाचे विश्लेषण होणे गरजेचे आहे.

**समस्या सूत्रण**

भारतीय राजकारणाला दीर्घ परंपरा आहे. भारतीय भूमीत राजे हे जसे वंशपरंपरेने झाले तसेच ते स्वकर्तृत्वानेही झाले. गणराज्य पद्धतीत राजेशाही दिसत असली तरी ते एक अविकसित असे लोकशाहीचे रूप होते. तक्षशिला, नालंदा, वल्लभी, विक्रमशिक्षा इ. विद्यापीठात प्राचीन काळात राजकीय शिक्षण दिल्याचे संदर्भ दिसतात. चंद्रगुप्त मौर्य व चाणक्य ही त्याची उत्तम उदाहरणे होते. स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणाच्या संकल्पना बदलत गेल्या तसेच राजकीय नेतृत्वाच्या संकल्पनाही बदलल्या. आता राजकीय नेतृत्व हे परिवर्तन सुधारणा राजकीय मुक्ती यासंदर्भात विकसित होवू लागले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मतदार व मतदानाचे प्रमाण हे राजकीय नेतृत्वासाठी विशेष महत्त्वाचे बनले. राजकीय नेतृत्व त्यांना प्रभावीत करण्यासाठी प्रयत्नशील राहिले. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील राजकारणावर गांधी कुटुंबियांचा प्रभाव पडल्याचे स्पष्टपणे दिसते. याशिवाय व्ही. पी. सिंग, चंद्रशेखर, देवेगौडा, इंदरकुमार गुजराल, अटलबिहारी वाजपेयी, मनमोहनसिंग, ज्योती बसू यांच्या नेतृत्वाचा विशेष उल्लेख करता येईल.

आंबेडकरोत्तर काळात बहुजन राजकारणातील सर्वात प्रगल्भ नेतृत्व म्हणून काशीराम व प्रकाश आंबेडकर यांचा उल्लेख करता येईल. काशीराम यांनी स्वतःच्या संशोधकांच्या उच्चपदस्थ नोकरीचा त्याग करून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य बहुजनाच्या कल्याणासाठी समर्पित केले. त्यांनी जीवनात अनेक गोष्टींचा त्याग केला. त्यातील मुख्य सूत्रे पुढीलप्रमाणे –

१. घराचा त्याग केला. कुटुंबाची जबाबदारी नाकारली.

२. नातेवाईकांबरोबर नातेसंबंध तोडून टाकले.

३. अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा केली.

४. कोणत्याही सामाजिक सुखाच्या व दुःखाच्या कार्यक्रमात सहभागी न होण्याचे ठरविले.

५. नोकरी सोडून दिली.

६. डॉ. आंबेडकरांचे समताधिष्ठित समाजनिर्मितीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याचे ठरविले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू असणाऱ्या प्रकाश आंबेडकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शोषणमुक्त समाज निर्माण करण्याचे व बहुजनांना सत्तेत वाटा देण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अनेक राजकीय अमिषांचा त्याग करून महाराष्ट्रात बहुजनांना राजकीय आत्मभान निर्माण केले.

प्रस्तुत संशोधकाला ही बाब मुख्य राजकारणातील व मुख्य राजकीय नेतृत्वापेक्षा स्वतंत्र व प्रभावी वाटली. शिवाय ग्रीक राजकीय विचारवंत प्लेटोने आदर्श राजा/तत्वज्ञ राज्यकर्त्यांची जी मांडणी केली. त्या मांडणीवर काशीराम खरे उतरताना दिसतात, तर जे. एस. मिल यांचे अधिकतम लोकांचे अधिकतम सुख हे तत्व प्रकाश आंबेडकरांच्या राजकारणात दिसते. म्हणूनच हा विषय संशोधनासाठी उपयुक्त वाटतो.

स्वातंत्र्योत्तर काळात क्रांतीबा जोतिबा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झालेला वर्ग वेगवेगळे प्रयत्न करीत होता. त्यामध्ये रामदास आठवले, रा. सु. गवई, जोगेंद्र कवाडे, प्रकाश आंबेडकर, डॉ. अरूण कांबळे यांनी महाराष्ट्रातील आर. पी. आय., बहुजन महासंघ व दलित पँथरद्वारे बहुजन राजकारण केले. तर दक्षिणेत पेरियार रामसामी नायर यांच्या अब्राह्मणी चळवळीच्या प्रभावातून डी. एम. के. चे राजकारण प्रभावी दिसते. त्यामध्ये अण्णादुराई, करूणानिधी यांचा विशेष उल्लेख करता येईल. १९९० च्या दशकात मंडल केंद्रित राजकारणाने बहुजन राजकारण चर्चेचे केंद्रबिंदू बनले. यामध्ये लालूप्रसाद यादव, मुलायमसिंह यादव, शरद यादव, रामविलास पासवान इत्यादींचा विशेष उल्लेख करता येईल. पण या सर्वांचा उद्देश व्यवस्था परिवर्तन करून बहुजन समाजामध्ये आत्मभान निर्माण करणे व त्यांना राजकीय सत्ता मिळविण्यासाठी तयार करणे. हा नसल्याचे दिसून येते. याउलट काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी याच दिशेने आपले बहुजन राजकारण केले व व्यवस्था परिवर्तनासाठी बहुजनांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना व्यवस्था परिवर्तनासाठी प्रशिक्षित केले व बहुजन

समाजाला वेगवेगळ्या राजकीय सत्तास्थानापर्यंत पोहचविले. भारतीय राजकारणात म. फुले, छ. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने सत्ता प्राप्त करता येऊ शकते. हा आत्मविश्वास निर्माण केला. प्राचीन काळापासून व्यवस्था परितर्वनासाठी वेगवेगळ्या राजकीय व सामाजिक नेत्यांनी बहुजन राजकारणासाठी जो मार्ग घालून दिलेला होता. त्या मार्गांपासून तत्कालिन बहुजन राजकारण करणारे नेते बाजूला गेले. त्यामुळे बहुजन समाज हा सर्व प्रकारच्या सत्तेपासून वंचित राहिला. त्या राजकारणाला पुन्हा महापुरुषांच्या विचारानुसार मार्गस्थ करण्यासाठी आणि भारतीय राजकारणात बहुजन राजकारणाची जी पोकळी निर्माण झाली होती. ती भरून काढण्याचा या दोघांनी प्रयत्न केला. पण त्यांच्या या प्रयत्नांच्या अनुषंगाने त्यांच्या बहुजन राजकारणाचा अभ्यास केला नव्हता ही संशोधकाला मोठी समस्या वाटली.

या सर्वांशी तुलना करता काशीरामांचे व प्रकाश आंबेडकरांचे नेतृत्व हे केडरबेस व आत्मसमर्पित वाटते. तसेच बहुजनेत्तर राजकीय नेतृत्वाची काशीरामांशी व प्रकाश आंबेडकरांशी तुलना करता बहुजनामध्ये राजकीय जाणीव जागृती निर्माण करण्याच्यादृष्टीने आणि व्यवस्थापरिवर्तनाच्यादृष्टीने दोघांची भूमिका समानतेकडे जाताना दिसते ही बाब संशोधनासाठी विषय निवडताना उपयुक्त वाटली. याशिवाय बहुजन राजकारणात स्वातंत्र्योत्तर काळात आलेली गतिमानता, त्याचे विविध पैलू, त्यांची सकारात्मकता, नकारात्मकता यादृष्टीने समाधानकारक संशोधन दृष्टीपथास नाही, म्हणून प्रस्तुत संशोधकाने काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास हा विषय निवडला आहे.

**संशोधन विषयाचे महत्व**

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये वेगवेगळ्या हितसंबंधाचे रक्षण करणारे वेगवेगळे गट निर्माण झाले. त्याचे वर्गीकरण दोन प्रवाहात करता येईल. पहिला व्यवस्थावादी प्रवाह जो आहे तीच व्यवस्था योग्य आहे. तिच्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही. सर्व गटांचे हितसंबंध आणि विकास याच व्यवस्थेत साधला जावू शकतो असे प्रतिपादन करतो, त्यामध्ये उजवे, हिंदुत्ववादी असे गट येतात. तर दुसरा प्रवाह हा व्यवस्था विरोधकांचा आहे. या व्यवस्थेची सर्व सूत्रे प्रस्थापित समाजाकडे आहेत. त्यामुळे देशातील दलित शोषित मागासवर्ग हा सर्व प्रकारच्या विकासापासून उपेक्षित राहिलेला आहे. त्यासाठी राजकीय सत्तेवर असणारी व्यवस्थावादी लोकांची मक्तेदारी नष्ट करून राजकीय सत्तेवर दलित, शोषित, मागासवर्ग यांना योग्य व पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले

पाहिजे. तरच समाजात सामाजिक, आर्थिक न्याय प्रस्थापित होईल. भारतात चार्वाक, गौतम बुद्ध, कबीर, भगवान महावीर, गुरूनानक, संत रविदास, संत तुकाराम, बसवेश्वर, छ. शिवाजी महाराज, क्रांतीअग्रणी जोतिबा फुले, छ. शाहू महाराज, पेरियार रामसामी नायर, नारायण गुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आण्णाभाऊ साठे इत्यादीनी बहुजन समाज केंद्रीत समाजकारण व राजकारण केले. स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मताच्या अधिकाराद्वारे बहुजन समाजाला व्यवस्थापरिवर्तनाचे साधन दिले. बहुजन समाजाला संदेश दिला की, राजकीय सत्ता ही अशी चावी आहे, जिने कोणतेही बंद कुलुप काढता येते. कृतीद्वारे बहुजन केंद्रीत राजकारण केले. छ. शाहू महाराजांनीही आपल्या कृतीद्वारे राजकीय सत्तेचा वापर करून बहुजनांच्या उत्थानाचे कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात बहुजन समाज केंद्रीत राजकारणाची गती कमी झालेली होती. तरीही बहुजन समाज केंद्रीत राजकारणाला भारतात दक्षिणेतील पेरियार रामस्वामी यांच्या विचारधारेवर आधारीत डी. एम. के. द्रविड़ मुनेत्र कळघमने तर उत्तर भारतात जनता दल व त्यांच्या समविचारी पक्षांनी अस्तित्वात ठेवले यांनी म. जोतिबा फुले, छ.शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाबरोबर लोहियांच्या तत्वज्ञानाला अनुसरून राजकीय भूमिका मांडली. यामध्ये व्ही. पी. सिंग, इंदरकुमार गुजराल, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंह यादव, शरद यादव, नितीशकुमार, देवेगौडा, रामविलास पासवान इत्यादींचा विशेष उल्लेख करता येईल .

काशीराम व प्रकाश आंबेडकरांच्या राजकीय पटलावरील उदयाच्या पूर्वी भारतातील बहुजन समाजाच्या चळवळी या प्रस्थापित राजकीय पक्षांच्या आश्रयाने चालविल्या जात होत्या. त्यांचे अस्तित्व हे प्रस्थापित पक्षांच्या इच्छेवरती अवलंबून होते. त्यामुळे या चळवळी प्रस्थापित व्यवस्थेला विरोध करून आमूलाग्र सामाजिक, राजकीय, आर्थिक बदल घडवून आणू शकत नव्हत्या. अशा पार्श्वभूमीवर काशीराम व प्रकाश आंबेडकर यांचा राजकीय उदय महत्त्वाचा वाटतो. पंजाबमध्ये १५ मार्च १९३४ रोजी रामदासिया या जाती जन्मलेल्या व बी.एस्सी. झालेल्या काशीरामांच्या सामाजिक व राजकीय उदयाला पुण्यातील सैन्यातील संशोधकाची नोकरी कारणीभूत ठरली. इथे त्यांच्यावर ज्या पुस्तकांचा प्रभाव पडला, त्यामध्ये एनहिलेशन ऑफ कास्ट आणि द बुद्ध ॲण्ड हिज धम्मा ही महत्त्वाची पुस्तके होती. शिवाय गौतम बुद्ध, जोतिबा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचाही प्रभाव पडला.

प्रकाश आंबेडकर याना तर आंबेडकर घराण्याचा न्याय, स्वातंत्र्य, समता बंधुता या तत्वांचा राजकीय वारसा लहानपनापासून मिळाला आहे. क्रांतिबा फुलेंनी आरक्षण धोरणाचा पुरस्कार केला. तर छ. शाहू महाराजांनी आरक्षणाचे धोरण प्रत्यक्ष अंमलात आणले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या धोरणाला घटनात्मक दर्जा दिला. पण बहुजन समाजाला याचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे बहुजन समाज विदारक स्थितीत आहे. या समाजाला उन्नत करायचे असेल तर विविध जातीत विभागलेल्या या समाजाला एकत्र करण्याची गरज वाटू लागली. काशीरामाना महाराष्ट्रातील बहुजन केंद्रीत चळवळी करणाऱ्या आर. पी. आय. सारख्या पक्षांना एकत्र करून त्याद्वारे बहुजन समाजामध्ये राजकीय भान निर्माण करता येईल, असे वाटत होते. पण आर.पी.आय.मधील नेतृत्वाच्या धोरणामुळे त्यांना ते अशक्य झाले. परिणामी उत्तरप्रदेशमध्ये त्यांनी सामाजिक चळवळीतून जागृती केली. त्यासाठी पहिल्यांदा त्यांनी पे बॅक टू सोसायटी या तत्वावर आधारित बामसेफ (दि ऑल इंडिया बॅकवर्ड एस.सी.एस.टी. ओबीसी ॲंड मायनॉरिटी कम्युनिटिज एम्प्लॉईज फेडरेशन,१९७८) या कर्मचाऱ्यांच्या संघटनेची स्थापना केल्यानंतर त्यांनी डीएस ४ (दलित, शोषित समाज संघर्ष समिती,१९८१) बुद्धीस्ट रिसर्च फौंडेशन या संघटनांचीही निर्मिती केली व त्याद्वारे शेटजी भटजी विरूद्ध क्षूद्र, अतिशूद्र हे फुलेंचे तत्वज्ञान, छ. शाहू महाराजांचे ब्राह्मण विरूद्ध ब्राह्मणेतर आणि सवर्ण विरूद्ध पददलित अस्पृश्य मागास वर्ग हे आंबेडकरांचे तत्त्वज्ञान १५ विरूद्ध ८५ च्या म्हणजेच उच्चवर्णीय विरुद्ध बहुजन या स्वरूपात मांडले. डीएस ४ च्या एका नाऱ्यात हे तत्वज्ञान स्पष्ट दिसते. ब्राह्मण बनिया और ठाकूर बाकी सब डी. एस. ४. (१९८४). बहुजन समाज पक्षाची स्थापना झाल्यानंतर बहुजन राजकारणाला नवे आयाम मिळाले.

प्रकाश आंबेडकर हे स्वत: व्यवसायाने वकील आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात निर्माण झालेल्या रिपब्लिकन पक्षात गटबाजी, स्वार्थ निर्माण झाला. परिणामी या पक्षाचे नंतरच्या काळात अनेक तुकडे झाले व तो एका जातीपुरता मर्यादित राहिला. या काळात भारतात नवी राजकीय समीकरणे निर्माण होत होती. अशावेळी दलित, दलितांतर्गत जातीना व इतर मागासवर्गीय जातींना राजकीय प्रवाहात आणण्यासाठी भारतीय रिपब्लिकन पक्ष (१९८०) स्थापन केला. त्यानंतर इतर मागासवर्गीयांना सामावून घेणेसाठी बहुजन महासंघ (१९९४) स्थापन केला. त्यांच्या बहुजनाच्या संकल्पनेमध्ये जे राजकीय सहभागापासून बाजूला आहेत, त्या सर्वांचा समावेश

होतो. बहुजन राजकारण आता आत्मसन्मानाचे राजकारण बनले आहे. बहुजन राजकारणाचे मुख्य ध्येय हे जातीव्यवस्थेची विषमतावादी व्यवस्था मोडित काढून समताधिष्ठित समाजाची निर्मिती करणे, म्हणजेच समाजव्यवस्था परिवर्तन हे बनले व त्यामध्ये अनेक शिखरे पार केली. समाजकार्यासाठी अविवाहित राहिलेल्या काशीरामांनी बहुजन राजकारणाला या उंचीवर नेऊन ठेवण्यासाठी आपले संपूर्ण जीवन खर्ची घातले. तसेच प्रकाश आंबेडकरांनी महाराष्ट्रात बहुजन राजकारणाला नवीन आयाम दिले. या दोघांनी फुले, शाहू, आंबेडकर यांच्या तत्वज्ञानावर व कृतीवर आधारीत भारताचे राजकारण बहुजन केंद्रीत बनविले. डॉ. आंबेडकरांच्यानंतर बहुजन राजकारणाची सूत्रबद्ध मांडणी करून त्याला सैद्धांतिक बैठक दिली. भारतातील प्रस्थापित व्यवस्थेचे बळी असणाऱ्या जातींना एकत्र आणून जातीनिर्मूलनासाठी त्यांच्यात समतेची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि बहुजन राजकारणाला स्वयंनिर्भर बनविले.

'बहुजन समाज पक्ष' व बहुजन महासंघ, वंचित बहुजन आघाडी या पक्षाची स्थापना झाल्यापासून भारतीय, महाराष्ट्रातील राजकारणाला बहुजन राजकारणाचे वळण लागले. स्वातंत्र्यानंतर भारतात एखादा दुसरा अपवाद वगळता काँग्रेस या एकाच पक्षाची सत्ता होती. इतर सर्व पक्ष फक्त आपले अस्तित्व टिकवून होते. बहुजन समाज उत्थानाचे प्रयत्न करणारे आर. पी. आय. सारखे पक्ष या काँग्रेस पक्षाशी हातमिळवणी करून राजकारण करत होते. परिणामी या पक्षांची स्वतःची व्होट बँक नव्हती. त्यांना त्याची गरजही वाटत नव्हती. १९९० च्या दशकात मंडल आयोगाच्या अंमलबजावणीपासून भारताच्या राजकारणाला बहुजन राजकारणाची किनार लाभली. भारतीय राजकारणातील महत्त्वाचे राष्ट्रीय पक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय), भारतीय जनता पक्ष, मार्क्सवादी पक्ष इत्यादीं पक्षांची व्होट बँक कमी झालेली आहे. अशा परिस्थितीत बी.एस.पी.ची व्होट बँक सातत्याने वाढताना दिसते. सद्य:स्थितीत सर्वच राष्ट्रीय पक्ष राजकारणात आघाड्या करून निवडणूक लढविताना दिसतात. अशावेळी त्यांची व्होट बँक निश्चित किती? असा प्रश्न उपस्थित होतो. बहुजन समाज पार्टी संपूर्ण देशामध्ये स्वबळावरती निवडणुका लढवत असल्याचे दिसते. त्यामुळे बहुजन समाज पक्षाची निश्चित व्होट बँक किती हे दिसून येते आणि या व्होट बँकेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसते. या पाठीमागे काशीरामांचे सत्तेचे राजकारण आहे. बहुजन समाजाच्या हाती सत्ता येण्यासाठी त्यांनी विचारधारेशी विसंगत असणाऱ्या पक्षाशी यशस्वी तडजोड केली. त्यामुळे त्यांच्या या राजकारणावर संधीसाधूपणाचे राजकारण म्हणून टिका झाली.

तरी काशीरामांनी त्याचे समर्थन केले. याचे कारण राजकारण म्हणजे सत्तेसाठी सहकार्य आणि संघर्ष हेच होते. वर्तमानकाळात उत्तरप्रदेश प्रमाणेच राजस्थान, पंजाब, हरियाणा, तामिळनाडू, उत्तरांचल, मध्यप्रदेश इ. घटकराज्यात लोकप्रतिनिधी निवडून आणून राजकीय दबाव निर्माण केला. त्यामुळेच मार्क्सवादी पक्षाला मागे टाकून बसपाने भारतीय राजकारणात तिसऱ्या क्रमांकाचे स्थान पटकावले आहे. भारतीय राजकारणात आघाड्यांची सरकारे सत्तेवर आहेत. याचे कारण बहुजन समाज पक्षाचा वाढता प्रभाव, काशीराम म्हणायचे, 'आम्हाला मजबूत नव्हे मजबूर सरकार पाहिजे. यामध्येच बहुजनाचे कल्याण आहे.

महाराष्ट्रामध्ये भारिप बहुजन महासंघ, वंचित बहुजन आघाडी, बहुजनवादी राजकारण करत असला तरी त्याला मर्यादा पडताना दिसतात, कारण महाराष्ट्राचे राजकारण हे जातीवर आधारलेले असलेने या पक्षाकडे येण्याचे लोकांचे प्रमाण कमी दिसते. पण अकोला जिल्हा हा पूर्णपणे या पक्षाच्या प्रभावाखाली आहे, असे असले तरी या पक्षाचा प्रभाव महाराष्ट्रात वाढताना दिसत आहे. कारण या पक्षाचे म्हणणे आहे. बहुजन सारे एक होवू सत्ता आपल्या हाती घेवू, भिक नको सत्तेची सत्ता हवी, हक्काची या स्वाभिमानी राजकारणाचा परिणाम म्हणून आत्तापर्यंत सहा आमदार वेळोवेळी विधानसभेवर निवडून गेले आहेत तसेच काही जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवरती सत्ता आहे. सद्य:स्थितीत भारतातले सर्व राजकीय पक्ष स्थळ, काळ व परिस्थितीनुसार बहुजन राजकारणाचा आधार घेतात. पण त्यांच्या बहुजन राजकारणाचा उद्देश हा व्यवस्था परिवर्तन नसतो. तर राजकीय वर्तुळात प्रवेश करून व्यक्तीगत राजकीय लाभ मिळविणे हे त्यांच्या बहुजन राजकारणाचे अंतिम ध्येय असते. त्यांच्या या धोरण बदलामागे काशीरामांचे व प्रकाश आंबेडकरांचे बहुजन समाज केंद्रीत राजकारण आहे.

काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाचा उद्देश हा म. फुले, छ. शाहूम महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारानुसार व्यवस्था परिवर्तन राहिलेला आहे. भारतामध्ये म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने राजकारण यशस्वी होऊ शकत नाही, ही समाजाची मनोभावना होती, त्याला तडा देऊन याच आधारे बहुजन राजकारण यशस्वी होऊ शकते, हे त्यांनी कृतीद्वारे दाखवून दिले. त्यासाठी त्यांनी बहुजन राजकारणाची शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून त्यांची अंमलबजावणी केली. त्यामुळे बहुजन राजकारणाने भारतीय राजकारणात प्रभाव निर्माण केलेला आहे. सद्याचे भारताचे राजकारण

पाहिले असता ज्या जाती अल्पसंख्य पण समाजव्यवस्थेत ज्यांना उच्चस्थान व प्रभु आहेत. त्यांचाच राजकारणावरती प्रभाव आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, ज्या जाती कनिष्ठ आहेत पण संख्येने जास्त आहेत त्या आजही सर्व क्षेत्रात मागे राहिल्या आहेत. या मागास राहिलेल्या जातींची प्रगती व्हावी, देशाच्या उत्पन्नात त्यांचा असणारा वाटा त्यांना मिळावा, यासाठी त्यांनी राजकीय सत्ता स्वबळाने हातात घेणे गरजेचे आहे. त्याचे मार्गदर्शन काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या बहुजन राजकारणाच्या तत्त्वज्ञानातून दिले आहेत. या तत्त्वज्ञानानुसार व्यवस्थेच्या बळी असणाऱ्या जातींनी राजकीय वाटचाल केली तर निश्चितपणे त्या राजकीय सत्तेपर्यंत पोहोचून त्यांचा विकास होणार आहे. ही गोष्ट विकसित भारताच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची आहे. हे या संशोधन विषयाचे महत्त्व आहे.

**संशोधनाची व्याप्ती**

''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास'' या संशोधन विषयाच्या अभ्यासात काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या व्यवस्था परितर्वनासाठी बहुजन राजकारणाच्या मांडणीचा संशोधनपर अभ्यास केला आहे. भारतामध्ये काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी राजकारण आणि समाजकारणात दिलेल्या योगदानाचा आणि विचारांचा, त्यांनी बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी त्यांनी केलेल्या सामाजिक चळवळी. त्यासाठी त्यांनी निर्माण केलेल्या सामाजिक आणि राजकीय संघटनांचा जसे कि, पे बॅक टू सोसायटी या तत्वावर आधारित बामसेफ (दि ऑल इंडिया बॅकवर्ड एस. सी. एस. टी. ओबीसी ॲंड मायनॉरिटी कम्युनिटिज एम्प्लॉईज फेडरेशन,१९७८) या कर्मचाऱ्यांच्या संघटनेची स्थापना केल्यानंतर त्यांनी डीएस ४ (दलित, शोषित समाज संघर्ष समिती, १९८१) या संघटनांचीही निर्मिती केली व त्याद्वारे शेटजी भटजी विरूद्ध क्षूद्र, अतिशूद्र हे फुलेंचे तत्वज्ञान, छ. शाहू महाराजांचे ब्राह्मण विरूद्ध ब्राह्मणेतर आणि सवर्ण विरूद्ध पद्दलित अस्पृश्य मागासवर्ग हे आंबेडकरांचे तत्त्वज्ञान १५ विरूद्ध ८५ च्या म्हणजेच उच्चवर्णीय विरुद्ध बहुजन या स्वरूपात मांडले. त्यांनी बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी केडर कॅम्प चे आयोजन करून बहुजन समाजाला प्रशिक्षित केले व त्याद्वारे त्यांनी बहुजन समाजाला व्यवस्था परिवर्तनासाठी तयार केले. त्यानंतर त्यांनी विविध सामाजिक राजकीय क्षेत्रातील विषयाबाबत आंदोलने केली. पर्यायाने येणाऱ्या निवडणुकाही व्यवस्था परिवर्तनाच्या उद्देशाने लढविल्या. पण राजकीय सत्ता मिळविणे हा

त्यांचा अंतिम उद्देश नव्हता. तर बहुजनांना सत्तेच्या वर्तुळात प्रवेश देवून व्यवस्था परितर्वन करणे हा होता. या सर्व बाबींचा अभ्यास प्रस्तुत संशोधन प्रबंधामध्ये केलेला आहे.

बहुजन समाज पक्षाची (१९८४) स्थापना झाल्यानंतर बहुजन राजकारणाला त्यांनी दिलेले नवे आयाम यांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकाश आंबेडकर हे स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू व व्यवसायाने वकील आहेत. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यवस्था परिवर्तनाच्या चळवळीचा वारसा लाभलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात निर्माण झालेल्या रिपब्लिकन पक्षात गटबाजी, स्वार्थ निर्माण झाला. परिणामी या पक्षाचे नंतरच्या काळात अनेक तुकडे झाले व तो एका जातीपुरता मर्यादित राहिला. या काळात भारतात नवी राजकीय समीकरणे निर्माण होत होती. अशावेळी दलित, दलितांतर्गत जातींना व इतर मागासवर्गीय जातीना राजकीय प्रवाहात आणण्यासाठी भारतीय रिपब्लिकन पक्ष (१९८०) स्थापन केला. त्यानंतर इतर मागासवर्गीयांना सामावून घेणेसाठी बहुजन महासंघ (१९९४) स्थापन केला. नंतर वंचित बहुजन आघाडी (२०१७) स्थापन केली. याद्वारे जे राजकीय सहभागापासून व व्यवस्थेच्या लाभापासून दूर आहेत. त्या सर्वांना आत्मसन्मानाचे प्रतिनिधित्व मिळावे, विषमतावादी व्यवस्था मोडित काढून समताधिष्ठित समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी त्यांनी केलेल्या सामाजिक, राजकीय प्रयत्न यापुरते हे संशोधन मर्यादित आहे.

**संशोधनाची मर्यादा**

''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास'' या संशोधन प्रबंधात त्यांच्या बहुजन राजकारणाचा अभ्यास केलेला आहे. भारतामध्ये प्राचीन काळापासून वर्ण व्यवस्था व जातीव्यवस्थेचे बळी ठरलेल्या लोकांची संख्या जास्त आहे. ज्याना बहुजन म्हटले जाते त्यांच्या उद्धारासाठी, त्याना सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रतिनिधित्व मिळावे यासाठी इतिहासात अनेक लोकांनी प्रयत्न सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवर प्रयत्न केलेचे दिसून येते. आधुनिक भारतातही स्वातंत्र्यानंतर विशेषतः मंडल आयोगाच्या अंमलबजावणीपासून या बहुजन समाजाला राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, म्हणून अनेकजण सातत्याने बहुजनवादी राजकारण प्रयत्न करताना दिसतात. या सर्वांच्या बहुजन राजकारणातील योगदानाचा अभ्यास करणे, हे अत्यंत व्यापक क्षेत्र असल्याने काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारणापुरती अभ्यासाची मर्यादा निश्चित केलेली आहे. या अभ्यासामध्ये

काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था व राजकीय व्यवस्थेमध्ये बहुजन समाजाला प्रतिनिधित्व मिळावे, विषमता नष्ट व्हावी, न्याय स्वातंत्र्य समता व बंधुता या लोकशाही मूल्यावर भारतीय समाजव्यवस्था निर्माण होवून व्यवस्था परिवर्तन व्हावे, यासाठी वेगवेगळ्या सामाजिक संघटनामार्फत व राजकीय पक्ष, संघटनामार्फत ज्या सामाजिक चळवळी व बहुजनवादी राजकारण केले त्याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. स्वातंत्र्योत्तर भारतातील बहुजन राजकारणाचा अभ्यास करणे.

२. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारणातील बहुजन राजकारणाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

३. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या व्यक्तिगत जडण–घडण व विचारसरणीचा अभ्यास करणे.

४. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या राजकीय विचारावरील प्रभावाचा अभ्यास करणे.

५. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणातील नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

६. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारणातील काशीराम व प्रकाश आंबेडकर नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके**

१. स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकारणावर बहुजन राजकारणाचा प्रभाव आहे.

२. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या व्यक्तीमत्व व विचारसरणीवर समताधिष्ठित विचारांचा विशेषतः फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारसरणीचा प्रभाव आहे.

३. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारतीय शासन हे स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वावर आधारित आहे.

४. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाने स्वातंत्र्योत्तर काळात बहुजन राजकारणाला बहुआयामी व स्वयंनिर्भर बनविले.

५. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारणावर काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाने प्रभाव निर्माण केला.

**संशोधन पद्धती**

कोणत्याही सामाजिक संशोधनात संशोधन आराखडा अतिशय महत्वाचा भाग असतो. संशोधन आराखड्याशिवाय संशोधन पूर्ण होवू शकत नाही. नाहीतर संशोधन दिशाहीन होण्याची शक्यताच जास्त असते. या संशोधनासाठी संशोधकांनी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केला आहे. ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचाही उपयोग करण्यात आलेला आहे. शिवाय म. जोतिबा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबााहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या आधारे प्रस्तुत शोध समस्येचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संशोधन आराखडा**

कोणत्याही सामाजिक संशोधनात संशोधन आराखडा अतिशय महत्त्वाचा भाग असतो. संशोधन आराखड्याशिवाय संशोधन पूर्ण होऊ शकत नाही. नाहीतर संशोधन दिशाहिन होण्याची शक्यता जास्त असते. संशोधन आराखड्याचे विविध प्रकार पडतात. प्रस्तुत संशोधन समस्येसाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा स्वीकारून संशोधन केलेले आहे. वर्णनात्मक संशोधन आराखड्यात एखादी व्यक्ती, समाज, घटना, विषय किंवा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन करणे हा मुख्य उद्देश असतो. वर्णनात्मक विवेचन वैज्ञानिक राहण्यासाठी त्याविषयाच्या संबंधात यथार्थ आणि संपूर्ण माहिती मिळविणे आवश्यक असते. म्हणजे वास्तविक आणि विश्वसनीय तथ्ये मिळविणे आवश्यक असते. त्यानुसार संशोधन समस्येविषयी संशोधन करत असताना विश्वसनीय तथ्ये मिळवून संशोधन करण्यात आले आहे.

वर्णनात्मक संशोधनात संशोधन समस्येसंबंधी सद्यःस्थितीचे वर्णन व अर्थनिर्वचन केले आहे. सद्यःस्थितीत कोणती स्थिती किंवा संबंध अस्तित्वात आहेत, मते आहेत, कोणती प्रक्रिया चालू आहे, कोणते परिणाम तसेच कोणते संबंध दिसून येतात, कोणत्या प्रवृत्ती आहेत. याचा विचार केलेला आहे. वर्णनात्मक संशोधन आराखड्यानुसार प्रथम संशोधन उद्दिष्टांशी निगडीत, समस्येची निश्चिती, संशोधन परिकल्पना मांडणी, गृहितकांची निर्मिती, संशोधन पद्धतीची निवड, माहिती संकलन साधनांची निवड, माहितीचे विश्लेषण, साधनांची निवड, निष्कर्ष आणि शिफारशी अशा क्रमांने संशोधनकार्य पूर्ण केले आहे.

**संशोधन तथ्य संकलनाची पद्धती**

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाचे विशेष महत्त्व आहे. घटनेचा कारण प्रभाव जाणून घेणे, आणि निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी तथ्यांची आवश्यकता असते. तथ्य हा असा मार्ग आहे

की, ज्याच्या साहाय्याने संशोधनाला एक विशिष्ट स्वरूप प्राप्त होते. प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक आहे. तथ्य संकलनाची तंत्रे योग्य नसतील तर संशोधनात वैज्ञानिकता येणार नाही. म्हणून संशोधन उद्दीष्टांना अनुरुप अशी तथ्य संकलनाची तंत्रे निश्चित करणे आवश्यक असते. तथ्य संकलनाच्या तंत्रांची निवड काळजीपूर्वक करावी लागते. संशोधन विषयाशी विसंगत असणारी तथ्ये, आकडे किंवा पुरावे, टाळता यावेत, म्हणून ही निवड आवश्यक असते. संशोधनाचे यश, अपयश हे संशोधन पद्धतीच्या निवडीवरच अवलंबून असते. घटनेचा कारण प्रभाव जाणून घेणे आणि निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी तथ्यांची आवश्यकता असते. प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

प्राथमिक साधनांत काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्वतः लिहिलेले ग्रंथ, त्यांचा वैयक्तिक, कौटुंबिक, राजकीय, सामाजिक पत्रव्यवहार, भाषणे हेही तथ्य संकलनाचे प्राथमिक साधन म्हणून उपयोगात येतील. दुय्यम साधनामध्ये काशीराम, ॲड. प्रकाश आंबेडकर व बहुजन राजकारण यावर आधारीत विविध ग्रंथ, नियतकालिके, शासकीय व अशासकीय अहवाल, शासकीय रेकॉर्ड, वर्तमानपत्रे, शासकीय गॅझेटियर, मासिके, पाक्षिके, वेबसाईट इ. चा अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वरील दोन्ही साधनांचा वापर करून काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण – एक अभ्यास याचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला जाईल.

**संशोधन तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

तथ्यांच्या विश्लेषणामुळे तथ्यांचा अर्थ स्पष्ट होतो. संकलित तथ्यांचे पाठिमागे त्या तथ्यांपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आणि व्यक्त होणारी आणखी एक गोष्ट असते. जर या व्यवस्थित तथ्यांना संपूर्ण तथ्यांशी संबंधित केले. तर त्याचा एक महत्त्वपूर्ण सामान्य अर्थ लक्षात येतो.

काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास या शोधप्रबंधाचा अभ्यास करत असताना काशीराम, ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे चरित्र, त्यांची बहुजनांची संकल्पना, इतिहासातील म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुजन संकल्पना, त्यांचे राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्यांचे तथ्यांचे संकलन केले. तथ्यांमध्ये काही चुका राहू नयेत म्हणून, तथ्यांचे अनुभवांच्याद्वारे संपादन केले. प्राथमिक व दुय्यम तथ्यांची छाननी करताना तथ्यांचा स्त्रोत, तथ्य संकलनाची तंत्रे या बाबी लक्षात घेतल्या व संशोधनाच्या उद्देशाशी अनुकूल व पुरेशी तथ्ये वापरली, संशोधन करत असताना फक्त तथ्ये गोळा करून

चालत नाही तर त्या तथ्यांचे वर्गीकरण करणे सुद्धा महत्त्वाचे असते. यावेळी उपलब्ध तथ्यांचे गुणात्मक आधारावर वर्गीकरण करत असताना काळाचा आधारही घेण्यात आला.

काशीराम व प्रकाश आंबेडकर यांचे बहुजन राजकारण याविषयी ज्या तथ्यांचे गुणात्मक आधारावरती वर्गीकरण केले होते. त्या तथ्यांचा भार तपासून पाहिला व जी तथ्ये अधिक भाराची आहेत. ती बाजूला काढली व या संकलित तथ्यांचा पुन्हा एकदा अभ्यास करून त्यांचे वर्गीकरण केले व जास्त भारांच्या तथ्यांच्या आधारे संकल्पनांची निर्मिती केली. त्यानंतर विभिन्न तथ्यांचे तुलनात्मक विश्लेषण करून त्या आधारे निष्कर्ष काढले.

**प्रकरण नियोजन**

**प्रकरण १ : प्रास्ताविक**

प्राचीन काळापासून भारतीय समाजाचे व राजकारणाचे जात हे एक महत्वाचे प्रतिमान राहिलेले आहे. भारतीय राजकारणाचा विचार केला तर सातत्यानी राजकारणावर व राजकीय सत्तेवर प्रभू जातींचा व वरिष्ठ जातींचा, वर्गाचा प्रभाव राहिलेला आहे. विशेष गोष्ट म्हणजे या जातींची, वर्गांची संख्या मात्र अत्यंत कमी राहिलेली आहे. बहुसंख्य जाती उतरंडीत कनिष्ट समजल्या गेलेल्यांना बहुजन असे म्हटले जाते. त्यामुळे त्यांना राजकारण, अर्थकारण या क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधित्व मिळताना दिसून येत नाही, त्यामुळे दारिद्र्य, उपासमार, मुलभूत गरजांची पूर्तता न होणे अशा समस्या या वर्गात प्रकर्षाने आढळतात. या वर्गावर होणाऱ्या या अन्यायाच्या विरुद्ध प्राचीन काळापासून अनेक लोकांनी प्रयत्न केले. यामध्ये चार्वाक, गौतम बुद्ध, छ. शिवाजी महाराज, म. फुले, छ. शाहू महाराज, पेरियार रामस्वामी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या सामाजिक व बहुजनवादी राजकारणाचा समावेश आहे. या सर्वांचा सविस्तर विचार या प्रकरणामध्ये केलेला आहे.

**प्रकरण २ : संदर्भ साहित्याचा आढावा**

संदर्भ साहित्याचा आढावा या प्रकरणात संशोधन करावयाच्या विषयाशी संबंधित पूर्ण संशोधन साहित्याचा आढावा घेतलेला आहे. यामध्ये डॉ. विवेककुमार बहुजन समाज पार्टी एवं संरचनात्मक परिवर्तन, घनश्याम शहा यांच्या दलितांची अस्मिता आणि राजकारण, अशोक गजभिये यांच्या समाजप्रवर्तक आणि बहुजन उद्धारक मानवतावादी कांशीरांम, सुखदेवे यांच्या आंबेडकरी चळवळीची दिशा काय, विवेककुमार यांच्या, Dalit Leadership in India अशा संदर्भ ग्रंथांचा विस्तृतपणे आढावा घेतलेला आहे. डॉ. स्वाती काळभोर यांनी सावित्रीबाई फुले

पुणे विद्यापीठ पुणे यांना सादर केलेला दलित चळवळीतील मान्य. काशीराम योगदान हा पीएच. डी. चा अप्रकाशित शोधप्रबंध, डॉ. अनिल जगताप यांनी टिळक महाराष्ट्र पुणे यांना सादर केलेला सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास १९७२–२००२, गजानन गजभिये यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ औरंगाबाद याना सादर केलेला भारतीय रिपब्लिकन–पक्ष भारतीय बहुजन महासंघाची भूमिका व त्यांचा महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव हा पीएच.डी.चा अप्रकाशित शोधप्रबंध, अशा एम.फिल., पीएच.डी.च्या एकूण २० प्रबंधांचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण ३ : संशोधन पद्धती**

कोणत्याही सामाजिक संशोधनात संशोधन आराखडा अतिशय महत्वाचा भाग असतो. संशोधन आराखड्याशिवाय संशोधन पूर्ण होवू शकत नाही. नाहीतर संशोधन दिशाहीन होण्याची शक्यताच जास्त असते. या संशोधनासाठी संशोधकांनी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे. शिवाय ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचाही उपयोग करण्यात आलेला आहे व म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या आधारे प्रस्तुत विषयाचा अभ्यास केला आहे. सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाचे विशेष महत्त्व आहे. घटनेचा कारण प्रभाव जाणून घेणे आणि निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी तथ्यांची आवश्यकता असते. तथ्य हा असा मार्ग आहे की ज्याच्या साहाय्याने संशोधनाला एक विशिष्ट स्वरूप प्राप्त होते. या संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

प्राथमिक साधनात काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी स्वतः लिहिलेले ग्रंथ, लेख त्यांचा वैयक्तीक, कौटुंबिक, राजकीय, सामाजिक पत्रव्यवहार, भाषणे हेही तथ्य संकलनाचे प्राथमिक साधन म्हणून उपयोगात आणले आहे. दुय्यम साधनामध्ये काशीराम, प्रकाश आंबेडकर व बहुजन राजकारण यावर आधारीत विविध ग्रंथ, नियतकालिके, शासकीय व अशासकीय अहवाल, शासकीय रेकॉर्ड, वर्तमानपत्रे, शासकीय गॅझेटियर, वेबसाईट इ. चा अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वरील दोन्ही साधनांचा वापर करून ''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास'' या विषयाचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला आहे.

**प्रकरण ४ : काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण**

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्राचीन काळापासून चालत आलेली विषमतावादी समाजव्यवस्था, चातुवर्ण्य जातीव्यवस्था आणि त्यामुळे निर्माण झालेली विषमतावादी व्यवस्था की, जिच्यामुळे समाजव्यवस्थेमध्ये काही मुठभर लोकांच्याच हातात सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक सत्ता राहिली. या सत्तेच्या आधारावर या वर्गाने जो संख्येने जास्त आहे, त्याला या सर्व सत्तापासून वंचित ठेवले. परिणामी त्याची सर्वच क्षेत्रात परवड झाली. या संख्येने बहु असलेल्या वर्गाच्या कल्याणासाठी, त्याला हक्क मिळावेत, यासाठी प्राचीन काळापासून अनेक महापुरुषांनी सामाजिक आर्थिक, राजकीय पातळीवर प्रयत्न केले, याचा आढावा घेणेत आलेला आहे. या प्रयत्नाचाच एक भाग म्हणजे भारतात काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी राजकारण आणि समाजकारणात दिलेल्या योगदानाचा, विचारांचा, तत्त्वज्ञानाचा, त्यांनी बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी केलेल्या सामाजिक, राजकीय चळवळी निर्माण केलेल्या सामाजिक आणि राजकीय संघटना त्याचा भारतीय समाजव्यवस्थेवर व राजकारणावर पडलेला परिणाम, बहुजन राजकारणाला त्यांनी दिलेले नवे आयाम, जे राजकीय सहभागापासून व व्यवस्थेच्या लाभांपासून दूर आहेत. त्या सर्वांना आत्मसन्मानाचे प्रतिनिधित्व मिळावे, विषमतावादी व्यवस्था मोडित काढून समताधिष्ठित समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी म्हणजे व्यवस्था परिवर्तनासाठी त्यांनी केलेल्या सामाजिक, राजकीय प्रयत्नांचा अभ्यास केला आहे.

**प्रकरण ५ : निष्कर्ष आणि शिफारशी**

प्रस्तुत संशोधन प्रकरणामध्ये काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी राजकारण आणि समाजकारणात दिलेल्या योगदानाचा आणि विचारांचा, तत्त्वज्ञानाचा, त्यांनी बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी केलेल्या सामाजिक, राजकीय चळवळी, त्यासाठी त्यांनी निर्माण केलेल्या सामाजिक आणि राजकीय संघटना त्याचा भारतीय समाजव्यवस्थेवर व राजकारणावर पडलेला परिणाम, बहुजन राजकारणाला त्यांनी दिलेले नवे आयाम जे राजकीय सहभागापासून व व्यवस्थेच्या लाभापासून दूर आहेत. त्या सर्वांना आत्मसन्मानाचे प्रतिनिधित्व मिळावे, विषमतावादी व्यवस्था मोडित काढून समताधिष्ठित समाजाची निर्मिती व्हावी यासाठी त्यांनी केलेल्या सामाजिक, राजकीय प्रयत्न याचा सविस्तर अभ्यास करून त्या अनुषंगाने निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहेत. तसेच गृहीतकांची पडताळणी करण्यात आली आहे.

**संदर्भ**


१. वर्मा, आर. पी. : बहुजन नायक मा. काशीराम, कांती पब्लिकेशन, दिल्ली, २०११

२. सुखदेवे, के. ना. : आंबेडकरी चळवळीची दिशा काय? सोनामा प्रकाशन, नागपूर, २०१०

३. धोंडे, भगवान एस. : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन नेतृत्व, कौशल्य प्रकाशन, २००५.

४. गुरव बाबुराव : व्यवस्था परिवर्तनाचा नवा आवाज काशीराम, मूल्य विवेक प्रकाशन, मुंबई, १९९४

५. देशपांडे प्रकाश : संशोधन पद्धती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक १९९४

६. बापट भा. गो. : शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे, १९८६

७. बेहरे सुमन : सामाजिक संशोधन पद्धती, विद्या प्रकाशन, नागपूर, २००४

८. भिंताडे वि. रा. : शैक्षणिक संशोधन पद्धती, नूतन प्रकाशन, पुणे, १९९९

९. सोहनी, शं.कृ. : शैक्षणिक टीपाकोश, हिंदुस्थान प्रकाशन, पुणे, १९९३

१०. घोरमोडे, के. यू. आणि घोरमोडे : कला, शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्व, विद्या प्रकाशन, रूईकर रोड, नागपूर, २००८.

११. जाधव मोहन, भोसले आरती आणि सरपोतदार, प्राची. : भारतीय शिक्षणाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६

१२. बापट, भा. गो. : शैक्षणिक संशोधन. पुणे : नूतन प्रकाशन, १९९८

१३. भिंताडे, वि. रा. : शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नूतन प्रकाशन, १९९९

14. Why is Bahujan Samaj Dependent in Independent India - Kanshiram .

15. Vivekkumar , Dalit Leadership in India , Kalpaj Publication , New Delhi ,2002

16. Kanshiram - Era of the Stooges , Samyak Prakashan , Delhi, 2009

## प्रकरण चौथे

# काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण

**प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणाचे विभाजन हे दोन विभागात करण्यात आलेले आहे. (अ) या विभागात काशीराम यांची बहुजन संकल्पना आणि राजकारणाचा परामर्श घेतला गेलेला आहे. प्रकरणाच्या (ब) विभागात ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन संकल्पनेचा शोध घेवून त्यांच्या एकूण राजकारणाचा समग्र आढावा घेतलेला आहे. या पार्श्वभूमीवर काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांची बहुजन संकल्पना काय आहे याचा आढावा घेवून बहुजन संकल्पनेचा त्यांच्या समग्र राजकारणाशी काय आंतरसंबंध आहे हे जाणून घेणार आहोत, काशीराम आणि ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा एकत्रित अभ्यास करून या दोहोंची बहुजन संकल्पना वंचित, शोषित समाजासाठी उपयुक्त होते का नाही याचा समग्र परामर्श घेणे प्राप्त आहे.

ब्रिटिशांच्या आगमनामुळे भारतात आधुनिकता अवतरली. ही आधुनिकता खंडीत स्वरूपाची जरी असली, तरी भारतातील ऐतद्देशिय लोकांचा संबंध हा आधुनिक शिक्षणाशी आला. परिणामी लोकांमध्ये आपल्या हक्काविषयी जाणीव जागृती होण्यास सुरुवात झाली. या जाणीवा जागृत करण्यामध्ये भारतातील राजकीय आणि सामाजिक परिवर्तन करू पाहणारे समाजाभिमुख समाजसुधारक आणि विचारवंत यांचा वाटा मोलाचा होता. त्यामध्ये राजाराममोहन रॉय, म. फुले, छ. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. या परंपरेतूनच काशीराम यांचा उदय झाल्याचा दिसतो. २० व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच संपूर्ण भारतातील शोषित समुदायांनी त्या व्यवस्थेविरुद्ध बंड करण्यास सुरुवात केली. ज्याचे ते शतकानुशतके बळी ठरले. ईशान्येपासून उत्तर–पश्चिम आणि नंतर दक्षिणेकडे भारताच्या नकाशावर नजर टाकल्यास देशाच्या प्रत्येक भागात विद्रोह सुरु झालेला दिसून येतो. वायव्येपासून सुरू होऊन ईशान्येकडे हा विद्रोह सरकताना आपण 'आदि–धर्मी जाटव कुरेल आदि–हिंदू नमो शूद्र' अशा चळवळींत रुपांतरीत झालेला दिसतो. दक्षिण भारतात आपल्याला तामिळनाडूतील सतनामी, रामनामी, आदि–आंध्र, आदि–द्रविड यांच्या चळवळी दिसतात. केरळमधील पोलया, थिया, इझावा, पूर्वेकडील किनारपट्टीमधील आदि–कर्नाटक आणि पश्चिम आणि मध्य भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील महारांची अर्थात तथाकथित अस्पृश्य आणि

गावकुसाबाहेरील लोकांची चळवळ ही महत्वाची सामाजिक राजकीय परिवर्तनवादी चळवळ होती. जी आजमितीपर्यंत सूरू असल्याची दिसते.

भारतात १९१९ चा भारत कायदा लागू झाल्यानंतर संपूर्ण भारतातील उत्पीडीत आणि शोषित बहुजन वर्ग स्वाभिमानासाठी स्वतःच्या ताकतीच्या आधारावर संघर्ष करताना दिसतो. भारतीय समाजात सुरु असलेल्या उत्पीडीत आणि शोषित बहुजन समाजघटकांच्या या सर्व लढ्यांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील अस्पृश्यांचा लढा मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३० आणि १९३१ मध्ये लंडन येथे झालेल्या पहिल्या आणि दुसऱ्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे यशस्वीपणे प्रतिनिधित्व केले आणि अस्पृश्यांना जातीय मतदारसंघ मिळवून दिले. हे उच्चजातीय हिंदूंना सहन झाले नाही म्हणून अस्पृश्यांना दिलेल्या या अधिकारांच्या विरोधात त्यांचे नेते म. गांधीनी उपोषण केले. १९३२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्यांवर पुणे करारासाठी जबरदस्तीने दबाव आणला. पुणे करारामध्ये अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघाऐवजी राखीव मतदारसंघ दिले. त्याचा परिणाम असा झाला की, या वर्गातून त्यांचे प्रतिनिधित्व करणारे प्रतिनिधी निवडून न जाता इतर पक्षांच्या व जातींच्या मर्जीवर निवडून जाणारे प्रतिनिधी निर्माण झाले. अशा प्रतिनिधींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलाल किंवा पिट्टू समजले.[१] काशीरामांनी त्यांना चमचा असे संबोधले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे १९३५ च्या भारत कायद्यात अस्पृश्य जातीसाठी एक सूची निर्माण करण्यात आली, व सर्व अस्पृश्याचा समावेश त्या सूचीमध्ये केला. तेव्हापासून भारतातील अस्पृश्यांना कायदेशीररित्या अनुसूचित जाती म्हणून ओळखले जाते.[२]

**भारत सरकार कायद्यानंतरची स्थिती (१९३५)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या अनुसूचित जातींची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना देशाच्या सामाजिक व्यवस्थेत सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी गांभीर्याने विचार केला. त्यांनी शिक्षणावर विशेषतः उच्चशिक्षणावर आणि त्यापेक्षाही जास्त उच्च आणि परदेशी शिक्षणावर अधिक भर दिला. त्या काळात त्यांनी अनुसूचित जातीतील बुद्धिमान व्यक्तींना पाश्चिमात्य देशांतील प्रगत देशांत उच्चशिक्षण घेणे अत्यंत आवश्यक मानले होते. पाश्चिमात्य आणि प्रगत शिक्षण घेण्याबरोबरच भारतातील व्यवस्थेच्या बळींना पाश्चात्य सभ्यता आणि संस्कृतीचा परिचय देण्यासाठी हे परदेशी शिक्षण आवश्यक मानले जात होते. यामागचा त्यांचा उद्देश केवळ असे उच्च

आणि परदेशी शिक्षण घेणाऱ्यांची स्थिती सुधारणे नव्हे तर त्यांना भारतात प्रचलित असलेल्या ब्राह्मणी समाजव्यवस्था आणि संस्कृतीविरुद्ध बंड करण्यासाठी तयार करणे हा होता. याचा परिणाम म्हणून त्याकाळात परदेशी शिक्षित अनुसूचित जातीच्या वर्गाची प्रारंभिक पिढी निर्माण झाली.

१९४२ मध्ये व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामील झाल्यानंतर त्यांनी अनुसूचित जातींसाठी अनेक फायदे आणि सवलती मिळवल्या. १९४३ मध्ये पहिल्यांदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वजनिक नियुक्त्यांमध्ये अनुसूचित जातींसाठी आरक्षण मिळविले. उच्च शिक्षणाला विशेष भर देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९४५ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. १९४६ मध्ये बॉम्बे मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे पहिले सिद्धार्थ महाविद्यालय सुरू केले. इंग्रजांनी देश सोडण्याचे ठरविल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारताची राज्यघटना तयार करण्याची संधी मिळाली. या राज्यघटनेत त्यांनी S.C., S.T., O.B.C. आणि अल्पसंख्याकासाठी अनेक सामाजिक–राजकीय तरतुदी ठेवल्या.

भारतीय राज्यघटनेत कलम१५ उपकलम IV, कलम १६ उपकलम IV हे या दिशेने केलेले सर्वात उल्लेखनीय प्रयत्न आहेत. कलम १५ उपकलम IV राज्याला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांच्या किंवा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या प्रगतीसाठी कोणतीही विशेष तरतूद करण्याची परवानगी देते. यामुळे शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीयांसाठी जागांच्या आरक्षणास परवानगी मिळते. कलम १६ कलम IV सरकारला मागासवर्गीयांसाठी सार्वजनिक पदांवरील नियुक्त्यांमध्ये आरक्षण ठेवण्याची परवानगी देते. यामध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचा समावेश आहे. शैक्षणिक क्षेत्रातील आणि सेवांमध्ये असणाऱ्या आरक्षणाच्या तरतूदींमुळे भारतातील अत्याचारित जातीमध्ये तथाकथित उच्चभ्रू वर्गाचा उदय झाल्याचे दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मागास आणि अल्पसंख्याक समुदायांना त्यांचे हक्क आणि हित जपण्यासाठी भारतीय संविधानात विविध तरतुदी केल्याचे दिसते. शिक्षण क्षेत्रातील तरतुदी सेवांमधील आरक्षण आणि राज्य विधिमंडळात तसेच संसदेतील आरक्षणाचा परिणाम म्हणून समाजातील शोषित बहुजन वर्गात मोठ्या प्रमाणात पांढरपेशी घटकांचा चढत्या क्रमाने उदय झाल्याचे आपणाला दिसत आहे. राज्य विधानमंडळे आणि संसदेतील आरक्षणामुळे या समाजातील

तथाकथित राजकीय नेत्यांचा एक वर्ग निर्माण झाला आहे. जो जवळपास संपूर्ण भारतात आणि सर्व पक्षांमध्ये दिसतो. सेवांमधील आरक्षणामुळे शिक्षित कर्मचाऱ्यांचा एक मोठा वर्ग आस्थापनाच्या नोकरशाही व्यवस्थेत जवळपास सर्वत्र आढळून आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना या शोषित वर्गातील अभिजन वर्गाकडून शोषित लोकांच्या हिताचे रक्षण आणि प्रगतीची अपेक्षा होती.[३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील बहुजन समाजाला जागृत करून राजकीय व्यवस्था परिवर्तनासाठी जी चळवळ सुरू केलेली होती. त्याला व्यापक रूप देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया निर्माण करण्याचे ठरवले होते. पण तत्पूर्वी त्यांचे महापरिनिर्वाण झाले त्यांचे हे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याचे त्यांच्या अनुयायांनी ठरवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात त्यांनी ३ ऑक्टोंबर १९५७ ला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) पक्षाची स्थापना केली. त्यानंतर लवकरच या पक्षाने महाराष्ट्रातच नव्हे तर पंजाब उत्तर प्रदेश दक्षिण भारतात आपला राजकीय प्रभाव वाढविला. रिपाईने सामान्य जनतेच्या प्रश्नांना हातात घेऊन आंदोलने केली. त्यामुळे १९५७ ते १९६७ या काळात देशातील दुसऱ्या नंबरचा राजकीय पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला.[४] त्या काळात काँग्रेसने रिपब्लिकन पक्षाचा राजकीय धोका ओळखून या पक्षाच्या काही नेत्यांना काँग्रेसमध्ये घेण्यास सूरूवात केली होती. त्यामुळे या पक्षाचा प्रभाव कमी व्हायला सुरुवात झाली. रिपब्लिकन पक्ष जातीयतेचा प्रभाव, आर्थिक चणचण प्रसारमाध्यमांचा नाकर्तेपणा आणि इतर पक्ष पुढाऱ्यांच्या विषारी प्रचारामुळे या देशातील गरीब वर्ग या पक्षाशी आपली नाळ जोडू शकला नाही. त्यामुळे काही दिवसातच या पक्षाची प्रतिमा फक्त मागासवर्गीय जातीचा पक्ष अशी झाली. त्यामुळे या पक्षाला निवडणुकीत फारशी नेत्रदीपक यश मिळू शकले नाही.[५]

या संदर्भात डॉ. आंबेडकर यांनी महत्वाचे विधान केले ते समर्पक असे वाटते ते आपल्या अनुयायांना उद्देशून म्हणत होते की, ''चळवळीचा गाडा जो मी इथवर खेचून आणला आहे. तो जर पुढे घेऊन जाणे जमत नसेल तर त्याला निदान मागे घेऊन जाऊ नका.''[६] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हा जो त्या काळात इशारा दिलेला होता तो महत्वाचा होता. रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व त्यांच्याविरुद्ध दिशेने पुढे जात होते. संधीसाधू नेत्यांनी आपला सवता सुभा सांभाळण्यात धन्यता मांडली. शोषित, पीडित लोकांच्या आवश्यकतेच्या विरोधात त्यांचे आचरण होते. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाला फुटीरतेचे ग्रहण लागले आणि रिपाई अनेक गटागटामध्ये विभागला गेला.

नेतृत्वात विवाद होऊन लागले. काशीराम म्हणतात, ''येथेच त्यांचे एवढे विवाद आहेत की ते विवाद सोडवण्यातच संघटना आपला वेळ वाया घालवत आहे, मूळ कार्य करू शकत नाही, अर्थात संघटनेचा मूळ हेतूच दूर राहत आहे.[७] परिणामी कोणताही नेता आंबेडकरी चळवळीचे काम प्रभावीपणे करू शकत नव्हता. उलट हे सर्व नेतृत्व प्रस्थापित पक्षांच्या मदतीने आंबेडकरी चळवळ चालवत होते. त्यामुळे आंबेडकरी चळवळीचे फार मोठे नुकसान झाले. आंबेडकरी चळवळीचे भवितव्य हे काँग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या मेहरबानी वर अवलंबून होते.[८] अशा परिस्थितीमध्ये बहुजन समाजामध्ये राजकीय आणि सामाजिक जागृती करून या बहुजन शोषित समाजघटकाला आवश्यक असणारी सजगता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असणारे बदल घडविण्याचा प्रयत्न आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसार क्रांती करण्याचा प्रयत्न काशीराम यांनी केला. त्यात ते काही अंशी यशस्वी झाले असे म्हणता येईल. त्यांनी भारतीय राजकारणामध्ये वेगवेगळे प्रयोग करून भारतीय राजकारणाला बहुजन राजकारणाकडे वळवले. त्यामुळेच आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यानंतर बहुजन चळवळीमध्ये कांशिरामांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. बहुजन समाजाचे संघटित लोकशाही चौकटितील राजकारण संघटित करून वंचित, शोषित अर्थात बहुजन समाजात आत्मभान निर्माण करण्यात काशीराम यांचे योगदान म्हणजे, शोषितांच्या बहुजनाच्या राजकारणातील महत्वाचा टप्पा म्हणावा लागेल. आपण जेव्हा बहुजन राजकारणाविषयक काही एखादी भूमिका मांडतो किंवा लोकशाहीच्या चौकटीतील बहुजन राजकारणाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न आपण करतो तेव्हा काशीराम यांच्या कार्याकडे दुर्लक्ष करता येतच नाही, कारण त्यांच्या कार्याचा आलेख हा उत्तरोत्तर वाढत गेलेला दिसतो. त्यांच्या बहुजन राजकारणाचा आढावा घेण्यापूर्वी त्यांचा संक्षिप्त जीवन परिचय करून घेणे क्रमप्राप्त ठरते.

**अ) काशीराम**

कांशिराम यांचा जन्म १५ मार्च १९३४ रोजी पंजाबमधील रोपट जिल्ह्यातील खवासपूर या गावी एका दलित रामदासिया जातीत झाला. त्यांच्या वडिलांचे नाव हरिसिंह व आईचे नाव किशनकौर होते. बी.एससी. पर्यंत शिक्षण रोपड येथील शासकीय महाविद्यालयात झाले. पुढे ते पुण्यात खडकवासला येथे सैन्याच्या प्रयोगशाळेत कामावरती रुजू झाले. १९६५ मध्ये बुद्ध जयंतीची डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या सार्वजनिक सुट्टी न दिल्याने भारतीय शासनाच्या सेवेत

असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले. त्यामध्ये काशीराम यांनी सहभाग घेतला, आणि येथूनच त्यांनी आपल्या सामाजिक चळवळीला सुरुवात केली. १९७८ साली कांशिराम यांनी 'बामसेफ' नावाची संघटना स्थापन केली. ही संघटना बिगर राजकीय व बिगर धार्मिक स्वरूपाची होती. १९८१ पासून त्यांनी दलित समाजाचे विविध प्रश्न हाती घेऊन काम करण्यास सुरुवात केली. कांशिराम यांनी आपल्या कर्तुत्वाने राजकारणात एक वेगळी छाप निर्माण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांचे प्रेरणास्थान होते. 'शिका संघटित व्हा, संघर्ष करा' या त्रिसूत्रीचा आधार घेत त्यांनी राजकारण केले, आणि देशाच्या राजकारणात प्रस्थापित राजकीय पक्षांना जोरदार धक्का दिला. सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या या कार्याची दखल घेतली. राजकीय सत्ताही तुमच्या प्रत्येक समस्याचे उत्तर आहे, हा बाबासाहेबांचा विचार त्यांनी आत्मसात केला होता. त्यांच्या प्रत्येक सभेत ते हे वाक्य वारंवार सांगत असत. त्यांच्या प्रभावामुळे मायावती आपले सर्व शिक्षण आणि आयएसचे स्वप्न सोडून राजकारणात आल्या. कांशिराम यांनी स्थापन केलेल्या 'बामसेफ'च्या माध्यमातून मायावतींनी 'बामसेफ'चा विस्तार करण्याचे मोठं काम केले. कांशिराम हे पंजाबचे होते तरीही मायावतीमुळे त्यांचा उत्तरप्रदेशमध्ये जम बसला. या सगळ्या घडामोडी घडत असताना १९८० च्या दशकात आणिबाणी नुकतीच संपली होती. जनता पार्टीतल्या गोंधळामुळे लोकांना पुन्हा एकदा काँग्रेस पक्ष हाच पर्याय वाटत होता. १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसला विजयी करून लोकांनी ते दाखवून दिले होते. पण १९८० नंतर भारतामध्ये प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढत होते आणि त्यातून प्रादेशिक अस्मितेचे राजकारण सुरू झाले. ही अस्मितेची लाट उत्तरेतही आली होती. संजय गांधींच्या मृत्यूमुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला होता. तरुण नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली होती. अशा वातावरणात मायावती या काशीरामांसाठी हुकमाचा एका ठरल्या. जाती आणि अस्मितेच्या राजकारणात काँग्रेसचे अपयश हे सगळ्या पक्षाना संजीवनी देणारे ठरले. त्या काळात बाबू जगजीवनराम हे काँग्रेसचा चेहरा होते. पण जगजीवनराम हे काँग्रेसची साथ सोडून जनता पार्टीत सहभागी झाले. त्याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्षाची स्थापना त्यांच्या अनुयायांनी केली होती. पण थोड्यात काळात हा पक्ष गटा-गटात विभागला. सामाजिक सुधारणांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी रिपब्लिकन पक्षाने राजकारणावरच सगळे लक्ष केंद्रीत केले होते. सामाजिक परिवर्तन हा उद्देश बाजूला ठेवून सत्तेचे राजकारण सुरू केले. त्यामुळे हा पक्ष खिळखिळा झाला. त्याच्यातून

दलित पँथरसारखी आक्रमक संघटना निर्माण झाली. पण ती फार काळ प्रभाव दाखवू शकली नाही. त्यामुळे काशीराम यांना दलित राजकारणातील पोकळी भरू काढण्याची मोठी संधी मिळाली होती. १९८० मध्ये मंडल आयोगाने ओबीसींसाठी २७% च्या आरक्षणाला मान्यता दिली होती. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींना मिळणाऱ्या २२.५% आरक्षणापेक्षा हे आरक्षण वेगळे होते. सरकारी नोकरी आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण मिळाल्याने अनेक जाती–जमातीमध्ये नवी प्रेरणा मिळाली. लोकांमध्ये जागृती झाली. उत्तर भारतात काशीरामांना मायावतीसारखा खंबीर साथ देणारा राजकीय सहकारी मिळालेला होता. काशीराम यांना आंदोलनाचा अनुभव होता आणि राजकारणाची उत्तम जाण होती. त्यामुळे उत्तरप्रदेशच्या राजकारणामध्ये जी राजकीय पोकळी निर्माण झाली होती ती भरून काढण्यासाठी त्यांनी १९८० मध्ये एप्रिल ते जून महिन्यात त्यांनी एका मोठ्या कार्यक्रमाची घोषणा केली होती, तो कार्यक्रम होता 'आंबेडकर ऑन व्हील्स' या कार्यक्रमा अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि शिकवण देणारे प्रदर्शन त्यांनी तयार केले होते सर्व देशभर ते प्रदर्शन घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्याची मोहीम त्यांनी हाती घेतली होती. त्यामुळे देशभरातील बहुजन समाजामध्ये सामाजिक जागृती निर्माण झाली हे करत असताना त्यांनी त्यात कुठेही राजकारण आणले नाही, त्यामुळे लोकांचा त्यांच्यावर विश्वास बसला. हे प्रदर्शन उत्तर भारतासह ९ राज्यांमध्ये ३४ ठिकाणी दाखवले गेले. या त्यांच्या मोहिमेमुळे काशीराम यांना देशभरातून अनेक नवीन व तरुण कार्यमकर्ते मिळाले. ज्याचा उपयोग संघटनेच्या विस्तारासाठी झाला. एवढेच नव्हे तर लोक काशीराम यांना आर्थिक मदतही देऊ लागले. याचा परिणाम काशीरामांनी वेगवेगळ्या संघटना स्थापन केल्या. त्या संघटनांच्याद्वारे त्यांनी समाजामध्ये बहुजन ही संकल्पना रुजविली व भारतीय राजकारणाला बहुजन राजकारणाकडे वळविले.

## काशीराम यांची कौटुंबिक पार्श्वभूमी

शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक यांची पवित्र भूमी म्हणून पंजाब प्रसिद्ध आहे. पंजाबला पाच नद्यांचा प्रदेश म्हणून ही ओळखले जाते. समतेचा संदेश देणारा शीख धर्म या पंजाबमध्येच उदयाला आला. भारताची प्राचीन विकसित सभ्यता, सिंधू सभ्यता तिचे एक केंद्र होते. हडप्पा संस्कृती या संस्कृतीचे काही अवशेष रोपडमध्ये मिळालेले आहेत.[१] गुरुगोविंदसिंह यांनी जातीव्यवस्थेतील श्रेष्ठ कनिष्ठ भावनेला छेद देण्यासाठी सर्व शिखांना सरदार ही पदवी बहाल केली. तसेच शिखांच्या नावापुढे सिंह लावण्याची पद्धत सुरू केली. सरदार म्हणजे श्रेष्ठ व सिंह

म्हणजे बलवान म्हणजेच गुरु गोविंदसिंह सर्व शिखांना बलवान आणि श्रेष्ठ बनवू इच्छित होते. पंजाब राज्यामध्ये रोपट जिल्ह्यात खवासपूर नावाचे छोटे खेडेगाव आहे. या गावामध्ये हरीसिंह हे शिख सरदार आपल्या कुटुंबासोबत रहात होते. हरीसिंह हे शेतीचे काम करायचे शिवाय चामड्याला रंग लावायचेही काम करायचे. हरीसिंह यांना तीन मुले आणि चार मुली होत्या. काशीराम हा त्यांचा सर्वात मोठा मुलगा होता.[१०] काशीराम यांचा जन्म रोरापूर, पंजाब या ठिकाणी १५ मार्च १९३४ रोजी झाला. या गावांमध्ये काशीराम नावाचे एक संत राहत होते. त्यांचा या गावावर व आसपासच्या परिसरावर फार मोठा प्रभाव होता. म्हणून काशीरामांच्या आजी प्रसिन्नी यांनी त्यांचे नाव काशीराम ठेवले. काशीरामांची आई बिशनकौर त्यांना काशिया किंवा कधी कधी काशी म्हणून बोलवत होत्या. गुरू गोविंदसिंहानी सर्व सिखांना सिंह बनविले. परंतु काशीराम आपल्या नावापुढे व मागे सिंह लावत नव्हते.[११] धेलोराम हे काशीरामांचे आजोबा होते, त्यांनी सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर खवासपूर येथे चामड्याला रंग देण्याचा घरगुती उद्योग सुरु केला. धेलोराम यांना एकूण तीन मुले आणि एक मुलगी होती. हरिसिंह, बिसनसिंह, रचनसिंह व मुलगी हरो अशी त्यांची नावे होती. काशीरामाचे दोन्ही चुलते म्हणजे बिसनसिंह आणि रचनसिंह है सैन्यांमध्ये भरती झाले. तर हरिसिंह हे चामडे रंगविण्याचा व बटईने शेती व्यवसाय करीत असत. हरिसिंह हे अतिशय स्वाभिमानी होते. हिंदू धर्मातील श्रेष्ठ–कनिष्ठ या भेदभावपूर्ण वागणूकीमुळे त्यांनी खालसा पंथाची दिक्षा घेतली होती.[१२]

पंजाबमध्ये त्या काळात आर्य समाजाचे कार्य जोरदारपणे सुरू होते. या आर्य समाजाच्या विचारधारेमुळे ही काशीरामांचे वडील प्रभावित झाले होते. त्यामुळेच त्यांनी बालक काशीरामांवर लहानपणापासूनच चांगले संस्कार केले होते. दलवारासिंह व सरदार हरबंससिंह असे काशीरामांना दोन भाऊ होते तर सबरण कौर व गुरचरण कौर अशा दोन बहिणी होत्या. काशीराम लहानपणी विविध खेळांमध्ये खूप पारंगत होते. त्यांना कबड्डी व कुस्तीची फार आवड होती. या दोन खेळांमध्ये त्यांची विशेष रूची होती. काशीराम खेळाच्या व्यतिरिक्त शाळेमध्ये ही अतिशय हुशार होते. पंजाब या प्रातांमध्ये ही त्यावेळी दलित जातीवादाच्या घटना घडायच्या. परंतु इतर राज्याच्या तुलनेत पंजाबमध्ये जातीवादाचे प्रमाण फार कमी होते. काशीरामांच्या पूर्वजांनी शीख धर्माची दिक्षा घेतल्याने त्यांना जातीवादाचा अनुभव जास्त आला नाही. काशीराम हे रामदासिया या शिखांमधल्या दलित जातीतले होते. ४५० वर्षांपूर्वी ज्या चांभारांनी चांभार जातीचा त्याग करून

शीख धर्माचा स्वीकार केला. त्यांना रामदासिया असे म्हणतात.[१३] या रामदासियांचा पंजाबमधील चांभार जातीतील मुलींशी बेटी व्यवहार सुरू राहिला. त्यामुळेच काशीरामांची आई ही चांभार जातीतील होती, व वडील रामदासिया शीख होते. हरिसिंहाबरोबर लग्न केल्यामुळे बिशनदेवी बिशनकौर झाल्या होत्या. अशाप्रकारे काशीराम यांची कौटुंबिक पार्श्वभूमी ही अतिशय साधारण कुटुंबातील आहे.

**शिक्षण व नोकरी**

काशीराम हे लहानपणापासूनच शिक्षणामध्ये अतिशय हुशार होते. काशीराम ६ ते ७ वर्षांचे असताना शाळेत जायला लागले. चौथीच्या वर्गात असताना त्यांचा प्रथम क्रमांक आला. त्यावेळी शिष्यवृत्तीसाठी संपूर्ण तालुक्यामधून एकच मुलगा निवडण्याची परंपरा होती आणि काशीरामजींची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. अशाप्रकारे चौथीपासून त्यांना सरकारी शिष्यवृत्ती सुरू झाली.

शासकीय प्राथमिक शाळेत अस्पृश्य मुलांना इतर मुलांपासून वेगळे बसवले जात असे. त्यांच्या पिण्याच्या पाण्याचे भांडेही वेगळे होते. त्यांच्या वडिलांना ही गोष्ट आवडली नाही, यामुळेच त्यांनी काशीरामला इस्लामिया स्कूल रोपरमध्ये प्रवेश मिळवून दिला. अशाप्रकारे इस्लामिया स्कूल रोपर येथून इयत्ता ५ ते इयत्ता ८ पर्यंतचे शिक्षण घेतले. D.A.V पब्लिक सेकेंड्री स्कूल रोपडमधून ९ वी ते १२ पर्यंतचे शिक्षण घेतले.[१४] पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी काशीरामानी शासकीय महाविद्यालय रोपर (पंजाब, विद्यापीठ) येथे प्रवेश घेतला व १९५६ मध्ये बी.एस्सी. (बॅचलर ऑफ सायन्स) भौतीकशास्त्रातून पदवी प्राप्त केली.[१५] त्यावेळी त्यांचे वय २२ वर्षे होते. तत्कालीन रोपर परिसरातील रामदासिया शीख पंथामध्ये बी.एस्सी.पर्यंत शिक्षण घेतलेले काशीरामजी हे एकमेव पदवीधर विद्यार्थी होते. काशीराम शिक्षणादरम्यान वडिलांवर अवलंबून नव्हते. आपला खर्च चालवण्यासाठी सुटीत नोकऱ्या करत असत. यासाठी त्यांना खूप मेहनत करावी लागली. पावसाळ्यात आंब्याच्या बागा विकत घेऊन आंबे विक्रीचा व्यवसाय करत. याशिवाय तो आपल्या वडिलांना चामड्याच्या रंगकामात तसेच शेतीमध्ये मदत करत. १९५६ साली उच्चशिक्षण व प्रशिक्षणासाठी काशीरामजींनी देहरादूनमधील स्टाफ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. प्रशिक्षणाच्या बरोबर काशीरामनी संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची ही तयारी सुरू केली. दोन वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीदरम्यान त्यांनी भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागामध्ये ही नोकरी केली तसेच या ठिकाणी असतानाच चांगल्या नोकरीचा त्यांनी शोध सुरू केला.

६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यावेळी त्यांच्या निधनाच्या दुःखद बातमीने काशीरामाचे सहयोगी मित्र श्री गैनी यांनी फार दुःख झाले. त्याचवेळी पहिल्यांदा काशीरामजींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्ष आणि त्यांचे कार्य समजून घेण्याची संधी मिळाली. त्यांनी आजपर्यंत केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे केवळ नाव ऐकले होते. परंतु त्यांनी केलेल्या महान कार्याची माहिती काशीरामजींना १९५६ ला झाली. त्यावेळी काशीराम ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाने दुःखी झाले. १९५८ साली महाराष्ट्रातील पुणे (खडकी) येथे केंद्र शासनाच्या एक्सप्लोसिव्ह रिसर्च एण्ड डेव्हलपमेंट लॅबोरेटरी या खात्यामध्ये शासकीय सहाय्यक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. ज्या पुण्यामध्ये गांधी आणि आंबेडकर यांच्यामध्ये पुणे करार झाला होता. ज्या पुण्यामध्ये पेशवाईच्या काळात टोकाचा जातीभेद पाळला जात होता त्याच पुण्यात काशीरामाचे आगमन झाले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा अभ्यास, प्रभाव व प्रसार**

इ. स. १९६२–६३ च्या दरम्यान काशीराम यांना या जातीभेदाच्या विषमतेचा अनुभव आला. आणि त्यांचे आयुष्यच बदलून गेले. पुण्यामध्ये ज्या ठिकाणी काशीराम नोकरी करीत होते त्या ठिकाणी म्हणजे एक्सप्लोसिव्ह रिसर्च अन्ड डेव्हलपमेंट लॅबोरेटरीमध्ये ज्या सुट्ट्या दिल्या जात त्यामध्ये बुद्ध जयंती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा ही समावेश होता. परंतु १९६३ च्या शेवटच्या महिन्यामध्ये १९६४ या वर्षातील सरकारी सुट्ट्यांमधून बुद्ध जयंती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या सुट्टया रद्द करण्यात आल्या होत्या. त्यामुळे व्यवस्थापनाने घेतलेल्या या निर्णयामुळे अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. परंतु व्यवस्थापनाच्या विरोधात जाण्याची कोणाची ही तयारी नव्हती. अशा परिस्थितीमध्ये एक राजस्थानी दलित कर्मचारी दिनाभाना यांनी या निर्णयाच्या विरोधात लिखित स्वरुपात आवाज उठविला. दिनाभाना हे एक चतुर्थश्रेणी कर्मचारी होते. प्रशासनाच्या विरोधात आवाज उठविल्यामुळे त्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. दिनाभाना यांना नोकरीवरून काढल्यानंतर याच संस्थेमधील डी. के. खापर्डे नामक कर्मचाऱ्यांने दिनाभाना यांना मॅनेजमेंटच्या विरूद्ध इंग्रजीतून पत्र लिहून दिले. त्यामुळे जेव्हा मॅनेजमेंटला हे समजले की हे पत्र डी. के. खापर्डे यांनी लिहून दिले आहे तेव्हा त्यांना ही नोकरीतून बडतर्फ करण्यात आले. या अन्यायाच्या विरोधात ऑफीसमधील सर्व दलित कर्मचारी एकत्र आले व त्यांनी या निर्णयाच्या विरोधात

आवाज उठविण्याचा निर्णय घेतला. त्यावेळेस कोणीतरी सूचविले की पंजाबमधील काशीराम नामक अनुसूचित जातीचा व्यक्ती आपल्या ऑफिसमध्ये आहे. तेव्हा त्याला ही या संघर्षामध्ये सामील करून घेतले पाहिजे. म्हणून ती सर्व मंडळी काशीरामजींच्या रूमवर गेली व त्यांनी ही या आंदोलनात सामील व्हावे, असे आवाहन केले.[१६] परंतु काशीराम सुरूवातीला यामध्ये सामील झाले नाहीत ते केवळ या संघर्षाचे व दिनाभाना यांचे निरीक्षण करीत होते. नंतर त्यांच्या लक्षात आले की, दिनाभाना एक चतुर्थश्रेणी कर्मचारी असून ही या अन्यायाच्या विरोधात लढतोय. तर आपण ही त्यास मदत केली पाहिजे, म्हणून काशीराम यांनी त्यावेळी दिनाभाना यांची भेट घेतली व त्यांना विचारले की, ''मॅनेजमेंटच्या विरोधात जाताना तुम्हाला भीती नाही का वाटली?'' दिनाभाना म्हणाले की, ''भीती कसली आपण चांगल्या कामासाठी लढतो या अन्यायाच्या विरोधात मी कोर्टामध्ये जाणार आहे.'' काशीराम यांनी दिनाभाना ना सांगितले, की आंदोलनामध्ये मी ही तुमच्यासोबत आहे. एवढेच नव्हे तर काशीराम यांनी कोर्टातील केससाठी स्वतः पाचशे रुपये दिले. काशीराम दिनाभाना यांना म्हणाले, हा लढा आता केवळ तुमचा राहिला नसून आपण सर्व मिळून हा लढा यशस्वी करू.[१७] या संघर्षाचा परिणाम असा झाला की, केसचा निकाल दिनाभाना यांच्या बाजूने लागला त्यांना पुन्हा नोकरीवर बोलावून घेण्यात आले. त्याचबरोबर बुद्ध जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या सुट्ट्याही परत देण्यात आल्या. पण या घटनेनंतर काशीराम ऑफिसमध्ये आणि घरात अस्वस्थ राहू लागल्याचे दिसून येते. त्यांच्या मनात काही प्रश्न निर्माण झाले, या देशात आमची अस्तित्व काय आहे? आमच्या अधिकारांचे रक्षण करण्याची चिंता कोणाला आहे? आमच्या मागण्या कुठे मान्य होतील? ना आमचे न्यायाधीश ना, आमचे मंत्री. काशीरामांनी त्यांच्या दुःखी मनाच्या शांतीसाठी आणि मनात येणाऱ्या प्रश्नांच्या उत्तरासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य वाचण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या या प्रश्नांची उत्तरे आंबेडकरांच्या साहित्यात सापडली. त्यांनी आपले पुढील आयुष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यात घालवण्याचा त्यांनी निर्णय घेतला.[१८] खडकी (पुणे) येथील केंद्र शासनाच्या एक्सप्लोसिव्ह रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट लॅबोरेटरीमध्ये नोकरी करीत असताना बुद्धजयंती आणि आंबेडकर जयंतीच्या सुट्ट्यावरुन निर्माण झालेल्या वादानंतर काशीरामाचे संपूर्ण आयुष्यच बदलून गेले.[१९] अॅनहिलेशन ऑफ कास्ट या पुस्तकाचा काशीरामांवर खुप प्रभाव पडला. असे म्हणतात की, एका रात्रीमध्ये काशीरामांनी हे पुस्तक तीन वेळा वाचले.[२०] या पुस्तकाचा

काशीरामांवर खूप प्रभाव पडला. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी १९६४ साली आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा दिला व पूर्ण वेळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या व त्यांच्यावर लिहिलेल्या साहित्याचा अभ्यास सुरु केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन आणि मिशन जेवढे जास्त त्यांना समजत गेले. तेवढेच काशीराम प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात भूमिका घेत गेले. त्यांनी ठरविले की, आपले संपूर्ण आयुष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेसाठी अर्पण करायचे. डॉ. आंबेडकरांची विचारधारा समजू घेण्यासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली सर्वच ग्रंथ वाचून काढले. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यांना गुरू मानले होते त्यांचे ही संपूर्ण साहित्य अभ्यासले. म. फुले, संत कबीर, छ. शाहू महाराज, संत रविदास, नारायण गुरू, पेरियार रामासामी इत्यादी महापुरुषांच्या जीवनकार्यांचा त्यांनी अभ्यास केला. बंगालमधील हरिचंद्र ठाकुर व गुरूचंद ठाकुर यांच्या चांडाल आंदोलनचा अभ्यास केला. एवढेच नव्हे तर त्यावेळी आदिवासी आंदोलनांचा व आदिवासी नेत्यांचाही काशीरामांनी शोध घेतला. बिरसा मुंडा, झलकारी बाई, सर छोटुराम, जगदेव प्रसाद इत्यादी आदिवासी नेत्यांच्या कार्याची त्यांनी माहिती घेतली.[२१]

काशीराम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीसह दलित साहित्याचे केवळ विपुल वाचनच केले नाही तर ते समजून घेतले आणि ते अतिशय यशस्वीपणे व्यवहारातही आणले. स्वातंत्र्यापूर्वी लंडन येथे झालेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे विचार मांडले होते की, ''हिंदू समाजाचे संघटन असे आहे की ज्यात लोकशाही जीवनासाठी आवश्यक असलेल्या समता आणि स्वातंत्र्याला स्थान नाही, जोपर्यंत सत्ता भारतीयांच्या हाती सोपवली जात नाही आणि शतकानुशतके दुःख सहन करणाऱ्या आणि शोषितांच्या हातात सत्ता पोहोचत नाही तोपर्यंत त्यांचे आर्थिक दुःख आणि सामाजिक अपंगत्व संपुष्टात येऊ शकत नाही.''[२२] काशीराम यांच्यावर २४ सप्टेंबर १९४४ रोजी मद्रास येथे एका सभेत त्यांचे गुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या भाषणाचा मोठा प्रभाव पडला होता. या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, ''आमचे अंतिम ध्येय समजून घ्या. या देशाचे राज्यकर्ते बनणे हे आमचे अंतिम ध्येय आहे. हे ध्येय तुम्ही तुमच्या घराच्या चार भिंतींवर लिहा. जेणेकरून तुम्ही कधीही विसरणार नाही. आमचा संघर्ष हा काही नोकऱ्या आणि सवलतींसाठी नाही तर आम्हाला मोठे ध्येय गाठायचे आहे. ते ध्येय आहे देशाचे राज्यकर्ते बनणे.'' ४ ऑक्टोंबर

१९४५ रोजी अखिल भारतीय अनुसूचित जाती महासंघाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरनी राजकीय सत्तेवर पुन्हा जोर दिला आणि म्हटले, राजकारण हे अनुसूचित जातींचे जीवन रक्त असले पाहिजे. तुमचे राजकीय अधिकार सुरक्षित करण्यासाठी राजकीय सत्तेचे मंदिर तुमच्या हातात घ्या. काँग्रेस पक्षाचे राजकारण प्रबळ जातींचे असल्याने मागासवर्गीय लोकांच्या अस्तित्वासाठी आणि हितासाठी हानीकारक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी ब्राह्मणवादाचा सर्व बळीं असणाऱ्या सर्व लोकांची एक व्यापक चळवळ उभारण्याचा प्रयत्न केला.[२३]

काशीरामांच्या लक्षात आले की प्रचलित व्यवस्थेमध्ये केवळ ठराविक उच्चवर्णीय लोकांनाच फायदा होत आहे. तर इतर समाज ज्याची लोकसंख्या देशाच्या लोकसंख्येच्या पन्नास टक्केहून अधिक आहे ते या व्यवस्थेचे शिकार झाले आहेत. देशातील पंधरा टक्के लोकसंख्या असणाऱ्या उच्चवर्णीय लोकांनी देशाच्या शासन व प्रशासनावर कब्जा केला आहे आणि बहुसंख्याक बहुजन समाज गुलामीचे आणि लाचारीचे जीवन जगत आहे. ज्या व्यवस्थेला बदलून समताधीष्टीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांनी प्रयत्न केले. त्या व्यवस्थेने आपले स्वरूप बदलले आहे. त्याची जाणीव सामान्य बहुजन समाजाला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी ज्या वर्गावर होती तो वर्ग केवळ आपल्याच समस्यांमध्ये व्यस्त आहे. पुणे करारामुळे ज्या दलित समाजाला काही प्रमाणात फायदा झाला. त्या समाजाची लोकं आपल घर, परिवार, मुलं यांच्यासोबत मजेत जीवन जगत आहेत. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिशनची काही काळजी नाही. आपला स्वाभिमान गहाण ठेवून ते ब्राम्हणवादी व्यवस्थेचे चमचे होऊन बसलेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेतून त्यांना विषमतावादी व्यवस्थेची रचना आणि ती नष्ट करण्याचा मार्ग मिळाला. मनुवादी व्यवस्थेचा आधार जातीव्यवस्था आहे. त्यामुळे भारतातील मूलनिवासी बहुजन ज्यांची लोकसंख्या एकूण लोकसंखेच्या ८५% आहे. अशा भारतीयांना ६००० जातीत विभागून त्यांना त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय अधिकारापासून वंचित ठेवलेले आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात समस्या आहेत. शिवाय या सर्व जाती मनुवादी व्यवस्थेच्या बळी असल्यातरी त्यांच्यात श्रेष्ठ–कनिष्ट हि भावना निर्माण केलेली असल्याने ते एकत्र येत नाहीत. असे काशीरामाना दिसून आले. या बहुजन समाजाच्या समस्या सोडवण्याची गुरुकिल्ली त्याना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात सापडली ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे तुमच्या सर्व समस्यांची गुरुकिल्ली राजकीय

सत्ता आहे. Political power is a master key which can open each and every lock.[24] म्हणून यां बहुजन समाजाला राजकीयदृष्ट्या एकत्र आणून त्यांना राजकीय सत्तेत योग्य वाटा देण्यासाठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्थापन करण्याचे ठरविले. पण तत्पूर्वीच त्यांचे महापरिनिर्वाण झाले. त्यांचे हे अपुरे कार्य पूर्ण करण्याचे काशीरामानी ठरविले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर दृढ विश्वास**

दिनाभाना केस चालू असताना डी. के. खापर्डे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'ॲनहिलेशन ऑफ कास्ट' हे पुस्तक काशीरामांना वाचायला दिले.[२५] याचा काशीरामजींवर खूप प्रभाव पडला. एका रात्रीमध्ये त्यांनी हे पुस्तक तीन वेळा वाचून काढले. या नंतर काशीरामांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र जीवन कार्याच्या अभ्यासाला सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या सर्व पुस्तकांचा त्यांनी अभ्यास केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्यांची संपूर्ण माहिती घेतल्यावर काशीरामांनी संपूर्ण आयुष्य आंबेडकरवादाच्या प्रचार व प्रसारासाठी अर्पण करण्याचा निर्णय घेतला. ज्या प्रतिकुल परिस्थितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी बहुजन समाजासाठी संघर्ष केला त्याची जाणीव काशीरामांना यावेळी झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांद्वारेच या देशामध्ये सामाजिक क्रांती करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. काशीरामांनी १९६४ साली आपल्या नोकरीचा राजीनामा दिला व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या विविध संघटनांचा विचार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक राजकारणासाठी रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाची कल्पना मांडली होती. याशिवाय शिक्षण क्षेत्रामध्ये कार्य करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'दी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली होती. अस्पृश्य बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सोसायटीची स्थापना केली. १४ ऑक्टोबर १९५६ साली बौद्ध धर्माची दिक्षा घेतल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माच्या कार्यप्रसारासाठी भारतीय बौद्ध महासभा या संस्थेची स्थापना केली होती. त्याचबरोबर आपल्या विविध कार्यक्रमांच्या संचालनासाठी व सरंक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी 'समता सैनिक दला'ची स्थापना केली होती. या चार ही संस्थाचे त्यावेळी आपले कार्य हे सुरु होते. काशीरामांपुढे या चार संघटनांचे पर्याय उपलब्ध होते. या चार संघटनांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या

राजकीय पार्टीची कल्पना मांडली होती, त्या 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'मध्ये काशीरामांनी काम करण्यास सुरुवात केली. दादासाहेब गायकवाड त्यावेळी रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष होते. दादासाहेब गायकवाडांकडून बरेच काही शिकायला मिळेल, असे काशीरामांना त्यावेळी वाटले होते. परंतु रिपब्लिकन पार्टीच्या स्थापनेनंतर एक–दीड वर्षातच या पार्टीमध्ये दोन गट पडले. एका गटाचे नेतृत्व ॲड. हरिदास आवळे, बी. सी. कांबळे व दादासाहेब रूपवते हे करीत होते तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व दादासाहेब गायकवाड हे करीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते की, कि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा भारतातील सर्व जाती–धर्माचे नेतृत्व करणारा मजबूत पक्ष असावा, पण अशाप्रकारे रिपब्लिकन पार्टीमध्येच गट पडल्यामुळे काशीरामांना खूप वाईट वाटले. काशीरामांनी त्यावेळी या गटातील कार्यकर्त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण त्यावेळी काशीराम हे पक्षामध्ये नवीन होते. त्यामुळे त्यांच्या बोलण्याकडे कोणी ही लक्ष दिले नाही, दरम्यान १९७१ साली पुण्यातील संत गाडगे महाराज धर्मशाळेमध्ये रिपब्लिकन पार्टी व काँग्रेस यांच्यामध्ये युतीची बोलणी सुरु होती. ५२१ जागांपैकी ५२० जागा काँग्रेसला व १ जागा रिपब्लिकन पार्टीला देण्याचे यावेळी ठरविण्यात आले.[२६] यामुळे कार्यकर्त्यामध्ये आनंदाचे वातावरण होते. परंतु काशीरामांना मात्र हा आंबेडकरी विचारधारेचा पराभव वाटू लागला. अशाप्रकारे रिपब्लिकन पार्टीचे नेते काम करणार असतील तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न कधी ही पूर्ण होणार नाही, असे काशीरामांना वाटू लागले. म्हणून काशीरामांनी रिपब्लिकन पार्टीचे काम सोडून दिले व आंबेडकरवादाच्या प्रसारासाठी त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारण्याचे ठरविले.

### सुशिक्षित आंबेडकरी नोकरदार वर्गातील काशीराम यांचे अभिनव प्रबोधन कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षामुळे ज्या मागासवर्गीय समाजाला आरक्षण मिळाले व या आरक्षणांमुळे त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळाल्या. काशीरामांनी या नोकरदार वर्गाकडे आपले लक्ष केंद्रीत केले. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा त्याग व कार्याची जाणीव करून दिली व संघटीत होण्याचे महत्त्व पटवून दिले. आपण ज्या पदावर काम करत आहोत. ते समाजामुळे मिळाले आहे. त्यामुळे आपल्या समाजाकडे लक्ष देणे हे आपले एक कर्तव्य व जबाबदारी आहे, असे काशीरामांनी ह्या कर्मचाऱ्यांना समजावून सांगितले. आपण समाजाचे देणे लागतो. ही जाणीव आपल्यामध्ये नसल्यामुळेच १८ मार्च १९५६ रोजी आग्रा सभेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर

म्हणाले होते की, ''मला शिकलेल्या लोकांनी धोका जर दिला नसता तर आपण आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडली असती'' त्यामुळे आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अधुरे कार्य पूर्ण करण्याची जबाबदारी ही आपल्यासारख्या सुशिक्षित व नोकरदार लोकांची आहे, असे काशीरामांनी या कर्मचाऱ्यांना पटवून सांगितले व या लोकांना आंबेडकरवादी चळवळीसाठी तयार केले. या त्यांच्या प्रयत्नात काही लोक त्यांना सहकार्य करण्यासाठी तयार होत तर काही लोक त्यांना पाहून आपला मार्ग बदलत असे. काहीतरी कारणे सांगून काशीरामांना टाळण्याचा प्रयत्न ही काही लोक करीत. अशा लोकांकडे सुद्धा काशीराम २०–३० वेळा जात. उलट असे नौटंकी करणारे लोक मला कार्यशील बनवतात, असे काशीराम म्हणत. जिथे मिळेल, जसे मिळेल, तिथे काशीराम जेवण करीत. काशीराम रेल्वे स्टेशनवर किंवा बस स्टँडवर झोपायचे. कधी कधी तर काशीराम फक्त पाणी पिऊनच झोपायचे. सायकल मिळाली तर ठीक नाहीतर रेल्वेच्या थर्ड क्लास डब्ब्यातून ते उभे राहून प्रवास करायचे. अशाप्रकारे त्यांनी जवळ–जवळ पूर्ण भारतभर प्रवास केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी काशीराम भारावून गेल्यामुळेच त्यांनी आंबेडकरवादी विचारधारेचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्य व बहुजन समाजाला आंबेडकरी चळवळीला पुढे नेण्यासाठी तयार केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची ओळख झाल्यानंतर काशीरामांनी त्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे धोरण स्वीकारले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर आंबेडकरवादी चळवळीची छकले पडली होती व गती खूप मंदावली होती, अशा परिस्थितीत काशीरामांनी बामसेफ, डीएसफोर व बीएसपी या संघटनांच्या माध्यमातून त्यांनी भारतभर आंबेडकरवादाचा प्रचार व प्रसार केला. भारतातील दलित अनुसूचित जाती–जमाती व इतर मागासवर्गीय म्हणजेच बहुजन जातींमध्ये काशीरामांनी आंबेडकरवादाच्या प्रचाराचे कार्य केले.

या दरम्यान देशातील अनेक आंबेडकरवादी संघठन व नेत्यांशी त्यांचा संपर्क आला. त्यांच्या समकालीन नेत्यांपैकी सर्वांत जास्त जनसंपर्क काशीरामांनी केला. प्रत्येक गाव, नगर व खेड्यांमध्ये काशीरामांनी आंबेडकरवादाच्या प्रसारासाठी सायकल रॅली काढल्या. आंबेडकरवादी आंदोलनाचा निळा झेंडा खांद्यावर घेऊन तसेच म. फुले, छ. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा घेऊन त्यांनी गाव, खेड्यांमध्ये प्रचार फेऱ्या काढल्या. काशीराम असे

म्हणत की, कोणत्याही विचारधारेचा विजय हा घरात बसून होत नसतो, तर त्या विचारधारेचा प्रचार होणे खूप गरजेचे असते. त्यामुळेच काशीरामांनी आंबेडकरी विचारधारेच्या प्रचार व प्रसारासाठी दिवस रात्र प्रयत्न केले.

१९३२ मध्ये म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये पुणे करार झाला. त्या कराराला १९८२ मध्ये पन्नास वर्ष पूर्ण होणार होते. या निमित्ताने काशीरामांनी पूर्ण भारतभर पुणे करार धिक्कार परिषदांचे आयोजन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही १९३२ च्या नंतर बऱ्याचवेळा पुणे कराराचा निषेध व्यक्त केला होता. २४ सप्टेंबर १९८२ ला पुण्यातून या धिक्कार परिषद कार्यक्रमाची सुरुवात झाली व २४ आक्टोंबर १९८२ ला जालंधर येथे या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अकोला, अमरावती, यवतमाळ, एमपूर, जबलपूर, इंदौर, आग्रा, अलीगढ़, मथुरा, कोसीकलांन, भरतपूर, फरीदाबाद, दिल्ली, भोपाळ, झांसी व जालंधर इत्यादी शहरांमधून पुणे करार धिक्कार परिषदांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या धिक्कार परिषदांच्या माध्यमातून काशीरामांनी पुणे करारांमुळे दलितांचे झालेले नुकसान व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या करारा केलेला निषेध याची भारतभर जागृती केली. त्यांच्या या कार्यामुळे दलित–शोषित समाजाला आंबेडकरवादाची ओळख झाली. १४ एप्रिल १९८० ते १४ जून १९८१ या दरम्यान काशीरामांनी आंबेडकर' मेळा हा कार्यक्रम आंबेडकरवादाच्या प्रचारासाठी दिल्लीच्या आसपासच्या शहरांमध्ये सुरू केला. १४ महिन्यांमध्ये हा कार्यक्रम दिल्लीच्या जवळपासच्या ३४ गावांना दाखविण्यात आला. उद्देश हा होता की, महाराष्ट्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सर्वजण ओळखतात. परंतु उत्तर भारतातील लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची ओळख व्हावी, त्यामुळे आंबेडकर मेळा या कार्यक्रमामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील प्रसंगाची चित्रे तयार केली गेली. त्यामध्ये महाड चवदार तळ्याच्या सत्यागृहाचा प्रसंग, नाशिक काळाराम मंदिर सत्याग्रह, भारताचे संविधान पं. नेहरु व डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सुपूर्द करतानाचे चित्र असे प्रसंग चित्रित करुन ते उत्तर भारतातील लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित–शोषित लोकांसाठी जे कार्य केले त्याची माहिती चित्राच्या स्वरुपात देण्यात आली. हा कार्यक्रम ही त्यावेळी खूप यशस्वी झाला. कारण लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य समजून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली. या कार्यक्रमांमुळेच उत्तर भारतातील बहुजन समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची जाणीव झाली. तसेच

म. फुले, छ. शाहू महाराज यांच्या कार्याचीही ओळख या कार्यक्रमातून लोकांना झाली. पण या कार्यक्रमाची दखल त्यावेळीच्या मनुवादी मिडियाने त्यांची दखल घेतली नाही. डीएसफोरचे कार्य करीत असताना तर काशीराम अमर उजाला च्या प्रेस कार्यालयामध्ये चार वेळा गेले होते. तरी ही त्यांच्या कार्यक्रमाची बातमी या पेपरने छापली नव्हती. १९२० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे पाक्षिक सुरु केले. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केसरी मध्ये छापण्यासाठी एक जाहिरात दिली होती. परंतु लोकमान्य टिळकांनी ती जाहिरात केसरीमध्ये न छापता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पैसे परत पाठविले होते. अगदी अशाच प्रकारची मनुवादी प्रवृत्ती अमर उजालाने काशीरामांना दाखविली होती. त्यामुळेच काशीरामांनी आंबेडकरी चळवळीचे प्रचार व प्रसार करण्यासाठी वेग–वेगळ्या भाषेतून नियतकालिके सुरु केली. व त्यामधून चळवळीविषयी अपप्रचार गैरसमज हल्ले परतवून प्रतिहल्ले चढविणे हे महत्त्वाचे काम यामुळे शक्य झाले. आंतरराष्ट्रीय भेदाभेदविरोधी चळवळींशी नाळ जोडण्याचे महत्त्वाचे कार्य या प्रकाशनामार्फत घडून आले. कोणतीही चळवळ स्थानिक बनली की, ती दडपून टाकणे सहज शक्य होते. पण चळवळ जेव्हा देशव्यापी होते व देशाच्या सीमा ओलांडून पलिकडे जाते, तेव्हा ती दडपून टाकणे हितशत्रूला अशक्य होते. म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांची चळवळ ही ग्रंथित झाल्यामुळेच पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरली. त्यामुळे आपली चळवळही अशीच ग्रंथित करण्याचे काम काशीरामांनी प्रकाशनांद्वारे केले. नोएडा येथे मिडिया सेंटर उभारुन काशीरामांनी या क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकले व म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुजनवादी विचाराचा प्रसार करण्याचे कार्य केले.

**बहुजनवादी कार्याला सुरूवात**

इ. स. १९७० दशकात प्रामुख्याने काशीराम यांचा बहुजन राजकारणात प्रवेश घेतला. दलित आंदोलनाचा व्यापक अभ्यास असल्याने त्यापासून प्रेरणा घेतली. काशीरामांनी असे मत मांडले की सामाजिक संघटन केल्याशिवाय राजकीय संघटन अशक्य आहे. हे संघटन करण्यासाठी निधी असणे गरजेचे आहे. यातूनच पुढे त्यांनी भारतातील सूमारे २० लाख दलित समाजातील कर्मचारी वर्गाकडे लक्ष केंद्रीत केले. त्यातूनच सुशिक्षित कर्मचारी लोंकांचे बामसेफ नावाच्या संघटनेने जन्म घेतला ही संघटना म्हणजे, बसपा या राजकीय पक्षाची पायाभरणी होती.[२७]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार बहुजन समाजाला पटवून देण्यासाठी आणि त्यांच्यात राजकीय जागृती आणण्यासाठी काशीरामानी प्रचार आणि प्रसार करण्याचा प्रयत्न आयुष्यभर केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा स्वीकार केल्याशिवाय भारतातील बहुजन समाजाचा सामाजिक राजकीय व आर्थिक विकास होणार नाही. याची त्याना खात्री पटलेली दिसून येते. आंबेडकरी विचारधारेचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी काशीरामांनी भारतभ्रमण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अधूरे स्वप्न पूर्ण करणे हेच काशीराम यांच्या जीवनाचे ध्येय बनले होते. काशीराम यांनी वर्ण व्यवस्थेत विखुरलेला बहुजन समाज एकत्र करण्यासाठी पिरॅमिडचे उदाहरण दिले.[२८] समाजातील १५ टक्के लोक हे संपूर्ण व्यवस्थेच्या साधनांचा फायदा घेत ८५ टक्के असणाऱ्या बहुजन समाजावर राज्य करीत आहेत. त्यांचे शोषण, अन्याय करीत आहेत. या शोषणाचा अंत केल्याशिवाय बहुजनांचे हित साध्य होणार नाही.[२९]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेची ओळख झाल्यानंतर काशीराम यांनी आपल्या कार्याला सुरूवात केली आणि नारा दिला ‘बाबासाहब का मिशन अधुरा, काशीराम करेगा पूरा’ काशीरामांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मिशन पूर्ण करण्याच्या कामामध्ये सरकारी नोकरी अडचणीची वाटली. म्हणून काशीरामांनी १९६४ साली अवघ्या ६ वर्षांत सोडून दिली आणि १९६५ रोजी त्यांच्या आईला २४ पानाचे एक पत्र लिहिले. त्या पत्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मिशन पूर्ण करण्यासाठी काही प्रतिज्ञा घेतल्याचे नमूद केल्याचे दिसून येते.[३०] त्या प्रतिज्ञा पुढीलप्रमाणे,

१. आजच्यानंतर मी कधीच घरी येणार नाही, माझे स्वतःचे घर असणार नाही. देशभरातील ८५ टक्के गरीब दलित मागासलेले आणि अल्पसंख्याकांचे घर हेच माझे घर असेल.

२. आजपासून मी सर्व नातेसंबंधांपासून मुक्त आहे. मी माझ्या कोणत्याही नातेवाईकांशी संबंध ठेवणार नाही. कारण आता संपूर्ण बहुजन वर्ग माझा नातेवाईक झाला आहे.

३. मी आयुष्यभर अविवाहित राहीन. आजपासून मी माझे जीवन केवळ माझ्या कुटुंबासाठीच नाही तर संपूर्ण समाजाला समर्पित करत आहे. कारण लग्नाच्या जाळ्यात अडकल्यानंतर मी माझ्या समाजासाठी काहीही करू शकणार नाही.

४. मी आजच्यानंतर कोणत्याही सामाजिक समारंभ, जन्मोउत्सव, विवाहसमारंभ आणि मृत्यू समारंभाला उपस्थित राहणार नाही किंवा भाग घेणार नाही.

५. आजनंतर मी कोणतीही कौटुंबिक जबाबदारी पार पाडणार नाही कारण माझ्यावर आता संपूर्ण समाजाची जबाबदारी आली आहे.

६. मी माझी नोकरी सोडली आहे आणि आजच्यानंतर मी दुसरी कोणतीही नोकरी करणार नाही.

७. जोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेले स्वप्न साकार होत नाही, तोपर्यंत मी शांत बसणार नाही.[३१]

अशाप्रकारच्या काही प्रतिज्ञा काशीरामांनी घेतल्या होत्या आणि त्यांची कठोर अमंलबजावणी ही केल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियामध्ये काशीराम यांनी काम करण्यास सुरूवात केली. पण लवकरच काशीरामांच्या लक्षात आले की, रिपब्लिकन नेते हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारानुसार बहुजन समाजाच्या हितासाठी म्हणजेच व्यवस्था परिवर्तनासाठी काम करत नाहीत. तर केवळ राजकारणामध्ये स्वतःचा स्वार्थ साधून आमदार, खासदार, मंत्री होण्यासाठी काम करीत आहेत. काशीरामानी या सर्वांना बाबासाहेब आंबेडकरांचे मिशन समजून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु काशीराम रिपब्लिकन पक्षात नवीन असल्याने त्यांचे कोणी ऐकून घेत नसे तरी देखील १९६४ ते १९७१ पर्यंत काशीरामांनी रिपब्लिकन पार्टीमध्ये काम केले.[३२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्याचा अभ्यास केल्यानंतर काशीराम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाकडे झुकले. त्यांनी सरकारी सेवेचा राजीनामा दिला व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे सक्रिय सदस्य झाले. १९५७ च्या निवडणुकीत आर.पी.आय. ने महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीसोबत युती करून विधानसभेच्या १३ जागा जिंकून राजकीय पटलावर एक नवे समिकरण सर्वासमोर मांडले. मात्र नंतर या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या अहंकारामुळे पक्षाचे तुकडे झाले. काशीरामजींना असे वाटत होते की, महाराष्ट्र हे म. जोतिबा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा आणि इतर अनेक संत–कवींची कर्मभूमी आहे. त्यामुळे बहुजनाच्या राजकारणासाठी इथे पुरेशी सुपीक जमीन आहे. त्यासाठी R.P.I. च्या घटकांना एकत्र करून राजकारणासाठी संघर्षाची भूमिका तयार करावी, यासाठी एप्रिल १९६४ ते एप्रिल १९७१ पर्यंत आर.पी.आय.च्या १२ तुकड्यांचे दलित

पँथरच्या ६ तुकड्याचे एकत्रिकरण करण्याचे प्रयत्न काशीरामानी केले. पण ते या कार्यात यशस्वी होऊ शकले नाहीत.[३३]

**काशीराम बहुजन राजकारण, बामसेफची स्थापना**

गौतम बुद्धांनी जगाला सांगितले की, लोकांची मानसिकता बदलल्याशिवाय आपण लोकांमध्ये कोणताही बदल घडवून आणू शकत नाही, जर मानसिक बदल झाला तर तो बदल कायमस्वरूपी असतो. म्हणजेच मन बदलले की गोष्टी कायमस्वरूपी होतात आणि कोणतीही समस्या उरत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संदर्भात महत्त्वाची भूमिका मांडताना दिसतात. त्यांच्या मते, आपल्या समाजाचे कल्याण करायचे असेल तर स्वत:च्या पायावर उभे राहावे लागेल, आपल्या हातातील ताकद वाढवून स्वत:ची संघटना निर्माण करावी लागेल, मी लोकशाही शासन व्यवस्था निर्माण करून आणि प्रौढ मताधिकाराची तरतूद करून या देशातील बहुसंख्य समाजाकडे राजकीय सत्ता सोपवली आहे. सध्या माझा समाज शासनाचा लगाम सांभाळण्यास योग्य नाही. पुढच्या काही वर्षात तुम्ही अभ्यास करून तयार व्हाल, आणि शासनाचा लगाम हातात घ्याल. काशीराम यांना हीच भूमिका योग्य वाटली, त्यामुळे त्यांनी या बहुजन समाजाच्या मानसिकतेत बदल घडविण्यासाठी त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले ते बहुजन, शोषित आणि वंचित बहुजन समाजात आत्मभान निर्माण करणारे होते. काशीराम यांनी तथागत गौतम बुध्द, म. फुले, छ. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदेशाचा बारकाईने अभ्यास केला होता. त्यांच्या लक्षात आले की, बहुजन समाजाला सत्तेत भागीदारी द्यायची असेल तर बहुजन समाजाच्या मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांनी आपले कार्यक्षेत्र मुंबईकडे वळविले. कारण मुंबईमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना मानणाऱ्या दलित कर्मचारी अधिकारी लोकांचा मोठा वर्ग होता. याबाबत काशीराम यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एक भाषण डोळ्यासमोर होते. १८ मार्च १९५६ साली रामलीला मैदान आग्रा येथे भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, मला शिकलेल्या, नोकरदार लोकांनी धोका दिला आहे. हे शिकलेले लोक स्वार्थी झालेत त्यांना आपल्या गरीब समाजाकडे बघायला वेळ नाही.[३४] आजच्या बहुजन समाजातील सुशिक्षित लोकांना मागे वळून बघण्याची गरज वाटेनासी झालेली आहे. हा वर्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कोणतेच कार्य करीत नव्हता. मुंबईमध्ये जाऊन या सर्व दलित कर्मचाऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यासाठी तयार करण्याचे काशीरामांनी

ठरविले. मुंबईतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळींविषयी आपुलकी होती. परंतु मोठा अधिकारी वर्ग या चळवळींपासून अनभिज्ञ होता. त्यावेळी अशा अधिकारीवर्गाला समजावून सांगण्याचे काम काशीराम यांनी केले. ज्या शिकलेल्या नोकरदार वर्गांकडून बाबासाहेबांना अपेक्षा होत्या त्याच लोकांना सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्ट्या जागृत करण्याचे काम काशीरामांनी सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनामुळे समाजास कशाप्रकारे आरक्षण मिळाले व आरक्षणामुळे दलित वर्गामध्ये कर्मचारी, अधिकारी वर्ग निर्माण झाला हे काशीरामांनी कर्मचाऱ्यांना समजावून सांगितले व या अधिकारी वर्गाने आपल्या समाज्याच्या प्रगतीची जबाबदारी घेतली पाहिजे. त्यासाठी समाजऋणाची परतफेड करण्यासाठी कर्मचाऱ्यांना जागृत करण्याची पे बॅक टू सोसायटीची मोहिम काशीरामांनी आपल्या सहकाऱ्यांमार्फत सुरु केली. या कामी त्याना सी. पी. थोरात, डी. के. खापर्डे, एस. वाय. कांबळे, पी. ई. आल्हट, नामदेव कांबळे, मधू परिहार, लक्ष्मण तांबे, एम. बी. भगत, कृपासागर मेश्राम, दीनाभाना, मनोहर आटे, तेजसिंग झल्ली, एस. एफ. गंगावणे इत्यादी सहकाऱ्यांनी मदत केली.[३५] आपल्या समाजाच्या प्रगतीची जबाबदारी ही आपल्यावर असल्याची जाणीव काशीरामांनी कर्मचाऱ्यांना करून देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. देशात अनेक दलित कर्मचारी संघटना निर्माण झाल्या होत्या, परंतु सामाजिक ऋण परत फेडणे किंवा आपल्या समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करणे असा उद्देश कोणत्याच कर्मचारी संघटनेचा नव्हता. भारतात सामाजिक ऋण फेडणारे संघटन निर्माण करण्याचा विचार पहिल्यांदा काशीरामानी केला. काशीरामानी दलित कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय स्तरावर काम करणारे संघटन निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू केली.

काशीरामांनी विचार केला की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या नोकरीतील आरक्षणामुळे भारतात दलितांचे जवळ–जवळ पंचवीस लाख कर्मचारी आहेत. यापैकी दोन लाख कर्मचारी जरी संघटनेशी जोडले गेले तरी संघटन खूप मोठे होईल. या सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या पगाराचा १% जरी दिला तरी कोट्यावधी रूपये जमा होतील व या पैशाच्या आधारे संघटन चालविला येईल, असा विचार काशीरामांनी केल्याचे दिसून येते. या विचाराला मुर्त स्वरूप देण्यासाठी त्यांनी बहुजन समाजातील सुशिक्षित व नोकरदार कर्मचाऱ्यांना संघटित करण्यासाठी १४ एप्रिल १९७१ रोजी पुणे (महाराष्ट्र) येथे एक बैठक आयोजित केली. ज्यामध्ये डी. के. खापर्डे मधु परिहार भिवराव दलाल मनोहर आटे यांच्यासह ५० ते ६० कर्मचारी उपस्थित होते. या

बैठकीत डी. के. खापर्डे यांनी सरकारी अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या काही जबाबदाऱ्या असतात, असे मत व्यक्त केले. सरकारी नोकरी करणारी व्यक्ती संघटना स्थापन करून राजकीय संघर्ष करू शकत नाही. तो कोणतेही धार्मिक व जातीय संघटन निर्माण करून राजकीय संघर्ष करू शकत नाही. यावर काशीरामनी हि भूमिका मांडली की, सध्या देशभरात अनुसूचित जाती–जमातीचे १७ लाख कर्मचारी/अधिकारी आहेत. त्यांची निर्भयता टिकवून ठेवण्यासाठी या संघटनेचे स्वरूप बिगर राजकीय आणि आंदोलन न करणारे असणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अधुरी स्वप्ने पूर्ण करण्याचा म्हणजे भारतावर बहुजनांचे राज्य आणि बौद्धमय भारताची निर्मिती करण्याचा आम्ही संकल्प केला आहे. परंतु झोपलेल्या बहुजन समाजाला जागृत करणे, सोपे काम नाही. त्यासाठी एक कटिबद्ध संघटना आणि वेळ पाहिजे.[३६]

डिसेंबर १९७३ साली काशीराम यांनी दलित कर्मचाऱ्यांची एक मिटिंग दिल्लीत बोलावली. या मिटिंगसाठी पुण्यातून ७० कर्मचारी गेले होते. ज्या कर्मचाऱ्यांमध्ये सामाजिक ऋण परतफेडीची जाणीव झाली होती असेच कर्मचारी या मिटिंगला उपस्थित होते. एस. सी., एस. टी., ओ.बी.सी. व मायनोरिटीज कर्मचाऱ्यांची मिळून एक प्रभावी संघटना बामसेफ संघटना (Backward And Minority Community Employees Federation) काढण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. डिसेंबर १९७३ ला बामसेफ या संघटनेची केवळ घोषणा झाली. प्रत्यक्षात या संघटनेची स्थापना ६ डिसेंबर १९७८ रोजी दिल्ली येथे झाली. [३७] या बैठकीत बामसेफ संस्थेच्या 'पे बॅक टू द सोसायटी' म्हणजेच बॅक टू द सोसायटी समाजाला परत द्या, आणि बहुजन नावाची संकल्पना तयार करून वंचित आणि शोषित लोकांसमोर मांडण्यात आली. पण या संघटनेच्या निर्मितीनंतर काशीरामच्यावरती अशी टीका करण्यात आली की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा हा जाती उच्चाटनासाठी होता. पण काशीरामांनी जातींच्या आधारावर ही संघटना स्थापन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी द्रोह केला आहे.

२१ जुलै १९४२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली त्रिसूत्री 'शिका संघटीत व्हा, आणि संघर्ष करा.' हे बामसेफ संघटनेचे ब्रीद वाक्य बनले. आंदोलनाच्या संदर्भात दिलेल्या वरील तीन कलमी संकल्पनेच्या आधारे स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली चळवळ सुरू केली होती. जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९१६ पासून आपल्या जीवनात समाजाचे प्रबोधन करण्यास सुरुवात केली. तसे काशीरामनी बामसेफ संघटनेच्या माध्यमातून सुशिक्षित,

व्यावसायिक आणि सरकारी कर्मचाऱ्यांचे संघटन केले व बहुजन समाजामध्ये प्रबोधन करून ही जाणीव निर्माण केली की, आपल्या जीवनात आपण जे काही मिळविले आहे, ते समाजामुळे त्यामुळे आपण समाजाचे ऋणी असले पाहिजे, हे ऋण आपल्याला समाजासाठी विधायक कार्य करून परत करायचे आहे.

सामाजिक स्तरावर दलित– मागास आणि अल्पसंख्याकांच्या ऐक्यासाठी व्यावहारिक उपाय देणारे काशीराम हे बहुधा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतरचे पहिले नेते होते. या ऐक्यासाठी त्यांची एक चौपदरी योजना होती.

१. भारतीय समाजात एक नवीन प्रयोग करून बहुजन समाज ही संकल्पना रुजवणे.

२. भारतीय समाजाच्या एकात्मतेसाठी, मनुवादाच्या माध्यमातून त्यांनी प्रतिस्पर्ध्याचे प्रारूप तयार केले, ज्याच्या विरोधात बहुजन समाजाला सहजपणे एका छत्राखाली आणता येईल.

३. बहुजन समाजाच्या ऐक्यासाठी या समाजाच्या समाजसुधारकांचा समूह निर्माण करणे व त्याना त्यांच्या प्रांतातून काढून त्यांच्या बहुजन ऐक्याचे काम अखिल भारतीय स्तरावर पोहचविणे.

४. बहुजन समाजाच्या विविध गटांना पक्ष संघटनेत आणि निवडणुकांमध्ये त्यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीत 'जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी भागीदारी' या घोषणेनुसार प्रतिनिधित्व देणे.

बामसेफ ही बहुजन समाजातील सुशिक्षित व्यावसायिक आणि सरकारी कर्मचाऱ्यांनी स्थापन केलेली बुद्धिजीवींची संघटना होती. बामसेफची स्थापना करून काशीरामाना सामाजिक व राजकीय कार्यासाठी मनुष्य–शक्ती आणि पैसा–शक्ती मिळाली. म्हणजेच लोकांची बुद्धिमत्ता, त्यांची मेहनत आणि त्यांचा पैसा हे बामसेफचे बलस्थान ठरले. कदाचित म्हणूनच ते म्हणायचे, बामसेफ बहुजन समाजाची ब्रेन बँक, टॅलेंट बँक, मनी बँक आहे. म्हणजेच बामसेफ वैचारिक परिवर्तन करणारी संघटना होती. महाराष्ट्र, दिल्ली, पंजाब आणि उत्तरप्रदेश येथील सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना एकत्रित करण्यात काशीरामांना बऱ्यापैकी यश आले. यामागे दोन कारणे होती. १. डॉ. आंबेडकरांप्रती त्यांची कृतज्ञता. २. सवर्ण कर्मचारी आणि अधिकारी यांच्याकडून त्यांचा अवमान आणि छळ.

कर्मचाऱ्यांच्या समस्यां सोडविण्यासाठी सुरुवातीला बामसेफने आंदोलने केली. एस.सी., एस. टी. कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काशीरामांनी बामसेफच्या माध्यमातून प्रयत्न केले. ए.आर.डी.ई. पाषाण येथे १२० कर्मचाऱ्यांची द्वितीय श्रेणी अधिकारी स्तरावरील बढती दोन वर्षे थांबविण्यात आली होती. बामसेफने पत्रव्यवहार करून एस.सी., एस.टी. कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून दिला. बामसेफच्या प्रभावामुळे या सर्व कर्मचाऱ्यांना बढती देण्यात आली. याशिवाय भारत मौसम विज्ञान विभाग येथे अराजपत्रित द्वितीय श्रेणी अधिकारी पदावर २०० कर्मचाऱ्यांच्या बढतीची यादी प्रसिद्ध झाली. परंतु या यादीमध्ये एकाही एस. सी., एस. टी. कर्मचाऱ्याचे नाव नव्हते. या प्रश्नांसंदर्भात जेव्हा बामसेफने पुण्याच्या महासंचालकाला विचारणा केली. तेव्हा अवघ्या पंधरा दिवसात ३९ एस.सी., एस. टी. कर्मचाऱ्यांना बढती देण्यात आली. याचप्रकारे पुण्याच्या महानगरपालिकेत एक व्यवस्थापनातील अधिकाऱ्याची राखीव जागा बरेच वर्षे भरली जात नव्हती. डी. टी. जगताप नावाच्या तेथील एका कर्मचाऱ्याने ही माहिती बामसेफला दिली. बामसेफने महानगरपालिकेकडे चौकशी केली. तेव्हा पुणे मनपाने ही जागा ताबडतोब भरू असे लेखी उत्तर दिले व एका आठवड्यात त्या जागेविषयी वर्तमानपत्रात जाहिरात दिली. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील की, ज्यावेळी बामसेफने अन्यायाविरुद्ध आवाज उठविला, त्यावेळी अन्यायाचे निवारण झाले. बामसेफने प्रत्येक वेळी राखीव जागासंबंधी ज्या घटनात्मक तरतुदी केल्या, त्यांचा अत्यंत बारकाईने अभ्यास केला होता. स्वतः काशीराम यांनी राखीव जागविषयी एकत्रित माहिती असलेले एक सुटसुटीत पुस्तक छापले होते. मोहिंदरसिंग या बामसेफच्या वरिष्ट कार्यकर्त्यांने या समस्या अनेक वर्षे यशस्वीपणे हाताळल्या. त्यामुळे या काळात बामसेफचा दरारा खुप वाढला होता.[३८]

दलित–शोषित बहुजन समाजाची बिगर–राजकीय मुळे मजबूत करण्यासाठी बामसेफ काम करू लागली. कारण त्याना बहुजनांचे राज्य आणायचे होते. बामसेफ हे परिणामकारक व प्रभावी सामाजिक संघटन बनत गेले.

**बहुजन समाजाच्या जागृतीसाठी काशीराम यांनी मांडलेली समीकरणे**

भारतामध्ये व्यवस्था परिवर्तन व्हायचे असेल तर इतर पक्षाप्रमाणे आपल्या पक्षाचे कार्यकर्ते एकनिष्ठ राहणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना आपण व्यवस्थेचे बळी आहोत. आपले हक्क या व्यवस्थेमध्ये संकुचित होत आहेत. याची जाणीव निर्माण होणे गरजेचे होते. तरच तो व्यवस्था

परिवर्तनासाठी तयार होऊ शकतो. म्हणून काशीराम यांनी कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देऊनच त्याला व्यवस्था परिवर्तन घडवून आणण्यासाठी कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग आयोजित करून या प्रशिक्षण वर्गात ते भारतातील समाज रचनेची व्यवस्था, त्यातून होणारे शोषण त्यांच्या प्रतिनिधीत्वाचा प्रश्न हे सर्व समजावून देत आणि त्यांच्यात बहुजन समाज निर्मितीची प्रक्रिया निर्माण करण्याचा प्रयत्न करत. त्यांच्या प्रशिक्षण वर्गात असणाऱ्या मुद्यांचा सारांश पुढील प्रकारे सांगता येईल.

भारतात मनुवादी विषम जातीव्यवस्था कार्यरत आहे. किंबहुणा जातीव्यवस्था हा या मनुवादी व्यवस्थेचा पाया आहे. त्यातूनच पुढे विशिष्ट जातीची म्हणजेच ब्राम्हण जातीची मक्तेदारी निर्माण झाली व त्या जातीनेच पुढे या देशात इतर जातींचे धर्माच्या नावाखाली दमन केले. या देशात मनुवादी समाज व्यवस्थेने ज्या मानवी उत्थानासाठी ज्या पाच सत्ता असतात त्यावर आपली पूर्णतया मक्तेदारी निर्माण केली आहे. या सत्ता प्रामुख्याने पुढीलप्रमाणे १) सरंजामदारी व जमीनदारी सत्ता २) आर्थिक सत्ता ३) प्रशासकीय सत्ता ४) राजकीय सत्ता व ५) सांस्कृतिक सत्ता. या व्यवस्थेने ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य याना जीवनाच्या सर्व प्रकारच्या संधी प्राप्त करून दिलेल्या आहेत. मात्र शूद्रांना सर्व प्रकारच्या प्रगतीच्या सर्व वाटा रोखल्या आहेत. शूद्रांच्या विरोधात ब्राम्हणांनी अनेक कायदे बनविलेत. शूद्र जन्माने गुलाम व दास आहेत. त्यामुळे त्यांचे वर्णव्यवस्थेत शेवटचे स्थान आहे. शूद्रांचा सन्मान करू नये. शूद्रांच्या जीवाची कोणतीही किंमत नाही, शुद्रांना शिक्षण देवू नये, शूद्रांनी संपत्ती बाळगता कामा नये. शूद्राला राजपद देवू नये.[३९]

मनुवादी समाज रचना ही उभी आहे. ती समांतर नाही. कारण ते जन्माने व संस्काराने एकमेकांपासून वेगळे आहेत. ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हे उच्चवर्णिय या देशातील रहिवाशी नाहीत. त्यामुळे त्यांना आर्य म्हणून संबोधले जाते. आणि शूद्र हे या देशातील मूळ रहिवाशी आहेत. त्यांना अनार्य वा मूळ रहिवासी म्हणतात. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य या आर्यांची देशातील संख्या १५ टक्के आहे. ब्राम्हण ३.५%, क्षत्रिय ५.५% आणि वैश्य ६% असे १५% आहेत आणि शूद्रांची या देशातील संख्या ८५% आहे. शूद्रांना अनेक जातीत विभाजीत केले आहे. इतर मागास बलुतेदार –आलुतेदार जाती ज्यांची संख्या ५२% आहे. त्यातही मध्यम मागास जाती ज्यांची संख्या ८.३% आहे व अति मागास जाती ज्यांची संख्या ४३.७% इतकी आहे. असे मिळून इतर मागास जातींची संख्या ५२% आहे. त्यानंतर महार, मांग, चांभार, ढोर आदि अनुसुचित जाती त्यांची संख्या १५% आहे. त्याचबरोबर अनुसुचित जमाती यांची संख्या ७.५% आहे. अशी अनुसुचित जाती–

जमातींची संख्या २२.५% आहे आणि हे सर्व मिळून बहुजन बनतात. अशा या बहुजनांची संख्या ७४.५% आहे. त्याचप्रमाणे मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन, लिंगायत, पारशी आदि धर्मातील अल्पसंख्य यांची संख्या १०.५% इतकी आहे. अशा सर्व शूद्रांची म्हणजेच बहुजनांची संख्या ८५% इतकी आहे. या ब्राम्हण्यवादी समाज व्यवस्थेत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य हे १५% वाले या समाज व्यवस्थेचे लाभार्थी आहेत. तर इतर मागास बलुतेदार–आलुतेदार जाती, अनुसुचित जाती–जमाती व धार्मिक अल्पसंख्य आदि ८५% बहुजन समाज हा या मनुवादी समाज व्यवस्थेचा शिकार बनलेला आहे.[४०]

**१) सामाजिक सत्ता**

या देशातील शूद्र म्हणजे बहुजन समाज हा कधीच एकसंघ राहू नये. म्हणून त्याला अनेक जातीत विभाजित करण्यात आले आहे. ५२% असणारा इतर समुदायांमध्ये बलुतेदार आणि अलुतेदार समुदाय किंवा आगरी, कुणबी, कुंभार, यांसारख्या जातींचा समावेश होतो.तेली, माळी, साळी, सोनार, सुतार, लोहार, परीट, शिंपी, न्हावी, तांबोळी आणि कुरवाडी इत्यादी ३७४३ जातीत विभाजीत केल्या आहेत. तर महार, मांग, चांभार,भंगी, ढोर इत्यांदी १५% अस्पृश्य समाज हा ११०० जातीत विभाजित केला आहे.तो या व्यवस्थेत पिडीत असा आहे. तर भिल्ल, गौंड, गोवारी, कोळी आदि ७.५% आदिवासी, भटके विमुक्त समाज हा १६०० जातीत विभाजीत केला आहे. तो या मनुवादी व्यवस्थेत अत्यंत परावलंबी असा समाज आहे. आणि मुस्लीम, ख्रिश्चन,१०.५% धार्मिक अल्पसंख्याक समुदाय जसे की शीख, बौद्ध इत्यादी धर्मांतरित किंवा मनुवादी व्यवस्थेत शोषण होणारा असा शोषित समाज आहे. या ८५% समाजाला मनुवादी समाज व्यवस्थेत लाचार व गुलाम बनविले आहे. आज १५% मनुवादी या देशावर राज्य करीत आहेत.[४१]

**राज्यसत्ता, मनुवाद्यांचे संसदीय लोकशाहीतील प्रतिनिधीत्व**

या देशात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य हे १५ टक्के आर्य, मनुवादी, ब्राह्मणवादी या देशावर राज्य करीत आहेत. काँग्रेस, भाजपा, जनता दल, समाजवादी, साम्यवादी, समाजवादी जनता पार्टी हे सर्व मनुवादी राजकीय पक्ष आहेत. या सर्व पक्षांचे नेतृत्व हे ब्राम्हण्यवादी करीत आहेत. यांनी या देशातील ८५% बहुजन समाजाची फसवणुक करून त्यांना लाचार बनवून, त्यांचे शोषण करून त्यांना पिडीत अवस्थेत ठेवले व त्यांना परावलंबी बनवून भ्रष्ट मार्गाने, सत्ता, संपत्ती व दादागिरी

या मार्गाचा अवलंब करून ते या देशाचे शासक बनले आहेत, काँग्रेसने तर सतत बहुजनांची फसवणुक केली.[४२]

**ब्राम्हणांचे लोकसभेतील प्रतिनिधीत्व**

या देशात ब्राम्हण जातीची संख्या देशाच्या लोकसंख्येचा विचार करता केवळ ३.५ टक्के आहे. त्याना ३.५ टक्केच प्रतिनिधीत्व मिळणे आवश्यक आहे. त्या प्रमाणात लोकसभेत ब्राम्हणांचे प्रतिनिधीत्व हे १७ –१९ च्या दरम्यान असायला हवे. मात्र सन १९५२ च्या पहिल्या निवडणुकीत ब्राम्हणांचे लोकसभा सदस्य ४९९ पैकी २३० होते, सन १९६२ च्या निवडणुकीत ते ५१० पैकी २१० होते. १९६७ च्या निवडणुकीत ते ५२३ पैकी १९२ होते. १९७१ च्या निवडणुकीत ५२३ पैकी १७८ होते. सन १९७७ च्या निवडणुकीत ५४२ पैकी १३६ होते. सन १९८० च्या निवडणुकीत ५३० पैकी १९० होते. तर सन १९८४ निवडणुकीत ५४४ पैकी २३८ होते. सर्व ब्राम्हण्यवादी पक्षातून ब्राम्हण निवडून येत होते. अशा रितीने राजकारणात ३.५ टक्के असलेल्या ब्राम्हणाना ४१ टक्के प्रतिनिधीत्व प्राप्त होत होते. म्हणजेच ब्राम्हणांनी इतर मागास बलुतेदार–आलुतेदार बहुजन समाजाच्या मताच्या जोरावर त्यांच्याच २००–२२५ जागा बळकावल्या होत्या. याची जाणीव इतर मागासवर्गीयांना नाही. इतर मागास वर्ग बलुतेदार व आलुतेदार यांची संख्या ५२ टक्के असूनदेखील त्यांना या कालावधीत ८ टक्के म्हणजेच ५०–६० जागाच प्राप्त होत होत्या. प्रत्यक्षात त्यांना २८०–२८५ जागा प्राप्त होणे आवश्यक होते. या निवडणुकीत अल्पसंख्यांकाना ज्याची संख्या १०.५ टक्के होती त्यांना ३ टक्के म्हणजे १८–२०च जागा प्राप्त होत होत्या. मात्र प्रत्यक्षात त्यांना ५५ ते ६० पर्यंत जागा मिळणे आवश्यक होते. याचाच अर्थ असा की, अल्पसंख्याकाच्या देखील ४०–५० जागा ब्राम्हण लाटत होते.[४३]

**ब्राम्हणांचे राज्यसभेतील प्रतिनिधीत्व**

राज्यसभा या सभागृहात ३.५ टक्के असलेल्या ब्राम्हण समाजाचे राज्यसभेत केवळ ८–९ सदस्य आवश्यक होते. परंतु सन १९५२ ला २१६ पैकी ७०, १९५७ ला २३२ पैकी १०८, १९६० ला २३६ पैकी ११५, १९६४ ला २३८ पैकी १०२, १९६८ ला २३० पैकी १०४, १९७० ला २३८ पैकी ११३, १९७४ ला २४० पैकी ११२, १९८७ ला २४४ पैकी ८४, १९८० ला २४४ पैकी ८९ व १९८४ ला २४८ पैकी ११३ असे सदस्य होते. देशाच्या लोकसभेत व राज्यांच्या विधीमंडळातही ब्राम्हण सदस्य जास्त असल्याने त्यांना ही किमया साधता आली. ३.५ टक्के

असलेल्या ब्राम्हणाना ४२.५ टक्के प्रतिनिधीत्व प्राप्त झाले. मात्र ८५ टक्के असलेल्या बहुजनांचे त्यांनी १०० ते १०५ पर्यंत प्रतिनिधीत्व लाटले. मात्र बहुजनांना काहीच प्राप्त झाले नाही. तरीही बहुजनांना याची जाणीव नव्हती कारण तो राजकीयदृष्ट्या जागृत नव्हता. किंबहुना मनुवाद्यांनी त्यांना अज्ञानातच ठेवले होते.[४४]

**आर्थिक शक्ती**

मनुवादी समाज व्यवस्थेत उच्चवर्णियांनी सर्व प्रकारची आर्थिक साधने आपल्याकडे ठेवली होती. मनुस्मृती या मनुवादी कायदे संहितेद्वारे शूद्रांना उत्पन्नाची सर्व साधने नाकारली होती. आणि ती मिळविण्याचा प्रयत्न केला तर त्यासाठी या संहितेत कडक शिक्षा सांगण्यात आल्या होत्या. त्यामुळे तो आर्थिक क्षेत्रातही मागे पडला. स्वतंत्र भारतात मनुवादी शासकानी भारतीय राज्य घटना राबविलीच नाही. कारण या राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसुचित जाती–जमाती, इतर मागास व अल्पसंख्य समाजासाठी आर्थिक क्षेत्रात अनेक योजना सुचविल्या होत्या. भारत सरकारने अनेक पंचवर्षीय योजना राजविल्या, परंतु या बहुजन समाजाची म्हणावी तशी आर्थिक प्रगती साधता आली नाही. भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर अनुसुचित जाती व मुस्लीम यांच्या सर्व प्रकारच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी मा. गोपाल सिंग यांच्या अध्यक्षतेखाली १९८० मध्ये एक अभ्यास कमिटी नेमली. त्या कमिटीने संपूर्ण देशात २०० संशोधक नेमून त्याचा अभ्यास केला व त्याचा रिपोर्ट जून ८० मध्ये भारत सरकारकडे दिला. तो पुढील प्रमाणे होय., सन १९८० पर्यंत जवळजवळ देशाच्या पाच पंचवार्षिक योजना अंमलात आणल्या गेल्या, तरीही पा वर्गांना न्याय मिळाला नाही हे दिसून येते. याउलट उच्चवर्णीयांना या आर्थिक क्षेत्राचा प्रचंड मोठा लाभ देण्यात आला आहे. एकाच गोष्टीचे या ठिकाणी उदाहरण घेता येते. त्यावरून आपल्याला स्पष्ट दिसून येते की, शासकीय यंत्रणा पूर्णपणे उच्चवर्णीय जातीसाठी राबविण्यात आली आहे. मोठ्या उद्योग समुहाला शासकीय परवाना देतेवेळी हिंदु उच्चवर्णीयांनाच पूर्णपणे दिल्या आहेत. सन १९७९ मध्ये एकूण २६० मोठ्या उद्योगांना परवानें दिले. त्यापैकी उच्चवर्णीय हिंदु उद्योगपतींना २४७ म्हणजे ९५ टक्के परवाने दिले गेले तर मुस्लीम उद्योगपतींना ५, शीख उद्योगपतींना ५ व पारशी उद्योगपतींना ३ असे परवाने देण्यात आले. म्हणजे या प्रमाणात उद्योगधंद्यांना शासकीय सवलती प्राप्त होणार, मग त्या अर्थसहाय्याचा असो वा अन्य प्रकारचे जमीन, पाणी, वीज, तत्सम सोयी असोत. त्या सर्व सवलती उच्चवर्णीय हिंदु उद्योगपतींना प्राप्त

होणार, सन १९८० लाही तीच परिस्थिती दिसून येते. त्यावर्षी एकूण ३८६ परवाने देण्यात आले. त्यापैकी ३६१ परवाने हे हिंदु उच्चवर्णीय उद्योगपतींना देण्यात आले. त्याचे प्रमाण जवळ जवळ ९३.६ टक्के इतके होते. मुस्लीम उद्योगपतींना ६, शीख उद्योगपतींना १४, पारशी उद्योगपतींना १ व ख्रिश्चन–बौद्ध उद्योगपतींना ४ परवाने देण्यात आले व त्या प्रमाणात सवलती दिल्या. याचाच अर्थ असा की, देशाची तिजोरीही उच्चवर्णीयांसाठीच खर्च केली जाते हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही.[४५]

**प्रशासकीय सत्ता**

प्राचीन काळापासून ते आजतागायत भारतातील प्रशासन यंत्रणेवर 'ब्राम्हण' या वर्गाचे प्रचंड मोठे वर्चस्व होते व आजही आहे. प्राचीन काळात राजेशाहीत प्रशासकीय यंत्रणा ही पूर्णपणे ब्राम्हणांच्या हातात होती. त्यानंतर मोगलानी आक्रमण करून भारतात आपली सत्ता प्रस्थापित केली. या मुस्लीम आक्रमकांचे या देशात पहिल्यांदा कोणी स्वागत केले असेल तर ते ब्राम्हणांनी केले, हे सत्य होय, म्हणून मुस्लीम सत्ताधीश असले तरी प्रशासन यंत्रणा मात्र ब्राम्हणांच्या हातीच होती. त्यांना थोडा शह बसला तो ब्रिटिश या देशात आल्यानंतरच. कारण ब्रिटिशांनी भारतावर साम्राज्य उभे केले व स्वतःची प्रशासकीय यंत्रणाही बरोबर आणली आणि त्यांनी भारतातील समाज व्यवस्थेतील उपयुक्त असणाच्या समाज घटकांचा वापर करून घेतला. त्यामुळे ब्रिटिश काळात प्रशासन यंत्रणेबरोबर कायस्थ या जातीचे प्राबल्य होते. परंतु स्वातंत्र्यानंतर पुन्हा ब्राम्हणांनी भारतातील प्रशासन यंत्रणेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.[४६]

ब्रिटीश कालखंडात सन १९३५ च्या अहवालाप्रमाणे ब्रिटीश प्रशासन यंत्रणेत ब्राम्हणांचे प्रतिनिधीत्व केवळ ३ टक्केच होते. तेच मात्र स्वातंत्र्यानंतर सन १९८२ मध्ये ७० टक्के व सन १९९० मध्ये ७५ टक्के झाले. आजही ते सरासरी ६६ टक्के आहे. त्याशिवाय वैश्य, क्षत्रिय यांचे ३० टक्के आहे. अशा प्रकारे उच्चवर्णिय १५ टक्क्यांनी प्रशासनाच्या जवळ जवळ ९६ टक्के जागा हडप केलेल्या आहेत.[४७]

या देशात ५२ टक्के असलेल्या इतर मागास बलुतेदार–आलुतेदार बहुजन समाजाला प्रशासनातील स्वातंत्र्यपूर्व काळात, ब्रिटीश अंमलाखाली काहीच जागा मिळाल्या नव्हत्या, व आता स्वातंत्र्यानंतर १९८२ पर्यंत २ टक्के व सन १९९० पर्यंत ४ टक्केच जागा प्राप्त झाल्या. याचाच अर्थ असा की, मनुवाद्यांनी विशेषतः ब्राम्हण्यवाद्यांनी इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या इतर मागास

जातीच्या ४८% जागा लाटल्या हे दिसून येते. आणि याच ब्राम्हण्यवाद्यांनी इतर मागासवर्गीयांनाच मंडल आयोगाविरूद्ध उभे केले. व मंडल आयोगाविरूद्ध देशभर प्रचंड मोठी आंदोलने उभी केली. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश अंमलाखाली अनुसुचित जाती– जमातींचा प्रशासनात कोणताच सहभाग नव्हता. मात्र स्वातंत्र्यानंतर भारतात राज्य घटनेनुसार संसदीय लोकशाही सुरू झाली व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेत अनुसुचित जाती–जमाती यांच्यासाठी भारताच्या प्रशासनात राखीव जागेची तरतूद त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात केली. तरीदेखील प्रशासनातील मनुवादी ठेकेदारांनी त्यांच्या जागा भरल्या नाहीत. सन १९८२ ला केवळ ६ टक्के व सन १९९० ला कवेळ ८ टक्केच जागा भरल्या गेल्या. आजही प्रशासनात त्यांच्या जागा सरासरी ५ टक्केच भरल्या आहेत. म्हणजेच अनुसुचित जाती–जमातीच्या २२.५ टक्के जागापैकी ५ टक्केच जागा भरल्याने ब्राम्हण्यवाद्यांनी त्यांच्याही १७.५ टक्के जागावर डल्ला मारला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात मुस्लीमांचा प्रशासनात ३५ टक्के सहभाग होता. मुस्लीम राज्यकर्त्याकडून देशाची सत्ता ब्रिटीशांनी घेतलेली होती. अशी पार्श्वभूमी होती. त्यामुळे प्रशासनात त्यांचा चांगला सहभागही होता. परंतु स्वातंत्र्यानंतर त्यांचा सहभाग नसल्यासारखीच अवस्था आहे. कारण स्वातंत्र्यानंतर व भारताची राज्यघटना लागू झाल्यानंतर सन १९५० ला जे सर्वेक्षण झाले, त्यात मुस्लीम समाजाचा ४ टक्के प्रशासनात सहभाग होता. तो सन १९८२ ला त्यांचा प्रशासनात केवळ ३.५ टक्के सहभाग उरला. तो सन १९९० ला १ टक्के वर आला. आज सरासरीत तो १ टक्काही राहीला नाही. खरं वास्तविक धार्मिक अल्पसंख्य यांची लोकसंख्या१०.५२टक्के असताना त्यांचा १ टक्काही प्रशासनात सहभाग नाही. ही भारतीय संसदीय लोकशाही प्रणालीला लांच्छनास्पद गोष्ट आहे.[४८]

**जमीनदारी सत्ता**

स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत भारताच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात जमीन संपादनाचा अधिकार बहाल केला आहे. असे असूनही स्वतंत्र भारतात जमीनदारीचे प्रमाण उच्चवर्णीयांकडेच जास्त आहे. ब्राम्हणाकडे शिक्षण व पुरोहीतपण होते. तरी देखील त्यांच्याकडे देशातील ५ टक्के जमीन आहे. तर क्षत्रियाकडे सर्वात जास्त म्हणजे ८० टक्के जमीन आहे. आणि वैश्याकडे ९ टक्के जमीन आहे. या देशात ब्राम्हण ३.५ टक्के, क्षत्रिय ५.५ टक्के व वैश्य ६ टक्के असे उच्चवर्णिय १५ टक्के असताना त्यांच्याकडे देशातील एकूण ९४ टक्के जमीन आहे. ती त्यांनी बहुजनांची हडप केली आहे. या उलट या देशात इतर मागास जाती

बलुतेदार–आलुतेदार या ५२ टक्के आहेत. त्याच्याकडे मात्र केवळ ४ टक्के जमीन आहे. आणि अनुसुचित जातीची संख्या १५ टक्के असताना त्यांच्याकडे केवळ ०.५ टक्के जमीन आहे. तर देशातील अनुसुचित जमाती यांची संख्या ७.५ टक्के असताना त्यांच्याकडेही ०.५ टक्के जमीन आहे. आणि धर्मांतरीत धार्मिक अल्पसंख्य १०.५ टक्के असताना त्यांच्याकडे केवळ ६ टक्के जमीन आहे. याचा अर्थ असा की, मनुवादी समाज व्यवस्थेत सर्वप्रकारच्या सत्ता या मनुवादी उच्चवर्णियांच्या ताब्यात आहेत. १५ टक्के अल्पसंख्य मनुवाद्यांनी संख्येने जास्त असलेल्या ५२ टक्के बहुजनांची ७९ टक्के जमीन हडप केलेली आहे. आणि ही परिस्थिती बहुजनांची सत्ता आल्याशिवाय तीत बदल होणार नाही.

**सांस्कृतिक (धर्म, शिक्षण) अधिकार**

मनुवादी समाज व्यवस्थेत धर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कारण ही मनुवादी समाज व्यवस्था धर्माचा आधार घेवूनच घट्ट करण्यात आली. धर्माच्या नावावर धर्मग्रंथांना कायद्याचे स्वरूप दिले. व हे सर्व ग्रंथ लिहिण्याचा अधिकार ब्राम्हणाना दिला. ब्राम्हणांनी अनेक धर्मग्रंथ लिहिले.[४९] वेद त्यात ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद वगैरे व नंतर संहिता किंवा इतर धार्मिक ग्रंथ लिहीले. या धर्म ग्रंथांना ब्राह्मणांनी कायदेसंहितेचे स्वरूप दिले व ब्राह्मणांनी आपले कायदेसंहिता तयार करण्याचा अधिकार आपल्याकडे घेतला. दुसरी गोष्ट ही की शुद्राच्या विरोधात ब्राह्मणांना जे अधिकार प्राप्त झाले आहेत ते अन्य वर्णियांना नाहीत. शूद्राने ब्राह्मणांविरुद्ध गुन्हा केल्यास त्याची शिक्षा अधिक कठोर असते. क्षत्रिय आणि वैश्य यांच्या विरुद्धच्या केलेल्या गुन्ह्यांसाठी शिक्षा कडक नसते. यज्ञासाठी किंवा इतर वैयक्तिक कारणांसाठी ब्राह्मण शूद्राची मालमत्ता हडप करू शकतो. पण इतर जातींना अधिकार नाहीत. म्हणजे मनुवादी नियमानुसार ब्राह्मणांसाठी विशेष पक्षपातीपणा आहे. किंवा उच्चवर्णीयांमध्ये ब्राह्मणांना क्षत्रिय आणि वैश्य यांच्यापेक्षा अधिक अधिकार आहेत. शूद्रांना नीच समजले असते, पण ब्राह्मणांचा नीचपणा हा कायमचा कठोर केला. शूद्र महानता प्राप्त करू शकत नाही. यापेक्षा अन्याय काय असू शकतो? शूद्रांना बळजबरीने कनिष्ठ केले गेले यासाठी ब्राम्हणांनी अनेक क्लृप्त्या लढविल्या. धर्मग्रंथ, वेद, संहिता, धर्मसूत्रे, स्मृत्या या कायदेसंहिता माणूस निर्मित नसून ईश्वर निर्मित आहेत. त्यामुळे त्यात माणसाला बदल करता येत नाही. आणि ब्राम्हण हा पृथ्वीतलावरील देवच असल्याने त्याच्या आज्ञा म्हणजे देवाच्या आज्ञा समजाव्यात.[५०] या कायदे संहितेद्वारे शिक्षणाची मक्तेदारी आपल्याकडे घेतली. इतरानी

शिक्षण घेतले तर त्यांना कडक शासनाची शिक्षा सांगितली. शूद्राना तर तो अधिकार पूर्णपणे नाकारला. अशाप्रकारे धर्म व शिक्षण याद्वारे सांस्कृतिक सत्ता शंभर टक्के आपल्याकडे केंद्रीत केली. म्हणून धर्मसत्ता ही १०० टक्के ब्राम्हणांकडे होती व आजही आहे.

**बहुजनांची शैक्षणिक अवस्था**

मनुवादी समाज व्यवस्थेत शिक्षणाचा पूर्ण अधिकार केवळ ब्राम्हणाकडे एकवटला आहे. राजा असेल तरीही त्याला मनुवादी समाज व्यवस्थेत शिक्षणाचा अधिकार नव्हता. आणि जर एखाद्याने शिक्षण घेतले तर त्याला कडक शिक्षा ठेवली होती. एखाद्या शूद्राने वेद जरी ऐकले तरी त्याच्या कानात तप्त शिशाचा रस ओतण्याची, वेद म्हटले तर जीभ छाटण्याची शूद्राना शिक्षा ठोठावली होती. त्यामुळे या देशातील शूद्र हे अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडत पिढ्यान् पिढ्या अज्ञानी राहीले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेतच सर्वांना शिक्षण द्यायची तरतूद केली. त्यामुळे या देशात बहुजन समाज शिक्षण घेवू लागला. तरीही या देशातील शूद्रातिशूद्र बहुजनांच्या पदरात म्हणावे तसे शिक्षण पडले नाही. हे खालील तक्त्यावरून दिसून येईल. १५ टक्के उच्चविर्णयांनी या देशातील ७८ टक्के शिक्षणाचे फायदे उपटले, तर ८५ टक्के असलेल्या बहुजनांच्या पदरात केवळ २२ टक्केच शिक्षण पडले. ३ टक्के ब्राम्हणांनी ५० टक्के शिक्षणाचे फायदे घेतले. ५.५ टक्के क्षत्रियांनी १६ टक्के तर, ६ टक्के वैश्यानी १२ टक्के शिक्षण पदरात पाडून घेतले.[५१] याउलट ५२ टक्के इतरमागास जातीनी १२ टक्के, १५ टक्के अनुसुचित जातीनी ६ टक्के, ७.५% आदिवासीनी २ टक्के शिक्षण घेतले. तर अल्पसंख्य हे १०.५ टक्के असूनही शिक्षणाचे प्रमाण २ टक्केच झाले आहे. यावरून आजही या देशात शिक्षणाची मक्तेदारी मनुवादी उच्चवर्णियांकडेच आहे हे नाकारता येत नाही. या वरील मुद्द्यांच्या आधारे प्रशिक्षण वर्गात बहुजन समाजाचे उद्बोधन करण्यात येत असे. याशिवाय काही अर्थपूर्ण घोषणाही काशीरामानी तयार केल्या होत्या या घोषणा बहुजन समाजात खूप लोकप्रिय झाल्या.त्या घोषणा पुढीलप्रमाणे आहेत.

बी.एस.पी. आई है। नई रोशनी लाई है।।

बाबा तेरा मिशन अधुरा। बी. एस. पी. करेगी पूरा।।

बसपा के तीन कप्तान। दलित, पिछड़ा और मुसलमान ।।

बी.एस.पी. की क्या पहचान। नीला झंडा, हाथी निशान।।

बी.एस.पी. क्या करेगी। समता का संघर्ष करेगी।।

महापुरुषों के सन्मान में। बी. एस. पी. मैदान में।।

जिसकी जितनी संख्या भारी। उसकी उतनी भागीदारी।।

धन, धरती और कुर्सी बाँटो। बाद में आरक्षण छाँटो।।

जो बहजन की बात करेगा। वह दिल्ली पर राज करेगा।।

वोट हमारा, राज तुम्हारा। नहीं चलेगा, नहीं चलेगा।।

जो जमीन सरकारी है। वह जमीन हमारी है।

बी. एस. पी. का नारा है। भारत देश हमारा है।।

एस. सी., एस. टी., ओबीसी। भारत के मूल निवासी ।।

चलेगा हाथी उडेगी धुल। न रहेगा पंजा, न रहेगा फूल ।।

नोट भी देंगे, बोट भी देंगे। बी. एस. पी. को चुनकर देंगे।।

वोटोंवाला जीतेगा। नोटों वाला हारेगा।।

देश की रक्षा करनेवालो। वोट की रक्षा कौन करेगा।।

जो हिटलर की चाल चलेगा। वह हिटलर की मौत मरेगा।।

बी. एस. पी. के वास्ते। खाली कर दो रास्ते ।।

हाथी को वोट दो। बाकी सबको चोट दो।।

जो हमसे टकरायेगा। मिट्टी में मिल जायेगा।।

बी. एस. पी. को चुनकर दो। रोजी रोटी मकान लो।।

संविधान की सम्मान में। बी. एस. पी. मैदान में।।

बहुजनों का सच्चा साथी। अपना हाथी, अपना हाथी।।

बी. एस. पी. को लायेंगे। बहुजन खुशी मनायेंगे।।

हारेगा भाई हारेगा। नोटों वाला हारेगा।।

काँग्रेस भाजपा देखी है। बी. एस. पी. अभी बाकी है।।

आम्बेडकर, फुले, शाहू जिंदाबाद। मनुवाद मुर्दाबाद, मुर्दाबाद।।

जयभीम का नारा गुंजेगा। भारत के कोने कोने में।।

मंडल आयोग लागू करो। वर्ना खुसर्सी खाली करो।।

आरक्षण कोई भिक नहीं। यह संवैधानिक अधिकार है।।

बी. एस. पी. की टक्कर में। चमचे पड़ गये चक्कर में।।

गली गली में शोर है। हाथी का ही जोर है।।

जो सरकार निकम्मी है। वह सरकार बदलनी है।।

ब्राम्हणवाद ने क्या किया। देश को बरबाद किया।।

आर्य पुत्र होश में आओ, होश में आओ। दास प्रथा खत्म करो, खत्म करो ।।

बहुजन भाई जागेगा। मनुवादी भागेगा।।

ब्राम्हणवादी होश में आओ। बहुजन से मत टकराओ।।

आप अपना अधिकार लेकर रहेंगे. मत सोचो, मत सोचो.

हमें नहीं तो तुम्हें नही। चैन नहीं आराम नही।।

बहुजन समाज जागेगा। चोर लुटेरा भागेगा।।

दास पुत्रों शर्म करो। दास प्रथा को खत्म करो।।

अशा विचारप्रवर्तक घोषणांनी बहुजनांचे प्रबोधन केले आणि बहुजन समाज बनविण्यास मदत केली. या सर्व घोषणा अत्यंत महत्त्वाच्या होत्या. या घोषणामधून काशीरामांचे बहुजनवादी राजकीय तत्वज्ञान प्रतिबिंबित होते. काशीरामजींनी त्यांच्या सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी विविध माध्यमांचा वापर केला. वॉलपेपर, सायकल रॅली, मोठ्या वाहनांद्वारे प्रचार दौरे, जनजागृती मोहीम, परिषदा, जाहीर सभा, सभा, परिसंवाद आदींद्वारे बहुजन विचारसरणीचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यात काशीरामजी यशस्वी झाले. चिकाटी, सातत्य, अर्थव्यवस्था, सुस्पष्टता, एकमत, प्रसंगनिष्ठ सापेक्षता आणि अचूकता ही त्यांच्या विचारप्रसार तंत्राची प्रमुख वैशिष्ट्ये होती. वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, हँडबिल्स, भित्तीपत्रके, झेंडे, बॅनर इत्यादी साधनांचा त्यांनी प्रचारासाठी प्रभावीपणे वापर केला. काशीरामनी बहुजन समाजात स्वावलंबी चळवळीचा प्रसार करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यासाठी पुढील पिढीला अनमोल मार्गदर्शन केले आहे.

**काशीराम बहुजन राजकारण दलित, शोषित, समाज संघर्ष समितीची स्थापना**

बामसेफ हे सरकारी कर्मचाऱ्यांचे संघटन असल्याने त्यांच्यावर खूप बंधने होती. त्यामुळे बहुजन समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी बामसेफ रस्त्यावरचा संघर्ष करू शकत नव्हती. परंतु काशीरामांना जास्तीत–जास्त बहुजन समाजाचे समर्थन मिळविण्यासाठी रस्त्यावरचा संघर्ष करणे आवश्यक वाटत होते. शिवाय सरकारी कर्मचारी उघडपणे राजकारणात सहभागी होऊ शकत

नव्हते. या सर्व कारणांमुळे काशीरामांनी एक लढाऊ व आंदोलनकारी संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९ जुलै १९४२ रोजी अनुसूचित जाती संघटना नावाची संघटना स्थापन केली होती. त्याच धर्तीवर काशीराम यांनी डी.एस.फोर (DS4) नावाची संघटना काढण्याचा विचार केला. डि.एस.फोर. याचा अर्थ दलित शोषित समाज संघर्ष समिती असा होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्यतिथीला ६ डिसेंबर १९८१ रोजी त्यांनी डीएसफोर (DS4) नावाच्या लढाऊ सामाजिक संघटनेची स्थापन केली.[५२] ही संघटना स्थापन करण्याचा उद्देश संघर्षातून शक्ती जन्माला येते हे तत्व होते. म्हणजे काशीरामानी रस्त्यावरचा प्रत्यक्ष सामाजिक, राजकीय संघर्ष करण्यासाठी या संघटनेची निर्मिती केल्याचे दिसून येते. बहुजन समाजाच्या अनेक समस्या होत्या त्यासाठी संघर्ष करणे आवश्यक होते. सत्ताधारी लोकांना बहुजन समाजाच्या समस्यांची जाणीव करून देण्यासाठी डीएसफोरच्या माध्यमातून अनेक संघर्ष करण्यात आले. या संघर्षामुळे बहुजन समाज डीएसफोरकडे आकर्षित होऊ लागला. पंजाब, उत्तरप्रदेश, बिहार व हरियाणापर्यंत या संघटनेचे जाळे पसरले. Limited Political Action म्हणजेच मर्यादित राजकीय कृती करण्यास ही डि.एस.फोर.ने सुरूवात केली. कारण बामसेफच्या माध्यमातून एका बाजूस गैर राजकीय मुळे भक्कम करायची व दुसऱ्या बाजूस मर्यादित राजकीय कृती करायची, असे काशीरामांनी ठरवले. डिएसफोरचा सभासद कोणताही सरकारी कर्मचारी होऊ शकत नव्हता. कारण ही संघटना राजकीय पक्षच होती. उत्तरप्रदेश, पंजाब, मध्यप्रदेश आणि हरियाणा मध्ये बहुजन समाज पक्षाच्या स्थापनेपूर्वी या संघटनेने अनेक निवडणुकाही लढवल्या. काशीराम यांनी या संघटनेच्या स्थापनेमागे पुढील उद्दिष्टे दिली. १. सामान्य जनतेशी संपर्क साधणे. २. दलित आणि मागासलेल्या लोकांमध्ये सामाजिक परिवर्तनाची इच्छा/चेतना निर्माण करणे. ३. दलित–शोषित समाज विद्यार्थी महिला आणि इतर अशिक्षित समाजांना एकत्र आणणे.

वरील उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी काशीराम यांनी दोन नारे दिले. १. 'वोट हमारा राज तुम्हारा नाही चलेगा, नही चलेगा' २. 'जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागीदारी' यालाच काशीरामानी सामाजिक न्याय म्हटले. काशीराम यांनी या संघटनेचे ०९ स्वतंत्र विभाग विकसित केले. १. जागृती जथा २. सहकार ३. पत्र प्रकाशन ४. संसदीय संपर्क संस्था ५. कायदेशीर मदत आणि सल्लागार ६. युवा मोर्चा ७. विद्यार्थी मोर्चा ८. कृषी कामगार मोर्चा आणि ९. औद्योगिक कामगार संघटना.[५३]

या सर्वच विभागांचे संचलन स्वतः काशीराम करीत असत. यासर्व विभागांपैकी जागृती विंग सर्वांत महत्त्वाची मानली जात होती. कारण या विंगच्या माध्यमातून गावा–गावांमध्ये जागृती कार्यक्रम राबविले जात. त्यामध्ये जागृती गीत, नाटक, रंगारंग कार्यक्रम करून लोकांना संघटित केले जाते असे. प्रत्येक विंग अतिशय तन्मयतेने काम करीत. सुरुवातीला मायावती या अशाच महिला विंगच्या संयोजक म्हणून कार्य करीत होत्या. डिएसफोर या संघटनेच्या माध्यमातून देशभर सायकल रॅलीही काढण्यात आली. प्रत्येक सायकलवर एक निळा झेंडा लावून गावा–गावामध्ये लोकांना जागृत करण्याचे काम काशीरामांनी केले. डिएसफोरच्या या सायकल रॅलीचा प्रभाव लोकांवर इतका पडला की, मोठ्या संख्येने लोक या संघटनेशी जोडले गेले. दलितांमधील नष्ट झालेल्या स्वाभिमान परत जागृत करण्याचा प्रयत्न डिएसफोरच्या माध्यमातून काशीरामांनी केला. १९८२–१९८३ च्या कालावधीमध्ये दिल्ली महानगर, हरियाणा व जम्मू काश्मीर या राज्यातील निवडणूकांमध्ये डिएसफोरला फारसे यश मिळाले नाही. परंतु काशीरामांच्या नेतृत्वामध्ये दलितांची एक राजकीय शक्ती उदयास येत आहे, असा संदेश दलित व शोषित समाजापर्यंत पोहचविण्यात ते यशस्वी झाले.

१८ मार्च १९८२ रोजी उत्तरप्रदेशातील आग्रा येथे बामसेफ आणि डीएसफार यांचे संयुक्त अधिवेशन घेण्यात आले. ज्यामध्ये ५० हजारांहून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते. आग्रा येथे डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेल्या विधानांकडे बहुजन समाजाचे लक्ष वेधण्यासाठी काशीराम यांनी हे संयुक्त अधिवेशन आयोजित केले होते. ही संघटना विविध धर्माच्या लोकांची होती. म्हणूनच काशीराम यांनी ९ ऑक्टोंबर १९८२ रोजी अलिगढमध्ये घोषणा दिली दलित–मुस्लिम–शीख–ईसाई लुटे–पिटे सब भाई भाई त्यामुळे या संघटनेचे सदस्य फक्त ब्राह्मणेतरच होऊ शकत होते. यावर जोर देण्यासाठी एक घोषणाही देण्यात आली. 'क्षत्रिय ब्राह्मण आणि बनिया छोड बाकी सब डिएसफोर'[५४] ही संघटना स्थापन करून त्यांनी आंबेडकरी विचारधारा संपूर्ण देशभर पसराविण्यासाठी सायकलीचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यास सुरुवात केली, कारण त्यावेळी बहुजन समाजात केवळ लहान सायकलीच मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत्या. या संघटनेचे लोक निळे झेंडे घेऊन सायकलवरून घरोघरी आपला संदेश देत असत. 'दो पहिये, दो पैर' ही प्रबोधनात्मक गाणी खूप लोकप्रिय झाले.[५५] ते स्वत: ते गाणे गात आणि संपूर्ण गटही ते गाणे गात. त्यामुळे खेड्यातील लोक त्यांच्याकडे आकर्षित व्हायचे. या संघटनेच्या माध्यमातून ६ डिसेंबर

१९८२ ते १५ मार्च १९८३ या कालावधीत भारताच्या एका कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात सायकल मार्चच्या माध्यमातून बहुजन समाजात एक विशेष चळवळ निर्माण करण्यात आली. या महामार्चमध्ये १.५ कोटी रुपये खर्च झाले आणि ३०.५० लाख कामगार त्यात सहभागी झाले.

या संस्थेच्या 'दो चक्का और दो पाँव' या सामाजिक कार्यक्रमांतर्गत १५ मार्च १९८३ ते २४ एप्रिल १९८३ पर्यंत ४० दिवसांत ३२०० कि.मी.चा प्रवास केला. संपूर्ण भारतभर सायकल मार्च काढण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर समान दर्जा मिळवण्यासाठीचा संघर्ष बहुजनसमाज आणि नेते करू शकले नाहीत. तो करण्याचा प्रयत्न काशीरामानी केल्याचे दिसून येते. या संघटनेला इतके बळ मिळाले, कारण ब्राह्मणांपेक्षा कमकुवत दलित, उच्चवर्णीयांच्या विरोधात छाती ठोकून उभे राहिले. बहुजनासाठी ही परिस्थिती अतिशय प्रेरणादायी होती.

डीएसफोरचे राजकारण अतिशय आक्रमक त्यामुळे तरुण वर्गाला आकर्षित करणारे होते. अतिशय संवेदनशील घोषणा देत या संघटनेचे कार्यकर्ते गावोगावी शिरायचे. 'तिलक, तराजू और तलवार इनको मारो जुते चार' या घोषणा ऐकून बहुजन वर्ग काशीरामासाठी वेडा व्हायचा. अशाच घोषणांनी काशीराम बहुजनांचे नेते बनले. पण काशीरामांच्या अशा घोषणांमुळे भारतीय समाजव्यवस्थेत जाती जातीत संघर्षाची भावना निर्माण झाली. अशी टीका काशीरामांवरती करण्यात येते. बामसेफही संघटना आर्थिक पाठबळ देणाऱ्या सुशिक्षित कर्मचाऱ्यांची संघटना होती परंतु डीएसफोर या संघटनेने सामाजिक बदलासाठी संघर्ष केला. डीएसफोची स्थापना करून त्यांनी सामाजिक जाणीव निर्माण केली. काशीरामाचे ध्येय सत्ता मिळविण्यासाठी नव्हते तर, बहुजन समाजाचे संघटन करणे होते. त्यासाठी बहुजन समाजामध्ये या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय जागृती करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. डीएसफोर या संघटनेने ६ डिसेंबर १९८१ ते १३ एप्रिल १९८४ पर्यंत काम केले. डिएसफोर ही संघटन Short Term Political Action साठीच स्थापन करण्यात आले होते. Long Term Political Action घेण्यासाठी एखादी राजकीय संघटना असावी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही म्हटले होते की, राजकीय सत्ता ही सर्व समस्येची गुरू किल्ली आहे. म्हणून काशीरामानी राजकीय पक्ष काढण्याचा निर्णय घेतला. १४ एप्रिल १९८४ रोजी बहुजन समाज पक्षाची स्थापना झाली.[५६] दलितांच्या अनेक समस्या होत्या त्यासाठी संघर्ष करणे आवश्यक होते. सत्ताधारी लोकांना दलितांच्या समस्यांची

जाणीव करून देण्यासाठी डीएसफोरच्या माध्यमातून अनेक संघर्ष करण्यात आले. या संघर्षामुळे दलित समुदाय डीएसफोरकडे आकर्षित होऊ लागला.

२४ सप्टेंबर १९८२ ला 'पुणे करार'ला पन्नास वर्ष पूर्ण होणार होते. म्हणून काशीरामांनी डिएसफोर च्या माध्यमातून पुणे करार धिक्कार परिषदांचे आयोजन केले. जो पुणे करार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर दबाव आणण्यात आला होता. ज्या पुणे कराराचा स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निषेध केला होता, ज्या पुणे करारामुळे दलित समाजामध्ये एजंट व चमचे तयार झाले होते.[५७] त्या पुणे कराराचा धिक्कार कार्यक्रम करण्याचा निर्णय काशीरामानी घेतला. पुणे करार धिक्कार परिषदेचा शेवट २४ ऑक्टोंबर १९८२ ला पंजाबमधील जालंधर शहरात करण्यात आला. या पुणे करार धिक्कार परिषदांची देशभर खूप चर्चा झाली. काशीराम आणि डिएसफोर या संघटनेची वेगळी ओळख निर्माण झाली. पुढे अनेक प्रकारच्या जनसंसदा, अधिवेशने, तीन हजार किलो मीटरच्या सायकल मार्च, निश्चय दिवस, अन्याय मुक्ती आंदोलने, आत्मसन्मान रॅली, सामाजिक कृती अभियान असे अनेक उपक्रम डीएसफोरच्या माध्यमातून राबविण्यात आले. पुणे करार धिक्कार परिषदेचा कार्यक्रम या संघटनेमार्फत संपूर्ण भारतभर घेण्यात आला. यानंतर काशीराम यांनी या संस्थेला चार कलमी कार्यक्रम दिले. १. तात्काळ म्हणजे सामाजिक कृती. २. अल्पकालीन म्हणजेच मर्यादित राजकीय कृती. ३. दीर्घकालीन म्हणजेच संपूर्ण राजकीय कृती. ४. कायमस्वरूपी म्हणजे. सांस्कृतिक बदल आणि नियंत्रण. परंतु निवडणुकांच्या रिंगणात डिएसफोर फार प्रभाव पाडू शकली नाही. म्हणून काशीरामांनी राजकीय पक्ष काढण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १४ एप्रिल १९८४ रोजी 'बहुजन समाज पक्षाची' स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शासनकर्ती जमात बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने बहुजन समाज पक्षाने पुढील वाटचाल सुरू केली. बहुजन समाज पक्षाच्या माध्यमातून दलित, शोषित समाजाला शासक वर्ग बनविण्यासाठी काशीरामांनी आयुष्यभर संघर्ष केला.

### काशीरामांच्या बहुजन राजकारण BSP ची स्थापना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या स्वतंत्र राजकीय हक्कांना आकार देताना पहिल्यांदा १५ ऑगस्ट १९३६ रोजी, स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. नंतर १९४२ रोजी अनुसूचित जाती महासंघ (SCF) स्थापन केला. आधी स्वतंत्र निवडणुका मग मतदानाचा अधिकार त्यानंतर स्वतंत्र आणि स्वावलंबी राजकीय पक्ष, स्वतंत्र कामगार पक्ष आणि अनुसूचित जाती

संघटना निर्माण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना वेगळी ओळख दिली. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना डॉ. आंबेडकरांनी जातीच्या आधारावर झाली नाही तर वर्गाच्या आधारावर केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतरच्या दलित नेतृत्वाने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, दलित पँथरची स्थापना करून दलित जातीबरोबर इतर मागासवर्ग जोडून दलित आत्मनिर्भर राजकीय पक्ष निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात फारसे यश मिळाले नाही. या कारणास्तव भूतकाळातील धडा घेऊन काशीराम यांनी आपला स्वावलंबी राजकीय पक्ष स्थापन करण्यापूर्वी बहुजन समाज ही संकल्पना आपल्या सामाजिक पायाचा विस्तार करण्यासाठी परिभाषित केली. या संकल्पनेत त्यांनी दलितांना केंद्रस्थानी ठेवले असले तरी आजूबाजूला त्यात मागास जाती आणि अल्पसंख्याकांचाही समावेश करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी प्रथम त्यांच्या कर्मचारी संघटनेत BAMCEF हा प्रयत्न केला आणि नंतर तो डीएसफोर आणि राजकीय पक्ष बहुजन समाज पक्षामध्ये सुरु ठेऊन बहुजनवाद भारतीय समाजात वाढविला. ज्या उत्तरप्रदेश राज्याने भारताला ४–४ ब्राह्मण पंतप्रधान दिले त्याच राज्यात काशीरामाना बहुजनवादाच्या नाऱ्याचा प्रयोग करावयाचा होता. याबाबत त्यांनी स्वतः सांगितले की, 'मी यूपी (उत्तरप्रदेश) वर लक्ष केंद्रित केले आहे, कारण हे राज्य ब्राह्मणवादाचे पाळणाघर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय वाटचालीत आलेले अनुभव काशीरामानी त्यांच्या संघर्षात शस्त्र म्हणून वापरले. हे काम ते एकटे किंवा एका जातीला सोबत घेऊन करू शकत नाही, हे त्यांना माहीत होते. म्हणूनच १५ विरुद्ध ८५% असा नारा देण्यात आला, आणि दलित–मागास आणि धर्मांतरित अल्पसंख्याकांचा समावेश करून बहुजन समाज असे नाव देण्यात आले.[५८] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले होते की, भारतीय राज्यघटनेत बहुजनांनी दिलेले कायदेशीर हक्क अंमलात आणण्यासाठी बहुजनांना केंद्रात आणि राज्यात सत्ता मिळणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते, जे त्यांच्या निधनामुळे अपूर्ण राहिले. काशीरामानी बहुजन समाजाला जागृत करून बाबासाहेबांचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्याचे ठरवले.[५९]

'बसपा'ची भूमिका स्पष्ट करताना काशीराम असे सांगत की, ''बसपा हा पक्ष उच्चवर्णीय समाजाचा विरोधक नाही, उच्चवर्णीय हिंदू समाज जो कोणी मनुवादी व्यवस्थेवर विश्वास ठेवतो, तथाकथित कनिष्ठ समजल्या गेलेल्या जाती समुदायाबाबत कपट आणि कारस्थान करतो व

त्यांना कमजोर करण्याचा प्रयत्न करतो, अशा प्रवृत्तीला बसपाचा विरोध आहे.''[६०] काशीराम संघर्षाशिवाय राजकीस सत्ता प्राप्त होत नाही असे नेहमी मत मांडत.[६१]

१८ ऑगस्ट २००२ रोजी गुजरातमधील राजकोट येथील देबर चौकातील रॅलीत त्यांनी आपल्या चळवळीची तीन ध्येये निश्चित केली.

१. देशातील सर्वात मोठे राज्य असलेल्या उत्तर प्रदेशमध्ये राज्यकर्ते बनणे.

२. बहुजन समाजाला समाजाचे राज्य बनवणे. संपूर्ण देशात सत्ताधारी समाज बनविणे.

३. भारताला बौद्ध बनविणे.

ऑक्टोंबर १९८६ रोजी जारखर गावातील बसस्थानकाजवळ झालेल्या सभेत काशीराम म्हणाले, ''आमचा संघर्ष फक्त बहुजनांना राज्यकर्ते करण्यासाठी आहे.[६२] त्यामुळेच त्यांनी बहुजनांमध्ये राज्यकर्ते होण्याची इच्छा निर्माण केली. या त्यांच्या वाटचालीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या राजकीय पक्षात ८ वर्षे सक्रीय कार्यकर्ता म्हणून काम केलेला अनुभव उपयोगी ठरल्याचे दिसून येते. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय वारशाचे प्रतिक असलेली रिपब्लिकन पार्टी ही काशीरामाची राजकीय प्राथमिक शाळा व प्रयोगशाळा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर त्यांच्या चळवळीची गती स्वार्थी नेत्यांनी कमी केल्याचे दिसून येते. त्याचाच परिणाम म्हणजे RPI. या पक्षाचे तुकडे झाले. आपला राजकीय पक्ष स्थापन करण्यापूर्वी काशीराम डीएसफोर म्हणजे दलित–शोषित समाज संघर्ष समिती आणि BAMCEF म्हणजेच अखिल भारतीय मागास (SC/ST आणि मागास) आणि अल्पसंख्याक समुदाय कर्मचारी महासंघ या संघटनांच्या माध्यमातून संपूर्ण देशातील बहुजन समाजातील लोकांच्यामध्ये बिगर–सामाजिक, बिगर राजकीय संघटना तयार करून बहुजनांमध्ये राजकीय चेतना निर्माण केली. काशीराम यांचे असे म्हणणे होते कि, ''बहुजन समाज पार्टी भारताचा असा हत्ती आहे कि ज्याला स्वतःला आपल्या ताकतीची कल्पना नाही. जून १९८२ मध्ये, D.S.Four संघटनेने मर्यादित कृती अंतर्गत हरियाणा प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाग घेतला, ज्याचा उद्देश होता. स्वतःचे (निवडणूक) तिकीट निर्माण करणे आणि दलित शोषित समाजाची एका राष्ट्रीय पातळीवरील राजकीय पक्षाची निर्मिती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही वाटले नसेल की अनुसूचित जातींना नोकऱ्यांमध्ये दिलेल्या आरक्षणाच्या गर्भातून दलितांसाठी राजकीय पक्ष जन्माला येऊ शकतो. शतकानुशतके मागासलेल्या आणि विखुरलेल्या समाजाला

एकत्र आणण्यासाठी काशीरामानी बहुजन समाजाची कल्पना केली. काशीरामानी आरक्षणाचा लाभ झालेल्या वर्गात जनजागृती करून आपली चळवळ पुढे नेली आणि बहुजन समाजाची कल्पना साकारली. त्यामुळे भारतातील दलित–शोषित–उपेक्षित समाजाला त्यांनी त्यांच्या राजकीय पक्षाचा स्वीकार करण्यासाठी तयार केले. त्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल १९८४ रोजी दिल्लीतील व्होट क्लब येथे आयोजित कार्यक्रमात बहुजन समाजाच्या राजकीय चेतना देण्यासाठी बहुजन समाज पक्ष या राजकीय पक्षाची स्थापन केली.[६३] बहुजन समाज पक्षाचा जन्म BAMCEF च्या उदरातून झाला होता, ज्याचा मूळ उद्देश ब्राह्मणवादी व्यवस्थेच्या जागी मानवतावादी व्यवस्था निर्माण करणे हा होता, म्हणजेच बहुजन समाज पक्षाची स्थापना, ब्राह्मणवादी संस्कृती संपवून मानवतावादी संस्कृती निर्माण करणे. म्हणजेच आंबेडकरवादाची स्थापना करण्याचे काम काशीरामनी केले. १९८६ मध्ये बहुजन समाज पक्षाला निवडणूक आयोगाकडून निळा झेंडा व हत्ती निशाण मिळाले.[६४]

काशीरामानी बहुजन समाज पक्षाची स्थापना सामाजिक परिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एका मिशन अंतर्गत केली. काशीरामांच्या विचारानुसार बहुजन समाज पक्ष हे आमचे ध्येय नसून मिशन चालवण्याची चळवळ आहे. ज्यांना ६००० जातींमध्ये (जाती) विभागून निरुपयोगी बनवले आहे. त्या लोकांचा पक्ष आहे. या हजारो तुकड्यांना जोडून बहुजन समाज निर्माण करावा लागेल.[६५] काशीरामनी बहुजन समाज पक्ष राजकारणासाठी नाही तर बहुजनांना देशाचा शासक बनवण्यासाठी स्थापन केला. म्हणजे बहुजन समाज पक्ष हा परिवर्तनवादी पक्ष आहे, काशीरामनी दलितांना व बहुजनाना बहुजन समाज पक्षाच्या रूपाने स्वतंत्र राजकीय पर्याय दिला. B.S.P. च्या सामाजिक व राजकीय चळवळीमुळे बहुजन समाजाला नवे बळ मिळाल्याचे दिसून येते. १९८४ मध्ये त्यांनी 'बाबा तुम्हारा मिशन अधुरा, B.S.P. करेगी पुरा, बसपा पूर्ण करेल' असा नारा दिला होता. काशीरामनी आंबेडकरवादाचे तीन एम शत्रू ओळखले. ते म्हणजे, १. तीन एम दुश्मण १. मनी, २. मिडिया, ३. माफिया यांचा सामना करण्यासाठी काशीरामांनी तीन मित्रांचा शोध घेतला. ते तीन एफ मित्र म्हणजे १. फूड, २. फ्रेंड, ३. फंड.[६६] डॉ. बाबासाहेब आंबेडकर २५ एप्रिल १९४८ रोजी लखनौ येथे म्हणाले होते, राजकीय सत्ता ही सर्व सामाजिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे आणि अनुसूचित जातींना तेव्हाच मुक्ती मिळू शकते जेव्हा ते तिसरा पक्ष म्हणून संघटित होऊन सत्ता काबीज करून प्रस्थापित राजकीय पक्षामधील संतूलन आपल्या

हातात घेतील. काशीरामांचा असा विचार असा होता की, जर ब्राह्मण १०% पेक्षा कमी असले तरी ५० वर्षे सत्तेवर राहू शकतात तर १३–१४% दलित का नाही? ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, चामार आणि जाटव या जाती दलित चळवळीच्या केंद्रस्थानी राहिलेल्या आहेत. याच आधारावर देशातील चामार आणि जाटव जाती बहुजन समाज पक्षाचा मूळ पाया बनल्या. कदाचित याच कारणामुळे १९८५ मध्ये उत्तरप्रदेशात चिडून काँग्रेसवाल्यांनी तर बहुजन समाज पक्षाला चमारांचा पक्ष म्हणून हिणविले. काशीराम एकदा म्हणाले होते, बहुजन समाज पक्ष दलित, शोषित–उपेक्षित, मागासलेल्या आणि अल्पसंख्याकांच्या म्हणजेच देशातील ८५% पीडित लोकसंख्येच्या भावनांचे प्रतिनिधित्व करतो. त्यांच्या भावनांचे मतांमध्ये रूपांतर करणे हे आमचे काम आहे. १९९३ मध्ये काही राजकीय निरीक्षकांनी दलितमुक्तीचे व्यासपीठ म्हणून बहुजन समाज पक्षाच्या उदयाकडे पाहिले. यावेळी बसपा राजकीय वाटचालीच्या अत्युच्च स्थानी होता. बहुजन समाज पक्षाच्या स्थापनेपूर्वी दलित आणि मागासवर्गीयांचा वापर ‘वापरा आणि फेकून द्या’ असा केला जात होता. परंतु नोव्हेंबर १९९३ मध्ये पक्ष मिळाल्यानंतर दलित आणि मागासवर्गीयांचा वापर ‘वापरा आणि फेकून द्या’ बंद झाला. आता तो स्वतः राजकीय सत्ता वापरू लागला आहे. आंबेडकरी चळवळीशी निगडित एकमेव पक्ष बहुजन समाज पक्ष आहे. त्याच्या उदयामुळे देशात काही प्रमाणात सामाजिक लोकशाही आली आहे. दलित–स्वाभिमानाचे राजकीय सत्तेत रूपांतर करून बहुजन समाज पक्षाने जे निवडणुकीत यश मिळवले ते काशीराम यांच्या संघटनात्मक क्षमतेमुळे आणि त्यांच्या शिष्या कु. मायावती यांच्या चमत्कारिक नेतृत्व क्षमतेमुळे काशीराम उत्तरप्रदेशला बहुजन समाज पक्षाची प्रयोगशाळा म्हणायचे. त्यांच्या नवनवीन प्रयोगांमुळे पक्षाची व्होट बँक अपेक्षेपेक्षा जास्त वाढली आहे. बहुजन समाज पक्षाच्या स्थापनेला १० वर्षे झाली होती. पण ११ व्या वर्षी म्हणजे १९९५ मध्ये उत्तर प्रदेशात त्यांचे सरकार स्थापन झाले. काशीराम यांनी बहुजन समाजाला सत्तेच्या कॉरिडॉरमध्ये नेले. सत्तेची गुरुकिल्ली दलितांच्या हाती दिली. आपल्या संघर्षाच्या बळावर काशीराम कमी–अधिक प्रमाणात आपले पहिले ध्येय गाठण्यात यशस्वी झाले. ते म्हणाले, मी माझ्या लोकांच्या कल्याणासाठी काहीही करू शकतो. ध्येय साध्य करणे हेच आमचे ध्येय आहे, मी साधनांची चिंता करत नाही. तत्त्वांसाठी मी माझे ध्येय सोडू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर काशीरामजींसारखी शैली आणि आक्रमक भाषा स्वीकारण्याचे धाडस कोणत्याही दलित नेत्याने दाखवले नाही. सर्व नेते पारंपरिक चमचेगिरीच्या

राजकारणाला बळी पडले. बहुजन समाज पक्षाचे पहिले राष्ट्रीय अधिवेशन लाल किल्ला मैदान दिल्ली येथे २२ ते २४ जून १९८४ रोजी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात संपूर्ण सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक मुक्तीचा नारा देण्यात आला. लोकसभा/विधानसभा निवडणुकीदरम्यान, बहुजन समाज पक्ष इतर पक्षांप्रमाणे आपला जाहीरनामा प्रसिद्ध करत नाही तर निवडणूक आवाहन प्रसिद्ध करतो. हे आवाहन फक्त एका ओळीचे आहे, जे वरील घोषणेमध्ये आहे. १९९६ मध्ये भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी सरकारला सांगितले की, ''बहुजन समाज पार्टी सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक उन्नतीसाठी कटिबद्ध आहे. आणि हा अजेंडा पूर्ण ताकदीने राबवेल, ना घोषणा ना वादा काम करने का इरादा' ही काशीरामांची यांची निवडणूक राजकीय घोषणा होती. म्हणूनच बहुजन समाज पक्ष म्हणण्यावर नाही तर करण्यावर विश्वास ठेवतो. हे त्यांच्या तीनही सरकारांमध्ये दिसून आले आहे. बहुजन समाज पक्षाने नोव्हेंबर १९८९ मध्ये भारतीय संसदेत मायावतीच्या रुपाने पहिल्यांदाच प्रवेश केला. तसेच एप्रिल १९९४ मध्ये त्यांनी भारतीय संसदेच्या वरिष्ठ सभागृहात म्हणजे राज्यसभेत प्रवेश केला. ८० च्या दशकात बहुजन समाज पक्षाने नवा विचार घेऊन भारतीय राजकारणात प्रवेश केला. तेव्हा प्रस्थापित राजकीय नेत्यांना विश्वास नव्हता की, बहुजन समाज पक्षासाठी २१ व्या शतकातील पहिले दशक हे राजकारणातील मैलाचा दगड ठरेल. या काळातील बहुजन राजकारणाने, राजकीय समाजजीवनात आपला प्रभाव वाढविला. या पक्षाने प्रामुख्याने केवळ राजकीय पक्षाची भूमीका बजावली नाही तर, एक सामाजिक चळवळ संघटित करून शोषित आणि वंचित समाजाला आत्मभान पुन्हा दिल्याचे दिसते. स्वतंत्र भारतात बहुजन राजकारणाचा प्रभाव भारतीय राजकारणावर वाढविण्याचे काम या पक्षाने केलेले दिसते याचे श्रेय हे काशीराम यांना द्यावे लागते.

हा पक्ष निवडणुकांमध्ये राजकीय पक्ष म्हणून दिसत असला तरी सामान्य परिस्थितीत तो सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळ असल्याचे दिसून येते.[६७] भारतात होत असलेल्या या मूक क्रांतीचे श्रेय जाते बहुजन समाज पक्ष आणि त्यांच्या अविचल नेतृत्वाला जाते. काशीराम एकदा म्हणाले होते, शेवटी आमच्या पक्षापेक्षा चांगली लोकशाही कुठे आहे मी पक्षात विरोधक निर्माण होऊ देत नाही, पण याचा अर्थ मी संघटनेत नेतृत्व निर्माण करत नाही असा होत नाही. पक्षात नेता हा शब्द वापरला जात नाही, नेता या शब्दाला तुच्छतेने पाहिले जाते. एक दिवस आपण स्वतंत्र भारतात शासक वर्ग होऊ. ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट्स असोसिएशनची परिषद कानपूर

येथे २९ जानेवारी १९४४ रोजी झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले विधान खरे ठरले. २५ एप्रिल १९४८ रोजी लखनौ येथे अनुसूचित जाती संघटनेच्या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते आपण स्वतःला आपण तिसरा पर्याय म्हणून संघटित केले पाहिजे, जेणेकरून (तत्कालीन) समाजवादी पक्ष किंवा काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळू नये आणि आमची मते मागण्यासाठी त्यांना आमच्या समोर झुकावे लागेल, त्यावेळी आपण सत्ता संतुलन आपल्या हातात ठेवू शकू आणि आमचे राजकीय समर्थन आमच्या अटीवर देण्यास लायक होईल. आज या संदर्भात विचार करता बहुजन समाज पक्षाने जो काही विकास साधला आहे तो केवळ चार वेळा सत्तेत आल्यानेच झाला आहे, अन्यथा त्याचे नशीब रिपाइंसारखेच झाले असते. दलित हे स्क्रीनरसारखे झाले असते. तसेच ज्या दिवशी बहुजन समाज पक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांपासून माघार घेईल त्यादिवशी त्यांची ओळख नष्ट होईल. काशीराम यांचे दुसरे ध्येय केंद्रात सत्ता काबीज करणे हे होते जे अद्याप साध्य झालेले नाही.

काशीराम एकदा राजकारणाबद्दल असे म्हणाले होते की, ''राजकारणाला कुणी कितीही चांगलं-वाईट म्हटलं तरी राजकारणाच्या जोरावरच समाजाच्या चळवळी वाढतात, चालतात. येथे विद्वान पेरिकल्सचे शब्द खरे वाटतात. तुम्हाला राजकारणात रस नसला तरीही राजकारण तुमच्यात रस घेते.[६८] त्यामुळे बहुजन समाजाने राजकारणात रस घेतला पाहिजे तरच त्याचा उद्धार शक्य आहे. म्हणून असे म्हणता येईल की, भारतीय राजकारणाला एक नवीन व्याख्या आणि क्रांतिकारी वळण देणारे नेते म्हणून काशीराम भारतीय राजकारणाच्या क्षितीजावर उदयास आले. काशीराम यांच्या लक्षात आले की, हजारो वर्षांपासून चालत आलेल्या या व्यवस्थेमध्ये केवळ ठराविक उच्चवर्णीय लोकांनाच फायदा होत आला आहे. ज्या समाजाची लोकसंख्या देशाच्या लोकसंख्येच्या ५० टक्के आहे, असा समाज समाज विषमतावादी व्यवस्थेचा शिकार बनलेला आहे. केवळ १५ टक्के लोकसंख्या असणाऱ्या उच्चवर्णीय लोकांनी देशाच्या शासन आणि प्रशासनावर कब्जा करुन ठेवला आहे, बहुसंख्याक समाज गुलामीचे आणि लाचारीचे जीवन जगत आहे. ज्या व्यवस्थेला बदलण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांनी प्रयत्न केले तीच व्यवस्था आता नव्या स्वरुपात उदयास आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी ज्या वर्गावर होती, तो वर्ग केवळ आपल्याच समस्यांमध्ये व्यस्त आहे. पुणे करारामुळे ज्या दलित समाजाला काही प्रमाणात फायदा झाला. त्या समाजाचे लोक आपले घर, परिवार,

मुले यांच्यासोबत मजेत जीवन जगत आहेत. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिशनची काही काळजी नाही. आपला स्वाभिमान गहाण ठेवून ते ब्राम्हणवादी व्यवस्थेचे चमचे होऊन बसलेत. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा काही स्वार्थी लोकांनी आपल्या राजकारणांसाठी वापर करुन घेतला आहे. अशा परिस्थितीमुळे काशीराम अत्यंत दुःखी झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण मिशन व ब्राम्हणवादी व्यवस्थेमध्ये अडकलेल्या दलित समाजाची स्थिती समजून घेतल्यावर काशीरामांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. बहुसंख्याक समाज हा अनेक जाती व उपजातीमध्ये विभाजित झाल्याने तो अल्पसंख्याक झाला आहे. त्यामुळे असा अल्पसंख्याक समाज आपली लढाई स्वतः लढण्यास असमर्थ असतो. म्हणून काशीरामांनी विचार केला की जो पर्यंत सर्व अल्पसंख्याक समाज एकजूट होऊन बहुजन समाजामध्ये परिवर्तित होत नाही तोपर्यंत त्यांना या देशाच्या शासन व प्रशासनात समान भागीदारी मिळणार नाही. या निष्कर्षानंतर काशीराम यांनी या समाजाला जागृत करून संघटित करण्याच्या अवघड कार्याला सुरुवात केली. विषमतावादी व्यवस्था उद्ध्वस्त करुन समानता प्रस्थापित करणे सहज शक्य नव्हते. परंतु मनापासून ईमानदारीने काम केल्यास व संघटन शक्तीचा योग्य वापर केल्यास विषमतावादी व्यवस्था नष्ट होऊ शकते, असा काशीरामांचा विश्वास होता.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा विविध लिखानातून प्रसार**

म. फुले, छ. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बहुजन चळवळ गतीमान करण्यासाठी काशीरामांनी अनेक पाक्षिके, साप्ताहिके व दैनिके सुरु केली. कारण चळवळीला प्रिंट मिडिया असल्याशिवाय चळवळ प्रसार पावत नाही. म्हणून त्यांनी १९७२ ला बुद्ध जयंतीच्या दिवशी त्यांनी ‘अनटचेबल इंडिया’ हे इंग्रजी भाषेतील नियतकालिक सुरू केले. १४ एप्रिल १९७८ साली काशीरामांनी ऑप्रेस्ड इंडियन हे इंग्रजी नियतकालिक सुरु केले व त्याद्वारे आपली चळवळ आंतरराष्ट्रीय भेदाभेद विरोधी चळवळीशी जोडण्याचा प्रयत्न केला. १९७९ रोजी काशीरामांनी दिल्लीतून बहुजन संगठक नावाचे हिंदी साप्ताहिक सुरु केले. ३० मार्च १९८० रोजी बहुजन नायक हे मराठी साप्ताहिक नागपूरमधून सुरु केले. त्यानंतर पंजाबी, गुजराती, कानडी, बंगाली इत्यादी १४ भाषांमधून काशीरामांनी साप्ताहिके व मासिके सुरु केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक धम्मदिक्षेच्या रजत जयंतीचे औचित्य साधून काशीरामांनी १९८९ साली चंदिगड येथे कर्पूरी ठाकूरांच्या हस्ते बहुजन टाइम्स या मराठी, हिंदी दैनिकाचे उद्‌घाटन केले. १९८४ ला

पुन्हा बहुजन टाइम्स हे मराठी दैनिक नागपूरमधून सुरु करण्यात आले. अशाप्रकारे विविध भाषेतील पाक्षिके, साप्ताहिके व नियतकालिके काढून काशीरामांनी आंबेडकरवादी चळवळीचा जास्तीत–जास्त प्रचार व प्रसार करण्याचा प्रयत्न करून बहुजन समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. त्यामुळे आंबेडकरी चळवळ संपूर्ण देशभर विस्तार पावली.

**विविध आंदोलनातून बहुजन समाज जागृती**

काशीराम यांनी १४ एप्रिल १९८४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी दिल्ली येथे 'बहुजन समाज पार्टी' ची स्थापना केली. त्यावेळी त्यांनी तीन उद्दिष्टे पुढे ठेवली होती. १) फुले, शाहू व आंबेडकरी विचारधारा २) ब्राम्हणवादी व्यवस्था, हा कट्टर शत्रू त्याचा बिमोड करणे आणि ३) केंद्रीय सत्ता बहुजनांच्या हातात घेणे. या उद्दिष्टावर काशीरामानी 'बहुजन समाज पार्टी'ची स्थापना केली व अनेक जनआंदोलने उभी केली. बहुजन समाज पार्टीने आपल्या ध्येय–उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी १९८४ पासून अनेक जन आंदोलने केली. त्यामधील महत्त्वाची पुढीलप्रमाणे होत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे जन आंदोलन म्हणजे 'राखीव जागा समर्थनार्थ आंदोलन' या आंदोलनाच्या माध्यमातून १९८४–८५ मध्ये देशाच्या कानाकोपऱ्यात ५ राष्ट्रीय चर्चासत्रे आयोजित केली. तर कार्यकर्त्यांनी व बहुजनांना प्रशिक्षित करण्यासाठी व या समस्येची माहिती देण्यासाठी देशभर ५०० शिबीरे आयोजित केली होती. ३२ दिवस संसदेपुढे धरणे आंदोलन धरले होते. यावेळी 'इतर मागासवर्गीयांच्या समस्या याच राष्ट्रीय समस्या' आणि 'मंडल आयोग हाच मागासवर्गीयांचा राष्ट्रीय जाहीरनामा' असे जाहीर करण्यात आले.[६९]

बहुजन समाज हा ६४४३ जातीत मनुवाद्यांनी विभागलेला आहे. हा सर्व समाज समानतेच्या पातळीवर यावा यासाठी १९८६ मध्ये 'भाई चारा बनाओ आंदोलन' सुरू करण्यात आले. त्यासाठी संपूर्ण देशात चर्चासत्रे, सभा, संमेलने आयोजित करण्यात आली. १५ ऑगस्ट १९८७ ते १५ ऑगस्ट १९८८ मध्ये सातत्याने दलितांवर होणाऱ्या अन्याय–अत्याचाराविरुद्ध वर्षभर 'सामाजिक कृती कार्यक्रम' हे आंदोलन सुरू केले.[७०] १७ ऑगस्ट १९८८ मध्ये पेरियार जयंतीनिमित्त सामाजिक बदलाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संपूर्ण देशाच्या पाच विभागातून ५ सायकल मार्च काढण्यात आले. १) कन्याकुमारी (तामिळनाडू) २) कोहिमा (नागालँड) ३) कारगील (काश्मिर) ४) पुरी (ओरिसा) ५) पोरबंदर (गुजरात) येथून ते दिल्लीपर्यंत संपूर्ण देशभर प्रबोधन यात्रा करून दिल्लीत पेरियार जयंती साजरी केली. १५ ऑगस्ट

१९८८ ला भारतीय शरणार्थी आंदोलन सुरू केले. देशातील सर्व प्रमुख व मोठ्या छोट्या शहरात ग्रामीण भागातील गरीब बहुजन झोपडपट्टीत, दलदलीत राहतो. त्याला चांगले राहणीमान प्राप्त व्हावे, म्हणून हे आंदोलन सुरू केले. दरम्यान 'भारतीय किसान मजदूर आंदोलन', 'भारतीय सफाई मजदूर आंदोलन', 'भारतीय दस्तकार आंदोलन' आणि 'भारतीय भागीदारी आंदोलन' अशी बहुजनांच्या उत्थानासाठी व त्याना सन्मानाने जगता यावे म्हणून ही आंदोलने सुरू केली. स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात 'स्वतंत्र भारतात बहुजन समाज आश्रीत का?' हे आंदोलन सुरू केले. बहुजनांचे प्रबोधन व्हावे, म्हणून देशाच्या कानाकोपऱ्यात ५ जीप मार्च आयोजित केले. १५ ऑगष्ट १९९७ रोजी कन्याकुमारी ते दिल्ली. २३ ऑगष्ट १९९७ रोजी कोहिमा ते दिल्ली व कारगील ते दिल्ली २५ ऑगष्ट १९९७ रोजी पुरी ते दिल्ली व २७ ऑगष्ट १९९७ पोरबंदर त्ते दिल्ली व शेवटी दिल्लीत प्रचंड महारॅली आयोजित केली.

भाजपने सुरू केलेल्या 'संविधान समीक्षा' या विरूद्ध संपूर्ण देशभर २६ जानेवारी २००० रोजी जनआंदोलन उभे केले. त्याचबरोबर संपूर्ण देशभर 'संविधान सुवर्ण महोत्सवी वर्ष' साजरे केले. त्यासाठी संपूर्ण देशात १५ मार्च ते ४ एप्रिल २००० पर्यंत ५ जीप मार्च कन्याकुमारी ते मुंबई, संपूर्ण दक्षिण भारतातून आयोजित करण्यात आले. त्याशिवाय ५ राष्ट्रीय चर्चासत्रे, ५००० राष्ट्रीय शिबीरे व कार्यशाळा आणि संपूर्ण देशात १ लाख लोकांची 'संसद' आयोजित करण्यात आल्या.[७१] १० ते ११ जून २००० ला सामाजिक व आर्थिक विषमता, घटना-संविधान व बहुजनांची सत्ता यावर मुंबईत 'राष्ट्रीय चर्चासत्र' आयोजित करण्यात आले होते. छ. शाहू महाराजांनी यांनी सन १९०२ मध्ये बहुजनांना राखीव जागेद्वारे सत्तेत भागीदारी दिली. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कोल्हापूरात 'आरक्षण शताब्दी महोत्सव' साजरा करण्यात आला. संपूर्ण देशभर हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. व २६ जुलै २००३ रोजी कोल्हापूरातच 'आरक्षण शताब्दी सांगता समारंभ' आयोजित करण्यात आला. या त्यांच्या बहुजन समाजातील राजकीय जागृतीमुळे गेल्या १८ वर्षात केवळ उत्तर प्रदेशातच नव्हे तर संपूर्ण देशातील राज्यातून किंबहुणा केंद्रात देखील स्थिर सरकार एकाच पक्षाचे येऊ शकले नाही. काँग्रेस पक्ष असो की भाजपा असो वा अन्य राष्ट्रीय पक्ष असोत, यांना आघाडी सरकार बनविण्याशिवाय पर्याय उपलब्ध नाही. आघाडी सरकार बनविण्याचे प्रयोग केवळ उत्तर प्रदेशातच नव्हे तर संपूर्ण देशातील अनेक राज्यात कमी जास्त प्रमाणात होवू लागले आहेत. आणि केंद्रातही अशा प्रकारची आघाडीची

सरकारे बनविण्याची राजनीती सुरू झाली आहे. या सर्व अस्थिर राजकारणाचे, राजकीय उलथापालथीचे सूत्रधार काशीराम हे होते. हे ऐतिहासिक सत्य कोणालाही नाकारता येत नाही. भारतीय राजकारण व मनुवाद्यांच्या सरकाराबाबत काशीराम म्हणत असत की, 'मुझे मजबुत नही, मजबुर सरकार चाहिए।'[७२] आणि ही घोषणा काशीराम यांनी त्यावेळी केली होती की ज्या वेळी बहुजन समाज पार्टीची कोणतीच ताकद नव्हती. परंतु बहुजन समाज पार्टी सरकारमध्ये नसली तरीही ती कोणत्याही पक्षाला बहुमत प्राप्त होवू देणार नाही व त्यांना त्यांच्या स्वतःच्या ताकदीवर सरकार बनवू देणार नाही, अशी राजकीय स्पष्ट भूमिका काशीराम यांनी मांडली होती. काशीराम यांच्या मते सद्य स्थितीतील भारतीय राजकारणातील सर्व पक्ष हे मनुवादी पक्ष आहेत. मग ते काँग्रेस, भाजप, माकपा, भाकपा व राष्ट्रवादी काँग्रेस हे राष्ट्रीय पक्ष असोत की संयुक्त जनता दल, राष्ट्रीय जनता दल, धर्मनिरपेक्ष जनता दल, समाजवादी पार्टी, तेलगु देसम, तृणमुल काँग्रेस, शिवसेना वा अन्य प्रादेशिक पक्ष असोत. या सर्व पक्षांच्या नेत्यांची मनोभूमिका पक्षांची ध्येय धोरणे, कार्यक्रम ही मनुवादाला संरक्षित व प्रोत्साहन देणारी आहेत.[७३] त्यामुळे या पक्षांना मताच्या जोरावर रोखणे, त्यांना पायबंद घालणे आवश्यक असल्याने काशीराम यांनी बहुजन समाज पार्टीची ध्येय–धोरणे व कार्यक्रम हे बहुजन समाजाच्या संरक्षणासाठी बहुजन हितवर्धक आखले. जेणेकरून बहुजन समाजाची मतेही बहुजन समाज पार्टीकडे वळावीत व कालातंराने या देशाची सत्तासूत्रे बहुजनांच्या हातात यावीत, अशी ठाम भूमिका घेवून काशीराम यांनी बहुजन समाज पार्टीची मांडणी व बांधणी केली.

काशीरामांनी आजपर्यंत स्थापन केलेल्या संघटनांचा स्थापना दिवस १४ एप्रिल व ६ डिसेंबर म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन आहे. काशीरामांनी जाणीवपूर्वक याच दिवशी आपल्या संघटनांची घोषणा केली होती. कारण या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानणाऱ्या समाजाने आत्मवलोकन करणे गरजेचे आहे, असे काशीरामांना वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण काय केले? व काय केले पाहिजे? याचा विचार या दिवशी करणे काशीरामांना अपेक्षित होते. म्हणून त्यांनी ६ डिसेंबर व १४ एप्रिल या दिवशीच आपल्या संघटनांची स्थापना केली. या सर्व घटनांमधून एक बाब स्पष्ट होते की, काशीराम हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे खरे पाईक होते. केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव घेऊन काशीराम थांबले नाही तर त्यांनी खरोखरच संपूर्ण भारतभर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा पोहचविण्यासाठी आंबेडकरवादाचा प्रचार व प्रसार करणे, हेच काशीरामांनी आपल्या जीवनाचे ध्येय बनविले होते व ते सत्यात उतरविण्यासाठी काशीराम नेहमी प्रयत्नशील होते.

**काशीराम यांचा बहुजन राजकारणाचा राजकारणावरील प्रभाव**

काशीरामयांच्या बहुजन राजकारणाचा खूप मोठा परिणाम भारतीय राजकारणावर व बहुजन राजकारणावर झालेला दिसतो. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.१९८४ नंतरच्या काळात उत्तर प्रदेशातच नव्हे तर संपूर्ण देशातील राज्यात, आणि केंद्रात स्थिर सरकार येऊ शकले नाही. आघाडी सरकार बनविण्याचे वारे देशातील अनेक राज्यात कमी जास्त प्रमाणात वाहू लागले. त्यामुळे केंद्रातही अशा प्रकारचे आघाडी सरकार बनविण्याचे राजकारण सुरू झाले. आणि आता केंद्रातही याची अपरिहार्यता स्पष्ट झाली आहे. भारतातील राजकारणामध्ये अशा प्रकारची जी उलथापालथ सुरू आहे, या सर्व उलथापालथीच्या राजनीतीचे शिल्पकार, सुत्रधार काशीराम हे आहेत. हे ऐतिहासिक सत्य कोणालाही नाकारता येत नाही. काशीराम यांनी घोषणा केली होती की, ''मुझे मजबुत नही, मजबुर सरकार चाहिये'' कोणत्याही पक्षाला स्वतःच्या ताकदीवर सरकार बनवू देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका काशीराम यांनी मांडली होती. काशीरामांनी मजबूर सरकारचा जो सिद्धांत भारतीय राजकारणात मांडला. त्यामुळे भारतात स्पष्ट बहुमताचे सरकार अनेक दशके येऊ शकले नाही, त्यामुळे भारताच्या विकासाला खिळ बसली, असे मानणारा एक प्रवाह देशात आहे. काशीराम यांच्या मते सद्य स्थितीतील भारतामधील सर्व राजकीय पक्ष हे मनुवादी विचारांचा पुरस्कार करणारे पक्ष आहेत. मग ते काँग्रेस, भाजप, माकपा, भाकपा, राष्ट्रवादी काँग्रेस हे राष्ट्रीय पक्ष असोत की संयुक्त जनता दल, राष्ट्रीय जनता दल, धर्मनिरपेक्ष जनता दल, समाजवादी पार्टी, तेलगू देसम, लोकजनशक्ती पार्टी, आण्णा द्रमुक, शिवसेना आदि अनेक प्रादेशिक पक्ष असोत.[७४] या पक्षांच्या नेत्यांची मनोभूमिका ही मनुवादाला प्रोत्साहन देणारी व पक्षाची ध्येय–धोरणे, मनुवादाला संरक्षित करणारी असतात. त्यामुळे अशा या पक्षांना बहुजनांच्या मताच्या जोरावर पायबंद घालणे आवश्यक आहे. ही ठाम भूमिका घेवून काशीराम यांनी बहुजन समाज पार्टीची मांडणी केली. काशीराम यांनी देशातील अनुसुचित जाती–जमाती, भटके–विमुक्त जाती, इतर मागासवर्गीय बलुतेदार, आलुतेदार, धर्मांतरीत अल्पसंख्य समाज जसे मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, जैन, लिंगायत आदि सर्व जाती धर्मातील बहुजन

लोकांना एकत्र करून, या बहुजनांची शास्त्रीय मांडणी करून ८५ टक्के असलेला बहुजन समाज हा सिद्धांत त्यांनी मांडला.[७५] हे सर्व बहुजन १५ टक्के असलेल्या उच्चवर्णिय यांच्या ब्राम्हणी व्यवस्थेचे बळी होते. काशीरामानी भारतातील या सर्व बहुजनामध्ये राजकीय इच्छाशक्ती व जागृती निर्माण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, राजसत्ता ही सर्व प्रकारच्या समस्याची सोडवणुक करणारी गुरूकिल्ली आहे. काशीराम यांनी बहुजन समाजाला शासनकर्ती जमात बनवण्यासाठी तयार केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या राज्यघटनेद्वारे दिलेल्या 'एक मत, एक मूल्य' या मताधिकाराचे महत्त्व सांगितले. त्यात बहुजन समाजाच्या मताचे महत्त्व काय आहे? हे समाजावून सांगितले. बहुजन समाजाच्या मताच्या जोरावर या देशातील मनुवादी 'राजसत्ता' प्राप्त करतात. परंतु ते बहुजन समाजासाठी सत्ता राबवित नाहीत. तर १५ टक्के मनुवाद्यासाठी ती राबविली जाते. ते हाणून पाडण्यासाठी त्यांनी बहुजन समाजातील लोकांना तयार करून निवडणुका लढविण्यास तयार केले, लोकशाहीत बहुजनांचा मताचा अधिकारच या देशातील मनुवादाला संपवू शकतो.[७६] याची जाणीव त्याना करून दिली. त्यामुळे भारतातील सर्व घटकराज्यात बहुजन राजकारणाची सुरुवात झाली. विविध पक्ष निर्माण झाले. मनुवाद्यांच्या सत्ता स्थानाला सुरूंग लावणे हा त्यांचा प्रमुख उद्देश होता. त्यासाठी त्यांनी राजकारणाचे स्वतःचे डावपेच तयार केले. मनुवाद्यांच्या हातातून सत्ता हिसकावून घेण्यासाठी त्यांनी मनुवादी समाज व्यवस्थेतील साडे सहा हजार जातीत विखुरलेल्या, अनेक छोट्या-मोठ्या जातीत विखुरलेल्या बहुजन समाजाला बहुजन समाज पार्टीत जोडण्याचे काम केले. या सर्वांची संख्या जरी ८५ टक्के असली तरी मनुवादी शासन व्यवस्थेविरूद्ध ५० टक्के बहुजन लोक जरी एकत्रित झाले तरी त्यांच्या सत्तेला धक्का देता येईल. जर तसे झालेच नाही तर ४० टक्के बहुजन लोक चालतील. तेही झाले नाही तर ३५ टक्के बहुजन लोक संघटीत झाले तर निश्चितच बहुजन समाज सत्ताधारी बनेल आणि तसे त्यांनी धोरण स्विकारून राजकारण केले. आणि याचा परिणाम असा झाला की, वेळोवेळी पार पडलेल्या देशातील निवडणुकीतून हळू हळू कॉंग्रेसचा जनाधार कमी होवू लागला. त्याचे कारण बहुजन समाज पार्टीद्वारे स्वतंत्रपणे निवडणुका लढवल्या हा आहे. सत्ताप्राप्तीसाठी कधी समाजवादी पार्टीची मदत घेवून, तर कधी भाजपाची मदत घेवून तर कधी पंजाबमध्ये अकाली दलाची मदत घेवून कॉंग्रेसची शक्ती क्षीण केली. तर भाजपाची मदत घेवूनच भाजपाचीही ताकद कमी केली. त्यासाठी देखील त्यानी कधी कॉंग्रेसची, तर पंजाबात अकाली दलाची, तर उत्तर

प्रदेशात समाजवादी पार्टीची मदत घेवूनच भाजपाला शक्तीहीन केले. याचे विश्लेषण करताना मनुवादी लोक काशीरामना संधीसाधू राजकारणी असेही म्हणत असत. काशीराम यांना मनुवादी लोक जातीयवादी म्हणत राहिले. आणि त्याच काशीरामनी मात्र मनुवाद्यानी निर्माण केलेल्या हजारो जातींना संघटीत करून सत्ताधारी बनण्यास लायक बनविले.[७७] उत्तरप्रदेश मध्ये सत्ता आल्यानंतर काशीरामांनी जो जमीन सरकारी है वो जमीन हमारी है, असा नारा देऊन बहुजन समाजातील भूमिहिन लोकांना हजारो हेक्टर जमीनीचे वाटप करून देशाच्या साधन संपत्तीत प्रतिनिधित्वाची भूमिका घेतली.

बहुजन समाजाला सत्ताधारी बनविण्याच्या कामाला लागले. लोकशाही प्रणाली असलेल्या देशात लोकप्रतिनिधीद्वारे सत्ता प्राप्त होते. आणि हे लोकप्रतिनिधी निवडणुकीच्या माध्यमातून निवडून येतात. त्यामुळे लोकशाही प्रणालीमध्ये निवडणुकांना अत्यंत महत्त्वावे स्थान असते. म्हणून काशीराम सतत म्हणत, या देशातील निवडणुका सतत झाल्या पाहिजेत. त्यासाठी निवडून आलेले सरकार अस्थिर असले पाहिजे. किंबहुणा ते अस्थिर बनविले पाहिजे. आणि सरकार अस्थिर बनणे यातच बहुजनांचे हित सामाविलेले आहे. कारण सतत होणाऱ्या निवडणुकामुळेच बहुजनांचा पक्ष बळकट बनून तो सत्ताधारी बनेल, असा सिंद्धात काशीराम यांनी मांडला होता. आणि तो पुढे त्यांनी यशस्वीही करून दाखविला. त्या दृष्टीने या मुद्याचे विश्लेषण होणे आवश्यक आहे.

काशीरामांच्या राजकारणाने देशात राजकीय अस्थिरता निर्माण होवून सतत निवडणुका होवू लागल्या. या सतत होणाऱ्या निवडणुकामुळे सन १९९६ मध्ये बहुजन समाज पार्टीला भारतीय निवडणुक आयोगाकडून राष्ट्रीय पार्टी म्हणून मान्यता प्राप्त झाली. मात्र त्याचवेळी सन १९९६ मध्येच सर्व कष्टकरी वर्गासाठी, सर्व हारासाठी असलेली, साम्यवादी व्यवस्था आणण्यासाठी कार्यरत असलेली भारतीय कम्युनिस्ट पार्टीची राष्ट्रीय मान्यता निवडणुक आयोगाने काढून घेतली होती.[७८] आणि याच दरम्यान वा देशातील बहिष्कृत अशा बहुजन समाजासाठी कार्यरत असलेल्या राजकीय पक्षाला राष्ट्रीय पार्टी म्हणून मान्यता प्राप्त होत होती, हे भारताच्या इतिहासातील एक आश्चर्य होते. बहुजन समाज पार्टी ज्या वर्गासाठी कार्यरत आहे तो बहुजन समाज धन नसलेला समाज आहे. आर्थिकदृष्ट्या तो अत्यंत कमकुवत आहे. अत्यंत गरीबीत तो जीवन जगत आहे. गरीब व साधनहीन लोकांसाठी नवीन पार्टी काढून चालविणे किती कठीण काम आहे हे दिसून येते. परंतु प्रामाणिक भावनेतून जर ती चालविली तर उशिरा का होईना यश प्राप्त होते. विशेषतः

या देशातील निवडणुकीवर असलेला धनवान लोकांचा प्रभाव. कॉंग्रेस, भाजपा हे मनुवादी पक्ष भांडवलदार व उद्योगपती यांच्या आश्रयाखाली निवडणुका लढवितात व बहुजनांची मते विकत घेवून सत्ताधारी बनतात. मात्र बहुजनांच्या हिताचे कोणतेही निर्णय घेत नाहीत. म. गांधी देखील याला अपवाद नव्हते. म्हणून भारताच्या प्रजातंत्रामध्ये पैसावाल्याचे सतत राज्य राहीले आहे. बहुमुल्य मताचा अधिकार असणारा बहुजन समाज त्यांच्यापुढे सतत लाचार राहीला आहे.त्यामुळेच निवडणुकीत तो मताची विक्री करू लागला. अशा परिस्थितीत या निर्धन गरीब बहुजन समाजासाठी नवीन पार्टी काढणे व पैसेवाल्या पार्टीबरोबर टक्कर देणे व पुढे जाणे किती कठीण काम आहे, याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही.[७९] म्हणून अशा लाचार बहुजन समाजाला 'मागणारा समाज' या मानसिकेतून बाहेर काढून 'देणारा समाज' ही मानसिकता घडविली.

काशीराम यांनी निवडणूक डावपेच आखताना महत्त्वाचे तीन टप्पे गृहीत धरले होते. ते असे प्रथम पार्टी निवडणूक लढवेल ते हारण्यासाठी व सर्व डिपॉझिट जप्त होण्यासाठी, दुसऱ्यांदा निवडणूक लढवेल ती प्रस्थापित पक्षांची मते आपल्याकडे खेचून त्यांना पाडण्यासाठी व राजकीय अस्थिरता करण्यासाठी आणि तिसऱ्यांदा निवडणूक लढवेल ती निवडून येण्यासाठी व सत्ता हस्तगत करण्यासाठी. हे टप्पे ठरवून बहुजन समाज पार्टी निवडणुकांना सामोरे गेली व निवडणुका लढविल्या. १९८४ ला बहुजन समाज पार्टी स्थापन झाली. त्यानंतर अगदी ८ महिन्यांनी भारताच्या लोकसभेची निवडणुक लागली. त्यावेळी पार्टीने संपूर्ण देशात १०७ उमेदवार उभे केले. त्यामुळे पार्टीतर्फे कु. मायावती यांनी बिजनौर मतदार संघातून निवडणुक लढविली होती. या आधी मुझ्झफरनगर लोकसभा निवडणुकीत मायातवती यांना ६५०० मते पडली होती. त्यांच्या सह सर्व उमेदवार पराभूत झाले व सर्वांच्या डिपॉझिटही जप्त झाल्या. परंतु त्या निवडणुकीत पार्टीला १०,०५,६४० इतकी मते पडली. ते १ टक्क्याहून कमी मतदान होते. त्यावेळी केवळ उत्तर प्रदेशात बसपाला ५ लाख ८८ हजार मते पडली होती. ते देखील १ टक्क्याहून कमी मतदान होते. त्याचप्रमाणे सन १९८५ मध्ये पंजाबातही विधानसभेच्या निवडणुका झाल्या, त्यात बसपाला २ लाख १५ हजाराच्यावर मतदान झाले. ते ४.६ टक्के इतके होते. निवडणुक आयोगाच्या नियमाप्रमाणे ४ टक्के मतदान असलेली पार्टी मान्यताप्राप्त पार्टी होत होती. त्यामुळे पार्टीला पंजाबात निवडणुक आयोगाची मान्यता मिळाली. व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या पक्षासाठी असलेले व नंतर रिपब्लिकन पार्टीसाठी असलेले व त्या पार्टीच्या

नेत्यांच्या दुफळीमुळे गमावलेले 'हत्ती' हे निवडणुक चिन्ह बहुजन समाज पार्टीला प्राप्त झाले.[८०] आणि हेच निवडणूक चिन्ह पुढे बहुजनाना सत्ता स्थानावर बसविण्यासाठी उपयोगी पडत आहे.

१९८५ मध्ये उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका पार पडल्या. त्यामध्ये बहुजन समाज पार्टीने २३७ उमेदवार उभे केले होते व या निवडणुकीत पक्षाला ७ लाख मते पडली. त्या मताची टक्केवारी २.२२ टक्के इतकी होती . याच वेळी उत्तरप्रदेशात 'बिजनौर' या लोकसभा मतदार संघाची पोटनिवडणुक झाली. त्यावेळी मायावतींना ६१००० मते पडली.[८१] त्याची टक्केवारी १८ टक्के होती. त्यानंतर १९८७ मध्ये उत्तर प्रदेशातील 'हरिद्वार' या लोकसभा मतदारसंघाची पोट निवडणुक झाली. या निवडणुकीत मायावती यांना कोणतीही साधन सामुग्री नसताना काशीराम यांनी संपूर्ण देशातील पार्टी कार्यकर्त्यांकडून ८७ हजार रूपये जमविले होते. या निवडणुकीत काँग्रेस, भाजपा व अन्य विरोधी पक्षाचे उमेदवार रामविलास पासवान होते. या सर्व पक्षाकडे प्रचंड मोठी साधन सामुग्री होती. अशा प्रतिकुल परिस्थितीतही या निवडणुकीत दोन नंबरची मते प्राप्त झाली. या आधीच्या निवडणुकीत काँग्रेसला २ लाख २४ हजार मतदान झाले होते. परंतु ते १ लाख ४९ हजार मतावर आले व कु. मायावती यांना १ लाख ३६ हजार मतदान पडले.[८२] व काँग्रेस केवळ १३ हजार मताने निवडून आली. अन्य विरोधी पक्षाचे उमेदवार रामविलास पासवान यांना केवळ ३४ हजार मते पडली. त्यांची जमानतही जप्त झाली.[८३] व भाजपाचा हरिद्वारचा आमदार याला केवळ ४५७६ मते पडली. यावेळी २६.७ टक्के इतकी मते पडली होती. १९८८ मध्ये उत्तर प्रदेशातील अलाहाबाद लोकसभा मतदार संघाची निवडणुकीमध्ये काशीराम उभे राहीले. त्यांना जवळजवळ २३.२२ टक्के इतके मतदान पडले.

यानंतर उत्तर प्रदेशातील 'बिजनौर' लोकसभा मतदार संघाची निवडणुक झाली. या निवडणुकीत मायावती या प्रचंड मताने निवडून आल्या. १९८९ ला लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यात काशीरामानी बसपामार्फत सर्व मतदारसंघात उमेदवार उभे केले. त्यावेळी ३ उमेदवार निवडून आले. उत्तर प्रदेशातून २ व पंजाबातून १. या निवडणुकाआधी काँग्रेसचे ४०० खासदार निवडून आले होते. यावेळी काँग्रेसच्या मताची टक्केवारी ४९.९ होती. ती टक्केवारी ३८.२ टक्क्यावर आली. याचा अर्थ काँग्रेसचे ११ टक्के मतदान कमी झाले. याच दरम्यान उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. त्यात बसपाला १५ जागा प्राप्त झाल्या. सन १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसची सत्ता गेली व विरोधी आघाडीचे व्ही. पी. सिंग

पंतप्रधान बनले. पण ११ महिन्यातच त्यांचे सरकार गडगडले व कॉंग्रेसच्या सहकार्याने चंद्रशेखर यांचे सरकार सत्तेवरती आले. परंतु त्यांनीही विश्वासदर्शक ठराव मंजूर करून घेण्याआधीच राजीनामा दिला. त्यानंतर १९९१ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीमध्ये काशीरामानी देशभर अनेक उमेदवार उभे केले. त्यामध्ये उत्तर प्रदेशातून २ व मध्यप्रदेश मधून १ असे ३ उमेदवार निवडून आले. त्याच दरम्यान उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. त्यात बसपाला ९ टक्के मतदान पडून पक्षाचे १३ उमेदवार निवडून आले.[८४] त्यामुळे उत्तर प्रदेशात बहुजन समाज पक्षाला निवडणुक आयोगाची मान्यता प्राप्त झाली. त्यानंतर उत्तर प्रदेशात 'इटावा' लोकसभेची निवडणुक झाली. त्यात काशीराम हे प्रचंड मताने निवडून आले. १९९२ मध्ये झालेल्या पंजाब विधानसभेच्या निवडणुकामध्ये बसपाने ९ जागा जिंकल्या, व बसपाचा विरोधी पक्ष नेता बनला. त्याच दरम्यान पंजाब व मध्य प्रदेशात एका जागेसाठी लोकसभेच्या पोटनिवडणुका झाल्या, त्यात पार्टीला यश प्राप्त झाले. त्यानंतर सन १९९३ मध्ये उत्तर प्रदेशात निवडणुका लागल्या, त्यावेळी बसपाने समाजवादी पक्षाशी युती केली. व युतीला १७६ जागा प्राप्त झाल्या. त्यात बसपाला ६७ जागावर विजय मिळाला.[८५] यावेळी बसपाला मिळालेल्या मताची टक्केवारी १२ टक्के होती. दरम्यानच्या काळात मध्यप्रदेश विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्यात बसपाला ११ जागा प्राप्त झाल्या व पक्षाला ७.१ टक्के मतदान प्राप्त होवून, मध्यप्रदेशात पार्टीला निवडणुक आयोगाची मान्यता प्राप्त झाली. यावेळी उत्तर प्रदेशात सपाचे मुलायमसिंग यादव यांच्या नेतृत्वाखाली सपा–बसपा युतीचे सरकार आले. पण मुख्यमंत्री मुलायमसिंग यादव यांनी बसपाच्याच कार्यकर्त्यांना त्रास देण्यास सुरवात केल्याने मुलायमसिंगच्या नेतृत्वाखालील युती सरकारचा २ जून १९९५ ला पाठींबा काढून घेतला. याच दरम्यान जनता दल, भाजप, कम्युनिस्ट या सर्वांनी पाठींबा दिल्याने मायावती यांच्या नेतृत्वाखाली बसपाचे ३ जून १९९५ ला सरकार आले. आणि देशात पहिली दलित महिला उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या राज्याची मुख्यमंत्री बनली. ही किमया काशीराम यांनी घडवून आणली. हे ऐतिहासिक सत्य कोणाही विचारी माणसाला नाकारता येणार नाही. या घटनेने देशातील मनुवादी शासकवर्गाला प्रचंड मोठा हादरा दिला होता. पण ४ महिन्यानंतर भाजपाने पाठिंबा काढून घेतल्याने मायावती यांच्या बसपा सरकारने राजीनामा दिला.

१९९४ मध्ये देशातील काही राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुकामध्ये बिहारमध्ये २, कर्नाटकात १ व हरियाणात १ असे उमेदवार निवडून आले. त्यानंतर सन १९९६ मध्ये

लोकसभेच्या निवडणुकामध्ये उत्तर प्रदेशात ५, पंजाबात ३ व मध्यप्रदेशात ३ असे ११ खासदार निवडून आले. याच दरम्यान सन १९९७ मध्ये उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका पार पडल्या. त्यात पार्टीचे ६७ उमेदवार निवडून आले. आणि मताची टक्केवारी २१.९ इतकी होती.[८६] याच दरम्यान बिहार व इतर ठिकाणीही विधानसभा निवडणुका पार पडल्या. त्यात बिहारमध्ये ५ उमेदवार निवडून आले. व मताची टक्केवारी ४ टक्क्याहून जास्त असल्याने बिहारमध्येही पार्टीला निवडणुक आयोगाची मान्यता प्राप्त झाली. त्यामुळे निवडणुक आयोगाच्या नियमाप्रमाणे बसपा ४ राज्यात मान्यताप्राप्त झाल्याने निवडणुक आयोगाने बहुजन समाज पार्टीला 'राष्ट्रीय पार्टी' म्हणून मान्यता दिली. याच दरम्यान झालेल्या जम्मू-काश्मिर विधानसभा निवडणुकीत ४ उमेदवार निवडून आले. तेथेही निवडणुक आयोगाने पार्टीला मान्यता दिली. सन १९९६ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत बसपाला ६७ जागा प्राप्त झाल्याने बसपाच्या मदतीशिवाय कोणीही सरकार बनवू शकत नव्हते. यावेळीही भाजपाने ६-६ महिन्याचे सरकार या अटीवर पाठिंबा दिल्याने बसपा-भाजपा यांचे कु. मायावती यांच्या नेतृत्वाखाली सरकार बनले. ६ महिन्यानंतर बसपा सरकारने राजीनामा दिला. भाजपाला पाठिंबा देण्याचे नाकारले. मात्र भाजपाने यावेळी बसपाचे ४० आमदार फोडून आपले सरकार बनविले. १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत बसपाचे उत्तर प्रदेशात ४ व हरियाणात १ असे ५ उमेदवार निवडून आले व मताची टक्केवारी २० टक्के इतकी झाली. यावेळी सर्व विरोधकांनी पाठिबा दिल्याने भाजपाचे वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली संमिश्र सरकार सत्तेवर आले. पण बसपाच्या ५ खासदारांनी विश्वासदर्शक ठरावावेळी विरोधी मतदान केल्याने १३ दिवसांचे वाजपेयी सरकार कोसळले. त्यानंतर १९९९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकामध्ये बसपाचे उत्तर प्रदेशातून १४ खासदार निवडून आले.[८७] त्यावेळी मताची टक्केवारी २१ टक्के होती. यावेळी भाजपाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी निर्माण करून वाजपेयींच्या नेतृत्वाखाली सरकार आले. पुढे २००१ ला जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुका झाल्या. त्यात पार्टीला २ जागा प्राप्त झाल्या. त्यानंतर २००२ मध्ये झालेल्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकात ९८ जागा प्राप्त झाल्या. व मतदान २३.०६ टक्के प्राप्त झाले. यावेळीही त्रिशंकु विधानसभा निर्माण झाली. बसपाशिवाय कोणाचेही सरकार बनणार नव्हते. त्यामुळे निवडणुका होवून बरीच महिने झाले तरी कोणाचेही सरकार येवू शकले नाही. शेवटी भाजपाने सरकारात सामील होवून बसपाच्या सरकारला पाठींबा दिला व मायावती या मार्च २००२

मध्ये मुख्यमंत्री बनल्या. भाजपाने लोकसभा निवडणुकीत बसपाने युती करावी म्हणून प्रयत्न केले. परंतु काशीरामानी त्याला नकार दिला. परिणामी भाजपा सरकारने कु. मायावतीवर ताज कोरेंडोर प्रकरण उकरून काढून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्याला भीक न घालता कु. मायावतींनी १५ महिन्यानंतर काशीराम यांच्या आदेशावरून २४ मे २००३ ला राजीनामा दिला. त्यानंतर २००३ साली दिल्ली, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड येथील विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. त्यामध्ये प्रत्येक राज्यात प्रत्येक २ उमेदवार निवडून आले. त्यानंतर सन २००४ मध्ये लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. त्यात पार्टीला १९ जागा प्राप्त झाल्या. व मतदान २६ टक्क्याच्यावर गेले. २००७ ला उत्तर प्रदेशच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत पार्टीला २१२ जागा प्राप्त झाल्या. मताची टक्केवारी ३०.४६ इतके झाली.[८८] उत्तर प्रदेशात स्वबळावर बहुजन समाज पक्षाचे २३ मे २००७ ला कु. मायावती यांच्या नेतृत्वाखाली सरकार आले. ही ऐतिहासिकता कोणालाही नाकारता येत नाही आणि याचे सर्व श्रेय पार्टीचे संस्थापक अध्यक्ष काशीराम यांनाच जाते हे नाकारून कसे चालेल?

**ब) ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर**

प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आहेत, ही त्यांची कौटुंबिक ओळख तर आहेच, पण दलित समाजामध्ये एक समजदार आणि सर्वसमावेशक नेता म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यांचे राजकीय आणि सामाजिक तत्वज्ञान बहुजन समाज म्हणजेच बहुसंख्य समाज या संकल्पनेवर आधारित आहे. बहुजन नेते आणि राजकारणी म्हणून १९९० च्या दशकापासून भारतीय राजकारणात सक्रिय आहेत. १९९० मध्ये ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मध्ये सामील झाले. आणि १९९५ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. १९९५ ते १९९६ या काळात त्यांनी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री म्हणून काम पाहिले.

त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा भारतीय राजकारण विशेषतः महाराष्ट्राच्या समाजावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडला आहे. त्यांच्या विचारांनी बहुजन नेत्यांच्या नवीन पिढीला प्रेरणा दिली आहे. त्यांनी भारतातील दलितांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत केली आहे. त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्यासोबतच ते एक उत्तम लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते देखील आहेत. त्यांनी बहुजन समाजाच्या समस्यांवर अनेक पुस्तके लिहिली आहेत. दलित

आणि इतर अत्याचारित गटांना भेडसावणाऱ्या समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी अनेक चळवळींमध्ये त्यांचा सहभाग आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर हे भारतातील सामाजिक आणि आर्थिक न्यायाचे खंबीर पुरस्कर्ते आहेत. त्यांनी उपेक्षितांच्या हक्कांसाठी वेळोवेळी आवाज उठविला आहे, पक्षाच्या विचारपीठांवरती भूमीका मांडली आहे. त्यांचे राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञान सामाजिक न्याय, समता आणि दलित आणि इतर अत्याचारित गट व बहुजन सक्षमीकरण या तत्त्वांवर आधारित आहे. समाजातील सर्व शोषीत घटकांचे कल्याण आणि सर्व समाज घटकांना राजकीय सत्तेत सहभाग हे त्यांच्या विचाराचे ब्रीद आहे. भारतीय समाजात घडत असलेल्या अन्याय अत्याचाराच्या घटनांचा ते खरपूस समाचार घेतात. आधुनिक काळात घडत असलेल्या जातिभेदाचे जोरदार टीका करतात. भारतीय समाजाच्या आमूलाग्र परिवर्तनाचे स्वप्न बाळगून ते कार्यरत आहेत.

१९९४ मध्ये, प्रकाश आंबेडकर यांनी भारिप बहुजन महासंघ या राजकीय पक्षाची स्थापना करून दलित आणि बहुजन समाजाला राजकीत सत्तेच्या परिघात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला आहे. भारिप बहुजन महासंघाकडून अन्यायग्रस्त आणि पिडीत समुहावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी कार्य केले. भारिप बहुजन महासंघ स्थानिक आणि राज्य पातळीवर निवडणुकांमध्ये सक्रीय सहभागी होऊन निवडणूका जिंकण्यात देखील यशस्वी ठरला आहे.

प्रकाश आंबेडकर यांच्या राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञानावर त्यांचे आजोबा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तथा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव आहे. बौद्ध धर्माच्या शिकवणीचा आणि दलित पँथर चळवळीचाही त्यांच्यावर प्रभाव आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या समतामूलक विचारांमुळे नकली पुरोगामी व प्रतिगामी शक्ती त्यांना घाबरून असतात, त्यांच्या राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञानात बहुजन समाजाच्या उत्कर्षाचाच विचार दिसतो.

प्रकाश आंबेडकरांच्या मते, भारतातील बहुजन समाज अर्थात दलित आणि इतर अत्याचारित गट हे भारतीय लोकसंख्येच्या तुलनेत बहुसंख्य आहेत आणि म्हणून सर्व बहुजनांनी त्यांच्या न्याय हक्कांसाठी एकत्र येणे आवश्यक आहे. दलित आणि इतर शोषित गटांना त्यांचे विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी त्यांच्याकडे राजकीय शक्ती असणे आवश्यक

आहे, असे प्रकाश आंबेडकरांचे मत आहे. दलित आणि बहुजन समाजाला भेडसावत असलेल्या भेदभावाची कारणे दूर करण्यासाठी त्यांच्यामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाबरोबरच शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरण होणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटते.

प्रकाश आंबेडकर यांच्या राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञानाचा भारतीय राजकारण आणि समाजावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडला आहे. त्यांच्या विचारांनी दलित नेत्यांच्या नवीन पिढीला प्रेरणा मिळत आहे आणि त्यांनी भारतातील दलितांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास सुरवात झाली असून दलितांतर्गत जाती व ओबीसी जातीसुद्धा त्यांच्या पक्षात एकजुटीने काम करीत आहेत.

भारतामध्ये स्वातंत्रपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर पुरोगामी विचारपरंपरेने बहुजन राजकारणाचा पाया घातला. छ. शाहु महाराज, म. जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही जी परंपरा आहे ती या संदर्भात महत्त्वाची वाटते. या परंपरेतून ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या विचारवंत आणि राजकीय नेतृत्त्वाचा उदय झालेला आपल्याला दिसतो. त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले, छ. शाहू महाराज अशा थोर महापुरूषांचा प्रभाव पडलेला दिसतो. ॲड. प्रकाश आंबेडकर हे म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार यांच्या आदर्शवत परंपरा व तर्कांचा आधार घेत आहेत. अर्थात म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणेच भारतीय समाजात राजकीय सत्तेच्या साहाय्याने व्यापक सामाजिक परिवर्तन घडविता येईल अशी त्यांची धारणा आहे. भारतीय बहुजन वंचित समाजाचे प्रश्न हे सामाजिक प्रश्नांना प्राधान्य आणि अग्रक्रम दिल्याशिवाय सुटणार नाहीत, आणि म्हणून ॲड. प्रकाश आंबेडकर हे प्रश्न प्रथम सामाजिक आणि पर्यायाने आर्थिक प्रश्न सामाजिक चौकटीत सोडविण्याचे नवे सुत्र सांगताना दिसतात. एकूण संरचना बदलण्याचा नवा उपक्रम ते जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात मांडण्याचा प्रयत्न ते करताना दिसतात. प्रस्थापित राजकीय आणि सामाजिक संरचनेची चिरफाड करून त्यातील सत्य आणि समाजाच्या प्रश्नाच्या सोडविण्याचे एक विलक्षण सूत्र समाजाला आणि एकूण देशाच्या राजकारणाला सांगण्याचे ते सतत प्रयत्न करीत आहेत. म्हणून नवनवे राजकीय समीकरण आणि कार्यक्रम ते सतत मांडत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात आणि त्यातही बहुजनवादी राजकारणात त्यांनी आपला प्रभाव टाकल्याचे दिसते.

म्हणून त्यांची एकुण बहुजन संकल्पना आणि बहुजन राजकारणाबाबत चर्चा करण्यापूर्वी त्यांचा अल्प जीवन परिचय करून घेणे क्रमप्राप्त आहे.

**ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय**

ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचा जन्म १० मे १९५४ रोजी बॉम्बे स्टेट सध्याचे मुंबई या ठिकाणी झाला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे नाव प्रकाश असे ठेवले. ॲड. प्रकाश आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आहेत. त्यांचे शालेय शिक्षण व उच्च शिक्षण मुंबईतच विविध ठिकाणी पुर्ण झाले. त्यांनी इ. स. १९७२ मध्ये सेंट स्टॅनीसलास हायस्कूल मधून दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यानंतर इ. स. १९७६ मध्ये सिध्दार्थ कला महाविद्यालयातून बी. ए. पदवीचे शिक्षण पूर्ण केले. १९८१ मध्ये त्यांनी सिध्दार्थ विधी महाविद्यालयातून एल. एल. बी. ही पदवी प्राप्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ते नातू असल्यांने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा व त्यांच्या विचारांचा प्रभाव पडला. प्रचंड वाचन आणि चिंतनाची परंपरा त्यांनी जपली. आयुष्यात कोणत्याही प्रसंगात आपल्या जीवनतत्त्वाशी तडजोड न करता रास्त आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गाने समाजकारण आणि राजकारण केले. समकालीन तत्त्वशून्य राजकारणाला दूर ठेवून तत्त्वाचे राजकारण करत समाजाच्या हिताचा सतत विचार केला.

**ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे राजकीय जीवन आणि बहुजन राजकारणाची सुरूवात**

ॲड. प्रकाश आंबेडकर यांची कारकीर्दीचे इथे अभ्यासाच्या दृष्टीने तीन टप्पे पाडलेले आहेत. अर्थात त्यांच्या राजकीय कारकीर्दीची खरी सुरूवात रिपब्लिकन पक्षातूनच झाली. या पक्षातूनच त्यांनी राजकारणाची सुरूवात केली. १९९४ पर्यंत त्यांनी रिपब्लिकन पक्षात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. हा त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा पहिला टप्पा म्हणावा लागेल.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ०४ जुलै १९९४ रोजी भारिप बहुजन महासंघ या नव्या स्वतंत्र राजकीय पक्षाची स्थापना केली. या पक्षातील बहुजन हा शब्दच मुळात त्यांच्या बहुजन राजकारणाचे दर्शन घडविताना दिसतो. भारिप बहुजन महासंघ हा पक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा लाभलेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षातील मोठ्या एका गटाचा पक्ष होता. या पक्षाच्या माध्यमाने ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेस, भाजप, शिवसेना या राजकीय पक्षांना शह देणारा १९९३–९४ मध्ये जो राजकीय प्रयोग केला. त्यालाच अकोला पॅटर्न म्हणून ओळखले जाते. या

अकोला पॅटर्नच्या माध्यमातून जिल्हा परिषदेत अर्थात स्थानिक स्वराज्य संस्थामधून आपला प्रभाव निर्माण केला. इ. स. १९९५ नंतर अकोला पॅटर्नच्या आधारे बहुजन दलितांची एकत्र मोट बांधत महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळा ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला. हा त्यांचा राजकीय कारकिर्दीचा दुसरा टप्पा म्हणावा लागेल.

ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी २०१८ मध्ये सुमारे १०० भर वंचित शोषितांच्या पक्षांची एकत्र मोट बांधून वंचित बहुजन आघाडीची स्थापना केली. आणि त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाचे समीकरणच बदलून टाकले. एक प्रचंड मोठी राजकीय शक्ती ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर आणली. बेरजेच्या अणि जमातवादी राजकारणाच्या मापदंडाना छेद देवून शोषित, वंचित समाजाची संघटित राजकीय शक्ती उभी केली. हा त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा तिसरा यशस्वी टप्पा म्हणावा लागेल.

प्रस्तुत प्रकरणात ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन राजकारणाच्या संदर्भात जे महत्वाचे योगदान दिले याचा विचार करणार आहोत. तत्पूर्वी दलित, शोषीत, वंचित, बहुजन राजकारणाची स्थिती ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यापूर्वी कशी होती याचा धावता आढावा घ्यावा लागेल. कारण म. फुले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसाच पुढे ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या रूपाने पुढे आल्याचा आपल्याला दिसतो. एकूणच बहुजन राजकारणाचा महत्वाचा दुवा म्हणून आपल्याला ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्याकडे पाहावे लागेल. किंबहुना या राजकीय प्रक्रियेचा ते एक महत्वपूर्ण भाग आणि नुसता घटकच नाही तर बहुजन राजकारणाला महत्त्वपूर्ण आशयच ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी प्राप्त करून दिला. परंतु त्यापूर्वीची एक विशिष्ट परिस्थितीचा त्यास एक वेगळा सामाजिक राजकीय संदर्भ आहे. त्याकडे आपल्याला दुर्लक्ष करून चालणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या एकूण भूमिकेचा त्यांच्या राजकीय प्रवासावर परिणाम पडलेला दिसतो. कारण राजकारण नुसते करत बसणे किंवा राजकारणाचा वाहक बनून जीवन कंठण्यापेक्षा माझ्या समाजाने राज्यकर्ती जमात बनली पाहिजे आणि समाजातील वर्षानुवर्षे नाकारलेला वाटा मिळविला पाहिजे. ही बाबासाहेबांची भूमिका प्रत्यक्ष राजकारणात उतरविण्याचा प्रयत्न ॲड. प्रकाश आंबेडकर करताना दिसत आहेत.

### ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाच्या प्रवेशाची पार्श्वभूमी

ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाच्या प्रवेशापाठीमागे निश्चित अशी पार्श्वभूमी होती. त्यातील ठळक गोष्टींचा विचार करूनच आपल्याला त्यांच्या एकूण

बहुजनवादी राजकारणाचा अभ्यास करता येईल. त्या ठळक घटकांचा आपल्याला पुढीलप्रमाणे विचार करता येईल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ आणि ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे आंतरसंबंध**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व विषमतेचे मूळ हे हिंदू धर्मातील समाजरचनेत आहे हे जाणले होते. त्यांच्या राजकीय चळवळीला धर्मचिकित्सेची भक्कम कडा होती. किंबहुना त्यांच्या धर्ममिमांसेत त्यांच्या चळवळीची दिशा होती. त्यामुळे त्यांच्या चळवळीला समजून घेण्यापूर्वी त्यांची धर्म मीमांसा जाणून घेणे गरजेचे आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर जी राजकीय सामाजिक चळवळ संघटित झाली तिलाच आंबेडकरी चळवळ म्हटले जाते.

''आंबेडकरी चळवळ म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र आणि सम्यक विचार–व्यवहारांच्या पायावर वाटचाल करणारी चळवळ''[८९] कोणतीही चळवळ ही एका साच्यातल्या, प्रवाहहीन असलेल्या विचार आणि व्यवहाराशी संबंधित नसते याचे कारण मुळात काळच प्रवाही असतो. त्यामुळे समाजजीवनातील सामाजिक संदर्भ आणि प्रक्रिया, समाजव्यवस्था तिचे मानके मानदंड प्रवाही आणि गतिशील असणे साहजिकच आहे. कारण काळ हा गतिशील असतो. त्यामुळे सामाजिक चळवळीच्या सैध्दांतिक चौकटीतच या अधिक व्यापक होतात आणि चळवळीचा आशयही वृध्दींगत होत असतो. यामुळेच तथागत ''गौतम बुध्दांनी अनित्येतेचा सिध्दांत मांडला. हा सिध्दांत सर्व भौतिक प्रक्रिया, सामाजिक प्रकिया यांच्याबरोबरच एखाद्या वैचारिक प्रवाहाला किंवा व्यक्ती करीत असलेल्या सैध्दांतिक वैचारिक मांडणीला सुध्दा लागू होतो''[९०] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि चळवळ ही विकसित होत गेलेली दिसते. म्हणून आंबेडकरी चळवळ ही अधिक व्यापक होणारी विस्तार पावणारी गतिशील आणि प्रवाही चळवळ आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित, शोषित, बहिष्कृत समाजाला न्याय हक्क मिळवून देणारी चळवळ उभी केली. सुरूवातीला छ. शाहु महाराज यांच्या मदतीने त्यांनी मूकनायक पाक्षिक सुरू करून समाजात जागृती केली. ही एका वैचारिक सामाजिक क्रांतीची सुरूवात होती. त्यानंतर बाबासाहेब आंबेडकर यांनी कोल्हापूरात पहिली बहिष्कृतांची परिषद भरवून अस्पृश्यांच्या दु:खांना सार्वजनिकरित्या वाचा फोडली. त्यानंतरच्या विविध घटना क्रमात प्रामुख्याने १९१७ मध्ये साऊथब्यूरो कमिटी समोरील साक्ष १९२५ हिलटन यंग समोरील साक्ष, चवदार तळे, महाड

सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, मनुस्मृतीचे दहन, स्वतंत्र मतदार संघ, पुणे करार, घटना निर्मिती, बौध्द धम्माचा स्वीकार, हिंदू कोड बिल अशा विविध घटना क्रमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत समाजाच्या हितासाठी जी चळवळ संघटित केली तशी आजमितीपर्यंत कोणासही शक्य होणार नाही. याच्या जोडीला प्रचंड अशा वाचन चिंतनातून असंख्य अशा ग्रंथाची निर्मिती करून या चळवळीचा वैचारिक पाया भक्कम केला आणि शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा मूलमंत्र दिला. आणि शोषित समाजाला राज्यकर्ती जमात होण्याचा मूलभूत संदेश देवून पुढची दिशा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित व त्यांच्या विचारांना पुढे घेवून जाणाऱ्या चळवळीलाच आले आंबेडकरी चळवळ म्हटले जाते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतरची वंचिताची चळवळ**

शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना १९४२ ला झाली. या पक्षाच्या स्थापनेनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना असे जाणवले होते की, शेकाफे पक्षाला दलितेत्तर लोक मतदान करीत नाहीत. तेव्हापासून एखादा सर्वसमावेशक राजकीय पक्ष असला पाहिजे ही धारणा आणि भूमिका स्वतः बाबासाहेबांची बनलेली होती. या पार्श्वभुमीवर बाबासाहेबांनी अत्रे, एस. एम. जोशी सारख्या मान्यवरांना पत्रव्यवहारसुध्दा केला होता. परंतु बाबासाहेबांच्या आकस्मिक महापरिनिर्वाणाने या प्रयत्नाला पूर्णविराम मिळाला. पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीला शेकाफेचा पराभव झाला होता. नंतर सामुहिक नेतृत्व स्विकारले व प्रेसिडियमचे प्रमुख म्हणून बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांची निवड करण्यात आली. या सामुहिक नेतृत्वाच्या काळात अभुतपूर्व यश मिळत लोकसभेच्या ९ जागा आणि विधानसभेच्या एकून २० जागा मिळाल्या हा खूप मोठा विजय होता.[११] हा विजय सर्वसामान्य कार्यकर्त्यांना आत्मविश्वास निर्माण करणारा ठरला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील पक्ष स्थापन करण्याचा मार्ग मोकळा करणारा होता.

**रिपब्लिकन पक्षाची स्थापना: बहुजन राजकारणाचे आणि न्याय हक्काचे विचारमंच**

१९४७ पासून स्वातंत्र्य चळवळीचे भक्कम अधिष्ठान लाभलेल्या काँग्रेस पक्षाला आव्हान देणारा एकही विरोधी राजकीय पक्ष उदयास आला नव्हता. परिणामी काँग्रेस पक्षाचा एकछत्री अंमल भारतीय राजकारणात राहिला डॉ. सुहास पळशीकर याचे वर्णन करताना काँग्रेस व्यवस्था असे करताना दिसतात. त्यामुळे काँग्रेस विरोधी परंतु समविचारी लोकांचा एक विरोधी पक्ष निर्माण करण्याच्या सैध्दातिक भूमिकेतून रिपब्लिकन पक्षाची स्थापना एक अपरिहार्य विरोधी पक्ष म्हणून

करण्याची गरज निर्माण झाली होती.[१२] या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांच्या सहवासात तयार झालेल्या तज्ज्ञ विवेकी लोकांनी ०३ ऑक्टोबर १९५७ रोजी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली.[१३] रिपब्लिक या शब्दात एक वेगळी वैचारिक बाजू एक भक्कम धारणा आणि सैध्दोतिक बाजू होती. रिपब्लिक हा फक्त लोकशाहीच्या अनुषंगाने महत्वाचा नव्हता. कारण रिपब्लिक आणि लोकशाही हे दोन वेगवेगळे शब्द आहेत. गणराज्यात राष्ट्र प्रमुख हा लोकांच्या माध्यमातून निवडला जातो आणि रिपब्लिक या शब्दाचा मराठी अर्थ गणराज्य असा होतो. या अर्थाने ही सैध्दांतिक बाजू स्वत:मध्येच परिपूर्ण होती. त्यास व्यापकतेचा भक्कम पैलू होता. सुरूवातीला ०३ ऑक्टोबर १९५७ रोजी शे. का. फे. विसर्जित होवून नव्या रिपब्लिकन पक्षाचे पहिले अध्यक्ष म्हणून रावबहादूर एन. शिवराज यांची निवड करण्यात आली.[१४] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या नियोजित पक्षाचे नाव रिपब्लिकन पक्ष असे ठेवले. त्याची काही कारणे आहेत. त्यापैकी एक म्हणजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तथागत गौतम बुध्द यांच्या तत्वज्ञानाचे आकर्षण आणि प्रभाव होता. त्यामुळे बुध्दकालीन गणराज्य अस्तित्वात आणण्याच्या पार्श्वभुमीवर गणराज्याचा आग्रह धरला गेला होता. गणराज्याला इंग्रजीमध्ये रिपब्लिक म्हटले जाते त्यावरून रिपब्लिकन असा शब्द घेतला असावा.[१५] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर प्रामुख्याने ज्या मान्यवरांनी शोषित बहुजनाचे राजकीय अस्तित्त्व टिकवून धरले होते. त्यांच्यामध्ये एन. शिवराज यांचे नाव अग्रक्रमावर घ्यावे लागेल. चंद्रमोहन वाघ यांच्या मते, शिवराज हे आंबेडकर चळवळीचे, फेडरिक एंजील होते.[१६]

रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेनंतर वास्तवात शोषित, वंचित समाजाच्या न्याय हक्काला भारतीय संसदेत वाट मोकळी झाली. वर्षानवुर्षे ज्या समाजाला ज्या समाज रचनेने आर्थिकदृष्टया दुर्बल केले होते. त्या समाजातील विविध क्षेत्रात आपला अधिकार मागण्याचा एक भक्कम मंच या रूपाने लोकांना मिळाला. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पक्षाने केलेले कार्य उल्लेखनीय राहिले.

लोकसभेत दादासाहेब गायकवाड, बी. सी. कांबळे, श्री. दिघे, जी. के. माने, हरिहरराव सोनुले, दत्ता कुट्टी, एन. शिवराज परमार तथा राज्यसभेत बॅ. राजाभाऊ खोब्रागडे आदी मान्यवरांनी विविध प्रश्न मांडून वंचित समाजाच्या प्रश्नांना पुन्हा वाचा फोडली. या प्रश्नांपैकी शेडयुल्ड कास्टना मिळणारी सवलत ही नव बौध्द समाजाला सुध्दा मिळाली पाहिजे, ही मागणी महत्त्वाची होती. मा. दत्ता कुट्टी यांनी बौध्दांचा प्रश्न उपेक्षणीय कसा? ते आपल्या १५ फेब्रुवारी १९५८ च्या भाषणात म्हणतात, ''अस्पृश्यता पाळणे हा जरी गुन्हा असला तरी ती अत्यंत तीव्र

प्रमाणात पाळली जात आहे. या गुन्हयासाठी कुणाला शिक्षा झालेली आहे अशा प्रकारचे उदाहरण मला तरी ऐकिवात नाही. अस्पृश्यता जरी राष्ट्रीय प्रतिष्ठेस बाधक असली अथवा ती माणुसकीवरील कलंक असला तरी ती नष्ट करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्नाचा अभाव आहे.

दादासाहेब गायकवाड यांनी दलित समाजाला पडीक जमीन देण्याची महत्त्वपूर्ण मागणी केली. त्याचबरोबर बिडी व्यवसाय, कातडी कमविणे, साबण, मेणबत्या वगैरे तत्सम घरगुती उद्योगांना शासनाचे सहकार्य मिळावे, अशा विविध मागण्या केल्या. ज्याला बहुतांशी यश येत होते. या सर्व मागण्यात महत्त्वाची मागणी अर्थात एक चळवळच त्यास म्हणता येईल. ती म्हणजे भूमिहिनांची चळवळ होय. ज्या वंचित लोकांना जमीन नाही किंबहुना राहती जागासुध्दा नाही अशाना जमीन मिळावी यासाठीची चळवळ ही क्रांतिकारी चळवळ म्हणावी लागेल. याशिवाय अल्पसंख्याक समाजाच्या हक्काचे अनेक प्रश्न संसदेत या पक्षाने मांडले.

प्रामुख्याने बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर या चळवळीला अंतर्गत मतभेदाने ग्रासले परिणामी चळवळीची अनेक वर्तुळे तयार झाली. रिपब्लिकन पक्ष निर्माण व्हावा, आणि या पक्षात सर्व शोषित समाज संघटित व्हावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे ठरले परंतु नेतृत्वावरून मतभेद झाल्याने शेडयुल्ड कास्ट फेडरेशन अंतर्गत निवडणुकीस सामोरे जाण्याचे ठरले. संपूर्ण देशातून ९ खासदार निवडून आले. या पक्षात १९५९ साली पहिली फूट पडली. आणि बी. सी. कांबळे आणि दादासाहेब गायकवाड यांचे दोन गट तयार झाले. ही उभी फूट आजमितीपर्यंत तशीच कायम दिसते. १९६२ साली दादासाहेब गायकवाड यांच्या गटाने काँग्रेसबरोबर हात मिळविले. पण या युतीचा पक्ष संघटनेवर प्रतिकूल परिणाम झाला. जास्तीत जास्त पदे मिळविण्यासाठी रिपब्लिकन पक्ष आपली शक्ती खर्च करू लागला व व्यवस्था परिवर्तनासाठी बहुजनांचे राजकारण हे पक्षाचे मूळ सूत्र त्यामुळे बाजूला पडल्याचे दिसते. दादासाहेब गायकवाड यांच्यानंतर खोब्रागडे यांनी स्वतंत्र गट तयार केला. या गटालाच रा. सु. गवई गट म्हटले जाते.

दरम्यानच्या काळात रिपब्लिकन पक्षात मोठे मतभेद वाढले होते. चळवळीतील खूप मोठा वर्ग हा काँग्रेस धार्जिणा बनत चालला होता. या फुटीच्या राजकारणामुळे दलित समाजावर अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढत होते. एकूण चळवळ पंगू बनत गेल्याने अत्याचारात दिवसेंदिवस वाढच

होत होती. यातून वेगळा मार्ग काढण्याची गरज होती. फुटीरता वाढत गेल्याने रिपब्लिकन पक्ष अंतर्गतरित्या पोखरला गेला. रिपब्लिकन पक्ष निर्मितीपासूनच्या या फाटाफुटी व ऐक्याला नवनवे संदर्भ प्राप्त होत गेले. आंबेडकरी नेतृत्त्व संधीसाधु व तडजोडवादी झाले. यामुळे आंबेडकरवादी चळवळीचे खच्चीकरण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाप्रयासाने निर्माण केलेला हा क्रांतिकारी लढा कुंठीत झाला.

१९७२ साली दलित पँथरचा उदय हा पुढच्या काळातील राजकीय समीकरणांना चालना देणारा ठरला रिपब्लिकन पक्षाच्या गटबाजीच्या राजकारणानंतर दलित पँथर हा एक वेगळाच पर्याय उपलब्ध झाला. याचे कारण रिपब्लिक पक्षाच्या अपयशानंतर वाढता अन्याय अत्याचार त्यात होरपळत चाललेला वंचित समाजघटक यांच्या दु:खाला वाचा फोडण्याचे काम दलित पँथरने केले.

**दलित पँथरचा उदय आणि बहुजन राजकारण**

संपूर्ण महाराष्ट्रात ज्या काळात दलित, अल्पसंख्य, समाजाला जमातवादी शक्ती लक्ष करत होती. त्या काळात रिपब्लिकन पक्षातील नेत्यांना या समाजाला संरक्षण देता आले नाही. नेमक्या याच काळात असुरक्षित समाजाच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्यासाठी राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांनी खूप प्रयत्नातून दलित पँथरची स्थापना केली. गाव तिथे शाखा उघडून शिवसेनेसारख्या पक्षाला सुध्दा आव्हान दिल्याचे दिसते. या पँथरच्या चळवळीत मोठया संख्येने काही ठिकाणी मुस्लिम युवक सामील झालेले दिसतात.

ज्या प्रसंगी हिंदूनी बौध्द समाजावर हल्ले केले, त्या पेचप्रसंगात दलित पँथरने छातीठोक भूमिका घेतली. दलित पँथरच्या रूपाने एक नवा पर्याय लोकासमोर होता. दरम्यान मुंबईच्या काही भागामध्ये हिंदू आणि बौध्द यांच्यामध्ये दंगली उसळल्या होत्या. हिंदूनी सामूहिकरित्या बौध्द समाजावर हल्ले केले होते. दलित पँथरने बौध्दांना दिलासा दिला. भयग्रस्त बौध्दांच्या रक्षणासाठी ते स्वत: धावून जात होते.[१७] एका अर्थाने दलित पँथर ही रिपब्लीकन या पक्षातील नेत्यांच्या दुर्बलतेमुळे निर्माण झालेली संघटना होती.[१८] क्षीरसागर म्हणतात तसे जरी रिपब्लीक पक्षातील नेत्यांच्या अपयशात दलित पँथरच्या उदयाची बीजे असली तरी दुसरा एक महत्वाचा पैलू होता, तो म्हणजे दलित वंचित समाजावर होणारा अन्याय आणि अत्याचारांचे वाढते प्रमाण. तत्कालीन साहित्यातून, ही मोठा विद्रोह आपल्याला पहावयास मिळतोच, हा विद्रोह कुठल्या ना कुठल्या

मार्गाने पुढे येणारच होता मग रिपाई अपयशी असो अथवा यशस्वी असो. हा अन्याय पाहून एका ठिकाणी राजा ढाले म्हणतात, 'एखाद्या महिलेच्या इज्जतीपेक्षा एखाद्या राष्ट्रध्वजाच्या कपड्याची किंमत अधिक कशी असू शकेल? जर महिलांचे कपडे फाटतच राहणार असतील तर आम्हाला राष्ट्रध्वजाच्या कापडासी काही देणेघेणे नाही.[९९] राजा ढाले यांच्या या एका विधानातच त्या काळातील अन्यायाची प्रचिती येते. त्या काळात तामिळनाडू, बिहार, दिल्ली, महाराष्ट्र, विदर्भ अशा बहुतांश ठिकाणी दलितांवर अन्यायाची उदाहरणे दिसून येतात. बलात्कार, सामुहिक अत्याचार हा नित्यनियमच जणू बनत होता. अशात पँथरने समाजाला हाक दिली.

९ जूलै १९७२ मध्ये दलित पँथर या लढाऊ संघटनेची स्थापना झाली. आणि त्यानंतर महाराष्ट्रात ही संघटना पसरू लागली. दलित तरूण वर्ग या संघटनेकड आकर्षित होवू लागला. पँथरची चळवळ ही इतकी अनुकूल आणि प्रवाही होती की त्यामुळे द्रमुकच्या मंत्रीपदाचा राजीनामा देत सत्यवाणी मुथ्थू यांनी दलित पँथरच्या झुंजारू संघटनेत प्रवेश केला. पँथरचा उदय हा महाराष्ट्रातील त्या तरूण साहित्यकारांमुळे झाला ज्यांच्या मनात दलित शोषित समाजावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द आग भडकत होती. फक्त महाराष्ट्रात नाही तर तामिळनाडू, गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश, दिल्ली, उत्तर प्रदेश अशा विविध राज्यात प्रसार आणि प्रचार झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रास्त अशा भूमिकेला आत्मसात करत व्यापक अशा दलित आंदोलनाच्या शीर्षस्थानी नामदेव ढसाळ, ज. वि. पवार हे होते. दलित लोक पँथरकडे एक मुक्तीदाता म्हणून पाहत होते. १९७२ ते १९७४ हा काळ दलित पँथरचा होता. पँथरचे नेते राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांनी बावडा प्रकरण संपूर्ण महाराष्ट्रात गाजविले होते. त्यामुळे रिपाई आणि काँग्रेसला सुध्दा हे आव्हान होते. १९७४ च्या लोकसभा पोटनिवडणुकीत दलित पँथरने उजव्या कम्युनिस्ट पक्षाच्या कॉ. रोझा देशपांडे यांना पाठींबा देवून काँग्रेसच्या रामराव आदिक यांचा पराभव केला होता. पँथरमध्ये दलितांबरोबर इतरही सहभागी होत होते. तसेच काही मुस्लिम तरूण सुध्दा सहभागी झाले होते.[१००]

ज्यावेळी गवई बंधूंचे डोळे काढण्याचा अमानुष अत्याचार झाला त्याप्रसंगी पँथरने प्रचंड असे आंदोलन केले. त्याकाळी रा. सु. गवईना सभापती पद सोडवत नव्हते आणि रूपवते ना. वसंतराव नाईक मंत्रीमंडळात गपचूप बसून राहीले. त्यामुळे पँथर ही निष्क्रीय झालेल्या रिपब्लिकन पक्षाला झटका देणारी स्व:स्फूर्त प्रतिक्रिया होती. कवी, साहित्यिक मनाच्या पँथर नेतृत्त्वात

बौध्दीक भांडवल होते. परंतु व्यावहारिक राजकारणात हे युवा नेते कमजोर होते. दलित समाज मोठा विद्रोह करणार हे इतर पक्षातील जाणती नेते मंडळी जी प्रस्थापित आणि राजकारणाचा वारसा असणारी होती ती ओळखून होती. दरम्यान संघटनेत मतभेद सुरू झाले याचा फायदा विविध पक्षांनी उठविला.[१०१]

**प्रकाश आंबेडकर यांचे राजकीय नेतृत्त्व**

दलित पँथरच्या फुटीनंतर मास मुव्हमेंट, भारतीय दलित पँथर, दलित युवक आघाडी यासारख्या संघटनांची बजबजपुरी निर्माण झाली. या प्रत्येक संघटनेने बाबासाहेबांच्या विचारांच्या सोईप्रमाणे एखादा भाग उचलायचा आणि आणि समग्र परिवर्तनाची परिभाषा करायची अशी पध्दती निर्माण केली. अशा बिकट प्रसंगात ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा राजकीय क्षितीजावर उदय हा बहुजनाच्या राजकारणाची नवसंजीवनी ठरली. समदुःखी आणि समविचारी लोकांची मिळून एक राजकीय शक्ती निर्माण करता येईल, हे त्यांनी जाणले होते. म्हणून त्यांची सबंध बहुजन संकल्पना आणि राजकारणाची संकल्पना या सूत्राशी गुंफल्याची दिसते.

रिपब्लिक पक्ष एक चांगला राजकीय पर्याय म्हणून आणि बहुजन, वंचित, शोषित समाजाला एक सकारात्मक राजकीय पर्याय बनू शकत होता. पण या पर्यायात एक महत्त्वपूर्ण अडसर ठरला. तो या पक्षातील बजबजपूरी आणि अंतर्गत कमालीचे मतभेद याचा परिणाम म्हणजे हा पक्ष रसातळाला गेला. रिपब्लिकन पक्षातील लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संघर्षाचा मार्ग सोडून दिला आणि आपसात मतभेदालाच राजकारण आणि स्वारस्याचा भाग मानल्याने या पक्षाचा राजकारणातील प्रभाव कमी झाला. संघर्षाचा मार्ग सोडल्याने हा पक्ष संसदीय राजकारणाच्या चौकटीत बंदिस्त झाला. त्यामुळे हा राजकीय पक्ष ज्या सौदेक्षमतेने राजकारण करून समाजाचा आणि पर्यायाने देशाच्या हिताचे सकारात्मक राजकारण करू शकत होता. तो आत्मा या पक्षाने हरपल्यासारखे झाले. परिणामी बहुजन वंचिताच्या हक्कांच्या विचारमंचाची व्यक्तिगत हेवेदावे आणि कटकारस्थानाने बळी गेला. रामदास आठवले सारखे नेतृत्त्व स्वहितापोटी कधी काँग्रेस कधी राष्ट्रवादी काँग्रेस तर सध्या भा. ज. पा. सारख्या पक्षाच्या पाठीमागे आपली आणि समाजाची ताकद उभी करू लागले आहेत. तत्त्ववैचारिक दिवाळखोरीने सबंध चळवळच मोडकळीस आली. लोक पर्यायाच्या शोधात इतर पक्षांना मते देवू लागल्याने स्वपक्षाची अंतर्गत हेवेदावे आणि मतभेदपूर्ण राजकारणाने रिपाईचे प्रंचड असे नुकसान झाले. लोकांना पर्याय हवा

होता. दलित पँथरचा उदय हा अशा काळात झाला ज्या काळात सबंध महाराष्ट्रात ६० च्या दशकानंतर राजकीय आणि सामाजिक जीवन कमालीचे जमातवादी बनले. दलित अल्पसंख्यांक समाजावरील होणारे हल्ले हे त्या जमातवादी राजकारणाचा परिणाम होता. पण दलित पँथरमध्येही नंतरच्या काळात फूट पडली व रिपब्लिकन चळवळ पुन्हा कमजोर झाली. अशाकाळातच ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाचा उदय झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शेड्युल्ड कास्ट फेडरेशन आणि समाजवादी पक्षाचे एकत्रिकरण करून सक्षम प्रभावी पर्यायी पक्ष भारतात निर्माण करावयाचा होता. डॉ. लोहिया यांनी त्याला मान्यता दिली होती. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर समाजवादी व रिपब्लिकन आंबेडकरवाद्यांना हा प्रस्ताव आणि त्याचे राजकीय महत्त्व माहित असतानाही ही प्रक्रिया कोणीच सुरू केली नाही. पन्नास वर्षांपूर्वीची आंबेडकर लोहिया संकपित ही बहुजन सत्तेची प्रक्रिया राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालूप्रसाद यादव, राबडीदेवी, बसपाचे नेते काशीराम, मायावती उत्तरप्रदेशमध्ये मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान आणि महाराष्ट्रामध्ये ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सुरू केली.

१९८२ साली ॲड. प्रकाश आंबेडकर वकीलीचा व्यवसाय करीत असतानाचा आपल्या कामातून वेळ काढून सामाजिक कार्यात उतरू लागले. त्यांनी सम्यक समाज आंदोलनास सुरूवात केली. या संघटनात्मक शक्तीच्या आधारे २ मार्च ते ८ मार्च १९८३ या काळात नाशिक ते मुंबई 'इशारा मोर्चा' काढून गटबाजीने त्रस्त झालेल्या बहुजन समाजात जनजागृतीचे मूलभूत कार्य केले.[१०२]

### इशारा आंदोलन आणि ॲड. प्रकाश आंबेडकर राजकारणातील प्रवेश

एकूणच सुरूवातीला महाराष्ट्रात आणि त्यातही विषेशकरून पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा तसेच विदर्भ अशा ठिकाणी काही जिल्हयात कनिष्ठ नोकरदार, महार तसेच रामोशी समाजासाठी राखीव अशी वतनी जमिनी होत्या. सुमारे प्रत्येक गावात १०० ते १५० एकर जमीन ही वतनदारांच्या जमिनी म्हणून त्यांच्या उत्पन्नाचे साधन होते. या जमिनी जरी खूप सुपीक नसल्या तरी या लोकांच्या असंख्य कुटुंबांचा उदरनिर्वाह यावर चालत होता. परंतु देशाच्या स्वातंत्र्यानंतर ३० ते ४० वर्षात सावकारी, फसवणूकीचे व्यवहार, दमदाटी, दहशत, गुंडगिरी अशा विभिन्न असंविधानीक मार्गाने तथाकथित उच्च मानल्या गेलेल्या जातीसमुहानी लाटल्या. परिणामी या समाजाच्या प्रगतीत अडथळा निर्माण झाला उपासमारीत जगणारा हा समाज आणखीन क्षतीग्रस्त

झाला. ॲड. प्रकाश आंबेडकरांना हा प्रश्न प्रकर्षाने जाणवला. त्यांच्या हे लक्षात आले की वर्षानुवर्षे या समाजाकडील उत्पन्नाची साधने प्रस्थापित समाजव्यवस्थेने एक तर हिसकावून घेतली किंवा उत्पन्नाची साधने मिळू दिली नाहीत. म्हणून या समाजाची सर्वांगिण प्रगती करायची असेल तर उत्पन्नाचे साधन मिळाले पाहिजे, तरच हा समाज आत्मर्निभर होवून स्वावलंबी होईल. या पार्श्वभूमीवर या पुर्ववत हक्काची वतने या समाजाला परत मिळविण्यासाठी आंदोलन केले. त्याचबरोबर १९८२–८३ मध्ये पूणे ते माणगाव साखर सम्राटांच्या आणि कारखानदाराच्या विरूध्द आवाज उठविला. सम्यक समाज आंदोलनापूर्वी त्यांनी बौध्द महासभेची स्थापना करून राज्यभर दौरे काढले होते. रिपब्लिकन पक्षाची घडी विस्कटलेली असताना प्रकाश आंबेडकर यांच्याकडे कार्यकर्ते मोठ्या आशेने पाहत होते. त्यांना वाटत होते की, निळ्या झेंड्याचे नेतृत्त्व स्वत: ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या खांद्यावर घ्यावे. आणि विस्कटलेली घडी बसवावी. २७ नोव्हेंबर १९८३ रोजी केलेली पक्ष पुर्नबांधणी ही याचाच एक भाग होता. ही घोषणा रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याचे आवाहन होते. ही प्रक्रिया टाके घालणारी नव्हती तर तळ साधणारी होती. अशा वेळी गटातटात विभागलेल्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना एकत्र करून रिपब्लीक चळवळीला तेज प्राप्त करून देणे हाच एक पर्याय होता.[१०३]

पूर्णबांधणीच्या घोषणेचा अर्थ हा विविध गटातटात विभागलेल्या कार्यकर्त्यांना एकत्र करून पक्षाची बांधणी करून ती गतिमान करणे इतकाच होता. या पूर्णबांधणीसाठी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सबंध महाराष्ट्र अक्षरश: पिंजून काढला होता.[१०४]

रिपब्लिकन पक्षातील कार्यकर्ते हे विभिन्न गटातटात विभागलेले असले आणि काही अंशी त्यांच्यात काही तात्विक मतभेद असले तरी चळवळीपासून ते वेगळे झालेले नव्हते. चळवळ हा सर्वांच्या आशेचा किरण होता. किंबहुना चळवळ हा त्यांच्या अंतप्रेरणेचा मूलभूत स्त्रोत होता. अशा कार्यकर्त्यांना एकत्र आणणे आणि पुन्हा चळवळ संघटित करून राजकीय शक्ती तयार करणे फार कठीण नाही, हे प्रकाश आंबेडकर यांनी जाणले होते. या चळवळीत सर्व धर्मीयांना मुक्त प्रवेश होता. ॲड. प्रकाश आंबेडकर आपली स्वतंत्र राजकीय सामाजिक भूमिका निर्भयपणे विकसित करीत होते. भारिपच्या पहिल्याच स्थापना बैठकीत त्यांनी युवक क्रांती दल, दलित युवक आघाडी, दलित पँथर अशा समविचारी राजकीय सामाजिक संघटनांना संवाद साधून बोलविले होते. बहुजन महासंघांची औपचारिक स्थापना पुढे १९९३ मध्ये झाली असली तरी

त्यासाठीचा व्यापक विचार ॲड. प्रकाश आंबेडकर पूर्वीपासूनच करीत होते हे लक्षात घेतले पाहीजे.[१०५]

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी २७ नोव्हेंबर १९८३ रोजी पक्ष पुर्नबांधणीची त्यांनी केलेली त्यांनी घोषणा ही मरगळ आलेल्या कार्यकर्त्यांना नवचैतन्य प्राप्त करून देणारी होती. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या व्यापक बहुजनवादी भूमिकेमुळे प्रारंभापासून प्रा. अविनाश डोळस, प्रा. एस. के. जोगदंड, प्रा. माधव मोरे यांच्यासारखे आरपीआयचे महत्त्वपूर्ण कार्यकर्ते संघटीत होऊ लागले. अकोल्याचे जेष्ठ कार्यकर्ते आणि सहकारी एम. एन. लंकेश्वर गुरूजी, यवतमाळचे चंदनबाबू तेलंग, चंद्रपूरचे दादा इंगळे, ॲड. जयश्रीताई इंगळे, नागपूरचे शंकर मानके, पुण्याचे जेष्ठ साहित्यिक आणि विचारवंत मुरलीधर जाधव या लोकांना मा. बाळासाहेबांनी जवळ केले. १९८४ मध्ये अकोला मतदारसंघातून लोकसभा पोटनिवडणुकीत ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी निवडणूक लढविली. पूर्वी दलित, अल्पसंख्याक, बहुजन लोकांची काँग्रेसला मते मिळत होती. ती मते आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न सुरू केला. या निवडणूकीत त्यांना दीड लाख मते मिळाली. नांदेडमध्ये ही अशोकराव चव्हाण अल्पमतात निवडून आले. या निवडणूकीत बाळासाहेबांचा विजय झाला नाही परंतु बहुजन राजकारणाच्या चेतना पुन्हा चेतल्या गेल्या, ही या संदर्भातील लक्षणीय गोष्ट म्हणावी लागेल. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्यामुळे दलितांच्या अस्तित्त्वाची लढाई पुन्हा एकदा पुनरूज्जीवीत झाली.[१०६]

ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचे नवचेतनापूर्ण बहुजन राजकारण भारिपचे कार्यकर्त्यांना एका विशिष्ट व्यापक प्रक्रियेतून घेवून जात होते. जिथे वंचित शोषित समाज घटकांवर अन्याय होईल तिथे ते ठामपणे उभे राहत. पूर्वी दलित व अन्य शोषित वंचित समाजवर्ग काँग्रेसच्या दावणीला गुरफटला होता. अशा समाजघटकाला ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी नवे आत्मभान, आत्मजाणीव, नवा विश्वास, आणि नवी प्रतिमा देण्याचा प्रयत्न केला. जो वर्ग सतत परिघाबाहेर फेकला गेलेला आहे, ज्याला आजमितीपर्यंत कोणताच वाटा मिळालेला नाही. अशा लोकांना घेवून त्यांनी राजकीय प्रवास सुरू ठेवला होता. एकुणच त्यांची राजकीय भूमिका ही व्यापक आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणारा आणि समतामुलक समाजनिर्मितीला पोषक होती. भावनिक प्रश्नांपेक्षा दलित शोषित आणि वंचित समाजाचे खरे प्रश्न हे आर्थिक आणि सामाजिक

आहेत. अगोदर ते सोडविले पाहिजेत. राजकीय सत्ता प्राप्त करणे हा एक त्यातील प्रयत्न आहे अशी भूमिका ॲड. बाळासाहेब आंबेडकर मांडत होते.

१९८३ पासून ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय रिपब्लिकन पक्ष अतिक्रमित जमिनीच्या प्रश्नावर लढत होता. गायरान पडीक जमीनी या भूमिहीन कसणाऱ्या लोकांच्या नावावर करा ही भूमिका ॲड. बाळासाहेब आंबेडकर नेहमी सांगत आले. त्यासाठी बाळासाहेब आंबेडकर यांनी वारंवार आंदोलने केल्याचे दिसते. मुंबई गिरणी कामगारांची थकबाकीचा प्रश्न, झोपडपट्टीचा प्रश्न असे विभिन्न प्रश्न त्यांनी पुढे आणले. फुले, आंबेडकरी बहुजन चळवळीने सत्ता संपादनाबरोबच संस्था उभारणीकडे लक्ष दिले पाहिजे. ही व्यापक भूमिका ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी मांडलेली होती. त्यासाठी ते सतत प्रोत्साहन देत होते.[१०७]

ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांची भूमिका व्यापक होती ते म्हणतात, आपल्या आंदोलनाचे ठोका ही उद्याच्या बहुजनांची सत्ता ही आहे जोपर्यंत या महाराष्ट्रामध्ये बहुजनांची अर्थात अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, हिंदू ओ. बी. सी., भटके विमुक्त, बौध्द, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन या अल्पसंख्यांक धर्मीयासह तमाम स्त्रियांची सत्ता आपण आणत नाही. तोपर्यंत आपले प्रश्न सुटत नाहीत ही बहुजनांची सत्ता आणण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.[१०८] एकूणच ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांची बहुजन राजकारणाची संकल्पना ही सर्वसमावेशक आणि व्यापक आहे हे स्पष्ट होते. पक्षाच्या अधिवेशनात पुढील घोषणा देण्यात येत.

१. बहुजन सारे एक होऊ, सत्ता आपल्या हाती घेवू.

२. संख्येच्या प्रमाणात सत्तेत सहभाग, हा आमचा हक्क आहे आणि तो आम्ही मिळविणारच....

३. मते आमची सत्ता तुमची, नाही चालणार... नाही चालणार...

४. भीक नको सत्तेची, सत्ता हवी हक्काची...

५. सत्तेवर येऊन बहुजन समाज, प्रस्थापितकांचा उतरेल माज... [१०९]

**ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या बहुजन राजकीय चळवळीचे वेगळेपण**

चळवळीबाबत ॲड. प्रकाश आंबेडकरांची भूमिका व्यापक आहे. चळवळ ही सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, आधारावर असावी अशी त्यांची भूमिका आहे. भारतातील राजकीय पक्षांबाबत ते म्हणतात की, इथल्या राजकीय पक्षांनी राजकारणाला महत्त्व

देऊन सामाजिक प्रश्नांना बगल दिली आहे. बुलढाणा येथे. पक्षाच्या मेळाव्यात त्यांनी अशी भूमिका मांडली की, बहुजन समाजाची लोकसंख्या मोठी असूनही या समाजाला न्याय मिळू शकला नाही. त्यांच्यावर लादण्यात आलेली सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, असमाजनता, स्वातंत्र्योत्तर काळातही कमी झालेली नाही. [११०] भारतात आत्तापर्यंत सामाजिक समता आणण्याचा प्रयत्न कोणीही केला नाही. तो मी करत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अशी भूमिका होती की, जे भारतात धर्म आहेत. त्यामध्ये असणाऱ्या प्रत्येक समाजाची समाजरचना बदलली पाहिजे, म्हणजे सामाजिक समता येईल.

ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी मुळात बहुजन या शब्द वापरून चळवळीला व्यापक रूप दिलले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यानंतर रिपब्लिकन चळवळ राष्ट्रीय काँग्रेसचा दलित विभाग म्हणूनच काम करत होती. हे चित्र बदलण्याचे प्रयत्न ॲड. प्रकाश आंबेडकरांनी केल्याचे दिसते. ते आपल्या चळवळीतील पदाधिकारी, कार्यकर्ते व बहुजनांना सांगतात की, आपली लढाई दोन प्रकारची आहे. एक धर्मवादी व जातीवादी भाजपसंघ परिवाराबरोबर तर दुसरी आपल्या स्वतःबरोबरची आहे. ती म्हणजे बहुजनांनी स्वतः सत्ताधारी बनण्यासाठी प्रथम सत्ताधारी बनण्याची मानसिकता निर्माण करणे. हे सुत्र त्यांनी बहुजनांच्या मनामध्ये रुजविले. त्यामुळे बहुजनांच्या राजकीय महत्त्वकांक्षा उंचावल्या.[१११] त्यासाठी त्यांनी बहुजनांचे अनेक मुलभूत प्रश्न हाती घेऊन आंदोलने केली. ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांनी भारिप बहुजन महासंघाच्यावतीने केलेले आंदोलने किंवा हाताळलेले प्रश्न समाजातील सर्व घटकांशी संबंधित होते.

### ॲड. प्रकाश आंबेडकर आणि बहुजनांचे मूलभूत प्रश्न

ॲड. प्रकाश आंबेडकर यांना मुळात शोषित बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणावयाचे आहे. त्यांनी सतत बहुजन समाजाच्या मूलभूत प्रश्नावर भर देवून राजकारण केल्याचे दिसते. या समाजघटकांचे शिक्षण, आरोग्य, नोकरी, छोटे–मोठे उद्योग, राजकारणातील स्थान, सामाजिक संरचनेतील त्यांचे स्थान व दर्जा या समाजातील लोकांचे अन्न, वस्त्र आणि निवारा आदी प्राथमिक गरजा अशा विविध प्रश्नावर प्रकाश आंबेडकर यांनी भर देत व्यापक राजकीय भूमिका घेतली. ती मुळात त्यांच्या बहुजनवादी वैचारिक भूमिकेला सुसंगत होती. आंबेडकरी चळवळ ही मुळात नाही रे वर्गातून वंचित, शोषितांच्या मधून निर्माण झालेली वैचारिक आणि समाजजीवनाला

जरा वेगळा पैलू देणारी तत्त्ववैचारिक भूमिकेच्या भक्कम कडा असणाऱ्या अधिष्ठानातून उदयास आलेली चळवळ आहे. ज्यावेळी महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीत मुलभूत प्रश्नांना बगल देऊन भावनिक प्रश्नांवरती चळवळ करत होत्या. त्यावेळी ॲड. प्रकाश आंबेडकरांची अशी भूमिका होती की, विविध प्रश्नांवरील चळवळी, आंदोलने, उभी करताना भावनांचा आदर केला पाहिजे. पण चळवळी केवळ भावनेच्या पायावर चालल्या तर त्यातून कष्टकरी, बहुजन जनतेचे प्रश्न सुटताना दिसत नाहीत.[११२] ॲड. प्रकाश आंबेडकर यांची ही व्यवस्था परिवर्तनाची बहुजनवादी राजकीय आणि वैचारिक भूमिका अभ्यासण्यासाठी पुढील काही घटकांचा विचार करावा लागतो.

बहुजन महासंघाच्या स्थापनेनंतर या पक्षाच्या विस्तारासाठी शेगाव, जि. बुलढाणा येथे पक्षाचे अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनात देशातून २ लाखांवर विविध जाती–समुहाचे लोक, आपल्या पारंपारिक वेशभूषेत उपस्थित होते. यावेळी आपली भूमिका स्पष्ट करताना ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले, ''महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय जीवनात शोषित, अल्पसंख्य व बहुजन समाजाची प्रचंड उपेक्षा झाली आहे. स्वातंत्र्यानंतरही बहुजन समाजाची परिस्थिती हालाखीची आहे. मुठभर लोकांच्या हातात सत्ता एकवटलेली आहे. ज्या दिवशी बहुजन समाजाची चळवळ सुरू होईल, त्यावेळेपासून बहुजन समाजाला सत्ता देणे, प्रस्थापितांना भाग पडले. बहुजन महासंघाचा सत्ता मिळविणे, एवढाच उद्देश नाही तर बहुजन समाजातील २७२ जाती, भटके, विमुक्त, अनुसूचित जाती जमाती, अल्पसंख्यांक जातींच्या हितसंबंधाचे रक्षण व न्याय हक्क मिळवून देणे, यासाठी कठिबद्ध आहे.''

**वतनी जमीन**

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी वतनी जमिनीबाबत महत्त्वपूर्ण आंदोलन संघटित केले. त्यांच्या या आंदोलनाला बहुजन संकल्पनेची व्यापकता होती. ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा राजकारणात आणि सामाजिक जीवनात प्रवेश झाला त्यावेळी आंबेडकरी चळवळ ही पूर्णपणे नामांतर या एकाच प्रश्नावर केंद्रीत झालेली होती. नामांतर निमित्ताने खूप मोठी ताकद निर्माण झाली होती. परंतु पोलिसांच्या माध्यमातून प्रचंड दडपशाहीचा अवलंब केला गेला. या दबावामुळे लोक खचून गेले होते. या काळात पोलिसांच्या माध्यमातून लोकांवर हकनाक अन्याय होत होता. जेणेकरून लोक चळवळीपासून लोक परावृत्त होतील अशाकाळात लोकांना आधाराची गरज होती, नेटक्या कार्यक्रमाची आवश्यकता होती. म्हणून ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी आठ

दिवसाचा 'लाँग मार्च' चे आयोजन केले. या लाँग मार्चमध्ये त्या काळातील अनेक आंबेडकरी चळवळीतील मान्यवरांना त्यांनी यशस्वीपणे सहभागी करून घेतले. 'सम्यक समाज आंदोलन' या नावाने नाशिकच्या काळाराम मंदिरापासून ते मुंबई पदयात्रा काढली. या पदयात्रेत त्यांनी सर्वप्रथम महार इनाम वतनी वर्ग ६ 'ब' च्या जमिनी, वतनी तथा कनिष्ठ नोकर इनाम हस्तांतरीत जमिनी पूर्ववत वतनदारांना मिळाल्या पाहिजेत हा प्रश्न त्यांनी अग्रक्रमाने मांडला.[११३]

**शेतकरी**

अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी प्रामुख्याने शेतकरी कष्टकरी लोकांच्या मूलभूत प्रश्नांचा व्यापक विचार केला. किंबहुना हा वर्ग हा देशाचा आधारभूत घटक आहे. हे त्यांनी आपल्या विचारात ठामपणे मांडले होते. समकालीन कृषी क्षेत्र आणि शेतकरी वर्गाच्या अनुषंगाने जे प्रश्न निर्माण झालेले आहेत, त्याच्या सोडवणूकीचे सूत्र हे अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या वैचारिक मांडणीत सापडते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

शेतमालाला हमीभाव मिळणे हे आजच्या संदर्भात महत्वाचे आहे. अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या मते, सरकार शेतकरी वर्गाच्या हिताचे निर्णय घेताना दिसत नाही. शेतमालाला योग्य हमीभाव नसल्यामुळे शेती परवडेनासी झालेली आहे. वाढती महागाई, बि–बियाणे, खते मशागत या विविध बाबींचा विचार करता आज शेती करणे परवडत नाही. या महागाईच्या तुलनेत शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. या प्रश्नाबरोबर जे शेती उत्पादन हे नाशवंत आहे. त्यामुळे शेतमाल शेतकरी वर्गाला मिळेल त्या दराने विकावेच लागतात. हमीभाव नसल्याने व्यापारी दलाल यांच्याकडून फसवणूक आणि लूट होते. परिणामी शेतकरी वर्गाला पीक कर्ज, इतर बँक कर्ज, शेती उपयुक्त औजारे, यंत्र यावरील कर्ज याचे हप्ते फेडणे अशक्य बनते. संपूर्ण कृषी क्षेत्रच धोक्यात आल्याने शेतकरी वर्गाचा कर्जबाजारीपणा वाढत चालला आहे. परिणामी शेतकऱ्यांच्यात व्यसनाधिनता, आत्महत्या यांचे प्रमाण वाढत आहे. हा बहुजन समाज जागृत झाला पाहिजे. देशाची अर्थव्यवस्थाच जर कृषी क्षेत्रावर असेल तर या क्षेत्राला आधार दिला पाहिजे. आजच्या संदर्भात विचार करता शेतकरी वर्गाला योग्य दाबाची वीज मिळत नाही परिणामी कृषी पंप चालेनासे दिसतात. वाढत्या भारनियमनामुळे तर समस्त शेतकरी कष्टकरी वर्गाचे कंबरडे मोडलेले आहे. आणि त्याच्या जोडीला आसमानी संकट कधी अतिवृष्टी तर कधी अनियमित पाउस तर कधी दुष्काळ, सिंचन योजनेचे तकलादू प्रयोग वाढता भ्रष्टाचार अशा विविध कारणाने समस्त कृषक

वर्ग त्रस्त आहे. या परिस्थितीत शेतीविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्त्वाचे वाटतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शेतीचे राष्ट्रीयकरण हवे होते. शेतीला उद्योगधंद्याचा दर्जा मिळाला पाहिजे असे ते म्हणत. या देशात पंचवार्षिक योजनासारख्या शेतीविषयक फसव्या धोरणांचा अवलंब केला. १९९० नंतर तर जागतिकीकरणाने व नव्या आर्थिक धोरणाने कृषी क्षेत्र मुळासह उपटून निघू लागले आहे. जागतिकीकरणाचा मोठा फटका भारतीय शेतकरी वर्गाला बसला पण शासनाचे या वर्गाकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे या वर्गाच्या हिताचा विचार करणाऱ्या बहुजन लोकांची सत्ता आली पाहिजे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या धोरणासंबंधी विद्यमान राजकीय पुढारी आणि राजकीय पक्ष यांची धोरणे या सर्वांची तुलना बाळासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या एकूण राजकीय चळवळ तसेच राजकीय पक्षासी करता येईल. १९८५ मध्ये ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ऊस उत्पादक शेतकरी वर्गाच्या संदर्भात भूमिका घेताना माणगाव ते पुणे लाँग मार्च काढला. या संदर्भातील महाराष्ट्रातील पहिलाच लाँग मार्च होता. महाराष्ट्र शासनाने कारखाना हा केंद्रबिंदू मानून राजकारण केले. परंतु या भागातील शेतकरी हा कधीच केंद्रस्थानी नव्हता या साखर कारखानदारीच्या जोरावर राजकीय सत्ता हस्तगत करणे हाच या मंडळीच्या राजकारणाच्या स्वारस्याचा भाग होता. या लाँग मार्च मध्ये पुढील मागण्या होत्या.

१. साखर कारखान्यातील भ्रष्टाचाराची चौकशी

२. कारखान्यातील राखीव जागा भरणे.

३. ऊस उत्पादक शेतकरी वर्गाला योग्य भाव

४. साखर कारखान्यांचे राष्ट्रीयीकरण करणे.

या लाँग मार्चमुळे कारखानदारांना योग्य भाव आणि काही प्रमाणात राखीव जागा भरण्यास भाग पडले. काही प्रमाणात भाव वाढला.[११४] या व्यतिरिक्त ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी कापूस पिकाला हमीभाव मिळावा म्हणून यशस्वी आंदोलन केल्याचे दिसते.

## भूमिहीन

भारताच्या एकूण आर्थिक संरचनेबाबत विचार केला असता मुळात संपत्ती आणि संसाधने तसेच साधन सामुग्रीचे मुल स्त्रोतांचे विषम वितरण आपणांस दिसेल. त्या साधनांमध्ये भूमिहिनता अर्थात शेतजमीन अशा घटकांचा विचार प्रथम करावा लागतो. भारतामध्ये शेतजमीन असो अथवा

भूखंड याबाबतीत विषम वितरण झालेले आहे. काही लोकांकडे जास्त जमीन तर काही लोकांकडे राहते घर बांधता येईल इतकी सुध्दा जागा नाही. ही विषम वाटणी समता प्रस्थापित करण्यासाठी प्रमुख अडथळा आहे. भारतातील भूमिहीन लोंकांकडे उत्पन्नाची साधनेसुध्दा नाहीत. परिणामी हा बहुजन वर्ग हा वर्षानुवर्षे वंचित राहिलेला आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या चळवळीत आणि वैचारिक मांडणीत या घटकावर भर दिला. भूमीचे समान वाटप झाले पाहिजे किमान कुणी भूमिहीन असता कामा नये ही भूमिका त्यांनी घेतली.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी गायरान जमिनी मिळाव्या यासाठी भूमिहीनांचे आंदोलन केले. त्यांनी 'भूमिहीन हक्क संरक्षण समिती' स्थापन केली. या समितीचे ॲड. बाळासाहेब आंबेडकर स्वत: अध्यक्ष आणि शांताराम पंदेरे सचिवपदी होते. या आंदोलनाचा दबाव शासनावर वाढला. याचा परिणाम असा झाला की, १९९० साली सुधाकरराव नाईक मंत्रिमंडळाने बाळासाहेब आंबेडकर यांच्या नावाने जी. आर. पास करून आणि लोकांना जमिनी देण्यात आल्या. अशाप्रकारे गायरान जमिनीचा लढा यशस्वी ठरला.

**नवबौध्द समाजाचे प्रश्न**

माणसाने धर्म बदलला की उपासना पध्दतीत बदल होतो. धार्मिक आचरणात नक्कीच परिवर्तन होत असते, परंतु ज्या व्यक्ती अथवा समाजघटकाने धर्मपरिवर्तन केलेले असते त्यांच्या जगण्याच्या साधनात किंवा राहणीमानात बदल कसा होईल? त्या समाजघटकांची आर्थिक परिस्थितीत बदल कसा होईल? हा विषय नवबौध्द समाजाच्या प्रश्नांना जाणून घेताना मूलभूत आणि महत्वाचा वाटतो. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी नवबौध्दांचा प्रश्न वरील प्रश्नाशी दोन हात करीत सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसतो. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजबांधवाने बौध्द धम्माचा स्वीकार करून सुध्दा त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात बदल झालेला नव्हता. कारण समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून विचार केला असता धर्मपरिवर्तनाने उपासना बदलेल त्यांची आर्थिक स्थिती मुळीच बदलणार नाही. माणूस धर्मपरिवर्तन करून सुध्दा जगण्याची साधने, काम, उद्योग धंदा तोच ठेवतो. तो सहजासहजी बदलणे मुळी शक्य होत नाही. त्यामुळे त्याच्या वेगळ्या धर्म आचरणामुळे त्याची आर्थिक स्थिती बदलत नसते, ही गोष्ट आपण मान्यच करावी लागते. एखाद्या समाजघटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहाबरोबरीने आणण्यासाठी काही उपाय आणि ते ही जाणीवपूर्वक करावे लागतात. आधुनिक लोकशाहीत ही मुख्य जबाबदारी

शासनसंस्थेची आणि पर्यायाने राज्यकर्त्यांची असते ही गोष्ट ही तितकीच खरी आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून अशा समाजघटकाला संविधानात्मक सवलती देवून त्यांना शिक्षण, नोकरी, उद्योग अशा विविध क्षेत्रात सवलती आणि घटनात्मक संरक्षण देवून त्यांची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थिती सुधारता येते. म्हणून ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून प्रयत्न केलेले दिसतात. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी भारिपच्या पहिल्या अधिवेशनात दि. ०५ मे १९८५ रोजी नवबौध्द समाजघटकाला राष्ट्रीय स्तरावर सवलती जाहीर करणारा ठराव संमत केला. यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणतात, 'या देशातील अस्पृश्यांना डॉ. बाबासाहेबांनी बौध्द धम्माची दीक्षा देवून हिंदू धर्माच्या कर्मकांडांतून बाहेर काढले. त्याला तीस वर्षाचा काळ पूर्ण होवून देखील आरक्षण मिळाले नाही. त्यामुळे हा प्रश्न आंदोलनाच्या माध्यमातून सोडविण्यासाठी पक्षाने प्रयत्न केले'[११५]

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी १९५७ पासून नवबौध्द समाजाच्या न्याय हक्कासाठी रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून सतत प्रयत्न केलेले दिसतात. विविध प्रयत्न करून सुध्दा या समाजघटकाला न्याय मिळाला नाही. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पुढच्या काळात जनता दलाचे अध्यक्ष व्ही. पी. सिंग यांच्या सोबत राजकीय समझोता केला. या समझोत्यामध्ये ' जर जनता दल सत्तेत आले तर नव बौध्दांना सवलती लागू करणे, संसदेत मध्यवर्ती सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र लावणे, तसेच त्यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करणे, अनुसूचित जाती जमातींच्या समूहांवर व अधिकाऱ्यांवर होणाऱ्या असंख्य अत्याचाराची पाहणीसाठी समिती गठीत करणे, या समाजघटकांसाठी आर्थिक महामंडळाची नेमणूक करणे.[११६] आदी मागण्या ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सतत केलेल्या दिसतात. त्यावेळी झालेल्या लोकसभा निवडणूकीत व्ही. पी. सिंग यांचा जनता दल या पक्षाला काही मित्र पक्षाच्या मदतीने सरकार बनविण्याची संधी मिळाली. त्यानंतर मुंबईला येवून १५ जानेवारी १९९० रोजी एका जाहीर सभेत नवबौध्दांना सवलती देण्याचे जाहीर करण्यात आले.[११७] ॲड प्रकाश आंबेडकर यांच्या प्रयत्नांना यश आले आणि नव बौध्द समाजबांधवांना न्याय हक्क प्राप्त झाले.

**मंडल आयोग**

भारतीय संविधानामध्ये अनुच्छेद ३८० मध्ये भारतामधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या मागासवर्गीय समाजाची जातीनिहाय संख्या किती आहे? याचा शोध घेवून त्यांच्या

हिताचा निर्णय घेण्यासाठी एका आयोगाच्या नेमणूकीची तरतूद करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर २९ जानेवारी १९५३ रोजी श्री. काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारने मागासवर्गीय आयोगाची स्थापना केली. या आयोगाने सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या कमकुवत वर्गाची पाहणी करून आपला अहवाल दि. ३० मार्च १९५५ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे सादर केला. त्यात देशभरातील २३९९ पैकी ८३७ जातींना कनिष्ठ वर्गातील असल्याचे जाहीर केले. परंतु तत्कालिन सरकारने तो स्वीकारला नाही'[११८] वर्षानुवर्षे विशिष्ट जातीसमुहांकडे उत्पन्नाची साधने केंद्रीत झालेली होती भारताला स्वातंत्र्य मिळाले तरी या परिस्थितीत फारसा बदल झाला नव्हता. परिणामी आपली मक्तेदारी संपुष्टात येईल या मानसिकतेने ओबीसी समाजघटकांना फायदा मिळवून देणारा कालेलकर आयोग सुध्दा फेटाळून लावला.

१९७७ च्या लोकसभा निवडणूकांमधून बरेच लोक ओबीसी समाजघटकांतून निवडून आले. राजकारणातील हा शिरकाव या समाजाच्या न्याय हक्कांना थोडा मार्ग मोकळा करून देणारा आहे असी अशा काही लोकांनी बोलून दाखविली. लोकशाहीसाठी हा बदल पोषक होता. ओबीसी समाजघटकांतील लोकांना सुध्दा प्रतिनिधित्व मिळावे या उद्देशाने ओबीसीमध्ये कोणकोणत्या जातींचा समावेश करता येईल याचा अभ्यास करण्यासाठी पी. बी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची स्थापना झाली. यालाच मंडल आयोग म्हणून ओळखले जाते.[११९] ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन समाजाच्या हितासाठी सतत संघर्षाची भूमिका घेतलेली दिसते. शेतकरी असो कामगार असो किंवा ओबीसी समाजातील समाजघटक असो ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी हक्कासाठी संघर्ष केला. त्यांनी १९८५ साली भारिपच्या जाहीरनाम्यात मंडल आयोगासंबंधी असे विचार व्यक्त केले की, 'आतापर्यंत चातुर्वर्ण्य व्यवस्थेने जन्मावरून व्यवसाय ठरविले आजही अनेक जाती धर्मातील हजारो मुलांना शिक्षणाची संधी मिळत नाही. म्हणून सर्व जाती–धर्मातील मुलांना शिक्षणाची संधी देणारा मंडल आयोग अंमलात येणे जरूरीचे आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांची मंडल आयोगाच्या संदर्भातील मागणी मान्य करून मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची घोषणा केली. आणि व्ही. पी. सिंग सरकारने १३ ऑगस्ट १९९० रोजी केंद्रीय कर्मचारी वर्गाबाबत अधिसूचना जारी केली. ॲड. प्रकाश आंबेडकर याच्या या बहुजनवादी आंदोलनाचे हे यश होते.

## ओ. बी. सी. सवलती

मंडल आयोगाच्या शिफारशी शासनाने मंजूर केल्याने महत्त्वाच्या दोन गोष्टी घडल्या पहिली गोष्ट ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण आणि आणि नोकरीबाबात आशादायक वातावरण निर्माण झाले. दुसरी गोष्ट ओबीसींना राखीव जागांबरोबर राजकीय जागृती आणि आत्मभान प्राप्त होवून ओबीसी चळवळ संघटीत झाली आणि लोकात जागृती निर्माण झाली. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती जाहीर होवून सुध्दा शासनाने पुरेसे याकडे लक्ष दिले नाही. ही शिष्यवृत्ती मिळावी यासाठी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी १ ऑगस्ट १९९७ रोजी औरंगाबाद (सध्या संभाजीनगर) संत एकनाथ रंगमंदिरात ओबीसी शिष्यवृत्ती मागणी परिषद आयोजित केली. या परिषदेत ओबीसी विद्यार्थ्यांना महाविद्यालय आणि उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यासंबंधीचा अहवाल केंद्राला पाठविला गेला.[१२०] ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे ओबीसी समाजघटकांच्या न्याय हक्कासाठी वारंवार प्रयत्न केले गेले. मोर्चे, आंदोलने परिपत्रक, विविध अभ्यास शिबीरे घेवून या समाजघटकाला न्याय मिळवून देण्यात ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा वाटा मोठा आहे. समाजाच्या हितासाठी मेळावे परिषदा घेवून बहुजन समाजाच्या हिताची काळजी त्यांनी घेतलेली दिसते. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्र शासनाने ०६ ऑक्टोबर २००३ रोजी एक परिपत्रक जारी करून २००३–२००४ या शैक्षणिक वर्षापासून ओबीसी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती लागू केली. यावरून एक गोष्ट लक्षात ती अशी की, ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे राजकारण आणि समाजकारण हे बहुजन वंचित आणि शोषित समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये येण्यासाठीची महत्त्वाची कडी आहे. वर्षानुवर्ष सर्वच क्षेत्रात ज्या समाजाला सापेक्षतेची आणि आपपरभावाची वागणूक मिळाली अशा समाजाला विकासाच्या एक टप्प्यावर घेवून जाण्यासाठी ॲड. प्रकाश आंबेडकर यांची विचारसरणी आणि राजकीय चळवळ पोषक आहे.

## एन्रॉन वीज प्रकल्प आंदोलन

भारताची १९९० साली आर्थिक स्थिती ही प्रचंड खालावलेली होती. देश कर्जबाजाराच्या उंबरठ्यावर होता. शासनाने आपले सुवर्ण भांडार सुध्दा परदेशी बँकात गहाण ठेवले होते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व आंतरराष्ट्रीय वित्त संस्थामार्फत कर्ज घेवून देशाला स्थिरता देण्याची प्रयत्न केला होता. परंतु या जागतिक वित्त संस्थांनी कर्ज देताना विविध जाचक अटी लादल्या

होत्या त्यापैकी एक अट आपली बाजारपेठ जगाच्या बाजारपेठेशी जोडून सर्वांना खुली करण्याची होती. परिणामी विविध सार्वजनिक क्षेत्रांना खाजगीकरणाने विळखा घातला. त्यापैकी एक अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र हे ऊर्जानिर्मितीचे क्षेत्र होते. अमेरिकेच्या एन्रॉन कंपनीने ऊर्जानिर्मितीबाबत करार केला. या प्रकल्पाबाबत अनेक प्रश्न शंकास्पद होते. लोकांचा यास विरोध होता. एन्रॉनबाबतचा प्रश्न ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सर्वप्रथम लोकासमोर आणला व त्याचे धोके लोकांना समजवून सांगितले. ॲड. प्रकाश आंबेडकर आज असे सांगतात की, एन्रॉनबाबत मी जी भूमिका घेतली होती, त्यातील धोके आज लोकांना जाणवत आहेत. वीज दरवाढीचे चटके राज्यातील जनतेला बसत आहेत. १९९९ साली काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांचे सरकार राज्यात आले. या सरकारमध्ये भारिप–बहुजन महासंघ सामील झाला होता. आम्ही राजकीय–सामाजिक प्रश्न घेवून चळवळ उभी केली. चळवळ उभी करताना समविचारी पक्ष संघटनांना सोबत घेतलेले होते. अनेकांनी रस्त्यावरील संघर्ष सत्तेत आल्यावर थांबविला. पण आम्ही सत्तेत सामील झाल्यानंतरही आम्ही आमच्या भूमिकेत बदल केला नाही. म्हणून ज्यावेळी आमच्या लक्षात आले की, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आमच्याशी संवाद न साधता परस्पर निर्णय घेत आहेत, त्याचवेळी आम्ही सरकारमधून बाहेर पडलो. ज्या फुले, आंबेडकरी समाजघटकाने सरकारला सत्तेवर बसविले त्याच समुहाच्या विरोधात सरकार जर भूमिका घेत असेल, तर आम्ही सत्तेत कसे बरे राहणार? ऑक्टोबर २००० मध्ये एन्रॉनबाबत पुन्हा विरोधाची भूमिका आम्ही घेतली. याचे कारण म्हणजे एन्रॉन फक्त दोन टक्के वीज निर्माण करते. पण २० टक्के महसूल उत्पन्न महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाचे खाते. म्हणून एन्रॉनबाबत पुर्नविचार करण्याची गरज वाटली. ही भूमिका घेता विरोधी पक्ष नेते नारायण राणे यांनी एन्रॉन करार रद्द करता येणार नाही आणि करायचाच असेल तर २० हजार कोटी रूपयांची नुकसान भरपाई द्यावी लागेल, ही भूमिका घेतली. अनेकांनी आमच्या भूमिकेला विरोध केला तरी सुध्दा आम्ही जानेवारी २००१ पासून आंदोलन केले.[१२१]

### नामांतराचा प्रश्न आणि भूमिका

नामांतराचा प्रश्न हा मुळात एका विद्यापीठाशी निगडीत होता. खरे तर वंचित शोषित समाजबांधवांना वाटत होते की, बाबासाहेबांनी आमचा उध्दार केलेला आहे. तसे ते रास्तच आहे. त्यामुळे या समाजबांधवानी या विद्यापीठाला नाव बाबासाहेबांचे असावे हा एक आस्थेचा भाग होता. नाव दिले तर वावगे ठरणारे मुळच नव्हते. परंतु काही समाजविघातक शक्ती या नावाला

विरोध करीत होत्या. नामांतराचा प्रश्न अकारण राजकीय बनविला गेला. मराठवाडा विभाग मुळात मागासलेला असल्याने या विभागाचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक पातळ्यांवर विकास होणे अत्यंत गरजेचे होते, आणि आजही आहे. त्यामुळेच बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद आज संभाजीनगर मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली होती. या भागातील कनिष्ठ मध्यम, वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती–जमातींच्या मुलांना शिक्षण घेता यावे त्यांची सर्वांगिण प्रगती व्हावी आणि भारताच्या विकासाच्या प्रवाहात एक अविभाज्य भाग व्हावा या उद्‌देशांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केला होता. महाविद्यालयाची स्थापना झाल्याच्या पहिल्या वर्षी एकूण १४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता त्यात १४ विद्यार्थी हे दलित समाजातील होती. त्यामुळे या विभागात हे महाविद्यालय टिकेल का नाही असी शंका उपस्थित केली जात होती.[१२२] परंतु काही काळातच महाराष्ट्र भरातून विविध भागातील विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात प्रवेश घ्यायला सुरूवात केली. सात ते आठ वर्षात औरंगाबाद येथे एक विद्यापीठ स्थापन करावे लागले. ज्याला मराठवाडा विद्यापीठ नाव देण्यात आले.

काही कालखंडानंतर विद्यापीठाना व्यक्तींची नावे दिली जावू लागली उदा. कुरूक्षेत्र विद्यापीठाला डॉ. बी. एन. चक्रवर्ती यांचे नाव देण्यात आले. दक्षिणेत मदुराई विद्यापिठाला कामराज नायर, राहूरी येथे कृषी विद्यापीठास म. फुले विद्यापीठ, अकोल्यात पंजाबराव देशमुख विद्यापीठ अशी नावे देण्यात आली.[१२३] पुढे काही काळात २६ जून १९७४ साली 'मराठवाडा रिपब्लिकन विद्यार्थी संघाने' विविध मागण्यांचे पत्र शासनास पाठविले त्यात मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली.[१२४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाडा विभागात शिक्षणासाठी महत्त्वाचे योगदान दिलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे उच्च विद्याविभूषित माणसाच्या नावाने हे विद्यापीठ असावे या रास्त मागणीसाठी भारतीय रिपब्लिकन पक्षाने आंदोलन सुरू केले. १९८५ साली निवडणूकीच्या जाहीरनाम्यात नामांतराचा मुद्‌दा मांडण्यात आला. त्यानंतर ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली दि. ११ जानेवारी १९८६ रोजी राज्यविधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे मोर्चा नेण्यात आला. यावेळी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देण्यात यावे, या मागणीचे निवेदन देण्यात आले.[१२५]

१० ऑगस्ट १९८८ रोजी दादर येथे एका जाहीर भाषणात प्रकाश आंबेडकर यांनी महत्त्वाचे विचार मांडले. ते म्हणतात की, मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या चळवळीमागील सामाजिक आशय बाजूला सारून निवडणूकीतील मतावर डोळा ठेवून हा विषय हाताळला जात आहे. मुख्यमंत्री शरद पवार यांनी सरळ सरळ नामांतर करून टाकावे. कारण ते स्वत:ला नामांतरवादी समजतात शिवसेनेसारख्या संघटनेच्या भितीने नामांतराचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे हा प्रश्न सावधतेने हाताळला जावा.[१२६] समाजात तंटा निर्माण होवू नये सर्व प्रश्न हे घटनात्मक मार्गाने सुटले पाहिजेत, ही लोकशाहीवादी भूमिका ॲड. प्रकाश आंबेडकर घेताना दिसतात. पुढच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री यांनी नामांतराबाबत अनुकूलता दर्शविली. दलित पँथरने तर नामांतर हा विषय आपल्या कार्याचा भाग बनविला. युवक क्रांती दल, दलित युवक आघाडी, विद्यार्थी पदव्युत्तर संघटना आदी संघटनांनी पुढाकार घेतला आणि संघटित होवून मराठवाडा विद्यापीठ नामांतर कृती समिती स्थापन केली.[१२७] या समितीच्या वतीने दलित संघटनांनी व पुरोगामी विचारांच्या काही संघटनांनी एकत्र येवून नामांतराचा लढा चालविला. शतकाच्या उत्तरार्धात चालविलेला हा एक मोठा लढा होता.

२५ नोव्हेंबर १९९३ रोजी नामांतरासाठी नांदेडमधील गौतम वाघमारे यांनी आत्मदहन केले. त्यामुळे विविध संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली. १२ डिसेंबर १९९३ रोजी ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली विविध जातीधर्माच्या लोकांना व बहुजन समाजाच्या लोकांना संघटित करून दोन लाख लोकांचा मशाल मोर्चा काढण्यात आला. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या सोबत आमदार भीमराव केराम, मखराम पवार, ॲड. बाळासाहेब आंबेडकर, रा. सु. गवई, रामदास आठवले, प्रा. जोगेंद्र कवाडे, गंगाधर गाडे इ. नेत्यांनी चर्चा केली. विद्यापीठाचे नामांतर जलद गतीने करण्याची मागणी केली. याप्रसंगी शरद पवार यांनी असे सांगितले की, नामांतराचा प्रश्न हा नामांतरवादी आणि नामांतर विरोधी या दोघानी आपल्या आपल्या समाजाच्या अस्मितेचा प्रश्न बनविलेला आहे. त्यामुळे या विषयातील गांभीर्य लक्षात घेता नामविस्ताराच्या माध्यमातून हा प्रश्न निकाली काढावा लागेल, यावर सर्वांनी समन्वयाची भूमिका घेतली. सर्वांनी सहकार्यांचे आवाहन केले.

मा. शरद पवार यांच्या आवाहनानंतर १९९४ मध्ये १ जानेवारी रोजी मराठवाडाभर शांततेचे आवाहन केले. पदयात्रा निघाली. त्यामध्ये प्रामुख्याने रा. सु. गवई, ॲड. प्रकाश

आंबेडकर, रामदास आठवले, भिमराव केराम, मखराम पवार गंगाधर गाडे, प्रा. जोगेंद्र कवाडे आदी मान्यवरांनी सहभाग घेतला.[१२८]

दि. ०३ जानेवारी १९९४ रोजी शरद उत्तम पाटोळे यांनी विद्यापीठाचे नामांतर व्हावे यासाठी अकलूज येथे आत्मदहन केले. असंख्य लोक हुतात्मे होवू लागले. बहुजन समाजाची व्होट बँक कुठे दुरावते की काय हे लक्षात येताच सत्ताधारी मंडळीने नामांतराचा निर्णय घेतला आणि मा. मुख्यमंत्री शरद पवार यांनी मराठवाडा विद्यापीठास 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.' असा नामविस्तार घडवून आणला.[१२९] नामांतराच्या लढ्यात अॅड. प्रकाश आंबेडकर यांची भूमिका महत्वाची होती.

**बहुजन चेतना दिंडी**

भारिप बहुजन महासंघाच्या स्थापनेनंतर बहुजन समाजात राजकीय आत्मविश्वास व चैतन्य निर्माण झाले. या आत्मविश्वासाला अधिक दृढ करण्यासाठी ५ ऑक्टोंबर १९९५ ते १६ ऑक्टोंबर १९९५ या काळात बहुजन चेतना दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीमुळे ओबीसींना राजकीय सत्तेचे महत्त्व पटू लागले. गावोगावी बहुजन महासंघाच्या सभा होऊ लागल्या. ५२ टक्के ओबींसींना ५२ टक्के राखीव जागा, लोकसंख्येच्या प्रमाणात सत्ता, संपत्ती, नोकऱ्या व साधनसामृग्रीत वाटा प्रत्येक कुटुंबात एक नोकरी, या घोषणा दिडींत देण्यात आल्या होत्या. त्यामुळे बहुजन समाज, जागृत होऊन राजकीय सत्तेबरोबर, आर्थिक सत्ता ताब्यात घेण्याची भाषा करू लागला. ही दिंडी बहुजनवादाची एक धार होती. ती धार सर्व बहुजनवाद्यांनी व आंबेडकरी चळवळीतील अनुयायांनी जोपासली पाहिजे. असा संदेश दिंडी गावागावात वस्ती वस्तीत, तालुक्यात, जिल्ह्यात घेऊन जात होती. [१३०]

**विविध निवडणुकांमधील राजकीय प्रयोग व त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव**

**लोकसभा निवडणूक १९८४**

१९८२-८३ मध्ये अॅड. प्रकाश आंबेडकरांचे नेतृत्त्व पुढे आले आणि लगेचच १९८४ साली लोकसभेच्या निवडणूका लागल्या. यावेळी महाराष्ट्रात २८ लोकसभा मतदारसंघात भारिपच्यावतीने उमेदवार उभे केले. स्वतः अॅड. प्रकाश आंबेडकर लोकसभा निवडणुकीत उभे होते. या निवडणुकित मधुसूदन वैराळे यांना १,७८,८७४ मते तर अॅड. प्रकाश आंबेडकर यांना १,६५,६६४ इतकी मते पडली. काँग्रेसचे मधुसूदन वैराळे हे एकूण ३४.८६ टक्के मते मिळवून

विजयी झालेले दिसतात. मतांच्या टक्केवारीचा विचार करता असे दिसते की, विजयी उमेदवारानंतर दुसरा क्रमांक हा ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी ३२.१७ टक्के मते प्राप्त केलेली दिसतात. इतर अपक्ष उमेदवारांच्या मतांची बेरीज करता २.१७ टक्के मते होताना दिसतात. इतर अपक्ष उमेदवारांनी प्रामुख्याने २.१७ मते मिळविल्याचे दिसतात. काँग्रेस पक्षाचा उमेदवार निवडून येण्यासाठी आणखी एक महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे १९८४ साली. कॉग्रेस पक्षाच्या स्व. इंदिरा गांधी यांना शहीद करण्यात आले होते. परिणामी देशात इंदिरांजींच्या निधनामुळे देशात काँग्रेस पक्षाला सहानुभूतीची लाट होती त्याचाही परिणाम या निवडणूक निकालावर पडला असल्याने ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचा निसटता पराभव झाला. सहानूभूतीची लाट नसती तर निवडणूकीचा निकाल वेगळा लागण्याची चिन्हे होती. परंतू इतकी उच्चांकी मते मिळविणे आणि त्या काळात काँग्रेस सारख्या प्रस्थापित पक्षाच्या विरोधात उभे राहून हे तितके सोपे काम नव्हते.

लोकसभा निवडणूका संपताच लगेच महाराष्ट्र विधानसभा निवडणूका पार पडल्या. १९८५ साली झालेल्या या निवडणुकांत प्रकाश आंबेडकरांनी संपूर्ण महाराष्ट्रात भारिपपक्षाकडून ४० उमेदवार उभे केले. यावेळी भारिपला १,७५,८४० एवढी मते पडली. त्यामुळे आंबेडकरी जनता व बहुजन समाज पुन्हा रिपब्लिकन पक्षाकडे वळू लागला व आपल्याच पक्षाच्या उमेदवारांना मते दिली पाहिजेत, असा मतप्रवाह निर्माण होऊ लागला.[१३१] याप्रसंगी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मुस्लिम लिग बरोबर युती केली, आणि निवडणूक लढविली. या निवडणूकातून एका उमेदवाराला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर एकूण १२ उमेदवाराला तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. मार्च १९८७ मध्ये नांदेड लोकसभा पोटनिवडणूकीत मा. शंकरराव चव्हाण यांचे चिरंजीव अशोक चव्हाण यांच्या विरोधात भारिप नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी लढा दिला. भावनिक प्रचारामुळे आणि स्वत: तत्कालीन मुख्यमंत्री यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्याने ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा अल्प मतात पराभव झाला. राजकारणात इतक्या लवकर ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी प्रभाव टाकला होता तो सबंध महाराष्ट्रासाठी आश्चर्यकारक होता.

### अकोला लोकसभा निवडणूक निकाल १९८९

१९८९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ॲड. प्रकाश आंबेडकरांनी जनता दलाबरोबर युती करून अकोला मतदारसंघातून निवडणूक लढविली. यावेळी भाजपचे पांडुरंग फुंटकर यांना ३,२२,३८४ मते मिळाली. तर ॲड. प्रकाश आंबेडकर यांना १,३२,२४२ इतकी मते पडली.

१९८९ सालच्या लोकसभा निवडणूकीचे संदर्भ वेगळे होते. भाजपा हा पक्ष स्थापन होवून सुमारे ०९ वर्ष पूर्ण होत होती. शहाबानो खटल्यावरून काँग्रेसची मुस्लिम व्होट बँक थोडी बाजूला जात होती, भाजपा या पक्षाने हिंदूत्त्वाच्या मुद्यावरून हिंदूच्या मतांची गोळबेरीज केलेली होती. व्ही. पी. सिंग काँग्रेसमधून बाहेर पडून जनता दल या नावाने नवा पक्ष काढला होता. या निवडणूकीत भाजपाचे निवडणूक चिन्ह कमळ हे होते. लालकृष्ण अडवाणी यांनी हिंदूत्त्ववादाच्या आधारे हिंदू लाट आणलेली होती. ते आता भाजपाचे अध्यक्ष बनले होते. इंदिरा सहानुभूतीची लाट ओसरत होती. राजीव गांधी यांनी मतदारांचे वय २१ वरून १८ केल्याने नव्या मतदारांची भर पडलेली होती. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी जनता दलाबरोबर आघाडी केली होती परंतू हिंदू लाटेवर स्वार फुंडकर याचा विजय झाला. कॉंग्रेसला दुसऱ्या क्रमांकाची मतांवर समाधान मानावे लागले होते. ॲड. प्रकाश आंबेडकर यांची मते १९८४ च्या निवडणूकीच्या तुलनेत कमी झाली होती. परंतू एक गोष्ट या निवडणूकीतून स्पष्ट होत होती ती म्हणजे बहुजन समाजाची शोषितांची काँग्रेस व्होट बँक आता कुठे भारिपकडे वळालेली दिसत होती.

**बहुजनवादी राजकारणाचा अकोला पॅटर्न (सामाजिक अभियांत्रिकी प्रयोग)**

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी अकोला पॅटर्न हा बहुजन राजकारणासाठी दिलेला एक नवीन आयाम म्हणावा लागेल. महाराष्ट्रातील बहुजन उपेक्षित घटकांना सत्तेपासून वर्षानुवर्षे वंचित रहावे लागले. आजपर्यंत कॉंग्रेस असो, भाजप असो किंवा इतर कोणताही पक्ष असो बहुजनांच्या संख्येच्या प्रमाणात सत्तेत वाटा कधीच दिला नाही. घराणेशाही, पक्षाची मक्तेदारी, संपत्ती, उत्पन्नाची साधने ज्यांच्या हाती तोच सत्तेचा वारसदार आणि मालक होत गेला. मुठभर प्रस्थापितांना सत्तेच्या पटलावर बसविण्यासाठी बहुजन समाजाचा नुसता वापर करण्यात आला. ५२.५ टक्के वरिष्ठ मागासलेल्या जाती व २२.५ टक्के अनुसूचित जाती–जमाती तसेच इतर अल्पसंख्यांकासह मुस्लिमांची टक्केवारी १२ ते १४ टक्यांच्या आसपास लोकसंख्या हे सर्व सुमारे ८७ टक्केच्या जवळपास शोषित व दुर्लक्षित समाज घटक आहेत. हा सर्व बहुजन शोषित समाजघटक संपूर्णतः दुर्लक्षित आहे. या सर्व ८५ ते ८७ टक्के जो सरासरी बहुजन समाज आहे. या सर्वांनी एकत्र येवून स्वबळावर सत्ता ताब्यात घ्यावी.[१३२] अशी भूमिका घेत ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी अकोल्यामधून एक नवा राजकीय पॅटर्न राबविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्ष निर्माण करायचा असेल तर तो बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार म्हणजेच आदिवासी, भटके विमुक्त, कुणबी या बहुजन वर्गापर्यंत म्हणजेच जे व्यवस्थेचे बळी आहेत, त्यांच्यापर्यंत पर्यंत पोहोचवावा लागेल. असा विचार प्रकाश आंबेडकर यांनी केला होता. कारण सुरुवातीच्या काळामध्ये रिपब्लिकन पक्षांनी बहुजनाच्या हितासाठी अनेक आंदोलने केलेली होते अनेक प्रश्न सोडवलेले होते पण नंतर या पक्षांमध्ये फूट पडत गेली. आणि हा पक्ष फक्त बौद्धांशी जोडला गेला त्यामुळे इतर बहुजन समाज या पक्षात येण्याची शक्यता खूप कमी झालेली होती. इतर बहुजन समाजातील इतर जाती या पक्षात येण्यासाठी कचरत होत्या. या बहुजन समाजातील इतर छोट्या मोठ्या जातींना बहुजन या संकल्पमध्ये आणण्यासाठी प्रकाश आंबेडकर यांचे मंथन सुरू होते. प्रकाश आंबेडकर यांना हे समजलेले होते की, आपल्याला सत्ता मिळवायची असेल, तर बहुजन समाजातील अल्पसंख्यांक जातींना बहुसंख्यांक करणे आवश्यक आहे. दरम्यानच्या काळात मंडळ आयोगामुळे ओबीसी समाज आपल्या राजकीय सामाजिक हक्काबद्दल जागृत झाला होता. याची जाणीव प्रकाश आंबेडकरांना झाल्यानंतर त्यांनी मखाराम पवार यांना सोबत घेऊन ओबीसी, सामान्य मराठा, वंजारी, मातंग, चांभार, माळी यांना एकत्र करण्याचे प्रयत्न केल्याचे दिसून येते त्यांनी माळी धनगर वंजारी यांना बहुजन महासंघात एकत्र आणण्याचा प्रयत्न केला ज्याला माधव असे म्हटले जाते. हा वर्ग बहुजन महासंघाचे काम करण्यास तयार तयार झाला. अशाप्रकारे अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी सांस्कृतिक, सामाजिक सामंजस्य निर्माण करून बहुजन महासंघ व भारिप यांना एकत्र आणले. प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणात अल्पसंख्यांकांना बहुसंख्य बनवणे, आणि त्यांना निवडून आणणे व त्यांच्या हाती सत्ता देणे हा असे असल्याचे दिसून येते.

भारताच्या आणि भारतातील सर्व घटक राज्यांच्या निवडणुकांचा इतिहास पाहिला तर ही गोष्ट आपल्याला लक्षात येते की, कॉंग्रेस, भाजपा किंवा इतर कोणतेही प्रस्थापित पक्ष बहुजनांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सत्तेत वाटा देत नाहीत. महाराष्ट्राच्या राजकारणात पाहिले तर ७० लाख लोकसंख्येच्या वंजारी समाजाला कधीही दोनच्या वर आमदार दिले नाहीत मंत्रीपदाची तर दूरच गोष्ट धनगर समाजाची लोकसंख्या ९० लाखांपेक्षा जास्त आहे पण या पक्षाला दोन ते तीन आमदार आणि एकादी राज्यमंत्रीपद अशीच अवस्था बहुजन समाजातील इतर जाती जमातींचे आहे अशा दुर्लक्षित जातींना राजकीय सत्तेत, देशाच्या साधन संपत्तीत, सार्वजनिक नोकरीत, संपत्तीत लोकसंख्येच्या प्रमाणात वाटा मिळवून देण्यासाठी बहुजन महासंघ निर्माण झाल्याचे दिसून

येते. याचा अर्थ भारिप बहुजन महासंघ हा बहुजन समाजाच्या विरोधात असणाऱ्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या विरोधात आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाचे एक तत्त्वज्ञान आहे ते असे की, उच्च मागासलेल्या जाती ५२.५ टक्के, अनुसूचित जाती जमाती २२.५ टक्के, मुस्लिमांसह इतर धार्मिक अल्पसंख्यांक १२ ते १४ टक्के या सर्व मिळून ८७% शोषित व दुर्लक्षित समाजाने बहुजन या शब्दाखाली एकत्र येऊन स्वबळावर सत्ता मिळवावी. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळवावे. असे आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाचे तत्त्वज्ञान आहे. बहुजन राजकारणाचा यशस्वी पॅटर्न अकोला पॅटर्न भारताच्या राजकारणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. भारतात उच्च वर्गीय उच्चवर्गीय वरिष्ठ व प्रभू जातीचे जे पक्ष आहेत त्यांच्याकडे बहुजन समाजाची मते हस्तांतरित होतात. पण बहुजन समाजातील पक्षांनी निवडणुकीत उमेदवार उभा केला तर बहुजनांची मते त्या उमेदवाराकडे पक्षाकडे हस्तांतरित होत नाहीत. हेच बहुजन समाजाच्या राजकारणाच्या असफलतेचे कारण आहे. प्रकाश आंबेडकरांनी अकोल्यामध्ये बौद्धांची मते इतर समाजाला व इतर समाजाची मते बौद्धांना मिळावीत म्हणजेच जातीबाहेर मतांचे आदान–प्रदान व्हावे हे तत्व विकसित केले. यालाच 'अकोला पॅटर्न' असे म्हणतात. १९९० मध्ये अकोल्यामध्ये विधानसभेसाठी बंजारा समाजाचे उमेदवार मखाराम पवार यांना प्रकाश आंबेडकर यांनी पाठिंबा दिला व आपल्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना मखाराम पवारांना निवडून आणण्याचे आवाहन केले. त्यानुसार मखाराम पवार निवडून आले. हा विजय बहुजन समाजामध्ये आलेल्या राजकीय परिपक्वतेचा आणि बहुजन एकजुटीचा होता. हा अकोला पॅटर्नचा पहिला यशस्वी बहुजन राजकारणाचा प्रयोग होता. या प्रयोगानंतर भारिप बहुजन महासंघाकडे बहुजन समाज मोठ्या प्रमाणामध्ये आकर्षित झाला. निवडणुकीत बहुजन समाजातील सर्व छोट्या मोठ्या जातींना उमेदवारी देऊन निवडून आणणे व संख्येने कमी असलेल्या जातींना स्वबळावर सत्तेपर्यंत पोहोचता येते हे या अकोला पटर्नमधून प्रकाश आंबेडकरांनी पहिल्यांदा बहुजन समाजाला दाखवून दिले. जातीबाहेर मतांचे आदान–प्रदान ही लोकशाही प्रिय संकल्पना विकसित करणे, हे अकोला पॅटर्नचे मुळ प्रमेय आहे. बौध्द समाजघटकांची मते जशी इतर समाजघटकांना मिळतात तशी इतर समाजघटकांची मते या समाजघटकांच्या उमेदवाराला मिळायला हवीत.

### महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९९०

१९९० पासून संपूर्ण भारतातील राजकीय व सामाजिक परिस्थिती अयोध्या राममंदिर, बाबारी मशिद यासारख्या मुद्यांवरून अस्थिर बनलेली होती. फेब्रुवारी १९९० मध्ये घेण्याचे निश्चित

झाल्यामुळे, राज्य विधानसभा निवडणुकीत भारतीय रिपब्लिकन पक्षाने ४३ मतदार संघामधून स्वबळावर उमेदवार उभे केले, व उर्वरित ठिकाणी जनता दलाला पाठिंबा दिला. शिवाय एका अपक्ष उमेदवाराला पाठिंबा दिला. यावेळी पक्षाच्या पाठिंब्याने अपक्ष उमेदवार श्री. मखराम पवार हे मुर्तिजापूर या अराखीव मतदार संघातून विजयी झाले. याप्रसंगी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी या उमेदवाराला निवडून आणण्याचे सर्वच बहुजन समाजाला आवाहन केले. मखराम पवार निवडून आले. हा विजय म्हणजे बहुजन समाजाचा विजय म्हणावा लागेल. अकोला पॅटर्नचा हा पहिला प्रयोग यशस्वी झाला. याप्रसंगी बोलताना ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणतात, राज्यातील धनदांडगे व जात दांडगे यांचा राजकीय धुमाकूळ आटोक्यात आणण्यासाठी व बहुजन समाजाला न्याय हक्क प्राप्त करून देण्यासाठी बहुजन महासंघाची स्थापना करण्यात आली.[१३३] दोन उमेदवारांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. व बारा उमेदवारांना तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. अकरा मतदार संघातून भारिप व काँग्रेस यांच्यातील मतविभागणीमुळे चार भाजप, सहा शिवसेना व एक अपक्ष मिळून या अकरा उमेदवारांना त्याचा लाभ मिळाला.[१३४] तसेच उर्वरित ठिकाणी पाठिंबा दिलेल्या जनता दलाचे २४ उमेदवार विजयी झाले. या निवडणुकीतील जनता दलाच्या यशानंतर पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी ॲड. बाळासाहेब आंबेडकरांना राज्यसभेत प्रतिनिधीत्व दिले. फेब्रुवारी १९९२ मध्ये राज्यातील जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यात आल्या. अकोला जिल्हा परिषदेत पक्षाचे ६० पैकी १५ उमेदवार विजयी झाले, पंचायत समित्यांच्या १२० उमेदवारांपैकी ३० उमेदवार विजयी झाले. यात बौद्ध, मुस्लिम, बंजारा, धनगर, कुणबी, मराठा, माळी, पारधी, हटकर, टाकोणकर, कोळी अशा अनेक जातिधर्माच्या लोकांना लोकशाहीच्या प्रवाहात सामिल केले.[१३५] १९९३ मध्ये किनवट विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीत कॉग्रेसने माजी मंत्री श्री. उत्तमराव राठोड यांना उमेदवारी दिली. त्यांच्या विरोधात भारतीय रिपब्लिकन पक्ष–बहुजन महासंघाने श्री. भिमराव केराम या आदिवासी समाजाच्या कार्यकर्त्याला उमेदवारी दिली. व भिमराव केराम निवडून आले. व काँग्रेसच्या प्रस्थापित उमेदवाराचा पराभव केला.[१३६] १९९५ मध्ये महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक घेण्यात आली. यावेळी भारिप–बहुजन महासंघाने राज्यातील कामगार आघाडी, माकप, भाकप, बसपा, व समाजवादी जनता पक्ष या पक्षांना सोबत घेवून 'बहुजन श्रमिक समिती' स्थापन केली व राज्यातील विधानसभेच्या सर्व जागा लढविल्या. त्यातील १३० मतदार संघातून भारिप बहुजन

महासंघाने उमेदवार उभे केले. नऊ मतदार संघामधून दुसऱ्या क्रमांकाची व १८ मतदार संघातून तिसऱ्या क्रमांकाची मते उमेदवारांना मिळाली. सर्व उमेदवारांना ३.०४टक्के मते मिळाली. बहुजन श्रमिक समितीतील माकपचे तीन व समाजवादी जनता पक्षाचे तीन उमेदवार यावेळी विजयी झाले. बहुजन श्रमिक समितीला अपेक्षित यश मिळाले नाही, पण दलित व बहुजन समाजाची काँग्रेसकडे जाणारी मते बहुजन श्रमिक आघाडीकडे खेचण्यात यश मिळाले. २२ मतदार संघात भारिप–बहुजन महासंघ व काँग्रेस पक्षाच्या उमेदवारात मत विभागणी झाल्याने भाजप सेनेचे १८ उमेदवार व अपक्ष ४ उमेदवार विजयी झाले. तसेच आघाडीतील घटक पक्षांना मिळालेल्या मतांमुळे काँग्रेसचे १९ उमेदवार पराभूत झाले. त्याचा लाभ भाजपा सेनेला मिळाला. त्यामुळे भाजप सेनेला सत्ता मिळणे सोपे झाल्याचे दिसून येते. प्रस्थापित काँग्रेस पक्षाला सत्तेपासून रोखणे व घराणेशाहीला आळा घालणे हा भारतीय रिपब्लिकन पक्षाचा हेतू यावेळी साकार करून दाखविला.

१९९६ मध्ये झालेल्या अकराव्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी रिपाई– बहुजन महासंघाने जनता दल, माकप, भाकप, शेकाप, समाजवादी पक्ष व कामगार आघाडी यांच्या सोबत आघाडी बनविली. १५ मतदार संघातून उमेदवार उभे केले. ॲड. बाळासाहेब आंबेडकरांचा अकोला लोकसभा मतदार संघातून ९०५३ मतांनी पराभव झाला. अमरावती, पंढरपूर व हिंगोली या मतदार संघातील पक्षाच्या उमेदवारांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. उत्तरपूर्व, मुंबई, चिमूर, नागपूर व नांदेड येथील उमेदवारांनी प्रभावी लढत दिली. उत्तर मध्यमुंबई, उत्तरपूर्व मुंबई, नाशिक, चिमूर, हिंगोली, नागपूर, वाशिम, अकोला व अमरावती या मतदार संघात रिपाई बहुजन महसंघाचा जनप्रतिसाद वाढल्याने काँग्रेसचे मताधिक्य कमी झाले. त्यातील पाच उमेदवार शिवसेनेचे व चार उमेदवार भाजपाचे असे नऊ उमेदवार तेथून विजयी झाले. पंधरापैकी १२ मतदार संघातून भाजप सेनेचे उमेदवार विजयी झाल्याचे आढळते. यावेळी रिपाईला पाच टक्केच्या आसपास मते मिळाली असल्याने या पक्षाला राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली.[१३७] १९९७ साली जिल्हा परिषद निवडणूकीत एकूण १३ उमेदवार निवडून आले. १९९८ साली वासिम अकोला जि. प. निवडणूकीत वासिम मधून ०४ उमेदवार निवडून आले. तर अकोल्यामध्ये एकूण २१ उमेदवार निवडून आले. कोळी समुदायातील डॉ. दशरथ भांडे यांना जिल्हा परिषद अध्यक्ष करण्यात आले. २००२ मध्ये सुध्दा विविध ठिकाणी उमेदवार निवडून आले. १९९८ मध्ये बाराव्या

लोकसभेची निवडणूक घेण्यात आली. यावेळी कॉंग्रेस पक्षाने राज्यातून समाजवादी पक्ष व रिपाई– बहुजन महासंघासोबत आघाडी करून ही निवडणूक लढविली. कॉंग्रेसने ४१, समाजवादी पक्षाने ३ व रिपाईने ४ अराखीव जागांवर उमेदवार उभे केले. त्यातील कॉंग्रेसचे ३३ व रिपाईचे ४ मिळून ३७ उमेदवार विजयी झाले.[१३८] यावेळी राज्यात, भाजप सेनेची सत्ता असूनदेखील कॉंग्रेस व रिपाई आघाडीला मिळालेले हे यश रिपाई बहुजन महासंघाच्या प्रभावाचा परिणाम असल्याचे मानता येते. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत रिपाईला राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली. त्यानंतर १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत रिपाईचे चारही उमेदवार विजयी झाले. आणि बहुजन महासंघाचे अध्यक्ष मखराम पवार यांची राज्य विधानपरिषदेवर निवड करण्यात आली. या यशामध्ये भारिप–बहुजन महासंघाचा मोठा वाटा असल्याचे आढळून येते. १९९९ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीसोबत राज्यविधान सभेची निवडणूक घेण्यात आली. यावेळी रिपाईचे श्री. रामदास आठवले हे राष्ट्रवादी कॉंग्रेससोबत गेले. श्री. रा. सु. गवई आणि प्रा. जोगेंद्र कवाडे हे कॉंग्रेस सोबत राहिले. रिपाईच्या फुटीमुळे भारिप– बहुजन महासंघाचे नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकरांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेससोबत जाण्याचे ठरविले. याबाबत भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात, ''राज्यातील भाजपसेना युती सरकारचा पराभव करण्यासाठी कॉंग्रेस सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे.''[१३९] यावेळी, पक्षाने लोकसभेसाठी राज्यातून चार उमेदवार उभे केले व विधान सभेसाठी ३४ उमेदवार उभे केले. अकोला या अराखीव लोकसभा मतदार संघातून ॲड. बाळासाहेब आंबेडकर विजयी झाले. हिंगोली आणि उत्तरमध्य मुंबई या लोकसभा मतदार संघातून पक्षाच्या उमेदवाराला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. पक्षाच्या चारही उमेदवारांना२.१०% मते मिळाली तसेच विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाने ३४ उमेदवार उभे केले होते. त्यातून बोरगाव मंजू (अकोला) अराखीव विधानसभा मतदार संघ, अकोट, जि. अकोला अराखीव आणि साक्री (धुळे) अ. जमाती राखीव मतदार संघ या तीन मतदार संघातून तीन उमेदवार विजयी झाले. विधानसभेतील भारिप बहुजन महासंघाच्या सर्व उमेदवारांना१.८५% मते मिळाली.[१४०]

२००३ साली झालेल्या अकोला व वासिम जि. प निवडणूकीत विविध जाती जमातींच्या लोकांना संधी देत अकोल्यातून एकूण २० तर वासिम मधून ०२ असे २२ उमेदवार ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी निवडून आणले. २००४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकांत भारिप, बहुजन महासंघाच्यावतीने १६ जागा लढविण्यात आल्या. या निवडणुकीत ५ ठिकाणी भारिप, बहुजन

महासंघाचे उमेदवार तिसऱ्या स्थानी राहिले. तर ॲड. प्रकाश आंबेडकर स्वतः अकोला मतदारसंघातून निवडणुकीला उभे राहिले होते. त्यांना १ लाख ८७ हजार २०२ मते मिळवून ते दुसऱ्या स्थानी राहिले. २००४ साली झालेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत भारिप, बहुजन महासंघाच्यावतीने ८३ जागांवर उमेदवार उभे केले होते. यावेळी भदे हरिदास पंढरी हे ६३ हजार ९३७ मते घेऊन बोरगाव मंजू मतदारसंघातून विजयी झाले. शिवाय दोन जागेवर पक्षाचे उमेदवार दुसऱ्या स्थानावर तर आठ जागांवर तीन नंबरला होते. यावेळी भारिप बहूजन महासंघाला ५ लाख १६ हजार २२१ मते पडली.

२००९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारिप बहुजन महासंघाच्यावतीने ३९ जागांवर उमेदवार उभे करण्यात आले होते. या निवडणुकीत पक्षाला ४ लाख २८ हजार ५६६ इतकी मते पडली. स्वतः ॲड. प्रकाश आंबेडकर हे अकोल्यातून निवडणूक लढवित होते. या निवडणुकीत त्यांना १ लाख ८७ हजार २०२ मते मिळवून ते दुसऱ्या क्रमांकावर राहले. याच साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत भारिप बहुजन महासंघाने १०३ जागा लढविल्या. यावेळी भदे हरिदास पंढरी हे बोरगाव मंजू मतदारसंघातून निवडून आहे.

२००९ साली सुध्दा जि. प. निवडणूकीत एकूण २० उमेदवार निवडून आणले आणि सर्वसामान्य मुस्लिम महिला साबिया अंजूम सौदागर या महिलेला अध्यक्ष करण्यात आले. २०१४ मध्ये झालेल्या १६ व्या लोकसभा निवडणूकीत प्रकाश आंबेडकरांनी भारिप बहुजन महासंघाच्या तिकिटावर राज्यात २३ उमेदवार उभे केले होते, मात्र सर्वांचा पराभव झाला. त्यांना एकत्रित ३,६०,८५४ (०.७%) मते मिळाली होती. २०१४ मध्ये झालेल्या १३ व्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत प्रकाश आंबेडकरांनी भारिप बहुजन महासंघाच्या तिकिटावर ७० उमेदवार उभे केले होते, मात्र त्यापैकी केवळ एकच उमेदवार विजयी झाला. सर्व उमेदवारांना एकत्रित ४,७२,९२५ (०.९%) मते मिळाली होती.

**वंचित बहुजन आघाडी : एक अभिनव प्रयोग**

२०१९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी वंचित शोषित लोंकाची एकत्र मोट बांधण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला. वंचित बहुजन आघाडी हा प्रकाश आंबेडकर यांनी स्थापन केलेला एक राजकीय पक्ष आहे. या पक्षाची विचारप्रणाली संविधानवादी आंबेडकरवादी धर्मनिरपेक्षता समाजवादी पुरोगामी असून

समान वैचारिक धोरणे असलेल्या अनेक राजकीय पक्षांसोबत युती किंवा आघाडी आहे. २४ मार्च २०१९ रोजी वंचित बहुजन आघाडीची भारतातील राजकीय पक्ष म्हणून नोंदणी झाली.[१२९] प्रकाश आंबेडकर हे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष आहेत. अनेक सामाजिक संघटना बहुजन वंचित आघाडी सोबत सहभागी आहेत. या पक्षाने एआयएमआयएम पक्षांसह १७ व्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील संपूर्ण ४८ जागा लढवल्या, ज्यात एका जागेवर एआयएमआयएम उमेदवार उभा होता तर इतर ४७ जागांवर वंबआचे उमेदवार उभे होते.[१४१] या युतीतील, एकमेव एआयएमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलील विजयी झाले तर वंबआचे संपूर्ण ४७ उमेदवार पराभूत झाले. या निवडणुकीमध्ये वंबआ व ए आय एम आय एम ने एकत्रित ४१, ३२, २४२ (७.६४%) मते मिळवली. वंचित बहुजन आघाडीने घेतलेल्या एवढ्यामतांमुळे काँग्रेस आघाडीचे किमान सहा खासदार निवडणुकीत हरले. तेव्हा काँग्रेसने प्रकाश आंबेडकर हे जातीयवादी भाजपाला मदत करत आहे, अशी टीका केली होती.

तृतीयपंथी कार्यकर्त्या आणि कवयित्री दिशा पिंकी शेख ह्या वंचित बहुजन आघाडी प्रदेश प्रवक्त्या आहेत. दिशा शेख राजकीय पक्षाच्या प्रवक्ते म्हणून कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील पहिल्या तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) आहेत.[१४२] त्यानंतर महाराष्ट्र विधानसभा २०१९ च्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी पक्षाने २८८ ही जागांवर आपले उमेदवार उभे केले आणि ४.६% मतदान म्हणजेच २४ लाख मतदान घेतले. यावरून पुढील निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी पक्ष महत्त्वाचा ठरेल.

२० मे २०१८ रोजी पंढरपूर येथे झालेल्या धनगर समाज मेळाव्यात वंचित बहुजन आघाडी हे नाव सर्वप्रथम वापरले गेले. या सोहळ्याचे अध्यक्षपद प्रकाश आंबेडकर यांना देण्यात आले होते. यानंतर अनेक शोषित वंचित असलेल्या आणि ज्यांच्यावर सतत अन्याय होत आलेला आहे अशा समाजाच्या संघटना यात सहभागी होत गेल्या. जून २०१८ मध्ये लक्ष्मण माने, हरिदास भदे आणि विजय मोरे यांच्या प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत झालेल्या एका बैठकीत सर्व पुरोगामी पक्षांची वंचित बहुजन आघाडी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या आघाडीत सर्व पुरोगामी पक्ष असतील प्रत्येक पक्षाचं अस्तित्व कायम ठेवून ही आघाडी केली जाईल. अशाप्रकारे आघाडीची वैचारिकता आंबेडकरांनी स्पष्ट केली.

२० मे २०१८ रोजी आंबेडकरांनी वंचित बहुजन आघाडीची स्थापना केली. २४ मार्च २०१९ रोजी भारतीय निवडणूक आयोगाने वंचित बहुजन आघाडीस नोंदणीकृत राजकीय पक्ष म्हणून मान्यता दिली. आणि पुढे यात भारिप बहुजन महासंघ पक्ष विलीन करणार असल्याचेही आंबेडकरांनी म्हटले होते.[१४३]

वंचित बहुजन आघाडीचे पहिले अधिवेशन किंवा सभा २८ सप्टेंबर २०१८ रोजी सोलापुरात झाले. ज्याला लोकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्यानंतर एआयएमआयएमला या आघाडीत सहभागी करण्यासाठी एआयएमआयएम पक्षाचे औरंगाबादचे आमदार इम्तियाज जलील यांनी एआयएमआयएमचे अध्यक्ष व खासदार असदुद्दीन ओवैसी यांच्याशी चर्चा केली व ती सकारात्मक ठरली. त्यानंतर ओवैसी यांनी २ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या औरंगाबादमधील वंचित बहुजन आघाडीच्या औरंगाबादच्या सभेमधे बहुजन वंचित आघाडीला साथ देण्याचे जाहीर केले आणि एआयएमआयएम पक्ष आघाडीमध्ये सहभागी झाला.[१४४]

आंबेडकरांनी वंचित बहुजन आघाडीच्या मार्फत महाराष्ट्र राज्यभर सभा–मेळावे घेऊन निवडणुका स्वबळावर लढण्यासाठी वातावरण निर्मिती केली. सुरुवातीला शेतकरी, कामगार, युवक, आरक्षण अशा वेगवेगळ्या नावाने परिषदा घेऊन विविध समाजघटकांना संघटित करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यानंतर त्यांनी जिल्ह्या–जिल्ह्यात सत्ता संपादन मेळावे घेऊन राजकारणात उतरण्याची तयारी केली.[१४५]

२३ फेब्रुवारी २०१९ रोजी मुंबई येथील शिवाजी पार्कवर वंचित बहुजन आघाडीची ओबीसी आरक्षण परिषद झाली होती. ह्या सभेचे अध्यक्ष आगरी–कोळी समाजाचे नेते राजाराम पाटील होते तसेच ॲड. प्रकाश आंबेडकर आणि असदुद्दिन ओवैसी यांची प्रमुख उपस्थिती होती. ह्या परिषदेत ओबीसींच्या हक्काबद्दलचे प्रश्न मांडण्यात आले तसेच मुंबईत आगरी, कोळी, भंडारी, ईस्ट इंडियन आदिवासी यांची २०० गावठाणे आहेत. त्यांचे सीमांकन करून भुमिपूत्रांना प्रॉपर्टी कार्ड मिळावेत त्यांना स्वयंविकासाचा अधिकार सरकारने द्यावा, याचप्रमाणे झोपडपट्ट्यांचा विकासही गावठाण हक्क कायद्याने व्हावा ह्या मागण्या करण्यात आल्या. शिवाजी पार्कवरील या सभेला लोकांचा मोठा प्रतिसाद लाभला होता, तसेच शिवसेनेच्या दसरा मेळाव्यापेक्षाही अधिक जनसमुदाय वंचित बहुजन आघाडीच्या सभेला उपस्थित होता.[१४६] या आघाडीने घेतलेल्या सभांना आतापर्यंत मोठा प्रतिसाद मिळाला आहे. पण तरीसुद्धा भाजपविरोधी महाआघाडीसाठी काँग्रेस–

राष्ट्रवादी यांच्यासोबत प्रकाश आंबेडकरांनी जावे यासाठी प्रयत्न झाले होते. वंचित घटकाला प्रतिनिधित्व देण्यासाठी धनगर, माळी, भटके, ओबीसी व मुसलमान अशा सहा घटकांना लोकसभेच्या प्रत्येकी दोन जागा अशा एकूण १२ जागांचा प्रस्ताव आंबेडकरांनी काँग्रेसपुढे ठेवला. यावर काँग्रेसने कोणतीही स्पष्ट भूमिका घेतली नाही. त्यामुळे आंबेकडरांनी एआयएमआयएमची साथ घेतली. त्यानंतर काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीला चार जागा देऊ केल्या.[१४७] आम्ही काँग्रेससमोर सुरुवातीला १२ जागांचा प्रस्ताव ठेवला होता पण त्या प्रस्तावाला अनुकुल प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर आता २२ जागांबाबतही चर्चा होती. पण तीदेखील बारळगली आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. तसेच आता थेट ४८ जागांची तयारी करून ठेवली असल्याचेही आंबेडकरांनी सांगितले.[१४८]

१४ मार्च २०१९ रोजी प्रकाश आंबेडकर यांनी भारिप बहुजन महासंघ या पक्षाला वंचित बहुजन आघाडी या पक्षात विलीन करण्याचे जाहीर केले. आंबेडकर म्हणाले की, भारिप बहुजन महासंघाच्या माध्यमातून सामाजिक अभियांत्रिकीचा अकोला पॅटर्नला यश मिळाले असले तरी भारिप या शब्दामुळे पक्षाच्या विस्ताराला मर्यादा आल्यात. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी ही व्यापक अर्थाने स्वीकारार्ह झाली असल्याने २०१९ च्या १७ व्या लोकसभा निवडणुकीनंतर वंचित बहुजन आघाडीमध्ये भारिप बहुजन महासंघ विलीन करणार असल्याचे त्यांनी सांगीतले.[१३८] २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीसाठीच्या जागा वाटपावरून वंचित बहुजन आघाडी व ऑल इंडिया मजलिस–ए–इत्तेहादुल मुस्लिमीन यांच्यात मतभेद झाला आणि सप्टेंबर २०१९ मध्ये त्यांची युती तुटली.[१४९] ही युती महाराष्ट्राच्या राजकारणात टिकली असती तर महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळी दिशा मिळाली असतील, पण मजलिसचे नेते असद्दूदीन ओवैसी यांनी ॲड. प्रकाश आंबेडकर विश्वासात न घेता निर्णय घेतात. म्हणून युती तोडल्याचे सांगतात. उमेदवारी १७ वी लोकसभा निवडणूक २०१९ संपादन मार्च २०१९ मध्ये वंचित बहुजन आघाडीने आपल्या ३७ लोकसभा उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती त्यामध्ये उमेदवारांच्या नावासमोर त्यांच्या जातीचा किंवा धर्मांचा उल्लेख करण्यात आलेला होता. धनगर, कुणबी, भिल्ल, बौद्ध, कोळी, वडार, लोहार, वारली, बंजारा, मुस्लिम, माळी, कैकाडी, धिवर, मातंग, आगरी, शिंपी, लिंगायत आणि मराठा अशा विविध समाजातील लोकांना उमेदवारी देण्यात आली होती. उमेदवाराच्या नावापुढे जातीचा/धर्माचा उल्लेख करण्याबाबत प्रकाश आंबेडकर म्हटले की, या

आधी मराठ्यांशिवाय इतर कुणाला उमेदवारी दिली जायची नाही. म्हणून ते जाहीर करण्याची वेळच येत नसे. हे गृहीतच धरले जायचे की उमेदवार मराठाच आहे. परंतु ती नंतर मराठ्यांची सत्ता न राहता कुटुंबाची घराणेशाही झाली. आंबेडकर पुढे म्हणतात की, आज आम्ही जात जाहीर केली, कारण ही पद्धत कोणताच पक्ष स्वीकारत नाही. शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस ह्या पक्षांत मराठ्यांव्यतिरिक्त कुणालाच उमेदवारी दिली जायची नाही. हीच पद्धत पुढे घराणेशाहीत बदलली. ज्या वंचित समाजातील लोकांना कधीही कुठल्या पक्षाने उमेदवारी दिलेली नाही त्यांना वंचित आघाडीने उमेदवारी दिली त्यामुळे त्यांच्या जातीचा/धर्माचा उल्लेख करणे आंबेडकरांना आवश्यक वाटला.[१५०] त्यांच्या या धोरणामुळे जातीवाद व धर्मवादाला खतपाणी मिळणार आहे, अशी एक त्यांच्या धोरणाबाबत चिकित्सा केली जाते.

प्रकाश आंबेडकरांनी अकोल्यासह सोलापूर मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली परंतु ते दोन्ही ठिकाणी पराभूत झाले. यापूर्वी ते अकोल्यातून दोनवेळा खासदार राहिलेले आहेत.[१५१] महाराष्ट्रातील २०१९ मधील लोकसभेच्या एकूण ४८ जागांपैकी औरंगाबाद मतदारसंघाच्या एका जागेवर एआयएमआयएम तर बाकीच्या ४७ जागांवर वंचित बहुजन आघाडी या पक्षाचे उमेदवार उभे होते.[१५२] त्यापैकी एआयएमआयएमचा एकमेव उमेदवार इम्तियाज जलील विजयी झाले. तर वंबआचा कोणताही उमेदवार जिंकू शकला नाही. राज्यातील १७ मतदारसंघांमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी ८० हजारांहून अधिक मते घेतली आहेत.[१५३] भारतीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारी नुसार २०१९ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या लोकसभा निवडणूकीत, वंबआ व एआयएमआयएमच्या उमेदवारांना ४१,३२,२४२ (७.६४%) एवढी मते मिळाली होती. वंबआच्या तिकिटावर उभ्या राहिलेल्या ४७ उमेदवारांना ३७,४३,२०० एवढी मते मिळाली, हे महाराष्ट्रातील एकूण मतांच्या ६.९२% व वंबआ ने उमेदवार लढलेल्या ४७ मतदार संघातील (औरंगाबाद वगळून) मतांच्या ७.०८% होते. महाराष्ट्रातील सर्व ४८ मतदारसंघात ५,४०,५४,२४५ एवढे एकूण मतदान झाले होते. त्यामध्ये संभाजीनगर औरगांबाद मतदार संघात ११,९८,२२१ मतदान झाले होते. सर्वाधिक मते मिळवण्यात औरंगाबाद या एका लोकसभा मतदार संघात वंचित बहुजन आघाडी समर्थित एआयएमआयएम पहिल्या स्थानी होती. अकोला या एका मतदार संघात वंबआ दुसऱ्या स्थानी होती तर ४१ मतदार संघात वंबआ तिसऱ्या स्थानी होती.[१५४] लोकनिती–सीएसडीएस संस्थेच्या

सर्व्हेक्षणानुसार, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बौद्ध धर्मीयांचा पाठिंबा वंचित बहुजन आघाडीला तर मुस्लिम धर्मीयांचा पाठिंबा काँग्रेसला होता. महाराष्ट्र राज्यातील मुस्लिम मते ८७% काँग्रेस–राष्ट्रवादी आघाडीला, १२% भाजप–शिवसेना युतीला, व १% वंबआ–एआयएमआयएम युतीसह इतर पक्षांना मिळाली. बौद्ध मते ८१% वंचित बहुजन आघाडीला, १२% काँग्रेस आघाडीला, व ७% भाजप–सेना युतीला मिळाली.[१५५]

सतरावी लोकसभा २०१९ मधील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अ. क्र. मतदारसंघ उमेदवार निकाल मिळालेली मते. १४ वी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ वंचित बहुजन आघाडीने विधानसभेची उमेदवारी देताना ओबीसी भटके–विमुक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मुस्लिम व अल्पसंख्य अशा सर्व समाजाला उमेदवारी दिली होती. महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ मतदारसंघांपैकी बऱ्याच मतदार संघात वंचित बहुजन आघाडीने उमेदवार उभे केले होते. या विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने जाहिर केलेल्या यादीनुसार पक्षाने मराठा समाजाचे १८ उमेदवार दिले होते. १८ टक्के उमेदवार भटके–विमुक्त (एनटी) जात गटातील दिले असून त्यात बंजारा, वंजारी आणि धनगर या जातींना सर्वाधिक प्राधान्य दिले होते. अनुसूचित जातीचे (एससी) ५० उमेदवार (१७ टक्के) दिले होते; यापैकी ४२ उमेदवार बौद्ध व ८ उमेदवार चांभार, मोची, मांग आणि ढोर अशा जातींचे होते. इतर मागास गट (ओबीसी) या समाजाचे ३२ उमेदवार (११ टक्के) दिले होते, ज्यात हलबा कोष्टी, माळी, सोनार, कुणबी, लेवा पाटील या छोट्या जातींच्या बहुसंख्य उमेदवारांचा समावेश होता. पक्षाने २५ उमेदवार (९%) मुस्लिम धर्मीय दिले होते. त्यातही मुस्लिमांतील शिकलगार, धोबी, पटवे अशा मागासवर्गीय जातगटातील उमेदवारांना वंचितने प्राधान्य दिले होते. अनुसूचित जमातीसाठी (एसटी) राज्यात असलेल्या २५ राखीव मतदारसंघांत वंचितने उमेदवार (९ टक्के) दिले होते. आदिवासींतील माना, गोंड, गोवारी या लहान जमातींना वंचितने उमेदवारीत प्रतिनिधित्व दिलेले होते. पक्षाने २५ उमेदवार (९%) धनगर समाजाचे दिले होते. वंचितने दोन ख्रिस्ती (एक ईस्ट इंडियन), एक शीख, आणि एक मारवाडी (जैन) उमेदवार दिला होता. तसेच वंचितने १२ उमेदवार (४ टक्के) या महिला दिलेल्या होत्या. ३२ वंचित बहुजन आघाडीने काही मतदारसंघात अपक्ष व एआयएमआयएमच्या उमेदवारांना पाठिंबा दर्शवलेला होता, ज्यात औरंगाबाद पूर्व, भायखळा कुर्ला मतदारसंघांचा समावेश होता. वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीत २८८ पैकी २३४

जागांवर उमेदवार उभे केले होते, परंतु एकाही जागेवर विजय मिळाला नाही.[१५६] पक्षाने २३ इतर उमेदवारांना सुद्धा पाठिंबा दर्शवला होता. बहुजन समाज पक्षानंतर (२६२ जागांवर लढले) सर्वाधिक जागा वंचित बहुजन आघाडीने लढल्या होत्या. या निवडणुकीत पक्षाच्या उमेदवारांना २४ लाखांपेक्षा अधिक मते (४.६%) मिळाली.[१५७] दहा मतदारसंघात वंचितच्या उमेदवारांना क्रमांक दोनची मते मिळाली होती. तर अनेक मतदारसंघांत तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती.[१५८] निवडणूक चिन्हे संपादन २०१९ च्या १७ व्या लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय निवडणूक आयोगाने वंचित बहुजन आघाडीच्या बहुतेक उमेदवारांना कपबशी हे निवडणूक चिन्ह दिले होते, तर काही उमेदवारांना किल्ली, शिट्टी व पतंग ही चिन्हे दिली होती. महाराष्ट्र विधानसभा २०१९ निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना गॅस सिलेंडर हे चिन्ह मिळाले होते.[१५९] ध्वजसंपादन ३१ मार्च २०१९ रोजी, प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीच्या अधिकृत ध्वजाचे अनावरण केले. या ध्वजात अशोकचक्रासह निळा भीम ध्वज, केशरी, पिवळा व हिरवा रंग घेतलेला आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, ६ एप्रिल २०१९ रोजी वंचित बहुजन आघाडीने जाहीरनामा प्रसिद्ध केला व भारतीय संविधानाचा सरनामा हाच त्यांचा जाहीरनामा असल्याचे सांगितले. या जाहीरनाम्यात वेगवेगळ्या २७ मुद्द्यांवर भर देण्यात आला होता. त्यामध्ये केजी ते पीजी मोफत शिक्षण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत आणणे, लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माचा दर्जा देणे, तसेच शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवणे अशी अनेक आश्वासने या जाहीरनाम्यात देण्यात आलेली होती.[१६०] महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, ऑक्टोबर २०१९ मध्ये, वंचित बहुजन आघाडीने आपला डिजीटल जाहिरनामा प्रसिद्ध केला, ज्यात भारतीय संविधानाचा सरनामा हाच आमचा जाहीरनामा असल्याचे सांगितले.[१६१] वंचितने शिवसेनेसह महाविकास आघाडीशी युती करण्याची गरज! देशातील लोकशाही व संविधान, संविधानिक संस्था अबाधित राखायचे असतील, तर धर्मनिरपेक्ष विचारांच्या सर्व शक्तींनी एकजूट करणे गरजेचे आहे. घडलेल्या अनपेक्षित सत्तांतरामुळे सर्वच राजकीय पक्षांचे संदर्भ व राजकारण बदलून गेले आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी व मित्रपक्षांचे सरकार राज्यात सत्तेवर होते. या सरकारचे प्रमुखपद मुख्यमंत्री म्हणून शिवसेनेच्या उद्धव ठाकरे यांच्यावर जबाबदारी होती. मात्र पक्षांतर्गत कुरबुरी व केंद्रीय संस्थांच्या भीतीपोटी शिवसेनेचा एक मोठा गट फुटून राज्यात सत्तांतर घडले, आणि

त्यानंतर एका वेगळ्याच राजकारणाचा जन्म महाराष्ट्रात झाला. सध्या सुरू असलेले महाराष्ट्रातील राजकारण हे एका वेगळ्या टप्प्यावर येऊन पोहोचले आहे. इथली सारी व्यवस्थाच संशयाच्या भोवऱ्यात सापडलेली आहे. असे असताना आगामी काळातील विविध स्तरांवरच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून वेगवेगळ्या राजकीय आघाड्या, युतीचे संकेत दिले जात आहेत. त्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि आंबेडकरी चळवळीतील एक प्रमुख राजकीय पक्ष असलेल्या ॲडव्होकेट बाळासाहेब आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडी या दोन पक्षांमध्ये युती होण्याचे संकेत दोन्हीकडून देण्यात आलेले आहेत.[१६२] त्यानिमित्ताने राज्यात पुन्हा एकदा शिवशक्ती– भीमशक्तीच्या दुसऱ्या प्रयोगाबद्दल जोरकसपणे चर्चा केली जाऊ लागली आहे. प्रबोधनकार ठाकरे यांच्यावरील वेबसाइटचे उद्घाटन करण्याच्या निमित्ताने शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर हे प्रथमच एका विचारमंचावर आले. (मुंबई २० नोव्हेंबर) मुंबईत झालेल्या या कार्यक्रमाची चर्चा खूप अगोदरपासूनच सुरू झाली होती. या कार्यक्रमात प्रकाश आंबेडकर यांनी मार्मिक भाष्य करतानाच राजकीय युती संदर्भात बोलणे टाळले होते. मात्र शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी याच कार्यक्रमातील भाषणात थेट मुद्याला हात घालत 'देशातील लोकशाही व्यवस्था वाचवायची असेल तर बाळासाहेब, आपणाला हातात हात घालून या पुढच्या काळात लोकांसमोर जावे लागेल. तरच आपण बाबासाहेब व प्रबोधनकारांचे नातू म्हणून म्हणवून घेऊ शकू,' असे म्हटले होते. याच कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना विचारलेल्या प्रश्नावर बाळासाहेब आंबेडकर यांनी युतीबाबत भाष्य करण्याचे टाळून 'निवडणुका जाहीर झाल्यानंतर आपला निर्णय जाहीर करू,' असे म्हटले होते. मात्र या कार्यक्रमानंतर दोन्ही पक्षांकडून राजकीय युतीसंदर्भात चाचपणी सुरू झाली. दोन्ही पक्षांकडे प्रमुख नेत्यांमध्ये युतीबाबत चर्चा व बैठका होत राहिल्या आणि अखेर काल–परवाच वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेऊन 'आम्ही शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यासोबत युती करण्यास तयार आहोत,' असे जाहीर केले आहे. मात्र ही युती फक्त शिवसेनेसोबत असणार आहे की, महाविकास आघाडीसोबत याबाबतचा निर्णय त्यांनी शिवसेनेवर सोपवलेला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात या युतीचे चित्र लवकरच स्पष्ट होणार आहे. राज्यात आंबेडकरी चळवळीत ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचा वंचित बहुजन आघाडी आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री

नामदार रामदास आठवले यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हे दोन प्रमुख पक्ष आहेत. याखेरीज रिपब्लिकन पक्षाचे इतरही अनेक गट आहेत. मात्र या दोन प्रमुख नेत्यांना चांगला जनाधार आहे. त्यामुळे प्रस्थापित राजकीय पक्ष आपल्यासोबत आंबेडकरी चळवळीतील यापैकी नेत्यांना आपल्या सोबत घेण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामागे बेरजेचे राजकारण असते. शिवाय राज्यात आंबेडकरी चळवळीची व मतांची ताकद सर्वदूर सर्व भागात पसरलेली आहे. याचीही जाणीव प्रस्थापित पक्षांना असल्यामुळे आंबेडकरी चळवळीतील या दोन प्रमुख नेत्यांना आपल्या सोबत घेण्याचा प्रयत्न अनेकांचा राहिलेला आहे. याखेरीज उर्वरित गटांच्या नेत्यांनाही आपापल्या बाजूने घेण्याचा प्रयत्न सातत्याने राहत आलेला आहे. आता तर पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते प्राध्यापक जोगेंद्र कवाडे यांना बाळासाहेबांची शिवसेना पक्षातर्फे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोबत घेण्याची तयारी दर्शवली.[१६३] या साऱ्या पार्श्वभूमीवर वर्तमान सामाजिक राजकीय परिस्थितीत आंबेडकरी चळवळीत ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांना एक मोठे वलय प्राप्त आहे. शिवाय ते चळवळीतील एक वजनदार आणि जनाधार असलेले नेते आहेत. आंबेडकरी समुदायाखेरीज त्यांनी अलुतेदार–बलुतेदार, बहुजन, वंचित समूहातील वर्गाची मोट बांधण्यात सातत्याने भूमिका घेतलेली आहे. बहुजन समाजाचे नेतृत्त्व करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. त्यांच्या राजकारणाचा बाज हा केवळ रिपब्लिकन राजकारण न राहता, ते बहुजनांचे राजकारण करण्याकडे राहिलेला आहे. एकजातीय राजकारणाला (केवळ बौद्ध समाजाच्या) त्यांनी नेहमीच विरोध केलेला आहे. आणि म्हणूनच त्यांनी विदर्भात अकोला पॅटर्न यशस्वी करून दाखवलेला आहे. त्यामुळेच त्यांचा राजकीय प्रवास हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ते भारिप, बहुजन महासंघ, ते आता वंचित बहुजन आघाडी असा राहिलेला आहे. यामागे त्यांची, त्यांच्या राजकारणाची व्यापक होत गेलेली वैचारिक भूमिका आहे. (मात्र याबाबत त्यांच्यावर सातत्याने राजकीय विरोधक टीकाही करतात की बाळासाहेब, कोणत्याही राजकीय भूमिकेशी सातत्य टिकवून ठेवत नाही.) ॲड. बाळासाहेब आंबेडकरांचे राजकारण हे स्वतंत्र बाण्याचे व स्वतंत्र अस्मितेचे राहिलेले आहे. कुणावर अवलंबून न राहता, स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे राजकारण आहे. त्यामुळेच गेल्या तीन दशकाहून अधिक काळ कधी युती करून, तर कधी स्वतंत्रपणे लढून आपले अस्तित्त्व अबाधित राखले आहे. मात्र त्या भूमिकेमुळे त्यांच्यावर अनेकदा आरोपही केले गेले आहेत. स्वतंत्र लढल्यामुळे जातीयवादी शक्तींना, पक्षांना त्याचा लाभ मिळत असल्याबद्दल

त्यांना टीकाही सहन करावी लागली आहे. परिणामी दुसऱ्या बाजूला रिपब्लिकन पार्टीचे नेते रामदास आठवले हे नेहमीच तडजोडीचे, सहमतीचे, सत्तेचे राजकारण करणारे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी आजवर काँग्रेस, राष्ट्रवादी सोबत युती करून राजकारण केले व त्यानंतर आता भाजपसोबत राहून राजकारण करत आहेत. मधल्या काळात काही काळ शिवसेनेसोबत युती केली. मात्र ती अल्पकाळच टिकली. तडजोडीचे व सत्तेचे राजकारण करीत असल्यामुळे आठवलेंना बऱ्यापैकी जनाधार मिळाला. मात्र सध्या ज्या पद्धतीने ते भाजपसोबत सत्तेत आहेत आणि भाजप सरकार ज्या पद्धतीने संविधान विरोधी व मागासवर्गीय समाजाविरोधी भूमिका व एकामागोमाग एक निर्णय घेत आहे. त्या पार्श्वभूमीवर लोकांना आठवलेंची भूमिका पटलेली नाही. म्हणूनच लोक नव्या पर्यायाच्या शोधात आहेत. आंबेडकरी चळवळीतील सामान्य माणसे व कार्यकर्तेही जातिवादी, धर्मांध शक्तीच्या विरोधात लढण्यासाठी धर्मनिरपेक्ष पक्षासोबत जाण्यासाठी त्यांना पर्याय हवा आहे. त्या शोधात लोक आहेत. अशा साऱ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील आगामी राजकारणाची वाटचाल पाहता, प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखालील वंचित बहुजन आघाडीने शिवसेनेबरोबर युती करणे हिताचे ठरेल, असे सर्वसामान्य माणसाला वाटते. मात्र २०१९ चा लोकसभा व विधानसभा निवडणुकीचा अनुभव पाहता वंचित बहुजन आघाडीने अगम्य अटी ऐनवेळी उभ्या करून पुन्हा स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतल्यास, तो पक्षासाठी आणि आपली हयात घालवणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी देखील आत्मघातकी ठरेल! त्यामुळे आगामी महापालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती निवडणुका तसेच २०२४ सालच्या विधानसभा व लोकसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून वंचित बहुजन आघाडीने शिवसेनेबरोबर युती करावीच! मात्र त्याबरोबरच महाविकास आघाडी ही जी नवी राजकीय आघाडी निर्माण झाली आहे, त्या आघाडीचा एक घटक पक्ष बनणे हे देखील तितकेच गरजेचे आहे. नाहीतर शिवसेनेला महाविकास आघाडीतून बाहेर पडण्यास सांगून फक्त शिवसेना व वंचित अशी युती करण्याची अट घातल्यास, त्याचा राजकीय फायदा हा भाजपला होऊ शकतो. परंतु शिवसेनाही अशा परिस्थितीत महाविकास आघाडीला सोडून केवळ वंचितसाठी आघाडीला सोडून बाहेर पडेल असेही चिन्ह नाही. ते शिवसेनेसाठी (उबाठा) आत्मघातकी ठरेल. वर्तमान स्थितीत बाळासाहेब आंबेडकर यांचे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी फारसे पटत नाही. मात्र भारतीय जनता पार्टीला निवडणुकीत खरोखरच पराभूत करायचे असेल तर या देशातील लोकशाही व संविधान, संविधानिक संस्था अबाधित

राखायचे असतील, तर धर्मनिरपेक्ष विचारांच्या सर्व शक्तीनी एकजूट करणे गरजेचे आहे. तरच या महाशक्तीचा पराभव करणे सोपे ठरू शकते. अन्यथा कठीण आहे. २०१९ सालच्या लोकसभा निवडणुकी वेळी वंचित बहुजन आघाडीने दोन्ही काँग्रेससोबत युती करावी म्हणून खूप प्रयत्न झाले. मात्र त्यात यश येऊ शकले नाही. काँग्रेस आघाडीने वंचित बहुजन आघाडीला आठ जागा देऊ केल्या होत्या. मात्र तरीही आघाडी न करता वंचितने स्वतंत्र निवडणुका लढवल्या. तरीही लोकांनी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना भरभरून मतदान केले. सुमारे ४२ लाख मते वंचितच्या उमेदवारांना मिळाली. मात्र एकही खासदार विजयी होऊ शकला नाही. परंतु त्यामुळे काँग्रेसच्या सुमारे दहा ते पंधरा उमेदवारांना जबर फटका बसला.[१६४] याचाच अर्थ वंचितच्या दहा ते पंधरा उमेदवारांना ५० हजारांहून अधिक मतदान झाले. सोलापूर, अकोला, सांगली, नांदेड यांसारख्या जागांवर दोन लाखांहून अधिक मते मिळाली. मात्र हाती काहीच लागले नाही.

लोकसभेत झालेल्या या पराभवातून काही शिकून बोध घेतला जाईल असे वाटले होते. मात्र ऑक्टोबर २०१९ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीतही वंचित बहुजन आघाडीने कुणाशीही युती न करता निवडणुका लढल्या. प्राप्त परिस्थितीत वंचितने काँग्रेस आघाडीसोबत राहून निवडणुका लढवायला हव्या होत्या. परंतु तशा न लढता त्याही स्वतंत्रपणे लढल्या. या निवडणुकीत वंचितला सुमारे २७ लाख मते मिळाली. परंतु याही वेळी पक्षाला अपयश आले. लोकांची अपेक्षा होती १० ते १५ वंचित बहुजन आघाडीचे आमदार निवडून येतील. मात्र ते तसे झाले नाही. या सगळ्याचा फायदा मात्र भारतीय जनता पार्टीला मिळाला. लोकसभा निवडणुकीतही तत्कालीन शिवसेना भाजप युतीच्या उमेदवारांना याचा जबर फायदा मिळाला व वंचितसह काँग्रेस–राष्ट्रवादी आघाडीचे प्रचंड नुकसान झाले.[१६५] तीच तऱ्हा विधानसभा निवडणुकीच्या वेळी ही दिसून आली. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीला खरोखरच गांभीर्याने भारतीय जनता पार्टीला पराभूत करायचे असेल, संविधान व लोकशाही व्यवस्थेला वाचवायचे असेल, तर जे जे भाजपविरोधी पक्ष आहेत अशांना संघटितपणे राहूनच लढावे लागेल. तरच त्यांचा निभाव लागू शकेल आणि म्हणून वंचितने केवळ शिवसेनेसोबत युती न करता, शिवसेनेसह महाविकास आघाडीचा घटक बनण्याची आवश्यकता आहे. ते सर्वांच्या हिताचे राहील. त्याकरिता कोणत्याही प्रकारची आडकाठी, अगम्य अटी न ठेवता सर्व संमतीने व सन्मानाने महाविकास आघाडीचा घटक पक्ष बनणे आवश्यक आहे. असेच सर्वसामान्य माणसाला वाटते. असे झाल्यास

शिवसेना (उबाठा) व वंचित बहुजन आघाडीचा जसा फायदा होईल, त्याचप्रमाणे महाविकास आघाडीचादेखील फायदा होईल व भाजपला पराभूत करणे शक्य होईल. अन्यथा भाजपच्या विजयाचा मार्ग प्रशस्तच होईल. त्यामुळे महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी जशी खबरदारी घेणे आवश्यक आहे, तशीच ती वंचित बहुजन आघाडीच्या शीर्ष नेतृत्वानेही घेणे आवश्यक आहे.

अकोला विधान परिषदेच्या अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या मैदानात वंचित बहुजन आघाडी उतरली आहे. वंचितने खामगाव येथील प्रा. डॉ. अनिल अमलकार यांना उमेदवारी जाहीर केली. वंचित आघाडीने उमेदवार दिल्याने निवडणुकीतील रंगत वाढण्याची चिन्हे आहेत. विधान परिषदेच्या अमरावती विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीमुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे. या निवडणुकीसाठी ३० जानेवारीला मतदान होणार आहे. भाजपने विद्यमान आमदार डॉ. रणजीत पाटील यांना पुन्हा एकदा उमेदवारी दिली. महाविकास आघाडीकडून काँग्रेस ही जागा लढवणार आहे. मात्र, काँग्रेसने अद्याप आपला उमेदवार जाहीर केलेला नाही. काँग्रेसकडून डॉ. सुनील देशमुख, डॉ. सुधीर ढोणे यांच्यासह सहा ते सात नावे चर्चेत आहे. भाजपकडून उमेदवारी दाखल करण्याची धामधूम सुरू असताना काँग्रेसने उमेदवारीवर शिक्कामोर्तब केलेला नाही. दरम्यान, ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत उडी घेतली आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशान्वये वंचित आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी अमरावती विभाग पदवीधर मतदार संघासाठी उमेदवार म्हणून प्रा. डॉ. अनिल ओंकार अमलकार यांचे नाव जाहीर केले. अनिल अमलकार हे खामगाव येथील असून त्यांच्या शैक्षणिक संस्था आहेत.[१६६] ते कुणबी समाजाचे आहेत. अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघात भौगोलिकदृष्ट्या मोठे क्षेत्र येत असून पाच जिल्ह्यांचा त्यात समावेश आहे. या मतदारसंघासाठी दरवेळेस नव्याने मतदार नोंदणी होते.

गेल्या काही महिन्यांपासून इच्छुकांनी मतदार नोंदणीवर भर दिला. तरीदेखील गेल्या वेळेस पेक्षा कमी मतदार नोंदणी झाली आहे. भाजपने मतदार नोंदणीसाठी संपूर्ण यंत्रणा कामाला लावली होती. काँग्रेसमधील इच्छुकांनी देखील नोंदणीसाठी जोर लावला आहे. वंचित आघाडीकडून ऐनवेळी निवडणुकीच्या रिंगणात उडी घेण्यात आली. वंचितकडून निवडणूक लढण्यासाठी पूर्वतयारी केल्याचे दिसून आले नव्हते. मात्र, वंचित आघाडीकडे परंपरागत मतदार आहेत. त्यामुळे वंचितच्या आगमनामुळे निवडणुकीच्या समीकरणात बदल होण्याची शक्यता

नाकारता येत नाही. पदवीधर निवडणुकीतील चुरस वाढण्याची चिन्हे आहेत. वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या युतीनंतर राज्यात पहिलेच एकत्रित आंदोलन होणार आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा होऊ लागली आहे.

शिवसेना ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडीची काही दिवसांपूर्वी युती झाली आहे. युती झाल्यानंतर राज्यातील ठाकरे गटाचे शिवसैनिक आणि वंचित बहुजन आघाडीच्या मोठा जल्लोष केला होता. शिवशक्ती आणि भीमशक्ती एकत्र आल्याचं सेलिब्रेशनचं कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी केलं होतं. त्याच पार्श्वभूमीवर युती झाल्यानंतर राज्यातील पाहिलं आंदोलन हे कोल्हापुरात केलं जात आहे.[१६७] शिंदे गटासह भाजपच्या विरोधात हे आंदोलन केलं जात आहे. यामध्ये कोल्हापूरचे पालकमंत्री दीपक केसरकर यांच्या विरोधात हे आंदोलन केले जाणार आहे. शिंदे–फडणवीस सरकारने दलित वस्तीच्या ३९ कोटीच्या निधीला प्रशासकीय मंजूरी असतानाही स्थगिती दिल्याने आंदोलन केले जात आहे. पालकमंत्री चलेजाव या आशयाखाली हे आंदोलन केले जात आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडी आज युती झाल्यानंतर पहिल्यांदाच कोल्हापूरमध्ये एकत्रित आंदोलन करीत आहे. दोन्ही पक्ष पालकमंत्री चलेजाव आंदोलन करण्यासाठी राजश्री शाहू महाराज यांच्या समाधी स्थळी एकत्र येणार आहे त्यासाठीची संपूर्ण तयारी दोन्ही पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केली आहे.

प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाचे महाराष्ट्राच्या राजकारणात चांगलेच मूळ धरलेले आहे त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात व ते त्यांचा फार मोठा प्रभाव पडताना दिसतो. प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. आंबेडकरोत्तर काळात बहुजन राजकारणामध्ये अनेक पक्ष, संघटना व व्यक्तींचे योगदान महत्त्वपूर्ण समजले जाते. त्यापैकी काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या योगदानाला विशेष महत्त्व आहे. कारण इतर सर्व पक्ष व संघटनापेक्षा काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी व्यवस्था परिवर्तनासाठी बहुजन राजकारण केले. त्यांच्या बहुजन राजकारणाची छाप ही दिर्घकालीन देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेली आहे. काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यावर म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव आहे. परंतु दुदैवाने आजच्या पिढीला काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन राजकारणाची योग्य माहिती नाही त्यामुळे त्याना एका जातीचेच राजकीय नेते म्हणून ओळखले

जाते. म्हणूनच त्यांच्या बहुजन राजकारणाचा परिचय करुन देणे, त्यांनी बहुजन समाजामध्ये कसे राजकीय भान आणून त्यांच्यामध्ये राजकीय सत्ता मिळविण्याची इच्छा निर्माण केली व व्यवस्थापरिवर्तनासाठी बहुजन समाजाला तयार केले. या दृष्टिकोनातून हा अभ्यास केला आहे. याशिवाय काशीराम व प्रकाश आंबेडकरांनी विविध संघटनांच्या माध्यमातून प्रस्थापित राजकारणाला कशा प्रकारे वेगळे वळण दिले, त्यांचे राजकीय डावपेच, त्यांची नेतृत्त्वक्षमता या सर्वांचा आढावा सदर प्रबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी मांडलेल्या विचारांमुळे देशामध्ये व महाराष्ट्रामध्ये जे काही सामाजिक व राजकीय बदल झाले. त्या बदलांचा वेध घेण्याचा प्रयत्न ही या प्रबंधामध्ये केला आहे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी जे कार्य केले त्या कार्यामुळे काशीराम व प्रकाश आंबेडकर हे बहुजन समाजासाठी एक प्रेरणा केंद्र बनले आहेत, हे समजून घेण्याचा प्रयत्न या प्रबंधाच्या माध्यमातून केला आहे.

## संदर्भ


१. काशीराम : चमचा युग, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००८, पृ. ७५

२. Sanjay kumar shyam, sahib Kanshiram A Socio-Political Giant, samyak prakashan, New Delhi, 2012, page no.156

३. राऊत बापू : 'बहुजन नायक काशीराम', ओ. बी. सी. सेवासंघ प्रकाशन मुंबई २००९ पृ.१४

४. जंजाळ प्रकाश : 'बीएसपी भ्रम आणि वास्तव', कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती २००५, पृ. २०

५. उपरोक्त, पृ. ११

६. दैनिक जनतेचा महानायक स्मृतिदिन, विशेषांक मुंबई आवृत्ती, ९ ऑक्टोंबर २००७

७. अकेला के. आर. (संपा.) : 'काशीराम के साक्षात्कार' साहित्य सदन प्रकाशन, २०१५, पृ.१२

८. सतनाम सिंह : 'बहुजन नायक काशीराम', सम्यक प्रकाशन नई दिल्ली, २००५, पृ.१४

९. रामचंद्र : 'हमारे मध्य मान्यवर काशीराम', सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली २०११, पृ.१८

१०. योगराज रामदास : 'मेश्राम बहुजन नायक काशीराम की ललकार' संम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०१२ पृ. २१

११. रामचंद्र : 'हमारे मध्य मान्यवर काशीराम' सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली, २०११, पृ.१९

१२. सतनाम सिंह : बहुजन नायक काशीराम' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पृ.२०

१३. थोरात सी. पी. : 'काशीराम मनुवादापुढे आव्हान' शिव प्रकाशन, पुणे २००५, पृ. ५

१४. रामचंद्र : ' हमारे मध्य मान्यवर काशीराम' सम्यक प्रकाशन नई दिल्ली, २०११, पृ.२०

१५. राऊत बापू : 'बहुजन नायक काशीराम' ओ.बी.सी. सेवासंघ प्रकाशन, मुंबई, २००९, पृ. १०

१६. किर्ती विमल : बहुजन समाज के प्रणेता मान्यवर काशीराम, वाणी प्रकाशन, नई दिल्ली, २०११, पृ.३२

१७. वाघमारे भारत : 'मान्यवर काशीरामसाहब जीवनदर्शन और ऐतिहासिक भाषण', प्रबुद्ध भारत पुस्तकालय, नागपूर २०१३, पृ. १२

१८. सतनाम सिंह : 'काशीराम कि नेक कमाई जिसने सोती कोम जगाई' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पृ. १४

१९. योगराज रामदास : 'मेश्राम बहुजन नायक काशीराम की ललकार' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०१२ पृ. ३४

२०. S Goutam, -nil Kumar, Tribute to Bahujan Nayak Manyawar Kanshiram, Goutam Book center, Delhi 2012 page no 14

२१. योगराज रामदास मेश्राम : 'बहुजन नायक काशीराम की ललकार' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली २०१२ पृ. ३५

२२. Sanjay kumar shyam, sahib Kanshiram - Socio-Political Giant, samyak prakashan, New Delhi, 2012, page no.121

२३. उपरोक्त, पृ. १२२

२४. सतनाम सिंह : बहुजन मसिहा काशीराम के राजनितिक भाषण, खंड २, सम्यक प्रकाशन, २०१२, पृ. १६८

२५. प्रज्ञावंत गौतम : 'काशीराम आणि व्यवस्था परिवर्तनाचे साधन', प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर, २०११, पृ. ११

२६. सतनामसिंह : 'बहुजन नायक काशीराम' सम्यक प्रकाशन २००५, पृ. २३

२७. गौतम : एस. बसपा के कालिन दलित राजनीती', गौतम बुक सेंटर, २००६, नई दिल्ली, पृ. ३६.

२८. दैनिक, नवभारत टाईम्स, २४ मार्च २००५ पृ. ४

२९. पाक्षिक, बहुजन संघटक : २५ सप्टेंबर, १ ऑक्टोंबर २००० पृ. ०३

३०. रामचंद्र : 'हमारे मध्य मान्यवर काशीराम' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०११ पृ. ६८

३१. सतनाम सिंह : 'बहुजन नायक काशीराम', सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०१२, पृ.१५

३२. मेश्राम योगराज रामदास : 'बहुजन नायक काशीराम की ललकार', सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०१२, पृ. ५०

३३. रामचंद्र हमारे : 'मध्य मान्यवर काशीराम', सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०११, पृ. ४१

३४. राऊत बापू : ‘बहुजन नायक काशीराम’, ओ.बी.सी. सेवासंघ प्रकाशन, मुंबई, २००९ पृ.१४

३५. रामचंद्र : ‘हमारे मध्य मान्यवर काशीराम’ सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली २०११, पृ. ४४

३६. उपरोक्त, पृ. ४२

३७. मेश्राम योगराज रामदास : ‘बहुजन नायक काशीराम की ललकार’, सम्यक प्रकाशन नई दिल्ली, २०१२, पृ.५४

३८. थोरात सी. पी. : ‘काशीराम मानुवादापुढे आव्हान’, शिवं प्रकाशन, पुणे २००५, पृ. ५६

३९. प्रज्ञावंत गौतम : ‘काशीराम आणि बहुजनांचे प्रशिक्षण’, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ.४१

४०. प्रज्ञावंत गौतम : ‘काशीराम आणि बहुजनांची सत्ता’, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ.१८

४१. प्रज्ञावंत गौतम : ‘काशीराम आणि बहुजनांचे प्रशिक्षण’, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ.४५

४२. उपरोक्त, पृ. ४७

४३. उपरोक्त, पृ. ४९

४४. उपरोक्त, पृ. ५०

४५. उपरोक्त, पृ. ५२

४६. दैनिक, नवभारत टाईम्स, १/७/१९९०, पृ. ५

४७. प्रज्ञावंत गौतम : ‘काशीराम आणि बहुजनांचे प्रशिक्षण’, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ. ५७

४८. उपरोक्त, पृ. ५१

४९. उपरोक्त, पृ. ६१

५०. उपरोक्त, पृ. ६२

५१. उपरोक्त, पृ. ६३

५२. प्रज्ञावंत गौतम : ‘काशीराम आणि सामाजिक परिवर्तनाचा लढा’ प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर २००९, पृ. २९

५३. रामचंद्र : 'हमारे मध्य काशीराम' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०११, पृ. ४७

५४. Sanjaykumar Sham : Sahib Kanshiram A Socio Political Giant, Samyak Publiction, New Delhi, 2023, P.48

५५. सतनामसिंह : 'बहुजन नायक काशीराम', सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००५, पृ. ३४

५६. रामचंद्र : 'हमारे मध्य काशीराम', सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०११, पृ. ४९

५७. काशीराम : 'चमचा युग : मोजेज मायकेल' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००८, पृ. ७५

५८. रामचंद्र : 'हमारे मध्य मान्यवर काशीराम', सम्यक प्रकाशन नवी दिल्ली, २०११, पृ.५१

५९. उपरोक्त, पृ. ५२

६०. पाक्षिक, बहुजन संघटक, २४–३० एप्रिल, २००० पृ.०३

६१. अकेला : काशीराम के ऐतिहासिक भाषण, १९८२–१९८४ संकलन, आनंद साहित्य सदन अलीगढ, पृ. ३०

६२. रामचंद्र : 'हमारे मध्य मान्यवर काशीराम', सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली २०११, पृ. ६३.

६३. उपरोक्त, पृ. ५२

६४. राष्ट्रीय विश्वास, ३१ डिसेंबर १९९३ पृ.०६

६५. काशीराम भाषणे, मोतीझील कानपूर, दि. २८/१०/१९८४

६६. जितेंद्रकुमार गौरव, युगप्रवर्तक, काशीराम की देन, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००८, पृ. ६१

६७. सुखदेवे के. ना. : 'आंबेडकरी चळवळीची दिशा काय?' सोनामा प्रकाशन, नागपूर–२७, २००७, पृ. ५९

६८. रामचंद : 'हमारे मध्य काशीराम', सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०११, पृ. ५७

६९. प्रज्ञावंत गौतम : काशीराम आणि सामाजिक परिवर्तनाचा लढा, प्रियदर्शी प्रकाशन, २००९, पृ.३९

७०. प्रज्ञावंत गौतम : काशीराम आणि बहुजनांची सत्ता, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ. १२

७१. उपरोक्त, पृ. १३

७२. मनीकुमार : आंबेडकर मुव्हमेंट के सजग प्रहरी काशीराम, सुकिर्ती प्रकाशन, नई दिल्ली, २००८, पृ. ६४

७३. प्रज्ञावंत गौतम : काशीराम आणि बहुजनांची सत्ता, प्रियदर्शी प्रकाशन, २००९, पृ.१८

७४. प्रज्ञावंत गौतम : काशीराम आणि व्यवस्था परिवर्तनाचे साधन, प्रियदर्शी प्रकाशन, २०११, पृ.१६

७५. उपरोक्त, पृ. १७

७६. उपरोक्त, पृ. १८

७७. उपरोक्त, पृ. १९

७८. उपरोक्त, पृ. २१

७९. उपरोक्त, पृ. २१

८०. उपरोक्त, पृ. २३

८१. प्रज्ञावंत गौतम : काशीराम आणि बहुजनांची सत्ता, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ.१४

८२. प्रज्ञावंत गौतम : काशीराम आणि व्यवस्थापरिवर्तन, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ.२४

८३. बोस अजय : 'बहनजी' अनु. कौलपूनम, वाणी प्रकाशन, दिल्ली, २००८, पृ. ७१

८४. प्रज्ञावंत गौतम : काशीराम आणि व्यवस्था परिवर्तन, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ.२४

८५. मेश्राम योगराज रामदास : बहुजन नायक काशीराम की ललकार, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०२१, पृ. १६

८६. प्रज्ञावंत गौतम : काशीराम आणि बहुजनांची सत्ता, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ. १६

८७. गायकवाड महेंद्र : पृ. ६२

८८. प्रज्ञावंत गौतम : काशीराम आणि बहुजनांची सत्ता, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ. २५

८९. पाटणकर : आंबेडकर चळवळ इतिहास आणि पुढील काळ, २०१६, पृ.२३

९०. उपरोक्त, पृ. २४
९१. क्षीरसागर आर. के.: भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलाश प्रकाशन, १९७९, पृ. १४२
९२. उपरोक्त, पृ. ३८
९३. उपरोक्त, पृ. ४५
९४. उपरोक्त,पृ. ३८
९५. उपरोक्त, पृ. ३९
९६. उपरोक्त, पृ. ५५, ५६, ५७
९७. प्रज्ञा रुईकर, प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबध, पृ. ३५
९८. क्षीरसागर, आर के. : भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलाश प्रकाशन, १९७९, पृ. ११०,१११
९९. नैमिशराय मोहनदास, बहुजन समाज, नीलकंठ प्रकाशन, नवी दिल्ली, २००९, पृ.१३
१००. जगदेव सिध्दार्थ, आंबेडकरांचे खरे शत्रू कोन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, काळामारुती चौक, एवले, जि. नाशिक, १९९९, पृ.७
१०१. नैमिशराय मोहनदास, बहुजन समाज, नीलकंठ प्रकाशन,नवी दिल्ली, २००९, पृ.१३
१०२. डांगळे अर्जुन : आंबेडकरी चळवळीचे अंतरंग, लोकवाङ्मय ग्रंथ प्रकाशन, मुंबई, २००१, पृ.५८
१०३. उपरोक्त, पृ. ५९
१०४. उपरोक्त, पृ. ६०
१०५. गायकवाड अशोक (संकलक) : आंबेडकर बाळासाहेब, बहुजन चळवळ, विचारसरणी आणि पक्ष संघटना, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००३, पृ. २१,२२
१०६. डांगळे अर्जुन : आंबेडकरी चळवळीचे अंतरंग, लोकवाङ्मय ग्रंथ प्रकाशन, मुंबई, २००१, पृ.५९
१०७. गायकवाड अशोक (संकलक) : आंबेडकर बाळासाहेब, बहुजन चळवळ, विचारसरणी आणि पक्ष संघटना, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००३, पृ. २०,२१
१०८. उपरोक्त, पृ. २३,२४

१०९. देठे भीमसेन, फुले आंबेडकरी चळवळीचे नवे क्षीतिज, भारिप बमस, प्रबुद्ध भारत, १ ते १५ ऑगस्ट १९९५, पृ. ३

११०. बहुजन समाजातून शंकराचार्य घ्या, प्रबुद्ध भारत, १६ ते ३१ मार्च १९९३, पृ. ८

१११. बहुजन चळवळ : विचारसरणी आणि पक्ष संघटना, लेख – बाळासाहेब आंबेडकर, संकलन : अशोक गायकवाड, पृ. १२,१३

११२. शांताराम पंदेरे – प्रस्तावना अशोक गायकवाड, संपादित बहुजन चळवळ विचारसरणी आणि पक्ष संघटना, पृ. १९

११३. पाक्षिक, प्रबुध्द भारत १ ते १५ सप्टेंबर १९९५ पृ. ०९

११४. भोजने भास्कर : अष्टपैलू नेतृत्त्व– ॲड. बाळासाहेब आंबेडकर, राजेंद्र प्रिंटर्स, रणपिसेनगर, अकोला, २००८, पृ. १५.

११५. मुलाखत : अविनाश डोळस उद्धृत

११६. जाहिरनामा : भारतीय रिपब्लिकन पक्ष १९८५, पृ. ३

११७. पवार ज. वि. : रिपब्लिक ऐक्याची शोकांतिका, संजना पब्लिकेशन, मुंबई १९९४, पृ. ४२

११८. क्षीरसागर आर. के. : भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलास प्रकाशन, मुंबई, १९७९, पृ.१४२

११९. आंबेडकर बाळासाहेब : ओबीसींचे राजकारण, प्रबुद्ध भारत प्रकाशन, हडको, औरंगाबाद, १९९६, पृ.५

१२०. आंबेडकर बाळासाहेब : बहुजन चळवळ विचारसरणी आणि पक्ष, हडको, औरंगाबाद, १९९६, पृ.५

१२१. आंबेडकर बाळासाहेब : एन्रॉनविरोधी पुरावे, प्रबुद्ध भारत पांक्षिक वर्ष ९ अंक २, १६ ते ३१ जानेवारी, २००१

१२२. दळवी म. य. : नामांत्तर, धर्मांतर आणि राष्ट्रांतर, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९८३, पृ. २५

१२३. गवई वामन हौसाजी : पश्चिम विदर्भातील दलितांच्या राजकीय जागृतीचे विश्लेषात्मक अध्ययन (१९३० ते १९८५), अमरावती विद्यापीठातील अप्रकाशित शोधप्रबंध, पृ. ८३९.

१२४. वाहूळ एम. ए. :'नामांत्तर आणि मी' नामांत्तर शहीद गौरव ग्रंथ, प्रकाशन भदन्त अश्वजित, २०००, पृ.१९८

१२५. गाडे गंगाधर : क्रांतिसूर्य जयंती विशेषांक, १९८५, पृ. ४८

१२६. आंबेडकर बाळासाहेब : प्रबुध्द भारत पाक्षिक, १९८८, पृ ०२.

१२७. ढोबळे विष्णू : 'दखल' आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९९१, पृ. ११०

१२८. वानखेडे अनंत : 'नामांतर आणि विद्यार्थी चळवळ' नामांतर शहिद गौरव ग्रंथ प्रकाशन, शालीमार, औरंगाबाद, २००९, पृ. १८९

१२९. उपरोक्त, पृ. १९०

१३०. शांताराम पंदिने, बहुजन चेतना दिंडी, १६ ते ३० नोंव्हेंबर १९९५, पृ. १, २

१३१. एकनाथ खिलारे, रिपब्लिकन पक्ष, नवे क्रांतिपर्व, पृ. ६६

१३२. पवार मखाराम : 'बसप कशासाठी–कोणासाठी?' बहुजन प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ. १०–११

१३३. आंबेडकर प्रकाश : दलित बहुजनांनो नवे आर्थिक धोरण उखडून टाका, मुलाखत संकलन के. डी. दि. ०९ मार्च बहुजन महासंघ पथदर्शक पुस्तीका, पृ. ०६

१३४. Election Commission of India Maharashtra state election,1990 , Maharashtra State Election Legislative –ssembly

१३५. पवार मखाराम : बहुजन महासंघ कशासाठी कोणासाठी?, बहुजन प्रकाशन, मुंबई, प्र. आ., २९ एप्रिल १९९३, पृ.१४

१३६. क्षीरसागर रा. का. : भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती ६ डिसेंबर २००६, पृ. १२७

१३७. महाराष्ट्र : निवडणूक आणि निकाल– १९६२ ते१९९९– राज्यसभा, लोकसभा, विधान परिषद आणि विधानसभा, बाबूकाका प्रकाशन, नेरुळ, मुंबई. जुलै२०००, पृष्ठ ३५ ते ५९

१३८. General Election of India. , 1998- Votes Polled in States By Parties Election Commission of India
१३९. प्रबुद्ध भारत : पाक्षिक, वर्ष ७ वे, अंक १५, १५ ऑगस्ट, १९९९ पृ. ३
१४०. General Election Legislative -ssembly of Maharashtra 1995- Chief Electoral office, Maharashtra Mantralaya Mumbai. P. N. 26,27
१४१. वंचित बहुजन आघाडीत तृतीय पंथीयांना स्थान–दिशा शेख Lokmat. 2019-03-12.
१४२. Vanchit bahujan aaghadi: तृतीय पंथी दिशा वंचित बहुजन आघाडीच्या प्रवक्ते पदी Maharashtra Times 2019-03-12 रोजी.
१४३. “India Votes PC: Party performance over elections-Bharipa Bahujan Mahasangh” India Votes Archived from the original on 2019-04-21. 2019-05-25.
१४४. ''आता आंबेडकरांची वंचित बहुजन आघाडी'' Maharashtra Times 2019-03-12.
१४५. ''महाराष्ट्र: प्रकाश आम्बेडकर और ओवैसी का गठबंधन, कांग्रेस का नुकसान?'' The Quint Hindi (इंग्रजी भाषेत) 2019-03-12.
१४६. ''प्रकाश आंबेडकरांचे शनिवारी मुंबईत शक्तिप्रदर्शन'' Loksatta 2019-03-15.
१४७. ''शिवाजी पार्कवर प्रकाश आंबेडकरांची सभा उमेदवारांची घोषणा करणार?'' News 18 Lokmat 2019-03-15.
१४८. ''वंचित बहुजन आघाडीला चार जागा'' Loksatta 2019-03-12 रोजी पाहिले.
१४९. ''लोकसभा चुनाव २०१९ : प्रकाश आंबेडकर बोले–महाराष्ट्र में कांग्रेस के साथ नहीं करेंगे गठबंधन– News 18 हिंदी'' News 18 India 2019-03-12 रोजी पाहिले.
१५०. अकोला, उमेश अलोणे, एबीपी माझा ''भारिप बहुजन महासंघ वंचित आघाडीत विलीन करणार, प्रकाश आंबेडकरांची घोषणा'' ABP Majha 2019-05-03
१५१. 'भारिप बहुजन महासंघ वंचित बहुजन आघाडीत विलीन करणार प्रकाश आंबेडकरांचा मोठा निर्णय'' Lokmat. 2019-05-03.

१५२. ''प्रकाश आंबेडकरांचा Big Decision भारिप बहुजन महासंघ वंचित बहुजन आघाडीत विलीन करणार'' divyamarathi. 2019-05-03.

१५३. ''टिल्लू रोहन (2019-03-10) ''लोकसभा निवडणूक २०१९: महाराष्ट्राचं राजकीय चित्र कसं आहे?'' (इंग्रजी भाषेत) 2019-03-12.

१५४. ''वंचित–एमआयएम युती तुटली'' Maharashtra Times ७ सप्टेंबर २०१९.

१५५. ''वंचित आघाडीत काडीमोडावर शिक्कामोर्तब, जलील वक्तव्याला ओवैसींचा पाठिंबा'' www.timesnowmarathi.com.

१५६. कोण्णूर, तुषार कुलकर्णी आणि मयुरेश (2019-03-15) ''लढाई जातीअंतासाठी आहे तर उमेदवारांच्या नावासमोर जात कशासाठी?'' 2019-03-15

१५७. author/lokmat-news-network. ''वंचित बहुजन आघाडीच्या प्रचारात काका–पुतणे दंग'' Lokmat 2019-04-20 रोजी पाहिले.

१५८. Khushbu ''महाराष्ट्र में BJP- शिवसेना के लिए कितनी गंभीर है अंबेडकर–ओवैसी की चुनौती?'' India TV Hindi (hindi भाषेत) 2019-05-03

१५९. कदम, अमृता (2019-05-24) ''या ७ मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीमुळे झाला काँग्रेसचा पराभव?'' (इंग्रजी भाषेत) 2019-05-28 रोजी पाहिले.

१६०. "General Election 2019- Election Commision of India" results.eci.gov.in. 2019-05-28

१६१. "Maha Election: ८७% मुस्लिम काँग्रेसमागे: आघाडी तुटल्याचा 'एमआयएम' ला फटका?'' Divya Marathi.

१६२. एबीपी माझा वेब टीम, राज्यात शिवशक्ती–भिमशक्ती पुन्हा एकत्र, उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकरांकडून युतीची घोषणा, २३ जानेवारी २०२३

१६३. Loksatta.com चंद्रशेखर बोबडे, शिंदे–कवाडे युतीचा राजकीय लाभ कोणाला, ५ जानेवारी २०२३

१६४. Lokmat.com महाराष्ट्र निवडणूक २०१९ वंचित एमआयएमने पाडल्या आघाडीच्या एवढ्या जागा. युतीला बहुमत मिळाले नसते. २५ ऑक्टोंबर २०१९

१६५. www.bbc.com बंगाळे श्रीकांत (२७ ऑक्टोंबर २०१९), वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीत काय केले.

१६६. dainkprabhat.com. वंचित बहुजन आघाडी ही पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या मैदानात.

१६७. om.marathi.abplive.com. शिवसेना वंचित बहुजन आघाडीचे एकत्रित आंदोलन कोल्हापूरात. २७ जानेवारी २०२३

# प्रकरण ५ वे

# सांराश, निष्कर्ष आणि शिफारशी

**प्रस्तावना**

आधुनिकतेची सूरूवात सर्वप्रथम पश्चिमी देशातून झाली. बुद्धीप्रामाण्यवाद वाढीस लागला. चांगले काय वाईट काय लोकांना कळू लागले. लोकांनी आधुनिक शिक्षण घेतल्याने हे बदल घडले. भारतात ही आधुनिकता ब्रिटिशांच्या आगमनामुळे झाली. परंतु ब्रिटिशांनी भारतात आणलेली आधुनिकता ही खंडीत स्वरूपाची होती. याचे कारण असे की, ब्रिटिशांनी भारतात आपले साम्राज्य प्रस्थापित केल्यानंतर दोन गोष्टी घडल्या पहिली गोष्ट भारतीयांवर ब्रिटिशांचा एकछत्री अमल सूरू झाला. दुसरी गोष्ट ब्रिटिश शासनकर्ते बनले व आपण त्यांचे गुलाम अर्थात शासित बनलो. ब्रिटिशात आणि आपल्यात शासक आणि शासित असे संबंध निर्माण झाले. ब्रिटिशांनी भारतील अनिष्ठ प्रथा उदा. अस्पृश्यता, सती आदी बाबींकडे आधुनिक दुष्टीने पाहीले आणि सांगितले की, प्रथा या चुकीच्या आहेत म्हणून त्या बदलल्या पाहिजेत. अर्थात हे बदल सूचवित असताना त्यांच्या सुधारणामध्ये शासक असल्याचा अहंभाव आणि उद्दामपणा अधिक होता. परिणामी भारतातील ब्रिटिश चष्म्यातील आधुनिकतेतून सर्वांगीण स्वरूप लक्षात येत नव्हते, त्यातून प्रतिसाद अणि प्रतिवाद करण्याच्या पार्श्वभूमिवर आधुनिकतेच्या संदर्भात विविध जे प्रवाह निर्माण झाले त्यामध्ये सत्यशोधक चळवळ महत्वाची होती. या परंपरेतूनच काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांचा जन्म झालेला दिसतो.

२० व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच संपूर्ण भारतातील शोषित समुदायांनी त्या व्यवस्थेविरुद्ध बंड करण्यास सुरुवात केली. ज्याचे ते शतकानुशतके बळी ठरले. ईशान्येपासून उत्तर–पश्चिम आणि नंतर दक्षिणेकडे भारताच्या नकाशावर नजर टाकल्यास देशाच्या प्रत्येक भागात विद्रोहाचा सुरु झालेला दिसून येईल. वायव्येपासून सुरू होऊन ईशान्येकडे हा विद्रोह सरकताना आदि–धर्मी, जाटव, कुरेल, आदि–हिंदू, नमो शूद्र अशा चळवळींत रुपांतरीत झालेला दिसतो. दक्षिण भारतात आपल्याला तामिळनाडूतील सतनामी, रामनामी, आदि–आंध्र, आदि–द्रविड यांच्या चळवळी दिसतात. केरळमधील पोलया, थिया, इझावा, पूर्वेकडील किनारपट्टीमधील आदि– कर्नाटक आणि पश्चिम आणि मध्य भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील महारांची चळवळ इ.चा उल्लेख करता येईल.

भारतात १९१९ चा भारत कायदा लागू झाल्यानंतर, संपूर्ण भारतातील उत्पीडीत आणि शोषित वर्ग स्वाभिमानासाठी स्वतःच्या ताकतीच्या आधारावर संघर्ष करताना दिसतो. भारतीय समाजात सुरु असलेल्या उत्पीडीत आणि शोषित घटकांच्या या सर्व लढ्यांमधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील अस्पृश्यांचा लढा मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाला. डॉ. आंबेडकरांनी १९३० आणि १९३१ मध्ये लंडन येथे झालेल्या पहिल्या आणि दुसऱ्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे यशस्वीपणे प्रतिनिधित्व केले आणि अस्पृश्यांना जातीय मतदारसंघ मिळवून दिले. हे उच्च जातीय हिंदूंना सहन झाले नाही म्हणून अस्पृश्यांना दिलेल्या या अधिकारांच्या विरोधात त्यांचे नेते म. गांधीनी उपोषण केले. १९३२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्यांवर पुणे करारासाठी जबरदस्तीने दबाव आणला. पुणे करारात अस्पृश्यांसाठी राजकिय क्षेत्रात राखीव जागा ठेवण्याचे धोरण राबविले गेले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे १९३५ च्या भारत कायद्यात अस्पृश्य जातीसाठी एक सूची निर्माण करण्यात आली , व सर्व अस्पृश्याचा समावेश त्या सूचीमध्ये केला. तेव्हापासून भारतातील अस्पृश्याना कायदेशीररित्या अनुसूचित जाती म्हणून ओळखले जाते

१९३५ भारत कायदा स्वीकारल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी या अनुसूचित जातींची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना देशाच्या सामाजिक व्यवस्थेत सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी गांभीर्याने विचार केला. त्यांनी शिक्षणावर, विशेषतः उच्च शिक्षणावर आणि त्याच्यापेक्षाही जास्त उच्च आणि परदेशी शिक्षणावर अधिक भर दिला. त्या काळात त्यांनी अनुसूचित जातीतील बुद्धिमान व्यक्तींना पाश्चिमात्य देशांतील प्रगत देशांत उच्च शिक्षण घेणे अत्यंत आवश्यक मानले होते. पाश्चिमात्य आणि प्रगत शिक्षण घेण्याबरोबरच भारतातील व्यवस्थेच्या बळींना पाश्चात्य सभ्यता आणि संस्कृतीचा परिचय देण्यासाठी हे परदेशी शिक्षण आवश्यक मानले जात होते. यामागे केवळ असे उच्च आणि परदेशी शिक्षण घेणाऱ्यांची स्थिती सुधारणे नव्हे, तर त्यांना भारतात प्रचलित असलेल्या ब्राह्मणी समाजव्यवस्था आणि संस्कृतीविरुद्ध बंड करण्यासाठी तयार करणे हा होता. याचा परिणाम म्हणून त्याकाळात परदेशी शिक्षित अनुसूचित जाती वर्गाची प्रारंभिक पिढी निर्माण झाली.

१९४२ मध्ये व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्ये सामील झाल्यानंतर त्यांनी अनुसूचित जातींसाठी अनेक फायदे आणि सवलती मिळवल्या. १९४३ मध्ये पहिल्यांदा डॉ. बाबासाहेब

आंबेडकरानी सार्वजनिक नियुक्त्यांमध्ये अनुसूचित जातींसाठी आरक्षण मिळवले. उच्च शिक्षणाला विशेष भर देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९४५ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि १९४६ मध्ये बॉम्बेमध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे पहिले सिद्धार्थ महाविद्यालय सुरू केले.

इंग्रजांनी देश सोडण्याचे ठरविल्यानंतर डॉ. आंबेडकरांना भारताची राज्यघटना तयार करण्याची संधी मिळाली. या राज्यघटनेत त्यांनी S.C., S.T., O.B.C. आणि अल्पसंख्याकासाठी अनेक सामाजिक–राजकीय तरतुदी ठेवल्या. भारतीय राज्यघटनेत कलम कलम १५ व १६ यातील उपकलमे हे या दिशेने केलेले सर्वात उल्लेखनीय प्रयत्न आहेत. या कलमानुसार राज्याला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांच्या किंवा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या प्रगतीसाठी कोणतीही विशेष तरतूद करण्याची परवानगी देते. यामुळे शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीयांसाठी जागांच्या आरक्षणास परवानगी मिळते. कलम १६ व त्यातील उपकलम सरकारला मागासवर्गीयांसाठी सार्वजनिक पदांवरील नियुक्त्यांमध्ये आरक्षण ठेवण्याची परवानगी देते. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचा समावेश आहे. शैक्षणिक क्षेत्रातील या तरतुदींचा परिणाम म्हणून आणि सेवांमध्ये आरक्षणाच्या स्वरूपामुळे भारतातील अत्याचारित जातीमध्ये उच्चभ्रू वर्गाचा उदय झाल्याचे दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी, मागास आणि अल्पसंख्याक समुदायांना त्यांचे हक्क आणि हित जपण्यासाठी भारतीय संविधानातील अनेक तरतुदी केल्याचे दिसते. शिक्षण क्षेत्रातील तरतुदी, सेवांमधील आरक्षण आणि राज्य विधिमंडळात तसेच संसदेतील आरक्षणाचा परिणाम म्हणून समाजातील शोषित आणि शोषित वर्गात मोठ्या प्रमाणात उच्चभ्रूंचा उदय झाला आहे. राज्य विधानमंडळे आणि संसदेतील आरक्षणामुळे या समाजातील तथाकथित राजकीय नेत्यांचा एक वर्ग निर्माण झाला आहे जो जवळपास संपूर्ण भारतात आणि सर्व पक्षांमध्ये दिसतो. सेवांमधील आरक्षणामुळे शिक्षित कर्मचाऱ्यांचा एक मोठा वर्ग आस्थापनाच्या नोकरशाही व्यवस्थेत जवळपास सर्वत्र आढळून आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना या शोषित अभिजात वर्गाकडून शोषित लोकांच्या हिताचे रक्षण आणि प्रगतीची अपेक्षा होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील बहुजन समाजाला जागृत करून राजकीय व्यवस्था परिवर्तनासाठी जी चळवळ सुरू केलेली होती. त्याला व्यापक रूप देण्यासाठी डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया निर्माण करण्याचे ठरविले होते. पण तत्पूर्वी त्यांचे महापरिनिर्वाण झाले, त्यांचे हे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याचे त्यांच्या अनुयायांनी ठरवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात त्यांनी ३ ऑक्टोबर १९५७ ला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) पक्षाची स्थापना केली. त्यानंतर लवकरच या पक्षाने महाराष्ट्रातच नव्हे तर पंजाब, उत्तर प्रदेश, दक्षिण भारतात आपला राजकीय प्रभाव वाढविला. रिपाईने सामान्य जनतेच्या प्रश्नांना हातात घेऊन आंदोलने केली, त्यामुळे १९५७ ते १९६७ या काळात देशातील दुसऱ्या नंबरचा राजकीय पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला होता.

त्या काळात काँग्रेसने रिपब्लिकन पक्षाचा राजकीय धोका ओळखून या पक्षाच्या काही नेत्यांना आपल्या पक्षांमध्ये घेणे काँग्रेसने सुरू केले. त्यामुळे या पक्षाचा प्रभाव कमी व्हायला सुरुवात झाली. रिपब्लिकन पक्ष जातीयतेचा प्रभाव, आर्थिक चणचण, प्रसारमाध्यमांचा नाकर्तेपणा आणि इतर पक्ष पुढाऱ्यांच्या विषारी प्रचारामुळे या देशातील गरीब वर्ग या पक्षाशी आपली नाळ जोडू शकला नाही. त्यामुळे काही दिवसातच या पक्षाची प्रतिमा फक्त मागासवर्गीय जातीचा पक्ष अशी झाली. त्यामुळे या पक्षाला निवडणुकीत फारशी नेत्र दीपक यश मिळू शकले नाही.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना उद्देशून म्हटले होते की, चळवळीचा गाडा जो मी इथवर खेचून आणला आहे. तो जर पुढे घेऊन जाणे जमत नसेल तर त्याला निदान मागे घेऊन जाऊ नका. हा जो इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला होता. रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व त्याच्या विरुद्ध दिशेने पुढे जात होते. संधी साधू नेत्यांनी आपला सवता सुभा सांभाळण्यात धन्यता मांडली. शोषित पीडित लोकांच्या आवश्यकतेच्या विरोधात त्यांचे आचरण होते. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाला फुटतेचे ग्रहण लागले, आणि रिपाई अनेक गटागटामध्ये विभागला गेला. नेतृत्वात विवाद होऊन लागले. परिणामी कोणताही नेता आंबेडकरी चळवळीचे काम प्रभावीपणे करू शकत नव्हता. उलट हे सर्व नेतृत्व प्रस्थापित पक्षांच्या मदतीने आंबेडकरी चळवळ चालवत होते. त्यामुळे आंबेडकरी चळवळीचे फार मोठे नुकसान झाले आंबेडकरी चळवळीचे भवितव्य हे काँग्रेस भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या मेहरबानी वर अवलंबून होते.

अशा परिस्थितीमध्ये बहुजन समाजामध्ये व्यवस्था परिवर्तनासाठी लागणारी जागृती निर्माण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारानुसार क्रांती करण्याचा प्रयत्न काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला. त्यात ते काही अंशी यशस्वी झाले. त्यांनी भारतीय

राजकारणामध्ये वेगवेगळे प्रयोग करून भारतीय राजकारणाला बहुजन राजकारणाकडे वळवले. त्यामुळेच आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर बहुजन चळवळीमध्ये काशीराम व प्रकाश आंबेडकर याचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते.

काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर या दोघांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात बहुजनवादी राजकारण हे भारताच्या राजकारणामध्ये पुढे नेण्याचे महत्त्वाचे काम केल्याचे दिसून येते. या दोघांनी भारतात आणि महाराष्ट्रामध्ये जे बहुजन राजकारण केले, त्यांच्या या बहुजन राजकारणाच्या पार्श्वभूमी व त्यांच्या बहुजन राजकारणाची, त्याचा बहुजन राजकारणावर पडलेला प्रभाव, भारतीय राजकारणावर पडलेला प्रभाव याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रबंधात केलेला आहे. प्रस्तुत शोधप्रबंध हा अभ्यासाच्यादृष्टीने एकूण पाच विभागांमध्ये विभागण्यात आलेला आहे. त्याचा प्रकरणनिहाय सारांश पुढीलप्रमाणे.

पहिल्या प्रकरणामध्ये एकूण संशोधन समस्येबद्दलची भूमिका मांडण्यात आलेली आहे. तसेच शोध प्रबंधाची दिशा स्पष्ट केलेली आहे. या प्रकरणांमध्ये बहुजन समाज संकल्पना, बहुजन राजकारणाचा उदय आणि विकास याबाबतची भूमिका मांडण्यात आलेली आहे. जातीसंस्था हे भारतीय समाज व्यवस्थेचे हे वैशिष्ट्य आहे. आणि या जाती व्यवस्थेचा प्रभाव समाज जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, अशा सर्व क्षेत्रांमध्ये पडल्याचे आपल्याला दिसून येते. प्राचीन काळापासून भारतीय समाजात चातुर्वर्ण व्यवस्था व जातीसंस्था अस्तित्व आहे. पण आजच्या काळात भारतामध्ये फक्त ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ग आहेत आणि भारतातल्या सर्व जाती या दोन वर्गांमध्येच विभागलेल्या आहेत. असल्याचे काही अभ्यासक मानतात, भारतामध्ये जवळपास ६००० पेक्षा जास्त जाती आहेत त्यातल्या काही मुठभर जाती सोडल्या तर संख्येने जास्त असणाऱ्या जाती या राजकीय, आर्थिक व्यवस्थेपासून बाजूला असलेल्या आपल्याला दिसतात त्यामुळे त्यांचा विकास होताना दिसत नाही. धर्माच्या ,रुढीच्या नावाखाली या बहुजन समाजाचे वरिष्ठ आणि प्रभू जातींकडून खूप मोठ्या प्रमाणामध्ये शोषण होत आहे. या वर्गाला समाजामध्ये मानाचे सन्मानाचे स्थान मिळावे, यासाठी प्रत्येक कालखंडामध्ये काही समाजसुधारकांनी, विचारवंतांनी प्रयत्न केलेले आपल्याला दिसतात. या सर्व बाबींचा आढावा प्रस्तुत प्रकरणात आलेला आहे.

भारतातील सामाजिक विषमतावादी व्यवस्था नष्ट व्हावी आणि भारतीय समाजव्यवस्था हि न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यावरती आधारित असावी, यासाठी प्राचीन काळापासून ज्या ज्या विचारवंतांनी समाजसुधारकांनी आजमितीपर्यंत जे प्रयत्न केले आहेत. त्यांचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेतलेला आहे. या प्रार्श्वभूमीवर प्रामुख्याने चार्वाक विचार परंपरा महत्वाची आहे. प्राचीन भारताच्या इतिहासामधील समतावादी व इहवादी तत्त्वज्ञान म्हणजे चार्वाक तत्वज्ञान होय. हे तत्त्वज्ञान सामाजिक अन्याय व शोषणावरती आघात करणारे होते. पारलौकिक जगात जगण्यापेक्षा वास्तव जीवन हे आनंदमय करणे म्हणजेच जीवन अशी यांची विचारधारा होती. म्हणजे मानसाचे आजचे जगणेच मुळात शाश्वत आहे. माणसाच्या मृत्युनंतरच्या जीवनाची शाश्वती नाही. अर्थात ते खरे नाही. त्यामुळे माणसाचे आताचे जीवन सूखी करणे हेच अंतिम सत्य आहे. हे करीत असताना माणसाला माणसाप्रमाणे जगण्यासाठी सामाजिक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. चार्वाक दर्शन हे समतावादी असल्याने त्यांनी चातुर्वर्ण्यव्यवस्थेवरती कडाडून हल्ला केला त्यांचे स्पष्ट मत होते की, सर्व मानवांचे अवयव समान असताना त्यांच्यात उच्च नीचता कशी असू शकते. चार्वाकानी त्या काळातल्या मागासलेल्या जाती जमाती वंचित यांच्या हक्कासाठी संघर्ष केल्याचे आपल्याला दिसते.

प्राचीन भारतातले दुसरे तत्त्वज्ञान म्हणजे बुद्ध तत्त्वज्ञान मुळात बहुजन संकल्पना ही तथागत गौतम बुद्धांनी प्रथमतः मांडली. गौतम बुद्धांनी चातुर्वर्ण्यव्यवस्थेला आणि जातीव्यवस्थेला मोठ्या प्रमाणामध्ये विरोध केला होता. धर्म व्यवस्थेच्या आधारे ब्राह्मण जात वर्ग स्वतःला इतर वर्णापेक्षा श्रेष्ठ मानत होता. इतरांना कनिष्ठ मानून त्यांचे शोषण करत होता, हे शोषण थांबावे बहुजन समाज हा दुःखापासून मुक्त व्हावा, यासाठी त्यांनी आपल्या भिक्खूंना चरक भिक्कवे चारिकम बहुजन हिताय, बहुजन सुखाय अशी शिकवण दिली. त्यांच्या शिकवणीचा अर्थ असा होता की हे भिक्खुनो बहुजन लोकांच्या दुःख मुक्तीसाठी, त्यांच्या सुखासाठी तुम्ही नेहमी चालत राहा, समतावादी विचारांचा प्रसार करत रहा. गौतम बुद्धांनी त्या काळामध्ये असणाऱ्या अनेक राजांना आपल्या धम्माचा उपदेश दिला आणि त्यांना समतावादाकडे जाण्याचा रास्त उपदेश दिला. तथागत गौतम बुध्द यांनी आपल्या शिकवणूकीतून दिलेला धम्मविचार हा जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी उपयुक्त आहे. जगातील प्रश्न हे हिंसेतून नाही तर शांतता आणि अहिंसेनेच सूटू शकतात. माणसाची तृष्णा ही माणसच्या दु:खाचे मुळ कारण आहे. त्यामुळे सर्व

माणूस, प्राणीमात्रांना जगण्याचे पोषक वातावरण असले पाहिजे, मानवी समाजात असणारा उच्च–निच भाव आप–पर भाव नष्ट करून माणसाला समतेच्या तत्वावर निस्वार्थीपणे जगता आले पाहिजे. हे गौतम बुध्द यांच्या तत्वज्ञानाचे मुख्य सूत्र होते. या सर्व घटकाचा परामर्श प्रस्तुत प्रकरणातून घेतलेला आहे.

रयतेचे राजे छ. शिवाजी महाराज हे मध्ययुगीन काळातील बहुजन राजकारणाचे अतिशय उत्तम उदाहरण आहे. भारतामध्ये धर्मनिपेक्षतेच्या तत्त्वाच्या आधारे सर्वधर्मियांचे मिळून स्वराज्य निर्माण करणारे राजे म्हणून छ. शिवाजी महाराज यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी स्वराज्याची स्थापना करत असताना अठरा पगड जाती व जातीव्यवस्थेमध्ये हीन, शूद्र समजल्या गेलेल्या लोकांना सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना केली आणि ते स्वराज्य वाढविले. याचा इतिहास साक्षी असल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या राज्यकारभारामध्ये स्त्रियांच्या, शेतकऱ्यांच्या व बहुजनांच्या हिताची काळजी केलेली दिसून येते. त्यांचा एकूणच सगळा राज्यकारभार हा बहुजन समाजाच्या हिताचा असलेला आपल्याला दिसतो. त्या काळामध्ये बहुसंख्य बहुजन समाजाचा शेती हा व्यवसाय असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांची अनेक राजकीय आज्ञापत्रे पाहिली असता आपल्याला दिसते की, त्यांनी शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये, अशा प्रकारचे त्यांचे आदेश दिले. यावरून छ. शिवाजी महाराजांना बहुजन समाजाची किती कणव होती हे दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांनी बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदारामधल्या मागासलेल्या जातींतील लोकांना गडकरी केले सैन्यामध्ये सहभागी करून घेतले. म्हणजे त्यांना प्रतिनिधित्व देण्याची भूमिका छ. शिवाजी महाराजांनी घेतलेली आपल्याला दिसते. त्यांचे राजकारण बहुजन राजकारणाला कुठेतरी चालना देणारे असल्याचे आपल्याला दिसते.

म. फुले हे आधुनिक काळातील सामाजिक सुधारणा क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचे नाव. म. फुलेंनी बहुजनाची संकल्पना मांडली नसली तरी बहुजन संकल्पनेमध्ये त्यांची शूद्र अति शूद्र आणि स्त्रिया याचा समावेश होतो. धर्म व्यवस्थेच्या आणि जातीव्यवस्थेच्या नावाखाली या शूद्र अति शूद्र आणि स्त्रियांचे जे शोषण केलं जात होते. त्या शोषणाविरुद्ध म. फुलेंनी गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड अशी पुस्तके लिहून त्यामध्ये या वर्गाच्या दारिद्र्याची कारण मीमांसा करून त्यांनी या दारिद्र्यातून बाहेर पडण्यासाठी काय उपाययोजना केल्या पाहिजेत. याचे विवेचन केले आहे. त्यासाठी ते शिक्षण हा एक महत्त्वाचा उपाय आहे हेही ते आवर्जून सांगताना दिसतात.

त्याच बरोबर त्यांनी केलेल्या चळवळी, सत्यशोधक समाजाची निर्मिती हेही घटक भारतातील बहुजन राजकारणाला पाया देताना दिसतात.

छत्रपती शाहू महाराज हे करवीर संस्थांचे छत्रपती होते. पण त्यांनीही जातीव्यवस्थेचे चटके सहन केलेले होते. ते स्वतः छत्रपती असताना सुद्धा त्यांना शूद्र ठरवण्यात आले. त्यांच्या जीवनातील वेदोक्त प्रकरण हे भारतातील राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची घटना असल्याचे दिसते. छ. शाहू महाराज हे कार्तिक महिन्यात पंचगंगा नदीवर स्नानासाठी गेल्यानंतर त्यांचे सगळे विधी हे पुर्णोक्त पद्धतीने करण्यात आले. हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी भारतीय समाज जीवनाचा अत्यंत सखोल असा अभ्यास केला. आणि त्यांच्या लक्षात ही गोष्ट आली की माझ्यासारख्या छत्रपतीला जर ही समाजव्यवस्था हिन लेखत असेल तर प्रजेमध्ये असणाऱ्या दिन दुबळ्या, गरीब, मागासलोकांची अवस्था किती भयानक असेल, की जो संख्येने जास्त आहे. या समाजाचे उद्धार करणे आणि या प्रस्थापित समाज विषमतावादी समाजव्यवस्थेला नष्ट करणे हे त्यांनी नंतरच्या काळामध्ये ध्येय मानले. वेदोक्त प्रकरणानंतर असणारे छ. शाहू महाराज हे वेगळे होते आणि बेदोक्त प्रकरणापूर्वीचे छ.शाहू महाराज हे वेगळे असल्याचे आपल्याला दिसतात. छ. शाहू महाराजांनी जेव्हा मंथन केले तेव्हा त्यांच्या गोष्ट लक्षात आली की इथला जो बहुजन समाज आहे म्हणजे त्यांच्या व्याख्येप्रमाणे ब्राम्हणेत्तर म्हणजे ब्राह्मण, शेणवी सोडून उरलेला सगळा मागासवर्ग. हा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे. त्यामुळे शिक्षित ब्राम्हण समाज हा मोठ्या प्रमाणामध्ये त्याचे शोषण करतो. म्हणून त्यांनी मोठ्या प्रमाणामध्ये ब्राह्मणेत्तर समाजामध्ये शिक्षणप्रसाराची भूमिका घेतली. बहुजन समाजाला शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी हॉस्टेल्स, शिक्षण संस्था, सक्तीचे आणि मोफत शिक्षण या गोष्टी सुरु केलेल्या आपल्याला दिसतात. एवढेच नव्हे तर आपल्या संस्थानांमध्ये ५०% राखीव जागा या ब्राम्हणेत्तराना देऊन ते आरक्षणाचे जनक ठरले, त्यांनी बहुजनवादी राजकारण हे पुढे नेण्याचा प्रयत्न केल्याचे आपल्याला दिसून येते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजन राजकारण व चळवळ जातीवादी नव्हती. तर ती वर्गवादी होती. त्यांचे बहुजन राजकारण हे जात आणि जमातनिष्ठ राजकारणाच्या पुढे जाणारे होते. त्यांनी बहुजन राजकारणामध्ये एक नवा प्रवाह विचार प्रवाह निर्माण केला. जाती–जातींमधील द्वेषाचे राजकारण हे जाती–जातीत संघर्ष निर्माण करणारे आहे. अशी त्यांची भूमिका होती. म्हणूनच राजकारणामध्ये त्यांनी सकारात्मक व समन्वय वादाची कास धरली होती आणि

काँग्रेसच्या बहुजनीकरणाचा त्यांनी आग्रह धरला होता. एवढेच नव्हे तर बहुजनांना सत्तास्थाने प्राप्त व्हावीत. म्हणून बहुजन पक्ष काढून त्यांनी बहुजन कोण हे सुद्धा स्पष्ट केलेले आहे. त्याचबरोबर त्यांनी काही कसोट्याही सांगितलेले आहेत त्या कसोटीच्या आधारे कोणते वर्ग बहुजन समाजात अंतर्भूत होतात आणि कोणते वर्ग कटाक्षाने वगळले पाहिजेत.

प्रस्तुत प्रकरणात पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षाच्या गुलामगिरीतून बहुजन शोषित वंचित आणि बहिष्कृत समाजाच्या मुक्तीसाठी जे चिंतन केले त्यातून त्यांचे बहुजन राजकारण आणि सामाजिक लोकशाहीचे वैचारिक अधिष्ठान निर्माण झाले. त्यांनी म. फुले आणि छ. शाहूंनी आरंभलेल्या बहुजन राजकारण, बहुजन मुक्ती लढ्याला आपली जीवित कार्य बनवलेले होते. त्यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्यभर प्रयत्न केलेले आपल्याला दिसतात. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माचे केलेली चिकित्सा, वर्णव्यवस्थेचे झालेले दुष्परिणाम आणि लोकशाहीमध्ये पददलित शोषित पीडितांना प्रतिनिधित्व मिळण्याची त्यांची भूमिका त्यासाठी त्यांनी ब्रिटीश काळात केलेलं प्रयत्न, स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करून बहुजनांना राजकीय प्रतिनिधित्व देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. याच राजकारणाला व्यापक स्वरूप देण्यासाठी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचा निश्चय होता. स्वतंत्र भारतात बहुजन ही संकल्पना परवलीची संकल्पना बनली यात यशवंतराव चव्हाण यांनी सुद्धा बहुजन राजकारण बेरजेचे केले त्याचाही आढावा या प्रकरणांमध्ये घेण्यात आलेला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणांमधून संपूर्ण शोधप्रबंधाची दिशा स्पष्ट केलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये एकूण संशोधन समस्येबद्दल भूमिका मांडण्यात आलेली आहे. संशोधन समस्येच्या संदर्भात यापूर्वी झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. संशोधन साहित्याचा आढावा घेत असताना प्रस्तुत विषयासंदर्भात उपयुक्त असणारे जे मोजके संदर्भग्रंथ आहेत, तसेच जे अप्रकाशित संदर्भ आहेत यांचा आढावा प्रस्तुत प्रकरणातून घेतला आहे. तसेच प्रस्तुत विषयासंदर्भात जे पूर्वसंशोधन झालेले आहे त्यातील उणीवा काय जाणवल्या यावर प्रकाश टाकलेला आहे. तसेच प्रस्तुत विषयातून कशा उणीवा भरून निघणार आहेत यावर थोडक्यात मांडणी केलेली आहे.

यामध्ये भोळे भा. ल. 'विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण' या ग्रंथामध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांची राजकीय जडणघडण महर्षी शिंदे यांच्या राजकारणाचे सामाजिक संदर्भ

त्यांचा बहुजनवाद आणि समाजवाद अशा विविध विषयाचा परामर्श घेतलेला आहे. बागल माधवराव बहुजन समाजाचे शिल्पकार' या ग्रंथामध्ये प्रकाशित केला. भारतीय राजकारणाची चर्चा करताना असे म्हटले आहे की, भारतीय राजकारण म्हणजे सुशिक्षितांची आणि काही भांडवलदारांची चळवळ. त्यांनी आपल्या ग्रंथातून उच्च सुशिक्षितांच्या मूठभर भांडवलदाच्या हातातील चळवळीमध्ये बहुजन वर्गाचे स्थान शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

डॉ. सुरेश माने यांनी Glimpses of Socio Cultural Revolt in India या ग्रंथात आर्य समाज आणि चार्वाक यांचा उठाव गौतम बुद्ध यांनी उभी केलेली रक्तहिन क्रांती संत कबीर रोहिदास यांची क्रांती, पश्चिम बंगालमधील चांडाळ जाती समुदायाची चळवळ, म. फुले याची क्रांतीवादी विचारसरणी, त्याचबरोबर छ. शाहू महाराज यांच्या कार्याचा आढावा घेवून त्यांनी द्रविड प्रांतातून ब्राम्हण्यवादाला हद्दपार करणारे पेरियार यांचा सखोल आढावा घेतलेला आहे. त्याचबरोबर नारायणा गुरू, कुमार गुरूदेवान यांच्या क्रांतीचाही परामर्श घेतलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय क्रांती उभी राहिली. हे सांगून काशीराम यांना बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार असे म्हटले आहे.

डॉ. रूपचंद गौतम यांनी लिहिलेला 'दलित राजनीती उदभव और विकास' या ग्रंथात दलित राजकारणाची व्याख्या करून दलित राजकारणाचा विकास स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे करित असताना बहुजन समाज पार्टी पूर्व दलित राजकारणाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर बसपाच्या समकालीन दलित राजकारणावही प्रकाश टाकला आहे. काशीराम के दो चेहरे या ग्रंथात काशीराम यांचा जीवन परिचय करून दिलेला आहे. त्याचबरोबर बसपा या राजकीय पक्षाचा उदय आणि विकासाचा आढावा घेतलेला आहे. त्याचबरोबर काशीराम यांचा प्रयोग यशस्वी होईल? असे काही प्रश्न उपस्थित करून काशीराम यांच्या काही निर्णयाची चिकित्सा केलेली दिसते. काशीराम के ऐतिहासिक भाषण या प्रस्तुत ग्रंथात काशीराम यांच्या दुर्मिळ ऐतिहासिक भाषणांचे संकलन केलेले आहे.

सुमंत यशवंत यांनी बहुजनवादी राजकारण' प्रस्तुत लेखात बहुजन राजकारणाचा प्रथम आढावा घेतलेला आहे. संकल्पनेबाबत झालेला गूंता यांचे विश्लेषण केले आहे. विविध लोकांनी आपल्या आपल्या परिमाने अन्वयार्थ लावल्याने या संकल्पनेबाबत गुंता याचे विश्लेषण केले आहे. प्रस्तुत ग्रंथात लेखकाने बामसेफ पूर्व दलित समाजाची सामाजिक आणि राजकीय स्थिती ते

बहुजन समाज पार्टी काशीराम याचा दौरा डॉ. आंबेडकर आणि काशीराम बसपावरील बाह्य दबाव, बहुजन समाजाचे सामाजिक संबंध अशा विविध घटकांवर प्रकाश टाकला आहे.

रूईकर प्रज्ञा (२०१२) ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा अभ्यास' प्रस्तूत अप्रकाशित पी.एचडी. शोधप्रबंधात ॲड. बाळासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक राजकीय क्षेत्रातील प्रवेशाची पार्श्वभूमी महाराष्ट्राच्या आंबेडकरी चळवळीत ॲड. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचे वेगळेपण बहुजन महासंघाच्या प्रयोगाचा महाराष्ट्राच्या निवडणूक राजकारणावरील प्रभाव इत्यादी प्रकरणांमधून ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे.

भास्कर भोजने, अष्टपैलू बाळासाहेब आंबेडकर , राजेंद्र प्रिंटर्स अकोला, आक्टोंबर २००८ प्रस्तुत ग्रंथात लेखकाने ॲड. प्रकाश ऊर्फ बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाचा जडण–घडणीचा त्यांच्यावर पडलेल्या प्रभावाचा आणि त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा आढावा घेतलेला आहे.

कमलेश कुमार, बहुजन समाज पार्टी : विचारधारा, कार्यक्रम आणि नेतृत्व अध्ययन (१९८४ ते २०१२ पर्यंत वाराणसी विभागाच्या विशेष संदर्भासह) काशी हिंदू विश्वविद्यालय वाराणशी पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, प्रस्तुत शोध निबंधामध्ये कमलेश कुमार यांनी बहुजन समाज पार्टीची स्थापना, तिची विचारधारा कार्यक्रम आणि नेतृत्व याचा अतिशय सखोल अभ्यास केला आहे.

वीर बहादूर सिंग, पूर्वांचल विद्यापीठ, जौनपूरचे पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध प्रस्तुत शोध निबंधामध्ये अवनीश कुमार यांनी बहुजन विचारधारेतील ज्योतिबाफुले, पेरियार इ.व्ही. रामासामी नायकर आणि मान्यवर काशीराम यांच्या राजकीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास ऐतिहासिक वर्णनात्मक पद्धतीचा वापर करून अभ्यास केलेला आहे. गजानन गजभिये, भारतीय रिपब्लिकन पक्ष– बहुजन महासंघाची भूमिका व महाराष्ट्रातील राजकारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध प्रस्तुत शोधनिबंधात गजानन गजभिये यांनी भारतीय रिपब्लिकन पक्ष– बहुजन महासंघाची भूमिका व त्यांचा महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव याचा सखोल आढावा घेतलेला आहे.

रमेश इंगोले,भारिप – बहुजन महासंघाच्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास विशेष संदर्भ– अकोला, वाशीम, बुलढाणा जिल्हा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती,

पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध. प्रस्तुत शोध प्रबंधात भारिप – बहुजन महासंघाच्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणातून संशोधन विषयाबाबतीत भेडसावणारी समस्या त्या अनुषंगाने समस्या सुत्रण. आजच्या संदर्भात बहुजन राजकारणाच्या संदर्भात सैध्दांतिक आणि संकल्पनात्मक दृष्टीने अभ्यासाचा अभाव असल्याने या विषयावर संशोधन करण्याची गरज आज बनलेली आहे या पार्श्वभुमिवर प्रस्तुत विषयाचे महत्व या प्रकरणातून स्पष्ट केलेले आहे. त्याचबरोबर जो उद्देशसमोर ठेवून संशोधन केलेले आहे. ती संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधन पद्धती, संशोधन आराखडा, माहिती संकलन पद्धत, अभ्यास क्षत्रे अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा, प्रकरण रचना आदी घटकांची मांडणी करण्यात आलेली आहे. या संशोधनासाठी संशोधकांनी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केला आहे. शिवाय ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचाही उपयोग करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे. याचे विवेचन केले आहे.

प्राथमिक साधनात काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्वतः लिहिलेले ग्रंथ, लेख त्यांचा वैयक्तिक, कौटुंबिक, राजकीय, सामाजिक पत्रव्यवहार, भाषणे हेही तथ्य संकलनाचे प्राथमिक साधन म्हणून उपयोगात आणले आहे. दुय्यम साधनामध्ये काशीराम, प्रकाश आंबेडकर व बहुजन राजकारण यावर आधारीत विविध ग्रंथ, नियतकालिके, शासकीय व अशासकीय अहवाल, शासकीय रेकॉर्ड, वर्तमानपत्रे, शासकीय गॅझेटियर, पाक्षिक, मासिक, वेबसाईट इ. चा अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वरील दोन्ही साधनांचा वापर करून काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण या विषयाचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला आहे. या संशोधन निबंधामध्ये गृहीत धरलेली सर्व गृहीतके सिद्ध झालेली आहेत.

चौथ्या प्रकरणात भारतात काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन राजकारण आणि समाजकारणात दिलेल्या योगदानाचा आणि विचारांचा, तत्त्वज्ञानाचा, त्यांनी बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी केलेल्या सामाजिक, राजकीय चळवळी, त्यासाठी त्यांनी निर्माण केलेल्या सामाजिक आणि राजकीय संघटना, त्याचा भारतीय समाजव्यवस्थेवर व राजकारणावर पडलेला परिणाम, बहुजन राजकारणाला त्यांनी दिलेले नवे आयाम जे राजकीय सहभागापासून, व व्यवस्थेच्या लाभापासून दूर आहेत त्या सर्वांना आत्मसन्मानाचे प्रतिनिधित्व मिळावे,

विषमतावादी व्यवस्था मोडित काढून समताधिष्ठित समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी त्यांनी केलेल्या सामाजिक, राजकीय प्रयत्न यांचा अभ्यास केला आहे. यामध्ये काशीराम यांनी बहुजन समाजामध्ये जागृती करण्यासाठी सामाजिक संघटन म्हणून बामसेफची निर्मिती केली. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण बहुजन समाजामध्ये सामाजिक व राजकीय जागृती करून बहुजनांना राजकीयदृष्ट्या एकत्रित करण्याचे काम केले. बामसेफच्या नंतर त्यांनी डी. एस. फोर. हे राजकीय संघटन निर्माण केले. या राजकीय संघटनाच्या माध्यमातून त्यांनी उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान या ठिकाणी निवडणुका लढवून बहुजन समाजामध्ये झालेल्या राजकीय जागृतीची चाचपणी केली. त्यानंतर बहुजन समाज पक्षाची स्थापना केली आणि संपूर्ण भारतावरती त्यांनी आपल्या राजकारणाचा ठसा उमटवला. भारतीय राजकारणामध्ये त्यांच्या बहुजन राजकारणामुळे बदल झाला. त्याचप्रमाणे बहुजन राजकारणामध्ये सुद्धा बदल झाला. त्याची माहिती या शोधप्रबंधामध्ये या प्रकरणात घेण्यात आलेली आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू त्यांना सुरुवातीपासूनच बहुजन राजकारणाचा वारसा त्यांच्या आजोबांच्याकडून मिळालेला आहे. प्रकाश आंबेडकरांनी ही बहुजन समाजामध्ये जागृती व्हावी त्यांना मताचे मूल्य कळावे यासाठी सातत्याने वेगवेगळ्या आंदोलने व प्रयोग केलेले आहेत. भारिप बहुजन महासंघाची स्थापना, नंतर सामाजिक अभियांत्रिकीचा अकोला पॅटर्न, वंचित बहुजन आघाडी हे राजकीय पक्ष निर्माण करून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावरती मोठा प्रभाव टाकलेला आहे त्याचे तपशीलवार विश्लेषण या प्रकरणांमध्ये करण्यात आलेले आहे.

पाचव्या आणि शेवटच्या प्रकरणात प्रबंधाचा आढावा घेण्यात आला आहे. काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय राजकारण नवीन समतामुलक मूल्यावर नेवून ठेवण्याची उर्मी बहुजन समाजात निर्माण केली. त्यामुळे संपूर्ण भारतीय राजकारण बदलून गेले. बहुजन राजकारणात सुद्धा प्रचंड बदल झाले. त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये आणि त्यांचे राजकीय विचार यांचे निष्कर्ष भारतीय राजकारण व बहुजन राजकारणातून दिसून येतात.

बहुजन राजकारण हे एका जातीपुरते मर्यादित ठेवले नाही, बहुजन समाजामध्ये आजही सामूहिक नेतृत्व ही संकल्पना स्वीकारली जात नाही. बहुजन समाजाला सत्ता परिवर्तनासाठी तयार केले. राजकीय पक्ष हे एका जातीपुरते मर्यादित न ठेवता बहुजनाचे केले. बहुजनामध्ये आपली संख्या कमी असली तरी सत्ता मिळवू शकतो हा विश्वास वाढविला. जाती नष्ट करण्यासाठी

जातीचाच आधार घेतला, मताचे मूल्य बहुजन समाजाला समजावून सांगितले. बहुजन राजकारण म्हणजे मतांची खरेदी विक्री हा कलंक धुऊन काढला. सत्तेपासून वंचित असणाऱ्यांना आमदार, खासदार मंत्री पदे मिळवून दिले, गरीब लोक सुद्धा निवडणूक लढवू शकतात आणि जिंकू शकतात हे त्यांनी दाखवून दिले, सामाजिक आणि राजकीय चळवळी या सामाजिक न्याय आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी होत्या. बहुजन राजकारण हे नैसर्गिक साधन संपत्तीचे व जमिनीचे वाटप समतेने व्हावी, यासाठी आहे. सामाजिक अभियांत्रिकीचा यशस्वी प्रयोग, बहुजन समाजामध्ये असणारा राजकीय न्यूनगंड दूर करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजाला समतेची वागणूक मिळण्यासाठी जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी धर्माचे अधिष्ठान नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला.

तसेच या प्रकरणात एकूण प्रबंधाचा प्रकरणनिहाय आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच गृहितकांची पडताळणी करून त्यांची सिद्धता स्पष्ट केलेली आहे. शिवाय संशोधन कार्यातून आलेल्या निष्कर्षाची मांडणी करून पुढील संशोधनासाठीची दिशाही विशद करण्यात आली आहे.

**निष्कर्ष**

१. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी आपले बहुजन राजकारण हे भारतातल्या शोषित वर्गात म्हणजेच एससी., एसटी., ओबीसी, एनटी, धनगर, वंजारी, माळी, आदिवासी, धार्मिक अल्पसंख्यांकापर्यंत पोहोचविले.

२. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी बहुजनांचे प्रश्न हातामध्ये घेऊन ते सोडवले. त्यामुळे बहुजन समाज राजकीय पातळीवर जाती व्यवहाराच्या चौकटीतून बाहेर पडला.

३. बहुजन समाजातील लोकांनी निर्माण केलेल्या पक्षाला नेतृत्व प्रभावी नसेल तर बहुजन समाजातील लोक त्या पक्षाला स्वीकारत नाहीत. म्हणजे बहुजन समाजामध्ये आजही विचारधारेपेक्षा व्यक्तिमत्त्वावरती आधारित राजकारण होताना दिसते. सामूहिक नेतृत्व ही संकल्पना आजही बहुजन समाजामध्ये स्वीकारली जात नाही.

४. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय समाज व्यवस्थेतील ओबीसी, एससी एनटी, ओबीसी, धनगर, मुस्लिम धार्मिक अल्पसंख्यांक अशा जातीमधील नागरिकांच्यात राजकीय आत्मभान निर्माण करून बहुजन समाजाच्या संकल्पनेखाली सत्ता परिवर्तनासाठी त्यांना तयार केले.

५. काशीराम यांनी बहुजण राजकारणाच्या आधारे उत्तरप्रदेशसारख्या मोठ्या राज्यामध्ये राजकीय पक्ष स्थापन करून सत्ता स्थापन केली तर प्रकाश आंबेडकर यांनी अकोला पॅटर्नद्वारे महाराष्ट्रातील बहुजनांचा सत्तेतील सहभाग वाढविला.

६. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी आपले राजकीय पक्ष हे बौद्धापुरते ते मर्यादित न ठेवता व्यापक दृष्टिकोनातून समाज व्यवस्थेतील सर्व जाती–जमातींना सहभागी करून घेऊन बहुजन राजकारण केले. काशीराम यांनी स्थापन केलेला बसप आणि प्रकाश आंबेडकर यांनी स्थापन केलेली वंचित बहुजन आघाडीतील विविध जातीसमुहांना दिलेले प्रतिनिधित्व हे त्याचे उदाहरण आहे. या दोघांचे राजकारण बहुजनवादी, सर्वसमावेशक प्रागतिक असे आहे.

७. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी एससी, एसटी, ओबीसी आदिवासी धार्मिक अल्पसंख्यांक जातींना आपली संख्या कमी असली तरी एकमेकांना मते देऊन आपण राज्याची सत्ता हस्तगत करू शकतो. हा आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळे लोकशाही मुल्यावरील लोकांचा विश्वास वाढला.

८. प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय समाज व्यवस्थेची मानसिकता ओळखली. भारतामध्ये ज्या महापुरुषांनी समतावादी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांचा उल्लेख करणारा जातीवादी ठरतो. म्हणून त्यांनी या महापुरुषांच्या नावाऐवजी त्यांच्या विचारांचे राजकारण केले. त्यांची विचारधारा बहुजन समाजामध्ये रुजवली. काशीराम यांनी भारतामध्ये जातिव्यवस्थेने निर्माण केलेली विषमतावादी व्यवस्था बदलण्यासाठी जातीचाच वापर केल्याचे दिसून येते. म्हणजे प्रकाश आंबेडकरांनी जात सोडून तर काशीराम आणि जातीचा वापर करून बहुजन समाज निर्मितीचे काम केले.

९. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांना ही जाणीव होती की, कनिष्ट जातीतील लोकांना आपले शोषण होत आहे हे कळत नाही, तोपर्यंत ते शोषणमुक्त होण्यासाठी प्रयत्न करणार नाहीत. त्यामुळे त्यांच्या जातीचे भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्थान काय आहे. याची जाणीव करून दिली. परिणामी सर्व जातींना कळून आले की आपण या व्यवस्थेचे बळी आहोत. या व्यवस्थेमुळे आपली सामाजित, आर्थिक, राजकीय क्षेत्रात प्रगती होत नाही, आपल्याला या क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही. या सर्वातून मुक्त व्हावयाचे असेल

तर आपल्या राजकीय सत्ता प्राप्त केली पाहिजे. त्यासाठी बहुजन समाज म्हणून एकत्र आलो पाहिजे, ही जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण झाली.

१०. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांनी मताचे मूल्य बहुजन समाजाला समजावून सांगितले त्यामुळे प्रस्थापित पक्षापेक्षा आपल्या पक्षाच्या उमेदवाराला मते देण्याकडे बहुजन समाजामध्ये कल निर्माण झाला. परिणामी काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या राजकीय पक्षांच्या मतांच्या टक्केवारीमध्ये वाढ झाली याची दिसते.

११. आजपर्यंत भारताच्या राजकारणात बहुजन समाजाचे राजकारण म्हणजे मत विकत घेणे आणि देणे असे व्यवहाराचे राजकारण असे सूत्र होते पण काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन समाजाला आत्मसन्मानाचे राजकारण करण्याची क्षमता निर्माण केल्याने बहुजन समाज मताची विक्री न करता मत हे अधिकार आहे आणि या अधिकाराद्वारे मी माझे भवितव्य बदलू शकतो, ही भावना बहुजन समाजात निर्माण झाल्याचे दिसते.

१२. सत्तेपासून वंचित असलेल्या बहुजन समाजातील नागरिकांना लोकसभेवर व राज्याच्या विधानसभेवर निवडणुकीला उमेदवारी देऊन राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणले त्यांना मंत्रिपदे देण्यात आली. त्यामुळे घराणेशाहीच्या व प्रभुजातीच्या राजकारणाला काही प्रमाणात आळा बसला. त्यामुळे राजकीय समता निर्माण होण्यास मदत झाली.

१३. भारतात निवडणुका खर्चिक होत्या, त्यामुळे बहुजन समाजातील सर्वसामान्य गरीब लोक निवडणुकीपासून अलिप्त राहत होते. त्यामुळे वरिष्ठ वर्ग निवडणुका लढवताना दिसत होते. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय राजकारणामध्ये ज्याच्याकडे पैसा नाही अशा लोकांना निवडणुकीला उभे करून निवडून आणले. त्यासाठी व्होट दो नोट दो हा सिद्धांत पहिल्यांदा राजकारणात काशीरामांनी आणलेला दिसतो. प्रकाश आंबेडकरांनी सुद्धा याच धरतीवरती महाराष्ट्रामध्ये निवडणुका लढवून गरीब सर्वसामान्य कुटुंबातल्या लोकांना आमदार मंत्रिपदापर्यंत पोहोचविल्याचे दिसून येते.

१४. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांनी ज्या सामाजिक व राजकीय चळवळी केल्या. त्या व्यवस्था परिवर्तनासाठी व राज्यघटनेने जो सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित केला आहे. त्या न्यायाची प्रत्यक्ष भारतीयांच्या जीवनात अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसते. काशीराम व प्रकाश आंबेडकर

यांनी मंडल आयोग, आरक्षण, पे बॅक टू सोसायटी, पीपल्स पार्लमेंट, सायकल रॅली, सांस्कृतिक मेळे, भूमिहीनाचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, ओबीसी वर्गाचे प्रश्न, अशा प्रश्नावर लढत राहून ते लढे यशस्वी केले व सामाजिक, राजकीय, आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

१५. भारतामध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीचे विषम वाटप आहे. यापैकी एक घटक म्हणजे जमीन. उच्चवर्गीय जाती व प्रभू जातीच्याकडे शेकडो एकर जमीन आहे तर याच्या उलट बहुजन समाजातील अनेक लोक भटके, गरीब आहेत कि ज्याना रहाण्यासाठी घर बांधण्यासाठी सुद्धा जमीन नाही. काशीराम व प्रकाश आंबेडकरांनी भारतातील नैसर्गिक व जमिनींचे वाटप न्याय पद्धतीने व्हावे यासाठी प्रयत्न केले. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रातील भूमिहीनांना जमीन मिळाली. तर उत्तरप्रदेशमध्ये बहुजन समाज पक्षाची सत्ता आल्यानंतर तेथील बहुजन समाज पक्षाने जो जमीन सरकारी ही वो जमीन हमारी ही हि घोषणा दिली व त्यावेळी शेकडो एकर जमीन बहुजन समाजामध्ये वाटप केली. नैसर्गिक साधनसंपत्तीचे समान वाटप हा या दोघांच्या राजकारणाचा मुख्य भाग असल्याचे दिसते.

१६. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी भारतामध्ये सामाजिक अभियांत्रिकीचा यशस्वी प्रयोग केल्याचे दिसून येते. जातिवादाच्या शस्त्राने उच्चवर्ग व प्रभू जाती बहुजन समाजाला गुलाम बनवून स्वतःचा फायदा करून घेतात. जातिव्यवस्थेची ही संरचना आणि त्याच्या पाठीमागे असणारे शोषणाचे षडयंत्र ८५% बहुजन समाजाला या दोघांनी दाखवून दिले. व ८५% बहुजन समाजाला एकत्र करण्याचा प्रयत्न केला. उत्तरप्रदेशमध्ये चार वेळेला बहुजन समाज पक्षाची सत्ता आणून व महाराष्ट्रामध्ये अकोला पॅटर्न राबवून बहुजन समाजाला राजकीय सत्तेच्या वर्तुळात नेले. हे फक्त सामाजिक अभियांत्रिकीच्या प्रयोगामुळेच शक्य झाल्याचे दिसून येते.

१७. काशीराम व प्रकाश आंबेडकर या दोघांनी बहुजन समाजामध्ये असणारा राजकीय न्यूनगंड दूर करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. बहुजन समाजामध्ये राजकीय इच्छा शक्तीचा फार मोठा अभाव निर्माण झालेला होता. आपण कधीच सत्ताधारी होऊ शकणार नाही, अशी त्यांची भावना निर्माण झालेली होती. ही भावना दूर करण्याचे काम या दोघांनी केलेल्या कार्यातून आपल्याला दिसून येते. या दोघांनी बहुजन समाजातील मरगळ

दूर केलीच पण त्याबरोबर बहुजन समाजाला राजकारणाच्या केंद्रस्थानी आणून गरीब जरी असलो तरी सत्ताधारी बनू शकतो ही इच्छाशक्ती त्यांच्यामध्ये निर्माण केली.

१८. काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय राजकारणात लोकसंख्येने कमी व जास्त असणाऱ्या जातीना त्यांच्या प्रमाणांत निवडणुकीत प्रतिनिधित्व देवून राजकीय सत्तेत सहभागी होण्याची संधी दिली. काशीरामांनी तर घोषणा केली होती, 'जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागीदारी' हा सिद्धांत भारतीय राजकारणात रूढ केला. त्यामुळे ज्या जातीना लोकसंख्या कमी असलेने कधीच प्रस्थापित पक्षांचे निवडणुकीत तिकीट मिळाले नाही. त्याना संधी मिळाली.

१९. जातीव्यवस्था आणि त्याचा पाठीमागे असणारे धर्माचे अधिष्टान नष्ट करून भारतीय समाजव्यवस्थेत आमुलाग्र परिवर्तन करून समतावादी समाजव्यवस्था निर्माण करणे हे काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या राजकारणाचे मुख्य सूत्र राहिले आहे.

२०. भारतामध्ये बहुजन समाज बनविण्याचे प्रयत्न अनेक वर्षांपासून सुरू आहेत. पण बहुतेक बहुजन समाजातील जातींना आपण बहुजन आहोत हे काही अंशी मान्य नसल्याने बहुजन समाज निर्मितीत अडथळे येताना दिसतात.

२१. भारतात बहुजन समाज निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली की, प्रस्थापित राजकीय पक्ष धर्माच्या मुद्यांच्या आधारे राजकारण करण्यास सुरुवात करतात. कार्ल मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे धर्म ही अफूची गोळी आहे. जो ही अफूची गोळी खातो त्याला बाह्य जगाची जाणीव राहत नाही. याप्रकारे बहुजन समाज धर्माच्या राजकारणाला बळी पडतो. त्यामुळे आपले शोषण होत आहे. याचीही जाणीव त्याला होत नाही. धर्मासाठी तो सर्व काही विसरतो. त्यामुळे बहुजन राजकारण फारसे यशस्वी होताना दिसत नाही.

२२. ॲड. प्रकाश आंबेडकर आणि काशीराम यांचे बहुजन राजकारण व्यवस्थापरिवर्तन करून समताधिष्ठीत समाजनिर्मिती, सामाजिक न्याय, बंधुता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेस भक्कम करणारे आहे. बहुजन समाजाने या दोहोंच्या विचाराने आणि त्यांनी आखून दिलेल्या कार्यकमाच्या आधारे मार्गक्रमण केल्यास बहुजन समाजाच्या हिताचे ठरणार आहे.

२३. म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेच्या आधारे आपण राजकीय सत्तेपर्यंत पोहोचून व्यवस्था परिवर्तन करू शकतो. हा आत्मविश्वास बहुजन समाजामध्ये निर्माण झालेला आहे.

२४. राजकीय सत्ता ही साध्य नसून, व्यवस्था परिवर्तनाचे साधन आहे. हे तत्त्व पायाभूत ठेवून काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन राजकारण केल्याचे दिसते.

**गृहीतकांची पडताळणी :**

१. स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकारणावर बहुजन राजकारणाचा प्रभाव आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात दलित, मागासलेल्या जातीच्या शोषणाविरुद्ध सामाजिक पातळीवर अनेक चळवळी झालेल्या दिसून येतात. त्याचा परिणाम तत्कालीन राजकारणावर झालेला दिसून येतो. मात्र स्वातंत्र्यानंतर भारताच्या राजकारणावर बहुजन राजकारणाचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. स्वातंत्र्यानंतर बहुतेक राज्यात ब्राम्हण मुख्यमंत्री होते. काँग्रेसचे नेतेसुद्धा बहुतेक ब्राह्मणच होते. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोहिया यांच्या मागासलेल्या जातींच्या उत्थानाच्या चळवळी यामुळे कर्पुरी ठाकूर, राम विलास पासवान, लालूप्रसाद यादव, शरद यादव हे दलित व मागास जातीतील लोक भारताच्या राजकारणावर प्रभाव टाकू शकले. याच परंपरेत काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन समाज पक्ष व भारिप–बहुजन महासंघ हे राजकीय पक्ष स्थापन केले. काशीरामांनी व ॲड. प्रकाश आंबेडकरांनी हे ओळखले होते की, राजकारणामध्ये बहुजनवाद यशस्वी व्हायचा असेल तर भारतातील विविध जातींमध्ये सामाजिक जागृती निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी राजकारणामध्ये विविध प्रयोग केले. काशीरामांनी बामसेफची स्थापना करून भारतीय समाज व्यवस्थेतील उच्च कनिष्ठ जातींना प्रबोधित केले. त्यासाठी त्यांनी १५ टक्के उच्चवर्णीय विरुद्ध ८५ टक्के एस. सी., एस. टी., ओबीसी, धार्मिक अल्पसंख्यांक असे सुत्र मांडून त्यांना बहुजन या संकल्पनेखाली एकत्र आणले. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी १३ ते १५ टक्के विरुद्ध ८५ ते ८७ टक्के असा सिद्धांत मांडून महाराष्ट्रातील एस.सी., एस.टी., ओबीसी, धार्मिक अल्पसंख्यांक, मुसलमान यांना बहुजन संकल्पनेखाली एकत्र आणले. काशीरामांनी बहुजन समाजपक्षाची स्थापना करून उत्तरप्रदेशमध्ये ४ वेळा या पक्षाची सत्ता आणली. काशीरामांच्या या

बहुजन राजकारणामुळे भारतात स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय काँग्रेस, बहुजन समाजाच्या मताच्या जोरावर स्पष्ट बहूमताने सरकार स्थापन करून राज्यकारभार करत होती. ती काँग्रेस काशीरामांच्या राजकारणामुळे सातत्याने अल्पमतात आली. त्यामुळे देशामध्ये आघाडी सरकारचा प्रयोग सुरू झाला. हे बहुजन राजकारणाच्या प्रभावाचेच लक्षण आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या भारिप, भारिप बहुजन महासंघ, वंचित बहुजन आघाडी या पक्षाच्या बहुजनवादी राजकारणामुळे महाराष्ट्रात काँग्रेसला सत्तेपासून दूर व्हावे लागत आहे. आज भारतात सर्वच घटक राज्यात अपवाद वगळता सर्व मुख्यमंत्री हे ओबीसी, कनिष्ठ जाती म्हणजे बहुजन समाजातील आहे. हे बहुजन राजकारणाच्या प्रभावामुळेच शक्य झाले आहे. भारतीय राजकारणात एस.सी., एस.टी., कनिष्ठ –उच्च जाती, धार्मिक अल्पसंख्यांक, ओबीसी, निवडणुका हिरीरीने लढवितात. त्याचे कारण या दोघांनी बहुजन समाज म्हणून त्यांच्यामध्ये केलेली जागृती होय. काशीरामांनी नारा दिला होता. 'जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी भागीदारी, तर प्रकाश आंबेडकरांनी संख्येच्या प्रमाणात सत्तेत सहभाग हा आमचा हक्क आहे आणि तो मी मिळविणारच.' हा नारा दिला. या दोघांच्या बहुजनवादी राजकारणामुळे माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोग लागू केला आणि राजकारणामध्ये राखीव जागांची तरतूद करण्यात आली. या राजकारणामुळे काँग्रेस दुबळी झाली व तथाकथित उच्च जातींची राजकारणावरची मक्तेदारी कमी होऊन बहुजन राजकारणाचा प्रभाव भारतीय राजकारणावर निर्माण झाला आहे. आज भारताच्या राजकारणात मोठ्या अभिमानाने घोषणा दिली जाते कि जो बहुजन कि बात करेगा वो दिल्ली पे राज करेगा. त्यामुळे आज भारतातील वरिष्ठ जातींच्या व तथाकथित उच्च जातींच्या पक्षांनाही बहुजन राजकारणाचा आधार घ्यावा लागत आहे, म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनाही मी ओ.बी.सी. आहे हे जाहीर करावे लागले. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन राजकारणाची व्यापक व्याख्या केली. बहुजन समाजातील शोषित, वंचित, अल्पसंख्यांक अशा सर्वच घटकांचा समावेश बहुजन संकल्पनेत केला. ज्या समाजाला संख्येने जास्त असून सुद्धा राजकीय सत्तेत वाटा कमी मिळाला होता. राजकीय सत्तेपासून दूर, सामाजिक दर्जाबाबत बहिष्कृत आणि आर्थिक आणि साधनसंपत्तीच्या वंचितता अशा दुबळ्या लोकांत या दोघांनी आपल्या हक्कांबाबत

जागृती केली. आणि या समाजघटकाला राजकीय विचारपीठ आणि राजकीय पक्षाचा रास्त कार्यक्रम दिला. की, जो म. जोतिबा फुले, छ. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरीत होता. परिणामी बहुजन समाजाला जमेत धरल्याशिवाय प्रस्थापित राजकीय पक्षांना सुध्दा राजकारण करणे अशक्य झाले. अर्थात स्वतंत्र भारतातील सबंध राजकारणावरील बहुजन राजकारणाचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत गेला.

२. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वावर व विचारसरणीवर समताधिष्टीत विचारांचा विशेषता म. फुले, छ. शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीचा प्रभाव आहे. काशीराम पुण्यात वास्तव्यास असताना त्यांच्या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या दिनाभाना नावाच्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यावर झालेल्या अन्यायाच्या प्रसंगातून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची ओळख झाली. यांच्या वाचनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीभेद निर्मूलन हे पुस्तक आले. त्यांनी हे पुस्तक त्या रात्री तीन ते चार वेळा वाचून काढले. तेव्हा त्यांना भारतातील विषमतावादी व्यवस्थेची दाहकता समजली. त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प केला. म्हणून त्यांनी घोषणा दिली. बाबा तेरा मिशन अधुरा काशीराम करेगा पुरा. यानंतर त्यांनी म. फुले, छ. शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पेरियार रामसामी या सर्व महापुरुषांच्या चरित्राचा लेखनाचा अभ्यास केला. तेव्हा त्यांच्या ही गोष्ट लक्षात आली की या सर्व महापुरुषांनी भारतातली विषमतावादी व्यवस्था नष्ट करून समतावादी व्यवस्था निर्माण करून दलित, मागास, शुद्र–अतिशुद्र यांचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये होणारे शोषण थांबवून त्यांना समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळावे. चातुर्वर्ण्य व्यवस्था नष्ट होऊन समताधिष्टीत समाजव्यवस्था निर्माण व्हावी, यासाठी प्रयत्न केले आहेत. हा विचार घेऊनच काशीराम यांनी उत्तरप्रदेशमध्ये म. फुले, छ. शाहू, डॉ. आंबेडकर या महापुरुषांचे फोटो प्रत्येक सभेच्या ठिकाणी ठेऊन, या महापुरुषांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. तिथल्या बहुजन समाजाला राजकीयदृष्ट्या जागृत करून एकत्र आणण्याचे प्रयत्न केले. प्रकाश आंबेडकर हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धगधगत्या चळवळीचा वारसा त्यांच्या पाठीशी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म.

फुलेंना आपले गुरु मानलेले होते. छ. शाहू महाराज हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समकालीन होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना परदेशामध्ये शिकण्यासाठी स्कॉलरशिप अशी दिलेली होती. त्याचप्रमाणे त्यांनी सुरू केलेल्या सामाजिक चळवळीला ही छ. शाहू महाराजांनी पाठिंबा दिलेला होता. कारण छ. शाहू महाराजांनाही समतावादी व्यवस्था निर्माण करावयाची होती. अशाप्रकारे या तिघांचाही काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांच्या विचारावरती फार मोठा प्रभाव आहे. भारताला आधुनिकतेची ओळख झाल्यानंतर भारतातील पहिली पीढी आधुनिक शिक्षण घेवून बाहेर पडली. त्यातील काहींनी अगोदर राजकीय सुधारणांचा आग्रह धरला तर कुणी म्हटले की, सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राजकीय सुधारणा अथवा स्वतंत्रतेला कवडी इतके सुध्दा मूल्य नाही. त्यामुळे अगोदर स्वातंष्य उपभोगण्यासाठी समाज पात्र झाला पाहीजे, भारतातील अनिष्ठ गोष्टीबाबतची निंदा नालस्ती त्याचा प्रतिवाद आणि प्रतिसाद देण्यातून ब्राम्हो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज आणि या सर्वात महत्वाचे म्हणजे सत्यशोधक समाज अशा परंपरेतून तसेच चार्वाक, बौध्द, आणि संत कबीर अशा विविध विचार परंपरातून म. फुले, छ. शाहू महाराज आणि त्यांच्याच समकालिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुरोगामी सामाजिक आणि राजकीय चळवळीचा उदय झालेला होता. ही चळवळ हा नुसता कोरडा कार्यक्रम नव्हता तर वास्तवादी कृतीची रचनात्मक कार्यक्रमाची जोड होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे केवळ आदर्शवादी तत्वज्ञान मुळीच नव्हते. आपले विचार त्यांनी कृतीत उतरविण्यासाठी संपूर्ण आयुष्यभर कष्ठ केले आणि यश मिळाविले. म. फुले, छ. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रभावातून प्रकाश आंबेडकर आणि काशीराम यांना बहुजनवादी राजकीय आणि सामाजिक चळवळ संघटित करावीसी वाटली कारण या विचारात संबंध बहुजन समाजाच्या उध्दाराची कुस होती आणि आहे आणि म्हणून काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांच्या व्यक्तीमत्वावर तसेच विचारसरणीवर फुले, छ. शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचा प्रभाव आहे.

३. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारतीय शासन स्वातंत्र्य समता व बंधुता या तत्त्वावर आधारित आहे. डॉ. आंबेडकरांना न्याय, स्वातंत्र, समता आणि बंधुता

या तत्त्वावरती भारतीय समाजव्यवस्थेला उभे करावयाचे होते. त्यासाठी त्यांनी व्यवस्था परिवर्तनासाठी रिपब्लिकन पक्ष निर्माण करण्याचे ठरविले होते. पण त्यापूर्वीच त्यांचे महापरिनिर्वाण झाले. तथापि त्यांच्या अनुयायांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. पण लवकरच या पक्षात फूट पडली व पक्षाच्या राजकीय प्रभाव संपला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्षाप्रमाणे व्यवस्थेने पिढीत लोकांच्या सहभागाचा व त्यांच्या हिताचा विचार करणारा पक्ष काशीरामांनी बहुजन पक्ष नावाने तर प्रकाश आंबेडकरांनी भारिप बहुजन महासंघ, वंचित बहुजन आघाडी असे पक्ष स्थापन करून न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही भारतीय समाजामध्य प्रस्थापित व्हावीत, यासाठी त्यांनी आंदोलने केली व सत्ता प्राप्त करून आपल्या शासनाचा आधार न्याय स्वातंत्र्य, समता हा ठेवून बहुजन समाजाच्या हिताचा शासन कारभार केल्याचे दिसते. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांच्या वरती गौतम बुद्ध, म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांचा फार मोठा प्रभाव आहे. या सर्व महापुरुषांनी भारतातील चातुर्वर्ण्य व्यवस्था व जातीव्यवस्था की जिला धर्माचा आधार आहे. ती बदलण्यासाठी आपली हयात खर्ची घातल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य समता आणि बंधुता या तत्वासाठी आपल्या सगळ्या चळवळी केल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर भारत बौद्धमय करण्याची घोषणा केली होती. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर या दोघांनी जे भारतीय राजकारण उच्चवर्णीयांच्या विषमतावादी मानसिकतेत अडकले होते, ते स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वावर आधारित बहुजन राजकारणाकडे प्रवाहित केले. काशीराम याबाबत एके ठिकाणी म्हणतात की, माझ्या स्वप्नांचा भारत सम्राट अशोकचा भारत असेल. सम्राट अशोकाच्या काळामध्ये जसा समतावादी शासन होतं त्या पद्धतीचे शासन भारतामध्ये असावं अशी त्यांची भूमिका असलेली आपल्याला दिसते. प्रकाश आंबेडकरांचे राजकारण हे जातीच्या पलीकडचे विकासाचे मुद्दे घेवून असते. सर्व जातीना मग त्या संखेने मोठ्या असू देत किंवा लहान असू देत त्यांना सर्व क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, हि भूमिका त्यांची असल्याचे दिसते. तसेच या दोघांनीही भारतीय राज्यघटना हि आमच्या पक्षाचा जाहीरनामा आहे असे जाहीर केले आहे. कि जी राज्यघटना न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही मुल्यांवर आधारित आहे.

४. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाने स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारणावर प्रभाव निर्माण केला. स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय राजकारणाचा विचार केला असता असे दिसून येते की, १९८८ पर्यंत भारतात एक प्रभावी पक्षपद्धती अस्तित्वात होती. सातत्याने भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची केंद्रात व घटकराज्यात सरकारे असल्याचे चित्र दिसते. पण १९८४ नंतर बहुजन राजकारणाचा प्रभाव भारतीय राजकारणावर वाढल्याचे दिसते. त्यांनी बहुजन समाजाच्या हितासाठी भारतीय राजकारणामध्ये मजबूत सरकार ऐवजी मजबूर सरकारचा सिद्धांत रूढ केला. त्यांचे असे मत होते की, सरकार जर स्थिर असेल तर अशा सरकारमध्ये बहुजन समाजाचे हित साधले जात नाही. त्यासाठी त्यांनी अनेक राजकीय आघाड्या व प्रयोग केले. त्यामुळे १९८४ नंतर भारतातील एक प्रभावी पक्षपद्धती संपूष्टात आली व भारतात आघाडी सरकारचा प्रयोग सुरू झाला. त्यांच्या या सिद्धांतामुळेच कॉंग्रेस पक्षाची भारतीय राजकारणात असणारी एकाधिकारशाही संपली. कॉंग्रेस पक्ष अनेकदा सत्तेपासून बाजूला गेला. बहुजन समाज पक्षाचा प्रभाव उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाणा, मध्यप्रदेश, राजस्थान व काही अंशी महाराष्ट्रात राहिला. उत्तरप्रदेशमध्ये मायावती या चारवेळा मुख्यमंत्री झाल्या. त्यामुळे प्रस्थापित पक्षाना बहुजन समाज पक्षाला विचारात घेवूनच राजकारण करावे लागत आहे. काशीराम हयात असेपर्यंत त्यांनी केंद्रातील सरकार हे आघाडीतील प्रादेशिक पक्षाच्या भावना लक्षात घेऊन त्यांना जबाबदार राहून शासन कारभार करताना दिसत होते. पण त्यांच्या पश्चात पुन्हा एकदा भारतात प्रभावी एक पक्ष पद्धती निर्माण होताना दिसते. भाजपने काशीरामांना राष्ट्रपतीपदाची ऑफर दिलेली होती. तर भारतीय कॉंग्रेस पक्षाने त्यांना उपपंतप्रधानपदाची ऑफर दिली होती. भारतीय राजकारणामध्ये बहुजन राजकारण या शब्दाला आज महत्त्व प्राप्त झालेली आहे त्याचे कारण काशीराम व प्रकाश आंबेडकर यांचे योगदान आहे. प्रकाश आंबेडकर यांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य राहिलेले आहे. महाराष्ट्रात प्रकाश आंबेडकरांनी ओबीसी धनगर बंजारा आदिवासी मागासवर्गीय सर्व जातींना एकत्र करून अकोला पॅटर्न हा तयार केला या पॅटर्नद्वारे त्यांनी दाखवून दिलं की जातीची लोकसंख्या कितीही कमी असली, तरी एक जात दुसऱ्या जातीला मदत करत असेल, एक जात दुसऱ्या जातीला आपली मत ट्रान्सफर करत असेल तर आपण विजय होऊ शकतो, आणि आपण बहुजन सगळे सत्तेत येऊ शकतो, हे दाखवून दिले.

त्याचा परिणाम असा झाला की, १९९५ च्या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातून काँग्रेस ही हद्दपार झाली. २०१८च्या निवडणुकीमध्ये प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वामुळे व बहुजन राजकारणामुळेच काँग्रेस पुन्हा सत्तेपासून दूर राहिलेली आपल्याला दिसते. आज प्रकाश आंबेडकरांच्याबरोबर उद्धव ठाकरेंची शिवसेना राजकीय समझोता करू इच्छित आहे. यावरून महाराष्ट्राच्या राजकारणावरती ॲड. प्रकाश आंबेडकरांचा असणारा प्रभाव हा दिसून येतो. काशीराम व प्रकाश आंबेडकरांनी केलेल्या बहुजन राजकारणामुळे कनिष्ठ जातींना आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव निर्माण झाली. परिणामी प्रत्येक जातीच्या संघटना निर्माण होऊन त्या शासनावरती प्रभाव टाकून आपले हितसंबंध जोपासू लागल्या. प्रस्थापित पक्ष आपले हितसंबंध जोपासू शकत नाहीत. याची जाणीव त्यांना झाली. परिणामी बहुजन समाजाच्या हितसंबंधाची भाषा आज भारतातील सर्वच राजकीय पक्ष बोलत आहेत. हा या दोघांचा भारतीय राजकारणावर असलेल्या प्रभावाचा परिणाम आहे.

५. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाने स्वातंत्र्योत्तर काळात बहुजन राजकारणाला बहुआयामी व स्वयंनिर्भर बनवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्वी भारतात जे बहुजन राजकारण सुरु होते ते प्रस्थापित पक्षांच्या सहकार्याने व मर्जीने चाललेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या राजकारणाला बहुआयामी व स्वयंनिर्भर बनवले. पण त्यांच्या पश्चात बहुजन राजकारण पुन्हा प्रस्थापित पक्षांच्या सहकार्याने सुरु असलेले दिसते. लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान, रिपब्लिकन पक्षाचे रा. सु. गवई, रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे यासारख्या नेत्यांनी बहुजन राजकारण करत असताना प्रस्थापित पक्षाला सहकार्य करत किंवा सहकार्य घेत राजकारण केल्याचे दिसते. त्यामुळे भारताच्या व घटकराज्याच्या राजकारणात सत्तेच्या वर्तुळापर्यंत स्वतःच्या पक्षाला पोहचवता येत नव्हते व स्वतंत्र स्वाभिमानाचे राजकारण करता येत नव्हते. याचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्यापूर्वी ज्या तत्त्वावरती बहुजन राजकारणाचा पाया घातला होता. ते तत्त्व म्हणजे व्यवस्था परिवर्तनासाठी राजकारण हे होते. जो समाज सर्व सत्तांच्या लाभापासून दूर आहे. त्याला सत्तेच्या वर्तुळात आणून व्यवस्था परिवर्तन करणे हा मुलभूत तत्त्वांचा विसर पडल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा वापर करून व्यक्तीगत राजकीय लाभाच्या आशेने त्यांनी राजकारण केले. स्वतंत्र राजकारणाची

मांडणी न करता, प्रस्थापित पक्षांचा एक विभाग म्हणून त्यांनी काम केले. त्यामुळेच त्यांनी केलेल्या राजकारणाचा समुह म्हणून समाजाला लाभ झाला नाही. प्रस्थापित राजकीय पक्ष जेवढे राजकीय लाभ देतील, तेवढ्यावरच त्यांना समाधान मानावे लागत होते. जनता दल किंवा समाजवादी पक्ष हा डाव्या विचारांना मानत असला तरी, मार्क्सवादाप्रमाणे त्यांनी व्यवस्थापरिवर्तनासाठी विशेष प्रयत्न केल्याचे दिसत नाही. पण काशीराम आणि प्रकाश आंबेडकर या दोघांनीही बहुजन राजकारण हे प्रस्थापित राजकीय पक्षांच्या व उच्चवर्गीय पक्षांच्या वर्चस्व खालून बाजूला करून त्याला स्वयंनिर्भर बनवले. बहुजन समाजाच्या राजकारणाला प्रस्थापित प्रवाहापासून स्वतंत्र करून त्याची स्वतंत्र तात्वीक मांडणी केली. बहुजन समाजाला एकत्र करून त्याला सत्तेपर्यंत पोहचविण्याचा कृती कार्यक्रम दिला. त्यासाठी विविध संघटनाद्वारे बहुजन समाजात प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करून बहुजन समाजात आत्मभान व स्वत्वाची जाणीव निर्माण केली. राजकीय पक्ष निर्माण करून बहुजन समाजाला राजकीय पर्याय निर्माण करून दिला. त्यामुळे बहुजन समाजाला निवडणुकीत तिकिटासाठी उच्चवर्णीय पक्षांच्या मेहरबानीवर अवलंबून राहण्याची गरज राहिली नाही. आज भारतीय राजकारणात बहुजन समाज पक्ष हा राष्ट्रीय पक्ष बनला होता. महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यानंतर रिपब्लिकन पक्षाने बहुजन राजकारणाला सुरुवात केली होती. पण नंतरच्या काळात या पक्षात फूट पडली. परिणामी त्याचे अनेक गट निर्माण झाले. हे वेगवेगळे गट वेगवेगळ्या राजकीय पक्षांशी सहकार्य करून एखादी दुसरी आमदारकी किंवा खासदारकी एवढ्यापुरतेच त्यांचे मर्यादित राजकारण राहिले. ज्या व्यापक दृष्टिने रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली होती. तो व्यापक दृष्टिकोन बाजूला गेला. एवढेच नव्हे, तर तो पक्ष एका जातीशी बांधिल राहिला. या पार्श्वभूमीवर ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी रिपब्लिकन पक्षाच्या व्यापक भूमिकेनुसार भारिप बहुजन महासंघ, वंचित बहुजन आघाडी, स्थापन करून बहुजन राजकारणाला सत्तेच्या वर्तुळापर्यंत नेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बहुजन राजकारण म्हणजे प्रकाश आंबेडकर हे समिकरण बनले आहे.

काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांचे बहुजन राजकारण हे समताधिष्ठित समाजनिर्मिती, सामाजिक न्याय, बंधुता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेस भक्कम करणारे आहे.

बहुजन समाजाने या दोहोंच्या विचाराने आणि त्यांनी आखून दिलेल्या कार्यक्रमाच्या आधारे मार्गक्रमण केल्यास बहुजन समाजाच्या हिताचे ठरणार आहे.

**पुढील संशोधनासाठीची दिशा**

भविष्यकाळात संशोधनासाठी दिशा दाखविणे ही प्रत्येक अभ्यासकाची जबाबदारी असते. सदर शोधप्रबंधामध्ये झालेल्या संशोधनाचा आढावा घेतल्यानंतर भविष्यकाळात या विषयाच्या अनुषंगाने कोणत्या क्षेत्रात संशोधन करता येईल, हे सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

१. ॲड. प्रकाश आंबेडकरांचे सद्याचे राजकारण – एक अभ्यास
२. काशीरामांच्या पश्चात बहुजन समाज पक्षाच्या राजकीय वाटचालीचा अभ्यास
३. बहुजन समाज पक्ष – काशीराम ते मायावती – एक अभ्यास
४. रिपब्लिकन पक्ष ते वंचित बहुजन आघाडी – एक राजकीय विश्लेषण
५. लोकसभा, विधानसभा निवडणुकांमधील ॲड. प्रकाश आंबेडकरांची राजकीय वाटचाल
६. ॲड. प्रकाश आंबेडकर आणि अकोला पॅटर्न सामाजिक अभियांत्रिकीचा एक अभ्यास
७. काशीरामांची सामाजिक चळवळीकडून राजकीय चळवळीकडे वाटचाल – एक अभ्यास
८. उपेक्षित समुदायाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सक्षमिकरणात काशीरामांच्या धोरणांची भूमिका– एक अभ्यास
९. महाराष्ट्रातील उपेक्षित समुदायाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमिकरणात प्रकाश आंबेडकरांच्या धोरणांची भूमिका.
१०. विकसित भारताच्या संदर्भात काशीरामांच्या विचारांचे मुल्यमापन – एक अभ्यास.
११. वंचित समुदायाचा विकास व प्रकाश आंबेडकर यांचे विचार

काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास हा शोधप्रबंध पाच प्रकरणांत मांडण्यात आला असून या प्रबंधामध्ये प्राचीन भारतात समतामुलक समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी अनेक विभुतींनी जे प्रयत्न केले. त्याच प्रयत्नांच्या साखळीतील दुवा म्हणून आधुनिक काळातील म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या या विचारानुसार २० व्या शतकाचा शेवट व २१ व्या शतकाच्या सुरुवातीला काशीराम, प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांनी बहुजन राजकारणाच्या माध्यमातून व्यवस्था परिवर्तनाचा यशस्वी प्रयत्न केला. त्याचा आढावा या शोधप्रबंधातून घेतलेला आहे.

# संदर्भ ग्रंथ सूची

**१. संदर्भ ग्रंथ**

१. अकेला के आर. : काशीराम के ऐतिहासिक भाषण, १९८२–१९८४ संकलन, आनंद साहित्य सदन अलीगढ, २०१३

२. अकेला के. आर. (संपा.) : 'काशीराम के साक्षात्कार' साहित्य सदन प्रकाशन, २०१५

३. ऑमवेट गेल : 'वसाहातिक सामाजिक, सांस्कृतिक बंड', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५,

४. आंबेडकर बाळासाहेब : बहुजन चळवळ विचारसरणी आणि पक्ष, हडको, औरंगाबाद, १९९६

५. आंबेडकर बाळासाहेब : ओबीसींचे राजकारण, प्रबुद्ध भारत प्रकाशन, हडको, औरंगाबाद, १९९६

६. आंबेडकर बी.आर. : 'भारतातील जाती' १९१६

7. Ambedkar Anhilation of Cast Govt. of Maharashtra Mumbai 2013,

8. Ambedkar B. R. Anhilation of Cast Govt. of Maharashtra Mumbai 2013

9. Arnest Barkar, Principle of Social and Political Theory, Oxford University Press, 1976

१०. काशीराम भाषणे, मोतीझील कानपूर, दि. २८/१०/१९८४

११. काशीराम : 'चमचा युग : मोजेज मायकेल' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००८

१२. कीर धनंजय : 'राजर्षी शाहू छत्रपती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, २००५

१३. किर्ती विमल : बहुजन समाज के प्रणेता मान्यवर काशीराम, वाणी प्रकाशन, नई दिल्ली, २०११

१४. कुमदाळे सतिश : 'पॅटर्न शिवरायांचा', आदित्य प्रकाशन, लातूर, २०१५

15. खरात शंकरराव : 'सामाजिक चळवळीचा इतिहास', इंद्रायनी साहित्य प्रकाशन, पुणे, २००६

१६. छ. शाहू महाराज यांची भाषणे, पान नं. ४, ५, ९, १०.

१७. गायकवाड प्रशांत : 'बुद्ध चरित्र आणि तत्त्वज्ञान', लोकायत प्रकाशन, सातारा, २०१५

१८. गायकवाड अशोक (संकलक) : आंबेडकर बाळासाहेब, बहुजन चळवळ, विचारसरणी आणि पक्ष संघटना, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००३

१९. गाडे गंगाधर : क्रांतिसूर्य जयंती विशेषांक, १९८५

२०. गुरव बाबुराव : व्यवस्था परिवर्तनाचा नवा आवाज काशीराम, मूल्य विवेक प्रकाशन, मुंबई, १९९४

२१. गौतम : एस. बसपा के कालिन दलित राजनीती', गौतम बुक सेंटर, नई दिल्ली, २००६

२२. गौतम रूपचंद : 'दलित राजनीती उद्‌भव और विकास' प्रस्तुत ग्रंथ नटराज प्रकाशन २०१२

२३. घोरमोडे, के. यू. आणि घोरमोडे : कला, शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, विद्या प्रकाशन, रूईकर रोड, नागपूर, २००८

24. Gupt Nandini , Caste Deprivation Politics , 1993 .

२५. जगदेव सिध्दार्थ, आंबेडकरांचे खरे शत्रू कोन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, काळामारुती चौक, एवले, जि. नाशिक, १९९९

२६. जाहिरनामा : भारतीय रिपब्लिकन पक्ष १९८५

२७. जाधव, सुशिला : 'भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री' कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००६

२८. जितेंद्रकुमार गौरव, युगप्रवर्तक, काशीराम की देन, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००८

29. Jeliet Alinar , From Untouchables Dalit Essays on Ambedkar Movement, Manohar Publictaion, New Delhi. 1999

३०. जंजाळ प्रकाश : 'बीएसपी भ्रम आणि वास्तव', कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, २००५

31. Joya , Quest for Power : -ppogitional Movement Post Congress Politics in U. P. Hasan,

३२. चव्हाण रा. ना., राजर्षी शाहू महाराज, रमेश चव्हाण प्रकाशन, १९९५

३३. चव्हाण रा. ना.: 'दलित चळवळीचे प्रणेते डॉ. आंबेडकर' प्रस्तुत लेख सौ. चव्हाण यांनी सातारा, १९९५

३४. चव्हाण रा. ना.: बहुजन समाजाच्या शिक्षणाचा व उन्नतीचा प्रश्न , लेख साप्ताहिक राष्ट्रवीर, बेळगांव, १९४९

३५. चव्हाण, रा. ना.: ‘फुले, आंबेडकर आणि बहुजन समाज’ प्रस्तुत लेख सौ. चव्हाण यांनी रा. ना. चव्हाण यांच्या पश्चात सातारा, १९९५

३६. बागल माधवराव : ‘बहुजन समाजाचे शिल्पकार’ प्रस्तुत ग्रंथ ठोकळ प्रकाशन पुणे, १९६६

३७. बोस अजय : ‘बहनजी’ अनु. कौलपूनम, वाणी प्रकाशन, दिल्ली, २००८

३८. बेहरे सुमन : सामाजिक संशोधन पद्धती, विद्या प्रकाशन, नागपूर, २००४

३९. भवार, एस. डी. : बामसेफच्या आंबेडकरद्रोही भूमिकेची छाननी, सुगावा प्रकाशन, पुणे २००६

४०. भारती कॅबल : ‘काशिराम के दो चेहरे’ प्रस्तुत ग्रंथ अमन प्रकाशन कानपूर, २०१२

४१. भास्कर भोळे, किशोर बेडकिहाळ (संपादक) : शतकानंतरच्या वळणावर, आंबेडकर अकादमी, सातारा, २००६

४२. भास्कर भोजने : ‘अष्टपैलू बाळासाहेब आंबेडकर’, राजेंद्र प्रिंटर्स अकोला, आक्टोंबर २००८

४३. भोले भा. ल. : ‘आधुनिक भारतातील राजकीय विचार’ पिंपळापुरे बुक्स् डिस्ट्रीब्युटर्स अ‍ॅण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, २००३

४४. भोसले एस. एस. : ‘परिवर्तनाची क्षितिजे – रा. ना. चव्हाण यांचे निवडक लेख’, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ मुंबई, १९९९

४५. भोळे भा.ल.: ‘विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण’ ग्रंथ लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०

46. Barkar, Arnest : Principle of Social and Political Theory; Oxford University, Press, 1976

४७. भिंताडे वि. रा. : शैक्षणिक संशोधन पद्धती, नूतन प्रकाशन, पुणे, १९९९

४८. डांगळे अर्जुन : आंबेडकरी चळवळीचे अंतरंग, लोकवाङ्मय ग्रंथ प्रकाशन, मुंबई, २००१

४९. ढोबळे विष्णू : ‘दखल’ आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९९१

५०. थोरात सी. पी. : ‘काशीराम मनुवादापुढे आव्हान’ शिव प्रकाशन, पुणे २००५

५१. दळवी म. य. : नामांत्तर, धर्मांतर आणि राष्ट्रांतर, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९८३

५२. दाभोळे ज. रा., हमाणे आ. : 'आंबेडकरवादी चळवळ दिशा व अपेक्षा' प्रस्तुत ग्रंथ हा ॲड. पंडीतराव सडोलीकर गौरव ग्रंथ समिती, कोल्हापूर, २००६

५३. देशपांडे प्रकाश : संशोधन पद्धती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक १९९४

५४. देशपांडे राजेश्वरी : 'वंचितांच्या चळवळींचे यशापयश: एक मूल्यमापन' प्रस्तुत लेख किशोर बेडकिहाळ संपादीत शतकोत्तरांच्या वळणावर या ग्रंथामधून आंबेडकर अकादमी सातारा, २००६

५५. दुसाद, एच. एल. : 'सामाजिक परिवर्तन और बी. एस. पी'. सम्यक प्रकाशन दिल्ली, २००३

५६. धनंजय कीर, : 'माळसे स. ग.', फडके य. दि., महात्मा फुले समग्र वाङ्मय, सहावी आवृत्ती, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६

५७. धोंडे, भगवान एस. : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन नेतृत्व, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००५

५८. नरके हरी, (संपादक) : महात्मा फुले साहित्य आणि चळवळी, महाराष्ट्र शासन, २००६.

५९. निकुंबे सी. एच. : 'दलितांच्या राजकारणाची दिशा' सुगावा प्रकाशन, पुणे, २००४

६०. नैमिशराय मोहनदास : 'बहुजन समाज' निलकंठ प्रकाशन, नवी दिल्ली, २००९

६१. पवार मखाराम : बहुजन महासंघ कशासाठी कोणासाठी?, बहुजन प्रकाशन, मुंबई, प्र. आ., २९ एप्रिल १९९३

६२. पवार एस. डी. : 'राजर्षी छ. शाहू महाराज : विचार आणि कार्य', सह्याद्री प्रकाशन, पुणे, २०१२

६३. पवार गो. मा. (संपा.) : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००९

६४. पवार गो. मा. : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे जीवन व कार्य' लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, २००४

६५. पवार ज. वि. : रिपब्लिक ऐक्याची शोकांतिका, संजना पब्लिकेशन, मुंबई, १९९४

६६. पवार जयसिंगराव : 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी प्रकाशन, कोल्हापूर, २००१

६७. पळशीकर सुहास : 'भारताच्या राजकारणाचा ताळेबंद', मराठी वाचन साहित्य मालिका क्र. १ राज्यशास्त्र व लोकप्रशासन प्रगत अध्यायन केंद्र, पुणे विद्यापीठ पुणे, २००१

६८. पळशीकर सुहास : समकालीन भारतीय राजकारण, काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद, अकेला, ए. आर. (संपा.), काशीराम के. साक्षात्कार, मानव पब्लिकेशन, बी ७ , सरस्वती कॉम्प्लेक्स, दिल्ली, २००४

६९. पाटील बी. बी. : 'राज्यशास्त्र परिचय', फडके प्रकाशन, २०१९

७०. पाटणकर : आंबेडकर चळवळ इतिहास आणि पुढील काळ, २०१६

७१. पानसरे गोविंद : 'परिवर्तनाच्या दिशा', लोकवाङ्गृह मुंबई, २००६

७२. प्रज्ञावंत गौतम : 'काशीराम आणि बहुजनांची सत्ता', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९

७३. प्रज्ञावंत गौतम : 'काशीराम आणि सामाजिक परिवर्तनाचा लढा' प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर २००९

७४. प्रज्ञावंत गौतम : 'काशीराम आणि व्यवस्था परिवर्तनाचे साधन', प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर, २०११

७५. प्रज्ञावंत गौतम : 'काशीराम आणि बहुजनांचे प्रशिक्षण', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००९

७६. Election Commission of India Maharashtra state election,1990 , Maharashtra State Election Legislative Assembly

७७. फुले महात्मा : 'ब्राह्मणाचे कसब' १८६९

७८. फुले महात्मा : 'सार्वजनिक सत्यधर्म १८८९

७९. फुले महात्मा : गुलामगिरी, १८७३

८०. General Election 2019- Election Commision of India" results.eci.gov.in. 2019-05-28

८१. General Election India ,1989, Vote polled in states by parties, Election Commission of India

८२. General Election Legislative -ssembly of Maharashtra 1995- Chief Electoral office, Maharashtra Mantralaya Mumbai.

८३. General Election of India. , 1998- Votes Polled in States By Parties Election Commission of India

84. Ghansham Shaha, 2002: Dalit identify Politics, Seg Publication, Delhi. 2004

८५. M. S. Gore Non Brahmin Movement in Maharashtra 2014

८६. महाराष्ट्र : निवडणूक आणि निकाल– १९६२ ते१९९९– राज्यसभा, लोकसभा, विधान परिषद आणि विधानसभा, बाबूकाका प्रकाशन, नेरुळ, मुंबई. जुलै २०००

८७. मनीकुमार : आंबेडकर मुव्हमेंट के सजग प्रहरी काशीराम, सुकिर्ती प्रकाशन, नई दिल्ली,

८८. मेश्राम योगराज रामदास : 'बहुजन नायक काशीराम की ललकार', सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०१२

८९. मुळे, रा. शं. आणि उमाठे, वि. तु. : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे.नागपूर : विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, १९९८

९०. मूंगडकर मा. प. : शिंदे लेखसंग्रह, ठोकळ प्रकाशन पुणे, १९६३

९१. २००८

92. Mane Suresh : Glimpses of Socio Cultural Revolt in India Samruddha Bharat, New Delhi, 2012

९३. योगराज रामदास : 'मेश्राम बहुजन नायक काशीराम की ललकार' संम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २०१२

९४. रामचंद्र : ' हमारे मध्य मान्यवर काशीराम' सम्यक प्रकाशन नई दिल्ली, २०११

९५. राऊत बापू : 'बहुजन नायक काशीराम' ओ.बी.सी. सेवासंघ प्रकाशन, मुंबई, २००९

९६. S Goutam, -nil Kumar, Tribute to Bahujan Nayak Manyawar Kanshiram, Goutam Book center, Delhi 2012

९७. लोकसभा सांख्यिकीय अहवाल, १९८४

९८. वर्मा, आर. पी. : बहुजन नायक मा. काशीराम, कांती पब्लिकेशन, दिल्ली, २०११

९९. वाहूळ एम. ए. :‘नामांत्तर आणि मी’ नामांत्तर शहीद गौरव ग्रंथ, प्रकाशन भदन्त अश्वजित, २०००

१००. वानखेडे अनंत : ‘नामांतर आणि विद्यार्थी चळवळ’ नामांतर शहिद गौरव ग्रंथ प्रकाशन, शालीमार, औरंगाबाद, २००९

१०१. व्होरा राजेंद्र (संपा. लेख) : ‘भारतीय राजकारणातील बहुजनवादाचा पाडाव’ आणि सुहास पळशीकर (संपा. लेख) : ‘भारतीय लोकशाही’, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९

102. Vivekkumar , Dalit Leadership in India , Kalpaj Publication , New Delhi ,2002

१०३. Why is Bahujan Samaj Dependent in Independent India - Kanshiram .

१०४. शिरवाडकर कुमार : ‘जातीसंस्थेचे बदलते स्वरूप’ प्रस्तुत लेख किशोर बेडकिहाळ संपादीत शतकोत्तरांच्या वळणावर या ग्रंथामधून आंबेडकर अकादमी सातारा, २००६

१०५. शिंदे वि. रा. : माझ्या आठवणी व अनुभव भाग १, २, ३ लेखन वाचन भांडार पुणे, १९५८

१०६. Sanjay kumar shyam, sahib Kanshiram - Socio-Political Giant, samyak prakashan, New Delhi, 2012

१०७. सरवदे भिमराव : ‘पेरियार रामसामी नायर’, समता प्रकाशन, नागपूर, २००३

१०८. सांगलीकर झेड. यु. : ‘रिपब्लिकन की बसपा’, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर, २०१२

१०९. साळवे मधुकर : ‘रिपब्लिकन पक्षाचा प्रवास आणि नेत्यांना पर्याय’, सुगावा प्रकाशन, वर्ष ३६, अंक ४ था, २००६

११०. साळुंखे आ. ह. : ‘सर्वोत्तम भूमिपुत्र गोतम बुद्ध’, लोकायत प्रकाशन, सातारा, पृ. ३२७

१११. सोहनी, शं.कृ. : शैक्षणिक टीपाकोश, हिंदुस्थान प्रकाशन, पुणे १९९३.

११२. सतनाम सिंह : ‘बहुजन नायक काशीराम’, सम्यक प्रकाशन नई दिल्ली, २००५

११३. सतनाम सिंह : बहुजन मसिहा काशीराम के राजनितिक भाषण, खंड १, सम्यक प्रकाशन, २०१२

११४. सुमंत यशवंत (संपा.) : ‘बहुजनवादी राजकारण’ प्रस्तुत लेख किशोर बेडकिहाळ शतकोत्तरांच्या वळणावर या ग्रंथामधून आंबेडकर अकादमी सातारा, २००६

११५. सुमंत यशवंत : विचारसरणीच्या विश्वात, युनिक अ‍ॅकॅडमी पब्लिकेशन्स, पूणे. २०१८

११६. सुखदेव : काशीरामजी का बहुजनवाद, सोमाना, नागपूर, ९ ऑक्टोंबर २०१०

११७. सुखदेवे के. ना. : 'आंबेडकरी चळवळीची दिशा काय?' सोनामा प्रकाशन, नागपूर–२७, २००७

११८. क्षीरसागर रा. का. : भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २००६

११९. ज्ञानेश्वर धावरे : सम्राट अशोकाचा राजधर्म, सुगावा प्रकाशन, पुणे, २००२.

**२. दैनिक**

१४. दैनिक लोकमत, सोमवार, २५ मे २००९

१५. दैनिक जनतेचा महानायक स्मृतिदिन, विशेषांक ९ ऑक्टोंबर २००७, मुंबई आवृत्ती

१६. दैनिक, नवभारत टाईम्स, १/७/१९९०

१७. दैनिक, नवभारत टाईम्स, २४ मार्च २००५

१८. जैन, संपादकीय लेख, नवभारत टाईम्स्, २००१

१९. राष्ट्रीय विश्वास, ३१ डिसेंबर १९९३

**३. मासिके**

१४. गवस राजन : 'बहुजनांच्या वाङ्मयीन संस्कृतीचा नायक : कॉ. अण्णाभाऊ साठे'मासिक, उद्याचा माणूस, वर्ष दुसरे, अंक सातवा व आठवा, २०१०

१५. जगझाप हर्ष : आंबेडकरवाद आणि बहुजनवाद, लेख समाज प्रबोधन पत्रिका. १९९५

१६. सकट अजय (संपा.) : मासिक : 'परिवर्तनाची लढाई', वर्ष तिसरे, अंक २० वा जयंती विशेषांक, २०१२

**४. पाक्षिके**

४. आंबेडकर प्रकाश : दलित बहुजनांनो नवे आर्थिक धोरण उखडून टाका, मुलाखत संकलन के. डी. दि. ०९ मार्च बहुजन महासंघ पथदर्शक पुस्तीका.

४. आंबेडकर बाळासाहेब : एन्रॉनविरोधी पुरावे, प्रबुद्ध भारत पांक्षिक वर्ष ९ अंक २, १६ ते ३१ जानेवारी, २००१

२. आंबेडकर बाबासाहेब, जनता विशेषांक, १९३३.

३. आंबेडकर बाळासाहेब : प्रबुध्द भारत पाक्षिक, १९८८

६. पाक्षिक, प्रबुध्द भारत १ ते १५ सप्टेंबर १९९५

५. पाक्षिक, बहुजन संघटक : २५ सप्टेंबर, १ ऑक्टोंबर २०००

१. प्रबुद्ध भारत : पाक्षिक, वर्ष ७ वे, अंक १५, १५ ऑगस्ट, १९९९

**५. अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध**

१. ओझा प्रभातकुमार : भारतीय राजनिती मे जाती आधारित राजनीतिक दलो का अस्तित्व और संभावनाए बहुजन समाज पार्टी के विशेष संदर्भ मे वीर बहादूर सिंह पूर्वांचल विश्वविद्यालय, जौनपुर , पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २००४

२. इंगोले रमेश : भारिप– बहुजन महासंघाच्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास विशेष संदर्भ. अकोला, वाशीम, बुलढाणा जिल्हा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध. २०१३

3. JI - Eun Lee, Dalit Movement in India : Centre, States and The lternatives, 1947-2000, Centre For Historical Studies School of Social Science Jawaharlal Neharu University, New Delhi, 2010

४. कुमार कमलेश : बहुजन समाज पार्टी : विचारधारा, कार्यक्रम आणि नेतृत्व का अध्ययन (१९८४ ते २०१२ पर्यंत वाराणसी विभागाच्या विशेष संदर्भासह) काशी हिंदू विश्वविद्यालय वाराणशी पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१९

५. कुमार अवनिश : बहुजन विचारधारेतील जोतिबा फुले, पेरियार इ. व्ही. रामासामी नायकर आणि मान्यवर काशीराम यांच्या राजकीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास. वीर बहादूर सिंग, पूर्वांचल विद्यापीठ, जौनपूरचे पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.२०२३

६. रूईकर प्रज्ञा, 'ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा अभ्यास', डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, राज्यशास्त्र पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध, २०१२

७. सिकंदर दुलगच : भारतीय राजनितीमे दलित चेतना के उन्नयन में बहुजन समाज पार्टी की भूमिका, डॉ. हरीसिंह गौर केंद्रीय विश्वविद्यालय सागर, मध्य प्रदेश, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१३

८. विवेकी रमेश : आंबेडकरी चळवळीतील काशीराम ह्यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, २०१०

**७. वेबसाईट**

१. कोण्णूर, तुषार कुलकर्णी आणि मयुरेश (2019-03-15) ''लढाई जातीअंतासाठी आहे तर उमेदवारांच्या नावासमोर जात कशासाठी?'' 2019-03-15

२. टिल्लू रोहन (2019-03-10) ''लोकसभा निवडणूक २०१९: महाराष्ट्राचं राजकीय चित्र कसं आहे?'' (इंग्रजी भाषेत) 2019-03-12.

3. Loksatta 2019-03-15.''प्रकाश आंबेडकरांचे शनिवारी मुंबईत शक्तिप्रदर्शन''

4. Loksatta.com चंद्रशेखर बोबडे, शिंदे–कवाडे युतीचा राजकीय लाभ कोणाला, ५ जानेवारी २०२३

5. Maha Election: ८७% मुस्लिम काँग्रेसमागे: आघाडी तुटल्याचा 'एमआयएम' ला फटका?'' Divya Marathi.

6. Maharashtra Legislative -ssembly - Election Commission of India State Election 1985

७. लोकमत : वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्रात बदलाचे वारे ०३/१२/२०१९

८. शेख दिशा : वंचित बहुजन आघाडीत तृतीय पंथीयांना स्थान, Lokmat. 2019-03

9. ABP Majha 2019-05-03

10. dainkprabhat.com. वंचित बहुजन आघाडी ही पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या मैदानात.

11. India Votes PC: Party performance over elections-Bharipa Bahujan Mahasangh” India Votes Archived from the original on 2019-04-21. 2019-05-25.

12. Khushbu ''महाराष्ट्र में BJP- शिवसेना के लिए कितनी गंभीर है अंबेडकर–ओवैसी की चुनौती?'' India TV Hindi (hindi भाषेत) 2019-05-03

13. Lokmat.com महाराष्ट्र निवडणूक २०१९ वंचित एमआयएमने पाडल्या आघाडीच्या एवढ्या जागा. युतीला बहुमत मिळाले नसते. २५ ऑक्टोंबर २०१९

14. News 18 Lokmat 2019-03-15.''शिवाजी पार्कवर प्रकाश आंबेडकरांची सभा उमेदवारांची घोषणा करणार?''

15. om.marathi.abplive.com. शिवसेना वंचित बहुजन आघाडीचे एकत्रित आंदोलन कोल्हापूरात.

16. The Quint Hindi (इंग्रजी भाषेत) 2019-03-12.''महाराष्ट्र: प्रकाश आम्बेडकर और ओवैसी का गठबंधन, कांग्रेस का नुकसान?''

17. Vanchit bahujan aaghadi: तृतीय पंथी दिशा वंचित बहुजन आघाडीच्या प्रवक्ते पदी Maharashtra Times 2019-03-12 रोजी.

18. www.bbc.com बंगाळे श्रीकांत (२७ ऑक्टोंबर २०१९), वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीत काय केले.

19. www.timesnowmarathi.com.

# ''काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र
विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी
सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

**श्री. प्रभुदास आनंदराव खाबडे**

पी.आर.एन : ०२११५००८३३४

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. माणिकराव सोनावणे**
समन्वयक, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


**राज्यशास्त्र विभाग**

**मे, २०२४**

# 80_Recommendation

**शिफारशी**

या संशोधनाला शिफारशी लागू होत नाहीत.

**निष्कर्ष**

१. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी आपले बहुजन राजकारण हे भारतातल्या शोषित वर्गात म्हणजेच एससी., एसटी., ओबीसी, एनटी, धनगर, वंजारी, माळी, आदिवासी, धार्मिक अल्पसंख्यांकापर्यंत पोहोचविले.

२. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी बहुजनांचे प्रश्न हातामध्ये घेऊन ते सोडवले. त्यामुळे बहुजन समाज राजकीय पातळीवर जाती व्यवहाराच्या चौकटीतून बाहेर पडला.

३. बहुजन समाजातील लोकांनी निर्माण केलेल्या पक्षाला नेतृत्व प्रभावी नसेल तर बहुजन समाजातील लोक त्या पक्षाला स्वीकारत नाहीत. म्हणजे बहुजन समाजामध्ये आजही विचारधारेपेक्षा व्यक्तिमत्त्वावरती आधारित राजकारण होताना दिसते. सामूहिक नेतृत्व ही संकल्पना आजही बहुजन समाजामध्ये स्वीकारली जात नाही.

४. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय समाज व्यवस्थेतील ओबीसी, एससी एनटी, ओबीसी, धनगर, मुस्लिम धार्मिक अल्पसंख्यांक अशा जातीमधील नागरिकांच्यात राजकीय आत्मभान निर्माण करून बहुजन समाजाच्या संकल्पनेखाली सत्ता परिवर्तनासाठी त्यांना तयार केले.

५. काशीराम यांनी बहुजण राजकारणाच्या आधारे उत्तरप्रदेशसारख्या मोठ्या राज्यामध्ये राजकीय पक्ष स्थापन करून सत्ता स्थापन केली तर प्रकाश आंबेडकर यांनी अकोला पॅटर्नद्वारे महाराष्ट्रातील बहुजनांचा सत्तेतील सहभाग वाढविला.

६. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी आपले राजकीय पक्ष हे बौद्धापुरते ते मर्यादित न ठेवता व्यापक दृष्टिकोनातून समाज व्यवस्थेतील सर्व जाती–जमातींना सहभागी करून घेऊन बहुजन राजकारण केले. काशीराम यांनी स्थापन केलेला बसप आणि प्रकाश आंबेडकर यांनी स्थापन केलेली वंचित बहुजन आघाडीतील विविध जातीसमुहांना दिलेले प्रतिनिधित्व हे त्याचे उदाहरण आहे. या दोघांचे राजकारण बहुजनवादी, सर्वसमावेशक प्रागतिक असे आहे.

७. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी एससी, एसटी, ओबीसी आदिवासी धार्मिक अल्पसंख्यांक जातींना आपली संख्या कमी असली तरी एकमेकांना मते देऊन आपण राज्याची सत्ता हस्तगत करू शकतो. हा आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळे लोकशाही मुल्यावरील लोकांचा विश्वास वाढला.

८. प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय समाज व्यवस्थेची मानसिकता ओळखली. भारतामध्ये ज्या महापुरुषांनी समतावादी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांचा उल्लेख करणारा जातीवादी ठरतो. म्हणून त्यांनी या महापुरुषांच्या नावाऐवजी त्यांच्या विचारांचे राजकारण केले. त्यांची विचारधारा बहुजन समाजामध्ये रुजवली. काशीराम यांनी भारतामध्ये जातिव्यवस्थेने निर्माण केलेली विषमतावादी व्यवस्था बदलण्यासाठी जातीचाच वापर केल्याचे दिसून येते. म्हणजे प्रकाश आंबेडकरांनी जात सोडून तर काशीराम आणि जातीचा वापर करून बहुजन समाज निर्मितीचे काम केले.

९. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांना ही जाणीव होती की, कनिष्ट जातीतील लोकांना आपले शोषण होत आहे हे कळत नाही, तोपर्यंत ते शोषणमुक्त होण्यासाठी प्रयत्न करणार नाहीत. त्यामुळे त्यांच्या जातीचे भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्थान काय आहे. याची जाणीव करून दिली. परिणामी सर्व जातींना कळून आले की आपण या व्यवस्थेचे बळी आहोत. या व्यवस्थेमुळे आपली सामाजित, आर्थिक, राजकीय क्षेत्रात प्रगती होत नाही, आपल्याला या क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही. या सर्वातून मुक्त व्हावयाचे असेल तर आपल्या राजकीय सत्ता प्राप्त केली पाहिजे. त्यासाठी बहुजन समाज म्हणून एकत्र आलो पाहिजे, ही जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण झाली.

१०. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांनी मताचे मूल्य बहुजन समाजाला समजावून सांगितले त्यामुळे प्रस्थापित पक्षापेक्षा आपल्या पक्षाच्या उमेदवाराला मते देण्याकडे बहुजन समाजामध्ये कल निर्माण झाला. परिणामी काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या राजकीय पक्षांच्या मतांच्या टक्केवारीमध्ये वाढ झाली याची दिसते.

११. आजपर्यंत भारताच्या राजकारणात बहुजन समाजाचे राजकारण म्हणजे मत विकत घेणे आणि देणे असे व्यवहाराचे राजकारण असे सूत्र होते पण काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन समाजाला आत्मसन्मानाचे राजकारण करण्याची क्षमता निर्माण केल्याने

बहुजन समाज मताची विक्री न करता मत हे अधिकार आहे आणि या अधिकाराद्वारे मी माझे भवितव्य बदलू शकतो, ही भावना बहुजन समाजात निर्माण झाल्याचे दिसते.

१२. सत्तेपासून वंचित असलेल्या बहुजन समाजातील नागरिकांना लोकसभेवर व राज्याच्या विधानसभेवर निवडणुकीला उमेदवारी देऊन राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणले त्यांना मंत्रिपदे देण्यात आली. त्यामुळे घराणेशाहीच्या व प्रभुजातीच्या राजकारणाला काही प्रमाणात आळा बसला. त्यामुळे राजकीय समता निर्माण होण्यास मदत झाली.

१३. भारतात निवडणुका खर्चिक होत्या, त्यामुळे बहुजन समाजातील सर्वसामान्य गरीब लोक निवडणुकीपासून अलिप्त राहत होते. त्यामुळे वरिष्ठ वर्ग निवडणुका लढवताना दिसत होते. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय राजकारणामध्ये ज्याच्याकडे पैसा नाही अशा लोकांना निवडणुकीला उभे करून निवडून आणले. त्यासाठी व्होट दो नोट दो हा सिद्धांत पहिल्यांदा राजकारणात काशीरामांनी आणलेला दिसतो. प्रकाश आंबेडकरांनी सुद्धा याच धरतीवरती महाराष्ट्रामध्ये निवडणुका लढवून गरीब सर्वसामान्य कुटुंबातल्या लोकांना आमदार मंत्रिपदापर्यंत पोहोचविल्याचे दिसून येते.

१४. काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांनी ज्या सामाजिक व राजकीय चळवळी केल्या. त्या व्यवस्था परिवर्तनासाठी व राज्यघटनेने जो सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित केला आहे. त्या न्यायाची प्रत्यक्ष भारतीयांच्या जीवनात अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसते. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी मंडल आयोग, आरक्षण, पे बॅक टू सोसायटी, पीपल्स पार्लमेंट, सायकल रॅली, सांस्कृतिक मेळे, भूमिहीनाचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, ओबीसी वर्गाचे प्रश्न, अशा प्रश्नावर लढत राहून ते लढे यशस्वी केले व सामाजिक, राजकीय, आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

१५. भारतामध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीचे विषम वाटप आहे. यापैकी एक घटक म्हणजे जमीन. उच्चवर्गीय जाती व प्रभू जातीच्याकडे शेकडो एकर जमीन आहे तर याच्या उलट बहुजन समाजातील अनेक लोक भटके, गरीब आहेत कि ज्याना रहाण्यासाठी घर बांधण्यासाठी सुद्धा जमीन नाही. काशीराम व प्रकाश आंबेडकरांनी भारतातील नैसर्गिक व जमिनींचे वाटप न्याय पद्धतीने व्हावे यासाठी प्रयत्न केले. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे

महाराष्ट्रातील भूमिहीनांना जमीन मिळाली. तर उत्तरप्रदेशमध्ये बहुजन समाज पक्षाची सत्ता आल्यानंतर तेथील बहुजन समाज पक्षाने जो जमीन सरकारी ही वो जमीन हमारी ही हि घोषणा दिली व त्यावेळी शेकडो एकर जमीन बहुजन समाजामध्ये वाटप केली. नैसर्गिक साधनसंपत्तीचे समान वाटप हा या दोघांच्या राजकारणाचा मुख्य भाग असल्याचे दिसते.

१६. काशीराम व प्रकाश आंबेडकर यांनी भारतामध्ये सामाजिक अभियांत्रिकीचा यशस्वी प्रयोग केल्याचे दिसून येते. जातिवादाच्या शस्त्राने उच्चवर्ग व प्रभू जाती बहुजन समाजाला गुलाम बनवून स्वतःचा फायदा करून घेतात. जातिव्यवस्थेची ही संरचना आणि त्याच्या पाठीमागे असणारे शोषणाचे षडयंत्र ८५% बहुजन समाजाला या दोघांनी दाखवून दिले. व ८५% बहुजन समाजाला एकत्र करण्याचा प्रयत्न केला. उत्तरप्रदेशमध्ये चार वेळेला बहुजन समाज पक्षाची सत्ता आणून व महाराष्ट्रामध्ये अकोला पॅटर्न राबवून बहुजन समाजाला राजकीय सत्तेच्या वर्तुळात नेले. हे फक्त सामाजिक अभियांत्रिकीच्या प्रयोगामुळेच शक्य झाल्याचे दिसून येते.

१७. काशीराम व प्रकाश आंबेडकर या दोघांनी बहुजन समाजामध्ये असणारा राजकीय न्यूनगंड दूर करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. बहुजन समाजामध्ये राजकीय इच्छा शक्तीचा फार मोठा अभाव निर्माण झालेला होता. आपण कधीच सत्ताधारी होऊ शकणार नाही, अशी त्यांची भावना निर्माण झालेली होती. ही भावना दूर करण्याचे काम या दोघांनी केलेल्या कार्यातून आपल्याला दिसून येते. या दोघांनी बहुजन समाजातील मरगळ दूर केलीच पण त्याबरोबर बहुजन समाजाला राजकारणाच्या केंद्रस्थानी आणून गरीब जरी असलो तरी सत्ताधारी बनू शकतो ही इच्छाशक्ती त्यांच्यामध्ये निर्माण केली.

१८. काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय राजकारणात लोकसंख्येने कमी व जास्त असणाऱ्या जातीना त्यांच्या प्रमाणांत निवडणुकीत प्रतिनिधित्व देवून राजकीय सत्तेत सहभागी होण्याची संधी दिली. काशीरामांनी तर घोषणा केली होती, 'जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागीदारी' हा सिद्धांत भारतीय राजकारणात रूढ केला. त्यामुळे ज्या जातीना लोकसंख्या कमी असलेने कधीच प्रस्थापित पक्षांचे निवडणुकीत तिकीट मिळाले नाही. त्याना संधी मिळाली.

१९. जातीव्यवस्था आणि त्याचा पाठीमागे असणारे धर्माचे अधिष्टान नष्ट करून भारतीय समाजव्यवस्थेत आमुलाग्र परिवर्तन करून समतावादी समाजव्यवस्था निर्माण करणे हे काशीराम व प्रकाश आंबेडकर यांच्या राजकारणाचे मुख्य सूत्र राहिले आहे.

२०. भारतामध्ये बहुजन समाज बनविण्याचे प्रयत्न अनेक वर्षांपासून सुरू आहेत. पण बहुतेक बहुजन समाजातील जातींना आपण बहुजन आहोत हे काही अंशी मान्य नसल्याने बहुजन समाज निर्मितीत अडथळे येताना दिसतात.

२१. भारतात बहुजन समाज निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली की, प्रस्थापित राजकीय पक्ष धर्माच्या मुद्यांच्या आधारे राजकारण करण्यास सुरुवात करतात. कार्ल मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे धर्म ही अफूची गोळी आहे. जो ही अफूची गोळी खातो त्याला बाह्य जगाची जाणीव राहत नाही. याप्रकारे बहुजन समाज धर्माच्या राजकारणाला बळी पडतो. त्यामुळे आपले शोषण होत आहे. याचीही जाणीव त्याला होत नाही. धर्मासाठी तो सर्व काही विसरतो. त्यामुळे बहुजन राजकारण फारसे यशस्वी होताना दिसत नाही.

२२. ॲड. प्रकाश आंबेडकर आणि काशीराम यांचे बहुजन राजकारण व्यवस्थापरिवर्तन करून समताधिष्ठीत समाजनिर्मिती, सामाजिक न्याय, बंधुता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेस भक्कम करणारे आहे. बहुजन समाजाने या दोहोंच्या विचाराने आणि त्यांनी आखून दिलेल्या कार्यकमाच्या आधारे मार्गक्रमण केल्यास बहुजन समाजाच्या हिताचे ठरणार आहे.

२३. म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेच्या आधारे आपण राजकीय सत्तेपर्यंत पोहोचून व्यवस्था परिवर्तन करू शकतो. हा आत्मविश्वास बहुजन समाजामध्ये निर्माण झालेला आहे.

२४. राजकीय सत्ता ही साध्य नसून, व्यवस्था परिवर्तनाचे साधन आहे. हे तत्त्व पायाभूत ठेवून काशीराम व ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन राजकारण केल्याचे दिसते.

काशीराम आणि प्रकाश आंबेडकर यांचे बहुजन राजकारण हे समताधिष्ठित समाजनिर्मिती, सामाजिक न्याय, बंधुता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेस भक्कम करणारे आहे. बहुजन समाजाने या दोहोंच्या विचाराने आणि त्यांनी आखून दिलेल्या कार्यक्रमाच्या आधारे मार्गक्रमण केल्यास बहुजन समाजाच्या हिताचे ठरणार आहे.

## पुढील संशोधनासाठीची दिशा

भविष्यकाळात संशोधनासाठी दिशा दाखविणे ही प्रत्येक अभ्यासकाची जबाबदारी असते. सदर शोधप्रबंधामध्ये झालेल्या संशोधनाचा आढावा घेतल्यानंतर भविष्यकाळात या विषयाच्या अनुषंगाने कोणत्या क्षेत्रात संशोधन करता येईल, हे सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

१. ॲड. प्रकाश आंबेडकरांचे सद्याचे राजकारण – एक अभ्यास

२. काशीरामांच्या पश्चात बहुजन समाज पक्षाच्या राजकीय वाटचालीचा अभ्यास

३. बहुजन समाज पक्ष – काशीराम ते मायावती – एक अभ्यास

४. रिपब्लिकन पक्ष ते वंचित बहुजन आघाडी – एक राजकीय विश्लेषण

५. लोकसभा, विधानसभा निवडणुकांमधील ॲड. प्रकाश आंबेडकरांची राजकीय वाटचाल

६. ॲड. प्रकाश आंबेडकर आणि अकोला पॅटर्न सामाजिक अभियांत्रिकीचा एक अभ्यास

७. काशीरामांची सामाजिक चळवळीकडून राजकीय चळवळीकडे वाटचाल – एक अभ्यास

८. उपेक्षित समुदायाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सक्षमिकरणात काशीरामांच्या धोरणांची भूमिका– एक अभ्यास

९. महाराष्ट्रातील उपेक्षित समुदायाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमिकरणात प्रकाश आंबेडकरांच्या धोरणांची भूमिका.

१०. विकसित भारताच्या संदर्भात काशीरामांच्या विचारांचे मुल्यमापन – एक अभ्यास.

११. वंचित समुदायाचा विकास व प्रकाश आंबेडकर यांचे विचार

काशीराम व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे बहुजन राजकारण एक अभ्यास हा शोधप्रबंध पाच प्रकरणांत मांडण्यात आला असून या प्रबंधामध्ये प्राचीन भारतात समतामुलक समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी अनेक विभुतींनी जे प्रयत्न केले. त्याच प्रयत्नांच्या साखळीतील दुवा म्हणून आधुनिक काळातील म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या या विचारानुसार २० व्या शतकाचा शेवट व २१ व्या शतकाच्या सुरुवातीला काशीराम, प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांनी बहुजन राजकारणाच्या माध्यमातून व्यवस्था परिवर्तनाचा यशस्वी प्रयत्न केला. त्याचा आढावा या शोधप्रबंधातून घेतलेला आहे.